लेवा पाटीदारांचा इतिहास

लेखक: शंकर विठोबा पाटील

History of Leva Patidar

Author: Shankar Vithoba Patil

Author: Shankar Vithoba Patil, Dudhalgaon, Malkapur Tahesil, Buldhana Dist.

लेवा पाटीदारांचा इतिहास

लेखक: शंकर विठोबा पाटील

History of Leva Patidar

Author: Shankar Vithoba Patil

Author: Shankar Vithoba Patil, Dudhalgaon, Malkapur Tahesil, Buldhana Dist.

या इतिहास संशोधनास तनमनधनाने सहकार्य करणाऱ्या
कै. सौ. लक्ष्मीबाई पाटील
यांचे स्मृतीस अपर्ण.

कै. सौ. लक्ष्माबाई शंकर पाटील



जन्म	मृत्यू
कार्तिक शुध्द २ शके १८५४	स्मृती तिथी माघ शुध्द ९ शके १९१९
रोज सोमवार	रोज गुरुवार
ता. : ३१ ऑक्टोबर १९३२	ता. : ५ फेब्रुअरी १९९८

लेवा पाटीदारांचा इतिहास

अनुक्रमणिका

प्रकरण १

प्रास्ताविक

गतेतिहासाने आपली सर्वांगीण ओळख होते. केलेल्या चुका टाळण्याची दृष्टी लाभते. भावी काळात प्रेरणा मिळते. म्हणून इतिहासाचा अभ्यास करणे समाजहिताचे आहे.

पण लेवा पाटीदार समाजाचा साद्यंत इतिहास अजून कोणीच लिहिला नाही. पाडळशाचे श्रो. देवराम सखाराम बऱ्हाटे, इंदूरचे श्री. वासुदेवराव पाटील आदिंनी स्फुट लेखवजा इतिहास लेखन केले, पण लेवा पाटीदारांचा मूलगामी इतिहास ग्रंथ अद्याप कोणीच मराठी भाषेत लिहिला नाही. विद्वानांना व धनवानांना त्याची फारशी जरूरही भासली नाही.

आणि हल्ली उपलब्ध असलेल्या इतिहासाचे कोणीच लेखन केले नाही, तर केवळ उपेक्षेपायी आहे तोही उपलब्ध इतिहास विस्मृतीचे उदरात गडप होऊन जाईल. पुढील पिढीला तो शोधूनही कदाचित गवसणार नाही. म्हणून माझ्यामध्ये इतिहास लेखनाची लायकी नसूनही तो विस्मृतीत गडप होऊ नये, म्हणून जमेल तसा तो अक्षरबद्ध करीत आहे. मी इतिहासाचा तज्ज्ञ नाही व माझे पत्नीचे दीर्घ आजारामुळे त्यावर यथास्थित लेखन संस्कार करण्याचीही माझी हल्ली मन:स्थिती नाही; पण मी आतापर्यंत शोधलेला इतिहास गायब होऊ नये, तो प्रज्ञावान इतिहासतज्ज्ञांना इतिहास लेखन करण्यासाठी कच्चा माल म्हणून उपयोगी पडावा, त्यावर यथायोग्य संस्कार करून जाणत्यांनी त्याआधारे भावीकाळात लेवा पाटीदारांचा उत्कृष्ट इतिहास लिहावा; व तो समाजास व माझ्या वंशजांना मार्गप्रद व्हावा म्हणून ही छंद म्हणून जमविलेली इतिहासाची विस्कळीत सामूग्री परिस्थिती-वश लेखन-संस्कार न करताच प्रकाशित करीत आहे. हेतु हा की, उत्तम इतिहासकारांना हवी असलेली लेखन-सामुग्री विस्मृतीचे उदरात गडप होऊ नये.

आमच्याकडील ओला दुष्काळ, पत्नीचा भयानक आजार (कॅन्सर) व आदी आकस्मित खर्चामुळे आहे तोही छापणे कठीणच, पण आता छापला नाही तर कधीच छापला जाणार नाही ह्या मनस्थितीत स्वत:चे एक शेत विकून तो शुद्ध समाजप्रेमभावनेने प्रकाशित करीत आहे. तो सर्वांग परिपूर्ण नाही याची मला जाणीव आहे. तरी पण ज्या समाजात जन्मलो त्याचे समाजऋणातून मुक्त व्हावे ह्या हेतूने समाजबंधूचे सेवेशी तो नम्रतेने सादर करीत आहे.

प्रकरण २

लेवा लोक

जगात १७० स्वतंत्र देश असून ६३ अंकित देश आहेत. त्यापैकी भारत नावाच्या देशातच लेवा पाटीदार वस्ती आहे.

सुमारे ४५०० वर्षांपूर्वी (इ.सन.पूर्व २५००) सिंधू नदी तीरावर सिंधू संस्कृती होऊन गेली. त्याही पूर्वी तैग्रीस व युफ्राटीस नद्याकाठी मेसोपोटियन संस्कृती होऊन गेली. लेखन-कला व कालमापन हे प्रगतीचे टप्पे तिने गाठले होते. इ.सन. पूर्व ३००० मध्ये नाईल नदीतिरी इजिप्शियन संस्कृतीत सौर कालमापन व दशांश पद्धतीचा शोध लागला. वगैरे अशा प्रमुख सात संस्कृती उदयास आल्या; पण त्यापैकी सिंधू संस्कृती आपल्या भारतीयांना जवळची आहे. तिचा विस्तार बलुचिस्तान, वायव्यभारत, सिंध, पश्चिम पंजाब, बहाबलपूर, राजस्थान, हरियाना, पूर्व पंजाब, गंगा-यमुना, दोआब, जम्मू, गुजरात, उत्तर अफगाणिस्तान या भूभागात झाला होता. यापैकी पाकिस्तानातील पश्चिम पंजाबात शाहीबाल जिल्हयात रावी नदीच्या डाव्या तीरावर नदीपासून ३.६० किलोमीटर अंतरावर हडप्पा नगर वसले होते. तेथे दक्षिणोत्तर ४२० मीटर व पूर्व-पश्चिम १९६ मीटर क्षेत्रफळाच्या समलंब चतुर्भुज दुर्गाचे उत्तरेस प्रवेशद्वार असल्याचे सापडले. श्री. दयाराम सहानी यांनी सन. १९२१ मध्ये हे संशोधन केले.

याच भागात माझ्या मते लेवा कुणबी कुळाची पाळेमुळे असावीत. कारण, येथेच रावी नदी तीरी लेवा पाटीदारांचा मूळ पुरुष प्रभू रामचंद्राचा मुलगा लव हा (लाहोर शहर) लवपूर वसवून नांदला होता. येथील मूळ संस्कार लेवा पाटीदारावर झाले असावेत.

कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा लेखक - डॉ. रामसियासिंह, समता प्रकाशन-सतना (म.प्र.) पृष्ठ ५४ परिच्छेद २ रा पहा. - "स्मरणीय है कि लवके द्वारा लवपूर (वर्तमान लाहोर) नगरी बसाई गई थी। लव और कुश के वंशज अभी भी क्रमशः लेवा और कडवा अपभ्रंश नामसे गुजरात तथा मध्यप्रदेश के पश्चिमी जिलो, धार, खरगोण आदि में पाये जाते है।"

तसेच, पृष्ठ ६०, ओळ १३ वर पहा : - "लववंश यह वंश रामके पुत्र लवसे चला है। अतः सूर्यवंशके अंतर्गत है। नेपालके राजा अपनेको लववंशी ही मानते है। (तत्पुत्रः सूर्यतुल्यो लव इति विदितो। (इन्स्क्रिप्शन्स फ्राम नेपाल, पृष्ठ २९ से ३१ पहा).... लव वंश के कूर्मीक्षत्रिय वर्तमानमे गुजरातमे बहुतागायत मे है। गुजरातमे वे लव्वा कणबी कहे जाते है। उनमे परंपरागत कथा प्रचलित है कि, "जब अंतर्वेद (गंगा और यमुना नदीयो के बीच का भूभाग) मे राजपूतोने अपना आधिपत्य स्थापित किया, तब वहासे उनके पूर्वज (लव वंशी) कुछ लाहोर और कुछ गुजरात चले गये थे।" असे पृष्ठ ६० वर डॉ. रामसियासिंह साधार संशोधन करतात.

तसेच, पृष्ठ ६१, परिच्छेद १ मध्ये- डॉ. रामसियासिंह लिहितात की, "बॉम्बे गॅझेटियर जिल्द ९ भाग १ मे जुनागड निवासी श्री. हेमभाई अजभाई वहीवाटदारका १८८९ इसवी का यह कथन अंकित है, "रामचंद्रके दो पुत्र थे। एक का नाव लव और एकका नाम कुश। लव के लवगण तथा कुशसे कडवा (कुशवंशी कुम्बी) उत्पन्न हुए।"

बॉम्बे गॅझेटियरमे कहा गया है कि, गुजरातमे कणबी लोगोके प्रमुख चार भेद है। आंजन, कडवा, लव, तथा मतीय... लवा के दो भेद है। पाटीदार (पट्टीकर वसुल करणारे) तथा कृषक (शेती करणारे)... गुजराथी कूर्मी अयोध्येसे बहिष्कृत होकर मथुरामे वसे थे। फिर वहासे भी

विवश होकर हटे और मारवाड होते हुए गुजरातमे आये। अनुमान है कि वे आजसे लगभग २००० वर्ष पूर्व गुजरातमे आबाद हुए। (पृष्ठ ६१ वरून)

असा हा लेवा पाटीदार समाज खिस्तपूर्व १५०० ते २००० च्या सुमारास स्थापन झालेल्या हिंदूधर्माचा अनुयायी आहे. वेदशास्त्र पुराणोक्त संस्कृतीचा हा समाज भारत, नेपाळ व मादागास्करमधील हिंदूधर्मियात मोडतो.

जगात हिंदूची संख्या सुमारे ६४.६८ कोटी असून यापैकी लेवा कुणबी समाज आहे. लंडनजवळील ग्रिनीच या मूळ रेखावृत्ताच्या पूर्वेकडील ८२°.३० पूर्व या रेखावृत्तावरील भारतीय प्रमाणभूत वेळ ग्रिनीच वेळेपेक्षा ५ तास ३० मिनिटे पुढे आहे. हीच लेवा पाटीदार समाजाने प्रमाणभूत वेळ मानली आहे.

भारताची लोकसंख्या सुमारे ९० कोटी आहे. त्यात तुलनेत लेवा पाटीदार नगण्य ठरतात. लेवा कुणबी समाज पंजाब, राजस्थान, मध्यप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र, उत्तरप्रदेश आदी भागात असून पंजाबी, हिंदी, गुजराथी, मराठी भाषिक आहे.

प्रकरण ३

मराठी भाषिक लेवा पाटीदार

इ.सन, पूर्व ४० लक्ष वर्षापूर्वी पृथ्वीतलावर मानव अवतरला, व इ.सन. पूर्व दीड ते दोन लक्ष वर्षापासून भारतामध्ये मानवाने वस्ती केली.

आद्य पुराश्म युग, मध्य पुराश्म युग, उत्तर पुराश्म युग, मध्याश्म युग, नवाश्म युग (ताम्र-पाषाण युग), सैंधव सभ्यता युग, सावळदा संस्कृतीचे युग, सिंधू संस्कृती युग, माळवा संस्कृती युग, जोर्वे संस्कृती युग, पूर्व वैदिक युग ह्या क्रमाने मानव-वंशाची वाटचाल होत गेली. नंतर इ.सन. पूर्व १५०० च्या सुमारास आर्यांचे भारतात आगमन होऊ लागले.

त्यांच्या मूळ स्थानाबाबत विद्वानांत अनेकांची अनेक मते आहेत. पण तैग्रीस व युफ्राटिस नद्याकाठच्या काही भटक्या टोळ्या भारतात येऊ लागल्या. त्यापैकी आर्य, ग्रीक, हूण, शबर, शक, गुर्जर आदी लोक वायव्य भारतातून या देशात प्रवेशिले.

इ.सन, पूर्व १५०० ते १००० ह्या काळात आर्यादी लोक आले. ह्या पूर्व वैदिक युगात ऋग्वेद रचना सुरू झाली.

इतिहास व पुराणांचा मागोवा घेतल्यास इ.सन. पूर्व ४०२१ वर्षापूर्वी स्वायंभूव मनु व त्याची पत्नी शतरूपा झाली असावी. इ.सन, पूर्व २७६१ च्या सुमारास त्याचे वंशात ४५ वे पिढीत दक्षराजा झाला. त्याची अदिती नावाची मुलगी-मारीची-कश्यपास दिली. त्या जोडप्यापासून विवस्वान उर्फ सूर्य जन्मला. ह्या सूर्यापासून उर्फ विवस्वनापासून वैवस्वत मनु व त्यापासून ईक्ष्वाकू ह्या क्रमाने सूर्यवंशाची निर्मिती झाली.

ह्या वंशक्रमाबाबतही पुराणात भिन्न मते आहेत. काहींच्या मते ३९ वे पिढीत प्रभू रामचंद्र व त्यापासून पुढील पिढी म्हणजेच ४० वे पिढीत लव व कुश हे सीता-पुत्र जन्मलेत, तर काहींच्या मते या वंशात ६५ वे पिढीत प्रभू राम व ६६ वे पिढीत कुश व लवाचा जन्म झाला.

ह्याच वंशात ५४ वे पिढीत (काहींच्या मते सुमारे इ.सन पूर्व १२७७ मध्ये) झालेल्या भारतीय

महाभारत युद्धात बृहद्बल, न्युपिताश्व व श्रुतायुश हे लवकुशाचे वंशज मारले गेले. लवानंतर ५५ व्या पिढीत पुढे ह्याच वंशातील सुमित्र राजा पंजाबात राज्यहीन झाला. व त्याचे चौथ्या पिढीतील कनकसेन हा इ.सन १४४ मध्ये गुजराथेत आला. तिथे काही पिढ्या नांदल्यानंतर यवनांच्या उपसर्गामुळे इ.सन १३५१ किंवा इ.सन १४८७ मध्ये त्याच वंशातील काहींनी तापीतीराने बऱ्हाणपूरमार्गे यावल, पाडळशे, दाताळा या भागात वस्ती केली. त्याच वंशात प्रस्तुत लेखकाचा स्वायंभूव मनुपासून सुमारे २१३ व्या पिढीत ता. ९ नोव्हेंबर १९२६ रोजी बुलडाणा जिल्हयात नळगंगातीरी मोताळा तालुक्यात (आजोळ गाव शेलापूर खुर्द) येथे त्यांचा जन्म झाला.

पूर्वी भारताचे स्वरूप, नाव, भूभाग हल्लीच्या भारतापेक्षा अलग होता. भारतास पूर्वी आर्यावर्त म्हणत असत व त्यात नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेश, अफगाणिस्थान, पाकिस्तान हे भाग येत. हल्ली भारताचे स्थान व विस्तार उत्तरेकडे संकुचित होऊन तो दक्षिणेकडे विस्तारला. उदा.-

स्थान ८°.४ 'उत्तर अक्षांस ते ३७°.४' 'उत्तर अक्षांस व ६८°.७ पूर्व रेखांश ते ९७°.२५' पूर्व रेखांशात आहे. त्याची दक्षिणोत्तर लांबी ३२१४ कि.मी., पूर्व-पश्चिम रूंदी २९३३ कि.मी., क्षेत्रफळ ३२८७२६३ चौरस कि.मी., भू-सरहद्द १५२०० कि.मी. किनारपट्टीसह, लोकसंख्या सन १९९१ मध्ये ८४३९३०८६१, लोकसंख्येची घनता दर चौ. कि. मीटरमध्ये २६७ व्यक्ती आहे. त्यात एकूण २५ राज्ये व ७ केंद्र शासित प्रदेश आहेत.

सर्वाधिक खपाचे वृत्तपत्र - मल्याळम् मनोरमा (केरळ) ६.५ लाख व सर्वाधिक खपाचे इंग्रजी वृत्तपत्र 'टाईम्स ऑफ इंडिया' ६.५ लाख आहे.

भारतात १ ली आगगाडी १६ एप्रिल १८५३ मध्ये मुंबई ते ठाणे मार्गावर धावली. नंतर ती लेवा परिसरात सन १८६३ चे सुमारास आली. तसेच,, पहिली हवाई वाहतूक सन १९३२ पासून तर पहिले डाक तिकीट सन १८५२ मध्ये कराचीस काढले. पहिले तारायंत्र भारतात १८५१ मध्ये तर पहिली दूरध्वनी सेवा सन १८८१ मध्ये येऊन त्यानंतरच ती लेवा परिसरात आली. सन १९७२ मध्ये पिनकोड पद्धती सुरू झाली. सहा अंकी पिनकोडमध्ये १ ला अंक क्षेत्र तर दुसरा अंक उपक्षेत्र दर्शविते. पहिले तीन अंक एखादे पृथक्करण क्षेत्र दर्शवितात. शेवटचे तीन अंक पृथक्करण क्षेत्रातील डाकघर दर्शवितात, व एकूण ६ अंकाने देशाचे कोणतेही डाकघर कळते. ह्यापैकी १ ला अंक ३ असल्यास राजस्थान, गुजरात, दमण व दीव प्रदेश दर्शविते, तर पहिला अंक ४ असल्यास महाराष्ट्र, मध्यप्रदेश व गोवा प्रदेश दर्शविते. ह्या प्रदेशातच प्रामुख्याने लेवा पाटीदार नांदतात. म्हणून १, २, ५, ६, ७ व ८ ने सुरू होणारा पिन कोड क्रमांक हा लेवा पाटीदारांच्या गावांचा शक्यतो नसतोच. त्यातही मराठी भाषिक लेवा पाटीदार फक्त महाराष्ट्रातच असल्याने पीन कोड क्रमांकाचा पहिला अंक ४ हा असल्यासच ते लेवा पाटीदार परिसराशी (मराठी भाषिक) शक्यतो संबंधित असू शकेल. शक्यतो म्हणण्याचे कारण की, लेवा पाटीदार व्यक्ती व्यतिरिक्त इतरही जमाती ह्या परिसरातच नांदतात. म्हणून ठोकळमानाने ४ व्यतिरिक्त अंकाने प्रारंभ होणारा पिनकोड हा मराठी भाषिक लेवा पाटीदारांच्या मूळ वसतीस्थान असलेल्या गावांचा सहसा नसतोच. व्यापार, धंदा, नोकरीनिमित्त स्थानांतर केलेल्या मराठी भाषिक लेवा पाटीदार गावांचा असू शकतो.

भारतीय घटना ता. २६-१-१९५० पासून लागू झाली. आपला राष्ट्रीय ध्वज केशरी, पांढरा व हिरवा अशा तीन आडव्या पट्ट्यांचा आहे. मधल्या पट्ट्यावर २४ आऱ्यांचे चक्र असून रूंदी व लांबी २ X ३ असते. राष्ट्रगीत रविंद्रनाथ टागोर (सन. १८६१ ते १९४१) यांचे विरचित 'जन-गण-मन' हे गीत आहे. ता. २२-३-१९५७ पासून भारतात राष्ट्रीय पंचांग सुरू झाले. वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी आहे. तर मोर हा राष्ट्रीय पक्षी आहे. १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्यदिन, तर २६ जानेवारी हा प्रजासत्ताक दिन व १ मे हा महाराष्ट्रदिन आहे. १० डिसेंबर हा मानव हक्क दिन आहे.

भारतात १ ले वर्तमानपत्र गुजराथी समाचार, मुंबई १८२९, तर पहिले नभोवाणी केंद्र मुंबईस १९२७, तर पहिले दूरदर्शन केंद्र दिल्लीस सन १९५९ व मुंबईस १९७२ मध्ये सुरू झाले. इंग्लंडला भेट देणारा पहिला भारतीय राजा राममोहन रॉय सन १८३२ मधील होय. **वरील भौतिक प्रगतीचा संपर्क लेवा परिसरात वरील तारखानंतरच येऊन पोहोचला.**

भारतात महाराष्ट्रातच मराठी भाषिक लेवा पाटीदार नांदतात. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३०७६९० चौ.कि.मी. असून लोकसंख्या ७८७०६७१९ असून राजधानी मुंबई व राजभाषा मराठी, तर राष्ट्रभाषा हिंदी आहे. भारतात ४१२ जिल्हे असून त्यापैकी ३१ जिल्हे महाराष्ट्रातच आहेत व त्यातही फक्त जळगाव व बुलडाणा जिल्हयातच मराठी भाषिक लेवा पाटीदार नांदतात. भारतात ६०५२२४ खेडी आहेत, तर महाराष्ट्रातील ३९३४५ खेडी यात समाविष्ट आहेत व **त्यापैकी जळगाव जिल्हयातील रावेर, यावल, जळगाव, भुसावळ व एदलाबाद ह्या तालुक्यातील सुमारे १४० गावातच म्हणजे जळगाव जिल्हयाचे पूर्व व मध्य भागात लेवा पाटीदारांची वस्ती आहे,** असे महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी खात्यातर्फे प्रकाशित झालेल्या 'महाराष्ट्राचे जिल्हे जळगाव' पृष्ठ १३ वरील लोकजीवनाची वैशिष्टये नामक प्रकरणात परिच्छेद ३ मध्ये दिले आहेत. "हे लेवा पाटीदार शेतकरी दक्षतेने व कष्टाने शेती करण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. थोड्या जमिनीतूनही ते जास्त उत्पन्न काढतात. त्यांची राहणीही हिशेबी व काटकसरी असते. त्यांच्या बरोबरीने त्यांच्या बायकाही शेतीत राबतात. लेवा पाटीदार समाज शेतीप्रमाणे शिक्षणातही जागरुक आहे. या समाजातील लोक उच्च शिक्षणासाठी परदेशीही जातात. सुशिक्षित असूनही शेती करण्यात ते कमीपणा मानीत नाहीत. उत्तम शेती, व्यवस्थित राहणी व शिक्षणाची तळमळ इ. गुणामुळे हा समाज जिल्हयात प्रगतिशील व आघाडीवर असतो." असे पृष्ठ १३ व १४ वर महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केले आहे.

याशिवाय बुलडाणा जिल्हयातील मलकापूर, मोताळा व नांदुरा ह्या तीन तालुक्यात प्रामुख्याने मराठी भाषिक लेवा पाटीदारांची वस्ती सुमारे ८० गावातून आहे. महाराष्ट्र शासनाच्या सन १९७६ मधील बुलडाणा जिल्हा गॅझेटियर सुधारित इंग्रजी आवृत्तीत पृष्ठ २२७ वर लेवा पाटीदारासंबंधी पुढील उल्लेख आहे-

"The Sect of kunbis known as the Leva Patidars is only found in Berar in the Malkapur tahasil of the District and deserves a separate notice. The Leva Patidars (Pajne) are found in about 80 villages near khandesh. Another local name for them is Revas....

The Word Pajne is traced to Pavakhand which they say formerly formed a part of Gujarat and Reva is supposed to be derived from the river Reva in Gujarat. In Gujarat, however Leva is said to mean mild as apposed to kadava (bitter) anohter sub-caste of Knubis.... The Leva Kunabis of Gujarat are really of Gujar origin.

After marriage the woman wear in one ear an ear ornament called pachatur, a ring of gold with five corals and five beads of gold. It is a certain means of identifying a Leva Patidar ... Now-a-days they have made immense progress in education. They have a reputation for economy. They are very industrious and assist each other in need. They abstain from the use of alcohal and both socially and mentally they rank above the other kunbis. Some of them are watandar Patels. He cherishes a strong love for his watans (heridetory holding and rights.)" The Kunbis domestic life is happy and cheerful. He is an affectionate husband and loving father. Industrious he is, he rises early, and retires late... Thus his life is one of toil and exposure..... The kunbi women are very industrious and are

perhaps more energatic than men."

म्हणजेच जळगाव जिल्ह्यातील १४० गावे + बुलडाणा जिल्ह्यातील ८० गावे मिळून एकूण २२० गावातूनच फक्त मराठी भाषिक लेवा पाटीदारांची मूळ वस्ती आहे. तेथूनच ते नोकरी व व्यवसायानिमित्त इतरत्र विखुरत आहेत.

अशा या लेवा पाटीदार वस्तीचे मध्यवर्ती ठिकाण मुंबईपासून ४४५ किलोमीटर अंतरावरील भुसावळ शहर आहे. देशातील प्रमुख राष्ट्रीय मार्गांपैकी धुळे, नागपूर, कलकत्ता ह्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर प्रामुख्याने मराठी भाषिक लेवा पाटीदार वस्तीची गावे आहेत. सुदैवाने जवळच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ या मार्गावरच उघडले आहे. त्यात ५० महाविद्यालये व २५००० विद्यार्थीही आहेत.

तसेच, ह्या भुसावळ शहरातून मुंबई-कलकत्ता हा भारतीय मध्य रेल्वेचा प्रमुख लोहमार्ग गेला आहे. तेथूनच भुसावळ -सुरत मार्ग जातो. तसेच,, मुंबई-भुसावळ-दिल्ली लोहमार्गही भुसावळवरूनच जातो. मुंबई, नागपूर, दिल्ली ह्या मराठी भाषिक लेवा पाटीदारांना उपयुक्त राजधान्या, सुरतबंदरासारखे व्यापारी शहर व अंतर्गत लेवा परिसरातील लहान-मोठे रस्ते भुसावळ शहराशी जोडले गेले व ते वरील २२० गावांचे मध्यवर्ती ठिकाणी असल्याने सर्व मराठी भाषिक लेवा पाटीदारांची सर्वांगीण एकात्मता साधण्यासाठी अ.भा.लेवा पाटीदार महामंडळाच्या आक्टोबर ते डिसेंबर १९९४ च्या श्री. म.ओ. राणे संपादित त्रैमासिक अंकात, पृष्ठ ९ वर "भुसावळ जिल्हा व्हावा. ८० गावें जोडावीत !" हा लेख मी लिहून समाजास जागविण्याचा प्रयत्न केला. पण त्याला प्रतिसाद मिळाला नाही. त्या अभावी. एक जिल्हा, एक जिल्हा परिषद, एक रेव्हेन्युविभाग, एक जिल्हा कचेरी, साऱ्या मराठी भाषिक लेवा पाटीदारांचे सर्व मार्गांनी जोडलेले, शिवाय मध्यवर्ती लेवा वस्ती केंद्र, तापीतिरी वैभवाने बहरलेले आपण पाहू शकत नाही हे आपले दुर्दैव आहे.

प्रकरण ४

उपयुक्त कालसूची

टीप :- अशा ह्या ब्रह्मांड उर्फ पृथ्वीवर वसलेल्या मराठी भाषिक लेवा पाटीदारांची प्रारंभापासून वर्तमानकालपर्यंतची प्रगतीची वाटचाल अभ्यासण्यासाठी संदर्भ सहाय्यार्थ दिलेली उपयुक्त कालसूची. ही कालसूची निरनिराळ्या उत्कृष्ठ संदर्भ ग्रंथांतून घेतली आहे.

इ.सन पूर्व ४०००००० ते ४२००००० वर्षांपूर्वी पृथ्वीवर मानव अवतरला.
इ.सन पूर्व ०२००००० ते ०१५०००० वर्षांपूर्वी भारतात मानव अवतरला.
इ.सन पूर्व ०३००००० ते ०१००००० वर्षे आद्य पुराश्म युग
इ.सन पूर्व ०१००००० ते ००३०००० वर्षे मध्य पुराश्म युग
इ.सन पूर्व ००३०००० ते १०००० वर्षे उत्तर पुराश्म युग
इ.सन पूर्व ००१०००० ते ४००० वर्षे मध्याश्म युग
इ.सन पूर्व ४००० ते २७०० वर्षे नवाश्म युग (ताम्र-पाषाण युग)
इ.सन पूर्व २५०० ते १५०० वर्षे सैंधव सभ्यता काल
इ.सन पूर्व २००० ते १८०० वर्षे सावळदा संस्कृती (नंदुरबार तालुका)
इ.सन पूर्व १८०० ते १६०० वर्षे सिंधू संस्कृती (तापी तीरी गुजराथेत)
इ.सन पूर्व १६०० ते १४०० वर्षे माळवा संस्कृती
इ.सन पूर्व १५०० ते वर्षे आर्यांचे भारतात आगमन
इ.सन पूर्व १४०० ते १००० वर्षे जोर्वे संस्कृती
इ.सन पूर्व १५०० ते १००० वर्षे पूर्व वैदिक युग (ऋग्वेद-रचना काल)
इ.सन पूर्व १००० ते ५०० वर्षे उत्तर वैदिक युग (महाभारत काल)
इ.सन पूर्व ९०० ते साली महाभारत युद्ध झाले (आनंदकुमार महाजन)
इ.सन पूर्व १२७७ मध्ये महाभारत संग्राम काल होय. (डॉ. सिंग, पृष्ठ ४१)
आज शके ५०९९ हा युधिष्ठिर शक चालू आहे. (ता. २४.८.९७ ला)
आज शालिवाहन शके १९१९ चालू आहे. (ता. २४ ऑगस्ट ९७ रोजी)
आज विक्रमसंवत २०५३/५४ वर्ष चालू आहे. (ता. २४ ऑगस्ट ९७ रोजी)
आज महावीर संवत २५२३/२४ वर्ष चालू आहे. (ता. २४ ऑगस्ट ९७ रोजी)
आज इसवी सन १९९७/९८ वर्ष चालू आहे. (ता. २४ ऑगस्ट ९७ रोजी)
आज हिजरी सन १४१७/१८ वर्ष चालू आहे. (ता. २४ ऑगस्ट ९७ रोजी)
आज शिव संवत ३२३/२४ वर्ष चालू आहे. (ता. २४ ऑगस्ट ९७ रोजी)
इ.सन पूर्व १३०० ते ११०० मध्ये रामायणाचे लेखन झाले.
इ.सन पूर्व ८०० ते मध्ये लोखंडाचा शोध लागला.
इ.सन पूर्व ८०० ते मध्ये आर्यांचा दक्षिण भारत प्रवेश झाला.
इ.सन पूर्व ६०० ते मध्ये उपनिषद काल + मगधांचा उदय.
इ.सन पूर्व ७०० ते ५०० मध्ये लोहयुग अवतरले.
इ.सन पूर्व ५६३ ते ४८३ सिद्धार्थ गौतम बुद्ध
इ.सन पूर्व ५४० ते ४६८ भगवान वर्धमान महावीर
इ.सन पूर्व ४१२ ते इ.सन पूर्व ३४४ शिशुनाग वंश बी.सी.

इ.सन पूर्व ४०० ते इ.सन पूर्व २०० मध्ये मौर्यकाल.
इ.सन पूर्व ३६२ नंद वंशाचा उदय.
इ.सन पूर्व ३२७ ते ३२५ सिकंदरची स्वारी
इ.सन पूर्व ३२३ सिकंदरचा मृत्यू, मगधात नंदाचा उदय.
इ.सन पूर्व २७३ ते २३२ सम्राट अशोक
इ.सन पूर्व १८५ ते १४८ = ३६ वर्षे मौर्यांचे पतन + पुष्पमित्रशृंग राज्यारूढ
इ.सन पूर्व ९० युनान साम्राज्य भारतातून नष्ट करून शकांचा अंमल सुरू
इ.सन पूर्व ८३ ते ८० रोमन साम्राज्याचा विस्तार
इ.सन पूर्व ७१ शृंग वंशाचा अंत
इ.सन पूर्व ६० सातवाहन वंशाची स्थापना.
इ.सन पूर्व ५८ विक्रम संवत प्रारंभ
इ.सन पूर्व ४ ते २९ येशू ख्रिस्त
इ.सन पूर्व ३२१ ते १८४ - मौर्य साम्राज्य (महाराष्ट्र राज्य परिचय, पृष्ठ १६ वरून)
इ.सन दुसऱ्या शतकापर्यंत असे एकूण ३०० वर्षे सातवाहन उर्फ आंघ्रभृत्यांचे राज्य
इ.सन २४९ पासून त्रैकुटकाचे राज्य
इ.सन ३०० ते ६०० पर्यंत वाकाटकांचे राज्य. त्यानंतर अल्प काळ कलचूरी राज्य.
इ.सन ७६० पर्यंत व पुन्हा ९७३ ते ११८० पर्यंत महाराष्ट्रावर चालुक्यांचे राज्य होते.
इ.सन ९६० ते ९७३ राष्ट्रकूट राज्य.
इ.सन ११८९ मध्ये चालुक्याचा अस्त व देवगिरीचे यादव राज्य सन ११८९ ते १३०७
इ.सन १२७२ ते ७३ ब्राह्मणशाहीने चक्रधराचा खून केला. (महदाश्रम, हेमाद्री वगैरे)
इ.सन १२८७ ज्ञानेश्वरास शुद्धिपत्र मिळाले.
इ.सन १२९४ अल्लाउद्दीनाने देवगिरीचा पाडाव करून राजकन्येशी लग्न केले.
इ.सन १२९० (शके १२१२) वर्णाश्रमधर्म रक्षणार्थ ज्ञानेश्वरांची गीता टीकारूपी ज्ञानेश्वरी लिहिली.
ता. ३-१०-१२९६ अल्लाउद्दीनाचे दिल्लीतक्तावर राज्यारोहण झाले.
इ.सन १२९१ (ज्ञानेश्वरी लेखनानंतर शके १२१२ चे शेवटी शके १२१३ चे प्रारंभीचे कालात जन्माधिष्ठित चातुवर्ण्य तत्त्वज्ञानाचा सर्वोच्च नाथपंथी प्रचारक (बहुधा संत ज्ञानेश्वर असावेत.) चा दामोधर पंडित या गुणकर्माधिष्ठ चातुवर्ण्य मानणाऱ्या महानुभावाने पूर्ण पराभव केल्यामुळे ताटी लावून जीवनसमाप्तीसाठी समाधी घेणाऱ्या संत ज्ञानेश्वरांस संत मुक्ताबाईने उपदेश करून संत नामदेवाचे वारकरी पंथात शिरण्याची लडिवाड विनंती केली, ताटीचे अभंग ऐकून ज्ञानेश्वराने हळूहळू शके १२१३ ते १२१७ पर्यंत नाथपंथ सोडून संत नामदेवाचे वारकरी पंथात प्रवेश केला व वर्णविषमतेचा ब्राह्मणीधर्म सोडून समतावादी वारकरी धर्म स्विकारला. व संत नामदेव फडात दाखल झाले.
इ.सन पूर्व ३०० च्या सुमारास (जळगाव) खानदेश प्रदेशात बौद्धधर्मीय राजसत्ता होती. (महाराष्ट्राचे जिल्हे जळगाव, पृष्ठ ६, महाराष्ट्र शासन)
इ.सन पूर्व ३२५ सिंधचा प्रमुख युनानी क्षत्रपाची हत्या
इ.सन पूर्व ३१७ चंद्रगुप्ताने पश्चिम पंजाबकडून युनान प्रदेश जिंकला.
इ.सन पूर्व २३२ ते २२९ कुणालपुत्र दशरथ
इ.सन पूर्व २२२ ते इ.सन पूर्व १४८ दशरथसूत संप्रती, नंतर शालीशुक, नंतर देवधर्मन, नंतर शतधन्वा व शेवटी वृहद्रथ मौर्य राजा झाला.
इ.सन पूर्व १८४ ते १४८ = ३६ वर्षे बृहद्रथाचा खून करून त्याचा सेनापती शृंगाने राज्य केले.
इ.सन ७८ सिथियन शक चष्टन वंश संस्थापक सामोतिक
इ.सन १३० ते १५० रूद्रदामन संस्कृतचे पुनरुज्जीवन, वैदिक धर्मास पाठिंबा

इ.सन १५० (शके ७२ मध्ये) रूद्रदामनचा गिरनार अभिलेख राजधानी उज्जैन. मौर्य घराण्यात अशोक, दशरथ, संप्रति, शालिशूक, देवधर्मन, शतधन्नव व शेवटी बृहद्रथ मौर्य राजे १८४ इ.सन पूर्वपर्यंत झाले.

इ.सन १२८७ ते १२९० कैकुबाद

इ.सन १२९० ते १३२० खिलजी वंश

ता. १३ जुलै १२९६ अल्लाउद्दीनने जलालउद्दीनचा खून केला.

इ.सन. १२९६ ते १३१६ अल्लाउद्दीन खिलजी

ता. ३ ऑक्टोबर १२९६ अल्लाउद्दीनचा राज्याभिषेक झाला.

इ.सन १२९८ च्या उत्तरार्धात अहमदाबादजवळ राजा कर्णचा पराभव करून त्याची पत्नी कमलदेवीशी विवाह केला.

इ.सन १४१२ मध्ये अहमदाबाद नगर सुलतान अहमदशहाने वसविले.

इ.सन १४० मध्ये क्षत्रप जयदामाने सौराष्ट्रात गिरीनगरला क्षत्रप राज्य स्थापले.

इ.सन १३८ पर्यंत कुशाणवंशीय हुविष्काने राज्य केले. (यु. इतिहास, लेखक मित्तल, पृष्ठ १२२ पहा.)

इ.सन १५६ मध्ये माधावलीचे कुर्मी राजा व्रजपालजीने उंझा नगर वसविले.

इ.सन १४४ मध्ये लवाचा ५९ वा वंशज कनकसेन पंजाबहून गुजराथेत प्रथम आला होता असे श्री. केशलाल पटेलकृत पाटीदारोंका इतिहास, पृष्ठ २० व उदय पुरोदय लेखक- भातेन्दु हरिश्चंद्र पृष्ठ ६८२ असल्याचे आपले लेवा परिवार एप्रिल ते जून १९९४, पृष्ठ ५ वरील चतुवर्णात पाटीदार वर्गाचे स्थान वासुदेवराव एच. पाटील लिहितात.

इ.सन. १४४ सुमित्रानंतर चौथे पिढीतील कनकसेन, त्याचे भाऊबंध व सहयोगी गुर्जर वायव्य भारतातील गुर्जर प्रदेशाहून सौराष्ट्रात आले म्हणून सौराष्ट्राचे नाव गुजराथ असे झाले. असे उत्तरप्रदेश शासकीय हिंदी संस्थानाने प्रकाशित केलेल्या प्राचीन भारत का भुगोल पृष्ठ ४७४ वर लिहिले असे वासुदेवराव पाटीलांचे पाटीदार वर्गाचे चतुवर्णात स्थान ह्या लेखात पृष्ठ ५ वर पहा.

इ.सन १०६ ते १९० गौतमपुत्र सातकर्णीचे खानदेशावर राज्य होते. (जळ., गॅझेट, पृष्ठ ४५)

इ.सन. पूर्व १८० मध्ये गंधार देशात माऊस उर्फ मोन हा १ ला शक राजा झाला.

इ.सन. पूर्व २०० ते इ.सन २०० मनुस्मृतीचे लेखन झाले.

इ.सन २५० मध्ये शिवदत्ताचा सूत राजन ईश्वरसेनने अभिरराज्य स्थापले. (वु. गॅझेट ५२)

इ.सन ३८० ते ४१५ चंद्रगुप्त दुसरा (ब्राह्मणधर्माचे सुवर्णयुग) यात अस्पृश्यता, सामाजिक विषमतेचा ब्राह्मणी धर्म होता. (सन. ५५० पर्यंत)

इ.सन ४०५ ते ४११ फाहाएन प्रवासी.

इ.सन ३२० गुप्तराज्य संस्थापना व अंत इ.सन ५५० मध्ये.

इ.सन ३८० विक्रमादित्याचे सिंहानस्थ होणे

इ.सन ६०६ हर्षवर्धन राज्यारूढ

इ.सन ७५३ राष्ट्रकुट

इ.सन ९८५ चोल

इ.सन ११७० ते ११९३ जयचंद्र

इ.सन ११७८ ते ११९२ पृथ्वीराज चव्हाण

इ.सन ७३० तोमर वंशाने दिल्ली शहर वसविले.

इ.सन ७१२ मध्ये इब्से कासिम या मुस्लीम्राचे भारतावर पहिले आक्रमण.

इ.सन ४६७ मध्ये गीता लेखन झाले. (श्री. तेलंगाचे मते खिस्त पूर्व २००, प्रा. गार्वेच्या मते इ.सन २०० ते ४००, कोसंबीच्या मते सन ४६७ मध्ये भागवतगीता लिहिली. हे ब्राह्मणी साहित्य ले. डॉ. आंबेडकर, पृष्ठ ८ व ९ वर पहा.)

इ.सन ११८८ विवेकसिंधू ग्रंथ, मुकुंदराज कवीने लिहिला.

इ.सन ७८८ ते ८२० श्रीमत आद्य शंकराचार्य

इ.सन ९९९ ते १०५८ ज्योतिष रत्नमाला या मराठी आद्य ग्रंथाचे लेखक- श्रीपती रोहिणखेडकर ता. मोताळा, जिल्हा - बुलढाणा चे लेखन

सन ११८९ श्री विठ्ठलाचे लहानसे आद्य मंदिर पंढरीस बांधले. बहिरट, पृष्ठ १८

सन १२२१ ऑगस्ट २० ला श्री चक्रधर प्रभू जन्मले व १२७४ साली त्यांचा काही ब्राह्मणांनी त्यांच्या पुरोगामित्वामुळे खून केला. (माघ कृष्ण ४ शके १२७४ रोजी हे दुसरे मत)

सन १२४० ते १२६७ चक्रधरांचा एकांक काळ

सन १२६७ ते १२७० एकूण ३ वर्ष ६ महिने चक्रधराने संन्यास घेऊन धर्मप्रचाराचा पूर्वार्ध काळ

सन १२७० ते १२७४ चक्रधर प्रभूच्या धर्म प्रचाराचा उत्तरार्ध काळ- ३ वर्ष ११ महिने.

ता. २६-१०-१२७० ते १३५० (शके ११९२ कार्तिक शुद्ध ११ ते शके १२७२ आषाढ वद्य १३) मध्ये वारकरी पंथ संस्थापक- संत शिरोमणी नामदेवांचा काळ.

इ.सन १२७५ ते सन १२९६ संत ज्ञानेश्वर ता. २५-१०-१२९६ रोजी संजीवन समाधी.

इ.सन १२८७ ज्ञानेश्वरास शुद्धिपत्र मिळाले.

इ.सन. १२९० संतज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली. जन्मजात वर्णाश्रमधर्माचे लेखन.

इ.सन १२९० ते ९१ या काळात ज्ञानेश्वरी लेखनानंतर गुणकर्मजात वर्णाश्रमधर्म असावा ह्या तत्त्वावर दामोदर पंडित महानुभाव पंथियांकडून नाथपंथीय योगमार्गी नेत्याचा पूर्ण पराभव केला.

सन १२९० ते ९१ ज्ञानेश्वरीतील जन्मजात वर्णाश्रमधर्माचा झालेला पराभव असह्य होऊन संत ज्ञानेश्वर झपाटा उर्फ ताटी लावून जीवंत योगमार्गे समाधीस्तव बसले. त्यानंतर संत मुक्ताबाईने ताटीचे अभंगाद्वारे संत ज्ञानेश्वरास उपदेश केला व संतनामदेवाच्या वारकरी पंथात शिरण्याचा सल्ला दिला.

सन १२७८ (शके १२००) चे सुमारास म्हाईभटाने लीळाचरित्र रचले (म. सारस्वत पृष्ठ ८४७)

इ.सन ११७९ ते १२४२ (शके ११०१ ते ११६४) अनहिलवाडचे राजे भोला भीमदेव होते.

इ.सन. १२९४ (शके १२१६) अल्लाउद्दीनाने महाराष्ट्रावर स्वारी केली.

इ.सन. १२९७ (शके १२१९) ते सन १२९८ (शके १२२० चालुक्यवंशीय रामदेव वाघेलचा पुत्र कर्णदेव वाघेल हा राजपूत वंशीय राजा अनहिलवाड (पाटण) चा राजा होता. अल्लाऊद्दीनाने त्याला जिंकले व त्या रायकर्ण वाघेलची गुजराथची राजधानी अनहीलवाडा (पाटण), सोमनाथ शहरे लुटली. व राजा कर्णाची सुंदर पत्नी- कमलदेवीशी अल्लाउद्दीनाने लग्न गेले, व तिची कन्या देवलदेवी चा स्वपुत्र खिज्रखानाशी विवाह केला (सन १२९६ मध्ये).

सन १२९६ जून ३ ला देवगिरीच्या रामचंद्रदेवाचा पराभव केला व त्याची कन्या जेठाईशी अल्लाउद्दीनाने लग्न केले. ता. २० जुलै १२९६ ला चुलता जल्लालुद्दीनचा खून करून दिल्लीपती म्हणून जाहिर केले, व ३ ऑक्टोबर १२९६ ला राज्याभिषेक केला. (बु. गॅ. पृ. ७९)

इ.सन १२९८ (शके १२२०) अल्लाउद्दीनाने गुजराथ जिंकला.

इ.सन १२९५ मध्ये हरसच्या इस्तपालजवळून अल्लाउद्दीनाने अशिरगड जिंकला.

इ.सन १३०७ मध्ये (काहींच्या मते) करण वाघेलची पत्नी कमल व पुत्री देवलशी खिज्रखानाचा विवाह झाला.

पाचवे शतकात कालिदास कवी, ६ वे शतकात भर्तृहरी, व ७ वे शतकात कवी भवभूती झाले. इ.सन ७०० (जिल्हे अकोला, पृष्ठ ४० पहा.)

इ.सन पूर्व ३०० ते ६०० कवी वाल्मिकी झाला. (मनोरमा, पृष्ठ ४-५)

इ.सन पूर्व ६ व्या शतकात कवी महर्षी व्यास झाले. (मनोरमा, पृष्ठ ४-५)

इ.सन पूर्व १०५ चीनमध्ये कागदाचा शोध लागला.

इ.सन पूर्व १०२५ अशिरगडचे ९ व्या व १० व्या शतकाचे राजे परमार राजपूत

सन १०२५ मध्ये पृथ्वीराजाचा मांडलिक असलेल्या इस्तपाल राजाने पराभूत करून अशिरगड घेतला. व इ.सन १२९५ मध्ये हरसच्या इस्तपालजवळून अल्लाउद्दीनाने अशिरगड घेतला.

इ.सन. १३५१ मध्ये पूर्णेच्या दक्षिणेस लेवा भाटाचे मते जगदीश पाटील दुधलगाव बु॥. याने येऊन वस्ती केली.

इ.सन १३५१ हसन गंगु ब्राह्मणाने पूर्णेच्या दक्षिणेस बहामनी राज्य स्थापन केले. (जळगाव जिल्हा गॅझेटियर, पृष्ठ ५० पहा.)

इ.सन १३९७ ते सन १४०९ मध्ये केव्हातरी मलिक नासेरच्या काळात दुर्गा देवीचा दुष्काळ होता. (जळगाव जि.गॅ., पृष्ठ ५२ पहा.)

इ.सन पूर्व १४३५ उत्तर बहामनी राज्याचा राजा अल्लाउद्दीन अहमदचे हिंदू प्रेयसीपायी त्याचा सासरा नासेरखानाने त्याला रोहिणखेडला पराभूत केले.

इ.सन पूर्व १४४९ ते १५११ महमंद बेगडा (जळगाव जि.गॅ., पृष्ठ ५७) चा नातू आलमखान होता.

ता. ३ ऑक्टोबर १२९६ ला अल्लाउद्दीन दिल्लीपती झाला. (बु. जि. गॅझेट, पृष्ठ ७९)

इ.सन १३१६ ते १८५३ = ५३७ वर्षे विदर्भ मुस्लीम राज्यात होता. (बु. जि. गॅझेट, पृ. ७९)

इ.सन १३४७ च्या ऑगस्ट ३ पासून हसन झापरखानाने अल्लाउद्दीन ब्राह्मणशहा नावाने राज्य सुरू केले. (बु. जि. गॅ., पृष्ठ ८१)

इ.सन १३४७ ते १४८४ बहामनी राज्य (जिल्हे अकोला, पृष्ठ ५ पहा).

इ.सन १८६४ मलकापूर, चिखली, मेहेकर यांचा वायव्य जिल्हा व कचेरी जानेफळ केली होती.

इ.सन १८६५ मलकापूर, चिखली मेहेकर यांच्या वायव्य जिल्हयास मेहकर नाव दिले.

इ.सन १८६७ ला त्यालाच बुलढाणा जिल्हा असे नाव दिले.

इ.सन १८६१ ते १८६५ या काळात जळगाव जिल्हयात रेल्वे सुरू झाली.

इ.सन १९५० ला एस.टी. कार्पोरेशन झाले, व सन १९५२ ला एस.टी. सुरू झाली.

इ.सन १९०६ च्या नोव्हेंबर १४ पासून जळगाव जिल्हा झाला.

इ.सन १८३६ ला दर्पण नावाचे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू झाले.

इ.सन पूर्व ३१०२ कलियुगाची सुरुवात झाली. (म. का. नि. ले.- साठे., पृष्ठ ८)

इ.सन पूर्व ३१३८ भारतीय महायुद्ध (म. का. नि. ले.- साठे., पृष्ठ ८)

इ.सन पूर्व १२०० वेदकाळ

इ.सन पूर्व १५०० हिंदूधर्म स्थापना (दास्ताने, महाराष्ट्र, १९९१ पृष्ठ २१८)

इ.सन १९२७ भारतात नभोवाणीचा शुभारंभ.

इ.सन १९५९ भारतात दूरदर्शनचा शुभारंभ.

ता. १-११-१९५६ ला द्विभाषिक मुंबई राज्य जन्मले.

ता. १-५-१९६० ला महाराष्ट्र राज्य जन्मले.

इ.सन १८२१ ला पुण्यात पहिले संस्कृत महाविद्यालय निघाले. ते ब्राह्मणेतरांनाही खुले होते.

इ.सन १८५१ साली म. ज्योतिबा फुल्यांनी सर्व जातीसाठी पहिली शाळा उघडली.

इ.सन १८५७ ला भारतात पहिले विद्यापीठ मुंबईस सुरू झाले.

इ.सन १८६१ च्या सनात वरणगाव ब्रिटिशांना दिले (ज. गॅ. पृ. ८१६)

इ.सन १६०० मोगलांनी एदलाबाद जिंकले (जळगाव गॅझेट, पृ. ७८४)

इ.सन १८६७ बुलढाणा जिल्हयाचे मुख्यालय बुलढाणा शहर झाले.

इ.सन १९०५ अकोला जिल्हयातील खामगाव व जळगाव तहशील बुलढाणा जिल्हयात सामील केल्यात.

इ.सन १९०३ निजामाकडून भारत शासनाने विदर्भ ताब्यात घेऊन तो मध्यप्रदेशास जोडला.

इ.सन १८७० सर "A.C. Lyall" यांनी पश्चिम विदर्भ गॅझेट संपादिले.

इ.सन १९१० मि. नेल्सनने बुलढाणा जिल्हा गॅझेट संपादिले.

इ.सन १८८१ मध्ये विदर्भाची जातवार शिरगणती केली.
इ.सन १९३६ डिसेंबरमध्ये अ.भा.कॉ.चे ५० वे अधिवेशन फैजपूरला झाले.
इ.सन १८७८ ग्रामोफोनचा शोध लागला. (मनोरमा, पृष्ठ ६०८)
इ.सन १८८९ इटालीत बेल्सिनने चष्म्याचा शोध लागला.
इ.सन १८०८ इटालीत टाईप रायटरचा शोध लावला.
इ.सन १८४९ इटालीत टेलीफोनचा शोध लागला.
इ.सन १९२६ ब्रिटनमध्ये टेलिव्हीजनचा शोध लागला.
इ.सन १५९३ इटालित गॅलिलियोने थर्मामीटर शोधले.
इ.सन १६०८ नेदरलँडमध्ये दुर्बिणीचा शोध लागला.
इ.सन १९२२ जर्मनीत बोलपट फिल्मचे संशोधन झाले.
इ.सन १८७९ एडिसनने विजेचा दिवा शोधला.
इ.सन १६९८ वाफेच्या इंजिनाचा ब्रिटनमध्ये शोध लागला.
इ.सन. १८७६ मायक्रोफोनचा शोध अमेरिकेत लागला.
इ.सन १४५५ जर्मनीत मुद्रण यंत्राचा शोध लागला.
इ.सन १८८५ जर्मनीत मोटार सायकलचा शोध लागला.
इ.सन १९०० लाऊडस्पीकरचा शोध ब्रिटनमध्ये लागला.
इ.सन १६३४ मध्ये शहाजहानचा मुलगा शहासुजा मलकापूर विदर्भ येथे तळ देऊन थांबला होता. (बु. जि. गॅ., पृ. १२०)
इ.सन १६३४ शहाजहानने पैनघाट व बालाघाट असे दोन सुभे निर्मिलेत. त्यापैकी उत्तर बुलढाणा जिल्हा म्हणजे पैनघाट होय.
इ.सन १६३६ शहाजहानच्या खानदेश सुभ्याची राजधानी बऱ्हाणपूर असून सैन्याचा तळ अशिरगडला होता. (बु.गॅ., १२०)
ता. ४ जून १८०३ ला बोदवडला शिंदे भोसल्यांची भेट झाली होती.
ता. ६ जून १८१८ ला दुसरा बाजीराव हरल्याने विदर्भ इंग्रजाकडून निजामाकडे आला.
इ.सन १८३७ ला दाताळ्याची लढाई व १२ वर्षांनी दाताळ्यांचे लालसिंगाने ३००० हिंदू + ५०० शिखानिशी मलकापूर लुटले.
इ.सन १८५८ नंतर विदर्भाचे अमरावती विभाग व अकोला विभाग असे दोन भाग पडले.
इ.सन १८६४ यवतमाळ जिल्हा निर्मिला.
इ.सन १८६७ बुलढाणा जिल्हा निर्मिती व रेल्वेचे आगमन.
इ.सन १९४७ ते १९५६ बुलढाणा जिल्हा मध्यप्रदेशात होता.
इ.सन १९६० बुलढाणा जिल्हा महाराष्ट्रास जोडला.
इ.सन १९६३ जानेवारीपासून पाटील वतने बंद केली.
इ.सन १९६० पासून जळगाव व धुळे हे जिल्हयाचे नामकरण झाले.
इ.सन १८४४ ग्वाल्हेरच्या तहाने यावल, चोपडा, पाचोरा व लोहारे ब्रिटिशांना मिळालेत.
इ.सन १८६० जळगाव खानदेशात रेल्वेलाईन आली.
इ.सन १९६९ चौदा मोठ्या बँकांचे राष्ट्रीयकरण झाले.
इ.सन १००० ते १०५५ भोज राजाने उज्जैनी सोडून धारा नगरीस राजधानी केली.
इ.सन पूर्व ३२५० मध्ये मोहेंजोदाडो व हडप्पाची सिंधूघाटी सभ्यता पुरातत्त्वविद मानतात. (कू. क्ष. कीर्तिकथा, ले.- डॉ. रामसिया सिंह, पृ. ४१)
इ.सन पूर्व ४०२१ मध्ये स्वायंभूव मनु (पत्नी शतरूपा) हा मनुर्भरत झाला. कू .क्ष. कीर्तिकथा, पृष्ठ ४५ पहा.)

इ.सन पूर्व २७६१ सूर्यवंशी मनुर्भरत वंशात ४५ वे पिढीत दक्षराज झाले.

इ.सन. पूर्व १६६९ प्रभू रामचंद्राचा काल (डॉ. सिंग)

इ.सन पूर्व १२६० वर्षाचा सत्ययुग भोगकाल झाला. (कूर्मवंशी कीर्तिकथा, पृष्ठ ४१)

इ.सन. पूर्व १२७७ मध्ये महाभारत युद्ध-काल होय. (कूर्मवंशी कीर्तिकथा, पृष्ठ ४१)

इ.सन पूर्व ३२२ ते इ.सन पूर्व २९८ या काळात सम्राट चंद्रगुप्त मौर्य होऊन गेला. (युनिफाईड इतिहास, पृष्ठ ७२ व ७३ पहा). आणि याच काळात भारतात जातिविभाजनाला सुरुवात झाली. मेगॅस्थेनीसच्या मते भारतीय जनता त्या काळात फक्त सात जातीत विभागली होती. (युनिफाईड इतिहास, पृष्ठ ७७ पहा.)

इ.सन पूर्व ७८ काळात कनिष्क काळात गुजराथ परिसरातून (पंजाबातील) अनेक गुर्जर व कूर्मी स्थलांतर करून मथुराकडे गेले. तेथून धिरे-धिरे आनर्त देशात गेले असे बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम १ वरून कळते. तसेच, कु.क्ष. पा. इतिहास, पृष्ठ ४५, ४६, व ४७ वरून कळते की, पंजाब सोडून कूर्मीयांनी स्थलांतर केले.

इ.सन १४४ मध्ये लवाचा ५९ वा वंशज कनकसेन हा गुजराथेत आला.

इ.सन १५६ मध्ये वज्रपालने उंझा नगरी वसविली.

इ.सन पूर्व १६६९ प्रभू रामचंद्र (अयोध्यापतीचा) काल.

प्रकरण ५

संदर्भाच्या पायवाटा

लेवा पाटीदार समाजाच्या इतिहासाचे मराठीत अद्याप संगतवार संशोधन कोणीच केले नाही, म्हणून तो इतिहास जाणून घेणे अशक्य नसले तरी, थोडे कठीण आहे. मी स्वत: ता. १३ जानेवारी १९८५ रोजी माझ्या सहकाऱ्यांसह भोरगाव लेवा पंचायत पाडळशे (ठाया दाताळा) विभाग मलकापूरच्या युवक-युवतींच्या मेळाव्या निमित्त एक दीड-दोनशे पृष्ठांची स्मरणिका संपादित केली होती. त्यात लेवा पाटीदार समाजाचा इतिहास (स्थूल आराखडा) नावाचा एक लेख मी लिहून प्रसिद्ध केला होता. त्या लेखाचे शेवटच्या परिच्छेदात "सेवा-निवृत्त झाल्यावर याच विषयावर मी विचारपूर्वक व सविस्तर असा 'लेवा पाटीदार समाजाचा इतिहास' लिहिणार आहे. ज्यांचे जवळ या संबंधी अधिक माहिती व पुरेसे कागदपत्र असतील त्यांनी कृपया संपर्क साधल्यास मी आपला आभारी होईल." असे पृष्ठ तीन वर आवाहन केले होते, पण माहितीचे अभावी व या विषयाच्या उपेक्षेने कोणीच त्याबाबत माझ्याशी संपर्क साधला नाही. उलट तुम्ही आश्वासन दिल्याप्रमाणे तसा इतिहास लिहून प्रसिद्ध केल्यास कृपा करून पाठवा अशी बरीच पत्रे मला आलीत; पण संदर्भ साहित्य मिळविणे किती कठीण आहे याचा अनुभव घेतल्यावर मी हताश झालो; पण तो मिळविण्यासाठी जिद्द सोडली नाही. सेवानिवृत्तीनंतरचे वाढते वय, प्रकृती स्वास्थ्याचा अभाव, व आर्थिक अडचणीमुळे उत्कृष्ट मांडणीपूर्वक संशोधन जमले नाही. तरी उपलब्ध पुराव्यांची गोळाबेरीज मांडणी करून पुढील संशोधकासाठी व माझ्या वंशजासाठी जाणकारांनी सुचविलेली संदर्भ साधने व संशोधनाच्या पुढील पायवाटापैकी शक्य त्या मिळविल्या व संशोधिल्या. निदान त्या पुढील लेखकांच्या उपयोगी पडून त्याआधारे त्यांनी उत्कृष्ट संशोधित समग्र इतिहास लेखन करावे यासाठीचा कच्चा आराखडा

म्हणून हा सूचीबद्ध लेखन-प्रपंच करीत आहे :-

ह्या सूचीतील काही ग्रंथ मला मिळालेत, पण मला न मिळालेलेही ग्रंथ नवीन लेखकांनी शोधावे यासाठी सर्व संदर्भ साधन-सूची दिग्दर्शित करीत आहे.

१) 'कुलमी इतिहास' नावाचे उत्तर प्रदेशातील श्री नारायणसेठ यांनी खूप प्रयत्नपूर्वक प्रथम पुस्तक समाजासमोर हिंदीतून सादर केले.
२) त्यानंतर कवी भीमनाथ विरचित लेऊवा पुराण
३) कडवा पुराण
४) सन १९०६ साली अहमदाबादच्या श्री. ड्याह्याभाई लक्ष्मणभाई पटेल यांनी 'वडनगरा कणबी क्षत्रियकी उत्पत्ती' लिहून त्यात लेऊवा कडवा पाटीदारांच्या उत्पत्तीवर प्रकाश टाकला.
५) सन १९१२ मध्ये श्री. पुरुषोत्तमदास परिख यांनी गुजराथीत 'कणबी क्षत्रिय उत्पत्ती अने इतिहास' नावाचा ग्रंथ लिहिला. तो आजही आधारभूत मानतात.
६) सरदार पटेल विश्वविद्यालयाचे सर्जक- श्री. भाईलाल भाई पटेलकृत 'गुजरातना पाटीदारो' हा ग्रंथ लिहिला.
७) डॉ. मंगुभाई पटेल संशोधित कृती "रायबहादूर बेचरदास अंबादास लष्करी-गुजराथना सामाजिक अने औद्योगिक नेताना जीवन वृत्तान्तनो अभ्यास."
८) 'लेऊवा अंजना वर्तमान' लेखक- डॉ. मंगुभाई पटेल.
९) पोकाक व डेव्हीड यांनी 'कुणबी-ए-पाटीदार' : ए स्टडी ऑफ द पाटीदार कॉम्युनिटी ऑफ गुजराथ (आक्फोर्ड : सन १९७२) नावाचा ग्रंथ लिहिला.
१०) आमचे वेद-पुराण
११) देविप्रसाद चौधरी लिखित क्षत्रिय कुलादर्श (बाराबंकी यु.पी.)
१२) कौर्मि वंशावली (लखनाऊ) ले.- पंडित साधुसिंह
१३) विल्स, इलियट, बारडोले, जनरल टॉड, कर्नल वॉकर आदी विदेशी लेखकांचे लिखाण
१४) विविध राज्यांची शासकीय राजपत्रे
१५) 'कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास' लेखक- डॉ. मंगुभाई पटेल, रीडर गुजराथ विद्यापीठ, अहमदाबाद, प्रकाशक- पाटीदार संशोधन और प्रकाशन ट्रस्ट, अहमदाबाद (गुजराथ) आवृत्ती १ ली, सन १९९१.
१६) इटारसी नागरी कुर्मी महिलाओंका एक समाजशास्त्रीय अध्ययन नावाचा कु. सीमा सचान यांनी सन १९९३ मध्ये समाजशास्त्र विषय विभागांतर्गत आचार्य (पीएच.डी.) उपाधी हेतू बरकत उल्लाह विद्यापीठ भोपाळमध्ये सादर केलेला शोध प्रबंध.
१७) "The Imperial Gazetteer of India Vol. V Abazai to Arcot, New edition to day and tomorrow Printers and Publishers, 22 B/5 original Road, New Delhi 5 (India) which book is referred from Bhopal University Library Bhopal Coll. No. 910-354 R. Book 1, Accession No. 2148, Page No. 96 to 99 only."
१८) The Tribes and castes of India of the North western India" written by William Crooke Vol. III published by Casmo Publication, Delhi Pin : 110006 India, Edition in 1975, Page No. 346 to 359 :- Kurmi-Kunbi.
१९) गुजराथ सर्व संग्रह, लेखक- नर्मदाशंकर लालशंकर.
२०) पटेल बंधू मासिक पत्रिका सिहोर म. प्र.
२१) पाटीदार हितेच्छू पत्रिका (बांझहून निघते)

२२) कुणबी-कुलादर्श, ले.- प्रकाश नारायण सेट.
२३) ता. १३-१-१९८५ ची भोरगाव लेवा पंचायत पाडळशे, विभाग मलकापूर, संपादक- शंकर विठोबा पाटील दुधलगावकर, खडसे, वराडे, खर्चे, फिरके यांनी संपादिलेली स्मरणिका.
२४) आपले लेवा परिवार (त्रैमासिक) संपादक- श्री. महेंद्र ओंकार राणे, मुंबई.
२५) भुसावल परिसरातील लेवा पाटीदारांची मराठी बोली सन १९७१ चा श्री. तोताराम नामदेव चोपडे यांचा आचार्य (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोध प्रबंध.
२६) खानदेशस्थ लेवा पाटीदारांची भाषा, लेखक- श्री. देवराम सखाराम बऱ्हाटे, सन १९३२.
२७) डॉ. इरावती कर्वे यांच्या सामाजिक सर्वेक्षणातील लेवा पाटीदारांसंबंधीचे उतारे
२८) जातीभास्कर, संपादक- पं. ज्वालाप्रसाद मिश्र, सन १९८६.
२९) पाटीदार दर्पण संपादक पुरुषोत्तम मुकाती सन १९९०.
३०) लेवा प्रबोधन पत्रिका, संपादक- राम नेमाडे
३१) श्री माळवा कुलमी पाटीदार श्रीराम मंदिर स्मारिका - संपादक- पुरुषोत्तम मुकाती.
३२) लेवायन, संपादक- श्री. राम नेमाडे, मुंबई.
३३) स्मरणिका भ्रातृमंडळ, पुणे, ता. २७-१-१९९१
३४) वर्षारंभ भ्रातृमंडळ, पुणे, १९९२ ते ९७
३५) सातपुडा निवासिनी श्री मनुदेवी स्मरणिका, ता. १२-२-१९८९
३६) भ्रातृमंडळ स्मरणिका नागपूर, सन १९७७.
३७) उज्वल ग्रामपंचायत विशेषांक, सन १९७०, पाडळशे.
३८) धन्य सौराष्ट्र धरणी नावाचे श्री सौराष्ट्र पटेल समाज मुंबईचे त्रैमासिक मुखपत्र.
३९) कडवा-पाटीदार कुळदेवी, उमियामाता संस्थान, ऊंझा पिन :- ३८४१७० गुजराथ चा वार्षिक अहवाल.
४०) उमिया-दर्शन- संपादक पटेल तंत्री जयंतीभाई पटेल.
४१) पाटीदार जागृती संरक्षक परशुराम पाटीदार व संपादक शिवनारायण पाटीदार.
४२) लेवा पाटीदार मित्र मंडळ, २७/१६० एलोरा पार्क, रेसकोर्स, बडोदा, ३९०००७ बडोदराची स्मरणिका- सन १९८४.
४३) दहा-दोन-तीन : संपादक- डॉ. ज.ह. फिरके यांचा ता. ९-२-१९८६ चा भोरगाव लेवा पंचायत विशेषांक.
४४) क्षत्रिय मराठ्यांची वंशावली व शहाण्णवकुळी, पृष्ठ ९१ वरील सूर्यवंश- लेखक- गावंडे व कार्लेकर.
४५) साप्ताहिक सहारा : दीपावली विशेषांक, १९९६ संपादक - वसंतराव शिंदे, यातील पृष्ठ ३३ वरील क्षत्रिय मराठा जातीचा ९६ मुख्य कुळे, उपनावे, वंश, गोत्र, कुलाचारदर्शक तक्ता.
४६) याच अंकातील पृष्ठ ३१ वरील क्षत्रिय मराठा समाज ९६ कुळी देवक, देवता, गोत्रे, प्रवरे.
४७) याच अंकातील मराठ्यांच्या महाभारताचा सारांश : लेखक- डॉ. द.भि. निकम, पुणे १७.
४८) लेवा पंचायत पाडळशेचा सन १९८४ चा अहवाल.
४९) क्षात्रधर्म : ले.- पु. मोरेदादा, पृष्ठ ११५ वरील लेवा पाटील क्षत्रिय सूर्यवंश हे प्रकरण व पृष्ठ ११६ वरील लेवा पाटीदारांच्या कुळी.
५०) नूतन वार्षिक, सन १९८८-८९ लेवा युवा संघ जळगाव द्वारा प्रकाशित.
५१) मध्यप्रदेश पाटीदार समाज स्मरणिका, संपादक- भवरलाल कुलमी.
५२) लेवा एज्युकेशन युनियन जळगाव, सुवर्ण महोत्सवी स्मृति-पुष्प, सन १९६८.
५३) शिलान्यास समारंभ स्मृतिग्रंथ भ्रातृमंडळ, नागपूर सन १९६८.

५४) अंबिका पाटीदार समाज धार्मिक एवम् पारमार्थिक ट्रस्टची ता. २५ एप्रिल १९९३ ची दसवी सामुहिक विवाह पत्रिका .

५५) लेवा पाटीदार ठायांच्या दप्तरांचे विखुरलेले अवशेष.

५६) श्रीधर व्यंकटेश केतकरांचा ज्ञानकोश ग्रंथातील कुणबी हा लेख.

५७) पाडळशे, दाताळा, नशिराबाद, तळवेल आदी लेवा पाटीदार ठाया व उपठायांची उपलब्ध कार्यवाही.

५८) एनसायक्लोपिडीया ऑफ ब्रिटानिका.

५९) बॉम्बे गॅझेटियर गुजराथ, ऑगस्ट १८७७ पृष्ठ ५२ व पृष्ठ ३७३.

६०) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, महाराष्ट्र शासन : महाराष्ट्र भूमी व तेथील लोक मराठी आवृत्ती (सुधारीत) १९९६, संपादक- डॉ. कि.का. चौधरी.

६१) बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम नं. १२ खानदेश, १९८०, पृष्ठ ३९ + ६८.

६२) महाराष्ट्र ज्ञानकोश विभाग : ११ लेख, श्री. व्य. केतकर, सन १९२४ पृष्ठ, ५३५ परिच्छेद, २ पासून पुढे.

६३) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर्स जळगाव जिल्हा सुधारित आवृत्ती, सन १९६२ भाग ३ रा.

६४) गॅझेटियर्स ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, बुलढाणा, जिल्हा, सुधारित आवृत्ती, सन १९७६, पृष्ठ २२६ कुणबी लेवा पाटील.

६५) महाराष्ट्राचे जिल्हे, जळगाव, प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृष्ठ १३ वरील लेवा पाटीदार शेतकरी.

६६) पुराणे व रामायणातील संदर्भ.

६७) कवी कालिदासकृत रघुवंश.

६८) लेवा पाटीदारोनो इतिहास लेखक भाईकाका उर्फ विश्वकर्मा.

६९) नलिन के. पटेल, एस.टी. स्टँड समोर, नवजीवन वर्कशॉप, मु.+पो डाकोर, तुलका- थासरा, जिल्हा- खेडा (गुजराथ) यांनी लेवा पाटीदारांबद्दल लिखाण केल्याचे मला प्रवासात डाकोर मुक्कामी कळले पण ते मिळाले नाही.

७०) "Castes & Tribes of Southern India by Edgar Thursion C.I.F. Volume IIV, K to M. Vol. 2 Casmo Publications, Delhi- 110006, India Page 118."

७१) Bombay Gazetteers XVIII, Part 1st, 284

७२) Hindu Tribes and Castes as represented in Benares by the Rev. M.A. Sherring, Casmo Publications, Delhi & India, 1974

७३) Cencus of India, 1991 यात Caste & Tribe in Central and North Western India. Govt. of India.

७४) कुणबी क्षत्रिय उत्पत्ति : अने इतिहास, या ग्रंथाचे हिंदी भाषांतर ले.- यशराज.

७५) कुर्मी कृषक का इतिहास अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय महासभाकी ओरसे लखनौ १९८८ जे.पी. वर्माकडून.

७६) काशीचा पंड्या रामप्रसाद दुबेच्या जुन्या पोथ्या.

७७) मराठा क्षत्रियांचा इतिहास : लेखक- श्री. काशीराव पाटील, अमरावती.

७८) कुणबी-मराठा समाजातील तरुणांना आव्हान, लेखक व प्रकाशक- श्री. बा.कृ. भेदरकर. ता. १०-४-१९७२ ची आवृत्ती.

७९) पाटीदार जागृति (हिंदी मासिक) पत्ता, पाटीदार समाज छात्रावास, संजीत मार्ग, मन्दसौर ४५८००१ (म.प्र.).

प्रकरण ६

काही उपयुक्त पत्ते

लेवा पाटीदार समाजाच्या इतिहासाचे संशोधक, समाज कार्यकर्ते, लेवा पाटीदार समाजाचे नेते व इतरांना उपयुक्त पत्ते पुढे देत आहोत. या ग्रंथातील माहितीची सत्यता पडताळून पाहण्यासाठी, अधिक माहिती मिळविण्यासाठी, समाज संघटनेसाठी व स्वत:च्या वैयक्तिक काही गरजा भागविण्यासाठी सदर काही पत्ते उपयोगी ठरू शकतील.

१) संचालक, चैतन्य प्रकाशन, दुधलगाव बुद्रुक, तहशील - मलकापूर, जिल्हा - बुलढाणा (महाराष्ट्र) पिन. ४४३१०१, फोन नं. ५२०२५ यांनी प्रकाशित केलेल्या चैतन्य संप्रदाय परंपरा : लेखक- शंकर विठोबा पाटील, पृष्ठे २५ + २०२, किंमत १०० रुपये, या ग्रंथात लेवा पाटीदार समाजातील सर्व वारकरी संत परंपरा सविस्तर दिल्या आहेत.

२) श्री. लालजीराम वर्मा- अध्यक्ष, मध्यप्रदेश कुर्मी क्षत्रिय समाज, भोपाळ ८/२ के.एम्. हॉस्पिटल, ईभ्राईमपुरा, भोपाळ(म.प्र.) फोन नं. ५४२९७०, आणि ५४३७४४.

३) श्रीमती केशकली सचान C/O पी.डी. सचान, ई-३/न्यु एम्.आय.जी.-१४, अरेरा कॉलनी, भोपाळ (म.प्र.) फोन : ५६३३५४. संयोजिका, मध्यप्रदेश कुर्मी क्षत्रिय समाज भोपाळ कार्यकारिणी.

४) श्री. शालीग्राम ढगे, मु.+पोस्ट - बावनबीर, ता. संग्रामपूर, जिल्हा - बुलढाणा हे अकोला व बुलढाणा जिल्हा कुणबी समाज स्मरणिकेचे प्रबंध संपादक असून त्यांचे मुख्य कार्यालय बाबनबीरला आहे. (तिलोरी कुणबी समाज संघटक आहेत).

५) श्री. रामचंद्र मुकुंदराम पाटीदार, अध्यक्ष, श्री अंबिका पाटीदार समाज धार्मिक एवम् पारमार्थिक ट्रस्ट रंगवासा राऊ, जिल्हा- इंदौर यांची पाटीदार दर्पण ता. ७ मे १९९० ची स्मरणिका वाचनीय आहे.

६) श्री. केशवलाल पटेल, अध्यक्ष, श्री उमियामाता संस्थान, ऊंझा, उत्तर गुजराथ, गुलाब पार्क, सिद्धपूर (सन १९९० च्या स्मरणिकेद्वारा).येथे कडवा पाटीदार समाजाचे मुख्य कुलदैवत आहे.

७) श्री. मदनलाल पाटीदार- अध्यक्ष, पाटीदार श्रीराम मंदिर न्यास उज्जैन, हनुमान गढी, उज्जैन (पत्ता.- सन १९९० सालचा आहे.)

८) श्री. शोभाराम पाण, अध्यक्ष, पाटीदार धर्मशाळा, ओंकारेश्वर, जिल्हा - खरगोण, निमाड (पत्ता सन १९९० सालचा)

९) अध्यक्ष- श्री. मालवा कुलमी पाटीदार, श्रीराम मंदिर, हनुमान गढी, न्यास उज्जैन (म.प्र.)चे राममंदिर- उज्जैनीच्या पश्चिमेस क्षिप्रा नदी तीरी मध्यप्रदेश व राजस्थान पाटीदार समाजाचे मुख्य कार्यालय येथे आहे. ह्या मंदिराची पुष्पांजली रजत जयंति स्मरणिका वाचनीय आहे. येथे कोणीही लेवा व कडबा पाटीदार उतरू शकतो. येथे राहण्याची व जेवण्याची सोय उत्तम आहे. A.W. Patil ([illegible])

१०) श्री. आनंद वामन पाटील- हे शेलगाव बाजार तालुका मोताळा, जिल्हा - बुलढाणा येथील लेवा पाटीदार असून यांचे मूळ आडनाव खर्चे आहे. यांच्या सहकार्याने डॉ. पंजाबराव देशमुखांनी विदर्भासाठी श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना सन १९३२ साली अमरावती येथे केली. याची नोंद दैनिक तरुण भारत, नागपूरच्या जानेवारी १९९२ च्या डॉ. पंजाबराव देशमुख विशेषांक, पृष्ठ ३२ वर दिली आहे.

११) मुंबई व परिसर लेवा मंडळ, मुंबई (नोंदणीकृत) सुमारे १९६८ पासून कार्यरत असलेले 'लेवा प्रबोधन पत्रिका' हे या मंडळाचे मुखपत्र आहे. संपर्कास्तव पत्ता :- अ २०४, जागृती सहकारी निवास मंडळ, भटवाडी, घाटकोपर प. मुंबई ८४, फोन नं. ५१२८९६६.

१२) औद्यौगिक विकास नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पिंपरी चिंचवड (द्वारा इन्स्टिट्यूट ऑफ बिझिनेस मॅनेजमेंट अँड रिसर्च) एम.आय.डी.सी. ब्लॉक नं. सी. प्लॉट नं. ९० चिंचवड, पुणे ४११०१९ ह्या ११६७ सभासदांच्या पतपेढीचे कार्यकारिणीत सन १९९२/९३ ला सर्व लेवा पाटीदार होते. तिचा आठवा वार्षिक अहवाल प्रगतिकारक आहे.

१३) लेवा पाटीदार समाज मंडळ, डोंबिवली, ठाणे (नोंदणीकृत) सन. १९६९ पासून कार्यरत. लेवाभवन, सगुणाबाई नेमाडे सभागृह, बाळूदादा सभागृह; संपर्क :- लेवा भवन, प्रकाश सहकारी सोसायटी, ध.ना. चौधरी मार्ग, रामनगर, डोंबिवली (पूर्व)

१४) विकास मंडळ, मुलुंड (पंजीकृत) स्थापना १९९०, संपर्क- १०१, जयलक्ष्मी नारायण हौ. सोसायटी, लो. टिळक मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०००८१ (महाराष्ट्र)

१५) भ्रातृमंडळ, मुबंई (पंजीकृत), स्थापना १९९०, संपर्क - हरिभाऊ नारायण इंगळे, ४०२ उषा अपार्टमेंटस, साने गुरूजी नगर, मुलुंड (पूर्व) मुंबई - ४०००८१ (महाराष्ट्र)

१६) लेवा पाटील समाज मंडळ, अंबरनाथ (पूर्व) पंजीकृत, स्थापना १९९०, संपर्क - सोपान नामदेव इंगळे (संस्थापक, सदस्य व आश्रयदाता, लेवा पाटील समाज मंडळ, अंबरनाथ (पूर्व), फ्लॅट नं. ३५, फार्मिंग सोसा., कैलासनगर जवळ, शिवाजी नगर, एम.आय.डी.सी. रोड, अंबरनाथ (पूर्व) पिन - ४२१५०१ संस्थेच्या शाखा पुढील प्रमाणे :-

१६) रजि नं. महा. २०७-९२ ठाणे, दिनांक २७-११-१९९२ पब्लिक ट्रस्ट रजि. नं. एफ ३३५३, ठाणे- दिनांक २३-३-१९९३.

१६-१) कल्याण उपशाखा, स्थापना २५-७-१९९३, सभासद ८३, संपर्क - श्रीकांत नारायण फिरके (कार्यवाह) दत्त कॉलनी, बेतुरकर वाडा, कल्याण (प.) जिल्हा - ठाणे.

१६-२) उल्हासनगर उपशाखा :- स्थापना ४-१-१९९४, सभासद संख्या ५८, संपर्क- हरिभाऊ विठ्ठल खर्चे (कार्यवाह), शिवसागर कॉलनी, सेक्शन २५, उल्हासनगर ४.

१६-३) मोहोने उपशाखा :- स्थापना १६-१-१९९४, सभासद ४०, पत्ता - निवृत्ती तुकाराम पाटील -(कार्यवाह), एन.आर.सी. कॉलनी, आरएस ११/८४ मोहोने ता. कल्याण, जि. ठाणे.

१६-४) भाईंदर उपशाखा :- स्थापना २७-११-१९९४, सभासद ४६, संपर्क - दिगंबर एकनाथ फिरके (कार्यवाह), २१५ डी, कल्पतरू, नवघर रोड, भाईंदर (पूर्व) जिल्हा - ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र)

कार्यालयाचा पत्ता :- द्वारा दिलीप निवृत्ती बोरले; दत्त निवास, रूम नं. ५, कुणाल कुटिर मागे, नवघर गाव, भाईंदर (पूर्व) जिल्हा - ठाणे. पिन ४०११०५ (महाराष्ट्र)

१६-५) डोंबिवली प्रतिनिधी - सभासद २३, संपर्क - श्री. अरुण रामचंद्र डहाके, अ/३, बाळकृष्ण को-ऑपरेटिव्ह-हौ. सो., राजेंद्र प्रसाद रोड, टिळक नगर, डोंबिवली (पूर्व).

१७) बहिणाबाई ज्ञान विकास संस्था, जळगाव (पूर्व खानदेश), स्थापना- ता. १३-४-१९९२, अध्यक्ष - प्रभाकर आनंदा पाटील यांनी बहिणाबाई व सोपानदेव चौधरी विशेषांक 'शहाणा कागद' संपादक- पुरुषोत्तम चावदस नारखेडे, यशोदानंद सूर्य हॉस्पिटलसमोर, भवानी पेठ, जळगाव पिन - ४२५००१ (पू.खा.) नावाचा अंक काढला. त्यात पृष्ठ ६६ वर 'विदर्भाची बहिणाबाई रुक्मिणीबाई पाटील' यांचे दुर्मिळ चरित्र समाविष्ठ केले आहे.

१८) पद्मश्री डॉ. वि.भि. कोलते, अध्यक्ष, भ्रातृमंडळ, ९ रामनगर, नागपूर १०, नागपूर ४४००१०

हे लेवा पाटीदार समाजातील सर्वश्रेष्ठ विद्वान लेखक व संशोधक आहेत.

१९) लेवा प्रबोधन पत्रिका, संपादक, राम नेमाडे, नोव्हेंबर १९८१, संपर्क - श्री केशव भिरूड, कार्यकारी संपादक, १०२, फलाय ओव्हर अपार्टमेंट ऑफ ब्रीज, अंधेरी (पूर्व) मुंबई - ४०००६९.

२०) लेवायन त्रैमासिक, मार्च १९९१, संपादक - राम नेमाडे, संपर्क - २ अ, गणेश पॅलेस, चित्तरंजनदास रोड, रामनगर, डोंबिवली (पूर्व), जिल्हा - ठाणे (महाराष्ट्र)

२१) श्री. रविंद्रनाथ ओंकार पाटील, अध्यक्ष, जळगाव जिल्हा लेवा समाज मंडळ, पिंपरी चिंचवड परिसर, पुणे ४४
कार्यालय : रविंद्रनाथ पाटील, यशवंती प्लॉट नं. ९०, सेक्टर नं. २७, शरयुनगर, प्राधिकरण, पुणे - ४०१०४४.

२२) राजेश स्टडी सेंटर, प्रो. राम नेमाडे, २३३, कस्तुरी प्लाझा, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व), जिल्हा - ठाणे (महाराष्ट्र).

२३) श्री. अशोक नेमिदास चौधरी, अध्यक्ष, भ्रातृमंडळ, सिडको, नाशिक - ४२२००९. पत्ता - एन९/इ९/३, जुने सिडको, नाशिक खिर्डी खुर्देकर (शिक्षक).

२४) अध्यक्षा, बहिणाबाई महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, पुणे. डी - १३, अभिमान अपार्टमेंट, गल्ली नं. १, ७१ तुळशीबागवाले कॉलनी, सहकार नगर नं. २, पर्वती, पुणे - ४११००९, फोन नं. - ४३६६६० ही पुण्यातील लेवा पाटीदार संस्थापित सहकारी पतपेढी आहे.

२५) श्री. महेंद्र ओंकार राणे, अध्यक्ष, अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळ, मुंबई ३/रविकिरण, म.फुले मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई ८१, फोन नं. - ५६१७०५६ यांनी 'आपले लेवा परिवार' हे या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र मराठीत चालविले आहे.

२६) अध्यक्ष, भ्रातृमंडळ, पुणे, सर्वे नं. १२५ अ + १ अ/२ वारजे जकात नाक्यामागे, वारजे, पुणे - ४११०२९ (महाराष्ट्र).

२७) जे.आर. पटेल भ्रातृमंडळ वसतीगृह, वारजे नाक्यासमोर, वारजे, पुणे ४११०२९ (महाराष्ट्र).

२८) श्री. मनुदेवी मंदिर जळगाव जिल्हयात यावल तालुक्यातील किनगाव व चिंचोली या गावांच्या मधून यावल ते चोपडा राज्यमार्गावरील आडगाव कासारखेडा या गावच्या उत्तरेस सातपुड्यात ७ किलोमीटर अंतरावरील मनुदेवी मंदिरात बरेच लेवा पाटीदार लोक दर्शनार्थ जातात.
सातपुडा निवासीनी श्री मनुदेवी शक्तिपीठ केंद्र नाशिक स्मरणिका प्रकाशन, माघ शुद्ध ७ रथसप्तमी दि. १२-२-१९८९ रविवार ठिकाण सातपुडा निवासिनी श्री मनुदेवी मंदिर, संपादक, श्री गोविंद नरहर कुलकर्णी - नाशिक व सहसंपादक श्री. प्रल्हाद सोमा महाजन नाशिक, जिज्ञासूंनी वाचावी.

२९) डॉ. रमेशचंद्र बेलावत, एफ-१, पशुचिकित्सा कॉलनी, ए.बी.रोड, सारंगपूर, जिल्हा - राजगढ (ब्यावरा) पिन - ४६५६९७. एस.टी.डी. (०७३७१) फोन - २२५४०, ४७२८०. हे मध्यप्रदेश प्रांतिक कुर्मी महासभेचे अध्यक्ष आहेत. मध्यप्रदेश व राजस्थान पाटीदार समाजाचे सन १९९५ ला अध्यक्ष होते.

३०) याच म.प्र. व राजस्थान पाटीदारांचे प्रांतीय महासभा सचिव श्री. मोहनलाल पाटीदार (शिक्षक).डी/२०६, अलकापूरी, रतलाम ४५७००१, एस.टी.डी. (०७४१२) फोन नंबर ३२४२६ हे आहेत.

३१) डॉ. प्रल्हाद पाटीदार (पूर्व प्रांताध्यक्ष एवं प्रबंध संपादक- पाटीदार जागृति) प्राध्यापक, वाणिज्य शासकीय स्नातकोत्तर महाविद्यालय, मंदसौर किंवा प्रबंध संपादक 'पाटीदार जागृति' पाटीदार समाज छात्रावास, संजित मार्ग, मंदसौर, ४५८००१ (म.प्र.)

३२) श्री. उमिया माताजी कॅम्पस, भागवत विद्यापीठके पास, सरखेज गांधीनगर, हायवे सोळा

रोड, अहमदाबाद (गुजरात), फोन - ४७५६५८ आणि २ रा फोन नं. - ४७२६८६ येथे उमिया माता संस्थान ऊंझाकडून पाटीदार प्रवाशासाठी लॉजिंग व बोर्डींग सुविधा आहे. अलाहाबादला लाल दरवाजा व रेल्वे स्टेशनहून सिटी बस मिळते.

३३) प्रो. वंशालाल पाटीदार, प्रांतीय निर्वाचन अधिकारी, सन १९८८ म.प्र. व राजस्थान पाटीदार समाज, डी. ३४, ऋषीनगर, उज्जैन (म.प्र.)

३४) अध्यक्ष, श्री सोलगाव लेऊवा पाटीदार प्रगति मंडल, पालनपूर, जिल्हा - बनासकाठा, (गुजराथ).

३५) स्वामी नारायण प्रकाश संपादक :- साधु स्वयंप्रकाशदास, स्वामी नारायण अक्षरपीठ, शाहीबागरोड, अहमदाबाद पिन - ३८०००४ या पत्त्यावर स्वामीनारायण पंथविषयक माहिती मिळेल. खानदेशात बरेच लेवा पाटीदार या पंथाचे अनुयायी आहेत.

३६) अध्यक्ष, लेवा समाज कल्याण मंडळ (लेवा पाटीदार समाजास्तव मर्यादित) रजि. नं. महा ४६६/७८ नाशिक.

३७) श्री. रमेश विठू पाटील, कुटुंब नायक भोरगाव लेवा पंचायत, मु. पाडळशे, तुलका - यावल, जिल्हा - जळगाव (महाराष्ट्र) पब्लिक ट्रस्ट आर.एन.ए.-११७ जळगाव.

३८) कृष्णा रघुनाथ खडके, अध्यक्ष लेवा युवा संघ, जळगाव, कोहिनूर प्रिंटींग प्रेस, ३५, पोलन पेठ, शिवाजी रोड, जळगाव - ४२५००१.

३९) श्री. दिवाकर नामदेव महाजन, सरचिटणीस, लेवा युवा संघ, कोहिनूर प्रिटींग प्रेस, ३५, पोलन पेठ, शिवाजी रोड, जळगाव - ४२५००१ या संस्थेचे सन १९८८-८९ चे नूतन वार्षिकांक वाचनीय आहे.

४०) अशोक अभिमन्यु भाट, लेवा पाटीदारांचे भाट, भाटगल्ली, मु+पो+ता. = चोपडा, जिल्हा - जळगाव, पूर्व खानदेश (महाराष्ट्र).

४१) लेवा पाटीदार मित्र मंडळ, २७/१६० एलोरा पार्क, रेसकोर्स सर्कल, बडौदा, पिन - ३९००७. या संस्थेचे प्रमुख/मंत्री यांची वर्ष ७ सन १९८४ चे स्मरणिकेत कण्वाश्रम, कानळदानिवासी चंद्रकिरण महाराज, म.ध. चौधरी खिरोदा, दामोधर कौतिक राणे, पितांबर धर्मा राणे यांचे लेख वाचनीय आहेत.

४२) सचिव/अध्यक्ष, भ्रातृमंडळ,विठ्ठलनगर, ४० बिद्या, मलकापूर, जिल्हा - बुलढाणा (महाराष्ट्र) पिन - ४४३१०१. एस.टी.डी. - (०७२६७) फोन - २३२५६.

४३) वे.शा.स. श्री. विश्वास त्र्यंबक धारणे, घर नंबर ४२०, गंगाघाट, मेनरोड, मु+पोस्ट, त्र्यंबकेश्वर जिल्हा - नाशिक, पिन - ४२२२१२. एस.टी.डी. (०२५३३९). फोन नं. - ३०२० हे विदर्भातील लेवा पाटीदारांचे क्षेत्र पुरोहित असल्याने काही लेवा घराण्यांच्या वंशवेली यांचेकडील चोपड्यात मिळतात.

४४) वे. मुरलीधर जगन्नाथ नाचण, नवा दरवाजा घर नं. २१९५ नाशिक १, हे नाशिक क्षेत्रीचे वैदर्भीय लेवा पाटीदारांचे क्षेत्र पुरोहित असल्याने क्षौर कर्म प्रसंगी लेवा वंशवेली उतरून घेतलेल्या त्यांच्या वंशराजास मिळू शकतात. फक्त २०० वर्षांपर्यंतच्या चोपड्या हल्ली उपलब्ध आहेत, असे त्यांचेकडे गेल्यावर मला दिसून आले.

४५) शंकर विठोबा पाटील, बी.ए.बी.टी. राष्ट्रभाषा कोविद, यांचे संशोधन केंद्रात लेवा पाटीदार कुळे, गोत्रे, कुलदेवता, गुजराथेतील मूळ स्थान आदी उपलब्ध माहिती असल्यास मिळते.
संपर्कासाठी पत्ता - शंकर विठोबा पाटील, मु+पोस्ट, दुधलगाव बुद्रूक, तुलका - मलकापूर, जिल्हा - बुलढाणा, पिन - ४४३१०१ (महाराष्ट्र) हा असून मुंबई-कलकत्ता रेल्वेमार्गावरील मध्यरेल्वेचे मलकापूर रेल्वेस्टेशन पासून १३ किलोमीटर वर बारमाही पक्क्या रोडवर हे गाव

असून दर तासाने एस.टी. बसेस मिळतात. तसेच, मलकापूर मोटर स्टँडपासून अॅटोरिक्षा मिळतात. यांच्या निवासचा संपर्क फोन - (०७२६७) ५२०२५ हा असून शेलगाव बाजार एक्स्चेंजचा फोन नं - एस.टी.डी. (०७२६७), ५२१०० हा आहे.

४६) डॉ. हरिभाई पटेलनी हॉस्पिटल, जगमल चौक, जुनागड, ३५२००१, हे जुनागडचे लेवा पाटीदार कार्यकर्ते आहेत. येथील लेवा पाटीदार विद्यार्थी वसतीगृहाचे ते संचालन करतात.

४७) जगदंबा मूर्ती भांडार, शिल्पकार श्री. अंकुश हरी पवार, श्री. निलेश जगन्नाथ धोत्रे, १३८१, सनगर गल्ली, पंढरपूर जि. सोलापूर (महाराष्ट्र) व (४८) श्रीराम मूर्ती भंडार, राजकुमार बापुराव पालकर यांचेकडे बस्ट, स्टॅच्यू, मूर्ती दगडी घडीव मूर्ती ऑर्डरप्रमाणे बनवून देतात. दुकान नं. १५१६ अ, गांधी रोड, पंढरपूर, जि. सोलापूर (महाराष्ट्र).

४९) व्यवस्थापक, हॉलीडे होम ऑफ गुजराथ टुरिझम डेव्हलेपमेंट कॉर्पोरेशन पावागड, ता. हलोल, जिल्हा - बडोदा (गुजराथ) येथे लेवा पाटीदारांचे महाकाली हे कुळदैवत जवळच आहे.

५०) श्री. सी.जी. नेमाडे, सचिव भ्रातृमंडळ, पुणे १३, अभिमान अपार्टमेंट, ७१ तुळशीबागवाले कॉलनी, गल्ली नं. १, सहकारनगर नं. २, पर्वती, पुणे, पिन - ४११००९, फोन ४३६६६०.

५१) भ्रातृमंडळ अकोला, द्वारा आशिर्वाद, कॉनव्हेंट रोड, अकोला - ४४४००१, फोन नं. ४५६८, नोंदणी क्रमांक, एफ - २८०, दिनांक २-१२-१९६८ व सोसा. रजि. नं. महा. १८१ दिनांक ६-४-१९७०, अध्यक्ष- श्री. ज्ञानदेव निनु पाटील, कृषी केंद्र, राधा कृष्ण टॉकीज कंपाऊंड, मूर्तीझापूर रोड, अकोला, पिन - ४४४००१, फोन नं - (०७२४) ४१५८६६ (ऑफीस फोन) ग्राम. के.के. ग्रुप.

५२) श्री. मु.पो. जावळे, अध्यक्ष, स्नेह संवर्धक मंडळ, भिलाईनगर, रजि नं. ३७५९/७४, प्लॉट नं. ११, एव्हेन्यु डी, सेक्टर ६, भिलाईनगर, पिन - ४९०००६, स्थापना १९७२., या संस्थेचे एक विठ्ठल रखुमाई मंदिर असून तिथे लेवा पाटीदारांचे कार्यक्रम होत असतात.

५३) अरुण घनश्याम पाटील (कॉन्ट्रॅक्टर), अध्यक्ष, झुंझार लेवा समाज सांस्कृतिक मंडळ, भुसावळ, जिल्हा - जळगाव. रजि नं. महा २५२३ जळगाव.

५४) अध्यक्ष, अखिल भारतीय पाटीदार संघटनांचे प्रधान कार्यालय- चतुर्भुज पाटीदारका निवास, राम स्नेही भवन, आग्रा-बॉम्बे रोड, राऊ जिल्हा - इंदौर (मध्यप्रदेश) येथे कार्यकारिणीच्या बैठकी होतात.

५५) लेवा कुणबी पाटीदार मंदिर एवंम् धर्मशाळा, श्री. लालबाई फुलबाई चौराहा, उज्जैन, अंकपात भैरवगड मार्गावर.

५६) श्री अंबिका पाटीदार समाज धार्मिक एवम् पारमार्थिक ट्रस्ट, जिल्हा इंदौर, म.प्र. कार्यालय, रंगवासा, राऊ जिल्हा इंदौर (म.प्र.).

५७) सुधाकर देविदास नारखेडे, लेवा पाटीदारांचे भाट, आठवडे बाजार पेठेजवळ, मु+पो.+ता = चोपडा, जिल्हा - जळगाव.

५८) मनसाराम फुंदीलाल सरोदे, लेवा भाट, भाट गल्ली, चोपडा, जि. जळगाव.

५९) नथु अप्पा, लेवाभाट, अरुण नगर, चोपडा, जि. जळगाव.

६०) सुभाष भिवलाल राजपूत भाट, भाटगल्ली, चोपडा, जि. जळगाव.

६१) शांताराम चिंतामण, गुजरभाट, भाटगल्ली, चोपडा, जि. जळगाव.

६२) ज्ञानेश्वर गिरीधर गुजरभाट, भाटगल्ली, चोपडा, जि. जळगाव.

६३) छोटू मोहन गुजरभाट, भाटगल्ली, चोपडा, जि. जळगाव याचे पर्यायी नाव रमेश असेही आहे.

६४) गणेश फुंदीलाल सरोदे, राजपूत भाट, भाटगल्ली, चोपडा, जि. जळगाव हे गहिरी गुजर व दोडे

गुजर या दोन जातींची भाटगिरी करतात.

६५) रमेश ताराचंद भाट, म्युनिसिपल क्लार्क, मु+पो+ता = तळोदे, जिल्हा - धुळे.
यापैकी बहुसंख्य भाट ज्येष्ठ व आश्विनपूर्ण स्वगृही राहून शेती करतात. त्यांचेकडे मलकापूर, भुसावळ, यावल, किनगाव, चोपडे मार्गे एस.टी. ने जाता येते. चोपडा गावात बॉम्बे लॉजमध्ये उतरून मधुकर भोजनालयात जेवावे. मलकापूर ते भुसावळ एस.टी.ने गेल्यावर भुसावळ ते चोपडा एस.टी. मिळते. लेवा इतिहासासाठी लेवाभाटाप्रमाणे इतर जातीचाही तुलनात्मक वंश अभ्यासार्थ वरील पत्ते दिले

६६) श्री. दामोदर कांतिकराव राणे, जो-१-११-अ, वैकुंठवाडी, कुंभनाथ सोसायटी, घोडसर, तोल नाक्याजवळ, मणिनगर, अहमदाबाद, पिन - ३८०००८, हे एक लेवा पाटीदार इतिहासाचे जाणकार आहेत.

६७) डॉ. आर.एम्. खर्चे, एम.एस्सी. (ॲग्री)., एल.एल.बी, एम.ए., पीएच.डी., एच.डी.सी., डी.सी.बी.एम., जी.डी.सी.ए.
ॲडिशनल रजिस्ट्रर ऑ. को.ऑपरेटिव्ह सोसायटी. (अँड). महाराष्ट्र स्टेट, सेंट्रल बिल्डिंग, पुणे ४११००१, फोन - ६२४३०६. निवास - जयदीपश्री, तेजस सोसायटी, मंत्री पार्कजवळ, कोथरूड, पुणे - ४११०२९, फोन नं - ३३५३०९, फॅक्स - ३३१४०२.
हे पुण्याच्या भ्रातृमंडळाचे वर्तमान अध्यक्ष आहेत. पत्ता - अध्यक्ष, भ्रातृमंडळ पुणे, सर्वे नं. १२५ अ + १अ/२, (वारजे जकात नाक्यामागे), वारजे, पुणे ४११०२९ (महाराष्ट्र)

६८) अध्यक्ष - लेवा पाटीदार भ्रातृमंडळ, भोपाळ, ७ भारत नगर, इंद्रपुरीके पिछे भोपाळ (म.प्र.) ४६२०२१.
विद्यमान सचिव- दत्तात्रय लक्ष्मण बेंडाळे.
पत्ता - हिंदी भाषिक प्रदेश असल्याने हिंदी किंवा इंग्रजी भाषेतच लिहावा.

६९) महू मध्यप्रदेशातील श्री. सुर्यकांत कुलकर्णी, ५४, बकुल बगान रोड, भवानीपूर, कलकत्ता-७०००२५, पृष्ठ १३४, किमंत १०० रुपये, ही महाराष्ट्राबाहेरील महाराष्ट्रीयांची संस्था परिचय सूची आहे. त्या धर्तीवर लेवा पाटीदारांची संस्था सूची तयार करा.

७०) प्रा. कैलासजी सचान, मु. इटार्सी, जिल्हा - होशंगाबाद (म.प्र.) हे मालवीय गंज येथे राहतात. याचा फोन नं. - (०७५७२) ३३२०२ हा असून यांच्या मुलीने कुर्मी समाज क्रिया (इटार्शी येथील) यांच्यावर संशोधन प्रकल्प बरकत उल्लाह विद्यापीठात पीएच.डी. साठी सादर केला.

प्रकरण ७

"मानव संस्कृती, कूळ, कुळदेव, गोत्रे, प्रवर, देवक, वंश, पिंड, सपिंड आदी संज्ञा परिचय"

विश्वातील जीवसृष्टीच्या ह्या उत्क्रांती चक्रात १ मच्छ, २ कच्छ, ३ वराह, ४ नृसिंह, ५ बटू, मानव रूपाने वामन ह्या पाच अवतारत लेवा पाटीदार जातच अस्तित्वात नव्हती.

परशुराम अवतारात मानवात वर्णाश्रम निर्माण झाला. चातुर्वर्ण्याची निर्मिती झाली. प्रथम मानवाची शिकारी अवस्था. नंतर दुसरी पशुपालन अवस्था. त्यानंतर तिसरी कृषक अवस्था. नंतर चौथी औद्योगिक अवस्था व पाचवी भावी काळात विज्ञान अवस्था. अशा टप्प्या टप्प्याने मानव उन्नत होत गेला.

ह्यापैकी पहिल्या शिकारी अवस्थेत धर्म, वर्ण, जाती वगैरे कोणतेच भेद नव्हते. नंतरच्या पशुपालन अवस्थेत त्याचा प्रारंभ झाला. मानव टोळ्या टोळ्याने राहून भटक्यावृत्तीने पशुपालन करू लागला. ह्या भटक्यावृत्तीतून शेतीचा शोध लागला. शेती करण्यासाठी नदी, तलावाकाठी पाण्याच्या आश्रयाने राहून पशुपालन व शेती उर्फ कृषी करणारा शेतकरी उर्फ कृषक जन्मला.

शिकारी अवस्थेतील मुक्त मानव पशुपाल अवस्थेत भटक्या टोळीवृत्तीने फिरताना विवाहाचा शोध लागला. या संस्कारातून स्थायी शेती करताना तो कुटुंब करून राहू लागला. कुटुंब म्हणजे बायको. कुटुंबापासून - बायकोपासून मुले व मुली असा प्रजनाने कुटुंबाचा विस्तार वाढला.

ह्या कौटुंबिक स्थायी अवस्थेत शेतीला कुल उर्फ कुळ म्हणू लागले. एक जोडी व एक नांगर जेवढी शेती वाहू शकतो त्याला 'कूळ' म्हणू लागले. अशा रीतीने कूळ (म्हणजे शेती) वाहू (वाहणारा उर्फ कसणारा) पासून कूळवाहू शब्द बनला. त्यापासून कूळबाहू, कुळंबी, कुणबी, कणबी शब्द-निर्मिती झाली.

डॉ. रायसिया सिंहाच्या मते कुटुंब पासून कुटुंबी शब्द बनला. वर्णलोपाच्या नियमाप्रमाणे "ट" ह्या वर्णाचा लोप होऊन कुटुम्बी पासून कुम्बी, कुणबी, कणबी आदी शब्द प्रचलन झाले. (कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, पृष्ठ १०, आवृत्ती १९९२ ची, पहा).

तसेच, श्री. रामसिया सिंह याचे ग्रंथात, पृष्ठ ५ वर लिहितात की, कु = भू+रमी म्हणजे रमण होणारी म्हणजे भू मध्ये (कु मध्ये) रमणारी ती भू रमी उर्फ कूर्मी उर्फ कुर्मी जाति संज्ञा निर्माण झाली.

भटक्या पशुपाल अवस्थेत उपद्रवी जंगली जनावरे, चोर, लुटारू, प्राकृतिक आपदा, अकाल, पूर ह्यापासून स्वत:चे आपल्या टोळीतील बांधवांची सुरक्षा करणे. त्यासाठी झगडणे, यत्न करणे, ह्याच अवस्थेत कृषक स्वभाव व कर्महो विशुद्ध क्षत्रियाचेच राहिल्याने या कुर्मीजनातून क्षत्रिय वर्गाची निर्मिती झाली. असे डॉ. रामसियासिंह यांचे मत आहे. त्यांच्या मते वेदात कृषकालाच आर्य म्हटले आहे. त्यांनी 'अर' म्हणजे लाकडी नांगराने शेतीचे कर्षण करून ती पेरण्यासाठी तैय्यार करणे. व जी ही क्रिया करतो म्हणजे 'अर' करतो तो आर्य. अशारितीने आर्य शब्द 'अर' धातूपासून बनला. अशा आर्या व्यतिरिक्त तो अर्थातच 'अनार्थ'होय. या रीतीने कुर्मवंशी क्षत्रिय जातीचा मूळ उगम या प्राचीन आर्य किंवा कृषक समाजापासून आहे. मानवी संस्कृतीचा पाया घालणाऱ्या या आर्य किंवा कृषकांनीच प्रागैतिहासिक कालात समृद्ध सभ्यता व संस्कृतीचा पाया

घातला.

कुटुंब उर्फ कुलपासून कुलम्बी, कुलमी, कूर्मी, कुम्बी, कुर्मी, कापू, कम्मा, कूर्मी क्षत्रिय, कुर्मवंशी क्षत्रिय आदी शब्द उच्चार भेदांमुळे प्रान्तपरत्वे व्युत्पन्न झाले.

भटका शिकारी मानव टोळ्या करून कृषीकर्माने स्थायिक झाला. कुटुंब करून राहू लागला. या काही कुटुंब मिळून बनलेल्या स्थानाला ग्राम म्हणू लागला. काही ग्राम मिळून सुसंघटित झालेल्या समाजास वेद-काळात 'जन' म्हणू लागले.

सिंधू (सिंध), वितस्त (झेलम), असिक्नी (चिनाब), परुष्णी (रावी), आणि विवाश (व्यास) ह्या पाच नद्याकाठच्या भूभागास 'पंचनद प्रदेश' म्हणत. त्यानंतर शतुद्री (सतलज) व सरस्वती ह्या नद्याचा उल्लेख वेदात दिसतो. त्यात पंचनद व सतलज तथा सरस्वती ह्या सात नद्यांकाठचा विस्तृत प्रदेश सप्त सैंधव प्रदेश म्हटला जाई.

वेदात ह्या पंचनद्याकाठच्या लोकांना पंचजन म्हणत. अनू, द्रुह्य, वुवंश, यदु व पुरुष हा पंचजनांचा समाजच 'पंचजन' म्हणून ओळखत. अशा प्राचीन वेदकाळापासून क्षात्रकर्म व कृषीकर्म करणारा हा समाजच सर्व संस्कृतीचा जनक आहे. डॉ. रामसिया सिंह 'कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा' आवृत्ती १९९२, पृष्ठ १२ परिच्छेद, ४ मध्ये म्हणतात की, **या कृषक क्षत्रियामधूनच चिंतनशील प्रबुद्ध ब्रह्मज्ञानी लोकांची निर्मिती झाली. ते लोक स्वत:ला ब्राह्मण म्हणवू लागले.** अनेक क्षत्रिय कृषक व विदुषिया वैदिक मंत्रद्रष्टचा होत्या. विश्वामित्र व राजा जनक दोन्ही क्षत्रिय होते. विश्वामित्र तप व साधनेद्वारा ब्रह्मर्षी तर राजा जनकास तत्त्वज्ञानी ब्रह्मवेत्ता पद प्राप्ती झाली. जनक राजाच्या दरबारात ज्ञानप्राप्तीस्तव अनेक विद्वान ब्राह्मण जनकापासून ज्ञानप्राप्त करण्यासाठी येत असत, तर वेदामधील सर्वश्रेष्ठ गायत्री मंत्राची रचना करणारा कवी विश्वामित्र हा क्षत्रिय होता.

साप्ताहिक सहारा, यमुना नगर, सेक्टर नं. २१, स्कीम नं. ६, बिल्डिंग नं. ३६, फ्लॅट नं. ९, प्राधिकरण, निगडी, पुणे ४११०४४, फोन नं. - ७७२४४८ दिल्ली. रजिस्ट्रेशन क्र. ३१९४३/१९७८ या वृत्तपत्राचें संपादक - श्री. वसंतराव शिंदे यांच्या साप्ताहिक सहारा दिवाळी विशेषांक, पृष्ठ ३१ वरील "क्षत्रिय मराठा समाज शहाण्णव कुळी देवक-देवता-गोत्रे व प्रवरे" नामक लेखात श्री भविष्य पुराणाधारे ब्रह्मोत्तरखंडामधून क्षत्रियांची सूर्यवंश उत्पत्ती कथन नावाचे प्रथम प्रकरण सर्ग दिले आहे, हे अधिक माहितीस्त व जिज्ञासूंनी वाचून पहावे.

क्षत्रिय मराठ्यांची गोत्रे व प्रवर या शीर्षकाखाली ७ गोत्रे प्रवर विचार करताना १ सूर्यवंश, २ चंद्रवंश, ३ शेषवंश उर्फ नागवंश, ४ ब्रह्मवंश उर्फ यदूवंश उर्फ हरिवंश या चार क्षत्रिय वंशात जे सुप्रसिद्ध ऋषी द्रष्टे म्हणजे वेदमंत्र रचणारे ऋषी होऊन गेले; त्यांच्या नावावरून त्या वंशाची गोत्रे चालू झाली. गोत्र ऋषि म्हणजे कुळाचा मूळ ऋषि होय.

क्षत्रिय मराठ्यांच्या ह्या चार क्षत्रिय वंशापैकी फक्त सूर्यवंशात, अयोध्येच्या प्रभू रामचंद्रसूत लवापासून लेवा पाटीदारांचा क्षत्रिय कुर्मी समाज निर्माण झाला आहे; हे आपण पूर्वी साधार पाहिलेच आहे.

"आर्षेय मृषैरपत्यमग्निम यजमानस्य ऋषी संतारवात् तं वृणिते प्रार्थयते होमादिभि:" भावार्थ - यज्ञ करणारा यजमान अग्नीची प्रार्थना करतो की, हे अग्ने ! ऋग्वेदातील सूक्तांनी ज्यांनी तुझी सेवा केली आहे. अशा ऋषींचा मी वंशज आहे. गोत्र ऋषी हा प्रवर ऋषीचा वंशज आहे... गोत्र ऋषी म्हणजे त्या कुळाचा मूळ ऋषी असा त्याचा अर्थ आहे. एका प्रवरापासून म्हणजे मुळच्या मंत्र ऋषीपासून अनेक गोत्रऋषी उत्पन्न होतात. म्हणून गोत्रे अनेक आहेत, पण प्रवर थोडे व ठराविक आहेत.

गोत्रप्रवरांचे महत्त्व : - वैदिक धर्मीय हिंदूंना लग्न, श्राद्ध, पक्ष, उत्तरक्रिया वगैरे धर्मकृत्यास

आरंभ करण्यापूर्वी आपल्या गोत्राचा व प्रवराचा उच्चार करावा लागतो. त्यावरून आपण कोणत्या पूर्वजांचे वंशात उत्पन्न झालो आहोत त्या पूर्वजांचे स्मरण होते. सुमारे ५००० वर्षांपासून आर्यांनी आपल्या वंशोत्पत्तीची आठवण कायम ठेवली आहे.

क्षत्रियांची व ब्राह्मणांची गोत्रे कोठेकोठे एकच ठरतात. याचे कारण पूर्वी गुणकर्मानुसार कोणासही ब्राह्मण होता येत असे. बहुतेक सर्व गोत्र ऋषी क्षत्रियच आहेत. तसेच, पूर्वी आपण पाहिलेच आहे की, कुर्मी लोकातून चिंतनशील प्रबुद्ध लोकच ब्राह्मण म्हणून पुढे आलेत. त्यामुळेही हे असे घडले.

ब्राह्मण म्हणविणारी माणसे स्वत:स सात मुख्य ऋषींच्या वंशापैकी समजतात. ते सात ऋषी अंगीरस, भृगु, विश्वामित्र, कश्यप, वशिष्ट, अत्रि व अगस्थि हे होत. या सात ऋषीपैकी विश्वामित्र हा क्षत्रिय ऋषी होता. कौशिक गोत्र क्षत्रियांचे आहे.

विश्वामित्रासच कौशिक म्हटलेले ग्रंथांतरी दाखले आहेत. या गोत्रातील मुलगी मिळाली तर भृगूचे गोत्र आपले भाग्य विशेष समजतो. जमदग्नीची आई सत्यवती ही विश्वामित्राची बहीण होती. बायको रेणुका हीही क्षत्रियच होती. अंगिरस, भृग, कश्यप व अगस्ती हे क्षत्रिय असल्याबद्दल वादच नाही. वसिष्ट हा कलावंतिणीचे पोटी जन्मलेला होता. अगस्तीची पत्नी लोपामुद्रा ही क्षत्रिय कुलोत्पन्नच होती. यावरून गोत्रे, गोत्रप्रवराचा मूळ शुद्ध पाया क्षत्रियांचाच विशेष मजबूत आहे. म्हणून ब्राह्मणांनी क्षत्रिय गोत्रातच आपला उगम मानला.

सूर्यवंशात परस्पर विवाह होत. उदयपूरचे गुहिलोह व जयपूरचे कच्छवाह ही दोन्ही सूर्यवंशी घराणी आहेत. यांच्यात परस्पर विवाह होत असत. राम व सीता या दोघांचीही घराणी सूर्यवंशीयच होत. अर्जुन व द्रौपदी ही चंद्रवंशी होते. यावरून एका वंशात क्षत्रियांचे विवाह होऊ शकत.

तेज:पुज प्राचीन राजे :-

ज्या तेज:पुज राजाचे नावावरून नऊ ग्रहांना नावे देण्यात आली ते राजे क्रमश: असे.

१ सूर्य राजा हा कलिंग देशात झाला. त्याचे गोत्र कश्यप.
२ चंद्र राजा उर्फ सोमराजा यमुनातिरी झाला. त्याचे गोत्र आत्रेय.
३ मंगल राजा अवंती देशात झाला. त्याचे गोत्र अत्रि.
४ बुधराजा मगध देशात झाला. त्याचे गोत्र अंगिरस.
५ गुरूराजा सिंधु देशात झाला. त्याचे गोत्र भार्गव.
६ शुक्र राजा भोजकट देशात झाला. त्याचे गोत्र कश्यप.
७ शनि राजा सौराष्ट्र देशात झाला. त्याचे गोत्र काश्यप.
८ राहूराजा बर्बर देशात झाला. त्याचे गोत्र मैत्रेनीस.
९ केतु राजा मध्यदेशात झाला. त्याचे गोत्र जैमिनी होय.

श्री व्यासऋषींनी लिहिलेल्या स्कंध पुराणातील सह्याद्रि खंडात षण्णवती कुल नामक प्रकरणात तसेच, स्वामी बाळाजी नथुजी गावंडे यांनी दिलेली वंशावळी व शहाण्णव कुळी, मूळस्तंभ अध्याय १७ आणि क्षत्रियांची उत्पत्ती व वंशावळी या ग्रंथात क्षत्रिय मराठा जातीच्या ९६ कुळाचा इतिहास दिला. त्यात परस्पर कुळात मेळ असल्याचे दिसते.

ऋषींचे पाच प्रकार मानतात :-

१ छंद ऋषी (त्यांनी धर्मग्रंथात छंदोबद्ध रचना केली) - वशिष्ठ, कण्व, कवष एलुतष इत्यादी.
२ ब्रह्म ऋषी (ब्रह्मासंबंधी किंवा ईश्वरासंबंधीचे विचारवंत) - अत्रि वगैरे.
३ महर्षी - भृगु इत्यादी ऋषी महर्षी होत.
४ राजर्षी - विश्वामित्र, प्रियव्रत, जनक, ऋतुपर्ण. अत्रि, कश्यप, अंगिरस, जैमिनी, शांडिल्य,

कौंडिण्य, भारद्वाज यापैकी काही छंद ऋषीही होते.

५ देवर्षी - नारद.

या ऋषींमध्ये क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अप्सरापुत्रादी वर्णाचे लोक होते म्हणून ऋषींचे कूळ व गंगेचे मूळ शोधू नये, अशी म्हण पडली.

अलिकडच्या मताप्रमाणे विश्वामित्र, जमदग्नी, भारद्वाज, गौतम, अत्रि, वशिष्ठ, कश्यप हे सात मुख्य गोत्र ऋषी व आठवा अगस्ती हे आठ गोत्र-ऋषी मानतात असे साप्ताहिक सहारा दिवाळी विशेषांक, १९९६, पृष्ठ ३१ वर श्री. वसंतराव शिंदे लिहितात. हे मूळातूनच वाचावे.

डॉ. रामगोपाळ सोनी, ए-१, युनिर्व्हसिटी टीचर्स क्वार्टर्स, अमरावती रोड, नागपूर, ४४००१० यांनी "मराठी आडनावे" नावाचा ग्रंथ लिहिला. तो श्रीयुत नि.सी. मुजुमदार, मनोहर कथा प्रकाशन, मुजुमदार बंगला, पोस्ट ऑफिसच्या मागे, गिरीपेठ, नागपूर - ४४००१० यांनी सन १९९१ चे सुमारास प्रसिद्ध केला. त्या ग्रंथाचे प्रकरण १ व २ मध्ये आडनावासंबंधी विचार करताना, आडनाव, गोत्र, प्रवर यासंबंधी मुख्य विषयानुषंगाने काही महत्त्वाचे विवेचन केले. ते या दृष्टीने अभ्यसनीय आहे.

डॉ. सोनींच्या मते ब्राह्मण, आरण्यके व उपनिषदे यांच्या काळी गोत्रनामांना प्राधान्य येऊ लागले होते. या ग्रंथात पृष्ठ ५ वर, श्री. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांचे एक मत नमूद केले की, "ऋषींच्या नावावरून गोत्रे बनली, गोत्रापासून कुळे बनली, हीच कुळे कालांतराने उपनामे(आडनावे) बनली."

डॉ. सोनीच्या मते (पृष्ठ २६) गोत्र ऋषी विशिष्ट कुळांचे मूळ पुरुष मानले जातात. गोत्रांचा सामान्य अर्थ कुळाचा मूळ पुरुष असा आहे. प्रसिद्ध वैय्याकरणपाणिनी याने 'अपत्य पौत्र प्रभृति गोत्रम्' अर्थात एका पूर्वजाची पुत्र-पौत्र इत्यादी सर्व संतती म्हणजे गोत्र, अशी व्याख्या केली. डॉ. केळकरांच्या मते ज्या कुळसमुहात आपण आपसात विवाह करू शकत नाही तो कुळसमूह म्हणजे गोत्र होय. असे महाराष्ट्रीय ज्ञानकोष, पृष्ठ ४९४ चा आधार देऊन ते लिहितात. तसेच, श्री.ना.गो चापेकरांच्या मते गोत्रांचा जन्म सहोदरत्वावर अथवा सपिण्डावर आधारित नव्हता. किंबहुना ते (गोत्र) उपनयन संस्काराने प्राप्त होत होते; असे चित्पावन पृष्ठ २९ चा आधार देऊन कथन करतात.

तसेच, गोत्राप्रमाणेच 'प्रवर' देखिल ऋषींच्या नावावरच प्रसिद्ध झाले. प्रवर ऋषींना गोत्रऋषींचे पूर्वज मानण्यात आले, आहे असे 'चित्पावन' पृष्ठ ३९ या ना.गो. चापेकरांचा आधार देऊन पृष्ठ २८ वर कथन केले आहे. निर्णयसिंधूकाराने गोत्र ऋषीचे पूर्वज अर्थात पिता, पितामह व प्रपितामह यांनाच प्रवर मानले आहे. "गोत्रभूतस्य पितृपितामप्रपितामह: एव प्रवरा:" असा ना.गो. चापेकर चित्पावन पृष्ठ ४० चा दाखला देऊन विषद केले आहे.

'प्रवराचा दुसरा अर्थ आवाहन करण्यायोग्य व्यक्ती.' प्रवराचा अर्थ अध्यापन करणारे गुरू असाही केला जातो. तसे पाहता प्रवराचा मूळ अर्थ यज्ञादी कार्यासाठी निवडण्यात आलेला पुरोहित असा आहे. धर्मशास्त्रात देखील प्रवराची हीच व्याख्या देण्यात आली आहे. 'प्रव्रियन्ते होत्राध्वर्युभ्याम् इति प्रवरा:' असे धर्मशास्त्र संग्रह ग्रंथाचे, पृष्ठ १२७ चा आधार देऊन निवेदन केले आहे.

प्राचीन काळी यज्ञासमयी प्रत्येक व्यक्ती आपला प्रवर निवडत असे आणि त्याच्याच नावावर आवाहन करीत असे. प्रवराच्या रूपात ऋषी, मुनी व श्रेष्ठ गुरूच निवडले जात. मध्यंतरी यज्ञव्यवस्थेत शिथीलता आली व लोकांना नवा प्रवर निवडण्यात योग्यता राहिली नाही, तेव्हा लोक आपल्या पित्यालाच प्रवर मानू लागले. अशा प्रकारे प्रवर क्रमश: परंपरागत झाले.

एका गोत्रात कित्येकदा अनेक प्रवर असतात. त्याचे कारण असे की, त्या गोत्रात पौरोहित्य

किंवा अध्यापन करणारे अनेक अध्यापक असावेत. प्रवरांची अधिक संख्या आपल्या पूर्वजांचे विचारस्वातंत्र्य, विद्वानाविषयी आदर व विद्याप्रेम प्रकट करते. प्रवर-संस्थापकात आत्रेय, काश्यप, देवल, बृहस्पती इत्यादी मुख्य आहेत.

नवीन संस्कृतीच्या प्रकाशात लोकांनी गोत्र नामाचा त्याग केला व प्रवृत्तीमूलक कुळनावाचा स्वीकार केला. गोत्रप्रवरमूलक आडनावे येथील प्राचीन परंपरेचे अवशेष असल्याने येथील ऋषी,मुनी व गुरू यांचा इतिहास सुरक्षित आहे. गोत्रप्रवरमूलक आडनावे वैदिक परंपरेची एक कडी आहे. जात, गोत्र, प्रवर, कूळ, मूळस्थान व आडनावे यांचे अधिक माहितीसाठी डॉ. सोनी यांचा 'मराठी आडनाव कोश' पहा.

श्री. ना.गो. चापेकर लिखित चित्पावन पृष्ठ ५५ च्या आधारे डॉ. सोनी पृष्ठ ३६ वर लिहितात की, "भारतात वैचारिक स्वातंत्र्याला फार महत्त्व आहे. म्हणून प्रत्येक व्यक्तीने वेगवेगळ्या देवतांची कल्पना केली व त्यांना प्रतिष्ठित करण्याचा प्रयत्न केला. **येथे प्रत्येक कुटुंबाची एक स्वतंत्र कुलदेवता आहे.** सुमेरियातसुद्धा प्रत्येक गावची एक प्रमुख देवता व प्रत्येक मनुष्याची एक कुळदेवता अथवा आराध्यदेवता आहे. ह्या दृष्टीने लेवा पाटीदार समाजाच्या इतिहासाचे सखोल अध्ययन करून श्री. शंकर विठोबा पाटील, मु.पोस्ट दुधलगाव बुद्रूक, तुलका - मलकापूर, जिल्हा - बुलढाणा (विदर्भ) पिन - ४४३१०१, फोन ५२०२५. यांनी अ.भा.लेवा पाटीदार महामंडळाचे त्रैमासिक मुखपत्र 'आपले लेवा परिवार' मार्च १९९४ पृष्ठ ४५ वर लेवा पाटीदारांनी गुजराथ सोडताना निघालेल्या काही कुळांची माहिती कूळ, गोत्र, कुळदैवत व त्यांचे गुजराथेतील मूळ वसतीस्थान ह्याबाबत सविस्तर दिली आहे. या लेखात दिलेल्या सुमारे १४ गोत्र-सूचीत प्रत्येक गोत्रात लेवा पाटीदारांची कोणकोणती कूळे समाविष्ट झालीत ते पाहून आपल्या आडनावानुसार माहिती शोधून माहिती पहावी.

डॉ. सोनी लिखित मराठी आडनावे पृष्ठ ४० वर जातीच्या वर्णव्यवस्थेवरून लिहिताना डॉ. सोनी लिहितात की, भारतात जातीची उत्पत्ती वर्णव्यवस्थेवरून झाली आहे. आपल्या प्रारंभिक अवस्थेत ही वर्णव्यवस्था कर्ममूलक व गुण मूलक होती. 'चातुवर्ण्यं मया सृष्टं या गुणकर्म विभागश:' (श्रीमत्‌भगवद् मीता ४:१३) असे भगवान श्रीकृष्णाने म्हटले, पण कालांतराने ती जन्ममूलक झाली. पूर्वी कोणतीही व्यक्ती कर्मानुसार आपला वर्ण बदलवू शकत होती, पण नंतर ही व्यवस्था रूढिग्रस्त, आनुवंशिक व अपरिवर्तनीय बनली.

जातीचा अर्थ 'जन्मापासून' असा आहे. म्हणून जातीत आनुवंशिकतेचे तत्त्व प्रधान समजण्यात येते. प्रा. कुले यांनी देखील जातीला आनुवंशिक मानले आहे. त्यांच्या मते 'जेव्हा एक वर्ग निश्चितपणे आनुवंशिक होऊन जातो तेव्हा त्यास आपण जात म्हणतो.' मार्टिन्डेल व मोनैकसी यांनी जातीची परिभाषा अशी दिली आहे- 'जात व्यक्तीचा एक असा समुह आहे की तिच्या कर्तव्याचा व विशेषाधिकाराचा हिस्सा जन्मापासून निश्चित होत असतो. ११ व्या शतकातील प्रसिद्ध इतिहासकार अल्वेरूनी याने देखिल चार वर्णांचा उल्लेख केला आहे. आर्यांची जी शाखा इराणात राहून गेली होती. तिला पारसी नावाने संबोधण्यात येते. पारशात देखील भारतीय आर्यांप्रमाणेच चार वर्णांचे चलन होते. 'अवेस्ता' या पारशी धर्मग्रंथात आथ्रवण (ब्राह्मण), रथैस्तार (क्षत्रिय), वास्तघोष (वैश्य) व हुतोक्ष (शूद्र) (दिनकर: संस्कृति के चार अध्याय पृ. ३२) ही वर्णमूलक व्यवस्था हळूहळू जातीत परिवर्तित झाली, व जातीदेखील अनेक उपजातीत वाढल्या गेल्या. या नवनवीन जाती व उपजातींची उत्पत्ती अनेक कारणांनी झाली. विभिन्न व्यवसाय व जातीच्या मिश्रणातून जातींची निर्मिती झाली. 'महाराष्ट्र परिचय' पृष्ठ ८८ चे अनुसार जातींची संख्या ४००० मानली आहे. यात उपजातीही समाविष्ट आहेत. उपजातींची संख्या मोठी विशाल असून तो एक स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे. या विभिन्न जातीच्या जन्माची कारणे अशी : १ चातुर्वर्ण्य व्यवस्था, २ प्रादेशिक

विभाजन, ३ व्यवसाय भेद, ४ भाषा भेद, ५ राज्यसत्ता भेद, ६ धर्म-संप्रदाय भेद. असे गोविंद मंगेश कालेलकर - उपोध्यात: मुंबई इलाख्यातील जाती, पृष्ठ २ वर पहा.

१२० जातींचा महाराष्ट्र परिचय, पृष्ठ ९० ते ९५ व मुंबई इलाख्यातील लेखकाने ७०४ जातींचा उल्लेख केला आहे. इसाई व मुसलमान हे सोडले तरी, या देशात एकामागून एक कमीत-कमी अकरा जातींचे आगमन व समागम झाल्याचा पुरावा मिळतो व त्यांनी भारतालाच आपला देश मानून त्यांनी भारतीय समाज व संस्कृती यात विलीन होऊन ते आर्य अथवा हिंदू बनलेत. निग्रो, आर्य, यूची, ग्रीक, शक, अभिर, मंगोल, तुर्क यांचा हिंदू ते समावेश झाला.

तसेच, पंजाबचे अधिपती व मूळ निवासस्थान पंजाबातील पंचनदीचे क्षेत्र असे गुजर लोक अत्यंत शक्तीशाली होते. (मराठी आडनावे लेखक सोनी, पृष्ठ ४९ पहा) तेथील गुजरानवाला या स्थानाचे नाव यांच्या नावावरून प्रसिद्ध झाले असे बजरंगलाला लोहिया यांचे राजस्थान की जातियाँ, पृष्ठ २१ वर दिले आहे. जनरल कमिंधमाच्या मताप्रमाणे गुजरानवाला, गुजरात इत्यादी प्रांत व नगर नावाचे नामकरण या जातीच्या नावावरच झाले आहे. गुजरांचा इतिहास पंजाबपासून सुरू होतो. विदेशी आक्रमकांनी यांना तेथून (हुसकून) हाकलून लावले तेव्हापासून ते उत्तर राजस्थानात जाऊन राहू लागले. काही गुजर पंजाबातून दिल्लीत आले, व तेथून ते अजमेर व सौराष्ट्रात पसरले. या गुजरामुळेच मूळच्या 'लाड' प्रांताचे नाव गुर्जरखंड अथवा गुजराथ पडले.

गुजरांच्या उत्पत्तीसंबंधात विद्वानात एकमत नाही. स्मिथ, डॉ. भांडारकर वगैरे काही विद्वान यांना परदेशातून आलेले मानतात. परंतु, वैद्याच्या मतानुसार गुजर हे भारतीय आर्यांचेच वंशज आहेत, असे मीत्तलच्या प्र.सा.इ.पृष्ठ ७० चे आधारे डॉ.सोनी मराठी आडनावे पृष्ठ ४९ वर कथन करतात. चारण व भाट गुजरांची उत्पत्ती राजपूतापासून मानतात. याचे कारण की, तंवर, चव्हाण, चंदेल इत्यादी राजपूत गोत्रे गुजरात आहेत. गुजर हे आडनाव गुजराथमधून महाराष्ट्रात आले असे दिसून येते, असे डॉ. सोनी म्हणतात.

यांचेपासून गुजर, बडगुजर, लेवागुजर, लेवा पाटीदार जातीत ही काही घराणे शिरली आहेत असे वाटल्यावरून विषयांतर करून वरील माहिती सविस्तर देत आहे.

महाराष्ट्र शासन, राज्य गॅझेटियर, महाराष्ट्र: भूमि व लोक संपादक : डॉ.कि.का. चौधरी, मराठी आवृत्ती सुधारित, १९९६, पृष्ठ २०८ म्हटले आहे की, "महाभारत काळात उत्तर भारतात 'गोत्र' पद्धती ब्राह्मणांनी स्वीकारली. गोत्र म्हणजे पित्याच्या घराण्याचा मूळ पुरुष असून त्यांचेच नाव नंतरच्या पिढीतील अपत्यांचे गोत्र समजले जाते... गोत्र म्हणजे कर्त्या पुरुष प्रमुखाचे नाव, **गोत्र म्हणजे सुप्रसिद्ध वंश पुरुषाचे नाव होय.** "गोत्र म्हणजे एकाच पुरुषापासून निर्माण होत गेलेल्या सर्व पिढ्यांच्या सर्व व्यक्तींचा समूह." असे पुरुष सात असून आठवा अगस्ती मानला जातो. एकाच गोत्राच्या व्यक्तींना विवाह करता येत नाही. गोत्र म्हणजे सुरुवातीच्या कुटुंबप्रमुखांपैकी आठ ऋषी पहिले पुरुष म्हणून मानले जातात. छांदोग्योपनिषदात आठ मूळ पुरुषांची भारद्वाज, गौतम, वसिष्ठ, अत्रि, काश्यप, विश्वामित्र, जमदग्नी आणि अगस्ति ही नावे सांगितली आहेत. त्यातूनच पुढे गोत्र साद्दृश्यावरून रक्तसंबंध किंवा अनुवंशिकता प्रस्थापित करण्याची पद्धती इ.सन ८०० च्या सुमारास पूर्ण रूढ झाली.

प्रवर :- ऋषी पाच प्रकारचे होते. छंदर्षी, राजर्षी, ब्रह्मर्षी, देवर्षी व तपस्वी. **क्षात्रधर्म** लेखक, ब्र.भू. प. पूज्य मोरेदादा, दिंडोरी दरबार, जिल्हा-नाशिक, आवृत्ती ता. १२ डिसेंबर १९८९ पृष्ठ १९ वर ऋषींचे हे पाच प्रकार मानलेत. ह्या ऋषींचे शिष्य, परंपरा यांनी वाढत्या संख्येला नेतृत्व व मार्गदर्शन देऊन मूळ ऋषींच्या अनुयायातच उपप्रमुख, गोत्रउपप्रमुख अथवा प्रवर ऋषी असे संबोधू लागले. यातच कोणी तीन-पाच असे उपप्रमुख ऋषी प्रत्येक गोत्रात झाले त्याचा उल्लेख त्रिप्रवर,

पंचप्रवर अशा शब्दांनी व्यक्तवितात.

महाराष्ट्र शासन, राज्य गॅझेटियर, महाराष्ट्र: भूमि व लोक संपादक - डॉ. कि.का. **चौधरी, पृष्ठ** २०९ वर लिहिले आहे की, **"एकाच** गोत्रातील ज्या कुटुंबात पूर्वजांचे नामस्मरण करून **प्रार्थना** करतात व ज्या पूर्वज ऋषीने यज्ञात आराधना केलेली असते त्या मूळ ऋषीचे नामोच्चारण व पुण्यस्मरण करणारी कुटुंबे म्हणजे प्रवर." एकूण ४९ प्रवरे आहेत. प्रवरे फक्त ब्राह्मणांमध्येच आहेत. क्षत्रिय, वैश्य व शूद्रांना परंपरेने प्रवरे नाहीत. म्हणून लेवा पाटीदारांचा इतिहास अभ्यासताना प्रवरे यांची फक्त तोंडओळख देऊन हा विषय आटोपतो.

पिंड :- पिंड म्हणजे भाताची मूद. सपिंड म्हणजे जवळचे नातेवाईक. हे जवळचे नातेवाईक मृत व्यक्तीला पिंडदान करतात म्हणून ते सपिंड समजतात. **समान रक्ताच्या एकत्रित संपर्काद्वारे गुणवत्ता कमी होते. अशी संतती सदोषही असू शकते.** ह्याचाही लेवा पाटीदार समाजास परिचय व्हावा इतकेच लिहीत आहे. यासंबंधी सखोल माहिती हवी असल्यास 'जोतिर्मयूख' ले.कै. गोविंद रामचंद्र मोघे, आवृत्ती ८ वी, **पृष्ठ** ६६ वर सपिंड्य निर्णय प्रकरणात पहा.

प्रकरण ८

काही रक्तसंज्ञा :- वंश, कुळ

वंश :-

वंश म्हणजे विभाग. क्षात्रधर्म लेखक प.पूज्य. मोरेदादा 'दिंडोरी दरबार' या ग्रंथात पृ. १७ वर वंशासंबंधी विवेचन केले आहे. क्षत्रियांचे वंश दाखविताना मूळ दोन वंश चंद्र व सूर्यासारखे तेजस्वी, कीर्तिमान होऊन गेले. त्यामुळे गुणकर्मानुरूप त्यांना सूर्यवंश व चंद्रवंश ही नावे दिली गेली. त्यानंतर नागवंश व ब्रह्मवंश हेही किरकोळ वंश क्षत्रियात गणले गेले.

प्रथम सूर्यवंशाचा विचार करू. भगवान आदिनारायण हे सुर्याचे नाव आहे. तसेच, भगवान विष्णुचेही नाव आहे. भगवान विष्णु हे इंद्राचे भाऊ असून सूर्यवंशाचे मूळ कारण **आहेत.**

भगवान विष्णुचा पुत्र ब्रह्मदेव, ब्रह्मदेवाला अत्रि व मरिची हे पुत्र झाले. अत्रिचा **मुलगा** सोम उर्फ चंद्र- त्याचेपासून चंद्रवंश झाला, व मरिचीचा पुत्र कश्यप व कश्यपास, **दक्षकन्या दाक्षायणी** उर्फ अदिती पासून आदित्य व विवस्वान व विवस्नानास मनु व यम हे पुत्र **झाले.** मनुपासून ईक्ष्वाकू आदि १० मुले झाली. ह्या **ईक्ष्वाकूचा २८ वा वंशज त्रिशंकू होय. ईक्ष्वाकूचे** वंशात रघु, सगर, भगीरथ, श्रीयाळ, नळ, जनक, विश्वामित्र, हरिश्चंद्र **निर्माण झाले**, तर- सीता, चांगुणा, दमयंती, तारामती या तेजस्वी स्त्रिया तसेच, दशरथ, राम, **लक्ष्मण, भरत**, मारुती, लवकुश, कैकयी, सुमित्रा, कौशल्या सारखे महान स्त्री-पुरुष हे सर्व **सूर्यवंशातील क्षात्र** आहेत.

क्षात्रधर्म लेखक **पूज्य मोरेदादा दिंडोरी दरबार**, जिल्हा नाशिक या ग्रंथात पृष्ठ १६ वर दिलेला सूर्यवंशाचा वंशवृक्ष असा -

१ आदिनारायण भगवान विष्णु इंद्राचा भाऊ होता. २ याचेपासून ब्रह्मदेव जन्मला. ३ ब्रह्मदेवापासून चंद्रवंश व सूर्यवंश जन्मले. सूर्यवंशात मरिची जन्मला, मरिचीचा पुत्र कश्यप, कश्यपापासून विवस्वान उर्फ सूर्य, विवस्वानापासून मनु, मनुपासून ईक्ष्वाकू **ईक्ष्वाकूचे वंशात ३७ वा वंशज सगर राजा झाला.** सगरापासून भगीरथ, त्यापासून अंबरीस, नंतर रघु, रघुचा पुत्र अज, अजापासून

दशरथ, दशरथापासून राम, रामापासून लव व कुश ही जुळी मुले झाली.

रेव्हेरेन्ड शेरिग्ज हिंदू ट्राईब्ज एण्ड कास्टस व्हॉल्यूम ३ चे पृष्ठ २५८ व बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम ९, पार्ट १ मध्ये उल्लेख आहे की, रामचंद्र भगवान यांना दोन-मुले लव व कुश नावाची होती. लवापासून लेवा कुशापासून कुशवाह झाले. असे आपले लेवा परिवार नावाचे अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळाचे त्रैमासिक मुखपत्रात- एप्रिल ते जून १९९४ चे अंकात, पृष्ठ ५ वर श्री. वासुदेवराव एच.पाटील लिहितात ते पहा - इंपिरियल गॅझेट ऑफ इंडिया न्यू एडिशन व्हॉल्यूम ५, पृष्ठ ९७ व ९८ अहमदाबाद डिस्ट्रिक्ट मध्ये म्हटलेले आहे की, **लेवा पाटील व कडवा पाटील राजपूतांच्या बरोबरीची जात आहे.**

भारतेन्दु हरिश्चंद्र द्वारा लिखित 'उदय पुरोदय' (भारतेन्दु समग्र, पृष्ठ ६८१ ते ७०२ मध्ये उल्लेख आहे की, लवाने लवपूर (लाहोर) वसविले. त्याचे राज्य आपल्या मुलास दिले. कारूपथ (कराची)चे राज्य लक्ष्मणाचे मुलास दिले. पुरुषपूर (पेशवर) चे राज्य भरतपुत्र पुष्कर यास मथुरेचे राज्य शत्रुघ्नाचे मुलास दिले होते. रामायण कालीन समाज व संस्कृती या दोन्ही ग्रंथात या शहराचे नाव व त्यांना वसविणारांचा उल्लेख आहे.

लव व कुश यांचे वंशज वायव्य हिंदुस्थान सोडून गुजरातमध्ये का आले ? या प्रश्नाचे उत्तर 'क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास' पृष्ठ ४४ मध्ये लेखक- श्री. केशवलाल पटेल ह्यांनी स्पष्ट केले आहे की, मनुचे चौथे पुत्र दिष्ट याचे वंशज जनमेजय (महाभारतातील जनमेजय वेगळा आहे) विशालावती (हल्लीचे पंजाबातील व्यास शहर) नगरात राज्य करीत होते. लवाने त्यास हरविले व लवपूर वसवून-त्याचे राज्य आपल्या मुलास दिले. **लवानंतर ५५ वा वंशज सुमित्र** यास अर्जुनाचा वंशज परीक्षित (द्वितीय) ह्याने हरविले व पंजाबचे राज्य आपल्या राज्यास जोडले. (सुमित्र व लव ह्यांच्यामधील ५५ पिढीचा नामक्रम उल्लेख त्या ग्रंथात आहे. लेख विस्तारामुळे इथे उल्लेख केला नाही.) इ.सनापूर्वी ७८ सालची ही घटना असावी.

सुमित्रानंतर चौथी पिढी **(लवानंतर ५९ वी) चा कनकसेन** पंजाब सोडून राजस्थानमार्गे गुजराथमध्ये आला. कारण, पंजाबात त्या वंशाचे राज्य समाप्त झाले होते. सौराष्ट्रात ह्या कनकसेनने वल्लभीपूर (विजयपूर) वसविले, व तिथे आपले राज्य प्रस्थापित केले. (पृष्ठ २०, पाटीदारोंका इतिहास लेखक-केशवलाल पटेल व पृष्ठ ६८२ उदय पुरोदय, लेखक- भारतेंदु हरिश्चंद्र).

कनकसेन जेव्हा सौराष्ट्रात आला तेव्हा इसवी.सन १४४ हा होता. श्री. कनकसेनबरोबर नंतर त्याचे भाऊबंद व सहयोगी गुर्जर, गुर्जर प्रदेशामधून (वायव्य हिंदुस्थानात गुर्जर प्रदेश आहे.) सौराष्ट्रात आले व स्थायिक झाले. म्हणून सौराष्ट्राचे नाव (लाट देश जाऊन) गुजराथ असे झाले. (प्राचीन भारतका भूगोल, पृष्ठ ४७४, प्रकाशक- उत्तर प्रदेश शासकीय संस्थान.) मुंबई सरकारच्या प्राचीन लेखावरून व विभिन्न संशोधनावरून गुर्जरं पाटीदार वर्ग वायव्य भारतातून गुजरातमध्ये येण्याची पुष्टी होते. बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम एकच्या अनुसार पंजाबातही लेवा समाज विद्यमान आहे. त्याला तिथे शब्द अपभ्रंशामुळे 'लेयाँ' असे म्हणतात.

श्री. वासुदेवराव पाटील पुढे पुन्हा लिहितात की, "पाटीदार लोक क्षत्रिय होते. परंतु, ते बऱ्याचशा कारणांमुळे आपला क्षात्रधर्मच्यूत झाले होते... त्यामुळे १८६१ मध्ये तत्कालीन शंकराचार्यांनी वासवाडा (राजस्थान) येथे पाटीदार लोकांना जनेउ संस्कार केला. नंतर सर्व लोक उपवित धारण करायला लागले, व द्विजोचित कार्य करू लागले. त्याला काही ब्राह्मणांनी विरोध केला. म्हणून उत्तर प्रदेशातील दीपनारायण सिंह पाटीदाराने सन १९०० मध्ये तत्कालीन शंकराचार्य वल्लभाचार्य के वंशज प. नाथुलाल शर्मा व श्रीमत् नरसिंहाचार्य चे सहमतीने क्षत्रियोचित नैमित्तिक कर्माचरण करू लागले. त्यामुळे ब्राह्मण व पाटीदार वर्गाचे विवाद उत्पन्न झाले. ह्या विवादाचे निर्णयार्थ ता. २५ व २६ मे १९०६ ला भरेहटा गावी उत्तर प्रदेशातील चुना जिलहयात गोस्वीमी १०८ श्री राधाचरण

विद्यावागीश आनररी मॅजिस्ट्रेट वृन्दावन यांचे अध्यक्षतेखाली एक संमलेन घेतले. त्यात श्री दीपनारायणसिंह या नेत्याने कुणबी पाटीदार वर्ग क्षत्रिय आहे व त्यांना द्विजोचित उपविती धारणाचा अधिकार आहे हे प्रतिपादिले. स्कंध पुराणातील दृष्टान्ताधारे पं.दामोदर शास्त्र्यांनी त्याचा पाठपुरावा केला, पण काशीचे पंडित मदनमोहन पाठकांनी विरोध नोंदविला. तेव्हा काशीचे पंडित महामहोपाध्याय स्वामी राममिश्र शास्त्री व त्यांचे शिष्य राजारामशास्त्री यांनी पाटीदारांचा पक्ष घेतला. आज हे लोक यज्ञयाग, मंगलप्रसंग, श्राद्ध वगैरे वेळी जानवे वापरतात.

पराशर स्मृती, अध्याय २, श्लोक १८ व १९ व गौतमस्मृती, अध्याय ७ मध्ये उल्लेख आहे की, "क्षत्रियोपि कृषि कृत्वा" क्षत्रिय राजाही कृषीकर्म करू शकतो. "राजन्यो वैश्यो कर्मा, राजा वैश्य कर्म करू शकतो." पुराणात राजा जनक व पृथुद्वारा-कृषी करीत हा उल्लेख आहे. म्हणून आरोपित कृषीकार्य निदनीय नाही.

वरील आलोचना व आपत्तीकरणाचे शंकासमाधान केल्यावर इंग्रज इतिहासकाराकडून लिखित १२ प्रमाणे प्रस्तुत केले व कुणबी पाटीदार क्षत्रिय आहेत व त्यांना उपविती धारणाधिकार आहे, असे 'क्षत्रिय पाटीदारांचा इतिहास' ग्रंथांचे आधारे श्री. वासुदेवराव पाटलाने प्रस्तुत लिखाण प्रसिद्ध केले. (आपले लेवा परिवार अंक एप्रिल मे जून १९९४ पृष्ठ ५ पहा)

अशा ह्या सूर्यवंशात राजा जनक, विश्वामित्र, राजा श्रीयाळ, चांगुणा, रोहिदास, नलराजा, दमयंती हे श्रेष्ठ क्षात्र जन्मले, असे पूज्य मोरेदादा, पृष्ठ १६ वर लिहितात. या वंशात लेवा पाटीदार वंश समाविष्ट असल्याने सविस्तर वर्णन केले. तरी पण इतरही वंश थोडक्यात पाहू.

अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळ संचालित मासिक मुखपत्र लेवा परिवार ऑगस्ट १९९१, संपादक- प्रा. डॉ. कमलाकर ढाके, बडोदे, पृष्ठ ७ वर श्री. वासुदेवराव पाटील इंदूर यांच्या 'लेवा समाजाचा पूर्व इतिहास' या लेखात म्हटले आहे की, "लेवा समाज लवाचा वंश असल्याकारणाने क्षत्रिय आहे. देवास जिल्हयात लेवा पाटीदारांच्या नावास 'सिंह' हे क्षत्रिय व वीरतासूचक उपनाव जोडतात. जसे महाराष्ट्रात 'राव' हे सन्मानसूचक उपनाव जोडतात.

'गीताप्रेस, गोरखपूर, उत्तरप्रदेश' ने सन १९७९ मध्ये "कल्याण" ह्या मासिक व धार्मिक पत्रिकेचा वार्षिक विशेषांक "सूर्यांङ्क" या शीर्षकाखाली प्रकाशित केला. ह्या विशेषांकात सूर्यवंशाबद्दल व सूर्यभक्तीबद्दल विशेष माहिती आहे. त्यात पृष्ठ ३०० वर **डॉ. श्री. निरंजन कान्तदेव चौधरी** विद्यार्णव (एम.ए.एल.एल.बी., पीएच.डी.) ह्यांनी प्रमाणित केले आहे की, उदयपूर व चितोडचे महाराज लवाचेच वंशज आहेत. आणि कुशवाह कुशाचेच वंशज आहेत.

उपरोक्त लेखावरून प्रमाणित होते की, लेवासमाज हा क्षत्रिय वर्णाची एक शाखा आहे. याला आधार :-

१) लव हा क्षत्रिय होता म्हणून त्याचे वंशज क्षत्रिय आहेत.
२) ह्या समाजाला उत्तर प्रदेशात कूर्मी, माळव्यात कुळंबी, गुजरात व महाराष्ट्रात कुणबी असे म्हणतात. उत्तरप्रदेशात ह्या जातीला क्षत्रिय नावाखाली संबोधितात.
३) भारतीय ७०० राजे महाराजांना एकसूत्रात बांधणारे, एका राष्ट्रीय ध्वजाखाली आणणारे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेलसुद्धा लेवा पाटीदाराच होते. त्यांचे जीवन चरित्र जबलपूरचे भूतपूर्व संसद सदस्य सेठ गोविंददास यांनी लिहिले आहे. या जीवनचरित्रात त्यांना क्षत्रिय-वंशी म्हणून संबोधिले आहे.
४) 'जातीभास्कर' ह्या प्राचीन संस्कृत ग्रंथात भारतातील अनेक जातींची उत्पत्ती व शाखा इत्यादींची माहिती आहे. या ग्रंथात बडगुजर ह्या जातीला क्षत्रिय म्हटलेले आहे. बडगुजर ही ज्ञाती लेवा समाजाचेच अंग आहे.
५) सन १८८५ चे सुमारास बडोद्याहून प्रसिद्ध झालेले क्षत्रिय व त्यांचे अस्तित्व ग्रंथात कुणबी

जातीला क्षत्रिय म्हणून संबोधिलेले आहे. लेवा समाजाला पण कुणबी म्हटले आहे.

६) लेवा समाजात लग्नप्रसंगी वरपक्षाकडून निशाण पाठविण्याची प्रथा होती. निशाण वा ध्वज पाठविण्याचा अधिकार फक्त क्षत्रिय वर्गाकडेच होता.

७) काही लेवा लोकांचे कुलदैवत मल्हारी मार्तंड (खंडेराव) व काहींचे माताभवानी अंबा देवी म्हणजेच शंकर-पार्वतीचे अंश यांची कुलदैवते आहेत. शास्त्रात सांगितले आहे की, ज्यांचे कुलदैवत भगवान शंकर व सती पार्वती आहेत ते लोक क्षत्रिय आहेत. मल्हारी मार्तंड म्हणजे शंकरावतार होय.

८) भारतात क्षत्रियांची कीर्ती लिहिणारे भाटवचारण असतात. भाट लोक वंशावळी लिहितात. वंशावळी लिहिण्याची पद्धती फक्त, क्षत्रियातच आढळते. पुराणात फक्त क्षत्रियांचीच वंशावळी दिलेली आहे. ब्राह्मण किंवा वैश्याची नाही. लेवा समाजाच्या लोकांची वंशावळी सुद्धा भाटच लिहितात.

९) पूर्वी लेवा समाजातील नवरदेवाजवळ क्षत्रियोजित चिन्ह कटयार किंवा चाकू ठेवत होते. क्षत्रियांनाच लग्नात शस्त्र बाळगण्याचा अधिकार होता.

१०) कच्छमधील 'लवांना' (लोहाणा) ज्ञाती लेवा समाजाची एक शाखा असून ती क्षत्रिय गणली जाते.

११) पूर्वी लेवा समाजाचे लोक यज्ञोपवित वापरत होते. अजूनही मंगलप्रसंगी, श्राद्धप्रसंगी यज्ञोपवित क्षत्रियोचित वापरतात.

लेवा समाजाचे लोक गुजराथमधून इकडे का आले ?

उत्तर : - जिझिया कर बसविल्यामुळे काही लेवा लोक तापीतिरीने बऱ्हाणपूर-भुसावळ परिसरात आले. इकडे यावल, वरखेडा, बेलखेडे (ओसाड) येथे यांचे किल्ले पण उपलब्ध आहेत.

खानदेश वऱ्हाडात फक्त लेवा समाजाचेच लोक आहेत. कडवा किंवा कुशवंशी या क्षेत्रात आढळत नाहीत.

अलिकडे ह्या समाजाच्या १ सावदेकर, २ थोरगव्हाणकर, ३ गाडेगावकर, ४ कंडारकर ह्या चार शाखा पडल्या. त्यातही सावदेकर ही व्यापक व मुख्य शाखा आहे.

अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळ संचालित लेवा परिवार या जुलै १९९१ चे मासिक मुखपत्रात संपादक- पृष्ठ ९ वर इंदूरचे श्री. वासुदेवराव पाटीलांचा 'लेवा समाजाचा पूर्व इतिहास' हा लेख देतात.

त्यात श्री. पाटील लिहितात की, उत्तर प्रदेशातील कुशाचा वंश कुशवाह असून तो ग्वाल्हेर संस्थान, आग्रा, इटावा, मथुरा परिसरात पसरला आहे. हे लोक स्वत:ला ठाकूर (क्षत्रिय) म्हणवितात व कुशवंशी सांगतात. हेच लोक गुजराथेत कडवा म्हटले गेले. माळव्यातही हे बहुसंख्य आहेत.

माळवा आणि उत्तरप्रदेशात वसलेले लववंशी (लेवा) मध्यप्रदेशात नरसिंहपूर, इटारसी परिसरातील रघुवंशी, बडगुजर, रेवा पाटीदार, निमाडातील रेवा पाटीदार, लेवा पाटीदार, धार जिल्हयातील कोद, बिडवाल इत्यादी परिसरात रतलाम, मंदसौर, उज्जैन, देवास जिल्हयातील लेवा पाटीदार, उत्तर मध्यप्रदेशातील गुजर, जम्मू-काश्मिरातील गुजर हे सर्व समकक्ष लोक आहेत, आजसुद्धा चोपडा व भाटीया ही आडनावे पंजाबात व लेव्यात आहेत. ह्या इतिहासाला आधार रामायणाचे उत्तरकांड, कालिदास चे रघुवंश काव्य उपलब्ध आहे. त्यात म्हटले की, भरताच्या मुलाला पुरुषपूर (पेशावर) व शत्रुघ्न सुतांना मथुराचे राज्य दिले. पंजाब, मथुरा परिसरात, कुशवंशी कुशवाह आहेत. श्रावस्तीचा राजा लव याचा वंश दीर्घकाळ होता. या वंशात ध्रुवसिंह राजा झाला. त्याचा ज्येष्ठपुत्र सुदर्शन श्रावस्तीचा राजा झाला. त्याचे वंशज निमाड, माळवा, द. राजस्थान, गुजराथ ह्या भागात स्थायिक झाले. म्हणून लेवा इकडे वसलेत.

आपले लेवा परिवार संपादक- प्रा. डॉ. कमलाकर ढाके, ऑक्टोबर १९९१ चे अंकात, पृष्ठ २ वर, लेवा पाटीदार : एक चिंतन, लेखक- पुण्याचे श्रीयुत **राकेश चौधरी** लिहितात की, "गुजराथेतील पावागड परिसरातून मुस्लीम जाचामुळे सुमारे २०० कुटुंबे खानदेशात नांदेड साळवे या गावी आली. व यथावकाश खानदेश व नंतर वऱ्हाडात विसावली."

'लेवा परिवार' नोव्हेंबर, १९९१, संपादक- प्रा.डॉ. कमलाकार ढाके, पृष्ठ ४ वर अहमदाबादचे **श्री. प्रभाकर पाटील** हे पत्रकार लिहितात की, "लेवा पाटीदार समाज पुस्तकी पांडित्यात अग्रेसर पण संस्कृतिविहीन आहे. व्यक्तिमत्त्वात सद्‌गुण, सदाचार, अथवा परस्परात प्रेम वा आपुलकी दिसत नाही. भावाभावात त्यांचे प्रेम व सहकार नाही. दुसऱ्याचे पाय खेचण्याची खेकड्यासारखी प्रवृत्ती. स्वत: करणार नाही. इतरालाही करू देणार नाही, ही त्यांची वृत्ती कितीही प्रशिक्षित झाला तरी सुधारत नाही. समाज स्वार्थी आहे. मंडळे आपले चोख आर्थिक व्यवहार समाजापुढे मांडत नाहीत.

अ.भा.लेवा पाटीदार महामंडळ, त्रैमासिक, एप्रिल ते जून १९९४, संपादक- **श्री.म.ओं.राणे** पृष्ठ ३३ वर लिहितात की, "लेवा पाटीदार" या जातीचा मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र सरकारच्या सामाजिक कल्याण मंत्रालयाच्या अधिसूचना नं. १२०११/५८/०३ बी.सी.सी. (सी.) ता. १० सप्टेंबर १९९३ प्रमाणे व ता. १३ सप्टेंबर १९९३ च्या केंद्र शासनाच्या राजपत्रात पार्ट १, महाराष्ट्राच्या यादीत अनुक्रम नं. ७० च्या पुढे "कुणबी, पोटजात लेवा कुणबी, लेवा पाटील व लेवा पाटीदार" अशा प्रकारे केंद्रिय सेवासाठी समावेश करण्यात आलेला आहे. तरी त्यानुसार केंद्रीय सेवासाठी आपल्या ज्ञातीबांधवांना अर्ज करावयाचा असल्यास त्याकरिता जातीचे प्रमाणित प्रमाणपत्र दाखल करून त्याप्रमाणे फायदा घ्यावा."

पंजाबातील गुर्जर देशातून गुर्जर लोक पश्चिम भारतातील लाट देशात आले व त्यांनी तिथे पंजाबातील सूर्यवंशी आर्य लोकांचे राज्य स्थापन केले. तेव्हापासून सौराष्ट्रातील लाट देशाला गुजराथ देश हे नाव पडले. त्या वंशातील एका शाखेने व्याघ्रदेवाचे नेतृत्वाने सोळंकी राजपूत राज्याची गुजराथेत स्थापना केली. या व्याघ्रदेवाचे नावावरून त्यांना वाघेल उर्फ बघेल म्हणू लागले. गुजराथेत त्यांना मुस्लीमांनी राज्यविहिन केल्यानंतर ते मध्यप्रदेशात रीवा उर्फ रेवा राज्यात गेले. तेथे नवीन राज्याची या बघेल राजपुतांनी राज्य स्थापना केली. त्या रेवा राज्याचे बघेल क्षत्रिय राजे सूर्यवंशी होते.

रीवा राज्यात शहाडोल जिल्हयात सोहागपूर तहशीलमध्ये श्री. लालजीसाहेब हे सोहागपूरचे इलाकेदार होते. या रीवा राज्याचे नाव गहोरा बांधव राज्य असे होते, पण रेवा नदी तिरीचे गुजराथनिवासी बघेलापासून या राज्यास रीवा राज्य नाव पडले होते. स्कंध पुराणात या रेवाखंडाची सुविस्तृत माहिती दिली आहे.

रीवा राज्याचे भूत पूर्व महाराजा स्व.गुलाबसिंह व त्यांचे उत्तराधिकारी महाराजा मार्तंड सिंह यांचे सोहागपूरचे इलाकेदार श्रद्धेय भैय्या बहादूर लाल राजेंद्र बहादूर सिंह ज्यू देव श्रीमान व्याघ्रदेवचे वंशज रीवा राज्य नरेश बघेल राजपूत क्षत्रिय होते. त्यांची वंशशाखा सूर्यवंशी असून लेवा पाटीदाराचे रक्तगटातील आहे. त्या श्रद्धेय लालजीसाहेबांचे कनिष्ठ पुत्र माजी आमदार कुमार गंभिरसिंहजी हे आहेत. त्यांच्या वंशाची माहिती व्हावी म्हणून, साधना साहित्य परिषद सोहागपूरने प्रसिद्ध केलेला "श्री राजेंद्र संस्मृति ग्रंथ" संपादक- बालमुकुंद मिश्र हा ग्रंथ या राजवंशात जन्मलेले माझे मित्र- गंभीरसिंहानी मला सप्रेम भेटीदाखल पाठविला. त्या ग्रंथाच्या तृतीय खंडात पृष्ठ ७ वर पंजाबातील सप्तसैंधव प्रदेशात आर्यांची भारतातील आदि-भूमी आहे. ऋग्वेदात वर्णिलेली १ सिंधू, २ वितस्ता (झेलम), ३ असिवनी (चिनाब), ४ परुष्णी (रावी), ५ विपाश (व्यास), ६ शतुद्रि (सतलज), ७ सरस्वती ह्या सात नद्यांकाठच्या सप्तसिंधूप्रदेशाच्या मध्यभागी या आर्यांची आदिवस्ती

होती.

या सिंधू नदीला इराणी लोक हिंदू म्हणत असत. त्यावरून तिच्या काळचे लोक हिंदू व त्यांचे निवासस्थान हिंदूस्तान बनले.

याच सिंधू नदीला ग्रीक लोक 'इन्दुस' म्हणत. म्हणून तिच्या काठच्या प्रदेशास 'इन्डस उर्फ इंडिया' म्हणू लागले.

प्रारंभी हल्लीचा अफगाणिस्तान, बलुचिस्तान, पाकिस्तान, काश्मीर व पंजाब एवढ्याच भागात आर्यांची वस्ती होती. व त्यास 'आर्यावर्त' म्हणत असत.

ब्राह्मणकालात आर्यांची वस्ती वर्तमान उत्तरप्रदेश, बिहार व बंगालपर्यंत विस्तारली.

पुढे सरस्वती नदीचे महत्त्व वाढून वर्तमान पतियाळा (पंजाब), कुमुक्षेत्र (हरियाणा), बीकानेर (राजस्थान) क्षेत्रात आर्य विस्तारले व या भागास 'ब्रह्मावर्त' म्हणू लागले.

इ.सन पूर्व ७५०० वर्षापूर्वी या भागात जलप्रलय होऊन तेथील वस्ती गुजराथेत स्थलांतरीत झाली असे श्री. बालमुकुंद मिश्रचे मत आहे. सिंधू क्षेत्रातील दानशूर 'मनु' चे कुळसुद्धा या सारस्वत क्षेत्रात पुढे पुर्नस्थापित झाले. त्यांचा मुख्य विवस्वानाचा पुत्र वैवस्वत मनु होता, व कालांतराने त्यास 'भारत' म्हणू लागले. या परिस्थितीत उत्तर भारतात इसवी सन. पूर्व ६००० राजतंत्र निर्माण होऊन वैवस्वत मनु राजा झाला. त्याची राजधानी शरयुतिरी अयोध्या ही होती.

या सूर्यवंशी मनुच्या सूर्यवंशात ९८ व्या पिढीत इसवी सन पूर्व ३२०० वर्षापूर्वी महाभारत युद्ध झाले असे पृष्ठ ९ वर श्री. बालमुकुंद मिश्र लिहितात.

राजाच्या पुत्रांना राजपूत म्हणू लागले. श्री.राजेंद्र संस्मृति ग्रंथ, खंड ३, पृष्ठ १९, अध्याय ७ वा- सोळंकी, वाघेल राजवंश प्रकरणात- परिच्छेद ४ मध्ये लिहिले आहे की,- "इसवी सनाचे सहावे शतकात विदेशी शासकांची अग्नीशुद्धी करून त्यांना ब्राह्मणांनी 'राजपूत' संज्ञा दिली." परिच्छेद ५ मध्ये श्री. बालमुकुंद मिश्रजी लिहितात की, इसवी सनाच्या सहाव्या शतकापूर्वी राजपूत शब्दाचा वापर केला जात नव्हता.

इसवी सनाच्या सहाव्या शताब्दित बहुसंख्य राज-पुत्रांची एकी करण्यासाठी आबू पर्वतावर एका यज्ञाचे आयोजन केले गेले. यज्ञ समाप्तीनंतर १ प्रमार (परमार), २ प्रतिहार (परिहार), ३ चालुक्य (सोळंकी) आणि ४ चाहमान (चौहान) ह्या चार वर्गात विभक्त होऊन शासनसत्ता स्थापनार्थ चारी दिशेने फैलावले या कारणामुळे यांना अग्नीवंशी म्हणू लागले.

पृष्ठ २० वर, श्री. मिश्रजी लिहितात की, हा वंश प्रारंभी अयोध्या, नंतर दक्षिण भारत, व नंतर गुजराथेत शासन सत्ता संस्थापू लागला. सुमारे इसवी सन ९६० चे सुमारास मूलराज सोळंकीने सत्ता स्थापिली. त्याचे सहावे वंशज कर्णदेव (इ.सन १०६३ ते १०९३) यांचे धाकटे बंधू सारंगदेव होते. या सारंगदेवाचा नातू वाघराज याला अनहिलवाडापासून १६ किलोमीटर दूर जहागिरदारीचे गाव यांचे नावावरून बघेला गाव व त्याचे वंशजांना 'वाघेल' म्हणू लागले. **तेव्हापासून सूर्यवंशी क्षत्रिय आर्य कुर्मी असलेली ही शाखा राजपूत जात म्हणून पृथक झाली असा अंदाज करता येतो.**

इ.सन १९७७ मध्ये आपली जहागीर आपला भाचा धवलला देऊन हे वाघराज उर्फ व्याघ्रदेव गहोरा बांधव राज्याचे संस्थापक बनले. यावंशात जन्मलेल्या १८व्या शासकाने म्हणजे वीरसिंह देवाने ४०० घोडेस्वारासह राणासंगाचे नेतृत्वाखाली दिल्ली सम्राट बाबराशी जून १५२७ मध्ये सामना केला होता. बाकी इतिहास, श्री. गुरु रामप्यारे अग्नीहोत्री यांनी लिहिलेल्या 'रीवा राज्य का इतिहास' ग्रंथाधारे मिळेल.

'शूद्र मूळचे कोण होते ?' लेखक- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रकाशक - गजेंद्र विठ्ठल रघुवंशी, रघुवंशी प्रकाशन, २४२ ब, शुक्रवार पेठ, पुणे २, या ग्रंथात मराठी आवृत्ती पृष्ठ १९६ परिच्छेद २ मध्ये डॉ. आंबेडकर लिहितात की, **"रामायणाचा नायक, त्याचा वडील पुत्र लव**

आणि लवाच्या कुळात जन्मले ते उदेपूरचे सिसोदिया. मेवाडचे सिसोदिया हे उदेपूरच्या सिसोदियांची एक शाखा होय."

डॉ.आंबेडकर पुढे लिहितात की, "हूण ह्या परकियांनी हिंदुस्थानवर स्वारी केली, व त्यातील बरेच लोक राजस्थानात स्थायिक झाले. त्यावेळी हिंदुस्थानात बौद्ध धर्माची चांगली चलती होती. त्या धर्माचा मध्य हिंदुस्थानात पाडाव करण्यासाठी ब्राह्मणांनी या हूण लोकांना पवित्र अग्नीसमोर काही विधी करून क्षत्रियत्वाचा दर्जा दिला, व त्यांना आत्मसात करून त्यांच्या जोरावर बौद्धधर्माचा पाडाव केला." यावरून रजपूत हे पूर्वाश्रमीचे हूण होते. याबाबतीत व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो - (C.V.Vaidya, History of Mediaeval Indian Vol. 11, Page 8) ते पहा.

पृष्ठ १९७ वर, डॉ. आंबेडकर लिहितात की, "ज्या जमातीच्या किंवा कुळांच्या लोकांनी राज्ये स्थापली त्यांचे ब्राह्मणांनी हिंदूकरण केले व त्यांना क्षत्रिय किंवा राजपूत हे नाव दिले.

परझार आणि उत्तरेकडील दुसऱ्या पुष्कळ रजपूत जमातीची उत्पत्ती पाचव्या व सहाव्या शतकात झाली. हिंदूधर्म स्वीकारल्यावर ब्राह्मणांनी गोंडाना चंडेल, बहार लोकांना राठोर, रवारवा लोकांना गहरवार अशी नावे दिली. इ.सन ४८० च्या सुमारास श्वेत हूण राजपूत जन्मले. (पृष्ठ १९८).

पुढे गुर्जरांनी हिंदू धर्म स्विकारला. त्यांच्यापासून वरिष्ट दर्जाची राजपूत घराणी जन्मली. राज्यप्राप्तीमुळे त्यांनी हिंदूधर्म स्वीकारला, व ब्राह्मणांचे धार्मिक वर्चस्व मान्य केले. **या काळात (पृष्ठ १९८) जाती-बंधने फारशी पाळली जात नसत.**

डॉ. डी.आर. भांडारकर यांचेसुद्धा असेच मत आहे. त्यांच्या मते रजपूत हे गुजर लोकांचे वंशज आहेत. (शूद्र मुळचे कोण होते, पृष्ठ १९० पहा.) गुजर हे परक्या देशातून येथे स्थायिक झालेले लोक आहेत, पण (Mr. Vaidya History of Mediaeval India P. 10) श्री. वैद्य यांचे मते ते प्रारंभीच्या आर्य क्षत्रियांचे वंशज आहेत.

महात्मा गौतम बुद्धाचा जन्म शाक्य लोकांच्या शुद्धोदन राजाचे पोटी झाला. शाक्य लोक स्वत:ला कोशलच्या ईक्ष्वाकू (सूर्यवंशीय) क्षत्रियांची शाखा मानतात, असे युनिफाईड इतिहास ले.डॉ. ए.के.मित्तल, साहित्यभवन पब्लीकेशन, आग्रा, आवृत्ती ३ री, १९९५, पृष्ठ ४५, ओळ ४ थी पहा.

याच पृष्ठ ४५, परिच्छेद ४ मध्ये लिहिले आहे की, "मौर्य अथवा मोरीय गणतंत्राची राजधानी पिप्पलीवन होती. मोरीय प्रथम शाक्य वंशीयच होते. परंतु, नंतर कोशल नरेश विद्दधच्या अत्याचाराने त्रासून ते हिमालयाचे तराईत पिप्पलीवन नावाचे स्थानी राहू लागले."

याच पृष्ठ ४५, वर वैशालीचे लिच्छवी गणराज्य उत्तर बिहारात असून तेथील राज्यकर्ते इक्ष्वाकू वंशीय क्षत्रिय होते. त्यांची राजधानी वैशाली आधुनिक मुजफ्फरपूर जिल्ह्यात बसाद नामक स्थानी होती. लिच्छवी आपल्या सामाजिक संस्कार, धार्मिक समारंभ, संघगट, शिक्षण, कला आदी क्षेत्रात विख्यात होते.... मिथिलाचे विदेह गणराज्य आधुनिक भागलपूर तथा दरभंजा जिल्ह्यात होते. याची राजधानी मिथिला अथवा जनकपूर होती. विदेह राज्याचे लोक प्राचीन सूर्यवंशाची शाखा निमिवंशी क्षत्रियापासून उत्पन्न झालेली मानतात. येथील लोक शिक्षित तथा कुलीन होते. स्त्रियासुद्धा शिक्षित होत्या.

तसेच, शरयू नदीचे उत्तरेकडील उत्तर कोशलची राजधानी श्रावस्ती व दक्षिण कोशलची राजधानी कुशवती होती. श्रावस्ती, साकेत तथा अयोध्या ही कोशल राज्यातील प्रमुख नगरे होती. महात्मा बुद्धकाळात प्रसेनजित हा कोशल नरेश होता. नंतर ते राज्य मगध राज्यात विलीन झाले. (युनिफाईड इतिहास, पृष्ठ ४८ पहा.)

तसेच, युनिफाईड इतिहास, पृष्ठ ५५ वर लिहिले आहे की. "शिशुनाग हा वैशालीच्या एक

लिच्छवी राजाचा पुत्र होता. शिशुनागने इ.सन पूर्व ४१४ ते इ.सन. पूर्व ३९६ पर्यंत १८ वर्षे राज्य केले. त्याने पाटलीपुत्र, गिरिव्रज, वैशाली अशा राजधान्या बदलल्या. इ.सन. पूर्व ३४६ मध्ये त्याचे पुत्रानंतर शिशुनाग वंश पदच्यूत होऊन शूद्र नंदवंश राज्यारूढ झाला. हा मगध-नरेश इ.सन पूर्व ३९६ मध्ये मृत झाला. हे ही राजे लिच्छवी कुळातले म्हणजेच सूर्यवंशी क्षत्रियच होते. इ.सन पूर्व ३४६ मध्ये यांचे राज्य समाप्त झाले.

तसेच, बौद्ध ग्रंथात वर्णिल्याप्रमाणे महावंशात चंद्रगुप्त मोरिय नामक क्षत्रिय जातीचा होता. मोरिय जाती शाक्यांची एक उच्च व पवित्र जाती होती. या जातीतच महात्मा बुद्धाचा जन्म झाला. नंदाचा राग येऊन ब्राह्मण चाणक्याने नवेनंद (धननंद) याचा विनाश करून चंद्रगुप्त मौर्यास संपूर्ण जंबद्विपाचा राजा बनविले. या 'युनिफाईड इतिहास' ले.डॉ. मित्तल, पृष्ठ ७२ वरून स्पष्ट हाते की, चंद्रगुप्त मौर्य क्षत्रिय असून मौर्य शब्दाची उत्पत्ति मोरिय या शब्दापासून झाली... पुरातत्त्विक श्रोतानुसारसुद्धा मौर्याची उत्पत्ती पिप्पलीवनचे मोरियापासून झाल्याचे प्रमाणित होते.

आणि हे मोरीय उर्फ मौर्य सूर्यवंशी क्षत्रिय होते. म्हणजे लेवा कुणबी क्षत्रिय रक्तगटातीलच होते. "हा चंद्रगुप्त मौर्य इ.सन पूर्व ३२२ ते इ.सन पूर्व २९८ या काळात होऊन गेला." (पृष्ठ ७२ व ७३ पहा).

या काळात भारतात जातिविभाजनाला सुरुवात झाली होती. युनानी साम्राज्याचा ग्रीक राजदूत मौर्य दरबारात आला होता. या राजदूताने भारतीयाचे निरीक्षण करून 'इण्डिका' (Indica) नावाचा ग्रंथ लिहिला. त्यात भारताचा देश, भूमि, जलवायू, पशुपक्षी, शासनपद्धती, धर्म, सामाजिक रितीरिवाज यांचे प्रत्यक्ष वर्णन केले आहे. 'युनिफाईड इतिहास,' पृष्ठ ७७ वर लिहिले आहे की प्राचीन युरोपात भारताविषयी मेगॅस्थेनिस हा सर्वश्रेष्ठ जाणकार होता. हा ग्रंथ ४ भागात लिहिला आहे. **मेगॅस्थेनिसचे अनुसार त्या वेळी भारतीय जनता फक्त सात जातीत विभागली होती. (युनिफाईड इतिहास, पृष्ठ ७७ पहा).**

तसेच, यूथ कॉम्पिटिशन टाईम्स प्रधान संपादक, आनंद कुमार महाजन. पृष्ठ ६४, वर श्री. महाजन लिहितात की, त्या सात जाती - १ दार्शनिक, २ कृषक, ३ सैनिक, ४ चरवाहे, ५ शिल्पी, ६ न्यायाधिकारी व ७वी पार्षद ह्या फक्त सातच जाती होत्या. **त्यापैकी सूर्यवंशी क्षत्रिय हे सैनिकजातीतील असून लेवा पाटीदारांचा** उगम या जातीपासून पुढील काळात झाला. पृष्ठ १६१ वर मेगॅस्थनिज इ.सन. पूर्व ३०० मध्ये झाला. सर्व बौद्ध व जैन ग्रंथात मौर्यांना क्षत्रिय म्हटलेले आहे. इ.सन पूर्व ३२६ चे आसपास सिकंदराने रावी नदी उतरून पावसाळ्याचे शेवटी पिंप्रमा दूर्ग जिंकला. अद्रेष्ट गणराज्यसुद्धा जिंकले. नंतर कठ गणराज्यावर आक्रमण केले कठची राजधानी शाँगल किंवा साँकल ही होती. कठ राज्याने कठोर सामना दिला. शेवटी हताश होऊन पोरस राजाची मदत मागून कठ राज्याचा सिकंदरने पराभव केला. (युनिफाईड इतिहास, पृष्ठ ६३ पहा). नंतर सिकंदराने सौभूती राज्य जिंकले. नंतर व्यासनदीपासून सिकंदर मायदेशी परतला, व झेलममार्गे परत गेला. व इ.सन. पूर्व ३२३ मध्ये ३२ व्या वर्षी मरण पावला.

इ.सन पूर्व ३२२ मध्ये चंद्रगुप्त मौर्य हा बलाढ्य सम्राट भारताचे गादीवर बसला. त्या सुमारास **चंद्रगुप्त मौर्याने पंजाबातील लढाऊ क्षत्रिय जातींना एकत्रित करून मोठे सैन्य उभारले,** व सेल्यूकस ची कन्या - हेलेनाशी विवाह केला. चंद्रगुप्ताचा मृत्यू श्रवणबेळगोळ येथे जैन साधनेत झाला.

इ.सन पूर्व ५१८ मध्ये इराणी पारशी राजा दरवेज गुस्तास्पेने पंजाब जिंकला, व तेथील सैनिकांच्या सहाय्याने ग्रीसवर हल्ला केला. या सैन्यात पंजाबातील सूर्यवंशीय क्षत्रियांचे पूर्वज लढले.

इ.सन पूर्व ३३७ मध्ये सिकंदरने पंजाबवर स्वारी केली. (कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास पृष्ठ ४४, परिच्छेद ३ रा पहा.) व पंजाब जिंकून सेल्यूकसचे स्वाधीन केला. पण त्याच **पंजाबातील लढाऊ जातीचे चंद्रगुप्त मौर्याने सैन्य उभारले.** कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, पृष्ठ ४५, परिच्छेद

पहिला मध्ये डॉ. मंगुभाई रामदास पटेल लिहितात की, **इ.सन पूर्व तिसरे शतकाचे शेवटी कूर्मीयांचे काही बहादूर परिवार पंजाब सोडून मगधची राजधानी कुशावती येथे चंद्रगुप्त मौर्याचे सैन्यात भरती झाले.**

कनिष्काचे मृत्यूनंतर अवंतीचे माळवाधिपती वीर विक्रमादित्याने शकांचा पराभव करून त्यांचे जवळून गुजराथ, माळवा, सिंध तथा पंजाब आदी प्रांत जिंकले व विदेशियांना हद्दपार करून इ.सन पूर्व ७८ चे आसपास कनिष्काचे काळात गुजराथ परिसरातून अनेक गुर्जर बाहेर पडले. त्यांचे बरोबर अनेक कुर्मी उर्फ कुणबीही निघाले व मथुराकडे जाऊन वस्ती केली. तेथून ते धीरे धीरे आनर्ते देशापर्यंत जाऊन पोहोचले असे बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम १ वरून कळते.

कुर्मी लोक लढाऊ असल्याने गरजेच्या वेळी युद्ध व शांतीकाळात शेती करीत. नंतर दुसऱ्या टोळ्याही पंजाबाहून कोटा व मंदसौरमार्गे माळव्यात गेल्यात. (कु.पा.इतिहास, पृष्ठ ४५ पहा.) याप्रकारे पंजाबातून निघालेल्या टोळ्यांनी कालांतराने मूळ भूमि व जातीची आठवण म्हणून कुरड प्रांत वासियांनी करडवा कुर्मी व लेयॉ प्रांत वासियांनी लेया कुर्मी ही विशेषणे धारण केली. गंगा-यमुनाच्या घाटांनी तथा उत्तर हिंदुस्थानात वर्चस्व जमविणाऱ्या कुर्मी टोळ्यांनी मध्य हिंद एजन्सी, मध्यप्रांत, खानदेश तथा दक्षिणेस वस्ती केली. त्याचे वंशज आजही लेवा आणि करड विशेषण धारण करीत आहेत. तथा आपले मूलस्थान पंजाबातही 'लेयॉ' (लेवा) नावाने महशूर आहेत. असे 'बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम' १ चा आधार देऊन मं.रा. पटेल आपल्या 'कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास' ग्रंथात पृष्ठ ४५, वर स्पष्ट करतात. पंजाब व उत्तर हिंदुस्थानातून गुजराथेत आलेल्या त्या कुर्मी टोळ्यांनी अजूनही (पंजाबातील) आपले मूल स्थान, (वतन)चे नावाने आपली शाखा संबोधितात. अशा एकूण ५२ शाखा पंजाब तथा उत्तर हिंदुस्थानातून गुजराथेत आल्यात त्यापैकी 'कुलमी पाटीदारोंका इतिहास' पृष्ठ ४६ व ४७ वरील ३५ क्रमांकाची पंजाबजवळील लाहोरगावची लहूओट कुर्मी लेवा पाटीदार शाखा आहे.

त्यानंतर ४२ परिवार माळव्यात सिद्धराजचे वेळीही आलेत. इ.सन. पूर्व तिसरे शतकाचे शेवटी पंजाब सोडून मगध प्रांतात व पुढे तेथून इ.सवी सनाचे पहिल्या शतकात बिंदुसार व अशोककाळात गुजराथेत येऊन या कुर्मी लोकांनी राज्य स्थापन केले. व माळवा ईडर, बासवाडा भागात वस्ती केली. पंजाबात इ.सन पूर्व ७८ मध्ये राजविहिन झालेल्या लेव्यापैकी **इ.सन १४४ मध्ये लवाचा ५९ वा वंशज कनकसेन हा गुजराथेत आला.** सन १५६ मध्ये वज्रपालने ऊंझानगरी वसविली. तेथे चौथ्या शतकापर्यंत क्षत्रिय राजाचे शासन राहिले, त्या वेळी गुजराथची राजधानी गिरीनगर होती. नंतर सन ५०९ ते ७०० पर्यंत सौराष्ट्रावर वल्लभी राजसत्ता होती. त्याची राजधानी वल्लभीपूर ही होती. त्याच काळात भडोच, नांदोद , नवसारी आदी भागात चालुक्य तथा गुर्जरांची छोटी छोटी राज्ये होती.

तेथून (इ.सन ५५६) संवत ६१२ मार्गशीर्ष शुक्ल द्वितीयेस तो भाग सोडून मध्य गुजराथेत भील्ल नगरी आशावल्ली उर्फ आसारवा येथे येऊन राहिले.

नंतर गुजराथेत चावडा राजपूत सत्ता आली. त्याचे सरदार जयशिखरी (इ.सन ६९० नंतर) पंचासर येथे राज्य करु लागले.

नंतर (इ.सन ७४६ नंतर) श्री स्थल (सिद्धपूर) जवळ अनहिलपूर पाटण येथे वनराजने राज्य स्थापले. म्हणून **संवत ८०२ मध्ये कुर्मी लोक ईडर प्रांती जामला गावी गेले**, व अंबिका, काली, बहुचरा व तुळजा आदी दैवतांच्या कृपेने तेथेच स्थायीक झाले. एका तिथीचे लग्न बंद झाले तेव्हापासून माळवा, नेमाड, **गुजराथचे लग्न संबंध कमी झाले**. संवत ६१२ मध्ये काही कूर्मी आसारवा येथे राहिले. इ.सन १०६४ मध्ये **करण राजाचे शासन** सुरू झाले. सन. १०६४ मध्ये करण राजाने सरदार आशा भिल्लाचा पराभव केला. त्यामुळे तेथील कुणबी लोक निश्चिंत झाले.

इ.सन १०९४ मध्ये सिद्धराज जयसिंहाने माळव्याच्या यशोवर्मावर आक्रमण केले. त्या वेळी माळव्यातून उद्ध्वस्त झालेले ४३ कुणबी परिवार सिद्धराज जयसिंहाने गुजराथेत नेऊन चरोतर भागात कायम जमिनी देऊन वसविले. म्हणून कानम, वाकळ, चरोतर, भाल आदी भागात त्यांनी शेती केली.

सोळंकी वंशानंतर गुजराथेत वाघेला वंश राज्यारूढ झाला. त्यानंतर करण वाघेलाचे काळापर्यंत दंदाव्य व गुजरातमध्ये कूर्मी सुखाने नांदले.

पुढे अत्याचारी करणने प्रधानमंत्री माधवचे पत्नीशी व्यभिचार केला. म्हणून माधवने दिल्लीपती अल्लाउद्दीन खिलजीस बोलावून करणची पत्नी कमल व मुलगी देवल चा विवाह खिज्रखान ह्या मोठ्या मुलाशी इ.सन १३०७ मध्ये केला. मुस्लीमांचा जुलूम झाला. त्यामुळे तेथील कुणब्यांनी चापानेरला स्थानांतर केले.

पुढे इसवी सन १४८३ मध्ये महंमद बेगडाने चापानेर लुटले म्हणून तेथील जनता बडोदा व अहमदाबादला गेली. मार्च १७ सन १४८३ ला महमूद बेगडाने पावागडवर स्वारी केली. वीस महिनेपर्यंत लहानमोठ्या चकमकी झडल्यात. हालोलजवळ राय वैरीसिंहाने आषाढात तोंड दिले. शेवटी बादशहाने ता. २८ एप्रिल १४८३ ला हल्ला करून वेढा दिला. इ.सन. १४८२ मध्ये चापानेरवरही हल्ला केला होताच. 'बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम' १, पृष्ठ २४७ नुसार अन्नभंडार खाली झाले होते, तेव्हा पटाई रावळचे साले सियाजी बाकलिया फितूर होऊन शत्रूस मिळाले.

संवत १५४१ च्या पौष महिन्यात तृतीयेस रविवारी लेवा पाटीदारांचा व पटाई रावल राजांचा पराभव झाला, व त्यांना पावागड किल्ल्याहून स्थानांतर करणे भाग पडले.

मुळातच लढाऊ वृत्तीचे सूर्यवंशी क्षत्रिय लेवा कुणबी लोक पंजाबात रावी नदी तिरी लाहोर परिसरत नांदत होते हे आपण मागे पाहिलेच आहे. कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास ले.- डॉ.मं.रा. पटेल, पृष्ठ ४४ वर लिहिल्याप्रमाणे या कूर्मीयांनी आपल्या युद्ध कौशल्याचे बळावर राज्यक्रांतीनंतरही पंजाबचा काही भाग स्वत:चे ताब्यात ठेवला होता, व (पंजाबातील) गुजरातचे आसपासचे करड व लेया प्रदेशात ते पुन्हा विस्तारले. त्यानंतर कालांतराने अर्जुनाचा पौत्र परिक्षितीने लवाचा वंशज 'सुमित्राचा पराभव करून त्याचे राज्य हस्तगत केले. **त्यांनी इ.सन पूर्व ७८ पर्यंत तेथे राज्य केले.** इ.सन पूर्व २९८ ते इ.सन पूर्व २७३ चे काळात झालेल्या विंदूसार मौर्याचे शासनकालात चंद्रगुप्त मौर्यानंतर उत्तरापथची राजधानी तक्षशिलामध्ये तत्रस्थ लढाऊ क्षत्रियांनी बंड केले. ते मोडण्यासाठी बिंदुसारने आपला पुत्र (सम्राट) अशोक त्यावेळी उज्जैनीस असल्याने राजकुमार सुसीमला पाठविले. तेव्हा तत्रस्थ क्षत्रियांनी आम्ही कुमारचे व राजा विंदुसारचे विरुद्ध नाही पण दुष्ट अमात्य आमचा अपमान करतो म्हणून त्या तेजस्वी क्षत्रियांनी बंड केले. बौद्ध धर्मग्रंथ दिव्यावदान पृष्ठ ४४९, वर लिहिले आहे की, -

"न वयं कुमारस्य विरुद्धा: नापि राज्ञो बिंदुराजस्य ।
अपितु दुष्टामात्या: अस्माकं परिभवं कुर्वन्ति ।"

हा दाखला देऊन अशोकासमोर स्पष्टीकरण दिले होते. यावेळी अमात्याच्या जुलमामुळे पंजाबातील बरेच लेवा पाटीदार स्थानांतरित झाले असावेत, असे कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास ले.डॉ. पटेल, पृष्ठ ४५ वरून आपणास कळते. व युनिफाईड इतिहास ले. - डॉ.मित्तल या ग्रंथातील पृष्ठ ७९ व ८० वरूनही याचा अंदाज करता येतो.

'युनिफाईड इतिहास' ले.- डॉ.मित्तल, पृष्ठ ७३, वर उल्लेखिलेला सूर्यवंशीय कोशल राजा प्रसेनजित होता. तसेच, यूथ कॉम्पिटिशन टाईम्स., ले.- आनंदकुमार महाजन, पृष्ठ ११०, ओळ ६ वीत दर्शविल्याप्रमाणे चोल राजे सूर्यवंशीय होते. तसेच, 'युनिफाईड इतिहास' पृष्ठ १९२, लिहिले आहे की, "प्रतिहार राजे अपने अभिलेखोमें स्वयं को सूर्यवंशी क्षत्रिय मानते है ।" तसेच, "साहित्यिक

स्त्रोतो (उदाहरणार्थ, हम्मीर महाकाव्य) से भी चाहमान राजाओं का सूर्यवंशी होना ज्ञात होता है। (पृष्ठ १९२) असा ईक्ष्वाकूचा सूर्यवंशी क्षत्रिय कुळाचा राजसंभार देशभर पसरला होता.

यूथ कॉम्पिटीशन टाईम्स, ले.- डॉ. मित्तल, पृष्ठ ३० च्या संदर्भावरून कळते की **इ.सन पूर्व १००० ते इ.सन पूर्व ५०० या उत्तर वैदिक काळात वर्णव्यवस्थेचा जन्म झाला.** पृष्ठ ३३ वरून कळते की इ.सन पूर्व ५०० च्या पूर्वीच रामायणाची रचना होऊन गेली होती. व याच काळात महाभारताचीही रचना झाली होती. इ.सन. पूर्व १५०० ते इसवी सन पूर्व १००० या काळात व्यक्तीची ओळख गोत्राद्वारे होऊ लागली.

वर्णव्यवस्था व वैदिक कर्मकांडा विरुद्ध पहिला लढा जैन धर्मियांनी दिला. जैनांनी वर्णव्यवस्था नाकारली व कर्मानुसार वर्ण व जाती व्यवस्था मानली. (यूथ कॉम्पिटिशन टाईम्स, ले. - आनंदकुमार महाजन, पृष्ठ ४२ पहा, व त्याच पृष्ठावर श्री.महाजन लिहितात की **बौद्धांनीही तेच कार्य केले. मात्र ब्राह्मण धर्माने जन्मानुरूप वर्ण व जाती मानल्यात. (पृष्ठ ४४ पहा).**

यूथ कॉम्पिटिशन टाईम्स, पृष्ठ ५० वरून कळते की, सम्राट अशोकपूर्वी २० वर्षापासून लेखन कला जन्मली. अशोक इ.सन पूर्व २७३ ते इ.सन पूर्व २३० चे काळात होऊन गेला. **मौर्यकाळात वर्ण कठोर होऊन जातींची निर्मिती जन्मानुसार होऊ लागली, व जातीबाहेर बेटीबंदी व व्यवसायबंदीस प्रारंभ झाला.** दार्शनिक बुद्धिजीवी वर्ग होता. हाच ब्राह्मणवर्ग होय.

कृषक लोकांची संख्या सर्वांहून जास्त असून त्यानंतर सैनिक कार्य करणाऱ्या क्षत्रियांचे संख्याधिक्य होते. कुलीन घराण्यात बहुविवाह होत असत. नियोग प्रथाही प्रचलित होती. **जनतेची पाली भाषा होती.** शकांनी मात्र संस्कृतला प्रोत्साहन दिले होते. ईक्ष्वाकू नरेश वीरपुरुष दत्तने उज्जैनीची शक राजकन्या रुद्रभट्टीकाबरोबर विवाह केला होता.

मनुस्मृतीमुळे जातीबंधने घट्ट झाली. चालुक्य वंशीय मूळराजने इ.सन ९४२ ते ९५५ पर्यंत गुजराथेत अन्हीलवाडला राजधानी करून सौराष्ट्र व कच्छवर राज्य केले. याच वंशात सन १०९४ ते ११५३ मध्ये सिद्धराज जयसिंह हा कर्णराजाचा पुत्र प्रतापी शासक होता. तसेच, माळव्यातील परमार वंशीय सिंधूराज (इ.सन ९९५ ते १०००) चा पुत्र भोज (१००० ते १०५५) राजा झाला. त्याने उज्जैनीहून धारानगरीत राजधानी नेली होती.

इ.सन १४१२ मध्ये सुलतान अहमदशहाने अहमदाबादनगर वसविले. (यूथ कॉम्पिटिशन टाईम्स, पृष्ठ १५६ पहा). ही गुजराथची राजधानी होती. अशा ह्या उज्जैनी, धार, अहमदाबाद शहरात सूर्यवंशी क्षत्रियांचा वंश अजूनही नांदतो.

तसेच, **जैन धर्माचे पहिले तीर्थंकर यांचा जन्म 'ईक्ष्वाकू' वंशात झाला. याच वंशात श्रीरामाचा जन्म झाला.** असे "आपले सण आपले उत्सव" पुष्प पहिले चैत्र, लेखक - श्री.'माऊलीसूत' प्रकाश संपादक, श्री. दामोदर प्रकाश रामदासी यांचे ग्रंथात पृष्ठ ९४ वर प्रारंभीच दिले आहे. याच ग्रंथात पृष्ठ ९३ वर तिसऱ्या परिच्छेदात या धर्मांची तीर्थे देतांना दिलेल्या. तीर्थात अयोध्या, श्रावस्ती, मथुरा ही तीर्थे दिली आहेत. ही लेवा पाटीदार वंशाच्या मूल श्रोतापैकी आहेत. तसेच, गुजराथेत लेवा पाटीदारांचे कुळदैवत असलेले पावागड व तेथील महाकाली दैवताच्या परिसरातच जैनांचे भारतातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. अजूनही गुजराथच्या महाकालीच्या पठारावरील पावागड किल्ल्यात जैनधर्मीय प्रथम तीर्थकर जो ईक्ष्वाकू वंशीय होता. त्याच ईक्ष्वाकू वंशातील लेवा पाटीदार हे सूर्यवंशीय क्षत्रिय असल्याने त्या दोन्ही वंशगटाचे तीर्थस्थान पावागड आहे. पुढे धर्मभिन्नतेमुळे महाकाली पठारावरील या पावागडक्षेत्रीच त्यांनी वेगवेगळी मंदिरे बांधून आपल्या मताप्रमाणे उपासना सुरू केल्या. पैकी क्षत्रिय लोक शंकर-पार्वतीचे उपासक असल्याने पार्वती देवीची सिंहवाहिनी महाकाली रूपात क्षत्रिय लेवा पाटीदार उपासना करून क्षात्र प्रेरणा घेतो, हा इतिहास आहे.

१. मनुर्भरत वंशवृक्ष

१. स्वायंभूव मनू (पत्नी शतरूपा)

२. प्रियव्रत
३. अग्नीन्ध्र
४. नाभि
५. ऋषभदेव (जैनांचे आद्यगुरु)
६. भरत (जडभरत) याचेच नावावरून भारत देश नाव पडले.
७. सुमति
२७. विषग्ज्योति
अनिश्चित नामावळी

उत्तानपाद २
उत्तम ध्रुव ३
(सहावे मनु) चाक्षुस मनु ३६
उर ३७
(इराण देशात) अंगिरा अंग ३८
बेण ३९
(वेदारंभ) प्रथम राजा कृषिप्रारंभ)पृथु वैन्य ४०
हविर्धान ४२
(आद्य स्थाई वस्ती करणारा कृषि पंडित) प्रचेतस ४४
इ.सन पूर्व २७६१ (आपल्या वंशाचे अंतीम प्रजापती)दक्ष ४५
६० मुली (दिती, अदिती वगैरेसह).

२. मनुर्भरत + सूर्य + चंद्र = या **तिन्हीवंशाचा संबंध**

स्वायंभूव मनु (पत्नी शतरुपा)

प्रियव्रत

उत्तानपाद
दक्ष
६० मुली

पती मारीची + पत्नी अदिती
१ ला वरुण १२ वा विवस्वान (सूर्य)
वैवस्वत मनु
ईक्ष्वाकू
अनेक पुत्र इला (पती चंद्र) +
सूर्यवंश

पती अत्रि + दाक्षकन्या
(२७ दाक्षायणी) + चंद्र
बुध (पत्नी इला)
चंद्रवंश

टीप :- विवस्वान (सूर्य) + बुध हे दोन्ही सख्खे मावसभाऊ होते. ते दक्षाचे मुलीचे मुलगे होते.

३. १ मरीची, २ कश्यप (पत्नी दाक्षायणी उर्फ अदिती) ३ आदित्य उर्फ विवस्वान ४ मनु व यम

विवस्वान (सूर्य) वंश

१ मनु (भारतात आर्य जातीचा व मानव कुळाचा संस्थापक)

२ कन्या **इलाने** बुधाशी लग्न केले)

२ इक्ष्वाकू
३ विकुक्षी, शशाद, शगुनी, वशाति, निमि
४ पुरञ्जय (काकुत्स्थ)
५ अनरण्य (अननस)
६ प्रथु
७ विष्टाश्व (विश्वगण्य)
८ आर्द्र
९ युवनाश्व प्रथम
युवनाश्व द्वितीय
मान्धाता (यदुवंशी शशीबिंदूचा जावई)

पुरुत्कुस — धर्मसेतु — मुचकुंद

सत्यव्रत उर्फ त्रिशंकू (हा ईश्वाकूचा २८ वा वंशज होता असेही म्हणतात).
हरिश्चंद्र
रोहित
सगर (यादव कन्या प्रभापति) —— ३२ भानुमति

(हा ईक्ष्वाकूचा ३७ वा वंशज होता असेही एक मत आहे.)

६०००० पुत्र कपिलशापाने दग्ध

३३ असमंजस
३४ भगीरथ
३५ अनुमित्र + रघु
३६ दिलीप
३७ अज
३८ दशरथ

(इ.सन. पूर्व १६६९ मध्ये झाले असे डॉ.सिंह म्हणतात) शत्रुघ्न — भरत — लक्ष्मण — राम ३९

(इ.सन. पूर्व १६४१ मध्ये झाले असावेत.) ४० लव — कुश ४०

मनुर्भरताचे ९८ वे पिढीत महाभारत महायुद्ध झाले. ५२ प्रसेनजीत — अहीवसु

इ.सन. पूर्व १२७७ मध्ये ५४ बृहदबल

परिपात्र — ४९ सहस्राश्व
५२ वज्रनाभ — ५१ तारापीड
५४ व्युपिताश्व — ५४ श्रुतायुष

या वंशात ५४ व्या पिढीतील बृहद्बल व्युपिताश्व, श्रुतायुष हे सर्व महाभारत युद्धात अनिमन्यूद्वारा मारले गेले.

४. चंद्रवंश

१. अत्रि
२. चंद्र (दक्षाच्या २७ कन्यांचा हा पति होता.)
३. बुध (सूर्याचा मुलगा वैवस्वत मनुची इला दिली होती.)
४. पुरुरवा - उर्वशीचा पती
५. आयु + स्वर्भानु, प्रभा
६. नहुष
७. यति, ययाति, संयाति आदी

(देवयानीचे पासून) — ८. तुर्वस, यदू, दुह्य

(शर्मिष्ठापासून) — अनु, पुरु

५. ब्रह्मवंश

वरुण ब्रह्मा

- अंगिरा
  - बृहस्पति (देवयाचक)
- भृगु
  - शुक्र-उशना (असूर याजक)
    - शुक्र (काव्य उशना)
      - १ त्वष्टा
        - त्रिशिरा (विश्वरूप, वृत्र) विश्वकर्मा-मय
      - २ वरुत्री
      - ३ शण्ड
      - ४ मर्क
    - च्यवन - वशन (स्त्री सुकन्या)
      - कन्या सुमेषा (चा पती विभ्रुव)
      - आप्नवान
        - उर्व
          - ऋचिक
            - जमदग्नी
              - परशुराम
      - दधिची
        - सारस्वत

कूर्मी क्षत्रियांची सूर्य वंशातील मराठी भाषिक लेवा पोटजात

पिढ्या भरतवंश	पिढ्या सूर्यवंश	पिढ्या लवाचा लेवा वंश	युग	इ.सन/पूर्व	पिढीचे नाव
१ली	-	-	सत्ययुग	इ.सन पूर्व ४०२१	स्वायंभूव मनुर्भरत
४५वी	-	-	सत्ययुग	इ.सन पूर्व २७६१	राजा दक्ष
४६वी			त्रेतायुग		दक्षकन्या अदितीचा पतीमारिची कश्यप
४७	१		त्रेतायुग		अदितीसूत विवस्वान उर्फआदित्य हा सूर्योपासक होता म्हणून तो सूर्य
४८	१		त्रेतायुग		वैवस्वत मनू
४९	२		त्रेतायुग		ईक्ष्वाकू
५०	३		त्रेतायुग		विकुक्षी
५१	४		त्रेतायुग		पुरंजय (काकुत्स्य)
५२	५		त्रेतायुग		अनरण्य (अनरस)
५३	६		त्रेतायुग		प्रधु
५४	७		त्रेतायुग		विष्ट्राव्य (विश्वगव्य)
५५	८		त्रेतायुग		आर्द्र
५६	९		त्रेतायुग		युवनाश्व (प्रथम)
७७	३२		त्रेतायुग		भानुमति
७८	३३		त्रेतायुग		असमञ्जस
७९	३४		त्रेतायुग		भगीरथ
८०	३५		त्रेतायुग		रघु + अनुमित्र
८१	३६		त्रेतायुग		दिलीप
८२	३७		त्रेतायुग		अज
८३	३८		त्रेतायुग		दशरथ
८४	३९		त्रेतायुग	इ.सन पूर्व १६६९	राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न
८५	४०	१	द्वापारयुग	इ.सन पूर्व १६४१	लव कुश
९७	५२	१२	द्वापारयुग		प्रसेनजीत वज्रनाभ
९९	५४	१४	द्वापारयुग	इ.सन पूर्व १२७७	बहद्बल व्युपिताश्व, श्रुतायुश
१४०	९५	५५	कलीयुग	इ.सन पूर्व १०१	सुमित्र इ.सन. पूर्व १०१ ते ७८ सुर्यवंशाचा शेवटचा राजा पंजाबात पराभूत.
				इ.सन पूर्व ७५	तातार देशाच्या शकांनी पंजाब जिंकला.
१४४	९९	५९	कलीयुग	इ.सन १४४	सूर्यवंशी कनकसेन वल्लभनगरला (सौराष्ट्रात) राज्य संस्थापक
१७८	१३३	९३	कलीयुग	इ.सन ९४२ते९५५	या कालात सौराष्ट्रात मूलराज चालुक्य (सोळंकीवंशीचे) राज्य होते.

१८०	१३५	९५	कलीयुग	इ.सन ९५५ते१००८	या कालात मराठी भाषा जन्मली (चामुंडराय सन ९५५ ते १००८)
१८५	१४०	१००	कलीयुग	इ.सन१०९४ते११५३	सिद्धराज जयसिंग राजपूताने भू-स्वामित्त्व पट्टे दिले. म्हणून पाटीदार झाले.
१८६	१४१	१०१	कलीयुग		भयाजी उर्फ भांगजी
१८७	१४२	१०२	कलीयुग		राम
१८८	१४३	१०३	कलीयुग		शंभू
१८९	१४४	१०४	कलीयुग		प्रभू
१९०	१४५	१०५	कलीयुग		देविदास
१९१	१४६	१०६	कलीयुग		रुद्र
१९२	१४७	१०७			मुकुंद
१९३	१४८	१०८			देवाजी
१९४	१४९	१०९			नरोबा
१९५	१५०	११०			बापू
१९६	१५१	१११			मुऱ्हारी (गुजराथेत)
१९७	१५२	११२	निर्वासित झाले	इ.सन १४८४	धबाजी
१९८	१५३	११३	दुधलगावला आले.		जगदीश
१९९	१५४	११४	कलियुग		राम
२००	१५५	११५	कलियुग		मुकुंद
२०१	१५६	११६	कलियुग		विश्राम
२०२	१५७	११७	कलियुग		दशरथ
२०३	१५८	११८	कलियुग		भगू
२०४	१५९	११९	कलियुग		आवजी
२०५	१६०	१२०	कलियुग		महादू उर्फ माधव
२०६	१६१	१२१	कलियुग		चंद्रभान
२०७	१६२	१२२	कलियुग		नेवोजी
२०८	१६३	१२३	कलियुग		कृष्ण
२०९	१६४	१२४	कलियुग		माधव
२१०	१६५	१२५	कलियुग	ते १९२१	सुपडा
२११	१६६	१२६	कलियुग	ते १९१८	दत्तू (मानमोडीच्या साथीत अकाल मृत्यू)
२१२	१६७	१२७	कलियुग	सन १८८८ ते १९६४	विठोबा
२१३	१६८	१२८	कलियुग	जन्म ९.११.१९२६	शंकर (प्रस्तुत ग्रंथ लेखक) यांना ३ मुले आहेत.
२१४	१६९	१२९	कलियुग		१. कृष्ण २. राम, ३. संजय
२१५	१७०	१३०	कलियुग	इ.सन. १९९८	अनंता(मृत) संकेत

पुण्याच्या एका साहित्यिक मित्राने वाल्मिकी रामायणाचे आधारे प्रभू रामचंद्राचा वंशवृक्ष पाठविला तो याच ग्रंथात पृष्ठ ५८ वर दिला आहे. शिवाय विष्णु पुराणाच्या ४ थ्या अध्यायाचे आधारे त्यांनी प्रभू रामाचा सूर्यवंश वृक्ष पाठविला तोही पृष्ठ ५८ वर दिला आहे. माझा मुलगा **संजय याने**

इटार्शीवरून एक सूर्यवंश वृक्ष गोस्वामी तुलसीदास कृत रामायणाधारे (प्रकाशक शिक्षा ग्रंथकार मथुरा, डाग दरवाजा) पाठविला तो असा :- १. आदि पुरुष भगवान, २. ब्रह्मदेव + सावित्री, ३. मरिचि (कलासह), ४. कश्यप (अदिती पत्नीसह), ५. विवस्वान (पत्नी संज्ञा), ६. श्राद्धदेव मनु, ७. ईक्ष्वाकू, ८. विकुक्षी, ९. पुरंजय, इंद्रवाह, कुकुत्स्य, १०. अनेना, ११. पृथु, १२. विश्वरंधी, १३. चंद्र, १४. युवनाश्व, १५. शावस्त, १६. बृहदश्व, १७. कुवलियाश्व, १८. दृढाश्व, १९. हर्यश्व, २०. निकुंभ, २१. वर्णाश्व, २२. कृपाश्व, २३. सनेजीत, २४. युवनाश्व, २५. मांधाता, २६. पुरुकुत्स, २७. त्रसद्रस्यू, २८. अनरण्य, २९. हर्यश्व, ३०. अरुण, ३१. निबंधन, ३२. सत्यवृत, ३३. हरिश्चंद्र, ३४. रोहित, ३५. हरित, ३६. चम्प, ३७. सुदेव, ३८. विजय, ३९. भरुक, ४९. वृक, ४१. बाहुक, ४२. सगर, ४३. असमंजस, ४४. अंशूमान, ४५. दिलीप, ४६. भगीरथ, ४७. श्रूत्र, ४८. नाम, ४९. सिन्धद्विप, ५०. अयुतांषु, ५१. ऋतुपर्ण, ५२. सर्वकाम, ५३. सुदास, ५४. अशाक, ५५. नारीकवच, ५६. दशरथ, ५७. इडबिड, ५८. विश्वसह, ५९. खट्वाङ्ग, ६०. दीर्घबाहू, ६१. रघु, ६२. प्रथुश्रवा, ६३. अज, ६४. दशरथ (कौशल्यासह), ६५. सीतापती रामचंद्र. ६६. कुश व (लव), ६७. अतिथी, ६८. निषध, ६९. नभ, ७०. पुंडरिक, ७१. क्षेमधन्वा, ७२. देवानिक, ७३. अहीन, ७४. पारीधात्र, ७५. बलस्थला, ७६. वज्रनाभ, ७७. स्वगण, ७८. विधृति, ७९. हिरण्यनाम, ८०. पुष्प, ८१. धृव संधी, ८२. शिघ्र, ८३. मरु, ८४. पुक्तभ्रत, ८५. संधि, ८६. अमर्षण, ८७. महस्वान, ८८. विश्वसह, ८९. प्रसेनजित, ९०. तक्षक, ९१. **बृहद्बल**, ९२. बृहद्रण, ९३. उरुक्रिया, ९४. कसवृह, ९५. प्रतिवियोग, ९६. भानु, ९७. दिवाक, ९८. वाहिनी पति, ९९. सहदेव, १००. वीर, १०१. बृहद्रथ, १०२. भानुवाह, १०३. प्रतिकाश्व, १०४. सप्रतिक, १०५. मरुदेव, १०६. समक्षेत्र, १०७. पुष्कर, १०८. अंतरिक्ष, १०९. सुतपा, ११०. अमिन्नजित, १११. बृहद्राज, ११२. वर्हि, ११३. कृतंजय, ११४. रणञ्जय, ११५. संजय, ११६. शाक्य, ११७. सुषेध, ११८. लंगल, ११९. प्रसेनजित, १२०. क्षुद्रक, १२१. रणक, १२२. सुरथ, १२३. **सुमित्र**.

मात्र श्री जगजाहिर सिंह एल/६२-३/बी, साकेत नगर, हबिब गंज, भोपाळ मध्यप्रदेश, पीन ४६२०२४, फोन नंबर - (०७५५) ५८९०३१ निवास. ह्यांच्या संग्रही असलेल्या गोरखपूर प्रतीतील ग्रंथाधारे या वंशावळीत काही फरक सापडला तो असा :

८. विकुक्षी उर्फ शशाद, १७. कुवलयाश्व उर्फ धुन्धुमार, १८. दृढाश्व उर्फ कपिलाश्व व भद्राश्व, २१. बाहेणाश्व, २२. कृशाश्व, २५. मान्धाता पत्नी शशी बिन्दुकी, २६. पुरुकृत्स्य+अंबरिश + योगी मुचकुन्द, ३१. त्रिबंधन, ३२. सत्यव्रत उर्फ त्रिशंकू, ४८. नाभ, ५४. सौदास (पत्नी मदयन्ती) उर्फ कल्माषपाद उर्फ मित्रसह, ५५. अश्मक, ५६. मूलक उर्फ नारीकवच, ५७. दशरथ, ५८. एडविड, ५९. विश्वसह, ६०. खट्वांङ्ग, ६१. दीर्घबाहू, ६२. रघु, ६३. अज, ६९. नभ उर्फ नळ, ७३. अनीह, ७४. पारिपात्र, ७७. खगण, ७९. हिरण्यनाभ, ८२. सुदर्शन, ८३. अग्निवर्ण, ८४. शीघ्र, ८५. मरु, ८६. प्रशुश्रूत, ८७. सन्धी, ८८. अमर्षण, ८९. महस्वान, ९०. विश्वसाह, ९१. प्रसेन्नजीत, ९२. तक्षक, ९३. बृहद्बल (हा भारतीय युद्धातील चक्रव्युहात अभिमन्यूकडून इ.सन. पूर्व १२७७ मध्ये मारला गेला. ९४. बृहद्रण, ९५. उरुक्रिय, ९६. वत्सवृद्ध, ९७. प्रतियोग, ९८. भानु, ९९. दिवाक, १००. सहदेव, १०१. बृहदश्व, १०२. भानुभान, १०६. सुनक्षत्र, ११२. बर्हि, ११७. शुद्धोद, ११८. लाङ्गल, १२३. सुमित्र हा ईक्ष्वाकू वंशातील शेवटचा सत्ताधिश इ.सन पूर्व ७८ मध्ये पंजाबात पराभूत झाल्याने याचा वंश उत्तरभारतभर विखुरला (कु.क्ष.पा.इतिहास, पृष्ठ ४५ पहा व बॉम्बे गॅझेटियर पहा).

इ.सन पूर्व ७५ मध्ये तातार देशाच्या शकांनी पंजाब जिंकला. त्या शकात कनिष्क फार शूर वीर होऊन गेला. या कनिष्कानंतर **माळव्याचा राजा वीर विक्रमादित्याने शकांचा पराभव केला.** इ.सनाच्या पहिल्या शतकाचे शेवटी मगधचे क्षत्रय राज्य आहे. इ.सन १४० मध्ये जयदामा सौराष्ट्रावर नांदला. १४४ मध्ये सूर्यवंशी कनकसेन व इ.सन १५६ मध्ये वज्रपालजी गुजराथेत नांदले. इ.सन ४०० पर्यंत सौराष्ट्रात क्षत्रियांचे राज्य होते. इ.सन ४१० ते ४७० गुप्तशासन व इ.सन. ५०९ ते ६९०

पर्यंत वल्लभी राजा वल्लभपूरला होते. सन ६९० ते ६९६ कल्याणी पती भूवड व सन ७४६ मध्ये चावडावंशी राजपूत वनराज अनहिल पाटणला नांदला. इ.सन १०६४ ते १०९४ करणराज सोळंकी स इ.सन १०९४ ते ११५३ मध्ये करणपूत्र सिद्धराज जयसिंहाने राज्य केले. याने माळव्याच्या यशोवर्मनचा पराभव करून तेथील ४२ कुर्मि टोळयांना सौराष्ट्रातील भुमिस्वामित्त्व देऊन पाटीदार बनविले. त्यानंतर करण वाघेलचे राज्य आले. व त्याच्या दुराचारामुळे यवनांनी त्याला पराभूत केल्याने कुर्मी लोकाशी लढले. इ.सन. १४८२ मध्ये चापानेरवर व ता. १७ मार्च १४८३ ला पावागडचे तळाशी महंमद बेगडाने तळ दिला २० महिने लढाई चालली. पताई रावळ राजपूत राजाचा साळा सियाजी बाकलीवाल फितूर झाल्याने कुनबी पाटीदार सैनापती वैरसिंहाचा सन १४८३ मध्ये पौष महिन्याचे तृतीयेस संवत १५४१ मध्ये महंमद बेगडाने पूर्ण पराभव केला. त्याची कत्तल केली. काही लोक भाल, चरोत्तर, कानम भागात पळाले तर १४०० गाडी तापी तीराने बऱ्हाणपूरच्या फारुकी अमंलात विवासली. तर काही शूरवीर राजूर रोहिणखेडच्या जैत्रपाळ यादवाचे परिसरात व पिंपळगाव राजाचे अहिरराज्यक्षेत्रात पुनर्वसनाच्या आशेने पुढे गेले व दाताळा / दुधलगाव लेवा भोरगाव ठाया संस्थापून तेथे तापीपूर्णेच्या खोऱ्यात नळगंगा तीराने पुनर्वसित झालेत. गुजराथेतून सिंहवाहिनी अंबिका, काली, बहुचरा व तुलजा कुलदैवतांना विसरून पंढरीचा पांडुरंग व बुलडाणा जिल्ह्यातील मढ व जाईचादेव येथील चक्रधराचे महानुभाव पंथ, वडनगरचा स्वामीनारायण पंथ व पिरानचा सत्पंथ उपासना करू लागले.

इ.सन. पूर्व ४०२१ ते इ.सन पूर्व २७६१ मनुर्भरत ते दक्ष सत्ययुगात ४५ पिढ्यांची १२६० वर्षे + इ.सन पूर्व २७६१ ते इ.सन पूर्व १६६९ दक्ष ते प्रभू रामचे त्रेतायुगात, ३९ पिढ्यांची १०९२ वर्षे + इ.सन पूर्व १६६९ ते इ.सन पूर्व १२७७ (रामप्रभू ते महाभारत) युद्ध द्वापारात १४ पिढ्यांची ३९२ वर्षे + इ.सन पूर्व १२७७ ते इ.सन १९९८ महाभारतयुद्ध ते आजपर्यंत ११७ पिढ्यांची ३२७५ वर्षे +

२८ वर्षाची १ पिढी धरून हिशेब करतात = एकूण २१५ पिढ्यांची ६०१९ वर्षे

इ.सन पूर्व ४०२१ ते इ.सन १९९८ पर्यंत = ६०१९ वर्षे होतात भागिले २८ = २१५ पिढ्यांचा अंदाज काढता येतो.

आचार्य चतुरसेनकृत 'भारतीय संस्कृति का इतिहास', पृष्ठ १५३, १५४, १६४, ११२, ११३ आदी पृष्ठांचे आधारे डॉ.रामसिया सिंह यांनी कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, पृष्ठ ४५ ते ५१ पृष्ठावर रेखाटलेल्या वंशवृक्षाचे आधारे प्रस्तुत वंश घेतले आहेत.

बॉम्बे गॅझेटियर बेलगाम, जिल्हा २१ मध्ये म्हटले आहे की, कुणबी (कूर्मी) लोककुळे २९२ आहेत. त्यापैकी १०२ कुळे चंद्रवंशीय आहेत. ४८ कुळे सूर्यवंशीय आहेत. ८१ कुळे ब्रह्मवंशीय असून उर्वरीत ३१ कुळे विविध वंशीय आहेत. असे डॉ. रामसिया सिंह कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा ग्रंथात, पृष्ठ ५२ वर लिहितात.

बॉम्बे गॅझेटियर, पूना जिल्द, १८ भाग, तथा ई.जे. किट्स : कम्पेण्डियम ऑफ हिंदू कास्टस् एण्ड ट्राईब्स, चौधरी दीपनारायण सिंह, कूर्मी क्षत्रियत्व निर्णय, द्वितीय संस्करण, पृष्ठ ८ व ९ चा दाखला देऊन डॉ.रामसिया सिंह, पृष्ठ ५२ व ५३ वर कूर्मी कूल व त्यांचे मुख्य वंश सांगतात. त्यातील ४८ वे पाटीदार कूर्मीकूल हेही सूर्यवंशीय आहे. तसेच, ५९ वे गुजराथी कूर्मी कुळही सूर्यवंशीय आहे व ४ थे कूर्मीकुळ लववंश हेही सूर्यवंशीय कूर्मीकुळच आहे.

ब्र.भू.प.पू. मोरेदादा, दिंडोरी दरबार, जि. नाशिक यांनी लिहिलेल्या 'क्षात्रधर्म' ग्रंथात पृष्ठ १६ वर दिलेला वंशवृक्ष असा : १ आदिनारायण भगवान विष्णु (इंद्राचा भाऊ) त्याचा पुत्र, २ ब्रह्मदेव, ३ त्यापासून मरिची, ४ कश्यप, ५ विवस्वान उर्फ सूर्य, ६ वैवस्वत मनु , ७ ईक्ष्वाकू, ८ **सदोतीसावा वंशज सगर,** ९ भगिरथ, अंबरिष, १० रघु, ११ अज, १२ दशरथ, १३ राम, १४ लव आणि कुश या सूर्यवंशात राज जनक, विश्वामित्र, राजा श्रीयाळ, चांगुणा, रोहिदास, नल-दमयंती हे श्रेष्ठ क्षात्र

जन्मले. पृष्ठ २३ वर भारतातील आज प्रचलित असलेले क्षत्रिय समाजाचे ४३ वंश दिले आहेत. त्यापैकी २४ वा लेवे क्षत्रिय व २५ वा कच्छवे क्षत्रिय, ३७ वा गुजराथी क्षत्रिय, ३८ वा काठेवाडी क्षत्रिय, ४० वा पंजाबी क्षत्रिय, हे वंश लेवा पाटीदार समकक्ष वाटतात.

'क्षात्रधर्म' ग्रंथात पृष्ठ ११५ वर लेवा पाटील क्षत्रिय सूर्यवंशाचे वर्णन करताना पूज्य मोरे दादा लिहितात की, "कर्नल टॉड यांचे राजस्थानचे इतिहासात व रामचंद्रिका प्रकाश ३९ यात म्हटले आहे की, - लवाचे वंशजांना 'लेवे' किंवा 'रेवे' म्हणतात व कुशाचे वंशाला 'कडवे' किंवा 'कच्छवे' किंवा 'कुळंबी' म्हणतात." बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम ९, भाग १, इ.सन १८८९ मध्ये वरील माहिती दिली आहे. तसेच, गुजराथेत १ आंजना,२ कडवा, ३ लेवा, ४ मतिया हे चार क्षत्रियांचे प्रकार आहेत. बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम ९, भाग १ यात वरील माहिती आहे. यावरून गुजराथ मधून महाराष्ट्र व विदर्भात (उत्तरमहाराष्ट्रात) आलेले लेवा पाटीदार हे क्षत्रिय असून प्रभू रामचंद्राचे वंशातील आहेत.

२ वंश-सूर्य, गोत्र - वशिष्ठ (मूळ गोत्र), देवक तरवार, कुळदेवता व कुळे अनेक आहेत. पृष्ठ ११६ वर मोरेदादांनी बऱ्हाटे, बोरोले, वहाळे, बोंडे, भोळे, भंगाळे, भारंबे, भिरुड, बोंबले, वाकसे, भोरकटक्के, भालोदे, बढे, बरडे, भोगे, भगत, कोळंबे, कोल्हे, कुरकुरे, किन्हीकुर, काळे, फिरंगे, खाचणे, खर्चे, खडके, कोलते, खडसे, ढाके, डहाके, ढोले, धांडे, इंगळे, होले, हरणखेडकर, फालक, फिरके, फेगडे, चौधरी, चिरमाडे, चिनावले, चोपडे, झांबरे, झोपे, नेहते, नाफडे, नारखडे, नेमाडे, गारसे, गाजरे, गुळवे, पाटील, पिंपरकर, पाचपांडे, पिंगळे, पांगळे, परतने, पेटकर, सरोदे, सुपे, सावदेकर, सराफ, सिंगणूरकर, सारंग, राणे, रडे, रहाणे, रोटे, तळेले, ठोंबरे, टोके, वाणी, वायकोळे, वारके, वराडे, वाघोदे, वायुळदे, येवले, यावलकर, जंगले, जावळे, महाजन, मार्कंडे, लढे, लोखंडे ह्या कुळसूचीत बरीच आडनावे आमच्या चैतन्य प्रकाशनाच्या संशोधन केंद्रास अपरिचित आहेत.

'मराठी आडनावे' या ग्रंथात पृष्ठ ५३ वर, तिसऱ्या परिच्छेदात, "प्रभू रामचंद्र-सूत कुशाचे वंशज कुशवंशी होत. या कुशवंशियांना कुशवाहा म्हणतात. कुशवाहापासून कछवाहा शब्द बनला. टॉडसाहेब देखील कुछवाहाला कुशवाहचा अपभ्रंश मानतात" असे लिहिले आहे.

पुढच्याच परिच्छेदात दशरथपुत्र रामाचे वंशज कूर्मवंशी अथवा कुछवाह म्हणून प्रसिद्धीस आले. जयपूर नरेशाचा वंशज याच कुळातील होता. श्री. सुख संपत्तिराय भंडारींनी लिहिलेला "भारतके देशी राज्य: जयपूर राज्य का इतिहास, पृष्ठ ४ आधार देऊन डॉ. सोनी लिहितात की, - या कुळातील काही लोक ग्वाल्हेरला स्थायिक झाले आहेत.

'कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा', लेखक - डॉ.रामसिया सिंह यांनी पृष्ठ १४ वर, अध्याय २ रा कूर्मवंशी क्षत्रियांची उत्पत्ती दिली ती अशी :- **कूर्म - कश्यपा पासून मानव जातीची उत्पत्ती झाली म्हणून कूर्म कश्यपाची संतान कूर्मी जाती व कूर्मीवंशी, कूर्मी, काश्यप, काश्यपगोत्री, स्वत:स म्हणवू लागले. कूर्म काश्यप मानवाचा आदी पुरुष असल्याने संपूर्ण प्रजा कूर्म कश्यपापासून झाली असे महाभारत आदिपर्व ६५-११ व्या श्लोकात "कश्यपात तु इमा: प्रजा: ।" असे म्हटले आहे.** तसेच, महाभारत शांतीपुर्व २९६/१७-१८ श्लोकात :-

मूल गोत्राणि चत्त्वारि सुमुत्पन्नानि भारत ।
अंगिरा: कश्यपश्चैव वशिष्ठो भृगुरेव च ॥१७॥
कर्मतोऽन्यानि गोत्राणि समुत्पन्नानि पार्थिव ।
नामध्येयानि तपसा तांनि च ग्रहणं सताम् ॥१८॥

यावरून **प्रारंभी अंगिरा, कश्यप, वशिष्ठ व भृगु नामक ४ ऋषी ही मूल गोत्र प्रवर्तक होते. व बाकी गोत्र प्रवर्तक नंतर झाले.** या गोत्र प्रवर्तकाची तपस्या व साधना यामुळेच साधूसमाजात ही सन्मानीत व प्रचलीत झाली.

कूर्मचा शब्दश: अर्थ 'कर्मशील' व कश्यपाचा शाब्दिक अर्थ 'द्रष्टा' असा आहे. सृष्टीकर्त्यात हे दोन्ही गुण आहेत. कारण,

"परमेश्वरेणेद सकल जगत् क्रियते तस्मात्तस्य कूर्म इति संज्ञा।

कश्यपोवै कूर्म इत्यनेन परमेश्वरस्यैव कश्यप इति नामास्ति।"

असे 'ऋग्वेदादि भाष्य भूमिका' पृष्ठ ३१५ पहा, व कश्यप पश्यको भवति यत् सर्व परिपश्यति इति सौक्ष्म्यात्। तैत्तिरीय आरण्यक। १/८/८ पहा म्हणजे खात्री होईल.

यजुर्वेदात कूर्म ऋषीस प्रजापती व आदित्य या दोन्ही नावांनी संबोधिले आहे. "कूर्म: प्रजापतिरादित्यो वा।" यजुर्वेद १३/३० मंत्राचे महिवर भाष्य. तसेच, ऋग्वेद १/२७ मध्ये "कूर्मो गार्त्समदो गृत्समदो वा ऋषि:।" म्हणजे राजर्षि कूर्म सुप्रसिद्ध वैदिक ऋषि गुत्समदाचा सुपुत्र होता.

कूर्मी शब्दाचा अर्थ अत्यंत पराक्रमी, तेजस्वी, प्राणवान, बलवान, पृथ्वीपती (भूपति या राजा) या सर्व गुणांमुळे सर्व कूर्मवंशी नि:संदेह क्षत्रिय होय. **महर्षि कश्यपाची पत्नी प्रजापती दक्षाची मुलगी अदिती होती. (पृष्ठ १७) म्हणून अदितीपासून झालेली संतान आदित्य संबोधिली गेली.**

महर्षी कश्यपाने ऋग्वेदाच्या प्रथम मंडलातील ९९ वे सूक्त रचले आहे. हल्ली त्यांचे ७२ मंत्र ऋग्वेदात मिळतात.

Kashyaps (9/114/2) is the generic name of the Caspian. Mount Demauand was called Kashypa and the caspian sea was named because the Caspians lived their. In Iranian population there is a strong caspien factor marked by tall stature, Dolochocephalic head with broad face and prominent nose and hazal eyes. Kasmir was also settled by kashyads (Chandra chakravarti, Racial History of India Page 169) यावरून कश्यपाचे काळी कास्पियन समुद्राजवळ इराण प्रदेशाचा कश्यप अधिपती असावा असे वाटते. 'कूर्मीक्षत्रिय कीर्तिकथा' ग्रंथात डॉ.रामसिया सिंह, पृष्ठ २० वर कूर्मी शब्दाची व्युत्पत्ती सांगतात की, कूर्मी-कु = पृथ्वी + उर्मि म्हणजे गोद यावरून पृथ्वीच्या गोदमध्ये वाढलेल्या म्हणजेच पृथ्वीपुत्र होय. कुरम - कु = पृथ्वी + रम = पती किंवा वल्लभ म्हणून कुरम म्हणजे भूपती वा पृथ्वीपती हा क्षत्रियवाचक शब्द होय.

'क्षेत्रात् रमेत स: क्षत्रिय:' असे म्हणूनच म्हणतात कुणबी कोण आहेत?

आंग्ल विश्वकोशात कुणबी जाती संबंधी म्हटले आहे की, कुणबी, महान हिंदू कृषक जाती असून ती मुख्यत: पश्चिम भारतात दिसते. मद्रासच्या तेलंगी प्रांतात यांनाच कापू, बेळगावमध्ये कुलबी, व. कोकणात कुलबदी, गुजराथेत कणबी, तथा भडोचचे पाटीदारांचे समरूप आहेत. नृवंशीय दृष्टीने उच्चवर्णिय मरहट्टा (मराठा) तथा कृषिकर्मी कुनबी समान आहेत. दोघांमध्येही विशिष्ट पैतृक गुण आहेत. असे कालिकाप्रसाद, ज्ञानमंडळ, वाराणसी यांनी संपादिलेल्या 'वृहत् हिंदी कोशात' पहा. कुनबीपासूनच कूर्मी शब्द बनला आहे. मराठा उच्च वर्गीय कुनबी असून ते दक्षिण भारतवासी आहेत.

"इटारसी नगरकी कुर्मी महिलाओंका एक समाजशास्त्रीय अध्ययन" हा भोपाळच्या बरकत उल्लाह विद्यापीठात सन १९९३ साली शोध निर्देशक - डॉ.गौतम ज्ञानेंद्र रीडरच्या निर्देशनानुसार कु. सीमा सचान यांनी समाजशास्त्राच्या आचार्य (पीएच.डी.) उपाधीसाठी ता. ५ जुलै १९९३ ला सादर केलेल्या शोध प्रबंधात, पृष्ठ ६, परिच्छेद २ मध्ये लिहिले आहे की, - "कूर्मी जाति भारतके सभी भागोंमे पाई जाती है। इसके अलग-अलग नाम है। जैसे कुन्बी, कुलंबी, कणबी, कूर्मी इत्यादि, इनमे भिन्नता होते हुए भी ये सभी कुटुम्बी शब्दसेही निकले है। उत्तर भारत में कूर्मी नाम अधिक प्रचलित हैं। वेदोसे 'कूर्मी' और 'कुर्म' शब्दका प्रयोग विशेषणके रूप मे असूर संहारक इंद्र और भगवती दूर्गा के लिये किया गया है। कूर्मी का अर्थ महान, पराक्रमी एवम् तेजस्वी होता है।"

गुजराथमध्ये पावागडला कुणबी, क्षत्रिय पाटीदार समाजाचे कुलदैवत म्हणून महाकाली रूपात दुर्गादेवीच आहे.

कु. सीमा सचान, पृष्ठ ९, परिच्छेद ३ मध्ये डॉ.जे.पी. वर्मा यांचा दाखला देऊन लिहितात की प्रारंभी समाजात कर्माधारे चार वर्ग म्हणजे चार वर्ण कल्पिलेत. त्या वेळी कोणीही व्यक्ती आपला व्यवसाय परिवर्तित करून आपला वर्ण बदलू शकत होती. अशा प्रकारे विभिन्न जाती निर्मिल्यात. "कूर्मी जाती क्षत्रियोंके अंतर्गत आती है। यद्यपी कूर्मी जाती के तीन मौलिक गुण है. क्षात्रत्त्व, भू-स्वामित्त्व, कृषकत्व। प्राचीन कालसे ही कूर्मी भू-स्वामी होते थे और साथ कृषी भी करते थे, और क्षात्रकर्म करते थे। क्षात्रसेवाके बदलमे इन्हे बडीबडी जागीरे मिली थी और साथ ये कृषि कार्यभी करते थे।"

डब्ल्यू कुक (रेसेस ऑफ नॉर्दर्न इंडिया : १९७३) कूर्मी अथवा कुन्बी दक्षिण भारतात सुस्थितीत दिसतात, जेथे काही काळ त्यांना मराठा म्हणून संबोधिले जाई. कारण की, त्यांनी शिवाजीच्या नेतृत्वाने स्वातंत्र्याची लढाई लढले.

"The Tribes & Castes of the North Western India" writer - William Crooke Vol.III, Editor : Casmo Publications Delhi, Pin : 110006, India, Edition in 1975 Page 346 to 359, Kurmi-Kunbi. ह्या पृष्ठावर कूर्मीजातीबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. त्यात पृष्ठ ३५३ वरील मुद्दा १३ वा सामाजिक नियम विशद करताना ग्रंथकार लिहितात की,

"Their Social Status is respectable. They will not eat Kachchi even if cooked by a Brahmin who is not their Guru. The same rule applies to Pakki. Some local Brahmins will eat Pakki from their hands and the same is the case with respectable. Kshatriyas. All other castes eat Pakki from their hands without hesitations... The worshipped Mahadeva."

The Imperial Gazetteer of India, Vol. V Abazi to Arcot, New edition, To days & Tomorrow Printers & Publishers, 22B/5, Original Road, New Delhi 5 (India). This book is available in Bhopal University Library. Bhopal Call No. 910-354 R, Book 1, Accession No. 2148 Pages No. 96 to 99 : यापैकी पृष्ठ ९८ वर लिहिले आहे की, "There is no real difference of caste between kunbis and Patidars; though Patidars will not now intermarry with ordinary Kunbis. The latter are divided into three classes - Levas, Kadavas and Anjanas."

Next in the Position to the Kunbis are the Rajputs, who still retain to some extent the look and feelings of soldiers.

चंद्रवंश, ब्रह्मवंश, नागवंश यात लेवा पाटीदाराचा वंश येत नाही. ते फक्त सूर्यवंशातच येतात. १ सूर्य, २ चंद्र, ३ ब्रह्मा, ४ नाग- या चारही वंशात उर्वरीत मराठा व कुणबी वंशवेली आहेत.

'शूद्र, मूळचे कोण होते ?' ले.- डॉ. आंबेडकर (मराठी प्रत) पृष्ठ २११, वर बाबासाहेब लिहितात की, सूर्यवंशाचे जे क्षत्रिय होते, ते तडफदार, बाणेदार होते. सोमवंशाचे जे क्षत्रिय होते ते स्वाभिमानशून्य व दळभद्र होते... **सूर्यवंशाचे क्षत्रिय लोक विद्येच्या बाबतीत ब्राह्मणाइतके विद्वान होते. एवढेच नव्हे तर ब्राह्मणापेक्षा ते उच्च दर्जाचे विद्वान राजर्षी म्हणून समजले जात असत.** जे क्षत्रिय विद्वान ब्राह्मणांच्या झगड्यात पडले त्यांची ही सत्यकथा आहे. वेदातील ऋचांचे कर्ते पुढे दाखविले आहेत. (Muir, Vol. 1 Page 268)

६-१५	वितहव्य (किंवा भारद्वाज)
१०-९	सिंधूद्वीप अंबरीषाचा पुत्र (किंवा त्रिशिर सत्त्वष्टीचा पुत्र)
१०-७५	सिंधूक्षित, प्रियमेधाचा मुलगा
१०-१३३	सुदास, पिंजवनाचा मुलगा
१०-१३४	सुदास, युवाश्वानाचा मुलगा
१०-७९	सिबी, उसीनराचा मुलगा, प्रतोदन दिवोदासाचा मुलगा व काशीचा मुलगा आणि वसुमन, रोहिदासाचा मुलगा.
१०-१४८	प्रिथी वैन्य...

वैदिक ऋचा रचणारे जे लोक होते, त्यांच्यात क्षत्रिय लोक अग्रगण्य होते. सर्व वैदिक ऋचात अत्यंत प्रसिद्ध असलेली ऋचा म्हणजे गायत्री मंत्र. ही ऋचा विश्वामित्राने रचली. विश्वामित्र (सूर्यवंशी) क्षत्रिय होता, आणि इतिहासाने असे सिद्ध केले की, चंद्रवंशापेक्षा सूर्यवंश हा पूरातन आहे.

कूर्मवंश (सूर्यवंश) :- स्वायंभूव मनु व त्याची पत्नी शतरूपा यांना प्रियव्रत व उत्तानपाद नावाची दोन मुले झाली. त्यापैकी उत्तानपाद शाखेचा ४५ वा वंशज दक्ष प्रजापती होता. दक्षकन्या आदितीने मरीची कश्यपाशी विवाह केल्यावर झालेल्या १२ आदित्यांपैकी सर्वात धाकटा आदित्य विवस्वान (सूर्य) चा सूर्यवंश होय. विवस्वानाचा पुत्र वैवस्वत मनु, त्यापासून ईक्ष्वाकू, मान्धाता, हरिश्चंद्र, रोहित, सगर, भगीरथ, दिलीप, रघु, अज, दशरथ, राम व रामास लव व कुश हे पुत्र झाले. शरयूचे उत्तरेस लवाचे राज्य श्रावस्तीहून तर शरयूचे दक्षिणेकडील कुशाचा कोशल प्रदेश विंध्य पर्वतावर कुशावतीहून हाकला गेला. कुश पुढे अयोध्येस गेला. लवाचे वंशात प्रसेनजित महशूर राजा झाला. लवाने लवपूर (उर्फ लाहोर) (पाकिस्तानातील) राबी नदीतिरी वसविले. लव व कुशाचे वंशज अजूनही लेवा व कडवा या अपभ्रष्ट नावाने गुजराथ व पश्चिम मध्यप्रदेशात धार व खरगोण भागात नांदतात.

कूर्मवंशी क्षत्रियांचा सूर्यवंश हा प्रधान क्षत्रिय वंश आहे. जेन्किन्सन एस्क्वायर डी.प्टी. कमिशनर अँड सेट लमेंट ऑफिसरच्या दिनांक २७ एप्रिल १८६६ च्या लेखात श्री. इ.जी. जेन्कीन्सनच्या मते झाशी प्रदेशातील कूर्मी आपणास बलभद्रापासून उत्पन्न झालेले सूर्यवंशी मानतात. स्कंध पुराण, सह्याद्रि खंड, अध्याय २७ मध्ये सुद्धा या सूर्यवंशी कूर्मी जातीचा उगम सापडतो.

कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, ग्रंथात, पृष्ठ ५७ वर पृथ्वीराज चव्हाण, कूर्मवंशी क्षत्रिय असल्याची भरपूर प्रमाणे दिली आहेत. विस्तारभयास्तव त्यांचा फक्त निर्देशच करतो. तसेच, पृष्ठ ५९ वर रामचंद्रिका प्रकाश, पृष्ट ३९ तसेच, कालिदासाचे रघुवंश सर्ग १६, श्लोक ४-४२, तथा कु.क्ष. की. क. ले. राम. सिंह पृष्ठ ५९ वरील कर्नल टॉड या सर्व पुराव्यांचे आधारे प्रभूरामाचा वंश कूर्मी उर्फ कुणबी वंश असून सूर्यशाखीय आहे.

गुजरात व मध्यप्रदेशात कुशवंशालाच कडवा हे नाव आहे, तर लवाचे वंशाला लेवा कुणबी म्हणतात. यांची पाळेमुळे पंजाबातील लाहोर व नंतर गुजराथेतील सूर्यवंशी क्षत्रियात आहे.

बॉम्बे गॅझेटियरमध्ये जुनावाडनिवासी श्री. हेमभाई अजभाई वहिवाटदाराचे सन १८८९ चे पुराव्यावरूनही वरील प्रमाणेच सिद्ध होते. (बॉम्बे गॅझेटियर, जिल्ल्द ९, भाग १ पहा).

इ.सन. १९०१ मध्ये गुजराथेत कडवा कुणबी ४००९५ व लवा कुणबी ५६८१८५ होते. गुजराथेत पाटीदार व कृषक हे लेवा कुणब्याचे दोन पोटभेद आहेत आंजन कुणबी ३१४८१ होते. ते आपल्या नावापुढे सिंह ही उपाधी जोडतात. ते भोलावत, चव्हाण, यादव, परमार, जरमाल, राठोड, सोळंकी आदी २३ कुळात विभागले गेले. चातुर्य व व्यवसायात ते राजपूतापेक्षा श्रेष्ठ आहे. मतीय कुणबी ४०२६ असून ते समृद्ध असून पूर्ण शाकाहारी आहेत. ते स्वत:ला सत्पंथी म्हणवितात.

काहींच्या मते अयोध्येतून मथुरा व तेथून सुमारे २००० वर्षापूर्वी ते मा खाडमार्गे गुजराथेत गेले. (कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, ले.- डॉ. सिंह पृष्ठ ६१ पहा).

स्कंधपुराण, सह्याद्रि खंड, अध्याय ३० श्लोक, ८ ते १४ तसेच, स्कंधपुराण, सह्याद्रि खंड, अध्याय ३३, श्लोक १६४ ते १६६ तसेच, स्कंध पुराण, सह्याद्रि खंड, अध्याय ३० ते ३४ यात कूर्मकुलाचा उगम अभ्यसनीय आहे.

डॉ. रामसिया सिंह, पृष्ठ ६३ वर चंद्रवंशाबाबत लिहितात की,- कश्यपाचा पुत्र अत्रि, अत्रिचा पुत्र, चंद्र(सोम) (त्यापासून चंद्रवंश सुरू झाला.) चंद्राचा बुध, बुधाचा पुरुरवा असा कूर्मी क्षत्रियांचा चंद्रवंश दिले आहे.

जेव्हा गंगा-यमुना दुआबात राजपुतांनी सत्ता प्रस्थापिली तेव्हा लववंशी लोक काही लाहोर तर काही गुजराथेत गेले. या अगोदरही काही सूर्यवंशी राणा क्षत्रिय नेपाळात राज्य करू लागले.

कूर्मचा पुत्र कौर्मि. देशी भाषात कूर्मी, कुनबी उच्चारला गेला. कवी पंडित कृष्णदत्त ने कवी

बिहारीलालच्या सतसई नामक ग्रंथातील दोहा क्र. ६१३ ची कवितारूपी टीका केली. त्यात भूतपर्व महाराज सवाई जयसिंग ला 'कुरम' जातीचे म्हटले आहे. उदा. - 'कुरम सवाई जयसिंह के अभंग जगमगत । दिनेश को सो तेज अंगअंगमें इत्यादि ।'

येथे 'कुरम' हा शब्द 'कूर्म' पासून व्युत्पन्न झाला, व राजपुतांचा उगमही कूर्मी लोकातूनच झाल्याचे सिद्ध होते.

भक्त कवी नामादासनेसुद्धा 'भक्तमाल' नामक आपल्या ग्रंथात इतिहासप्रसिद्ध पृथ्वीराज चौव्हानला कूर्म म्हणून संबोधिल्याचे श्री.डॉ.सिंह यांनी पृष्ठ ५६ वर लिहिले आहे. पान ५७ वर चंदवरदाई या दरबारी कवीनेही कुरमराज म्हणजे कुणबी राजा म्हणून पृथ्वीराज चौहानला गौरविले आहे. पृथ्वीराजाचा बहनोई पज्जून हाही कूर्मी जातीचा असल्याचे श्री. वल्लभ मनीराम शर्मा ह्या त्यांच्या पुरोहिताने 'दैवज्ञ विनोद' नामक ग्रंथात दिल्याचेही डॉ.सिंह नोंदतात.

मनुने स्पष्ट म्हटले की, - "जन्मना जायते शूद्रा। संस्कारात द्विज उच्यते। म्हणजे जन्मताच प्रत्येकजण शूद्र असतो. पण नंतर गुण व कर्म संस्काराने त्यास वर्ण प्राप्त होतो. या आधारेच क्षत्रिय कुलोत्पन्न विश्वामित्र, वेश्यापुत्र जाबाल, वैश्यकुळीचा वसूकरण, व तुलाधार, शूद्र कुलोत्पन्न कवध, ऐलुष, चांण्डाल कुलोत्पन्न मातंग आणि धर्मव्याध, दासीपुत्र, कक्षीवान आदी लोक विद्याबलाने ऋषीपदी गेलेत.

पाराशर ऋषि चाण्डाल कन्यापासून जन्मला, व्यासाचा जन्म केवट (धीवरकन्या) कन्येपासून झाला, तर वशिष्टाचा जन्म वेश्यागर्भातून झाला तरी ते तपाने सर्व ऋषीपदी पोहोचले. म्हणूनच नववा अवतार मानलेले गौतमबुद्ध म्हणतात की, जन्माने नव्हे तर कर्मानेच माणसास वर्ण प्राप्त होतो. कूर्मींच्या क्षात्रकर्मामुळेच त्यांना क्षत्रिय वर्ण मिळाला होता.

या क्षत्रियात स्कंध पुराण, सह्याद्रि खंड, अध्याय २७, श्लोक १७,१८ व १९ मध्ये सूर्यवंशी क्षत्रियांची एकूण १२ गोत्रे वर्णिली आहेत. उदा.-

"भारद्वाज: पूतमाक्षो वशिष्ठ: कश्यपस्तथा ॥१७॥
हारीत: बुद्ध विष्णुश्च तथा ब्रह्मा जनार्दन: ।
सौबल: कौटिमश्चैव माण्डव्य: कौशिकस्तथा ॥१८॥
विश्वामित्र ऋषि श्रेष्ठो द्वादषैते प्रकीर्तितत: ॥१९॥"

अर्थात भार द्वाज, पूतमाक्ष, वशिष्ठ,कश्यप, हरित, बिष्णू, ब्रह्मजनार्दन, सौबल अथवा सौतन्य, कौटिम अथवा कौंडिन, मांडव्य, कौशिक व विश्वामित्र हीच सूर्यवंशाची मूळ बारा गोत्रे आहेत.

तसेच, स्कंध पुराणात चंद्रवंशीय क्षत्रियांची २५ गोत्रे सांगितली. महाराष्ट्र कुल वंशावळीतील पुढील श्लोक पहा :-

सूर्य वंशोद्भवानाहि गोत्राणि द्वादशैवहि ॥
पंचविपति सोमानां गोत्राणि मुनिरबुवीत ॥

लेवा पाटीदारात चंद्रवंश नसल्याने ती २५ गोत्र सूची गाळत आहे. जिज्ञासुंनी स्कंधपुराण, सह्याद्रि खंड, अध्याय ३० मधील, श्लोक २७ ते ३५ मध्ये पहा.

प्रस्तुत लेखकाने आपले लेवा परिवार या अ.भा.लेवा महासंघाचे त्रैमासिक मुखपत्राचा तिसरा वर्धापन दिन विशेषांकात सन १९९४ मधील अंकात, पृष्ठ ४५, ४६, व ४७ वर लेवा पाटीदारांची १ वशिष्ठ, २ भारद्वाज, ३ विश्वामित्र, ४ मारीच म्हणजेच काश्यप.५ कौडण्य, ६ भार्गव, ७ गौतम, ८ पाराशर, ९ मार्कंडये, १० अंगीरा, ११ अगस्ती, १२ शृंग, १३ शांडिल्य, १४ लोकाक्ष ही १४ गोत्रे संशोधनपूर्वक दिली आहेत. याशिवाय आणखीही काही गोत्रे रूढ झाली आहे, पण खानदेशात गावोगाव फिरून उर्वरित गोत्र संशोधनाचे अभावी ते अपूर्ण राहिले याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. पुढील आवृत्तीत संपूर्ण संशोधित गोत्र-सूची दिली जाईल.

तूर्त माझे मित्र श्री.वासुदेवराव एच.पाटील इंदूरकरांनी 'लेवा परिवार त्रैमासिक', वर्ष २, अंक ३ सप्टेंबर ते नोव्हेंबर १९९२ चे अंकात, पृष्ठ १० व ११ वर दिलेली गोत्रसूची अशी :-

१ गौतम, २ शांडिल्य, ३ कोकाक्ष (माझ्या मते ते लोकाक्ष असावे), ४ भारद्वाज, ५ कश्यप, ६ काळंकी, ७ वशिष्ठ, ८ भृशुंडि, ९ वामदेव, १० गंधर्व, ११ भृगू उर्फ भार्गव, १२ भृंगी, १३ अग्नी, १४ वाल्मिकी, १५ लोमेश, १६ दुर्वासा, १७ ब्रह्मचारी, १८ मार्कंडेय, १९ बकदालभ्य, २० कौंडिण्य, २१ कपिल, २२, अगस्ति, २३ गर्ग-गर्गाचार्य, २४ विश्वामित्र, २५ मांडव्य, २६ देवमुनि, २७ पौलस्त्य, २८ लोकम्, २९ भार्गव, ३० याज्ञवल्क्य, ३१ गोकर्ण, ३२ वल्लभश्री, ३३ शृंगी, ३४ कृष्ण, ३५ ब्रह्मर्षि, ३६ अंगिरस, ३७ अंगिरा, ३८ शंख, ३९ विमजाय आदी सव्वातीन डझन गोत्रांची सूची दिली आहे. ती जिज्ञासूंनी पहावी.

'मराठी आडनावे' लेखक - डॉ.रामगोपाल सोनी, सन १९९१ या प्रबंधात, पृष्ठ १८ वर Surname म्हणजे कुळनाव, आडनाव, Clan म्हणजे गोत्र, Totem टोटम (कुळवाद) किंवा देवक या अर्थी हे शब्द वापरले आहे. अन्य शब्दात सांगायचे म्हणजे देवतेची कल्पना करून त्याची पूजा करणे म्हणजे टोटम होय. हेच देवक होय. या ग्रंथात डॉ.सोनी, पृष्ठ ५, परिच्छेद २ मध्ये लिहितात की,- **पैतृक नावाच्या प्रयोगानंतरही जेव्हा व्यक्तीच्या परिचयात अडथळा येतो तेव्हा गोत्र वापरतात.** उदा.- विजय नारायण भारद्वाज (गोत्रनाम), तसे पाहता गोत्र परंपरा बरीच प्राचीन असून ब्राह्मण, क्षत्रिय वगैरे जातीत धार्मिक संस्काराच्या वेळी गोत्र-प्रवरांचा उच्चार करावा लागतोच. परिचयात्मक दृष्टीने आडनावांचा प्रयोग अर्वाचीन आहे. **भारतात सहाव्या शतकानंतर ब्राह्मणांचे वर्गीकरण केले.** (प्राचीन भारतीय अभिलेखोंका अध्ययन ले.,उपाध्याय, पृष्ठ ९२ पहा.) गोत्रांधारे वर्गीकरणांची प्रथा आजही विद्यमान आहे. श्री. वि.का. राजवाड्यांनी 'भारतीय आर्यवंश गोत्रे ब्राह्मणांची' शीर्षकाचे लेखात महाराष्ट्रीय आडनावांची उत्पत्ती गोत्रातून मानली आहे. त्यांच्या मतानुसार ऋषिनामापासून गोत्रे बनली. गोत्रापासून कुळे बनली व हीच कुळे कालांतराने उपनामे (आडनावे) बनलीत. त्यांनी ३९१ आडनावांची उत्पत्ती गोत्रनामापासून मानली. (भारत इतिहास संशोधन मंडळ, प्रथम संमेलन वृत्त १८३५, पृष्ठ ५ ते ११ पहा).

गोत्रमूलक आडनावे, गोत्राद्वारे व्यक्तिपरिचय स्पष्ट करतात. मराठी व्युत्पत्ती कोश ले.कृ.पा.कुलकर्णी, पृष्ठ १७, ६९, वर मराठी आडनावांना अर्धनामन् व आदिनामन् म्हटले आहे. गौडा हे कुळनाम किंवा आडनाव नसून पद्नाम आहे. गौडा म्हणजे गाव प्रमुख किंवा पाटील होय.

डॉ.सोनी, पृष्ठ २६ वर लिहितात की, गोत्र ऋषी विशिष्ट कुळाचे मूळ पुरुष मानले जातात. **गोत्राचा सामान्य अर्थ कुळाच्या मूळ पुरुष असा आहे.** श्री. खंडेराव अप्पाजी मोरे यांच्या 'क्षात्रधर्म' ग्रंथात पृष्ठ ११५ वर दिले की, "लेवा पाटील क्षत्रिय सूर्यवंश यांचे वशिष्ट, ब्रह्मदेव, मरिची, कश्यप, सूर्य, मनु, ईक्ष्वाकू, सगर, भगीरथ, अंबरिष, रघु, अज, दशरथ, राम, लव-कुश ह्या वंशावरून विष्णु किंवा ह्या वंशातील कोणत्याही श्रेष्ठ पुरुषाचे नावाने गोत्र असावे, पण पृष्ठ ११५ वर लवाचे वंशजांना लेवे किंवा रेवे व कुशाचे वंशाला कडवे किंवा कच्छवे किंवा कुळंबी म्हणतात. वरील जातीचे वंशगोत्र (मूळ गोत्र) वेश्यागर्भातून जन्मलेला वशिष्ठ असल्याने तो प्रभू रामाचे कुळाचा मूळ पुरुष म्हणणे हास्यास्पद नव्हे तर शुद्ध वेडेपणाचेच होय. हे सर्वथैव असत्य आहे. म्हणून जन्मवंशाऐवजी विद्यावंशाचा मूळ पुरुष म्हणजे उपनयन संस्कार करणारा गुरू म्हणून वशिष्ठ गोत्र मानावे लागेल. व गुरूपासून विद्यावंश मानून त्याचे नावे गुरूश्रद्धेपोटी कुळगोत्राचा उच्चार करावा लागेल. पण महाराष्ट्र शासन राज्य गॅझेटियर महाराष्ट्र भूमि व लोक संपादक -डॉ. कि.का. चौधरी मराठी आवृत्ती १९९६, पृष्ठ २७८, परिच्छेद ३ मध्ये स्पष्ट म्हटले आहे की, "गोत्र पद्धती प्रामुख्याने ब्राह्मणापुरतीच निर्माण झाली. पुढे ही ब्राह्मणी पद्धती म्हणूनच टिकली. उत्तरेकडील जातीवर तिचा फारसा प्रभाव पडलेला दिसत नाही."

इसवी. सनापूर्वी काही शतके गोत्राचे रूपांतर बर्हिविवाही कुळात झाले. "गोत्र म्हणजे एकाच पुरुषापासून निर्माण होत गेलेल्या सर्व पिढ्यांच्या सर्व व्यक्तींचा समूह." असे पुरुष सात असून आठवा अगस्ती मानतात. एकाच गोत्रात विवाह होत नाही, यातूनच पुढे गोत्रसादृश्यावरून रक्तसंबंध किंवा आनुवंशिकता प्रस्थापित करण्याची पद्धती रूढ झाली असावी. जी.एस. धुर्वे यांच्या मते इ.सन. ८०० च्या सुमारास ही प्रक्रिया पूर्ण झाली असावी. पृष्ठ २०९ मध्ये नवव्या ओळीत म्हटले आहे की, - महाराष्ट्रात

ब्राह्मण जातीत विवाहप्रसंगी वर व वधूचे गोत्र एकच असू नये असे म्हटले आहे.

महाराष्ट्र शासन राज्य गॅझेटियर, जळगाव जिल्हा, मराठी प्रत सन १९९४, संपादक : डॉ.कि.का चौधरी, पृष्ठ १८४, लेवा पाटीदार समाजाची माहिती देतांना शेवटच्या ओळीत डॉ. चौधरी लिहितात की, लेवा पाटीदार समाजातील लोक लग्न जमवितांना गोत्रेपेक्षा कुळांना अधिक महत्त्व देतात. सकुळ विवाह तसेच, मावस बहीण, आतेबहीण व मामेबहिणीशी विवाह निषिद्ध मानतात. सगोत्र विवाह करीत नाहीत. परंतु, निषिद्धही मानत नाही, बहुतेक आडनावे काही अपवाद सोडून कुळे असतात. अपवाद :- पाटील, महाजन, चौधरी, देशमुख, वाणी व राणे ही वतनावरून पडलेली आडनावे होत.

मराठी भाषिक लेवा पाटीदार हे सैंधव संस्कृतीजन्य हिंदू धर्मीय कुणबी क्षत्रिय आहेत. त्यांचा धर्म हिंदू, वर्ण क्षत्रिय, जात कुणबी, उपजात उर्फ पोटजात लेवा कुणबी किंवा लेवा पाटीदर किंवा पाटोदार असून वंश सूर्यवंश, दैवत महादेव, पार्वती किंवा पार्वतीचे पावागडची महाकालीरूप पार्वती असून यांचे जात-पंचायतीचे ठाये पाडळशे, किंवा दाताळा व प्रमुख शाखा सापदेकर, आडनाव कुळ, गोत्र, कुळदैवत, देवक, वेगवेगळी आहेत.

सपिंड, सगोत्र व सप्रवर गटात लग्न करणे वैद्यकीयदृष्ट्या इष्ट नाही. वंश म्हणजे उदग्र वाढणारी व वारस कोण हे सांगणारी, तर कुळ म्हणजे पितापुत्र संबंध दर्शवून वारसा सांगणारी व्यवस्था होय. महाभारत काळात ब्राह्मणांनी गोत्र-पद्धती स्वीकारली. गॅझेटियर, पृष्ठ २०९ प्रमाणे ब्राह्मण ग्रंथांच्या व उपनिषदांच्या काळात यज्ञ यागादि कर्मकांडाकरिता किंवा विद्या शाखेचे निर्देशक म्हणून स्वीकारलेल्या गोत्र संबंधांचा सूत्रकाळात आनुवंशिकतेशी संबंध जोडला गेला.

प्रवर :- एकाच गोत्रातील ज्या कुटुंबात पूर्वजांचे नामस्मरण करून प्रार्थना करतात व ज्या पूर्वज ऋषींची यज्ञात आराधना करतात त्याचे नामोच्चारण व पुण्यस्मरण करणारी कुटुंबे म्हणजे प्रवर." एकूण ४९ प्रवरे आहेत. कोणी३, कोणी ५ असे कुटुंबाचे उपप्रमुख उर्फ प्रवर मानतात. **प्रवरे फक्त ब्राह्मणांमध्येच आहेत. क्षत्रिय, वैश्य व शूद्रांना परंपरेने प्रवरे मानने आवश्यक नाहीत असे महाराष्ट्र राज्य गॅझेटियर भूमि व लोक संपादक डॉ.कि.का. चौधरी, पृष्ठ २०९ वर म्हटल्यामुळे लेवा पाटीदरांना त्याची गरज नाही. ब्राह्मणात सप्रवरात विवाह वर्ज्य मानतात.**

पिंड :- पिंड म्हणजे भाताची मूद. सपिंड म्हणजे जवळचे नातेवाईक. हे जवळचे नातेवाईक मृत व्यक्तीला पिंडदान करतात म्हणून ते सपिंड समजले जातात. **समान रक्तगटात विवाह केल्याने वंशात गुणवत्ता घटते. संतती सदोष असू शकते. म्हणून सपिंड विवाह वर्ज्य होय.** दक्षिण भारतात मामे-बहिणीशी अधिक विवाह होतात.

पूज्य मोरे यांच्या 'क्षात्रधर्म' ग्रंथात, पृष्ठ २३ वर भारतात प्रचलित असलेले क्षत्रिय सूचीत दिलेल्या ४३ क्षत्रिय शाखेपैकी २४ क्रमांकांची लेवे क्षत्रिय व २५ क्रमांकाची कच्छवे क्षत्रिय जात दिली आहे. **ही जात क्षत्रिय आहे म्हणून हिचे जातीकुळ दैवत क्षत्रियास प्रेरक अशी पावागडची सशस्त्र माता महाकाली आहे.** इतरांप्रमाणे हाती कुंदेंदु, वीणा, पुस्तक-धारणी सरस्वती किंवा लाडू, मोदक, फुले युक्त शुभाशीर्वाददायी मोर वा मूषक वाहक दैवता ऐवजी **सिंहवाहिनी बहुसंख्य हातात शस्त्रास्त्रे असणारी शौर्यप्रद दैवते क्षत्रियांची असतात.**

मराठी आडनावे, या शोध प्रबंधात, डॉ. सोनी, पृष्ठ ६४ वर भोसले कुळाचा उगम शोधताना डॉ. सोनी लिहितात की, सूर्यवंशात **प्रभू रामचंद्रानंतर १२५ वा राजा भोसाजी हा उदयपूरच्या गादीवर बसला.** त्या भोसाजीनंतर आजपर्यंत अंदाजे १५ पिढ्या झाल्या. म्हणून १२५ + १५ = १४० पिढ्या प्रभू रामचंद्रानंतर आजपर्यंत झाल्या हे सिद्ध होते. कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, ले.डॉ. रामसिया सिंह- या ग्रंथात, पृष्ठ ४१, आचार्य चतुरसेन-लिखित भारतीय संस्कृतीच्या इतिहासात उर्वरीत माहिती पहा.

प्रकरण ९

कुलमी, क्षत्रिय, लेवा पाटील, देशमुख, चौधरी, महाजन कुटुंबनायक पदपरिचय

कुलमी :

इटारसी नागरिक कुर्मी महिलाओंका एक समाज शास्त्रीय अध्ययन हा बरकत उल्लाह विद्यापीठ भोपाळच्या समाजशास्त्र विभागात आचार्य (पीएच.डी) उपाधी हेतु तारीख ५ जुलै १९९३ ला डॉ. ज्ञानेंद्र गौतम रीडर यांचे शोध निर्देशानुसार सादर केलेल्या शोध प्रबंधात कु.सीमा सचान म्हणतात की,- कुन्बी, कुलंबी, कणबी, कूर्मी ह्या समानार्थी शब्दात उत्तरभारतात कूर्मी शब्द अधिक प्रचारात आहे.

कु = पृथ्वी व रमी = रमणारा. अर्थात ती व्यक्ती की जिचे कर्मक्षेत्र भूमि आहे.

कुर्म = सृष्टीचा आरंभ करणारा कश्यप ऋषी, विष्णुचा अवतार, कुर्मनावाचा एक ऋषी किंवा सूर्य.

पंडित लक्ष्मीशंकर मिश्रा "कूर्म सिद्धांत विमर्श: ने हरिवंश पुराणाच्या ५३ व्या अध्यायात १४ व १५ क्रमांकाच्या श्लोकात याचा संदर्भ लागतो, त्यात **ब्रह्मदेवाने कश्यपाला पुत्र मानले. तसेच, शतपथ ब्राह्मण काण्ड ७ मध्ये "कश्यपो वे कुर्म:" अर्थात कश्यपच कूर्म आहे असे मानले. यावरून कुर्मपासून कुर्मवंशाची उत्पत्ती हरीवंश पुराण मानते. कश्यप काळात पंचनद प्रदेशात पंचजन उजीवीकेसाठी कृषीकर्म करीत. यावरून कृषीकर्म करणाऱ्या कूर्मवंशी लोकांना कुरमी म्हणू लागले.**

क्षत्रिय :

आर्य वसाहत क्षेत्राचे रक्षण करणाऱ्या लढाऊ सैनिक जनाला क्षत्रिय म्हणू लागले.

क्षेत्राचे परिरक्षक ते क्षत्रिय. हे शूर, त्यागी असत. गुण व कर्मानुसार वर्ण ठरत असताना समाजाचे नेतृत्व घेऊन संरक्षणार्थ सैनिक कर्म करणाऱ्या मूल गुणप्रवृत्तीनुसार कार्यरत लोकांना क्षत्रिय म्हणू लागले.

लेवा पाटीदार वंशाचा उगम आवश्यक वेळी क्षात्र कर्म व इतर वेळी कृषी कर्म हा असल्याने ते प्रारंभापासून क्षत्रिय गणले गेले.

लेवा :

लवापासून झालेल्या वंशाला लेवा असे म्हणतात. अयोध्यानिवासी इक्ष्वाकुं वंशीय सूर्यवंशी लवाने पंजाबात रावीतीरी नवनगरी वसविली. लवाचे नावावरून तीस लाहोर म्हणत. हल्ली पाकिस्तानात लाहोर रावी नदीतीरी आहे. हे लववंशाचे मूळ क्षेत्र होय. लववंशाने पंजाबचा जो भाग व्याप्त केला होता त्यास लेयाँ प्रदेश म्हणतात, व तेथील लोकांना अजूनही लेयाँ (म्हणजेच लेवा) म्हणतात. काहींच्या मते सूर्यवंशात ४० वे पिढीत लवाचा जन्म झाला, व काहींच्या मते **सूर्यवंशात ६६ वे पिढीत लवाचा जन्म प्रभू रामास सीतेपासून झाला.** शरयूनदीचे उत्तरेस ह्याचे राज्य असून श्रावस्ती त्याची राजधानी होती.

पंजाब जिंकल्यानंतर लेवावंशाचा लेयाँप्रदेश पुढे इराणी गुर्जर टोळीने जिंकला, व गुर्जरामुळे त्या भागास 'गुजरात सुभा' हे नाव मिळाले. सौराष्ट्रात आलेले लेवा गुर्जर, लेवा कुर्मी याच भागातून निघालेत.

लवानंतर ५५ पिढ्या तेथे नांदल्यात. ५५ वे पिढीतील सुमित्रापर्यंत तेथे राज्य केले, व लवानंतर ५९ व्या पिढीतील कनकसेनाचे कारकीर्दीत इ.सन १४४ मध्ये हे लेवा पंजाबातील गुजराथ व लेया

प्रांताहून सौराष्ट्रात आले. त्यामुळे सौराष्ट्राला 'गुजरात' नाव मिळाले. मात्र यांनी इ.सन पूर्व ७८ मध्येच पंजाब सोडला होता.

पाटीदार :

मराठी आडनावे या प्रबंधाचे लेखक- डॉ. रामगोपाल सोनी यांनी पृष्ठ २०८ वर पाटीदार शब्दाची व्युत्पत्ती पुढीलप्रमाणे दिली आहे- पाटीदार = पट्टीचा अधिकारी; पाटी+दार (म.+फा.), संस्कृत पट्टिका > पट्टिय (प्रा.) > पाटी, दार-अधिकारी पट्टीचा अर्थ शेत किंवा प्रदेश असाही आहे. तसेच, कापडाच्या चिरोटीलासुद्धा पट्टी म्हणतात. पण पाटीचा अर्थ लिहिण्यासाठी वापरण्यात येणारी पाटी किंवा शेणाने भरलेली शेणोडी असाही आहे. केळाची किंवा फळांची पाटी असेही म्हणतात.

भगवान कृष्णाला जन्मत:च यमुनेच्या पुरापार करताना ज्या टोपलीत ठेवले तीही पाटीच होय.

महाराष्ट्र सारस्वत पुरवणीसह ले.कै.वि.ल.भावे आवृत्ती ४ थी पृष्ठ २१५- पाटीचा उपयोग पुढीलप्रमाणे पहा :- "प्रथम लोक वसाहतीस येत ते 'पाटी'चे असे म्हणवीत; व पहिल्या 'पाटी'ची दहापाच, दहापाच कुटुंबे असत." शके १४०० (सन.१४७८ चे नंतर) असे काही लोक महाराष्ट्रात आले. कायमचे येऊन राहू लागले असे कै.भावे म्हणतात. तसेच, कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, ले.-डॉ.पटेल, पृष्ठ ५५, परिच्छेद २ रा मध्ये- उस लढाईने असा खा के रूसात पाटी के धींगाजी पटेल तथा कर्णाजी पटेल कूर्मीयो मे प्रमुख थे। यात 'पाटी' शब्दाचा उपयोग टोळी किंवा शाखा या अर्थाने दिसतो. तसेच, पृष्ठ ५९ वर, परिच्छेद ५३ मध्ये पहा, "तब एक पाटी के नेता पटेल शिवसिंहजी थे।" पृष्ठ ५६ वर इ.सन १०९४ मध्ये सिद्धराज जयसिंहाने माळव्यातील ४३ कुटुंबांना चरोतर तथा दशकोशी भालच्या उपजाऊ जमिनीचे मालक बनविले. (कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, ले.-पटेल, पृष्ठ ५६ पहा). तसेच, कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास ले.डॉ.पटेल, पृष्ठ १८५, परिच्छेद ५ वा पहा :- **"महम्मद बेगडा के शासनकालमे गुजराथ का किसान कणबी से पाटीदार बना।** यद्यपि उसने कृषि का त्याग नही किया। पत्ती याने कि पांती - भाग, हक। **पत्तीदार होनेसे किसान अब जमीनका मालिक बना और पत्तीदार एवं पाटीदार कहलाया।"**

पट्ट म्हणजे जमिनीचा तुकडा किंवा पट्टा. त्यावर शासनाला शासनाचा जमीन कर म्हणजे पट्टी किंवा भूमिपट्टी वसूल करून देणारा. Tax collecter पट्टी म्हणजे कर, जसे घरपट्टी, पाणीपट्टी, भंगीपट्टी तसेच, भूमीपट्टी. ही पट्टी देणारा पाटीदार या शब्दात पट्टीपासून पाटीशब्द बनला. व दार हा फारशी प्रत्यय देणारा या अर्थी लागून पट्टीदार > पाटीदार शब्द बनला.

पाटील :

पाटलाचा अर्थ मुख्य अथवा गाव प्रमुख असा आहे. 'मराठी आडनावे', ले.डॉ.सोनी, पृष्ठ ६९ वर दिले की,- जयसिंहाच्या मांधाता ताम्रलेखात जनपदाबरोबर 'पट्ट-कील' शब्दप्रयोग झाला. मराठीत उत्कीर्ण आगाशी शिलालेखात 'पटकील' व नागाव शिलालेखात 'पाटैलृ' असे रूप आहे. पट्टचाचा अर्थ प्रमाणपत्र, सनद, लेख व कीलचा अर्थ खिळा. अशा प्रकारे पट्टकीलचा अर्थ खिळ्याने उत्कर्णित प्रमाणपत्र असा आहे. या पट्टकिलाच्या स्वामीला पट्टकील अथवा पाटील म्हणतात.

भाषाभेदामुळे संस्कृतात पटकील, प्राकृतात पाट्टिल, देशी प्राकृतात 'पट्टहल'. गुजराथीत व हिंदीत 'पटेल' सिंधीत पटेलु असा शब्द व्युत्पन्न झाला. स्थानभेदामुळे विदर्भात पाटील, कोल्हापूरकडे चौधरी, कोकणात चौगुले असा पर्यायी शब्द निवडला.

पाटील शब्दाची व्युत्पत्ती पतिकुल. 'पटु'- हुशार. तसेच, पट्ट=प्रमुख यापासून लावतात. बरेचदा गाव वसविणारा नेताच गावचा पाटील बनत असे. पाटील हे गावमान्यतेमुळे बनत. म्हणजे

पाटील हे शासनप्रदत्त पद नसून ते स्वअर्जित पद होते पूर्वकाळी गुण कार्यावर पाटील बनत असे, पण पुढे ते पद वंशपरंपरागत झाले, व पाटील जणू गावचे राजेच बनले, व त्यास राजमान्यता असे. बऱ्याचशा सरदारांनी अनेक पदे प्राप्त असूनही 'पाटील-पद' सोडले नाही. उदा.- भोसले, दाभाडे, पवार, गायकवाड, शिंदे, होळकर यांनी राज्ये मिळविलीत, पण पाटिलक्या सोडल्या नाहीत. महाप्रतापी महादजी शिंद्यांना पाटील म्हणवून घेण्यात भूषण वाटे असे गावगाडा पृष्ठ ३२ वर पहा. गावचे संरक्षण करणे. यासाठी पाटलापाशी काही घोडेस्वार व हत्यारबंद शिपाई देखील राहत असत. असे 'गावगाडा' ग्रंथात दिले आहे.

गावच्या सीमेतील कृषीयोग्य जमिनी व्यतिरिक्त, कुरण, पडित जमिनीवर पाटलाचा अधिकार असे. पगार, चांभाराकडून (पादत्राणे) दोन जोड, महाराकडून चामडे, तांबोळ्याकडून रोज १३ पाने, सन्मानसूचक पगडी, रसाचा घडा (मडकी) इत्यादी घेण्याचा अधिकार पाटलास असे. शासकीय उत्पन्नात त्याचा काही टक्के (१ ते ५ पर्यंत) हिस्सा असे. ह्या अधिकारास पाटील-पासोडी म्हणत असे. श्री.के.बी. देशमुख, म.क्ष.इ., पृष्ठ १२६ वर पहा. आदी २८ अधिकार व मान तथा उत्पन्न कर मिळत असे, आदी सविस्तर माहिती, मराठी आडनावे, ले.डॉ.सोनी, पृष्ठ ८९,९०,९१ व ९२ पहा.

लेवा पाटील जातीला आपल्या कर्तबगारीवर पाटिलक्या मिळाल्यामुळे या **कुणबी समाजाचे शाखेस लवाचे वंशज म्हणून लेवा व भूमिपट्टीचे मालक म्हणून पाटील म्हणत असत. यावरून लेवापाटील हे जातीचे नाव बनले.** लेवा कुणबी, लेवा पाटीदार, लेवा पाटील, पाटीदार, कुणबी, रेवा, रेवा कुणबी आदी नावांनी हा समाज ओळखला जातो, पूर्वी गावच्या पाटलांना फौजदारी अधिकार प्राप्त होते. ('मराठी आडनावे', लेखक डॉ. सोनी, पृष्ठ १०५ पहा.) बहुतेक लेवा पाटीदार वस्तीचे गावात लेवा पाटीदारच पाटील असायचा.

देशमुख :

देशमुख म्हणजे देशाचा मुख्य, देश म्हणजे परगणा 'गुप्त व कलचूरी' लेखात देशाचे क्षेत्रफळ ३० ते ४० वर्ग मैल सांगण्यात आले आहे. देशमुखाचे समनार्थी शब्द देसाई व नाडगौडा हे आहेत, डॉ.सोनींच्या मते श्री शिवकालात देशमुख परगण्यात वतनदार अधिकारी होता. देशाच्या (परगण्याच्या) व्यवस्थेचे संपूर्ण उत्तरदायित्त्व त्याच्यावर असायचे. देशमुख एकप्रमारे क्षेत्राचा राजाच असायचा. राजास धान्यादी वसुलात देशमुखामार्फतच होई. देशमुख **परगण्याचा शाश्वत अधिकारी होता. व त्याचे पद अबाधितपणे चालत असे. राज्ये बदलायची पण देशमुखी बदलत नव्हती.**

देशमुखाचे मुख्य कार्य परगण्यात नव्या वस्त्या वसविणे, शेती करविणे, कर वसूल करणे, फेरीवाले, धंदेवाईक, बारा बलुतेदारांचे संरक्षण व संवर्धन करणे. देशमुखाचा एक स्वतंत्र शिक्का(मोहर) असे, व त्यात विशेषत: नांगराचे चिन्ह असे. परगण्यात कोणाला इनाम द्यावा, कोणाला मिराशी द्यावी हा निर्णयही देशमुखच घेत. त्याने हाताखाली निरनिराळे अधिकारी नेमावे. देशभर गस्त द्यावी. पदरी चाकर, प्यादे, थोडे सैन्य व देशमुखी सत्ता चालवावी. इंग्रजी शासनकाळात या वतनदार देशमुखांचे अधिकार समाप्त झाले. इ.सन १८६३ मध्ये देशमुखादी वतनदार अधिकारविहिन झाले. सन १८७० मध्ये 'इनाम कमिशनने'इनामी जमिनी शासनाने ताब्यात घेतल्या. जुने ताम्रपट व सनदा परत घेऊन वतनदारी हक्क संपविले व देशमुखांना पेन्शन देऊ लागले. या पेन्शनीस (निवृत्ती वेतनास) 'लवाजमा' व अशा अधिकार विहिन देशमुखांना Ex-Pargana Officer म्हणजेच 'भूतपूर्व परगणाधिकारी' म्हणण्यात येऊ लागले.

पूर्वी देशमुखास पाटलापेक्षा जास्त इनाम, हक्क व मानपान मिळत असे. देशमुखाचे हक्कास 'रूसूम' म्हणत. देशमुखास परगण्याची पूर्ण वसुली व कृषी यांचा विसावा भाग मिळत असे. गावगाडा ग्रंथात, पृष्ठ ३७ वर पहा. गावगाड्यानुसार देशमुखास बरेच हक्क होते. खरे पाहता देशमुख

देशनायकच होते. आजही या आडनावात गतकाळचे वैभव व इतिहास लपलेला आहे. अशा प्रकारची माहिती डॉ.सोनी 'मराठी आडनावे' ह्या ग्रंथात. पृष्ठ ९५,९६ व ९७ वर दिली आहे.

लेवा पाटीदारांचे पूर्वी दोन परगणे होते. खानदेश परगणा आणि विदर्भ परगणा असे वेगवेगळे देश किंवा परगणे होते. प्रत्येक परगण्याला वेगवेगळी भोरगाव पंचायत असे. या परगण्याचे समाज-प्रमुखांना शासनाकडून देशमुखी अधिकार मिळाले होते. खानदेशाच्या लेवा परगण्याचे परगणाप्रमुख म्हणजे देशमुख यावलचे थोरगव्हाणे देशमुख हे होते, तर विदर्भाच्या लेवा परगण्याचे परगणाप्रमुख दाताळा-दुधलगाव बुद्रूक येथील वराडे आडनावाचे वतनदार देशमुख होते.

मध्यंतरी काही मतभेद उद्‌भविल्यामुळे खानदेशाच्या लेवा परगण्याचे यावलचे थोरगव्हाणे देशमुख यांनी लेवा समाज मान्यता गमाविल्यामुळे त्यांचे त्या परगण्यावरील नेतृत्त्व गेले. व ते खानदेशातील फक्त थोरगव्हाण शाखेचेच प्रमुख राहिलेत, व खानदेशातील सावदेकर लेवाशाखा, नवघरे व कंडारकर ह्या तीन शाखांचे परगण्यातील जातपंचायत प्रमुख पद भोरटेक व नंतर पाडळशे येथील पोलीस पाटलाकडे गेले. पण हा बदल आंग्लाईत झाल्याने पाडळशाच्या पोलीस पाटील कुटुंब नायकांना देशमुखी मिळाली नाही. याउलट विदर्भातील लेवा परगण्याचे पंचायत-प्रमुख दाताळा-दुधलगाव बुद्रूक येथील वऱ्हाडे येथील देशमुख कुळाने विदर्भातील जनसामान्य लेवाजातींचा विश्वासदर्शक पाठिंबा कायम ठेवल्यामुळे त्या दाताळा दुधलगाव बुद्रूक ठायाचे वराडे कुटुंब नायकाकडे विदर्भवासी लेवा परगण्याचे नेतृत्त्व करणारे जातपंचायतीचे कुटुंबनायक हे प्रमुखपद व देशमुखी सतत चालूच राहिली व शासनाने देशमुखी वतनाचे विसर्जन केल्यामुळे व लेवा जातपंचायताचे कार्य आंग्लाईत दिवसेंदिवस निष्प्रभ होत गेल्यामुळे भोर पंचायतीचे कुटुंबनायक पद व लेवा परागण्याचे देशमुखी पद ह्या दोन्ही गोष्टी इतिहासजमा झाल्या. आधारादाखल महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्य गॅझेटियर जळगाव जिल्हा १९९४ ची मराठी आवृत्ती, संपादक डॉ.कि.का. चौधरी, पृष्ठ १८३ व खानदेश गॅझेटियर, सन १८८० पृष्ठ ६८, तथा पाडळशे व दाताळा ठायाचे भोरगाव लेवा पंचायत जुने दप्तर पहा.

चौधरी :

डॉ. सोनींच्या मते हा गावातील शासकीय कर्मचारी होता. तो पाटलाचा सहाय्यक अधिकारी होता.

महाजन :

गावामध्ये सभेत उपस्थित असलेली एक सन्माननीय व्यक्ती. पाटलाचे कार्यास सहाय्यभूत कार्य.

लेवा पाटीदार समाजात पाटील, देशमुख, चौधरी, महाजन ही पददर्शक आडनावे त्यातील लपलेला इतिहास स्पष्ट करून दाखविण्यासाठी सविस्तर वर्णन केली.

कुटुंबनायक :

पूर्वी भोरगाव लेवा पंचायतीचे परगणा प्रमुख म्हणून कार्य करणाऱ्या लेवा पाटीदार समाजमान्य प्रभावी व्यक्तीस कुटुंबनायक हे पद असे. विदर्भातील लेवाजात पंचायतीचे प्रमुख पद दाताळा-दुधलगाव बुद्रुक येथील वराडे देशमुख कुळातील प्रभावी व प्रमुख व्यक्तीकडे असे.

तसेच, खानदेशातील भोरगाव लेवा पंचायतीचे परगणा प्रमुख म्हणून कार्य करणारे लेवा पाटीदार यावलचे देशमुख यांचेकडे होते, पण खानदेशातील सावदेकर शाखा, नवघरे, कंडारकर आणि थोरगव्हाणे या चार शाखांपैकी काही मतभेदांमुळे सावदेकर शाखा, नवघरे व कंडारकरांचा त्यांनी विश्वासदर्शक पाठिंबा असलेली समाजमान्यता गमावल्यामुळे ते फक्त थोरगव्हाण शाखा प्रमुख राहिले व उर्वरित तीन शाखांचे कुटुंब नायकत्त्व पाडळशे येथील पोलीस पाटलाकडे आतापर्यंत होते, पण अलिकडे जातपंचायत कार्य निष्प्रभ होत चालल्यामुळे पर्यायान कुटुंबनायकाचे कार्यही इतिहास-जमा होत आहे.

प्रकरण १०

सूर्यवंशी कुलमी क्षत्रिय पाटीदारांच्या पूर्ववृत्ताबद्दलचे पुरावे

'कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास' या ग्रंथाचे लेखन डॉ. मंगुभाई रामदास पटेल, रीडर, गुजराथ विद्यापीठ, अहमदाबाद, (गुजरात) यांनी पाटीदार संशोधन व प्रकाशन ट्रस्ट, अहमदाबाद द्वारा उत्कृष्ट संशोधन केले, व कुलमी पाटीदारांचा इतिहास लिहिला, पण त्यात लव वंशोद्भव लववंश पूर्णपणे दिला नाही.

आपले लेवा परिवार संपादक, श्री. म.ओ. राणे, मुंबई, पृष्ठ ५ वरील श्री. **वासुदेवराव पाटील** (इंदूर) यांनी लिहिलेला 'चतुर्वर्णात पाटीदार वर्गाचे स्थान' ह्या लेखात दुसऱ्या परिच्छेदात लिहिले आहे की,- "रेव्हरन्ड शेरिंग्ज हिंदू ट्राईब एन्ड कास्टस्, व्हॉल्यूम ३, पृष्ठ २५८ व बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम ९, पार्ट १ मध्ये, म्हटले की- रामचंद्र भगवान यांना लव व कुश नावाची दोन मुले होती. लवापासून लेवा व कुशापासून कुशवाह झाले." तसेच, "क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, पृष्ठ ४४ मध्ये, लेखक- श्री. केशवलाल पटेल यांनी लिहिले की, मनुचे चौथे पुत्र दिष्टचे वंशज जनमेजय (महाभारतातील जनमेजय नव्हे) विशालावती (हल्लीचे पंजाबातील व्यास शहर) नगरात राज्य करीत होते. लवाने त्यास हटवून लवपूर वसविले, व ते राज्य आपल्या मुलास दिले. लवानंतर ५५ वा वंशज सुमित्र यास अर्जुनाचा वंशज परीक्षित (द्वितीय) ह्याने हरवून पंजाब जिंकला. **सुमित्र व लेव यांच्यातील ५५ पिढींचा नामक्रम उल्लेख या ग्रंथात आहे.** सुमित्रानंतर चौथी (लवानंतर ५९ वी) पिढीचा कनकसेन पंजाब सोडून राजस्थानमार्गे गुजराथेत आला. कारण, पंजाबात त्याचे राज्य समाप्त झाले होते. सौराष्ट्रात ह्या कनकसेनाने वल्लभीपूर (विजयपूर) वसविले व तिथे आपले राज्य संस्थापिले. (पृष्ठ २०, पाटीदारोंका इतिहास, लेखक- केशवलाल पटेल व पृष्ठ ६८२, उदय पुरोदय, लेखक- भारतेन्दु हरिश्चंद्र).

वायव्य भारतातील गुर्जर प्रदेशातून कनकसेन, त्याचे भाऊबंद व सहयोगी गुर्जर इ.सन. १४४ पासून सौराष्ट्रात येऊन स्थायिक होऊ लागले. त्यामुळे सौराष्ट्राचे नाव गुजराथ झाले असे उत्तरप्रदेश शासकीय हिंदी संस्थानने प्रकाशित केलेल्या 'प्राचीन भारतका भूगोल' पृष्ठ ४७४ वर लिहिले आहे. 'बॉम्बे गॅझेटियर' व्हॉल्यूम १ च्या अनुसार पंजाबात हा लेवा समाज "लेयाँ" या नावाने विद्यमान आहे.

पुण्याच्या माझ्या **एका साहित्यिक मित्रास** विष्णुपुराणाच्या चवथ्या अध्यायात तसेच, **वाल्मिकी रामायणात** (१-७ व २-११०) मध्ये इक्ष्वाकू वंशवेल पहाण्यास सांगितले होते. त्यांनी पाठविलेली इक्ष्वाकू वंशवेल अशी :- १. मरीची, २. कश्यप, ३. विवस्वान, ४. मनु, ५. इक्ष्वाकू, ६. कुक्षी, ७. विकुक्षी, ८. बाण व ९. अनरण्य. १०. पृथू, ११. त्रिशंक, १२. धुंधुमार, १३. युवनाश्व, १४. मान्धातु, १५. सुसंधि, १६. ध्रुवसंधि. १७. भरत, १८. असित, १९. सगर, २०. असमञ्य, २१. अंशूमन, २२. दिलीप, २३. भगिरथ २४. कुकुत्स्थ, २५. रघु, २६. कल्माषपाद, २७. शङ्खण, २८. सुदर्शन, २९. अग्नीवर्ण, ३०. शीघ्रग, ३१. मरू, ३२. पश्रश्रुक, ३३. अंबरिष, ३४. नहुष, ३५. ययाति, ३६. नाभाग, ३७. अज, ३८. दशरथ, ३९. राम, ४० लव व कुश. ही वंशवेल रामायणाधारे त्यांनी मला पाठविली.

शिवाय विष्णूपुराणाधारे चवथ्या अध्यायातून त्यांनी दुसरी वंशवेल पाठविली ती अशी :- मरीची कश्यपाची पत्नी दक्ष कन्या आदितीपासून १२ आदित्य झाले. सर्वात धाकटा विवस्वानाचा सूर्यवंश असा :- १. विवस्वान, २. मनु, ३. इक्ष्वाकू, ४. विकुधि (शशाद), ५. पुरंजय (कुकस्थ),

६. अनेनस, ७. पृथु, ८. विश्वगश्व, ९. आर्द्र, १०. युवानाश्व, ११. श्रावस्त, १२. बृहदश्व, १३. कुवलयाश्व (धुंधुमार), १४. दृढाश्व, १५. हर्षश्व, १६. निकुम्भ, १७. संहताश्व, १८. कृताश्व, १९. प्रसेनजित, २०. युवनाश्व, २१. मान्धातु, २२. पुरुकुत्स्य, २३. त्रिसदस्य, २४. संभूत, २५. अनरण्य, २६. पृषदश्व, २७. हर्यश्व, २८. वसुमनस, २९. त्रिधन्वन, ३०. त्रैयारुण, ३१. सत्यव्रत, ३२. हरिश्चंद्र, ३३. रोहिताश्व, ३४. हरित, ३५. चक्षु, ३६. विजय, ३७. रूरूक, ३८. वृक, ३९. बाहू, ४०. सगर, ४१. असमञ्जस, ४२. अशुमत, ४३. दिलीप, ४४. भगिरथ, ४५. श्रूत, ४६. नाभाग, ४७. अम्बरिष, ४८. सिंधूद्विप, ४९. आयुताश्व, ५०. ऋतुपर्ण, ५१. सर्वकाम, ५२. सुदास, ५३. मित्रसह, ५४. अश्मक, ५५. मूलक, ५६. देवानिक, ५७. दशरथ, ५८. इलबिल, ५९. विश्वसह, ६०. दिलीप, ६१. खट्वांड, ६२. दीर्घबाहू, ६३. रघू, ६४. अज, ६५. दशरथ, ६६. राम, ६७. कुश, ६८ अतिथी, ६९. निगध, ७०. नळ, ७१. नभत्स, ७२. पुंडरिक, ७३. क्षमधन्वन, ७४. अहिनगु (रुरु), ७५. पारियात्र, ७६. दल, ७७. उदय, ७८ वज्रनाभ, ७९. शङ्खनाभ, ८०. युपिताश्व. ८१. विश्वसह, ८२ हिरण्यगर्भ, ८३. ?, ८४. ?, ८५. ?, ८६. पुष्प, ८७. ध्रुवसंधि, ८८. सुदर्शन, ८९. अग्नीवर्ण, ९०. शीघ्र ९१ मरू, ९२. प्रसुश्रुत, ९३. सुगवि, ९४. अर्मण, ९५. महस्वत, ९६. विश्रुनवत, ९७. बृहद्बल असा हा अयोध्यापती कुशाचा वंश मिळाला. लवाचा अद्याप मिळाला नाही. जिज्ञासूंना तो केशवलाल पटेलांच्या ग्रंथात मिळू शकेल.

"कुणबी / मराठा समाजातील तरुणांना आव्हान" या ग्रंथाचे लेखक- **श्री.बा.कृ. भेदरकर** यांनी श्री. नरकेसरी प्रेस, श्रीनाथ की तलैय्या, जबलपूर येथे १० एप्रिल १९७२ रोजी प्रचारार्थ आव्हान पत्रिका छापून प्रसिद्ध केली. त्यात कुणबी शब्दाची व्युत्पत्ती कुलंबीज या मूळ शब्दापासून झाल्याचे वर्णिले आहे. यात कुळ म्हणजे वंश आणि बीज म्हणजे बी; बीयाणे हा अर्थ आहे. यावरून कुलंबीजचा शब्दार्थ वंशाचे मूळ बीज हा आहे. कुलंबीज पासून वर्णलोपाच्या नियमाप्रमाणे कुलंबी व वर्णभेदाच्या नियमाप्रमाणे कुलंबीपासून कुळंबी, नंतर कुळंबीपासून कुणबी शब्द सिद्ध झाला.

कुणबी समाज एकेकाळी पश्चिम भारतात होता. नंतर ते भारतभर पसरले. हेच लोक पुढे स्वत:ला मराठा म्हणवीत. मराठा व कुणबी हे एकच होय. एवढेच नव्हे तर शाहू छत्रपती महाराजांनी ता. २७ डिसेंबर १९१७ साली बुलढाणा जिल्हयातील खामगावच्या शिक्षण परिषदेत केलेल्या भाषणात कुणबी मराठा एक आहे असे सांगितले. त्याचप्रमाणे मराठा व कुणबी हे एकच आहेत हा निकाल हायकोर्टजज्ज श्रीमान पी.एस. कोतवाल-बार-ॲट-लॉ व एफ. डब्ल्यू. ए. पिडीक्स, यु. सी. ए. सी. बी. ई. बार-एट-लॉ यांना ता. १५ ऑक्टोबर १९२१ सी.पी. कोर्टात निकाल देताना सांगितले व विवाह ठराव होऊ शकतो असे पृष्ठ ३ वर भेदरकर लिहितात.

तसेच, कुणबी व मराठा हे एकच होय हा **मुंबई गॅझेट, सातारा, व्हॉल्यूम १९ पान ७५ व मुंबई गॅझेटियर, बेळगाव, व्हॉल्यूम २१,** पृष्ठ १२६ यामध्ये सन १८८१ साली प्रसिद्ध केले. कुणबी या शब्दात मराठा व कुणबी हे मुख्य वर्ग होय- हे मुंबई गॅझेटियर पूर्ण भाग १८ व पोटभाग १ मध्ये प्रसिद्ध केल्याचे ते लिहितात.

पुढे मराठे व कुणबी एकमेकाला श्रेठ समजू लागले. मराठ्यांनी स्वत:मध्ये पुढील पोटभेद निर्माण केलेत. १. सूर्यवंशी, २. सोमवंशी किंवा चंद्रवंशी, ३. नागवंशी, ४. ब्रह्मवंशी, ५. अग्नीवंशी व नंतर ६. घाटमाथ्याचे मराठा, ७. धनगर मराठा, ८. शहाण्णवकुळी वगैरे पोटभेद निर्माण केले तसेच, कुणब्यांनी सुद्धा १. लेवा, २. दखना, ३. तिरळा, ४. वायना, ५. खेडुला, ६. खैरा, ७. वाढेकार, ८. धनुजे, ९. लोणारी, १०. पाटीदार, ११. कडवे, १२. पांजणे कुणबी इत्यादी पोटभेद वाढविल्याचे त्यांनी लिहिले आहे.

पृष्ठ ४, परिच्छेद २ मध्ये श्री. भेदरकर पुढे लिहितात की, "लेवा कुणबी स्वत:ला लव वंशातील

समजतो, तर दख्खन पठारावरील दखने कुणबी, वऱ्हाडातील सधन शेतकरी वर्ग स्वत:ला तिरळा कुणबी मानतो. तसेच, बावन गावचा मालगुजार म्हणजे बावना कुणबी, तर शेतीत राबणारा गरीब कुणबी खेडुला किंवा खैरा, तर स्वत:च्या उपजीविकेसाठी भटकणारा वाढेकार कुणबी ठरला. Wander पासून वाढेकर बनला. कडवे कुणबी अयोध्यापती प्रभू- रामचंद्रसूत कुशापासून, तर पांजणे कुणबी हे पावन प्रदेश (पावन खिंडीप्रमाणे) पासून नाव पडले असावे. कर्नल टॉडने देखील ही सर्व स्थानवाचक नावे पडल्याचे म्हटले आहे. डॉ.कुर्तकोटी शंकराचार्य नाशिक पंचवटी यांनी देखील ता. १८ जुलै १९२८ रोजी वरील अभिप्राय दिला. यारीतीने कुणबी समाजाचे पोटभेद निर्माण झाले.

कुलंबीज > कुलंबी > कुळंबी > कुणबी

कुणबी
१. लेवा
२. दखना
३. तिरळा
४. बावना
५. खेडुला
६. खैरा
७. वाढेकर
८. धनुजे
९. लोणारी
१०. पाटिदार
११. कडवे
१२. पांजणे

मराठा
१. सूर्यवंशी
२. चंद्रवंशी
३. नागवंशी
४. अग्नीवंशी
५. ब्रह्मवंशी
  १) घाटमाथे मराठा
  २) धनगर मराठा
  ३) ९६ कुळी मराठा इत्यादी.

श्री. भेदरकर शेवटी लिहितात की,- ब्राह्मणांनी १. कोकणस्थ, २. देशस्थ, ३. कऱ्हाडे, ४. वऱ्हाडे, ५. पांचाळ, ६. लोळक, ७. चरक, ८. रंजक, ९. मुंडक, १०. अभीर, ११. सारस्वत, १२. शेणवी, १३. चित्पावन ह्या सर्व जातींचे एकत्रिकरण करून सर्व जातींची मिळून ब्राह्मण वर्णाची एकच जात मानली व त्यामुळेच ब्राह्मणांचा उत्कर्ष झाला. United we stand Divided we fall हे तत्त्व जाणून उत्कर्ष साधण्यास्तव परस्परातील भिन्नभाव विसरून सर्व जाती पोटभेद विसरून ऐक्य निर्मिल्यासच या लोकशाही राष्ट्रात बहुसंख्य असलेल्या कुणबी जातीचेच शासन राहील. डॉ. पंजाबराव देशमुखांनी या साठीच वरीलप्रमाणे जाती ऐक्यांची धडपड केली. ती पूर्णत्वास नेण्याचे श्री. भेदरकर साऱ्या कुणबी मराठा पोटजातींना आवाहन करतात.

उत्तर प्रदेशात कुशापासून कुशवाह (कच्छवा) समाज होय. कुशवाह आडनावाचे लोक ग्वाल्हेर संस्थान, आग्रा, इटावा व मथुरा परिसरात दिसतात. हे लोक स्वत:ला ठाकूर (क्षत्रिय) म्हणवितात, व कुशवंशी सांगतात. यांनाच गुजराथ व माळव्यात कडवा म्हणतात.

माळवा व उत्तरप्रदेशातील लववंशी (लेवा) मध्यप्रदेशात नरसिंहपूर, इटारसी आदी क्षेत्रात पसरलेले रघुवंशी, बडगुजर, रेवा, पाटीदार, निमाडातील रेवा पाटीदार, लेवा पाटीदार, धार जिल्ह्यातील कोद बिडवाल, रतलाम, मंदसौर, उज्जैन व देवास जिल्ह्यातील लेवा पाटीदार, उत्तर मध्य प्रदेशातील गुजर, जम्मू-काश्मिरातील गुजर हे सर्व समकक्ष जातीचे लोक आहेत. आजही चोपडा, भाटीया आडनावे पंजाबात व लेवा समाजात आहेत. रामायणाचे उत्तर कांड व कालिदासाचे रघुवंश यांचे

आधारे कळते की, भरत पुत्रांना पुरुषपूर (पेशावर) शत्रघ्नुसुतांना मथुरेचे राज्य दिले होते. लवाच्या मुलाला श्रावस्तीचे राज्य दिले होते. लववंशीय ध्रुवसिंधूची पत्नी कलिंग राजकन्या **मनोरमा व** अवंती (उज्जैन) नरेश युद्धजितची लिलावती, ह्या दोन राण्यांपैकी मनोरमापुत्र सुदर्शन राजा झाला. सुदर्शनचा श्वसूर काशी नरेश सुबाहूच्या मदतीने श्रावस्तीत राज्य करू लागला. याचा वंश विस्तार निमाड, माळवा, दक्षिण राजस्थान, गुजरात भागात वस्ती करून राहिला. **देवासचे लेवा पाटीदार नावाला सिंह हे क्षत्रिय व वीरतासूचक उपनाव जोडतात, तर महाराष्ट्रात राव म्हणजे राजे हे सन्मानसूचक उपनाव जोडतात.**

सन १९७९ मध्ये गीताप्रेस गोरखपूर (उत्तरप्रदेश) ने कल्याण मासिकाचा 'सूर्याङ्क' नामक विशेषांक काढला. त्यात पृष्ठ ३०० वर **डॉ. श्री. निरंजन कानदेव चौधरींनी** सूर्यवंश व सूर्यभक्ती वर्णिली. त्यात प्रमाणित केले की, उदयपूर व चितोडचे महाराज लवाचेच वंशज होते. व कुशवाह हे कुशाचेच वंशज आहेत. यावरून क्षत्रिय लवाचा वंश असा हा लेवा समाजही क्षत्रिय वर्णातच मोडतो. या समाजाला उत्तरप्रदेशात कूर्मी, माळव्यात कुलमी, गुजराथ व महाराष्ट्रात कुणबी म्हणतात. कणकण वेचून ह्यांनी राष्ट्राची महान सेवा केली म्हणून त्यांना कुणबी म्हणतात. महाराष्ट्रात ते मराठा जातीसमुहात मोडतात.

जबलपूरचे भूतपूर्व संसद सदस्य **सेठ गोविंददास** लिखित लोहपुरुष **सरदार वल्लभभाई पटेल जीवन चरित्रात त्यांना क्षत्रियवंशी लेवा पाटीदार म्हणून म्हटले आहे.**

लेवा समाजाचेच अंग असलेली बडगुजर जात क्षत्रिय असल्याचे **जातिभास्कर ग्रंथात** लिहिले आहे.

लेवा पाटीदारात लग्नारंभी वरपक्षाकडून वधूपक्षाकडे निशाण पाठवण्याची क्षात्रवर्णीय प्रथा होती. ईक्ष्वाकू सूर्यवंशी रामाचे कुलदैवत भगवान शंकर होते; तर चंद्रवंशी यादवातील श्रीकृष्णाचे कुलदैवत देवी योग माया होती. **पुराणात ब्राह्मण व वैश्याची वंशावळी नसते; पण क्षत्रियांचीच भाट व चारण लिहितात ही प्रथा लेवावंश लिहिण्याची आहे.**

क्षत्रियात नवरदेवाजवळ क्षत्रियोचित कटचार किंवा चाकू ठेवण्याची प्रथा होती. कच्छमधील 'लवांना' लोहाणा जातीस क्षत्रिय म्हणतात. मुस्लीम आक्रमणानंतर जिझिया कराला विरोध केल्यामुळे गुजराथेतील क्षत्रिय लेवा पाटीदार तापी तीराने इकडे येऊन विसावला.

पाडळशे व दाताळा येथील भोरगाव पंचायती मराठी भाषिक लेवा पाटीदारांचे नियंत्रण करीत. पुढेपुढे या समाजात १. सावदेकर, २. थोरगव्हाणकर, ३. गाडेगावकर (नवघरे) ४. कंडारकर या चार गावचे पुढारीपणाने. चार शाखा निर्माण झाल्या.

भवियोत्तर पुराण व स्कंध पुराणांतर्गत सह्याद्रि खंडात मूळस्तंभ अध्याय १७ मध्ये क्षत्रियांचो उत्पत्ती (वंशावळी) या सर्वमान्य प्राचीन ग्रंथात व शहाण्णव कुळी वंशावळी या ग्रंथात क्षत्रिय वंशावळी दिली आहे. तसेच, **बाळाजी नथुजी गावंड** व **गोविंद मोरोबा कार्लेकर** यांनी मराठ्यांची वंशावळी व शहाण्णवकुळी आणि सोम, सूर्य, ब्रह्म व शेषवंश नावाचा एक उत्कृष्ट ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथात पृष्ठ ९१ ते ९४ वर जे सूर्य, सोम, ब्रह्म व शेष असे चार वंश दिलेत त्यापैकी पृष्ठ ९१ वरील सूर्यवंशात लेवा पाटीदार वंशाचा समावेश केला आहे तो पहा.

मनुर्भरत वंशातील प्रजापतींनी प्रथम कृषीचा शोध लावला. वैदिक काळामध्ये कृषिक कर्म सर्वाधिक प्रतिष्ठित मानले जात होते, असे कु.क्ष.की. क., पृष्ठ ७ वर **डॉ. सिंह** लिहितात. ते त्याच पृष्ठावर पुढे लिहितात की, "राय डेव्हीडस्च्या मतानुसार बौद्धकाळात गावात आम्हाला अपराधाची एकही घटना घडल्याचे ऐकीवात नाही. गावात छोटे स्वशासित लोकतंत्र असे. कृषिकर्म करणे गौरवास्पद मानत. नोकर ठेवणे दूषणास्पद मानत असत." असे जातककालीन भारतीय संस्कृती,

पृष्ठ ७५ वर राय डेव्हीडस्चे कथन दर्शवून डॉ. सिंह, पृष्ठ ८ वर लिहितात.

'कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास', ले.- डॉ. पटेल यांच्या, पृष्ठ १८४ वर देशी व विदेशी इतिहासकारांनी पाटीदार वंशाची क्षत्रियात गणना केली. कडी प्रांताचे सुभेदार रावबहादूर गोविंद भाई हाथीभाई देसाई 'गुजरातनो प्राचीन इतिहास', नामक ग्रंथात गुर्जर नावाच्या जातीमधून पाटीदार वंश जन्मला हे लिहितात. हे लोक लढवय्ये व क्षात्र वृत्तीचे राजकर्ते होते. आजही पाटडी दरबार मौजूद आहे. वीरमगाम व पाटडीस कडवा कुणब्यांचे तर वसो येथे अमिन या लेवा कुणब्यांचे राज्य होते, याच अमिन वंशीय वीरात्मा दरबार गोपालदासने आपली जहागिरी मिळकत सोडली. ते गांधीवादी बनून स्वातंत्र्य संग्रामात दाखल झाले होते. बारडोली सत्याग्रहात एका टोळीचे ते नेते होते, त्यात अनेक पाटीदार शहीद झाले. याच लेवा पाटीदार वंशात लोहपुरुष सरदार वल्लभभाई झवेरभाई पटेल व त्यांचे बंधू विठ्ठलभाई पटेल जन्म घेऊन राष्ट्रवंद्य विभूती बनले.

महंमद बेगडाचे काळात गुजराथचा किसान कुणबी भूमीस्वामी रूपाने पाटीदार वर्गात किंवा जातीत रूपांतरीत झाला. पत्ती म्हणजे पंक्ती, भाग, हक्क. पत्तीदार झाल्याने किसान भूमीस्वामी बनला. व पत्तीदार म्हणजेच पाटीदार म्हणून संबोधला जाऊ लागला. या सोनेरी काळानंतर इजारदारी सुरू झाली. आंग्लाईत इजारदारांना भूमीस्वामी ठरविले. **सन १३०४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने गुजराथ लुटल्यानंतर महंमद बेगडाने कुणब्यांना भूमी स्वामित्वाचे अधिकार प्रदान करून गुजरातच्या सूर्यवंशी लेवा कुणब्यांना पाटीदार बनविले.**

उत्तर भारतीय कुर्मवंशीय **श्री नारायण सेठने** सर्वप्रथम 'कुलमी कुलादर्श' ग्रंथ प्रकाशित केला. सन १९०६ मध्ये डाह्याभाई लक्ष्मणभाई पटेल लिखित 'वडनगरा कणबी क्षत्रिय उत्पत्ति' तसेच, सन १९१० मध्ये **श्री पुरुषोत्तम ललुभाई परिखांनी** लिहिलेला "कुणबी क्षत्रिय उत्पत्ति और इतिहास" या ग्रंथात पाटीदारांचा इतिहास मिळतो. तसेच, 'पीराणा पंथनी पोल' व डॉ. मं. रा. पटेलांनी सन १९८५ मध्ये रायबहादूर बहेचरदास अंबाईदास लष्करी (१८१८ ते १८८९) मधील नेत्यांची जीवन चरित्रे आचार्य पदवीसाठी लिहिली त्यातून बरीच माहिती मिळते, असे 'कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास', ले.- डॉ. मं. रा. पटेल, पृष्ठ ९१ वर पहा.

पृष्ठ १९९ वरून कळते की, रावण पण एका ब्राह्मणाचा पुत्र होता. त्याचे शारीरिक तथा आत्मिक बल श्रेष्ठ दर्जाचे होते तरी, आमच्या पूर्वजासमोर तो टिकू शकला नाही; इतके आमचे पूर्वज बलवान होते. **पाटीदारांचे सूर्यवंशी पूर्वजांचा ब्राह्मण कन्याशी विवाह होत असे. उदा. ययाति व शुक्राचार्यांची मुलगी देवयानी, तसेच,- ब्राह्मण जमदग्नी ची पत्नी रेणुका ही क्षत्रिय कन्या होती. तिचा मुलगा परशुराम होय. अंजना, कडवा, लेवा व मतिया ह्या कुणबी क्षत्रियांच्या पोटजाती सूर्यवंशी क्षत्रिय प्रभू रामचंद्राच्या लव व कुशापासून जन्मल्यात.**

श्री. दामोधर कौतिक राणे, (अध्यक्ष) लेवा पाटीदार समाज (अहमदाबाद) यांच्या मते, "कश्यप वंशीय म्हणून कुर्मी म्हणजे कृषक असलेले लेवा पाटीदार हे प्रभू रामचंद्राचे लवाने पंजाबवर स्वारी करून रावीतिरी "इरावती" शहर उर्फ "लवपूर" वसविले. तेच हल्लीचे लाहोर होय. परचक्राला कंटाळून तत्रस्थांनी गुजराथेत करड व लेयारपूर प्रांतातून स्थलांतर केले. **जयदीपसिंह रावळाचे राज्यात इ.सन ७८८ साली भद्रमातेच्या कोपामुळे पावागड उद्ध्वस्त झाला. कालांतराने सुलतान अहमदशहाने अहमदाबाद सन १३८४ मध्ये बसविले. पण सन १४८४ मध्ये महंमद बेगडाने पावागडवर आक्रमण केले म्हणूनच चरोतर व खेडा जिल्ह्यातील लेवा पाटीदार १. चरोतर, २. वाकळ, ३. कानम व ४. खानदेश विदर्भात तापीपूर्णा खोऱ्यात स्थलांतरीत झाले. हा चवथा भाग महाराष्ट्रात आल्याने याची मूळ लेवा पाटीदार समाजापासून भाषा व प्रदेशात अंतर पडल्याने तो समाज आपल्या पूर्वसूरी व सहोदरापासून कायमचा दुरावला."**

देवीसिंह चौहाणच्या मते पाटीदार लोक इराणाहून खैबर खिंडीमार्गे भारतात आले. ते मूळ गुजराथचे नाहीत. चोपड्यांच्या भाटांच्या नोंदीवरून लेवा पाटीदार खानदेशात संवत ११०० चे सुमारास स्थलांतरीत झाले. **गुजराथी लेवा कुणबी उत्तरेतील गुजर वंशाचे आहेत, असे 'बुलढाणा जिल्हा गॅझेटियर' सन १९१० च्या पृष्ठ १२५ वर पहा. राज्यात यांना पूर्वी पाजणे म्हणत. पाजणे शब्द पावाखंडशी (गुजराथचा एक भाग) जोडला गेला. खेडा जिल्ह्यातील लेवा लोक पावागडला गेले.**

'पाटीदार जागृति' या मासिक पत्रिकेच्या, वर्ष १६, अंक ५ मे १९९८, प्रबंध संपादक "पाटीदार जागृति" पाटीदार समाज छात्रावास, संजित मार्ग मंदसौर पीन - ४५८००१, (म.प्र.) या अंकात लेखक- **परशुराम पाटीदार** (ॲडव्होकेट), पाटीदार जागृति न्यासचे अध्यक्ष, पृष्ठ २१ वर लिहितात की,- "प्रागैतिहासिक काल मे इ स. पूर्व ५००० पूर्व यानी आजसे ७००० वर्ष पूर्व इंडो आर्यन समूह एक विशिष्ट भूभागपर रहते थे। यह इन्डो समुह की एक शाखा २५०० वर्ष इ सा पूर्व यानी ४५०० वर्ष पूर्व जो भारतमे प्रवेश करके पंचनद प्रदेशमे बसी।... ऋग्वेद आर्योंके भारतमे आने तथा कुछ भाग भारत मे वसने के कालका है। .... शेष तीनो वेद आज २८०० वर्ष पूर्व रचित है। २८०० वर्ष पूर्व प्राचीन कालमे क्षत्रिय, वैश्य, शूद्र, ब्राह्मण यह वर्ण विभाजन हो चुका था। यह शतपथ ब्राह्मण काल कहलया गया था। इसके बाद वाल्मिकी रामायण और व्यासकृत महाभारत की रचना हुयी। इस कालमे जाती विभाजन हुआ। आजसे २५००/२६०० वर्ष पूर्व जाती विभाजन हुआ। आजसे २४०० वर्षपूर्व पाणीनी हुये। तथा १७०० या १८०० वर्ष पूर्व मनुस्मृति हुयी।

'युनिफाईड इतिहास', लेखक- **डॉ. प.के. मित्तल**, प्रकाशक, साहित्यभवन पब्लिकेशन, हॉस्पिटल रोड, आगरा २८२००३. आवृत्ती ३ री सन १९९५, पृष्ठ १२ वरून कळते की, पुरातत्त्ववेत्ताओंच्या मते मानव सभ्यताचा अविर्भाव ४००००० से ५००००० वर्ष पूर्व झाला. त्यानंतर १. पूर्व पाषाण काल, २. मध्य पाषाण काल, ३. उत्तर पाषाण काल, ४. धातु युग अवतरले.

त्यात १. मेसोपोटेमियाची संस्कृती, २. बलुची संस्कृती, ३. भारतीय संस्कृती, ४. आर्य संस्कृती या प्राचीन संस्कृती अवतरल्या. **विश्वातील प्राचीनतम सिंधू सभ्यता होती.** ती इ.सन. पूर्व ३२५० ते इ.सन. पूर्व १५०० या अवधीत केव्हातरी झाली असावी (पृष्ठ १६ वरून) असे वाटते. यावेळी वर्ण विभाजन नव्हते. पृष्ठ १७ वरून कळते की, **तेव्हा मातृप्रधान सभ्यता होती.** सिंधू निवासी मातृदेवीची पूजा करीत असत (पृष्ठ १९ पहा). मातृदेवीला 'माता', 'अम्बा', 'काली' एवम् 'कराली' आदी नावांनी संबोधिले जाई. (पृष्ठ १९ पहा.). सिंधू सभ्यता ५००० वर्ष प्राचीन असून तिच्यापासून आर्य संस्कृती प्रभावित झाली. (पृष्ठ २३ पहा). वैदिक सभ्यता, लगभग ३००० वर्ष प्राचीन आहे. (पृष्ठ २३ पहा.) या आर्यांचा भारतात सप्तसिंधू प्रदेशात निवास होता. इ.सन पूर्व १५०० ते इ.सन पूर्व १००० ह्या पूर्व वैदिक कालात ऋग्वेद रचला. व इ.सन पूर्व १००० ते इ.सन पूर्व २०० पर्यंत उर्वरीत वेदवाङ्मय रचना झाली. (पृष्ठ ३३ पहा). यास उत्तर वैदिक काल म्हणतात. **ऋग्वेदकालीन समाज पितृसत्तात्मक (Patriarchal)** होता. पृष्ठ ३८ वरून कळते की, ऋग्वेदिक काळात वर्ण, कार्य व रंगावर आधारित होते, पण उत्तर वैदिक काळात ते जन्मावर आधारित पैतृक पद्धतीत परिवर्तीत झाले. उत्तर वैदिक काळात अंतर्जातीय विवाह होत असत. परंतु, मुख्यत: सजातीय विवाहाकडे अधिक कल होता. व स्त्रियांची दशा शोचनीय होत गेली. नंतर अंग, मगध, काशी, कोशल, वज्जी, मल्ल, चेदि, वत्स, कुरू, पांचाल, मत्स्य, सूरसेन, अवन्ति, अश्मक, गांधार, कंम्बोद ही सोळा महाजन पदे उदय पावलीत.

म.बुद्ध काळात १. कपिलवस्तुचे शाक्य, २. रामग्रामचे कोलिय, ३. पिप्पलीवनचे मौर्य उर्फ मोरिय, ४. पावाचे मल्ल, ५. कुशीनगरचे मल्ल, ६. अल्लाकप्पचे बुली, ७. वैशालीचे लिच्छवी, ८.

मिथिलाचे विदेह, ९. सुसुमार पर्वतावरील, भग्ग, १०. केसपुत्तचे कालाम ही दहा गणतंत्रात्मक राज्ये अस्तित्वात होती. (पृष्ठ ४३ व ४४ वरून), बुद्धकाळात या दहा गणतंत्रात्मक (Republics) राज्याव्यतिरिक्त १. मगध, २. अवंती, ३. वत्स (राजधानी कोशाम्बी), ४. आधुनिक अयोध्येचे स्थानी कोशल राज्य होते. शरयू नदीचे उत्तरेकडील उत्तर कोशलची राजधानी श्रावस्ती व शरयूचे दक्षिणेकडील, राजधानी कुशवती होती. श्रावस्ती, साकेत तथा अयोध्या ही त्यातील प्रमुख नगरे होती. महात्मा बुद्धकालीन नरेश प्रसेनजित होता. अशी चार राज तंत्रात्मक (Monarchy) राज्ये होती. पैकी या चवथ्या राज्यात लेवा पाटीदारांची पाळेमुळे आहेत.

मगधाधिपती प्राचीनतम बृहद्रथवंशीय राजवंश हा चेदिराज वसुचा पुत्र बृहद्रथपासून मगध साम्राज्य संस्थापक झाला. या वंशात बृहद्रथपुत्र जरासंधाचा कृष्णाने भीमाकडून वध केल्याने मगध राज्याचे पतन झाले, असे **महाभारत व पुराणावरून** कळते. बृहद्रथ वंशाचा अंतिम शासक रिपुंजयाची त्याचा मंत्री पुलिकने हत्या करून तो वंश राज्यविहिन केला. त्यानंतर इ.सन पूर्व ५४४ ते इ.स. पूर्व ४९२ मध्ये मगधावर बिम्बिसार हा राजा झाला.

या बिम्बिसारने कौशलचे शक्तीशाली इक्ष्वाकू वंशीय शासक महाकोशलची कन्या, प्रसेनजितची बहीण कोशलदेवीशी विवाह केला. नंतर बिम्बिसारने वैशालीचे लिच्छवी राजा चेटकची कन्या छलना उर्फ चेल्लनाशी विवाह केला. बिम्बिसारने तिसरा विवाह मद्र देश (पंजाब)ची राजकुमारी क्षेमाशी विवाह केला. या बिम्बिसार राजाची पत्नी कोशलदेवी व दुसरी पत्नी छलना ह्या लेवा पाटीदारांच्या रक्तगटातील ईक्ष्वाकू कुलोत्पन्न सूर्यवंशीय राजकन्या होत्या. इ.सन पूर्व ४१४ ते इ.सन पूर्व ३४६ पर्यंत वैशालीचे लिच्छवी राजाचा पुत्र शिशुनागने पाटलीपुत्राच्या नागदशकला राज्यविहीन करून तेथे लिच्छवी कुलात (सूर्यवंशीय कुल) जन्मलेल्या शिशुनागाचा शिशुंनाग वंश स्थापन केला. हा लेवा वंशीय रक्तगटातील सूर्यवंशी राजा होय. 'युनिफाईड इतिहास', पृष्ठ ५५ वर पाटलीपुत्रचे जागी गिरीव्रजला राजधानी करून नव्या राज्याचा संस्थापक शिशुनांग हा वैशालिचा लिच्छवी राजकुमार होता. (पृष्ठ ५५ पहा). व पृष्ठ ४५ वर लिच्छवी गणराज्याधिकारी ईक्ष्वाकु वंशीय क्षत्रिय होते असे लिहले आहे. आणि या इक्ष्वाकू क्षत्रिय सूर्यवंशातच लेवा पाटीदारांचे पूर्वज प्रभू रामचंद्रसूत लवाचा ४० वे पिढीत जन्म झाला. (कुर्मवंशी क्षत्रिय किर्तीकथा, लेखक- रामसियासिंह, पृष्ठ ४८ पहा.)

'मध्ययुगीन भारताचा इतिहास' लेखक- **प्रा. मा. म. देशमुख,** (एम.ए., इतिहास विभाग, थ.नॅ.कॉलेज नागपूर) यांनी भारतीय इतिहासाचे ३ कालखंड कल्पिलेत. इ.सन १२०६ पर्यंत प्राचीन काल. इ.सन १२०६ ते १७६१ मध्यकाल, व इ.स. १७६१ ते आजपर्यंत अर्वाचीन काल होय.

त्यांच्या मते अनार्यांची सत्ता नष्ट करून ख्रिस्तपूर्व १७५० चे सुमारास आर्यांनी भारतात येऊन वैदिक संस्कृती स्थापन केली. (पृष्ठ २ पहा.)

'श्री. राजेंद्र संस्मृति ग्रंथ' तृतीय खंड, ऐतिहासिक पृष्ठभूमि, लेखक **श्री. बालमुकुंद मिश्र** अध्याय, ४ पृष्ठ, ७ आर्यप्रवाह नामक प्रकरणात लिहितात की,- "विद्वानांच्या मते सप्तसैन्धव प्रदेशात आर्यांची आदि-भूमि आहे. ऋग्वेदात वर्णिलेल्या १. सिंधू, २. वितस्ता (झेलम), ३. असिवनी (चंद्रभागा - चिनाब), ४. परुष्णी उर्फ रावी, ५. बियास उर्फ व्यास, ६. शतुद्रि उर्फ सतलज व ७. सरस्वती नदी या ७ नद्या काठच्या प्रदेशास 'सप्तसिंधू प्रदेश' म्हणतात.

प्रारंभी वर्तमान अफगाणिस्तान, बलुचिस्तान, पाकिस्तान, काश्मिर व पंजाब येथे आर्यांची वसाहत होती. ब्राह्मणकालात या सीमा उत्तरप्रदेश, बिहार व बंगाल पर्यंत विस्तारल्या. नंतर आर्यनिवास पतियाळा (पंजाब), कुरुक्षेत्रे (हरियाणा), व बिकानेर (राजस्थान) ह्या सारस्वत क्षेत्रात सर्व ऋषीकुले विस्तारली. इ.सन. पूर्व ७५०० चे सुमारास सारस्वत क्षेत्रात जलप्रलय होऊन त्या प्रदेशाची वाताहत

झाली, व त्याच सुमारास राजस्थानचा मरुप्रदेश अस्तित्वात आला असे शतपथ ब्राह्मण ग्रंथात लिहिले आहे. (श्री. राजेंद्र संस्मृति ग्रंथ, पृष्ठ ८ वरून). यात सिंधूक्षेत्रीच्या वैवस्वत मनुकुलाचा बराच संहार झाला. त्या काळात मत्स्य नौकाच्या सहाय्याने खवळलेल्या सारस्वत समुद्रातून विवस्वान (सूर्य) चा पुत्र वैवस्वत मनुने हिमालयाच्या पायथ्याशी त्यांना सुरक्षितपणे आणले (पृष्ठ ९ वरून) परिणामत: जनतेने वैवस्वत मनुस अयोध्येस राजा म्हणून मान्यता दिली.

जयचंद्र विद्यालंकार लिखित "इतिहास प्रवेश" ग्रंथाधारे श्री. बालमुकुंद मिश्र पुन्हा पुढे लिहितात की, मनुपासून सूर्यवंश जन्मला व यांचे पुत्र 'इल' ने प्रतिष्ठान (झूंझी) मध्ये ऐल अर्थात चंद्रवंशोत्पत्ती केली.

या सूर्यवंशात मनुच्या ९८ व्या पिढीत म्हणजेच महाभारत युद्धापर्यंत सूर्यवंश विस्तारला. व भारतीय महायुद्धात तो बराच मारला गेला. राज्यतंत्र बुद्धकालापर्यंत क्षीण दशेतच राहिले. परिणामस्वरूप अडीच हजार वर्षाचा काल शक्ति संचायातच गेला. (आधार : नगर परिक्षेत्र की ऐतिहासिक पृष्ठ भूमि स्मारिका, स्वर्ण जयंती, शा.रघु. उ.मा. विद्यालय, शहडोल, फरवरी १९८७ पहा). त्यांचे मते इ.सन पूर्व ३२०० वर्षापूर्वी महाभारत युद्ध झाले.

इ.सन पूर्व ५७ मध्ये मालवगणाधिपती विक्रमादित्य कालात झालेल्या महाकवि कालिदास विरचित रघुवंशात (लेवा पाटीरांचे पूर्वज) रघुवंशीय वर्णिलेत. त्यांचा वंशविस्तार मूळातूनच वाचा. हे प्राचीन आर्य मूर्तिपूजक नव्हते. (श्री. राजेंद्र संस्मृति ग्रंथ, लेखी खंड, ले. बालमुकुंद, मिश्र अध्याय ६ वा, पृष्ठ १४ वरून). इ. सनाच्या ६ व्या शताब्दित (शतकात) सर्व राजपुत्रांचे अबू पर्वतावर संमेलन झाले. त्यात प्रमार (परमार), प्रतिहार (परिहार), चालुक्य (सोळंकी) और चाहमान (चौहान) या चार गटात विभक्त होऊन सत्तासंपादनार्थ चार दिशांनी विस्तारलेत. यापैकी चालुक्य उर्फ सोळंकी वंश प्रारंभी अयोध्या नंतर दक्षिणभारत व नंतर गुजराथेत सत्ताधीश झाला. चालुक्यवंशीय सुलंकदेवाचा हा वंश होय. या वंशातील मूळराज सोळंकीने इ.सन ९६० मध्ये गुजराथमध्ये नवीन राज्य संस्थापना केली. यांचे सहावे वंशज कर्णदेव (इ.सन १०६३ ते १०९३) चे छोटे बंधू सारंगदेवाचा नातू वाघराज यास 'अनाहिल वाडा' पासून १६ किलोमीटर दूर एक गाव जाहागिर मिळाले. वाघराजाचे नावावरून त्या गावास बघेला गाव व त्याचे वंशास 'वाघेल वंश' नाव मिळाले. याने सन ११७७ मध्ये आपला भाचा धवलला ती जहागीर देऊन चित्रकूट पर्वतावर 'मरफा' नामक किल्ल्यावर वस्ती केली. हा वाघराज उर्फ व्याघ्रदेव या क्षेत्रीच्या वाघेल वंशाचा संस्थापक होता. ह्याच वंशात गहोरा वांधव (रीवा) राज्यांत सोहागपूरचा राजवंश पृष्ठ २७ वर दिला आहे. या वाघेल काळातच लेवा पाटीलांनी गुजरात सोडला. "या राजपुत्रापैकी प्रतिहार (परिहार) अपने अभिलेखामें स्वयंको सूर्यवंशी क्षत्रिय मानते है।" (युनिफाईड इतिहास, पृष्ठ १९२ पहा).

साहित्यिक स्त्रोतो (उदा. हम्मीर महाकाव्य) से भी चाहमानो (चौहान) का सूर्यवंशी होना ज्ञात होता है। (युनिफाईड इतिहास, पृष्ठ १९२ पहा).

प्रतिहार व चाहमान हे दोन्ही वंश ईक्ष्वाकू कुलोत्पन्न सूर्यवंशीय होते. म्हणून सूर्यवंशीय लेवा पाटीदार रक्तगटातील होते हे इतिहासावरून कळते.

"राजपूतकालीन सामाजिक जातीभेदजन्य विभक्तीकरण व छुआ-छूत भावसे हिंदूका विघटण हुआ." (युनिफाईड इतिहास, पृष्ठ २०९ वरून) व त्यामुळे मुस्लीमांनी एकात्मतेच्या जोरावर हिंदूचा पूर्ण पराभव केला.

झेलम व चिनाब नदीमधील मध्यप्रदेश (कैकय देश) पोरस राजाचे अधिन होता. त्यानेच सिकंदरशी सामना केला. (युनिफाईड इतिहास, पृष्ठ ६२ पहा).

'युनिफाईड इतिहास', पृष्ठ ४५ वरून मौर्य उर्फ मोरिय (पिप्पलीवनचे) प्रथम शाक्यवंशीयच

होते. तसेच, वैशालीचे लिच्छवीचे शासक ईक्ष्वाकू वंशीय क्षत्रिय होते. तसेच, विदेह (मिथिला उर्फ जनकपूर) राज्याचे शासक प्राचीन सूर्यवंशाचो निमिवंश क्षत्रियोत्पन्न शाखा होती.

इ.सन पूर्व ४८६ ते इ.सन पूर्व ४६५ मध्ये क्षयार्षच्या नेतृत्वाखाली इराणी आक्रमणप्रसंगी युनानवर स्वारी केली, तेव्हा थर्मोपलीच्या युद्धात भारतीय सेनेने खूप पराक्रम केला. झेलम व चिनाब मधील कैकय प्रदेशाचा राजा पोरस ग्लोगनिकाई गणराज्य, चिनाब पार केल्यावर गंदीरीस प्रदेशात सिकंदर शिरला. नंतर इ.सन पूर्व ३२६ वर्षांचे अंती रावी नदी पार करून सिकंदर ने पिंप्रभा दूर्ग तथा अद्रेष्टा गणराज्य जिंकून नंतर कठ गणराज्याचे सॉंकल उर्फ सॉंगल या राजधानीवर हल्ला केला त्यात सिकंदराचा पराभव झाल्यामुळे त्याने पोरसची मदत घेऊन कठ राज्याची राजधानी उद्ध्वस्त केली. (युनिफाईड इतिहास, पृष्ठ ६१ पहा). हा सर्व रावीनदी लगतच भूभाग हा लेवा पाटीदारांची पितृभूमी आहे. याच भागात गुर्जर लोकावरून गुजरात शहर, गुजराणवाला शहर वसले आहेत. या रावी नदीतिरी लेवा वंशाचा मूळ पुरुष प्रभू रामचंद्र सूत लवाने लवपूर उर्फ लाहोर वसविल्याचा इतिहास आहे. या अती साहसी व शूर लोकांच्या प्रदेशात युनानी शासन उलथून पाडण्यासाठी चंद्रगुप्त मौर्याने सैन्य उभारले. (लेवा पाटीदार पितृभूमी मध्ये), (पृष्ठ ७४ पहा.) "हा चंद्रगुप्त मौर्य युनिफाईड इतिहास, पृष्ठ ७२ वरील अनेक आधारावरून विप्पलीवनच्या मौर्य उर्फ मोरिय वंशात जंन्मला. हा मोरीय उर्फ मौर्यवंश क्षत्रिय वर्णात येतो. मोरियवंशीय मौर्य म्हणून त्याने मयूर हे वंशचिन्ह बनविले होते." यथ कॉम्पिटीशन टाईम्स, प्रधान संपादक आनंदकुमार महाजन, इलाहाबाद, पृष्ठ ६२ वर लिहिले आहे की, "बौद्ध ग्रंथ मौर्यांको क्षत्रिय जातीसे संबंधित करता है। यह चंद्रगुप्त मोरिय क्षत्रिय वंश का कहा गया है। मोरीय कपिलवस्तुके शाक्योंकी ही एक शाखा है। यह स्थान मोरोंके लिए प्रसिद्ध था, अत: यहाके निवासी मोरिय कहे गये।" चंद्रगुप्तने सेना जमाकर सिकंदरके क्षत्रियोंके विरुद्ध राष्ट्रीय युद्ध छेडकर इ. सन पूर्व ३१७ मे पश्चिम पंजाबका अंतिम युनानी सेनानायक युडेमसको जितकर उसका राज्य तथा संपूर्ण सिंध तथा पंजाब हस्तगत कर लिया।" (यु. कॉ. टाईम्स, पृष्ठ ६३ वरून), याने सेल्यूकसची पुत्री हेलनशी पहिला अंतर्जातीय, अंतर्धर्मिय, अंतर्देशीय विवाह केला. या उच्च व पवित्र क्षत्रिय जातीच्या मोरीय शाखेतच महात्मा गौतम बुद्धाचा जन्म झाला. (युनिफाईड इतिहास, पृष्ठ ७२ पहा). युनिफाईड इतिहास, पृष्ठ ४४ वरून दिसते की; बुद्धकाळी कपिलवस्तुचे शाक्य "शाक (शाल या शाख) के जंगलो को साफ करके वहा बसने के कारण वे शाक्य कहलाये थे। शाक्य स्वयंको कोशल के ईक्ष्वाकू सूर्यवंश की एक शाखा मानते थे।" याच ईक्ष्वाकू सूर्यवंशात लेवा पाटीदार वंश जन्मला. हे आपण पूर्वी पाहिलेच आहे. तसेच, लिच्छवी शासकही ईक्ष्वाकू वंशीय क्षत्रिय होते. (युनिफाईड इतिहास, पृष्ठ ४४ पहा.) "मिथीलाकी विदेह राजधानी जनकपूरके लोकही सूर्यवंशीय निमीवंश क्षत्रियोंसे उत्पन्न हुए थे।" (पृष्ठ ४५ पहा).

इ.सन पूर्व ३२२ ते इ.सन पूर्व २९८ मध्ये चंद्रगुप्त मौर्याने एकसूत्री साम्राज्य निर्माण केले, व शासनकालचे शेवटी त्याने जैनधर्म स्विकारून भद्रबाहू या जैनसाधूसह श्रवणबेळगोल येथे दक्षिण भारतात इ.सन पूर्व २९८ पर्यंत म्हणजे मरेपर्यंत जैनधर्म साधना केली. (युनिफाईड इतिहास पृष्ठ ७६). **डॉ. मं.रा. पटेल** लिखित. कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, पृष्ठ २६ वरील हिंदी भाषिक वर्णनाचे आधारावरून कळते की, "बडोदा राज्याचे वस्तीपत्रकावरून लेऊवा व कडवा कणबी नावे कशी पडली ते दिले आहे." पंजाबात इरावती उर्फ रावीतीराप्रमाणे गुर्जर राष्ट्रात रेवा (नर्मदा) तिरीचे लेवा व कडी प्रांतातील ते कडवा संबोधिले गेले.

विभिन्न संशोधनाद्वारे बंबई सरकारने गुजरातचा इतिहास लिहिला. त्यात गुजरात हे नाव गुर्जर जाती वरून पडले. संस्कृतात गुर्जर राष्ट्रावरून गज्जरात > गुजरात हे नाव पडले. वायव्य

भारतातील गुर्जर लोक वायव्यप्रांतातील दक्षिण तथा पूर्व भागातील **गुर्ज्जर व जाट लोक साथ-साथ भारतात प्रवेशले. (पृष्ठ २६, कु.पा.इ., पटेल).** प्रथम पंजाब, वायव्यप्रांत, सिंधूप्रदेश, मथुरा व तेथून गुर्जर पूर्वी राजपूताना कोटा, मंदेसर, माळवाचे भेलसा व सहारानपूरपर्यंत व दक्षिणेत खानदेशपर्यंत विस्तारले. व गुजराथेत वल्लभीपूरला राज्य संस्थापक बनलेत. खानदेशात पूर्वभागात लेवा कुणबी आहेत. पंजाबातही गुर्ज्जरामध्ये लेवी नावाची एक जात आहे. (कु.पा.इ.पृष्ठ. २७ पहा.) युनिफाईड इतिहास, पृष्ठ ७४ व "कुलमी पाटीदारोंका इतिहास" ले.मं.रा. पटेल, पृष्ठ ४५ वरून कळते की, इ.सवी सनाचे तिसरे शतकांन्ती बहादूर कुणबी लोक पंजाब सोडून मगध देशाची राजधानी कुशावतीस चंद्रगुप्त राजाचे सैन्यात बहुसंख्याने भरती झाले. तत्पश्चात बाक्ट्रिया (बलख) च्या लोकांनी थोडा पंजाब जिंकला. त्यानंतर तातार देशातील शकांनी उर्वरीत पंजाब, सिंध, माळवा जिंकून इ.सन पूर्व ७५ मध्ये थेट गुजराथवर आक्रमण केले. त्यात शक राजा कनिष्क फार शूर होता. कनिष्कानंतर अवंतीत वीर विक्रमादित्य शासन आले. त्याने गुजरात, माळवा, सिंध, पंजाब जिंकला. याच काळात इ.सन पूर्व ७८ मध्ये पंजाबातील गुर्जर प्रदेशातील म्हणजे गुजरातमधील गुर्जर व त्याच सोबत बरेचशे कुर्मी लोक मथुरामार्गे आनर्त देशात ५साहतीस गेले. नंतर दुसरी कुर्मी टोळी पंजाबहून कोटा व मंदसोरमार्गे माळव्यात गेली. त्यांनी पंजाबातील करडवाचे कडवा कुर्मी व लेया प्रदेशस्थ लेवा कूर्मी ही नावे धारण केली.

तेथून गंगा-यमुना तिरी, उत्तर हिंदुस्थान, मध्य हिंदुस्थान, मध्यप्रांत, खानदेश पर्यंत विस्तारलेत. (कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, पृष्ठ ४५ वरून). असे बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम ९ वरून डॉ. मंगूभाई पटेल कु.पा.इ., पृष्ठ ४५ वर लिहितात.

तसेच, भारतीय संस्कृती कोश खंड १०, संपादक **महादेव शास्त्री जोशी,** पृष्ठ ११३ वर सूर्यवंशाबद्दल पुढील पुराणांतर्गत लिखाण सादर करतात ते असे :- श्री. महादेव शास्त्री जोशींच्या मते, १. वैवस्वत मनु हा सूर्यवंशाचा मूळ पुरुष होय. २. त्याचा पुत्र ईक्ष्वाकू हा अयोध्येचा राजा झाला. ३. ईक्ष्वाकूनंतर विकुक्षी, ४. विकुक्षीचा पुत्र पुरंजय उर्फ कुकुत्स्थ हा होय. त्याचा सहावा वंशज श्रावस्त याने श्रावस्ती वसविली. तो उत्तर कोशलची राजधानी झाली. श्रावस्तचा नातु कुवलाक्ष्व उर्फ धुंधुमार. त्याचा आठवा वंशज युवनाश्व दुसरा. त्याचा पुत्र मान्धाता याची पत्नी यादव वंशातील बिंदुमती होती. मान्धातानंतर त्याचा पुत्र पुरुकुत्स सिंहासनाधीश झाला. याचे धाकटे बंधू अंबरीष व मुचकुंद हे होत. मान्धाताची पत्नी नर्मदा होती. पुरुकुत्सानंतर पुढे सात-आठ राजानंतर, १. भयारुण, सत्यव्रत, २. त्रिशंकू, ३. हरिश्चंद्र असे तीन राजे झाले. हरिश्चंद्राचा सहावा वंशज बाहू हैहयाने आयोध्या जिंकली. पण बाहुपुत्र सगराने अयोध्या पुन्हा जिंकली. सगरानंतर त्याचा नातु अंशुमन राजा झाला. त्याचे वंशज भगीरथ होय. त्याच्यानंतर अंबरिष ऋतुपर्ण, सुदास, मित्रसह (कल्माषपाद) हे राजे झाले. दहा-पंधरा राजानंतर दिलीप दुसरा हा राजा झाला. त्याचा पुत्र रघु व रघुचा पुत्र अज व अजाचा पुत्र दशरथ आणि दशरथाचा पुत्र राम होय. (वायुपुराणात नंतरची माहिती पहा). रामाचा पुत्र कुश, याला कुशस्थली व लवाला उत्तर कोशलचे राज्य मिळाले. श्रावस्ती ही त्याची राजधानी होय. रामाचा ज्येष्ठ पुत्र कुश, याच्या ३० वंशजांची नामावली वायूपुराणात आहे. त्यातील बृहदबल राजानंतरची २६ नावे अन्य पुराणात दिली आहेत. अयोध्येचा शेवटचा राजा क्षेमक हा मगध सम्राट महायद्मानंद याचा समकालीन होता. लवाचा वंशज प्रसेनजीन हा गौतमबुद्धाचे समकालीन होता.

प्रकरण ११

लेवा पाटीदार जातीचा पूर्वेतिहास भाग - १ ला

'कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा' ग्रंथात, डॉ. रामसिया सिंह, पृष्ठ ४१ वर लिहितात की, "सिंधू घाटीची सभ्यता तथा मनुर्भरतची सभ्यता समकालीन होती." आचार्य चतुरसेन लिखित 'भारतीय संस्कृतीका इतिहास', पृष्ठ ९० चा आधार देऊन, डॉ. सिंह लिहितात की,- "मोहेंजोदाडो व हडप्पाची सिंधूघाटी संस्कृती पुरातत्त्वविद. इ.सन पूर्व ३२५० वर्षापूर्वीची मानतात. हाच काल मनुर्भरत सभ्यतेचा असावा किंवा या सभ्यतेचे लोकच स्वायंभूव प्रजापती मनुर्भरत असावेत."

प्राचीन विश्वात १. मनुर्भरत वंश, २. सूर्यवंश, ३. सोम उर्फ चंद्रवंश हे प्रमुख तीन वंश नांदले. त्यापैकी मनुर्भरत वंशाचे आदिपुरुष हे स्वायंभूव मनू असून विश्वातील आद्य मनु होत. पुराणात असे १४ मनू कल्पिले आहेत, ते असे- १. स्वायंभूव मनू, २. स्वाराचिष, ३. उत्तम, ४. तामस, ५. रेवत, ६. चाक्षुस, ७. वैवस्वत (वर्तमान मनू), ८. सावर्णी, ९. दत्त सावर्णी, १०. ब्रह्म सावर्णी, ११. धर्म सावर्णी, १२. रुद्र सावर्णी, १३. दैव सावर्णी, १४. इंद्र सावर्णी.

वरील स्वायंभूव मनुला प्रियव्रत व उत्तानपाद हे दोन पुत्र व काकूति, प्रकृति व देवहुती या तीन मुली होत्या. प्रियव्रत व उत्तानपादांचे वंशज मनुर्भरत प्रजापती होत. त्यांच्या ४५ पिढ्या झाल्या. त्या वंशात अंतीम ४५ व्या पिढीत दक्ष जन्मला. त्याला ६० मुली होत्या.

स्वायंभूव मनू व त्याची पत्नी शतरूपा जगावर राज्य करीत, पण त्याचे वंशातील नाभि महाराजांचा पुत्र श्री. ऋषभदेव हा जैनांचा गुरु व तीर्थंकर मानतात. ऋषभदेवाचा पुत्र भरत उर्फ जडभरत उर्फ मनुभरत नावाने प्रसिद्ध होता. त्याचेच नावावरून या देशास 'भारतवर्ष' म्हणतात.

प्रियव्रतो नाम सुतो नमो: स्वायंभूवस्वह ।
तस्याग्नीन्ध्रस्तत: नाभि: ऋषभतस्य सुतस्तत: ।
अवतीर्ण पुत्रशतं तस्मासीद ब्रह्म पाश्याम ।
तेषां वै भरतो ज्येष्ठो नारायण परायण: ।
विख्यात वर्षमेतद्यन्नाम्ना भरतमुत्तमम् ।। श्रीमद भागवत प्र.अ. १३१.

प्रियव्रताचे भारतात तसेच, भारताबाहेरही साम्राज्य होते. त्याचा पुत्र अग्नीन्ध भारतातच राहिला. त्याचे २ पुत्रात राज्य विभागल्यावर नाभि भारतातच राहिला, व अन्य पुत्रांनी भारताबाहेर साम्राज्ये चालविली. चाक्षुष मन्वंतरात भारतवंश विस्तारला. पृथुवैन्य प्रथम राजा झाला. याच पृथुवैन्यकाळात वेदरचनेस प्रारंभ झाला. भूमी समतल केली. कृषी प्रारंभ झाला. नगरे वसलीत. याच वंशात पुढे प्रचेतसने जंगल सोडून स्थायी वस्तीने कृषीकर्म आचरिले.

चाक्षुस मनुला १. अत्यराति जानंन्त पति, २. अभिमन्यु, ३. उर, ४. पूर, ५. तपोरत हे पाच परम प्रतापी पुत्र सम्राट होते. त्यांनी भारताबाहेरही साम्राज्य विस्तारले. उरचा दुसरा पुत्र अंगिरा होता. अत्यरती जानन्तपती यांची गणना जगातील प्राचीन बारा चक्रवर्तीत केली जाई. त्याचे समुद्रापर्यंत राज्य होते.

अंगिराची राजधानी पूर ही पुनलिया नामक स्थळ एलबूर्ज(इराणी बैकुंठ)चे जवळ आहे.

आचार्य चतुरसेनच्या मते देवासूर संग्राम झाला. देव, दैत्य, दानव, नाग, गरुड आदी दायाद बांधव लोक कश्यपसागर तीरावर रहात होते. त्यांचेतील सत्तासंघर्ष पुराणात देवासूर संग्राम म्हणून

गाजला. हिरण्यकश्यपु ते नहुषाचा बंधू रविपर्यंत किंवा बाणासूरापर्यंत सुमारे ३०० वर्षात १२ देवासूर संग्राम झाले. नहुषपुत्र रवीने ही जागतिक युद्धे समाप्त केली.

पाचव्या देवासूर तारकामय संग्रामात दैत्यराज पुत्र विरोचनाचा इंद्राने वध केल्यावर भारतात आर्यावर्तांची स्थापना झाली. पुढे आग्नेय, द्रविड व आर्यांनी भारतात वास्तव्य केले. उत्तानपाद शाखेपासून भारतीय मनुर्भरत राजवंशातील ४५ व्या पिढीतील दक्षराजा नंतर तो वंश समाप्त झाला. या मनुर्भरत वंशराजास प्रजापती मनुर्भरत म्हणत. यांनीच भारतात आर्य वसाहत प्रथम वसविली.

प्रियव्रत शाखेतील पृथुवैन्यने सुसंघटित समाज संस्थापिला. प्रारंभी सूर्य, सोम व मनुर्भरत ह्या तिन्ही वंशात परस्पर विवाह होत असत.

स्कंध पुराण, सह्याद्रि खंड, अध्याय ३३, श्लोक ६४ मध्ये वर्णिलेला सूर्यवंश क्षत्रियातच गणला गेला होता. **कूर्म ऋषीसूत कौर्मिपासून कुर्मी, कुणबी शब्द निघाले. हे कूर्मी लोक याच वंशातील होत. कुर्मीशिवाय इतर क्षत्रियांची नावे कूर्मवंशी नावाने प्रसिद्ध नाहीत.**

गुणकर्मस्वभावातील परिवर्तनाने मनुष्याचा चातुवर्ण्यातील वर्णही बदलतो अशी पूर्वी वर्णव्यवस्थेत गतिमान परिवर्तनशीलता होती. मनस्मृतीतील पुढील श्लोकात ही दिसतेच.

"शूद्रो ब्राह्मणतामेति ब्राह्मणश्चैति शूद्रताम् ॥
क्षत्रियाज्ज्यातमेवस्तु विद्याद्वैश्या तथैव च ॥ तसेच,
जन्मनः जायते शूद्रः संस्काराद्विज उच्चते ।
वेदपाठाद् भवेद विप्रो ब्रह्म जानाति ब्राह्मण ॥" (मनुस्मृति)

म्हणजे जन्माने सर्व शूद्र असतात नंतर संस्काराने त्यांना वर्ण प्राप्त होतो. जन्माने नव्हे. हे पटविण्यासाठी महाभारतातील एक दाखला पहा-

गणिकागर्भ सम्भूतो वशिष्ठश्च महामुनिः ।
तपसा ब्राह्मणो जातः संस्कारस्तत्र कारणम् ॥
जाती व्यासस्तु कैवर्त्याः श्वपच्यास्त पराशरः ।
बह्ववोऽन्येपि विप्रत्वं प्राप्ता ये पूर्वमाद्विजाः ॥ महाभारत

या आधारावरच क्षत्रिय कुलोत्पन्न विश्वामित्र, वेश्यापुत्र, जाबाल, वैश्य कुलोत्पन्न वसुकरण आणि तुलाधार, शूद्र कुलोत्पन्न कवध, एलुष, चाण्डाल कुलोत्पन्न मातंग आणि धर्मव्याध, दासीपुत्र कक्षीवान आदिंनी विद्या प्राप्तीनेच ऋषीपद म्हणजे ब्राह्मणत्व प्राप्त केले होते. पाराशर ऋषि चाण्डाल कन्येपासून जन्मले. केवट कन्यापोटी व्यास जन्मले. वेश्यागर्भातून वशिष्ठ जन्मले. हे सर्व तपोबलानेच ऋषिपदी गेले. म्हणूनच "लक्ष्मणराय: रिसर्च प्रास्पेक्टस्, १९८४," काशी हिंदू विश्व विद्यालय द्वारा १९८९ मध्ये प्रकाशित झालेले संपादक, ओ.पी. टंडन, पृष्ठ ४१५ मध्ये परचक्रे या क्षत्रियांनीच निप्रभ केली.

'कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा', पृष्ठ ३३ वर, डॉ.सिंहानी साधार संशोधन केले की प्रारंभकाळात क्षत्रियांना समाजात प्रथम स्थान प्राप्त होते. ते सर्वश्रेष्ठ मानले जात होते. **वैदिक व पूर्व वैदिक कालात क्षत्रिय वर्ण सर्वश्रेष्ठ समजला जाई, पण उत्तर वैदिक कालात वर्णवर्चस्वाबाबात चुरस निर्माण होऊन ब्राह्मण वर्ण स्वत:चे श्रेष्ठत्व प्रस्थापित करू लागला.** त्यातूनच **ब्राह्मण-क्षत्रिय संघर्षास सुरुवात झाली. विश्वामित्र क्षत्रिय व वशिष्ठ ब्राह्मणांचा संघर्ष या दृष्टीने अभ्यसनीय आहे. याप्रकारे सामाजिक प्रधानता प्राप्तीस्तव हा वर्णवर्चस्वाचा ब्राह्मण व क्षत्रियात दीर्घकाळ संघर्ष चालला.**

उत्तर वैदिक काळात वाढत्या यज्ञप्रथेमुळे यजमान क्षत्रियापेक्षा याचक पुरोहितांचे महत्त्व वाढत जाऊन ब्राह्मण वर्णाने क्षत्रिय वर्णियांचे श्रेष्ठत्व झुगारून दिले. क्षत्रिय शासकावर उपजिवेकासाठी

ब्राह्मण याचक प्रारंभी आश्रित असल्याने ही स्थिती उद्‌भवली, व वर्णवर्चस्वासाठी ब्राह्मण-क्षत्रिय संघर्षाचे बीजारोपण होऊन ती सतत वाढतच गेली. विषयांतर होईल म्हणून त्याचे वर्णन पुढे स्वतंत्र प्रकरणात करू. असो. कूर्मक्षत्रिय उर्फ कूर्मी हे आद्य मानव जातीचे संघटक शासक होते. युद्धात मिळालेली संपत्ती, पशू, कृषि व व्यापारात प्राप्त वलि (कर) तथा वेतन हा क्षत्रियांचा आर्थिक आधार होता.

''पुलिन्दाश्च सुमिनाश्च रूपया: स्वापदै सह ।
तथा करूमिनश्चैव सवे चैव कठाक्षरा : ।।
- मार्कण्डेय पुराण ५७/५०

पुलिन्द व सुमिन नामक प्राचीनतम देशासोबत करूमिन देशाचा उल्लेख येतो यातील कुरूमी शब्दावरून कूर्मीयांची प्राचीनता दिसते. बहुधा ब्राह्मणवर्णनिर्मितेचेही अगोदर कूर्मीवंश प्राबल्य होतेच. इ.सन ६०६ मध्ये हर्षवर्धनाचे राज्यात बाणभट्टाने लिहिलेल्या 'हर्षचरित' नामक ग्रंथाचे ७ व्या उच्छ्‌वासात 'कुटुम्बिक' शब्दप्रयोग केला आहे. डॉ. सिंह कु.क्ष. कीर्तिकथा, पृष्ठ ३४ 'कुटुम्बिक' शब्द हा कुणबी जातीचा बोधक दर्शविला. शेकडो वर्षांनंतर 'कुटुम्बी' शब्दातील मधल्या 'ट' वर्णाचा लोप होऊन कुटुम्बी > कुम्बी > कुणबी शब्द उत्पन्न झाला.

डॉ. वासुदेव शरण अग्रवालकृत 'हर्षचरित का एक सांस्कृतिक अध्ययन' या ग्रंथाधारे डॉ. सिंह बाणभट्टाच्या लिखाणात कुणबी जाती या अर्थाने आपल्या ग्रंथात, पृष्ठ ३४ वर तसे निर्देशितात. भगवान बुद्धकाळातही कुशीनारा, पावा व आनुपिया देशात मल्ल नामक कूर्मी क्षत्रियांची राज्ये होती. यावरून कूर्मी क्षत्रियांची प्राचीनतम श्रेष्ठता दिसून येते.

'महाभारत युद्धकाल निर्णय समस्या' लेखक- श्रीराम साठे, आवृत्ती १९८७, पृष्ठ २७ चे आधारे मॅक्समुल्लरने आर्यांचा, भारतावरील आक्रमण काळ ख्रिस्तपूर्व १५०० ठरविला. तर वेदकाळ ख्रिस्तपूर्व १२०० हा निश्चित केला आहे.

यूथ कॉम्पिटिशन टाईम्स, प्रधान, संपादक- श्री. आनंदकुमार महाजन, या ग्रंथात, पृष्ठ १९ व पृष्ठ ३४ वर **हिंदूच्या प्राचीनतम ऋग्वेदाचा रचनाकाल इ.सन पूर्व १५०० ते १००० हा आहे.**

ह्यानंतरचा काळ इ.सन पूर्व १००० ते ६०० हा उत्तर वैदिक काळ होय. या काळातच सामवेद, यजुर्वेद, अथर्ववेद, ब्राह्मण ग्रंथ, आरण्यक व उपनिषदे यांची रचना झाली. (यु.कॉ.टा. लेखक महाजन, पृष्ठ ३४ पहा).

इ.सन पूर्व ६०० च्या सुमारास उपनिषदांचे संकलन झाले. (यु.कॉ.टा., ले. महाजन, पृष्ठ ३१) प्रसिद्ध विद्वान मैकडोनल्डच्या मते मूळ रामायण इ.सन पूर्व ५०० मध्ये रचले गेले. (यु.कॉ.टा., पृष्ठ ३१ पहा). हॉपकिन्स महाभारत रचना-काल इ.सन पूर्व ४ थ्या शतकात मानतो. (यु.कॉ.टा., पृष्ठ.३३). भासचा काळ इ.सन. पूर्व ३५० आहे. (पृष्ठ ३३). तर डॉ. जयचंद्र विद्यालंकारच्या मते- महाभारत इ.सन पूर्व ५०० मध्ये रचले. (यु.कॉ.टा., पृष्ठ. ३३).

सारांश :-

इ.सन पूर्व २८०० ते इ.सन पूर्व १७७० पर्यंत सिंधू संस्कृती.
इ.सन पूर्व १५०० आर्यांचा भारतात प्रवेश काल.
इ.सन पूर्व १५०० ते इ.सन पूर्व १००० ऋग्वेदरचना-काल. वैदिक संस्कृती काळ.
इ.सन पूर्व १००० ते ६०० उत्तर वैदिक काल. यात सामवेद, यजुर्वेद, अथर्ववेद रचना झाली. ब्राह्मण ग्रंथ, आरण्यके, उपनिषदे रचली.
इ.सन पूर्व ९०० भारतीय महायुद्धाचा काळ.
इ.सन पूर्व ८०० आर्यांचे दक्षिण भारताकडे प्रयाण (पृष्ठ २६ पहा.)

इ.सन पूर्व ५०० ते ४०० मूळ महाभारत रचना.
इ.सन पूर्व - ३५० कवी भासाचा काळ.
इ.सन पूर्व ६०० ते इ.सन पूर्व ३०० सूत्र साहित्य (कल्पसूत्र, गृहसूत्र, धर्मसूत्र) रचले.
इ.सन पूर्व २०० ते इ.सन पूर्व २०० मनस्मृतीची रचना.
इ.सन पूर्व ८०० मध्ये पाणिनी झाला. येथपर्यंतचा काल **श्रुतिकाल** होय (वैद्य, पृष्ठ २)
इ.सन पूर्व ८०० ते इ.सन पूर्व ६०० (**स्मृति काल**) व इ.सन ६०० ते इ.सन १४०० चा **भाष्य-काल** होय.
इ.सन पूर्व १०० च्या आसपास मनुस्मृति लिहिली असावी. (सं.वा.इ., वैद्य, पृष्ठ ३)
इ.सन पूर्व १७० ते १५० या काळात सुमती भार्गवने मनुस्मृती लिहिली व पुष्यमित्राने इ.सन पूर्व १८५ मध्ये ब्राह्मणी क्रांती करून पुढे हिला कायद्याचे रूप दिले. (ब्राह्मणशाहीचा विजय, ले.-डॉ.भि.रा. आंबेडकर, पृष्ठ ७ पहा).
इ.सन १०० ते ३०० याज्ञवल्क्यस्मृती.
इ.सन पूर्व ५०० पर्यंत श्रीकृष्ण व बळरामाचे द्वारकेवर राज्य.
इ.सन १४० मध्ये माळवाधिपती क्षत्रप जयदामाने सौराष्ट्रात येऊन गिरीनारला राजधानी केली. याच काळात ईडर व बासवाडा प्रदेशात कुणब्यांनी येऊन वडनगर (आनर्तपूर) व श्रीस्थल (सिध्दपूर) येथे वस्ती केली.
इ.सन १४४ मध्ये लवाचा ५९ वे पिढीतील कनकसेन ने पंजाब सोडून राजस्थानमार्गे गुजराथेत येऊन वस्ती केली. त्याने वल्लभीपूर (विजयपूर) वसविले. व सौराष्ट्रात राज्य उभारले. (पाटीदारोंका इतिहास, ले. केशवलाल पटेल, पृष्ठ २०) व (आपले लेवा परिवार वर्ष १ अंक २ पृष्ठ ५).
इ.सन ३०० ते ४०० नारद स्मृती.
इ.सन ३०० ते ५०० पाराशर स्मृती.
इ.सन ३०० ते ५१० बृहस्पती स्मृती.
इ.सन ४०० ते ६०० कात्यायन स्मृती.
इ.सन ३९९ दुसऱ्या चंद्र गुप्तकाळात फाहायने आला होता.
इ.सन ६२९ हर्षकाळात हुएनत्संग भारतात आला होता.
इ.सन पूर्व ५०० ते इ.सन ५०० संगम साहित्य रचना काल.
इ.सन पूर्व ५६३ ते इ.सन ४८३ सिद्धार्थ गौतम बुद्ध
इ.सन पूर्व ५४० ते इ.सन पूर्व ४६८ जैनधर्मी वर्धमान महावीर.
इ.सन २०० ते ४०० श्रीमत भगवतगीता रचली. (ब्राह्मणी साहित्य, ले.डॉ. आंबेडकर, पृष्ठ ८).
इ.सन ७८८ ते ८२० श्रीमत् आद्य शंकराचार्य
इ.सन १०१७ ते ११३७ रामानुजाचार्य
इ.सन ११६२ निबांर्काचार्य
इ.सन ११९७ ते अंदाजे १२०६ माधवाचार्य
इ.सन १११७ ते वल्लभाचार्य
इ.सन २०० ते ६०० मार्कंडेय पुराण
इ.सन २०० ते ५०० वायुपुराण व ब्रह्मांड पुराण.
इ.सन १०० ते ३५० विष्णुपुराण.
इ.सन ३२५ ते ११०० मत्स्य पुराण.
इ.सन ५०० ते ६०० भागवत पुराण

इ.सन ५५० ते १००० कुर्म पुराण
इ.सन ७०० ते १००० वामन पुराण
इ.सन ८०० ते १५०० वराह पुराण
इ.सन ६०० ते ९५० पद्म पुराण
इ.सन ८७५ ते १००० बृहत् नारदीय पुराण
इ.सन ८५० ते ९०० अग्नीपुराण
इ.सन ८५० ते १००० गरुड पुराण
इ.सन ९०० ते १००० ब्रह्म पुराण
इ.सन ७०० नंतर स्कंध पुराण
इ.सन ७०० नंतर ब्रह्म वैवर्त पुराण
इ.सन ५०० नंतर भविष्य पुराण
इ.सन ७१२ मुस्लीमांचे पहिले आक्रमण- इब्से कासीमने केले.
इ.सन २०० ते ४०० च्या गॉर्बेच्या मते गीता ग्रंथ रचला. (ब्रा.सा.,पृष्ठ ८).
इ.सन २०० च्या सुमारास वेदान्त सूत्रे रचल्याची प्रा. कीथ म्हरतात. (ब्रा.सा., पृष्ठ १५)
इ.सन २०० ते ४०० प्रा. हापकिन्सच्या मते महाभारत रचना (ब्रा.सना., पृष्ठ १५)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'ब्राह्मणी साहित्य', पृष्ठ २० परिच्छेद ३ मध्ये लिहितात की (भाषांतर: बाबा दळवीकृत) **"ब्राह्मणांनी लिहिलेला सर्व इतिहास तारखा नसलेला इतिहासच आहे."**

तसेच, Who were the shudras ?, म्हणजे 'शूद्र मूळचे कोण होते ?' या ग्रंथाचे लेखक डॉ.बाबासाहेब भि.रा. आंबेडकर, पृष्ठ १०८ वर लिहितात की, **"आपल्या मनाला पोषक अशा शब्दांच्या खोट्या व्युत्पत्या तयार करणे** ही एक मोठी कला आहे. आणि **ह्या कलेत ब्राह्मण ग्रंथकारांचा जगात कोणीही हात धरू शकणार नाही.** संस्कृत भाषेत असा एकही शब्द मिळणार नाही की ज्याच्याबद्दल ब्राह्मण ग्रंथकार व्युत्पत्ती तयार करून ठेवणार नाही. उपनिषद या शब्दाच्या व्युत्पत्त्या निरनिराळ्या ब्राह्मण ग्रंथकारांनी निरनिराळ्या सांगितल्या आहेत. या संबंधी प्रो. मॅक्समुल्लरांनी पुढील विचार प्रदर्शित केले. (Upanishads-Introduction p.p. 64-71).

"ब्राह्मण-ग्रंथकारांनी या बाबतीतील स्पष्टीकरणे जाणूनबुजून इतकी उलटी पालटी मांडली आहेत की त्यांच्यातील एकमत कोणत्या स्पष्टीकरणाबद्दल आहे हे समजून घेणे कठीण झाले आहे."

ब्राह्मण-ग्रंथकारांच्या या साहित्य प्रदूषक वृत्तीमुळे काही जाणकार ब्राह्मण-ग्रंथकारांचे संदर्भादाखल आधार घेत नाहीत. व इतरांनी घेतलेले ब्राह्मणी आधार ते विश्वसनीय मानत नाही. असो.

पुराणांचा काळ हा बौध्दकाळानंतरचा काळ आहे. पुष्यमित्राच्या नेतृत्त्वाखाली ब्राह्मणी धर्माचा विजय झाल्यानंतरचे हे साहित्य आहे. (ब्रा. सा., पृष्ठ २०). वरील बरेचसे 'ब्राह्मणी साहित्य' ले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर (भाषांतर, बाबा दळवी,) सुगावा प्रकाशन, पुणे ३० या. ता. ३-१०-१९९५ च्या आवृत्तीतून घेतले आहे.

वरील ब्राह्मणी साहित्याच्या आधारे आर्यांच्या प्रगतीचा आलेख सापडतो. या काळावरूनच समस्त कुणबी जातीचा आणि त्यातील लेवा पाटीदार शाखेचा इतिहास शोधावा लागेल. कारण तो स्वतंत्र असा अद्याप लिहिलेला नव्हता. त्यातही ब्राह्मणांची क्षत्रियाविषयी पूर्वापार वर्णवर्चस्वाच्या चुरशीने असूया वृत्ती जन्मून कुलमी क्षत्रियाबाबात केलेले उल्लेख हे कलुषित दृष्टीकोनाने ग्रस्त असणारच. त्याला इलाज नाही. म्हणून सत्यकथनास्तव परदेशी, परकीय, परधर्मीय तथा ब्राम्हणेतर साहित्य प्रमाणभूत मानायला हरकत नाही.

पूर्वी "संवत्सर गणना पद्धतीचा कालगणनेसाठी वापर अल्प प्रमाणात असल्याने **काल गणना, राजांचे शासन काल व पिढ्या यावरून करीत असत.** भाट व स्तुतिपाठक कवी यासारखे राजदरबारातील लोक अशा वंशावळ्या लिखित अथवा मुखोद्गत ठेवीत असत... हस्तीनापूर च्या चंद्रवंशी व अयोध्येच्या सूर्यवंशी राजवंशाची महाभारत युद्धापासून १४६८ वर्षांची अशा प्रकारची माहिती मिळते." (म.का.ले., श्रीराम साठे, पृष्ठ २).

पूर्वी "सूत अथवा चारण किंवा भाट यांच्याकडे हीच (इतिहास लेखनाची) कामगिरी होती... पिढ्यान् पिढ्या या पेशाचे लोक निरनिराळ्या भाषांतून इतिहास-कथनाचा कार्यक्रम करीत देशभर फिरत. 'व्यास' म्हणजे संकलनकार : पिढ्यान्पिढ्या इतिहास जतन करीत सूत आणि व्यासाच्या संज्ञेने ओळखलेले हे लोक भारतात हजारो वर्षे कार्यरत आहेत." (म.का., ले. - श्रीराम साठे, पृष्ठ ६). "पुराणांतील कालक्रम फार अस्पष्ट आहे. व **ब्राह्मणांनी स्वत:चे महत्त्व वाढविण्याकरिता भारताचे प्राचीनत्व वास्तवापेक्षा अंतिरंजित केले आहे. (म.का., ले. श्रीराम साठे, पृष्ठ १०). श्री साठे यांच्या मते भारतीय इतिहासकारांचे लिखाण भोंगण व अतिरंजित असते." (म.का., ले. साठे, पृष्ठ १६).**

"राजांच्या वंशावळी ही पुराव्यांच्या दृष्टीने उत्तम प्रकारची साधनसामुग्री ठरते. अशा वंशावळ्या पुराण ग्रंथातून व महाभारतातून उपलब्ध आहेत." (पृष्ठ ३९) **"राजवंशाच्या अंमलाबाबात विविध पुराणांतर्गत माहितीचा सुवर्णमध्य स्वीकारून 'कलियुगराज वृत्तांत' तयार करण्यात आला होता. या संस्कृत संशोधित ग्रंथात संबंधित व सर्वमान्य असा इ.सनाच्या आठव्या शतकापर्यंतचा इतिहास विस्तारश: दिलेला आहे. ('महाभारत कालनिर्णय समस्या' लेखक- श्रीराम साठे, पृष्ठ ४० पहा.)**

त्यांच्या मते "भारतीय इतिहासकारांनी भारतीय युद्धाचा काल कलियुगाच्या सुरुवातीपूर्वी ३६ वर्षे असा निश्चित केला आहे. कलियुगाची सुरुवात इ.सनापूर्वी ३१०२ वर्षे असल्याने त्यावरून भारतीय युद्धकाल इ.सनापूर्वी ३१३८ मानला जातो. तेव्हापासून आजतागायतची कालगणना यावरून मांडण्यात आलेली आहे... पण कल्हण याने इ.सनाच्या बाराव्या शतकात लिहिलेल्या 'राज तरंगिणी' ह्या ग्रंथावर उद्धृत केलेल्या वृद्धमार्गाच्या वराहमिहिराने दिलेल्या एका श्लोकावरून काहींनी भारतीय युद्धकाल २४४८ इसवी सनापूर्वी आहे असे मानले." (म.का.स., ले.साठे, पृष्ठ ८).

"भारतीय युद्ध काल २०२९ इ.सन पूर्व असावा असा निष्कर्ष पुराणांतर्गत वंशावळ्यांवरून सर विल्यम जोन्स (रॉयल एशियाटिक सोसायटीचा संस्थापक व अध्यक्ष) याने काढलेला आहे. (म.का.ले. साठे, पृष्ठ १०).

राजवंशातील या पिढ्यांच्या आधारे लेवा पाटीदार वंशावळीचा आपण पुढील प्रकरणात सविस्तर विचार करू. तूर्त लेवा पाटीदारांचे पूर्वज जे आर्य त्यापैकी एक टोळी भारतात प्रवेशिल्याचा इतिहास बघू.

भारतीय संस्कृती तथा सभ्यतेचा आधार असलेली सैंधव संस्कृती. या सैंधव सभ्यतेचा पश्चिम पंजाबातील रावी नदी तिरी हडप्पा नावाचे स्थानी शोध लागला. (यूथ कॉम्पिटेशन टाईम्स ३२/३ एच, इंडिया, अल्लापूर, इलाहाबाद - ६, फोन- ६६०६२१, प्रधान संपादक: आनंदकुमार महाजन, पृष्ठ ५ पहा.)

हडप्पाचे पुरास्थल पाकिस्तानच्या शाहीवाल जिल्ह्यात रावी नदीच्या डाव्या तीरावर नदीपासून ३.६० किलोमीटरवर स्थित आहे. (यु.कॉ.टा., ले.- महाजन, पृष्ठ ७). तसेच, काही महत्त्वपूर्ण स्थल गुजराथेत काठियावाडच्या भोगवा नदीतिरी खम्बायतचे खाडीत लोथल नामक पुरास्थल अहमदाबाद जिल्ह्यात भोगवा नदीतिरी सरगवाला गावापासून २ किलोमीटर उत्तरेस सन १९५४ साली दिसले. (यूथ कॉ.टा., पृष्ठ ९). या संस्कृतीतून शिवोपासना जन्मली. ही योनीपूजा व लिंगपूजा

अनार्य सैंधव संस्कृतीची देणगी आहे. (पृष्ठ १५ पहा.)

इ.सनाच्या दुसऱ्या शतकात आर्यांच्या आगमनानंतरच इतिहास काळाचा आरंभ झाला. (पृष्ठ १९). भारत जनाचा राजा सुदासचे संघटित झालेल्या दहा राजांशी परुष्णी उर्फ रावी नदी तिरी युद्ध झाले. त्यात सुदास जिंकला (यु.कॉ.टा., पृष्ठ ६९). या काळात १. सिंधू, २. वितस्ता (झेलम), ३. असवनी (चिनाब), ४. परुष्णी (रावी), ५. बिपाशा (व्यास), ६. शतुद्रि (सतलज), ७. सरसुती (सरस्वती) ह्या सात नद्याकाठच्या समसिंधूनामक प्रदेशात वैदिक संस्कृती जन्मली. सृजय व त्याचे मित्र भरतजन हे दल तसेच, यदू, तुर्वश, अनु, दहयू व पुरु मिळून संबोधिलेल्या पंचजन यांचे दल असे दोन्ही दल इंद्रोपासक होते. (यु.कॉ.टा., पृष्ठ १९) या काळी वैदिक संस्कृतीत आंतरजातीय विवाह रूढ होते. बालविवाहाची प्रथा नव्हती. (पृष्ठ २१) पुनर्विवाह एवंम् नियोग प्रथा प्रचलित होती. विधवा विवाह होत. विवाहाचा मुख्य उद्देश पुत्रप्राप्ती करणे हा होता. स्त्री स्वातंत्र्य होते. ऋग्वेदातील घोषा, लोपामुद्रा, आदी स्त्रिया सुस्थितीत होत्या. मुलींना वैदिक शिक्षाही मिळत होती. 'सवितृ' व 'विवस्वान' मूलत: सूर्याची विशेषणे होती. परंतु, सूर्यदेवता मानली गेली व लोक सूर्योपासक बनले. पंजाबात मूलतान येथे पूर्वी फार मोठे सूर्य मंदिर बनविले होते. (यु.कॉ.टा., पृष्ठ ५७) पण इस्लामी आक्रमणानंतर ते उद्ध्वस्त झाल्यावर भारताच्या पूर्व किनाऱ्यावर आर्यांनी कोणार्कला सूर्य मंदिर उभारले. तसेच, (यूथ कॉम्पिटिशन टाईम्स, पृष्ठ ८७ वरील) मंदसोरचे उभारले. असा **ऋग्वेदकालीन समाज प्रारंभी वर्णभेद रहित एकसंघ होता. (यु.कॉ.टा., पृष्ठ २२ पहा.)**

ऋग्वेदात वर्णव्यवस्थेचे जे किंचित (उगवते) रूप सापडते ते जन्मावर नसून कर्मावर आधारित होते. (यूथ कॉ.टा.,लेखक महाजन, पृष्ठ २२ व २४ वर पहा). ऋग्वेदकाळी व्यवसाय स्वातंत्र्य नव्हते, असा एकही पुरावा मिळत नाही. (पृष्ठ २३ पहा). **ऋग्वेदात मंदिर व मूर्तीपूजा याचा उल्लेख नाही. स्तुति व भजन हीच त्यांची देवपूजा होती (पृष्ठ २३ पहा).**

क्षत्रिय व ब्राह्मण हे दोन्ही वर्ण जन्मजात नसून योग्यता व कर्मावर आधारित होते. (यु.कॉ.टा., पृष्ठ २४). "जन्मना जायते शूद्र संस्कारात द्विजं उच्यते." ही परिस्थिती पुढेही चालूच असल्याचे दिसते. श्रीमद् भगवदगीतेतही 'चातुवर्ण्यं मया सृष्टम् गुणकर्म विभागश: ।' (गीता अ-४ श्लोक १३, चरण १ला पहा.) तसेच. गीता अ-१८ श्लोक ४१ मध्ये 'ब्राह्मण क्षत्रिय विशां शूद्राणामच परंतप । कर्माणि प्रविभक्ता नि स्वभाव प्रभवैर्गुणै ॥४१॥' मूळ मानवी गुण स्वभावावरून भेद पडल्याचे दिसते. 'जन्म प्रभवैर्गुणै:' असे गीतेत म्हटले नाही.

तसेच. **दगडाच्या देवात देवत्व न मानणारे आर्य लोक** "ईश्वर: सर्व भूतानां हृद्देशेर्जून तिष्ठति ।" (भ.गीता.अ. १८. श्लो. ६१) सर्व प्राणीमात्रात ईश्वर अनुभविणारा हा ऋग्वेदकालीन समाज प्रारंभी वर्णभेदरहित एकसंघ होता. (यु.कॉ.टा., पृष्ठ २२). या काळी इंद्र, वरुण, विष्णु, उषा, अदिती, मरुत, सोम आदी देवता कल्पून पुजल्या जात. इ.सन पूर्व १५०० ते १००० या ऋग्वेदकाळी एकेश्वरवाद असून 'सत्' हे तत्त्व प्रधान मानले जाई.

त्यानंतरचा **इ.सन पूर्व १००० ते ५०० हा उत्तर वैदिक काळ होय. या काळातच वर्णव्यवस्था (म्हणजे चातुर्वर्ण्य) जन्मली.** (यु.कॉ.टा., पृष्ठ २४ व ३० पहा.) जणू ऋग्वेदकाल (इ.सन पूर्व १५०० ते १०००) हा कृतयुग उर्फ सत्ययुगाचा काळ होय. पण त्यानंतरचा उत्तर वैदिक काळ हा त्यापेक्षा भ्रष्टकाळ जणू सत्ययुगानंतरचे त्रेतायुगच होय. या काळात ऋग्वेदकलीन मानवधर्म भ्रष्ट झाला. या उत्तर वैदिक काळात कुरू, पांचाळ, कोशल, काशी तथा विदेह ही प्रमुख राज्ये होती (यु.कॉ.टा., पृष्ठ २५). **ऋग्वेदकाळी फक्त ब्राह्मण व क्षत्रिय ह्या दोन वर्णाचीच निर्मिती झाली**, व दोन्ही वर्ण जन्मजात न होता योग्यता व कर्मानुसार मानले गेले (पृष्ठ २४ पहा). कर्मकांडांचा अतिरेक व

विकास उत्तर वैदिक युगात झाला (पृष्ठ २६ पहा). ऋग्वेदकालानंतर वैश्य व शूद्र वर्णांचा उदय झाला.

पुराणात महाभारत काल इ.सन पूर्व ३०१२ मानतात, पण इ.सन पूर्व ९०० मध्ये महाभारतयुद्ध झाले. पुराण रचना वैदिक साहित्यानंतर झाली. महाभारत रचना इ.सन पूर्व ५०० व रामायणाची इ.सन पूर्व ६०० मध्ये मानतात (यु.कॉ.टा., पृष्ठ २६ पहा). उत्तर वैदिक काळात मांसाहार प्रचलित होता (पृष्ठ २७ पहा).

इल सूर्यवंशी, चंद्रवंशी, विष्णु प्रभात काळच्या तीव्र सूर्याचे साकार रूप आहे. (यु.कॉ.टा., पृष्ठ ३०). उत्तर वैदिक काळात अनुलोम विवाह होते. कारण, क्षत्रिय लोपामुद्रेने अगस्ती ब्राह्मणाशी विवाह केला होता. तसेच, अत्रिचा विवाह क्षत्रिय राजकुमारीशी झाला होता. उत्तर वैदिक काळात राजांचे निर्वाचन होई (यु.कॉ.टा., पृष्ठ ३१). **नंतर इ.सन पूर्व ५०० ते इ.सन ५०० पर्यंतचा काळ संगम युग होय.**

उत्तर वैदिक काळात (इ.सन पूर्व १००० ते इ.सन पूर्व ५००) वर्ण व्यवस्थेचा जसा उदय झाला (पृष्ठ २४). तसेच, याच काळांत यज्ञ संस्थाही उगवली. याचकाळात कर्मकांडावर विश्वास वाढला (पृष्ठ २६). राजसूय, अश्वमेघ, वाजसेन, अग्नीस्टोम, व पंचमहायज्ञ याच उत्तर वैदिक काळात (इ.सन पूर्व १००० ते इ.सन पूर्व ५००) होऊ लागला. गृहस्थी जीवनात पंचमहायज्ञाची आवश्यकता मानली जाऊ लागली (पृष्ठ २६). **त्यामुळे पुरोहितवर्ग परान्नपुष्ट बनला.** सामान्य कष्टकरी प्रजेचे त्यांचेकडून कमालीचे शोषण होऊ लागले. ब्राह्मणशाहीचा उदय झाला. ब्राह्मणधर्म फोफावला. ब्राह्मणी साहित्य निर्मिती झाली. अधिक माहितीसाठी डॉ.बाबासाहेब भि.रा. आंबेडकर लिखित 'ब्राह्मणशाहीचा विजय' (The Triumph of Bramhinism) चे म.य.दळवीकृत भाषांतर, सुगावा प्रकाशन, आवृत्ती १ ली, नोव्हेंबर १९९४, पुणे हा ग्रंथ वाचा. यात पृष्ठ ३ वर **"भारताच्या इतिहासाइतका धर्माचा प्रभाव इतर कोणत्याही देशातील इतिहासावर दिसून येत नाही. भारताचा इतिहास हा बौद्धधर्म व ब्राह्मणधर्म यातील मरणांतिक संघर्षाचा इतिहास आहे." याच काळात ब्राह्मणवर्गाने केलेल्या अत्याचाराने चिडून महाविरांनी जैनधर्म स्थापन केला.** आक्सफोर्ड इंग्लीश शब्दकोशात (The little Oxford Dictionary of current English by Georgo ostper (Printed in Great Britain) आवृत्ती ३री, सुधारीत आवृत्ती, पृष्ठ २६७ वर या शब्दाचा अर्थ (a non-Brahmani east Indian sect with doctrin like those of Buddhism) असा दिला आहे. **यावरून ब्राह्मण धर्माचे अत्याचाराचे विरोधात बौद्ध व जैनधर्म उदय पावले हे दिसते.**

"भारताच्या इतिहासातील इ.सनपूर्व १८४ मौर्यवंशाचे पतन व शुंगवंशाची स्थापना पुष्पमित्र शुंगाने केली. त्याने इ.सन. पूर्व १४८ पर्यंत राज्य केले. इ.सन पूर्व ७२ मध्ये कण्ववंश स्थापना. इ.सन पूर्व ५७ मध्ये विक्रम संवत सुरू झाला. इ.सन २७ मध्ये सातवाहन वंश स्थापला. इ.सन ७८ मध्ये शक सुरू झाला. इ.सन १०६ ते इ.सन १३० मध्ये गौतमी पुत्र शातकर्णी मेला.

अयोध्या (अवध)च्या कोशल राज्याचे पूर्वेस गंडकी नदी होती, पश्चिमेस पांचाल, दक्षिणेस सई नदी व उत्तरेस नेपाळची तराई होती. व शरयू नदीचे उत्तरेकडील उत्तर कोशल राजधानी श्रावस्ती व दक्षिण कोशलची राजधानी कुशावती होती. महात्मा बुद्धकालीन कोशल नरेश प्रसेनजित होता. व त्याचे मृत्यूनंतर ते राज्य मगध साम्राज्यात विलीन झाले. या कोशल प्रदेशातच लेवा पाटीदारांच्या पूर्वजांचा सूर्यवंश नांदला होता. म्हणजे प्रभू रामचंद्राच्या सूर्यवंशाचे हे कार्यक्षेत्र होते. या सूर्यवंशातूनच लेवा गुजर, लेवा पाटीदार कुणबी, कडवा गुजर व कडवा पाटीदारादी उपशाखा उगवल्यात.

कुलमी क्षत्रिय लेवा पाटीदार वंशाची बदलती नावे :-

मूळ इतिहास पाहता यांचा वंश कास्पियन समुद्राजवळ सुमारे ५००० वर्षापूर्वी आर्य नावाने होता. भारतात यांच्याप्रमाणेच तिकडचेच हूण, शक, गुर्जर, अरब मध्य एशियामार्गे आले. जमिनीचा शोध घेत घेत हे लोक भारतात सिंधूचे खोऱ्यात सैंधव संस्कृतीनंतर आले. त्याचे तेथील आद्य स्थान (मूळ स्थान) मूलतान असावे, ते रावी नदीतीरी प्रथम शाहीबाल जिल्हयात स्थिरावले. तेथील पंचजनाते सामील झाले. **त्या गुर्जर टोळीच्या पंजाबातील आद्य वसाहतीला गुजरात म्हणू लागले. हा भाग सप्तसिंधू प्रदेशात होता.**

त्या अनेक टोळ्या व वंशांपैकी सूर्यवंशाने अयोध्येस राज्य संस्थापले. मनुर्भरत स्वायंभूव मनुचे हे वंशज होत.

डॉ. सिंहच्या मते इ.सन. पूर्व ४०२१ मध्ये मनुर्भरत झाला. त्याचे ४५ वे पिढीत दक्ष जन्मले. म्हणून इ.सन पूर्व ४०२१ ते इ.सन पूर्व २७६१ म्हणजेच स्वायंभूव मनूपासून दक्षराजपर्यंत १२६० वर्षाचा काळ होय. यासच सत्ययुग म्हटले. महाभारत संग्राम काळ त्यांनी इ.सन पूर्व १२७७ हा मानला.

इ.सन पूर्व ४०२१ आदिपुरुष स्वायंभूव मनू पासून

इ.सन पूर्व २७६१ प्रजापती दक्षाचा काळ (मनू ते दक्ष) पर्यंत (सत्ययुग)

इ.सन. पूर्व २७६१ ते इ.सन पूर्व १६६९ पर्यंत १०९२ वर्षाचा (त्रेतायुग) (राजा दाक्ष ते राम)

इ.सन पूर्व १६६९ ते इ.सन पूर्व १२७७ पर्यंतच्या द्वापार युग (द्वापारयुग) = ३९२ वर्षे.

इ.सन पूर्व १२७७ महाभारत काल (बृहद्बल काल) ते कलियुगात आजपर्यंतचा काल

स्वायंभूव मनुची पहिली पिढी. तर दक्षाची ४५ वी पिढी मनुर्भरत वंश होय. नंतर सूर्यवंशाचे ३० व्या पिढीत प्रभू राम व ४० वे पिढीत लव-कुश झाले. ५४ वे पिढीत बृहत्बल + व्युतिताश्व + श्रुतायुच्या पिढीत महाभारत युद्ध झाले. नंतर **इ.सन १४४ कनकसेनने गुजराथेत वस्तीस प्रारंभ केला. पुढे अंदाजे इ.सन १४८७ दाताळ्यास आले.** या सूर्यवंशियांनी अयोध्येस राज्य संस्थापिले. पुढे रामपुत्र लवाने श्रावस्ती व लाहोरला राज्य केले. लवानंतर ५५ वा वंशज सुमित्र होय व ५९ वा वंशज कनकसेनाने इ.सन. १४४ मध्ये पंजाबातून गुजराथेत स्थलांतर केले. 'क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास' ह्या ग्रंथात केशवलाल पटेल यांनी हा सर्व नामक्रम आपल्या ग्रंथात दिला आहे. गुजराथेत येऊन त्यांनी वल्लभीपूर (विजयपूर) वसविले. व तेथे स्वतंत्र राज्य स्थापन केले. (पृष्ठ २० पहा), व 'उदय पुरौदय' लेखक- भारतेंदु हरिश्चंद्र ग्रंथात, पृष्ठ ६८२ वर पहा. पंजाबातील गुजराथ प्रदेशातून कनकसेन, त्याचे भाऊबंद, सहयोगी गुर्जर सौराष्ट्रात आल्यामुळे त्या सौराष्ट्राचे नाव गुजराथ पडले. (प्राचीन भारतका भूगोल, पृष्ठ ४७४, प्रकाशक- उत्तरप्रदेश शासकीय हिंदी संस्थान). मुंबई सरकारच्या प्राचीन लेखावरून व विभिन्न संशोधनावरून गुर्जर पाटीदार वर्ग वायव्य भारतातील गुजराथ प्रदेशातून सौराष्ट्र म्हणजेच नंतरच्या गुजराथ प्रदेशात येऊन राहिला.

अशी सप्तसिंधूकाळच्या गुजराथ प्रदेशातून सौराष्ट्रात आल्यावर तिथे नवा गुजराथ बनला. अशा वायव्य भारतातून गुजराथमध्ये हे लोक येण्याची पुष्टी मिळते. बॉम्बे गॅझेटियर; व्हॉल्यूम १ च अनुसार पंजाबात ही लेवा जात हल्लीही लेयाँ या नावाने विद्यमान आहे. वरील विवेचनावरून ह्या सूर्यवंशीय कुलमी क्षत्रिय लेवा पाटीदार वंशाचा अगदी प्रारंभापासून आलेख पुढीलप्रमाणे मांडता येईल :-

१ ली पिढी स्वायंभूव मनु + पत्नी शतरूपा इ.सन पूर्व ४०२१ पासून ४५ वी पिढी दक्ष प्रजापती स्वायंभूव मनुर्भरत वंशाचा अंतिम वंशज इ.सन. पूर्व २७६१

४६ वी पिढी दक्षकन्या अदिती + तिचा पती मारिची **कश्यप.**

४७ वी पिढी अदितीची १२ मुले+ आदित्य, आणि धाकटा विवस्वान उर्फ सूर्य
४८ वी पिढी विवस्वान पुत्र वैवस्वत मनु
४९ वी पिढी ईक्ष्वाकू
८४ वी पिढी सूर्यवंशात ६५ वे वंशज विष्णु पुराणाप्रमाणे, तर ३९ वे वंशज रामायणाप्रमाणे प्रभू रामचंद्राचा होय. **इ.सन पूर्व १६६९ मध्ये झाले.**
८५ वी पिढी रामचंद्रपुत्र लव
१४० वी पिढी **लवाचा ५५ वा वंशज सुमित्र होय. इ.सन पूर्व ७८ सुमारे. इ.सन पूर्व १२७७ महाभारत काल होय.**
१४४ वी पिढी **सुमित्रानंतर ४ थो पिढीत कनकसेन इ.सन. १४४ सालीपंजाब सोडून गुजराथेत (सौराष्ट्रात) वल्लभीपूरला राज संस्थापक** होय.

२१३ वी पिढी प्रस्तुत ग्रंथ, लेखक- शंकर विठोबा पाटील दुधलगावकरांची होय. कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, लेखक- डॉ. रामसिया सिंह, पृष्ठ ४१ ची तळटीप पहा : पाश्चात्य पंडितांनी पुराणातील पिढीक्रमाची वर्षगणना करण्यासाठी एक पिढी २८ वर्षाची कल्पून कालगणना केली आहे.

इ.सन २००० ची मौजे दुधलगावच्या वस्तीचा अंदाज धरून त्याहून इ.सन १४४ सन वजा केल्यास २०००-१४४ = १८५६ वर्षे. कनकसेनानंतरचा लेवा पाटीदार वंश होय. म्हणून १८५६ ÷२८ वर्षाची १ पिढी = एकूण ६६ पिढ्या + ८ वर्षे इ.सवी सनाचे या शतकांती होतात. कनकसेनाची लवानंतर ५९ पिढी म्हणजेच स्वायंभूव मनुपासून १४४ वी पिढी सन १४४ मध्ये नांदते. म्हणून इ.सन १४४ नंतर १८५६ वर्षांनी येणारी ६७ वी पिढी १४४ + ६७ = म्हणजेच प्रस्तुत लेखकाची २११ वी पिढी धरून कालगणना करावी.

क्षत्रियांच्या पिढ्यांबाबत भाट उर्फ मांगटे लिखाण करतात. सूर्यवंशी कुलमी क्षत्रिय लेवा पाटीदारांची या भाट उर्फ मांगटे लोकांनी परंपरागत वंशवृक्षवेली लिहून ठेवल्या आहेत.

प्रस्तुत लेखक कुणबी क्षत्रिय लेवा पाटीदार कुळीतील सावदेकर शाखीय असून लेवा पंचायतीचे दाताळे ठायातील मौजे दुधलगावच्या कुटुंबनायक वराडे पाटील या देशमुख कुळीत, तारीख ९ नोव्हेंबर १९२६ रोजी, मंगळवार, कार्तिक शुद्ध ४ शके १८४८ रोजी नळगंगा तिरीच्या शेलापूर खुर्द, ता. मोताळा., जि. बुलढाणा या आजोळ स्थळी दुपारी मूळ नक्षत्रावर धन राशीत जन्मला. या वंशकुळीचा भाट श्री. अशोक अभिमन्यु नारखेडे लेवा भाट, भाटगल्ली, मुक्काम + पोष्ट + तालुका = चोपडा, जिल्हा जळगाव यांचे वही क्रमांक एक, पान नंबर २९१ ते ३१७ यावरून श्री.मनसाराम फुंदिला सरोदे लेवा भाट, भाटगल्ली, चोपडा, जिल्हा जळगाव यांनी प्रस्तुत लेखकाचे गावी मौजे दुधलगाव बुद्रूक, पोस्ट-दुधलगाव बुद्रूक, तालुका - मलकापूर, जिल्हा - बुलढाणा (विदर्भ) पिन - ४४३१०१, येथे आमचे वराडे कुळाची वंशवेल परंपरा तपशीलासह ता. १२ मे १९८७ रोजी आमचे भाऊबंदासमोर लेवाभाटाचे पोथीवाचनाने ऐकविली. ती ध्वनिमुद्रीत केली. तिच्या आधारे पुढील गोषवारा देत आहे :-

त्या आधारे प्रथम वस्ती गुजराथ नगर पावागड, गाव वेझलपूर, वालवाडे येथील वतनदार पाटील व देशमुख कुळ वराडे गोत्र शांडिल्य ऋषी कुळदेवी निंबाबाई ह्या कुलस्वामिनीची पूजा करीत. नवरात्रात कुंभघट भरायचा; उपवास करायचा. देवपूजा केल्यावर नित्य नेमाने स्नान, संध्या, देवपूजा केल्यावर जेवण करीत. स्त्रिया काचोळी घालीत. हस्तीदंताच्या बांगड्या घालत. काच व कथीलाचे दागिने वापरत नसत. अशा रीतीरिवाजाच्या लेवा पाटीदार कुळीत अंदाजे सन ४११ चे सुमारास सौराष्ट्रातील वेझलपूर वालवाडे गावचे मूळ रहिवासी होते. पुढे मुस्लीम आक्रमणाने ही गावे उद्ध्वस्त झाली म्हणून अहमदाबादला स्थलांतरीत झाले. त्या कुळाचा लेवा भाटाचे

नोंदीनुसार पुढील पिढीक्रम देत आहे. तो असा :-

वेझलपूर वालवाडे गावला या वराडे कुळातील प्रसिद्ध पुरुष श्री. भयाजी पाटील, सन ४११ चे सुमारास राहात होता. हा १. भयाजी उर्फ भवानी पाटील, २. रामजी, ३. शंभूजी, ४. प्रभूजी, ५. देविदास, ६. रुद्राजी, ७. मुकुंदा, ८. देवाजी, ९ नरोबा अंदाजे सन ६३० पर्यंत ह्या पिढ्या सुखाने तेथे नांदल्या. पण पुढे १० वी पिढी बापू, ११. वी पिढी मुऱ्हार, १२ वी पिढी धनाजी पाटील गुजराथेत नांदले. अंदाजे सन १११५ सालचे सुमारास धबाजीला चार मुले होती. १. धावजी, २. नेवजी, ३. जगदीश, ४ था चांगोजी ही चारही मुले यवनाच्या त्रासामुळे सन १११५ साल ते सन १२७५ पर्यंत सैनिकी टोळीच्या अस्थिर जीवनास कंटाळून सुमारे १२७५ चे आसपास गुजराथेत कर्णरायसिंह राजा असावा. तेथे इस्लामाकडून पराभूत झाले. जिझिया उर्फ डोईजड कराविरुद्ध बंड केले. इ.सन १२९६ साली आपण खानदेशचे रोखाने प्रस्तान केले असावे. प्रथम चापानेरला येऊन वस्ती केली. तेथील राजा पतियाळा राऊळ कालंकादेवीच्या शापाने पराभूत झाला. म्हणून आपण तेथून दुसरा मुक्काम धनदेवी, तिसरा मुक्काम पालनपूर, चवथा मुक्काम धवडके धुंडके, तेथून पुढे पाचवा मुक्काम कडवीर मंगळावती, सहावा मुक्काम अहमदाबाद, सातवा मुक्काम बडोदे, आठवा मुक्काम भडोचपर्यंत आपल्या १४०० गाडींच्या टोळीसह स्थानांतर करीत करीत आलो. तेथे नर्मदा नदीला १ लक्ष मोहरा खर्चून पूल दुरुस्ती केल्यावर नर्मदा नदी ओलांडून नववा मुक्काम तापी तिरीच्या सुरत मुक्कामी आलो. नंतर दहावा मुक्काम सोनगड, अकरावा मुक्काम रनाळे, बारावा मुक्काम दोंडाईचा. तेरावा मुक्काम नरशी दबाशी, चौदावा तळ तापी किनारी नांदेड परिसरात आलो. खानदेशात आपल्या कबिल्याने प्रवेश केला तेव्हा औरंगाबाद सुभ्यात बुऱ्हाणउद्दीन बादशहा राज्य करीत होता. इ.सवी सन १३५१ चे सुमारास आपल्या तळ विभागून ७०० गाडी खानदेशात व ७०० गाडी विदर्भात व पाच-सहा गाड्या नेमाड जिल्ह्यात बऱ्हाणपूर परिसरात विखुरल्या.

दुधलगाव बुद्रुक येथे जो जगदीश पाटील आला तेव्हा तेथे ब्राह्मण पाटील होता. त्याचे जागी जगदीश पाटीलाने देशमुखी हक्कासह तेथे वस्ती केली. त्याच्या चांगो नावाचे भावाने दाताळा व धावजी व नेवाजी ने एदलाबाद व साकेगावला येथे वस्ती केली. या चाऱ्हीचे वंश या चारही गावाला आजही नांदतात. अशा ह्या सूर्यवंशी कुणबी क्षत्रिय लेवा पाटीदार समाजाच्या वंशावेलीत हा असा : १. भयाजी, २. रामजी ३. शंभूजी, ४. प्रभूजी, ५. देविदास, ६. रुद्राजी, ७. मुकुंद, ८. देवाजी, ९. नरोबा, १०. बापू, ११ मुऱ्हार, १२. धबाजी, १३. दुधलगावला प्रथम वस्ती करणारा जगदीश, १४. रामजी, १५. मुकुंदा, १६. विश्राम, १७. दशरथ, १८. भगू, १९. आवजी, २०. महादू, २१. चंद्रभान, २२. नेवोजी, २३. कृष्णा, २४. माधव, २५. सुपडा, २६. दत्तू, २७. विठोबा, २८. शंकर, हा प्रस्तुत लेखक हल्ली दुधलगावला नांदत आहे. २९ कृष्ण + राम + संजय = ३० संकेत.

हिंदू म्हणून ओळखले गेलेले हे लोक वर्णाने क्षत्रिय, जात कुणबी, पोटजात लेवा पाटीदार ही आहेत.

सूर्यवंशी दाशरथी रामाचा मुलगा लव होता या लवाने मनुचे चौथे पुत्र दिष्टचे वंशजांचा पराभव करून रावी नदीतीरावर आपल्या नावाने लवपूर (लाहोर) वसविले. (कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास,लेखक : डॉ. मंगुभाई रामदास पटेल, रीडर गुजराथ युनिव्हर्सिटी, गुजराथ पृष्ठ ४४, परिच्छेद पहिला पहा.) त्याच काळात लक्ष्मणाने लक्ष्मणावती (लखनौ) व कुशाने कुशावती (पाटणा) वसविले. (पृष्ठ ४४). पंजाबात राजक्रांती झाल्यावरही कूर्मी क्षत्रियांनी आपल्या रणकौशल्याचे जोरावर राज्याचा थोडा भाग आपले स्वाधीन वाचवून ठेवला होता, व पंजाबातील झेलम नदी व चिनाब नदीच्या दुआबमध्ये गुर्जरांनी वसविलेल्या गुजराथ शहराजवळ करड व लेया प्रदेशात वस्ती केली. कालांतराने अर्जुनाचा पुत्र परीक्षिताने लवाचा वंशज सुमित्र नावाच्या राजाजवळून

इ.सन पूर्व ७८ मध्ये पंजाब जिंकून घेतला. इ.सन पूर्व ३७७ मध्ये पंजाबवर सिकंदरनी स्वारी झाली, व इ.सन पूर्व ३०६ ते इ.सन पूर्व २९८ मध्ये सेल्यूकसचा पराभव होऊन त्याने आपली मुलगी मगधापती चंद्रगुप्तास दिली होती. या समयाचे सुमारास चंद्रगुप्त मौर्याने पंजाबातील उत्कृष्ट लढाऊ लोक आपल्या मगध सैन्यात भरती केले. ही **लेवा पाटीदारांची पितृभूमी असल्यामुळे येथून बरेच सूर्यवंशी कुणबी (कुर्मी) मगध सैन्यात भरती होऊन स्थलांतरीत झाले असावेत. 'युनिफाईड इतिहास' लेखक- डॉ. ए.के. मित्तल, पृष्ठ ७४, परिच्छेद ८ वरून हे आपल्या लक्षात येईल.** तसेच, कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास लेखक डॉ. मंगुभाई रामदास पटेल पृष्ठ ४६, परिच्छेद १ मधील घटनेचा परिणाम स्वरूप "इ.सवी सन पूर्व तिसरी सदी के अंतमे कुर्मी के कुछ बहादूर परिवार पंजाब छोडकर मगध देश की राजधानी कुशावती मे चंद्रगुप्त राजाके सेना मे भरती हो गये। तत्पश्चात बाक्ट्रिया (बल्स) के लोगाने, इसके बाद तातार देशके शकोंने पंजाबको जिता और बाद मे वे सिंध, मालवा तथा ढेट गुजराथतक आगे बढे (इ.सवी सन पूर्व ७५) उसमे शक राजा 'कनिष्क' बडा वीर हुआ था।

कनिष्क मरनेके बाद अवंती मे वीर विक्रमादित्य नामका बडा पराक्रमी राजा हुआ। उसने विदेशियोंको देशके बाहीर निकालकर गुजराथ, माळवा, सिंध तथा पंजाब आदि प्रांत छीन लिये। फिर दिल्लीके शासक परीक्षितीके वंशज राज राजपालको भी हराया। इसी काल मे इ.सन पूर्व ७८ के लगभग क्षत्रप राजा कनिष्क समयमे गुजराथ एवं उसके आसपासके प्रदेशसे बहुतसे गुर्जर बाहर निकले। उनके साथ साथ कितने कुर्मी भी निकले और मथुरा तक जाकर बस गए। वहा से धीरे धीरे आनर्त देशतक पहुचे होंगे ऐसा जान पडता है।"असे मत बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम एकचा आधार देऊन, डॉ. मंगुभाई रामदास पटेल 'कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास' ग्रंथ पृष्ठ ४५ परिच्छेद २ मध्ये लिहितात.

"कुर्मी लोक लडाकू होने के कारण आवश्यकता पडनेपर यहाँभी वे युद्ध करते तथा, शेष, शांतीकाल खेती करनेमे व्यतीत करते। बाद मे दुसरी टोलिया भी पंजाबसे कोटा और मंदसोर हो कर मालवा मे आयी।

इस प्रकार पंजाबसे निकली टोलियों ने कालांतर मे अपने मूल भूमि और जाति विस्मृत न हो जाय, इस हेतु से करड प्रांत के मूल निवासियों ने करडवा कुर्मी तथा लेया प्रांत के कूर्मीयो ने 'लेया कुर्मी' ऐसे विशेषण धारण किए। गंगा-यमुना की घाटियो की और बढती तथा उत्तर हिंदुस्थान मे अपना वर्चस्व जमाती कूर्मीयों की अन्य टोलियो मध्य हिंद एजन्सी, मध्यप्रांत, खानदेश तथा दक्षिण की और आकर बसी। उनके वंशज आज तक लेवा और करड विशेषण धारण किये हुए है तथा अपने मूल स्थान पंजाब मे 'लेया' (लेवा) नाम से वे महशूर है।" (बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम एक के आधारपर तथा डॉ. मंगूभाई पटेलकृत कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास,पृष्ठ ४५ देखिए).

आपले मूळ वतन पंजाबच्या भिन्नभिन्न भागांतून निघून शेवटी गुजराथ देशात ते लढाऊ कूर्मी लोक येऊन उंझा गावालगत उतरले. एवढेच नाही तर पंजाबातील आपली मायभूमी सोडल्यावर तिची कायम आठवण रहावी म्हणून आपल्या मूळ गावाचे व प्रदेशाचे नावाने त्या प्रमुख ५२ टोळ्या उर्फ शाखा ओळखल्या जाऊ लागल्या. गुजराथेत वस्ती केलेल्या कूर्मी लोकांचे मूळ स्थान पंजाब तथा उत्तर हिंदुस्थानातीलच गाव व प्रदेश असल्याने त्या गावाचे नावाने ते ओळखले जाऊ लागले. उदा., लहुओट शाखेचे (टोळीचे) लढाऊ कुर्मी लोक पंजाबजवळील प्रदेशातील लाहोर शहरातून आले. (कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, लेखक- डॉ. मं.रा. पटेल, पृष्ठ ४५ व पृष्ठ ४६ वर पहा).

अशा रीतीने इ.सन पूर्व तिसऱ्या शतकात काही लढाऊ कुणबी चंद्रगुप्त मौर्याच्या मगध सैन्यात भरती होऊन त्यांनी पंजाब प्रांत सोडून मगध प्रांतची राजधानी कुशावतीस आलेल्या टोळीने काही काल येथेच निवास केला. या सुमारास मगध राजकुमार बिंदुसार तथा अशोकाच्या माळव्यातील सुभेदारीकाळात त्यांचेबरोबर राहिले असावेत. नंतर आपल्या सैनिकी बळावर इ.सनाचे पहिल्या शतकाचे शेवटी या प्रदेशाचा काही भाग हस्तगत करून त्या प्रदेशाची माधावती नगरी यांनी राजधानी केली असावी, असे गुजराथचा प्राचीन इतिहास तथा देसाई पटेलांचे पुश्तनामे (भाटांच्या चोपड्या) यावरून हे कळते.

अशा प्रकारे माधावतीचे कुर्मीशासन काळात माळवा, ईडर, बासवाडा भागातील बहुसंख्य कुर्मी तिथे वस्तीस गेले. नंतर कुर्मी लोकांनी हळूहळू गुजराथेत स्थायी वसाहती केल्या. (डॉ. मं.रा. पटेलकृत इतिहास, पृष्ठ ४७ पहा) + (पृष्ठ १८९ वर पहा)

मौर्यांची मगधची राजधानी कुशावती (पाटणा) वरून काही सुभेदार सौराष्ट्रातील गिरीनगर (गिरनार) म्हणजेच आनर्त (आनर्तपूर-वडनगर), सौराष्ट्र (द्वारिका-गिरिनगर) तथा लाट देश (भरूच-भडौच) आदी खंडावर तत्कालिन क्षत्रप राजापूर्वी ग्रीक, बाक्ट्रियन, पार्थियन, स्कीथियन, हूण व शक लोकांचा गुजराथवर अंमल असावा असा मध्य गुजराथ व काठियावाडच्या पुरातत्त्वीय अभिलेखाद्वारे अंदाज करता येतो.

नंतर अवंती (माळवा) नरेश वीर विक्रमादित्याने व त्याचे नंतर इ.सनाचे पहिल्या शतकात मगधचे क्षत्रप राजांनी माळवा जिंकला. त्यांचा तिसरा राज्यकर्ता जयदामाने इ.सन १४० मध्ये सौराष्ट्रात गिरनारहून राज्य चालविले. याच काळात ईडर तथा बासवाडा प्रदेशात कुर्मीयांनी (कुणब्यांनी) प्रवेश करून आनर्तपूरच्या इलाख्यात वडनगर तथा श्रीस्थल (सिध्दपूर) या सभोवार वस्ती केली, असे डॉ. पटेल, इतिहास, पृष्ठ ४८ वर निर्देशितात.

माधावतीचा पराभूत कुणबी राजा वज्रपालजीने इ.सन १५६ मध्ये उंझा गाव वसवून तिथे आपली कुळदेवी उमियाजीची स्थापना केली. तिथे इ.सनाचे पाचव्या शतकापर्यंत ते नांदले. पुढे कारणवशात ते इ.सन ५५६ मध्ये तेथून मध्य गुजराथेतील भीलनगर आशावल्ली उर्फ असारवा येथे येऊन स्थायिक झाले. त्यानंतर तेथे चावडा राजपूत इ.सन ६९० मध्ये सरदार जयशिखरीचे सरदारीत व पुढे इ.सन ६९६ मध्ये कल्याणीपति भूवडने व पुढे इ.सन ७४६ मध्ये चावडा वंशीय वनराजने अनहिलपूर पाटण वसवून तेथे राज्य केले. त्यात यांना दिवस काढावे लागले, पण पुढे विक्रम संवत ८०२ मध्ये वज्रपालजीचे वंशज ईडर प्रांती जाऊन तेथे कावर नामक ग्राम वसविले व जामळा गावी वस्ती केली.

इ.सन १०६४ मध्ये करण राजा झाला. त्याने डाकूंचा बंदोबस्त करून कुर्मी लोकांना निश्चिन्त केले. पुढे इ.सन १०९४ मध्ये सिद्धराज जयसिंहाने माळव्याच्या यशोवर्मा राजाचा पराभव केला व त्याची **कुर्मी प्रजा गुजराथेत नेऊन चरोत्तर, दशकोशी, भाल प्रदेशातील उपजाऊ जमिनीचे मालकी हक्क देऊन कानम, वाकळ, चरोत्तर, भाल आदी प्रदेशात कूर्मीयांची वस्ती केली.** या कुर्मीयांना जमिनीचे पट्टे मिळाले, **तेव्हापासून हे पाटीदार गणले गेलेत.**

गुजराथेत सोळंकी वंशानंतर वाघेला वंश राज्यारूढ झाला. वाघेला वंशातील अंतीम राजा करण वाघेला अत्याचारी व व्यभिचारी निघाला. त्याने आपला प्रधान मंत्री माधवच्या पत्नीचे हरण केले. म्हणून त्याचा सूड घेण्यासाठी प्रधानमंत्री माधवने दिल्लीच्या अल्लाउद्दीन खिलजी राजास बोलावून करण वाघेलाची पत्नी कमल व मुलगी देवल यांचा विवाह अल्लाउद्दीन खिलजीचे खिज्रखान नावाचे मुलाशी लावण्याचे मोबदल्यात देशद्रोहपूर्वक फितुरी करून सूड उगवला. त्यामुळे तेथील कुणबी चरोत्तर, भाल प्रदेशात कानम, साबरमती आदी भागात विखुरले. व काही कुर्मी लोक

अनहिलपूर पाटणच्या आक्रमित राजपूत राजधानीत अल्लाउद्दीनने अंमल बसविल्यामुळे ते त्या यवन राज्याबाहेर चापानेरच्या राजपूत राज्यात वसाहतीस गेले. व पुढे इ.सन १४८३ मध्ये महंमद बेगडाने चापानेर जिंकल्यामुळे तेथील लोक बडोदा व अहमदाबादेस गेले. अशा रीतीने चापानेरच्या रजपूत राज्यात वैभवाने नांदणारे कुणबी लोक चापानेरच्या पाडावामुळे उद्ध्वस्त झाले. त्या कुणब्यांचा नेता सेनापती वैरीसिंहजीस महंमद बेगडाने कैद केले.

कर्णदेवाचे नंतर वाघेला-सोळंकी वंशसत्ता समाप्त होऊन यवन सत्ता प्रस्थापित झाली. इ.सन १२९२ (शके १२१४) मध्ये जलालुद्दीन खिलजीने माळव्यावर चढाई केली व उज्जैनी लुटून मंदिरांची तोडफोड केली. इ.सन १२९४ (शके १२१६) मध्ये अल्लाउद्दीनाने भेलसा जिंकून पूर्व माळवा घेतला. पुढे महम्मद तुघलगाने उर्वरित माळवा जिंकला. हे भयानक आक्रमणाचे परिणाम श्री संत ज्ञानेश्वराने संत नामदेवासह तीर्थयात्रेत पाहिले व ते असह्य होऊन भ्रष्ट राज्यात रहाण्यापेक्षा नष्ट होणे बरे या मताने चारही भावंडांनी धडाधड जिवंत समाध्या शके १२१८ ते शके १२१९ च्या कालवधीत घेतल्या.

माळव्यावर विजय मिळवून सिद्धराज जयसिंहाने राजा भोजाचे ग्रंथालय पाटण शहरी आणले. हा सिद्धराज नि:संतान असल्यामुळे त्याचा सामंत व सहाय्यक त्रिभुवनपालचा ज्येष्ठ पुत्र कुमारपालने पाटीदार कुणब्यांचे सक्रीय सहयोगाने राजगादी प्राप्त केली. (कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, पृष्ठ १५४ पहा).

य।नंतर अनहिलपाटणच्या राजगादीवर सोळंकी वंशाचा पहिला राजा विशाळदेव वाघेला हा विक्रम संवत १३०० (सन १२४४) मध्ये सत्ताधीश झाला.

इ.सन १०९४ मध्ये सिद्धराज जयसिंहाने माळव्यातील पराभूत यशोवर्म्याची कुणबी प्रजा गुजराथेत नेऊन त्यांना भूमि-पट्टे कसण्यासाठी दिले होते. त्या भूमि पट्ट्याचे मालकी हक्क वंशपरंपरेने प्रथमच दिले होते हे आपण पूर्वी पाहिले आहेच. संस्कृतमध्ये पट्टिका शब्दापासून पट्टिय हा प्राकृत शब्द बनला, व पट्टियचेच पुढे (पाटी) हे मराठी रुपांतर झाले. आणि 'पाटी' ह्या मराठी व्युत्पन्न शब्दालाच 'दार' हा फारशी प्रत्यय घटित शब्द लागून पाटी + दार = पाटीदार शब्द कसा सिद्ध झाला हे डॉ. रामगोपाल सोनी यांनी 'मराठी आडनावे' या ग्रंथात, पृष्ठ २०८ वर दिले आहे. त्यांनी पट्टीचा अर्थ शेत किंवा प्रदेश केला. त्यावरून पाटीदार म्हणजे जमीनदार किंवा जमिनीचा मालक (भूमी-स्वामी) हा शब्द बनला.

ह्या 'पट्टिकेची' स्वतंत्र मालकी मिळालेल्या पट्टीधारकास शासनास दर वर्षी ह्या मालकीचा मोबदला रूपाने दिलेली 'पट्टी' म्हणजेच जमिनीचे पट्ट्यावरील कर होय. व दार म्हणजे देणारा. म्हणून पट्टीदार उर्फ पाटीदार म्हणजे भूमिपट्टीवरील पट्टी (जमिनीवरील कर) उर्फ कर शासनास देणारे भूमि-स्वामी म्हणजे पाटीदार होय. हे भूमि-स्वामित्वाची शासनास पट्टी वसून करून देणारा पाटीदार ह्या सिद्धराज जयसिंह काळातच जन्मला असावा असे वाटते.

महाराष्ट्र शासनाचे 'महाराष्ट्र राज्य गॅझेटियर' जळगाव ज़िल्हा, संपादक : डॉ. कि.का. चौधरी, सुधारित आवृत्ती २ री, सन १९९४, पृष्ठ १८२ मध्ये 'पट' म्हणजे मोठे शेत आणि पट्टी म्हणजे शेतीचा लाब पट्टा व तो धारण करणारा तो पाटीदार असा अर्थ निघतो. गुजराथेत पाटीदारांना पाटील किंवा शेतकरी असेही म्हणतात. पाटीदार म्हणजे जमीनदार व सावकार हा अर्थ असून ह्या पाटीदारांची वस्ती खेडा जिल्हयातील आनंद, बोर्साद, नडियाद या चरोत्तर प्रदेशात प्रामुख्याने अधिक आहे. या भागातील पाटीदार स्वत:स कुलिया म्हणजे जमीनदार व इतरांना अकुलिया म्हणजे कूळ संबोधितात. (गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी खंड ९ भाग १, सन १९०१ पृष्ठ १६६-१६७ वरील तळटीप पहा). ब्रिटीश राजवटीपूर्वी पाटीदार लोक शासन व कुळातील मध्यस्तीचे

काम करीत, व कौशल्याने सारा वसूल करून शासनास देत. (कित्ता पृष्ठ १६६). गुजराथेत पाटीदारांचे लेवा व कडवा हे दोन प्रकार आहेत. लेवा म्हणजे मवाळ व कडवा म्हणजे कट्टर हा अर्थ निघतो. ज्या खेडा जिल्ह्यातून हे लोक आले त्या कैरा उर्फ खेडा जिल्ह्याच्या सन १८८२ च्या गॅझेटियरमध्ये पाटीदार लोक उत्कृष्ट शेतकरी, निर्व्यसनी, शांत व उद्योगी आहेत असे म्हटले.

पाटीदारांची वस्ती मध्यप्रदेश, राजस्थान व पश्चिम बंगाल मध्येही आहे. मात्र, पश्चिम बंगालमधील मिदनापूर जिल्ह्यातील पाटीदार हे भाटआहेत. देवीसिंह चौहाणच्या मतें पाटीदार लोक इराणाहून खैबरखिंडी तून हिंदुस्थानात आले. लेवा पाटीदार हे मूळ गुजराथेतील नाहीत. पूर्व राजस्थान, पंजाब व मध्यप्रदेशातील पाटीदारांची संख्या अधिक होती. अजूनही मंदसोर, निमार या मध्यप्रदेशातील जिल्ह्यात पाटीदार मोठ्या संख्येने आहेत. बऱ्याच लेवा पाटीदारांच्या वंशावळी चोपड्याचे भाट व त्र्यंबकेश्वरचे क्षौरकर्म करणारे ब्राह्मण व काशीचे पंडे यांनी ठेवलेल्या आहेत. चोपड्याचे भाटांचे नोंदीवरून लेवा पाटीदार खानदेशात संवत ११०० च्या सुमारास गुजराथेतून-स्थलांतरीत झाले. भाटांच्याच मुलाखतीनुसार खानदेशात व गुजराथमध्ये येण्यापूर्वी पाटीदार राजस्थानात होते. तेथून ते चित्तोड गड, मल्हार गड, काठेवाडमार्गे गुजराथेत आलेत. व रेवा नदीतिरी स्थायिक झाले. रेवा नदीकाठी स्थायिक झालेल्यांना रेवा व अपभ्रंशाने लेवा पाटीदार असे नाव प्राप्त झाले. **गुजराथमधील लेवा कुणबी उत्तरेकडील गुजर वंशाचे आहेत** असे बुलढाणा जिल्हा गॅझेटियर सन १९१० च्या, पृष्ठ १२५ वर पहा. जिल्ह्यात पूर्वी यांना पाजणे कुणबी म्हणत. पाजणे शब्द पावाखंडाशी (पावागडशी) जोडला जात असून पावागड पूर्वी गुजराथचा भाग मानत. पुढे गुजराथमधील मुस्लीम आक्रमणामुळे खेडा जिल्ह्यातील काही लेवा पाटीदार पावागड येथे स्थलांतरीत झाले. तेथे काही दिवस राहिल्यावर मुस्लीम आक्रमणामुळे तेथूनही ते खानदेशात आले. खानदेशात आल्यावर साळी कारागिराबरोबर (विणकर) सूतास ब्रशासारख्या फणण्याने पांजण्याचे (पांजण म्हणजे वस्त्र विणण्याआधी सुतास लावण्याची खळ व पांजण म्हणजे विणकराचे सूत खळीने युक्त करणे) असा अर्थ होतो. (दाते व कर्वे संपादक पूर्वोक्त, खंड ५ वा, पृष्ठ १९७७) हे काम करू लागल्याने त्यांना पांजणा असे नाव प्राप्त झाले ही ब्राह्मणी व्युत्पत्ती निराधार होय. लेवा भाटाचे सांगण्यावरून पुढे शेती करू लागल्याने त्यांना पांजणा कुणबी हे नाव मिळाले. पांजणा कुणबी म्हणजेच जिल्हयातील लेवा पाटीदार होत. त्यांच्या रेवा किंवा लेवा, नवघरे, कंडारकर, थोरगव्हाणे या चार पोटशाखा मानल्या जातात. यातील लेवा हे मूळ असून त्यांच्यापासून भांडून बाहेर पडलेल्या नऊ कुटुंबांच्या वंशास 'नवघरे' म्हणतात. याचे नेतृत्व गाडेगावकराकडे होते म्हणून त्यांना गाडेगावकर असेही म्हणत. रावेर तालुक्यातील थोरगव्हाण व भुसावळ तालुक्यातील कंडारी ह्या गावावरून त्यांना अनुक्रमे थोर गव्हाणकर व कंडारकर ही नावे पडली. यातील नवघरे व कंडाकरातील मतभेद मिटले असून त्यांचे लेवा, नवघरे व कंडारकरात आपसात बेटी-बेटी व्यवहार पूर्ववत: पुन्हा सुरू झाले.

खानदेश गॅझेटियर १८६० वरून असे दिसते की,- पूर्वी पांजणा जातीच्या पंचायतप्रमुख यावलचा देशमुख घराण्यातील थोरगव्हाणे होता. वरील चार पोटभेदांनी परस्परातील बेटी व्यवहार बंद झाल्यावर यावलचा देशमुख फक्त थोरगव्हाणे पोटभेदाचाच पंचायत प्रमुख राहिला. व बाकीच्या लेवा पाटीदारांचे पंचायत-प्रमुखपद भोरटेक येथील लेवा पाटलाकडे गेले व भोरटेकमधून लेवा पाटीदारांना तेथील कोळयांनी हुसकून लावल्यावर पाडळशेचा पोलीस पाटील लेवा पाटीदार पंचायत-प्रमुख बनला. लेवा पाटीदार कुणबी मांसाहारी नव्हते. थोरगव्हाणकरांना मात्र मांसाहार वर्ज्य नाही. म्हणूनच कदाचित त्यांच्यात मतभेद झाले असावेत.

लेवा कुणबी हे मद्यपान करीत नाहीत. गुजराथेतील मोमणा कुणबी स्वत:स लेवा पाटीदार

समजतात. ते सत्पंथी आहेत. जळगाव जिल्ह्यातील फैजपूर पाडळशे परिसरातील सत्पंथी लेवा पाटीदार यांचेच वंशज असावेत. ते मद्य, मास वर्ज्य मानतात. पण पिराणा, अहमदाबाद, नवसारी बऱ्हाणपूरच्या पिरांना ते भजत. त्यांचे दैवत गुजराथेतील इमामपूरचा इमामशहा आहे.

स्वामी-नारायण पंथी लेवा पाटीदारही यावल व रावेर तालुक्यात बरेच आहेत. खानदेशात आल्यावरही गुजराथमधील पंथीय बांधिलकी यांनी अद्याप सोडली नाही. सातोद, कोळवद, सावदा, न्हावी व कठोरे येथे या पंथीयांची मंदिरे आहेत. यांचे दैवत गुजराथेतील वडताळचे सहजानंद स्वामीमहाराज हे आहेत. जळगाव जिल्ह्यातील शिरपूर, चोपडा, रावेर महामार्गाच्या उत्तर भागात यांची बरीच वस्ती आहे.

बहुतेक लेवा पाटीदार गुजराथेतील स्थलांतरानंतर पंढरीच्या पांडुरंगाचे उपासक वारकरी बनले, पण सावदा, हिंगोणे, बाम्हणोद, भालोद परिसरातील लेवा पाटीदारांनी महानुभाव पंथाचा स्वीकार केला.

लेवा पाटीदारांच्या जात पंचायतीला भोरगाव पंचायत म्हणत. भोरगाव पंचायत म्हणजे बारा पंचक्रोशीतील गावांची पंचायत. लग्नविषयक भांडण-तंटे, सोडचिठ्ठी, संपत्तीविषयक, भाऊबंदकीचे तंटे, तसेच, जात-तंटे ही पंचायत सोडवित असे. यावल तुलक्यातील पाडळशे व भोरटेक गावाजवळून वाहणाऱ्या मोर नदीच्या वाळवंटात ही वर्षातून एकदाच घेतली जाई. मुस्लीम आचार विधिवत मानल्यामुळे भोर पंचायतीने सत्पंथीयांना दंड करून तंटा मिटविला होता. परंपरेनुसार लेवा पाटीदार हुंडा घेत नसत. मद्यपान करीत नसत, पण ही परंपरा आता शिथिल झाली.

लेवा पाटीदारांना आपली गोत्रे माहीत नाहीत. लेवा गुजराप्रमाणे अंबिक, अत्री, भारद्वाज, गर्ग्य, गौतम, जामदग्न, काश्यप, कौशिक, कौशल्य, प्रयाग व वसिष्ठ ही अकरा गोत्रे असावीत असे गॅझेटियकार लिहितात, पण ते माझ्या मते तेवढे बरोबर नसावे. लग्न जमविताना गोत्रापेक्षा लेवा पाटीदार लोक कुळांना अधिक महत्त्व देतात. सकुळ विवाह व सगोत्र विवाह ते सहसा करीत नाहीत.

लेवा पाटीदारांची कुळे नसलेली आडनावे साधारणपणे पाटील, देशमुख, महाजन, चौधरी, वाणी, राणे अशी वतनावरून जरी पडलीत तरी त्यांची कुळे बोरोले, झोपे, नारखेडे, येवले, फेगडे, जावळे, गाजरे, धांडे, तळेले, ठोंबरे, नेमाडे, बऱ्हाटे, नेहेते, बोंडे, खर्चे, ढाके, खडसे, भोळे, नाफडे, कोलते, टेकाडे, भंगाळे, वराडे, पाचपांडे, होले, वाघोदे, रोटे, रडे, जंगले, भारंबे, फिरके, लढे, किनगे, किरंगे, सरोदे अशी आहेत.

लेवा पाटीदारात विवाह पौराणिक पद्धतीने करतात. देवक बसविण्याचे प्रथेस बेमाधन म्हणतात. अंबोलाभात, गौरघर, तोरण ताटी प्रत्येक लग्नघरी आम्रपर्णयुक्त तूर खाट्यांची तोरणताटी हे मंगलकार्याचे द्योतक मानतात. तोरण ताटी सव्वा महिना काढत नाहीत. वधू-वरास लग्नापूर्वी हळद लावतात. सीमांत पूजनास शेवंतो म्हणतात. लग्न लागल्यावर वधूवरांनी एकमेकांचे हात हातात घेण्यास 'हातोई' म्हणतात. लग्नात वधूचे पदराची गाठ वराचे उपरण्यास बांधतात. सप्तपदीला चवरी-भवरी म्हणतात. वधू ही वराचे आईकडे अहेरासहित येते तेव्हा सूनमुख दर्शन घेतात. बलुतेदारांना दिल्या जाणाऱ्या दक्षिणांना 'मांडव चुकविणे' म्हणतात.

लेवा पाटीदारांच्या कुळदेवता वणीची सप्तशृंगी, तुळजापूरची भवानी, माहूरची रेणुका देवी, पावागडची महाकाली असून कुळदैवत खंडोबा, अट्रावलचा मुंजा, बुलढाणा जिल्ह्यातील जाईचा देव येथील दत्तात्रय हो आहेत.

लेवा कुणब्यात पहिले बाळंतपण माहेरी होते. सहाव्या दिवशी सटवाईची पूजा करतात सटवाईची सोन्याचांदीची प्रतिमा मनगटाला काळ्या दोऱ्याने बांधतात. सुतेर १२ दिवस पाळतात

बाराव्या दिवशी घर शेण-मातीने सारवून सवाष्णींना घुगऱ्या वाटून बाळाचे नामकरण करतात. मौंज करीत नाहीत. मात्र कान टोचतात. रोटपूजा करतात. ग्रामदेवतेचे उत्सव करतात. नागपंचमीनंतर पहिल्या रविवारी ग्रामदेवी पूजा करतात. रात्री उपवास सोडतात. रात्री रोटाचे गाणे म्हणतात. खानदेशातील रंबाई देवीची चक्रपूजाही करतात. मुली भाद्रपदात भुलाबाई सोहळा करतात. आषाढी, कार्तिकी एकादशी व महाशिवरात्रीस उपास करतात. फाल्गुनात ठराविक दिवशी कुळदेवीची पूजा करतात. होळी, अक्षय्य तृतीयेस श्राद्ध करतात. मुली माहेरी येतात. सालदारांचे साल अखोजीस सुरू होते. गावातील बलुतेदारांना खळयावर बलुते देतात.

पूर्वापार शेती व्यवसायाव्यतिरिक्त अलिकडे नोकऱ्या, धंदे व सांस्कृतिक बाबीकडेही यांचा कल वळत आहे. त्याविषयी सविस्तर माहिती आपण पुढे स्वतंत्र प्रकरणात पाहूच.

अशी ही लेवा पाटीदारांची ओळख महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्य गॅझेटियर जळगाव जिल्हा, संपादक : डॉ. कि.का. चौधरी यांनी सांस्कृतिक कार्यविभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने सन १९९४ साली प्रसिद्ध केलेल्या ग्रंथाधारे, पृष्ठ १८२ ते पृष्ठ १८६ द्वारे आपण पाहिली. याच ग्रंथाच्या पृष्ठ १८७, परिच्छेद २ मध्ये लिहिले आहे की, मथुरेच्या पश्चिमेस लेहकपूर येथे लेवा वंशाची वसाहत होती. विक्रम संवताच्या सुमारे दोनशे वर्षांपूर्वी सिकंदराने पंजाबर स्वारी केली तेव्हा तेथील राजांच्या मदतीकरिता गेलेल्या मथुरेच्या सैन्यात लेहकपुरातील लेवावंशी सैनिकही होते. गुजराथेत अजय नामक राजाने लेवा वंश वसविला असेही त्या लेवापुराण ग्रंथानुसार (सन १९१८ मध्ये प्रकाशित) कळते. **लेवा शाखेतून लेवा गुजर व लेवा पाटीदार (कणबी) आणि कडवा शाखेतून कडवा गुजर व कडवा पाटीदार (कणबी) अशा उपशाखा निर्माण झाल्या असाव्यात. (पृष्ठ १८७ पहा).**

या शाखेचे लेवा गुजर रणथंबोर (राजस्थान) येथून आल्याचे (खानदेश गॅझेटियर, सन १८८०, पृष्ठ ६३) कळते. राजपूतांनी त्यांना तेथून हाकलून लावल्याने ते जुनागडमार्गे अहमदाबादला व नंतर पावागड व चंपानेर भागात गेले. तेथूनही राजकीय अंदाधुंदीमुळे ते नर्मदा खोऱ्यातील नेमाड व तेथून खानदेश व तापीखोऱ्यात नंदूरबार मार्गे संवत १२३४ च्या सुमारास आले असावेत.

क्षत्रिय कुणबी लेवा पाटीदार वंशाची बदलती नावे :-

लेवा पाटीदार हे अलीकडे मिळालेले नाव आहे. यांचा मूळ इतिहास पाहता हे लोक कास्पियन समुद्र किनारी सुमारे ५००० वर्षांपूर्वी **'आर्य'** ह्या नावाने वावरत असत.

पुढे तेथील आर्यात तिकडचेच हूण, शक, गुर्जर, अरब अशा अनेक नावाने ते मध्य आशियात विभागले गेले. त्यापैकी गुर्जर आर्यांची टोळी जी भारतात सप्तसिंधू प्रदेशात सैंधवी संस्कृतीत प्रथम मूलतानला आली. हिंदुस्थानात प्रवेश केल्यावर त्याचे मूल-स्थान जे तेच 'मूलतान' असावे. पुढे जमिनीचा शोध घेत-घेत ते पंजाबात रावी नदी तिरी शाहीवाल जिल्ह्यातील पंचजनात सामील झाले. त्या गुर्जरांनी झेलम व चिनाबच्या दुआबात वसविलेल्या गुजराथ शहरात वस्ती केली.

स्वायंभूव मनूचा वंश वायव्य भारतापासून थेट कास्पियन समुद्रापर्यंत सत्ताधीश होता. या वंशातील ४५ व्या पिढीतील राजा दक्षाचे अदिती नामक मुलीचा विवाह मारिची काश्यपाशी झाला. ह्या कश्यपास अदितीपासून झालेला धाकटा पुत्र विवस्वान उर्फ आदित्य होय. याचे वंशास '**सूर्यवंश**' म्हणतात. ह्या सूर्यवंशात विष्णुपुराणानुसार ६५ वा वंशज प्रभू रामचंद्र हा होय. त्याचे पुत्र लव व कुश हे होत. लवाने श्रावस्तीस राज्य केले. तरी आपल्या मुलासाठी रावी नदीतिरी नवे राज्य स्थापून लवपूर उर्फ लाहोर ही राजधानी वसविली. ह्या लवाचा वंश म्हणजे **लेवा कुणबी** होय.

ह्या लवानंतर ५५ व्या पिढीत जन्मलेला सुमित्र राजा होता. अर्जुनाचा वंशज द्वितीय परीक्षितीने त्याचे राज्य जिंकून घेतले.

'आपले लेवा परिवार', संपादक : महेंद्र ओंकार राणे या अखिल भारतीय लेवा महामंडळाचे त्रैमासिक मुखपत्रात, वर्ष पहिले अंक २ एप्रिल, मे जून १९९४ च्या अंकात, पृष्ठ ५ वर इंदूरचे श्री. वासुदेवराव एच. पाटीलांच्या 'चतुर्वर्णात पाटीदार वर्गाचे स्थान' या लेखाचे परिच्छेद २ मध्ये साधार स्पष्ट केले आहे की, "रेव्हरंड शेरिंग्ज हिंदू ट्राईब्ज अँड कास्टस व्हॉल्यूम ३, पृष्ठ २५८ व बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम ९ ,भाग १ मध्ये उल्लेख आहे की, भगवान रामचंद्राच्या लवापासून लेवा व कुशापासून कुशवाह झाले.

श्री. वासुदेवराव पाटील, परिच्छेद ३ मध्ये लिहितात की.- "भारतेंदु हरिश्चंद्रद्वारा लिखित 'उदय पुरोदय' (भारतेंदु समग्र, पृष्ठ ६८१ ते ७०२) मध्ये उल्लेख आहे की, लवाने लवपूर (लाहोर) वसविले."

"क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास" लेखक- श्री. केशवलाल पटेल, पृष्ठ ४४ वर मनुचे चौथे पुत्र दिष्टचे वंशज जनमेजय (महाभारतातील जनमेजय वेगळे आहेत). विशालावती (हल्लीचे पंजाबातील व्यास शहर) नगरात राज्य करीत होते. लवाने त्यास हरविले, व लवपूर वसवून त्याचे राज्य आपल्या मुलास दिले. लवानंतर त्याच ५५ वा वंशज सुमित्र यास अर्जुनाचा वंशज परिक्षित (द्वितीय) ह्याने हरविले, व त्याचे राज्य आपल्या मुलास दिले. लवापासून सुमित्रापर्यंत ५५ पिढ्या पंजाबवर राज्य करणाऱ्या ह्या लवाच्या वंशाचा नामक्रम उल्लेख क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास ले. केशवलाल पटेल या ग्रंथात दिला आहे हे श्री. वासुदेवराव पाटीलांनी या लेखात नमूद केले आहे. या सत्ताहीन झालेल्या सुमित्राची चौथी पिढी म्हणजेच लवानंतर ५९ वे पिढीमधील कनकसेन पंजाब सोडून राजस्थानमार्गे गुजराथेत येऊन त्याने वल्लभीपूर (विजयपूर) वसविले. व तिथे गुजराथेत आपले स्वतंत्र राज्य प्रस्थापित केले. (पृष्ठ २०, पाटीदारोंका इतिहास लेखक- केशवलाल पटेल व पृष्ठ ६८२, उदय पुरोदय, लेखक- भारतेंदु हरिश्चंद्र पहा).

पंजाब सोडून गुजराथेत इ.सन. १४४ मध्ये आलेल्या कनकसेनबरोबर व नंतर त्यांचे भाऊबंद व सहयोगी गुर्जर वायव्य भारतातील गुर्जर नावाच्या प्रदेशातून सौराष्ट्रात आले. म्हणून सौराष्ट्राचे (पूर्वीचा लाट प्रदेश) नाव गुजराथ असे झाले. (प्राचीन भारत का भूगोल, पृष्ठ ४७४, प्रकाशक- उत्तर प्रदेश शासकीय हिंदी संस्थान) मुंबई सरकारच्या प्राचीन लेखावरून व विभिन्न संशोधनांवरून गुर्जर पाटीदार वर्ग वायव्य भारतातून गुजराथेत येण्याची पुष्टी मिळते. बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम १ च्या अनुसार पंजाबातही लेवा समाज विद्यमान आहे. आज तिथे त्याला शब्द अपभ्रंशामुळे 'लेयाँ' असे म्हणतात.

वरील स्पष्टीकरणावरून ह्या वंशावळीचा पुढील शब्दात संक्षिप्त गोषवारा काढता येईल :-

१ ली पिढी स्वायंभूव मनु + पत्नी शतरूया इ.सन पूर्व ४०२१

४५ वी पिढी राजा दक्ष इ.सन पूर्व २७६१ (तसेच, इ.सन. पूर्व १२७७ मध्ये महाभारत युद्धकाल श्री रामसिया सिंह दर्शवितात.)

४६ वी पिढी दक्षकन्या अदिती व तिचा पती कश्यप.

४७ वी पिढी अदितीचा १२ सूत विवस्वान उर्फ आदित्य (सूर्य)

४८ वी पिढी विवस्वान पुत्र वैवस्वत मनु हा भारतीय आर्यवंश संस्थापक होय.

४९ वी पिढी विवस्वानाच्या सूर्यवंशात जन्मलेला ईक्ष्वाकू हा प्रथम अयोध्या नरेश.

८४ वी पिढी (म्हणजेच सूर्यवंशातील ३९ वे वंशज) प्रभू रामचंद्र

(४८ वी पिढी विवस्वान सूर्यवंशाचा उगम + ६५ सूर्यवंशीय रामचंद्र = ११३.)

८५ वी पिढी लवाची

१४० वी पिढी सुमित्राची (लवानंतर ५५ वा पंजाबातील वंशज राजा).

१४४ वी पिढी सुमित्रानंतर ४ थे पिढीतील इ.सन १४४ मध्ये पंजाबातून गुजराथेत आलेला पहिला लववंशीय राजा कनकसेन हा होय.

२१३ वी पिढी प्रस्तुत ग्रंथलेखक शंकर विठोबा पाटील दुधलगावकरांची लववंशीय पिढी.

२१४ वी पिढी कृष्ण + राम + संजय व २१५ वी पिढी संकेतची.

टीप :- इ.सन १४४ साली सौराष्ट्रात आलेल्या प्रथम लववंशी कुर्मी क्षत्रिय सूर्यवंशी वसाहतकारास इ.सन २००० साली (२०००-१४४ = १८५६ वर्षे) सुमारे १८५६ वर्षे झाली.

कुर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, लेखक- डॉ.रामसिया सिंह, या ग्रंथाचे पृष्ठ ४१ वर पाश्चात्य [illegible]तांच्या कालगणनेबाबतच्या गृहीत कल्पसूत्रानुसार २८ वर्षांची एक पिढी ही मानलेली कालमर्यादा आधा[illegible]न धरून वरील १८५६ वर्षात (१८५६ ÷ २८ = ६६ पिढ्या + ८ वर्षे) गुजराथेत (सौराष्टात) कनकसेनाचे प्रवेशकाल सन १४४ पासून आजपर्यंत एकूण ६६ पिढ्या + ८ वर्षे होतात = ६७ वी पिढी.

कनकसेनाची १४४ वी पिढी + कनकसेनानंतरच्या आजपर्यंतच्या ६७ पिढ्या त्यात मिळविल्यानंतर (१४४ + ६७ = २११) आजची २११ वी वर्तमान पिढी होय. म्हणून लेवा कुणबीयांचे या वंशक्रमात प्रस्तुत ग्रंथ लेखक- श्री. शंकर विठोबा पाटील यांची अनायसे २११ पिढी ठरावी.

अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळाचे मासिक मुखपत्र 'लेवा परिवार' वर्ष १, अंक ७ ऑगस्ट १९९१, पृष्ठ७ वरील इंदूरचे श्री. वासुदेवराव पाटील यांच्या 'लेवा समाजाचा पूर्व इतिहास' या लेखात लेवा समाज हा **क्षत्रिय** वर्णाची एक शाखा आहे याला या लेखात दिलेले ११ आधार आहेत. त्यापैकी आठवा आधार पुढीलप्रमाणे आहे- "भारतात क्षत्रिय लोकांची कीर्ति लिहून काढण्याकरिता भाट व चारण असे दोन वर्ग होते. भाट लेक वंशावळी लिहितात. वंशावळी लिहिण्याची पद्धत फक्त क्षत्रियातच आढळून येते. पुराणग्रंथात फक्त क्षत्रिय वर्गाचीच वंशावळी दिलेली आहे. ब्राह्मण किंवा वैश्य वर्णियांची नाही. लेवा समाजांच्या लोकांची वंशावळीसुद्धा भाट लोकांकडून लिहिली जाते." यावरून लेवा कुणबी ही क्षत्रिय वर्णाचीच एक शाखा आहे हे सिद्ध होते. ब्रह्मज्ञानी निम्नजातीचाही ब्राह्मण बनतो म्हणून त्यांची वंशावळी लिहिता येणे शक्य नाही. (वेद पाठाद् भवेद् विप्रो ब्रह्म जानाती ब्राह्मण ॥ मनुस्मृती ॥

महाराष्ट्र टाईम्स या अग्रगण्य मराठी दैनिकात जात पंचायत सदरात 'बहुतांची अंतरे' या उपसदरात "वैश्याची उणीव भरून काढणारे कोमटी !" हा पुण्याचे श्री. रा.कृ. दुभलवार यांचा छोटासा लेख वाचला. त्यात परिच्छेद दोन मध्ये "महाराष्ट्रात वैश्य हा वर्णच नाही ... कोकणातील वाणी सोडल्यास अख्या महाराष्ट्रात वैश्य अशी जात नाही... वैश्य जातींची ही उणीव विदर्भ मराठवाड्यात आम्हो कोमटी लोकांनी भरून काढली आहे. कोमटी ही तेलंगणातील वैश्य जमात."

आणि उर्वरीत शूद्र वर्णीय तथा ब्राह्मण वर्णीयांचे वंशावळी लिहिण्याची पद्धती नाही. पुराणग्रंथातही ह्या वर्णीयांची वंशावळी देण्याचा प्रघात दिसत नाही. म्हणून कालगणना करताना क्षत्रियांचीच वंशावळी हा एकमेव आधार उरतो. आणि लेवा कुणबीयांच्या वंशावळी लिहिण्याची पद्धती प्रचलीत आहे. त्यांचे पिढीक्रमावरून इतिहास संशोधकांना कालगणना करण्यास एक आधार सापडतो.

क्षत्रियांच्या पिढ्याबाबत भाट उर्फ मांगटे लिखाण करीत असतात. लेवा पाटीदार क्षत्रिय कुणब्यांची पूर्वापार शाखा असल्याने परंपरेने लेवा कुणब्यांचे भाट असे लेखन करीत आले. प्रस्तुत ग्रंथ लेखक- कुणबी क्षत्रिय लेवा पाटीदार या सूर्यवंशीय वंश कुळीत सावदेकर शाखेत जन्मला असून भोरगाव पंचायतीच्या दाताळा डायामधील मौजे दुधलगावचा रहिवाशी आहे आणि या वंशकुळीचा भाट श्री. अशोक अभिम[illegible] नारखेडे लेवा भाट, भाटगल्ली. मुक्काम व पोस्ट व तालुका चोपडा, जिल्हा जळगाव यांचे [illegible] (चोपडी) क्रमांक, १ पान नंतर २९१ ते ३१७ यावरून श्री.

मनसाराम फुं.इला सरोदे लेवा भाट, भाट गल्ली, मु+पो+तालुका = जिल्हा चोपडा, जिल्हा जळगाव यांना दुधलगाव बुद्रुक, कुळ वराडे यांचे वंशावळीचा तपशील, तारीख १२ मे १९८७ रोजी श्री. शंकर विठोबा पाटील, मुक्काम व पोस्ट = दुधलगाव बुद्रुक, तालुका मलकापूर, जिल्हा बुलढाणा यांचे उपस्थितीत वाचून दाखविला. तो लेवाभाटाची पोथी ऐकताना प्रस्तुत लेखकाने ध्वनिमुद्रित केला होता. त्याचा गोषवारा पूर्वी दिला आहे.

या वंशवृक्षात दुधलगावचा पहिला लेवा कुणबी वसाहतकार लेवा भाटाचे मते सन १३५१ साली आला. इ.सन १८६० साली ग्वाल्हेरकर शिंद्यांनी भेलसा तालुका घेऊन इंग्रजांना त्याचे मोबदल्यात त्याचे ताब्यातील एदलाबाद पेटा दिला. त्याचे मुख्यालय एदलाबादचे नुकतेच मुक्ताईनगर असे नामकरण झाले.

या परिसरातील श्री. झेंडुजी महाराज बेळीकरांना कार्तिक शुद्ध ११ शके १७५५ (सन १८३३) रोजी पंढरपूरला भीमा नदीतिरीच्या पांडुरंगासमोरे वारकरी संप्रदाय दीक्षा दिली. या ह.भ.प. झेंडुजी महाराज बेळीकरांनी एदलाबाद कोथळीस श्री संत मुक्ताईचे समाधी संशोधन करून तेथील स्वयंभू मूर्तीची प्राणप्रतिष्ठापूर्वक दर वर्षीची पुण्यतिथी यात्रा प्रारंभ केला. व वारकरी पंथप्रसारकार्य या परिसरात सुरू केले. शके १८०० च्या मार्गशीर्ष वद्य द्वादशीस दुपारी ४ वाजता एदलाबाद कोथळीस श्री संत मुक्ताबाईचे समाधी स्थळी यांचे देहावसान झाले. त्यांचे नंतर त्याचे ज्येष्ठ शिष्य ह.भ.प. धनजी महाराज भुसावलकरांनी त्यांचे गुरूंनी सुरू केलेली वार्षिक मुक्ताबाईचे वारीचे दरमहाचे वद्य एकादशीचे मासिक वारीत परिवर्तन केले. व मुक्ताबाईचे वारीची दिंडी प्रथा सुरू केली, असे ह.भ.प. श्री. निवृत्ती दौलत वक्ते बडाळीकर यांचे ब्रह्मचित्कलादर्शन अर्थात श्री मुक्ताबाई चरित्र व गाथा, आवृत्ती २३ जुलै १९८०, पृष्ठ ४४१ वर स्पष्टपणे नमूद केले आहे. पृष्ठ ४४४ वर ह.भ.प. श्री. वक्ते महाराज स्पष्टपणे लिहितात की, "रेवा पाटील समाजाच्या त्या काळच्या महाराजांना मराठा समाज गुरुस्थानी मानत असत. त्यांनीच मराठा समाजास वारीचे वळण (या परिसरात) लावले." असे हे ह.भ.प. धनजी महाराज भुसावलकर मित्ती वैशाख शुद्ध एकादशी शके १८२४ (१९०२ सनात) रोजी भुसावळ येथे वारले. त्यांचे गादीवर झेंडुजी बेळीकरांचे द्वितीय शिष्य ह.भ.प. श्री संत नागोजी महाराज तळवेलकरांनी पंथप्रसार कार्य विशेषत: मराठा समाजात फार तळमळीने व प्रभावी[illegible] केले. त्या प्रभावी पंथ प्रसारकांना मार्गशीर्ष शुद्ध ११ गीताजयंती रोजी शके १८२७ रोजी स्वर्गवास झाल्याने ह.भ.प. [illegible]नाराम महाराज गाडेगावकरांनी त्यांची गादी पुढे चालविली, व आषाढी वारीहून परत येत असताना जगप्रसिद्ध अजिंठा लेण्याचे परिसरातील अजिंठा गावी श्रावण शुद्ध ५ गुरुवारी शके १८५५ साली यांची प्राणज्योत मालविली म्हणून ह.भ.प. झेंडुजी महाराज असोदेकरांनी मित्ती पौष वद्य चतुर्थी गुरूवारी शके १८९४ (सन १९७२) म्हणजे त्यांचे मृत्यूपर्यंत ते कार्य पुढे चालविले. व त्यांचे नंतर ह.भ.प. राजाराम शास्त्री शेळगावकर हल्ली ते दिंडी कार्य चालवीत आहेत. अशी ही लेवा पाटीदार समाजाची अग्रगण्य दिंडी कार्यरत असतानाच ह.भ.प. श्री झेंडुजी महाराज बेळीकरांचे तृतीय शिष्य ह.भ.प. मुकुंद महाराज एणगावकरांनी विदर्भाची एक नवी दिंडी उभारली. ता. १४ जानेवारी १९१५ पौष वद्य १४ शके १८३६ रोजी त्र्यंबकेश्वरचे श्री. निवृत्तीनाथ पुण्यतिथी वारीचे सांगतेनंतर यांचा मृत्यू झाल्याने ह.भ.प. मोतीराम महाराज एणगावकरांनी ती गादी चालविली. आषाढ शुद्ध १४ शके १८६९ ला त्यांचा मृत्यू झाल्याने ता. ९ जुलै १९४७ रोजी. ह.भ.प. श्री. काशीराम मोतीराम वराडे आडविहीरकरांनी आमरण ती दिंडी चालविली. मृत्यूसमयी ह.भ.प. यादव काशीराम वराडे आडविहीरकराकडे तो कार्यभार सोपविला.

या दिंडीचे संस्थापक : भ.प.श्री मुकुंद महाराज एणगावकरांनीच त्र्यंबकेश्वरला श्री निवृत्तीनाथ पुण्यतिथी वारी सुरू केली म्हणून दरवर्षी श्री निवृत्तीनाथ यात्रा प्रसंगी श्री निवृत्तीनाथ मंदिरात

पौष वद्य नवमीचे दिवशीचा आद्य कीर्तनाचा मान यांचे दिंडीस पूर्वापार चालत आला असून त्यांचे दिंडीसाठी मंदिरालगतच मोठे पटांगणही यांना मिळाले आहे.

तिसरी दिंडी जगन्नाथ महाराज अंजाळेकर, चवथी दिंडी श्री लक्ष्मण बुवा कुंडकर इत्यादी दिंड्या सूर्यवंशी कुणबी क्षत्रिय लेवा पाटीदारांच्या आजतागायत या परिसरात सांस्कृतिक उत्थान करीत आहेत.

पूर्वीपासून श्री संत मुक्ताबाई क्षेत्राच्या पूर्वेकडचा भाग विदर्भात सामील होता. व पश्चिमेकडील भाग खानदेशात गणला जाई. म्हणून मुक्ताई क्षेत्रात पश्चिमेकडील भागात ह.भ.प. धनजी महाराज भुसावलकर व मुक्ताबाई क्षेत्राचे पूर्वेकडील परिसरात ह.भ.प. मुकुंद महाराज एणगावकरांच्या अनुक्रमे खानदेश दिंडी व विदर्भ दिंडी म्हणून संस्था कार्यरत होत्या, व ह.भ.प. श्री संत नागोजी महाराज तळवेलकरांनी मराठा समाजात हे वारकरी संप्रदाय कार्य चालविले होते.

मठातील वारकऱ्यांच्या वाढत्या गर्दीमुळे सन १९०२ चे सुमारास मराठा समाजाने स्वतंत्र मठ उभारला, व इ.सन १८६० पासून एदलाबादपेठा विदर्भातून खानदेशात श्री. शिंद्यानी सामील केल्यामुळे खानदेश विदर्भातील समसमान वस्ती असलेला लेवा पाटीदार समाज बहुसंख्येने खानदेशात सामील झाला. व अल्पसंख्य विदर्भवासी लेवा समाजाची प्रत्येक वारकरी क्षेत्रातील मठात कुचंबणा होऊ लागली. तशातच खानदेशवासीय लेवा समाज श्रीमंत असून आधीच अल्पसंख्य असलेला विदर्भवासी लेवा समाज निकृष्ट जमिनीमुळे आर्थिकदृष्ट्या निकृष्ट ठरला. व त्यातच वेगवेगळे जिल्हा, वेगवेगळे महसूल विभाग, वेगवेगळी वर्तमानपत्रीय परिसर विभागणी, वेगवेगळी जिल्हा परिषद, तसाच भिन्न भूमीस्तर ह्यामुळे मराठी भाषिक लेवा पाटीदारांची एकात्मता दुभंगलीजाऊ लागली. प्रत्येक शहरात नोकरी धंद्यानिमित्याने आलेल्या एकाच जातीचे लेवा पाटीदार एकात्मतेने एकत्र येण्यास कसे कठीण होत गेले हे आपण पुढील प्रकरणी पाहू.

लेवा एज्युकेशन युनियन, जळगावचे श्री फकिरा हरी लेवा बोर्डींग हाऊसचे सुवर्ण महोत्सवी स्मृतिपुण्य १९६८, संपादक : प्रा. रा. वा. पाटील, मु.जे. विद्यालय, जळगाव या १९.११.१९६९ ला प्रकाशित झाले, त्यात लेवा समाजाची शैक्षणिक वाटचाल पृष्ठ एक, परिच्छेद २ मध्ये लिहिले आहे की, "सुमारे तीनशे वर्षांपूर्वी शहाजहान बादशहाचे कारकीर्दीत मिळालेल्या एका सनदेत राहणार पावागड जिल्हा अहमदाबाद हल्ली मुक्काम पाडळशे, परगणे सावदे "असा उल्लेख आहे.

-आणि 'यूथ कॉम्पिटिशन टाईम्स', संपादक : आनंद कुमार महाजन, पृष्ठ १५६ वर श्री महाजन लिहितात की, सुलतान अहमदशहाने सन १४१२ मध्ये अहमदाबाद नगराची स्थापना केली. यावरून हे सिद्ध होते की अहमदाबादला काही दिवस थांबलेला लेवापाटीदार समाज इ.सन १४१२ नंतरच गुजराथेतून स्थानांतरीत झाला.

महाराष्ट्र शासनाचे जळगाव जिल्हा गॅझेटियर संपादक डॉ. कि.का. चौधरी, आवृत्ती १९९४ मराठी प्रत पृष्ठ १८३ डॉ. चौधरी लिहितात की, "बऱ्याच लेवा पाटीदारांच्या वंशावळ्या चोपड्याचे भाट, त्र्यंबकेश्वरचे क्षौरकर्म करणारे ब्राह्मण व काशीचे पंडे यांनी ठेवलेल्या आहेत. चोपड्याच्या भाटांच्या नोंदी व्यवस्थित आहेत. त्यांच्या नोंदी पहाता दिसून आले की,- लेवा पाटीदार खानदेशात संवत् ११०० (म्हणजेच इ.सन १०४४)च्या सुमारास गुजराथमधून स्थलांतरीत झाले." ह्या वर्णनात थोडी विसंगती वाटते.

अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळाचा तिसरा वर्धापन दिन विशेषांक सन १९९४ च्या त्रैमासिक मुखपत्राचे संपादक : श्री. महेंद्र ओंकार राणे (मुंबई) यांनी संपादिलेल्या जानेवारी ते मार्च १९९४ चे अंकात, पृष्ठ ४५ ते ४७ वर श्री. शंकर विठोबा पाटील, मु.पो. दुधलगाव बुद्रुक, तालुका मलकापूर, जिल्हा बुलढाणा, पिन - ४४३१०१ यांचा "लेवा पाटीदारांनी गुजराथ सोडताना

निघालेल्या काही कुळांची माहिती" हा संशोधन पूर्ण लेख पाहता त्यात १६ वे कुळाचे गुजराथेतील गाव पृष्ठ ४६ वर अहमदाबाद दिले आहे व अहमदाबाद अहमदशहाने सन १४१२ मध्ये संस्थापिले असे डॉ. आनंदकुमार महाजन आपल्या 'यूथ कॉम्पिटिशन टाईम्स' पृष्ठ १५६ वर लिहितात. म्हणजेच लेवा पाटीदारांचे हे स्थानांतर सन १४१२ नंतरच झाले हे सिद्ध होते. म्हणून शासनाचे जळगाव जिल्हा गॅझेटियर, पृष्ठ १८३ वर संवत ११०० (म्हणजेच इ.सन. १०४४) हा लेवा पाटीदारांचा गुजराथेतून स्थानांतराचा काल मानणे मनाला खटकले.

तसेच, लेवा कुणबीयांची समकक्ष जात लेवा गुजर यांचे गुजराथेहून नंदूरबार मार्गे स्थानांतर संवत १२३४ (म्हणजेच सन ११७८) मध्ये झाल्याचे पृष्ठ १८७ वर, डॉ. चौधरी जळगाव जिल्हा, गॅझेटियर मध्ये लिहितात. यासाठी सन १२१९ मध्ये जामनेरच्या देशमुखीचे गवळ्याकडून लेवा गुजराकडे हस्तांतर झाल्याचे खानदेश, गॅझेटियर, सन १८८०, पृष्ठ ६३ चा दाखला देऊन डॉ. चौधरी ठासून मत मांडतात.

लेवा एज्युकेशनल युनियनच्या श्री. फकिरा हरी लेवा बोर्डींग हाऊसचे सुवर्ण महोत्सवी स्मृतिपुष्प १९६८ मध्ये साहित्याचार्य श्री. देवराम सखाराम बऱ्हाटे पाडळशेकरांच्या, पृष्ठ ३७ वरील "अशी संस्कृती असा समाज" ह्या लेखात, पृष्ठ ३९ वर श्री. बऱ्हाटे लिहितात की,- "संवत १५०८ च्या भाद्रपद शुद्ध ११ च्या दिवशी सत्पंथ प्रवर्तक सै. इमामुद्दीन इराणाहून हिंदुस्थानात गुजराथेत अहमदाबाद जवळच्या गिरमथा गावी आला. त्याचा पंथ काही लेवा पाटीदारांनी स्विकारला."

गुजराथेतून खानदेशात आलेल्या लेवा पाटीदारांपैकी काही लोक गिरमथागावच्या पिराणी पंथाचे श्री सतपंथ संप्रदायी आहेत. संतपंथ प्रवर्तक सैय्यद इमामशहा हा महंमद बेगडाचे कारकीर्दीत (इ.सन १४५८ ते १५११) गुजराथेत गिरमथा गावी येऊन त्याने तिथे संत्पंथ संस्थापिला. गुजराथेतील स्थानांतरीत लेवापाटीदारांपैकी काहींनी तेथून संत्पंथ स्वत:बरोबर खानदेशात आणला. यावरून त्यांचे गुजराथेतून स्थलांतर इ.सन १४५८ ते १५११ नंतरच झाले हे सिद्ध होते आणि म्हणून जळगाव जिल्हा गॅझेटियर, पृष्ठ १८३ वरील- "लेवा पाटीदार खानदेशात संवत ११०० (सन १०४४) मध्ये आल्याचे डॉ. चौधरींचे मत मनास खटकते. याउलट 'अशी संस्कृती असा समाज' ह्या लेखातील साहित्याचार्य श्री. देवराम सखाराम बऱ्हाटे यांचे पृष्ठ १०० वरील इ.सन १४८४ या पावा प्रलयानंतरच खानदेश विदर्भात आगमन झाल्याचे मत मनास पटते.

मात्र, भोरगाव लेवा पंचायत पाडळशे (ठाया दाताळा) विभाग मलकापूर, युवक-युवती मेळावा ता. १३ जानेवारी १९८५ ची स्मरणिका, संपादक - श्री. शंकर विठोबा पाटील, दुधलगाव, श्री. खडसे, श्री. खर्चे, श्री. फिरके, श्री. वराडे यांनी संपादिलेल्या अंकात लोकसेवक श्री. मधुकरराव चौधरी खिरोदेकर यांचा 'आपला आपण करू उद्धार !' या लेखात पृष्ठ ८४ वरील मत, असे सांगतात की,- "सन १३९७ मध्ये १४०० गाड्या गुजराथेतील पावागडहून नांदेडमार्गे तापी तीराने खानदेश विदर्भात आल्या." हेही मत तेवढे बरोबर वाटत नाही.

प्रस्तुत लेखक शंकर विठोबा पाटील दुधलगावकरांची वंशवेल गुजराथेतून १४०० गाड्यांसह आलेल्या लेवा पाटीदारांनी विदर्भात वसविलेल्या दुधलगाव बुद्रुक येथील आद्य लेवा पाटीदार जगदीश पाटीलांची वर्तमान १८ वी पिढी कुमार संकेत रामराव देशमुख दुधलगावकर हल्ली विद्यमान आहे. कुर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, लेखक- डॉ. रामसिया सिंह, पृष्ठ ४१ वरील तळटीप १ मध्ये पाश्चात्य पंडितांनी पुराणात वर्णिलेल्या पिढीचा सरासरी काल प्रत्येक पिढीस २८ वर्षांचा मानून वंशवेलीची कालगणना निश्चित केली. ह्या सूत्रानुसार (१८ पिढ्या X२८ वर्षे = ५०४ वर्षे) सुमारे ५०४ वर्षांपूर्वी गुजराथेतील १४०० गाड्यांसह आलेला दुधलगाव बुद्रुक येथील आद्य लेवा पाटीदार वसाहतकार- श्री. जगदीश पाटील आला हे सिद्ध होते. आजचा इसवी सन १९९७ - ५०४ वर्षेनांदलेल्या

दुधलगावच्या १८ पिढ्या = १४९३ वर्षांपूर्वी गुजराथेतून स्थानांतराने १४०० गाड्यांसह दुधलगावी आलेले आद्य लेवा पाटीदार वसाहतकारांचा काळ ठरविता येतो, आणि सन १४८४ च्या पावा प्रलयानंतर मजल -दर मजल करीत सुमारे सन १४९३ चे आसपास लेवा पाटीदार समाजाचा जथ्था खानदेश विदर्भात आला असावा हे सिद्ध होते.

सारांश :- मोहेंजोदाडो आणि हडप्पाची सिंधूघाटी संस्कृती पुरातत्त्वविद लोक इ.सन पूर्व ३२५० सालची मानतात. म्हणून = ५२४७ वर्षांपूर्वी सिंधूघाटी संस्कृती झाली असावी.

आचार्य चतुरसेन लिखित 'भारतीय संस्कृतिका इतिहास', पृष्ठ ९० च्या आधारे स्वायंभूव मनुर्भरत वंशाचे आद्य पिढीत स्वायंभूव मनु + त्याची पत्नी शतरूपा झाले. डॉ. रामसिया सिंह लिखित कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा पृष्ठ ४१ चे आधारे सत्ययुगाचा आरंभ मनुर्भरत वंशाचे आद्य पुरुष स्वायंभूव मनुपासून म्हणजेच इ.सवी सन पूर्व ४०२१ मध्ये होतो.

आणि या स्वायंभूव मनुपासून ४५ वे पिढीत दक्ष राज झाले. **४५ पिढ्या X २८ वर्षांची एक पिढी = एकूण १२६० वर्षांचा सत्ययुगाचा काल स्वायंभूव मनुकाल इ.सन पूर्व ४०२१ मधून वजा केल्यावर इ.सन पूर्व २७६१ पासून त्रेतायुगाचा काल सुरू होतो. हा दक्ष राजाचा काळ होय.**

यानंतर अदितीपुत्र विवस्वान उर्फ आदित्याचा सूर्यवंश त्रेतायुगात नांदला. डॉ. रामसिया सिंहांनी लिहिलेल्या- कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा ग्रंथ, पृष्ठ ४६ ते ४८ वर दिलेल्या वंशावळीचे अनुसार या त्रेतायुगात प्रभू रामावतरापर्यंत एकूण ३९ पिढ्या झाल्या. म्हणून ३९ पिढ्या X २८ वर्षाची एक पिढी १०९२ वर्षे त्रेतायुगीय रामावतरापर्यंत झाली. म्हणून सत्ययुगाचा अंत **दक्षकाळ इ.सन पूर्व २७६१** मधून त्रेतायुगातील प्रभू रामावतरापर्यंत ३९ पिढ्यांचा १०९२ वर्षांचा काल वजा केल्यास इ.सन पूर्व १६६९ पर्यंत त्रेतायुग होते. इ.सवी सन पूर्व १६६९ पासून द्वापार युग मानल्यास या द्वापारयुग संपून कलियुगास प्रारंभ झाला. म्हणून द्वापारातील १४ पिढ्या X २८ वर्षाची १ पिढी = ३९२ वर्षे द्वापार युगातील भोगलेली वर्षे इ.सन पूर्व १६६९ मधील रामावतार समाप्तीकालानंतरचा द्वापार युगीनकाल १४ पिढ्यांचा होता. म्हणून १४ पिढ्या X २८ वर्षाची एक पिढी = ३९२ वर्षे त्रेतायुगाचे अंतकाळातून वजा जाता इ.सन पूर्व १६६९ - ३९२ = इ.सन पूर्व १२७७ मधील महाभारत युद्धकालपर्यंत द्वापार युग होय. या द्वापार युगाचे शेवटी भगवान कृष्णानंतर कलियुगारंभ झाला. म्हणून इ.सन पूर्व १२७७ + वर्तमान सन १९९७ = ३२७४ वर्षे या कलियुगातील काळाची मानता येतील. म्हणजेच-

सत्ययुगातील ४५ पिढ्यांचा काल १२६० वर्षे
+ त्रेतायुगातील ३९ पिढ्यांचा काल १०९२ वर्षे
+ द्वापारयुगीन १४ पिढ्यांचा काल ३९२ वर्षे
+ कलीयुगीन ११७ पिढ्यांचा काल ३२७६ वर्षे
स्वायंभूव मनुपासून सन १९९७ पर्यंत ६०२० वर्षे

एकूण २१५ पिढ्यांचा एकूण ६०२० वर्षे सन १९९७ पर्यंतचा काल स्वायंभूव मनुपासून आजपर्यंत झाला. मात्र विष्णु पुराणानुसार एकूण पिढ्या मोजल्यास आजपर्यंत २३९ पिढ्या होतात. २३९ - २१५ = २४ पिढ्यांचा फरक पुराणांतरीच्या पिढीक्रमानुसार पडतो. म्हणून विष्णु पुराणानुसार २३९ पिढ्या x २८ वर्षे = एकूण ६६९२ वर्षाचा काल स्वायंभूव मनुनंतर येतो.

आचार्य चतुरसेनच्या 'भारतीय संस्कृतीचा इतिहास' ग्रंथाधारे डॉ. सिंग यांनी सत्ययुगातील ४५ पिढ्या + त्रेतायुगातील ३९ पिढ्या + द्वापार युगातील १४ पिढ्या + कलियुगातील ११७ पिढ्या = एकूण २१५ पिढ्यांचा काल ६०२० वर्षांचा येतो. या पिढी कालगणेनुसार प्रारंभापासूनच्या आर्यवंशीय मानवाच्या ४५ पिढ्या वर्तमान भारताबाहेर झाल्या. त्या मनुर्भरत **आर्य वंश** नावाने प्रसिद्ध आहेत.

त्यानंतरच्या ३९ पिढ्या भारतातील **सूर्यवंशीय क्षत्रिय कुर्मी** कुल म्हणून मशहूर आहेत. त्यानंतर द्वापारातील १४ पिढ्या क्षत्रिय कुर्मी कुलाच्या **लेवा कुर्मी** म्हणून म्हणता येतील. नंतरच्या वंशवेलीस इ.सन १४४ नंतर गुजराथेत **लेवा कुणबी** व सिद्धराज जयसिंग तथा महंमद बेगडा कालानंतर **लेवा पाटीदार** तसेच, इ.सन १४८७ नंतरच्या मराठी भाषिक लेवा कूर्मीयांना **पांजणे कुणबी** उर्फ लेवा कुणबी म्हणून संबोधिले गेले. इ.सन १९२० पासून **लेवा पाटीदार** व इ.सन १९७४ नंतर उत्तर भारतात **पाटीदार** गुजराथेत लेवा कुणबी, महाराष्ट्रात लेवा पाटीदार म्हणून संबोधिले गेले.

यांची प्रारंभी भाषा संस्कृत होती. नंतर पाली, प्राकृत अपभ्रष्ट, मराठी, मराठी, राजस्थानी, हिंदी, गुजराथी, आदी भाषा स्विकारल्याने यांच्यात दळणवळणांच्या साधनांच्या अभावी व प्रदेश भिन्नतेमुळे रोटी-बेटी व्यवहारात अंतर पडत होते, व पेहराव, पेशा व व्यवसाय बदलत गेले, व पर्यायाने छोट्या-छोट्या जाती-गटात ते विभागले गेले.

मुस्लीम काळात विद्या, कला व सत्ता यास आचवलेला हा समाज पेशव्यांच्या जुलमी ब्राह्मणी बादशाहीत पूर्णपणे निरक्षर ठेवला गेला. पेशवाईत ब्राह्मणाशिवाय इतरांना शिक्षणाची द्वारेजवळजवळ बंदच झाली. ब्राह्मणांनी पेशवाईत लादलेली सामाजिक गुलामगिरी मोगलापेक्षाही भयानक होती. सुदैवाने पेशवाईचा ब्राह्मणी अंमल गेला व आंग्लाई आली म्हणून सर्वांना शिक्षणाची द्वारे खुली झाली. तरीपण सामाजिक समता गोगलगायीचे गतीने सुधारू लागली. पण सन १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. सन १९५० पासून डॉ. आंबेडकरांनी नवी समताधिष्टीत भारतीय घटना सर्वांसाठी प्रदान केल्यामुळे प्रतिगामी सनातनी वर्ग व पुरोगामी प्रगतीशील वर्ग यातील विषमतेची दरी वेगाने घटत आहे. तरी आजही सनदी उंच नोकऱ्यात, पक्ष संघटनाप्रमुख पदी, ब्राह्मणेत्तर समाज नगण्य आहेत. त्यांची वर्तमानपत्रे नाहीत. देवळातील पुरोहितशाहीची ठेकेदारी अजूनही ब्राह्मणवर्गाकडेच आहे. धर्माचे नावाखाली समतेच्या तत्त्वावर आधारित पक्षांना विरोध होत आहे. हिंदूधर्मात अजूनही कमालीची विषमता आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्याय याची धर्मामध्ये लोकशाही मूल्ये अजूनही धर्माधिष्ठीत पक्षांनी उचलून धरली नाहीत. मंदिरे, यज्ञयाग, अंधश्रद्धा यात लोकशाही आणायला कसून विरोध होत आहे. त्यामुळे समतेला विरोध करणारे देशाचे दुष्मन, धर्म, देवळे, राजकीय पक्ष, साहित्य संस्था यात तळागाळातील लोकांना अजूनही वाव देत नाहीत. यामुळे देशाची एकात्मता ठिसूळ राहते. समताधिष्ठित मुस्लीम समाजासारखी एकात्मता यापुढे जन्मजात वर्णविषमता नष्ट केल्याशिवाय हिंदूधर्मियांत येऊ शकत नाही.

टीप :- इ.सन पूर्व ४०२१ स्वायंभूव मनुर्भरत (पिढी १ली)
इ.सन पूर्व २७६१ दक्षराज (पिढी ४५ वी)
इ.सन पूर्व १६६९ स्वकुलनायक सूर्यवंशी प्रभू रामचंद्र (सूर्यवंशात ३९ वी पिढी)
इ.सन पूर्व १२७७ भारतीय महायुद्धकाल
इ.सन पूर्व ७८ सुमित्र काळात लेवा पाटीदारांनी पंजाबातून स्थानांतर केले.
इ.सन १४४ कनकसेनाने गुजराथेत राज्य संस्थापले.
इ.सन १०९४ सिद्धराज जयसिंहाने भू-पट्टे देऊन पाटीदार बनविले.
इ.सन १४८३ महंमद बेगडाने भू-पट्टे देऊन पाटीदार बनविले.
इ.सन १४८७ लेवा पाटीदारांनी गुजराथेतून तापी तीराने स्थानांतर केले.
त्या वेळी पश्चिम विदर्भात क्षत्रिय यादव राज्य संपले होते. प्रा.कृ.पा. कुलकर्णी यांच्या मते - इ.सवी सनापूर्वी सातव्या शतकानंतरच आर्य लोकांनी दक्षिणेकडे स्थलांतर करण्यास सुरुवात केली. अर्थातच तोपर्यंत नाग लोक या विभागात दृढपणे स्थायिक झालेले होते. या दोन लोकांचे तादात्म्य होण्यासाठी सुमारे १००० वर्षे लागली. इ.सवी सनाच्या सुमारे पाचव्या शतकात मराठ्यांचा

उदय झाला. त्यांची मराठी भाषा होय. (महाराष्ट्र राज्य परिचय, महाराष्ट्र शासन मुंबई, १९६०, पृष्ठ १५ पहा).

महाराष्ट्रात इ.सन पूर्व ३२१ ते १८४ पर्यंत मौर्यवंश, इ.सन ३०० ते ६०० पर्यंत विदर्भात वाकाटकांचा अंमल होता. नंतर इ.सन ९७३ ते ११८० पर्यंत चालुक्य वंश नांदला. पुढे सन ११८९ ते सन १३०७ पर्यंत देवगिरीच्या यादवांचे येथे राज्य होते. सुमारे **९ व्या शतकात मराठी बोली प्रथमच लिखित साहित्याचे माध्यम म्हणून वापरली.** (महाराष्ट्र राज्य परिचय, महाराष्ट्र शासन, पृष्ठ १७ पहा). तेराव्या शतकात चक्रधराच्या महानुभाव पंथाने या भागात मराठीला धर्मभाषेचे स्थान दिले. त्यामुळे अजिंठ्यात मढ उर्फ जाईचा देव हे चक्रधराचे वास्तव्यस्थान मराठीचे माहेरघर बनले. त्या परिसरात बुलढाणा जिल्ह्यात जयपूर कोथळी येथे ही त्यांनी मराठीतून धर्मप्रचार केला. या परिसरात अजिंठ्याचे पायथ्याशी ९०० वर्षांपूर्वी पिरात सिंगाचे पिंपळगाव राजा येथे एक गुराखी राजघराणे राज्य करीत होते. तेथे विद्वानाचे वास्तव्य होते. याच परिसरात मराठीचा उगम झाला. विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात मोताळा तालुक्यातील रोहिणखेडणच्या श्रीपतीने "ज्योतिष रत्नमाला" नावाचा आद्य मराठी ग्रंथ इ.सन ९९९ ते १०५८ मध्ये लिहिला. (५८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, जळगाव, दिनांक २८, २९ व ३० जानेवारीला १९८४ मधील परिसंवाद : आधार लेख पहिला मराठी भाषा, प्रगति व संभावना. लेखक डॉ. वसंत कृ. वऱ्हाडपांडे या लेखाचे आधारे) या परिसरातील पिंपळगावराजा येथे सन १६१९ चे सुमारास प्रसिद्ध साहित्यिक गणेश दैवज्ञ होऊन गेला. (बुलढाणा जिल्हा गॅझेटियर, आवृत्ती २ री, सुधारित, सन १९०६, पृष्ठ ७८६ पहा). नवनाथ ग्रंथात वर्णिलेल्या प्रसिद्ध नवनाथापैकी कंबळनाथाचे याच परिसरात वास्तव्य होऊन गेले. (बुलढाणा ज़िल्हा गॅझेटियर १९७६, पृष्ठ ७८६ पहा). याच परिसरातील राजूरला नुकताच गौतमबुद्धाची प्रतिमा तळाशी असलेला शिलालेख सापडला. (बु.जि.गॅझेटियर, पृष्ठ ७८८). तसेच, याच परिसरात रोहिणखेडला लेवा पाटीदारांचे आगमन कालात अल्लाउद्दीन बहामनी राज्य करीत होता. बुरहाणपूरच्या नासिर खान-फारूकीने सन १४३७ मध्ये येथील सुलनातावर हल्ला करून ह्या भागाचा पूर्ण विध्वंस सन १४३७ साली केला. त्याच्या पुनर्वसनासाठीही कदाचित ह्या बहामनी राज्यात लेवा पाटीदारांचे स्वागत झाले असावे.

जवळच चिखली तालुक्यात माहेंबा येथे प्रसिद्ध संत गोरक्षनाथाचीही समाधी आहे. (बु.जि. गॅझेटियर, पृष्ठ १८९). अशा ह्या परिसराकडे लेवा लोक आकर्षित झाले. या गोरक्षनाथासच अमरजा व कामळजा परिसरात तत्कालीन कमळनाथ म्हटले असावे. कमळजा नदीच्या उगम स्थानी कमळाच्या फुलांची विपूलता असावी. यावरून ती कमळजा म्हणून प्रसिद्धीस आली असेल काय ?

भोरगाव लेवा पंचायत पाडळशे (ठाया दाताळा) विभाग मलकापूरच्या युवक-युवती मेळाव्यात ता. १३ जानेवारी १९८५ ची स्मरणिका, संपादक : शंकर विठोबा पाटील, दुधलगावकर, तथा श्री. खडसे, श्री खर्चे, श्री. फिरके व श्री वराडे या स्मरणिकेत, "आपुला आपण करू उद्धार" लेखक लोकसेवक मधुकरराव धनाजी चौधरी खिरोदेकर, पृष्ठ ८४, स्तंभ २ मधील परिच्छेद २ मध्ये बाळासाहेब चौधरी लिहितात की, "१३९७ मध्ये १४०० गाड्या गुजराथमधील पावागडहून मजल-दरमजल करीत निघाल्या. त्यांचा पहिला मुक्काम अंमळनेर तालुक्यातील नांदेड या तापीकाठच्या गावी पडला... येथून ७०० गाड्या तापीच्या उत्तरेकडून यावल, रावेर, बऱ्हाणपूरकडे आणि ७०० गाड्या तापीच्या दक्षिणेकडून जळगाव, भुसावळ, मलकापूरकडे गेल्या. अशी झाली आरपट्टी व पारपट्टी. प्रत्येक 'पट्टी' वाले पट्टीचे अहंकारी परंतु, दळण वळणाच्या साधनामुळे व शिक्षणामुळे नातेसंबंध वाढल्यामुळे आरपट्टी-पारपट्टी हा भेद खूप कमी झाला आहे."

लेवा भाटांच्या वह्यातही काही पुरावे सापडतात. ते पडताळून पहावे. या लेवा भाटांचे वंशावळीतील

काहींना भेटण्यासाठी त्यांची वंशावळी देत आहे. लेवा भाटाची वंशावळी वही नंबर ४.

राजाराम देवराम (नारखेडे) भाट + त्याचा भाऊ

१ अचंबादास २ बळीराम ३ अभिमन्यु | कडू आंधळा

देविदास कै. कृपाराम मधुकर अशोक नथु

(यास ३६ गावांची भाटगिरी आहे) | राजू (हा (खानदेशचा भाट) नोकरी करतो) | १०० गावांची भाटगिरी करतो. नांदेड भागात

सुधाकर राजू

(हा जळगावला नोकरी) करतो (धंदा भाटगिरी)

हे भाट लोक आश्विन + कार्तिक मासात स्वगृही असतात.

आरपट्टी (बऱ्हाडासह भाग) व पार पट्टी (सावदा परिसरासह) विभागवार भाटांना भेटा.

१. देविदास अचंबा नारखेडे (भाट) मु + पोस्ट = चोपडा, तालुका = चोपडे, जिल्हा - पूर्व खानदेश, बाजारपेठेत, मिसर गल्लीत राहातात. (३६ गावांची भाटगिरी)

२. सुधाकर देविदास नारखेडे, भाटगल्ली, मु. + पोस्ट = चोपडा, जि. जळगाव महा.राज्य)

३. बळीराम राजाराम भाट (बळीराम उर्फ तितंबा) भाटगल्ली, चोपडा, जिल्हा पूर्व खानदेश.

४. अभिमन्यु राजाराम भाट (३६ गावांची भाटगिरी खानदेशात करतात.) भाटगल्ली, चोपडा.

५. राजु कृपाराम भाट, चोपडा (जिल्हा जळगाव महा. राज्य)

६. नथुभाट, नांदेड परिसरात राहून १०० गावांची भाटगिरी करतात.

या भाटांच्या मते सन १२७५ चे सुमारास बडोद्याचे भीमसेन राजपूत राजाचे आश्रयास काही लेवा समाज राहात होता. पण अल्लाउद्दीन खिलजी व महंमद घोरीच्या गुजराथवरील आक्रमणामुळे ते तेथून विखुरले. त्यापैकी कोलते कुळाचे सन १२७१ साली बार्डोलीस वास्तव्य होते. सरदार वल्लभभाई पटेल याच कुळातील होत. सन १३७१ साली या कुळातील रामजी कोलते या व्यक्तीने नरवेल येथे प्रथम वास्तव्य केले. त्याचे वंशज अजून तेथे नांदतात. त्या कुळातच मराठी भाषिक लेवा कुळ भूषण पद्मश्री डॉ. वि.भि. कोलते हे एक होत.

तसेच, बॉम्बे गॅझेटियर, पु. १८, ट्राईब्ज ऑड कास्टस् ऑफ बॉम्बे, व्हॉ.२, सी.पी.इ. व महाराष्ट्र ज्ञानकोश व ५३५ व ५४२ ह्या पृष्ठावर वऱ्हाडी कुणबी १४ वे शतकात गुजराथेहून खानदेशात आल्याची नोंद सापडते. त्यात झाडे, खैरे, धानोरे, तिरोळे, छिंडवाड्यातील गाढवे पाळणारे असे अनेक टोळ्यांचे उल्लेख आहेत. त्यांचे सोबत काही लेवा पाटीदारही इकडे आले असावेत असे वाटते.

ता. ६ मे १९६१ रोजी मौजे दुधलगाव बुद्रुक येथे लेवा भाटाची मी मुलाखत घेतली होती. तेव्हा त्यांनी सांगितले की, गुजराथ प्रदेशात पावागड परगण्यात वेझलपूर वालवाडे येथील शांडिल्य गोत्राचे वराडे आडनावाचे श्रीयुत भयाजी पाटील हे अंदाजे सन ४११ साली तेथे वैभवाने नांदत होते. त्याचे वंशज सन ७१२ साली त्याच वेझलपूर गावची पाटिलकी करीत होते. पुढे यवनांच्या उपसर्गामुळे सन १२७५ च्या नंतर १४०० गाडीने कडवीर ते अहमदाबाद भडोच मार्गे नर्मदेवर एक लक्ष रुपये खर्चून एक पूल दुरुस्त करून सुरत ते नवापूर ते नंदूरबार ते सुलतानपूर ते नांदेड मार्गे खानदेशात बुरहाणशहांचे अंमलाखाली वसाहतीस राहिले. तेथे पाटिलकी, देशमुखी, महाजनकी ही वतने मिळविली. ह्या टोळीचे प्रमुख वरील वेझलपूर निवासी वराडे आडनावाचे लोक होते. त्याचे नेत्याला चार मुले होती. ती साकेगाव, एदलाबाद, दाताळा व दुधलगावला राहू लागली.

त्यांचे वंशज अजूनही तिथे नांदतात. आलेल्यांपैकी ७०० गाड्या तापी अलीकडे व ७०० गाडी तापी पलीकडे विसावली व सात-आठ गाड्या बऱ्हाणपूरमार्गे नेमाड जिल्ह्यात प्रवेशिल्या.

राजकीय आक्रमणामुळे बदलत्या प्रादेशिक सरहद्दीने खानदेश व वऱ्हाडातील प्रदेशांचे क्षेत्रही कायम राहू शकले नाही.

या समाजाचे सन १९१५ साली रावसाहेब रूपचंद यांचे अध्यक्षतेखाली एक संमेलन झाले. तेथून स्फूर्ती घेऊन सन १९१८ साली एक भ्रातृमंडळ स्थापन झाले. सन १९१९ साली दाताळा ठायातील ७८ गावांची खानेसुमारी केली.

श्री. देवराम सखाराम बऱ्हाटे, पाडळसा, तसेच, प्रा.टी. एन. चोपडे, पुनमचंद नाहटा कॉलेज भुसावळ, यांच्याप्रमाणेच श्री. शा.जा. महाजन भादलीकर, अजिंठा प्रेस, भुसावळ, पांडुरंग टॉकीजसमोर यांनी लेवा समाज पत्रिकेत अल्पसे लिखाण केल्याचे ऐकतो.

सीताराम नाना चौधरींनी आत्मोद्धार साप्ताहिकात लेवा जातीसंबंधी लिखाण केल्याचे बोलले जाते. श्री. के. नारखेडे भुसावळकर यांचे अंजनी कादंबरीत काही लेवा पाटीदार संदर्भ सापडतात असेही ऐकले.

फकिरा हरी लेवा बोर्डींगमध्ये श्री. रा. वा. पाटील, भालोदचे त्र्यंबक चापा चौधरी, प्रभाकर पाटील तळवेलकर हे पत्रकार, नांदेड ते नांदुऱ्यापर्यंतचे ३.५ लाख लोकांपैकी वयोवृध्द जाणकार मंडळी याकडेही काही माहिती मिळू शकेल. जळगाव पूर्व खानदेशाचे श्रीकृष्ण प्रिटींगप्रेस मध्ये सन १९३२ साली सुमारे ४३ पृष्ठांचा खानदेशस्थ लेवा पाटीदारांची भाषा अशुद्ध मराठी नसून अपभ्रष्ट गुजराथी आहे हे दर्शविणारा श्री. देवराम सखाराम बऱ्हाटे पाडळशेकर यांचा एक लेख श्री. नामदेव माधव नेमाडे यांनी मुद्रित करून श्री. बऱ्हाटेंनी प्रसिद्ध केल्याचेही मी ऐकले आहे.

ऋग्वेद मंडल १, सुक्त ११७, मंडळ ८-५५, मंडल ३, सूक्त ६ व शतपथ ब्राह्मण अध्याय ७, ब्राह्मण ५-१ तथा बॉम्बे गव्हर्नमेंट गॅझेटियर व्हॉल्यूम १ तसेच लोकहितवादीकृत गुजराथचा इतिहास मधील पावानो प्रलय वाचा. सन १४८४ मध्ये लेवा लोक सर्वत्र के विखुरलेत हे पृष्ठ १८० व १८२ व पृष्ठ २६७ वर पहा असेही मला एका जाणकाराने सांगितले. हे वाचल्यास जयसिंग रावळ रजपूताची वात्रकतिरीची चापानेर परिसरात पावगड परगण्यात पट्टीदार लेवा कसा नांदला हे पाहिल्यावर लेव्यांचे कालिका मंदिर व महाकालीची मूर्ती यांचे विध्वंसन कसे झाले व लेवा लोक निर्वासित होऊन कसे विखुरले हेही कळेल. व खानदेशातील फारुकी अंमलात त्याचे पुनर्वसन झाले. नंतर अकबरानेही त्यांना आश्रय दिला. नंतर त्यांचे कायम वास्तव्य येथे झाले.

प्रकरण १२

लेवा पाटीदार जातीचा पूर्वेतिहास- भाग २ रा

डॉ. आनंदा कौतिक कोल्हे आपल्या "पिंपरुड कोल्हे कुळवृत्तांत" ग्रंथात पृष्ठ २ वर लिहितात की,- "विदेशी लोकांच्या स्वाऱ्यांमुळे रघुवंश (क्षत्रिय लेवा) दक्षिणेकडे सरकला. तो गुजराथपर्यंत आला. काही काळाने गुजराथमधील हा समाज मुसलमानी राजवटीला कंटाळून अगर गरिबीमुळे अगर छप्पनीचा (१२ वर्षे दुष्काळामुळे) नर्मदा व तापी नदीच्या संगमाकडे खानदेश व वऱ्हाडपर्यंत पसरला. ह्या स्थलांतरात मूळचा क्षत्रिय लढवय्या गुण विसरून शेतकरी बनला."

डॉ. कोल्हे याच ग्रंथात पृष्ठ ९ वर लिहितात की,- "स्मृती पूर्व काळी गोत्र जन्मानुसार प्राप्त होत नव्हते. उपनयनात नंतर ते गुरुकडून प्राप्त होई. त्यामुळे गुरुचे गोत्र त्यास मिळत असे. कालांतराने पिता गुरुचे कर्म करू लागला म्हणून गोत्राची जागा पितृपरंपरेने घेतली."

मध्यंतरी ब्राह्मणीधर्माच्या अतिरेकी जुलमी धर्मव्यवस्थेमुळे ब्राह्मणेतरांना शिक्षणाची द्वारे बंद केली होती. त्यामुळे त्यांना गुरू नसत, व म्हणून गुरूचे गोत्र प्राप्त होणे थांबले. गुरूगृही ब्राह्मणेतरांना प्रवेश बंदी झाल्यामुळे त्यांचे उपनयन संस्कारही थांबले. त्यामुळे उपनयन प्रसंगी प्राप्त होणारे गुरू-गोत्र मिळणेही थांबले. म्हणून या काळात पिताच आपल्या मुलांना उपनयन संस्कारवशात शिक्षण प्रदान करू लागल्याने गुरूगृही प्राप्त होणारे गुरु-गोत्र मिळण्याऐवजी पितृगोत्र प्राप्त होऊ लागले.

डॉ. कोल्हे, पृष्ठ १० वर जळगाव जिल्हा गॅझेटियर, १९९५ चा आधार देऊन अनेकांना आपली गोत्रे माहित नाही असा उल्लेख करतात. नाशिक क्षेत्रातील वऱ्हाड खानदेश लेवा पाटील यांचे उपाध्याय शुक्ल यांचेकडे चौकशी केली, तेव्हा समजले की- सुमारे ९०% लेवा पाटीदारांना त्यांचे गोत्र माहीत नाही. असे डॉ. कोल्हे लिहितात.

'ब्राह्मणशाहीचा विजय' लेखक- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अनुवाद : म. य. दळवी, सुगावा प्रकाशन, पुणे आवृत्ती १ली १९९४, पृष्ठ ७ वर, डॉ. आंबेडकर लिहितात की,- "भृगूने रचलेली संहिता 'मनुची धर्मसंहिता' या ग्रंथाचे नाव इ.सनाच्या चौथ्या शतकात नारद स्मृतीच्या लेखकाला हे नाव माहित होते. नारदाच्या माहितीप्रमाणे मनुस्मृतीची लेखिका सुमती भार्गव ही आहे... सुमती भार्गवने ही संहिता खिस्तपूर्व १७० ते १५० या काळात लिहून तिला 'मनुस्मृती' हे नाव दिले. **पुष्यमित्राने केलेली ब्राह्मणी क्रांती खिस्तपूर्व १८५ मधे झाली.** मनुस्मृतीच्या पूर्वी मानवधर्मसूत्र नावाची संहिता अस्तित्वात होती. पृष्ठ ९ वर डॉ. आंबेडकर लिहितात की, असेही अगदी शक्य आहे की पुष्यमित्रानेच मनुस्मृती तयार करण्याचे आदेश दिले असावेत, व ब्राह्मणी तत्त्वज्ञानाचे ग्रंथ म्हणून त्याला स्थान दिले असावे."

पुष्यमित्राने वर्णाचे जातीत रूपांतर केले. स्त्री-शूद्रांची अवनती केली. उच्च-नीच वर्गवारी करून असमानता निर्माण केली. लवचिक असलेली समाजव्यवस्था बदलून ताठर बनविली. (ब्राह्मण शाहीचा विजय, ले.- डॉ. आंबेडकर, पृष्ठ १२). त्यामुळे हिंदूधर्मात विषमतेची सड निर्माण झाली. म्हणूनच भारताची अवनती होऊन पारतंत्र्य आले. पुष्यमित्राने ब्राह्मणासाठी मक्तेदारी निर्माण केली. अध्ययन व अध्यापनाचा हक्क ब्राह्मणांना त्याने दिला. (ब्राह्मणशाहीचा विजय ले. आंबेडकर, पृष्ठ १४). अध्यापन करणे, दुसऱ्यासाठी यज्ञ करणे (पुरोहितपण) व दान देणे या गोष्टींची क्षत्रियांना बंदी केली.

ब्राह्मणशाहीने वर्णाचे रूपांतर जातीत केले. याचा अर्थ दर्जा व व्यवसाय हे वंशपरंपरागत करण्यात आले. (ब्रा. वि., पृष्ठ २३) ब्राह्मणशाहीने आंतरजातीय विवाह व भोजन यांना प्रतिबंध करून समाजाच पूर्ण विघटन केले. ही सामाजिक ऐक्याची मृत्यूघंटा आहे. (ब्रा.वि., पृष्ठ ४२). जाती व्यवस्थेमुळे राष्ट्रवादाच्या वाढीत फार मोठा अडथळा झाला. (ब्रा.वि., पृष्ठ ४२). त्यांनी आंतरजातीय विवाहांना व सहभोजनांना चार वर्गात बंदी केली. (ब्रा.वि., पृष्ठ ४४). त्यामुळे पूर्वीचा गुण व कर्मानुसार आदर घटून जन्माबद्दल आदर निर्माण केला गेला.

उत्तर वैदिक काळात चातुर्वर्ण्य विभागणी झाली तरी, आंतरजातीय विवाहांना बंदी नव्हती. वर्णसंस्कार हा कायदेशीर व नितीमान मानला जाई. उदा :-

अ.न.	पती	पतीचा वर्ण	पत्नी	पत्नीचा वर्ण
१.	शंतनु	क्षत्रिय	गंगा	शूद्र (अनामिक)
२.	शंतनु	क्षत्रिय	मत्स्यगंधा (शूद्र)	कोळी
३.	पराशर	ब्राह्मण	मत्स्यगंधा (शूद्र)	कोळी (व्यास)
४.	विश्वामित्र	क्षत्रिय	मेनका	अप्सरा
५.	ययाती	क्षत्रिय	देवयानी	ब्राह्मण
६.	ययाती	क्षत्रिय	शर्मिष्ठा	आसुरी (अनार्य)
७.	जरात्कारू	ब्राह्मण	जरात्कारी	नाग (अनार्य)

ब्राह्मणशाहीने एखाद्या पिसाळलेल्या पशूप्रमाणे विविध वर्गातील या आंतरवर्णीय विवाहांवर हल्ला करून ते बंद केले. (ब्रा. वि., ले.- डॉ. आंबेडकर, पृष्ठ २८ व २९ पहा). म्हणूनच लेवा कुर्मीयांनी इ.सन पूर्व ७८ नंतर आपली मूळ भूमी पंजाब सोडून इतरत्र वस्तीस सुरुवात केली असावी. बुद्धपूर्व काळात अशी आंतरजातीय व आंतरवर्णीय विवाहांना मुभा होती. (ब्रा.वि., पृष्ठ २८) उदा.-

१ वरुण मित्र + उर्वशी

२ वशिष्ठ + अक्षमाला - शक्ती

३ पराशर + मत्स्यगंधा - व्यास

ब्राह्मणशाहीने हे आंतरवर्णीय विवाह बंद केले. मनुने अंतर्विवाहांना बंदी केली... सह भोजनावरही बंदी घातली. (ब्रा.वि., पृष्ठ २९). मनुने विधवा-विवाह बंद केले.

जातीबाहेर टाकल्यानंतर जर मुले झालीत तर तेही वारसा हक्क गमावतात. ती मुले जातीबाह्य समजली जातात. (उदा. संत ज्ञानेश्वर भावंडे, ब्रा.वि., पृष्ठ ४१ पहा).

अनुलोम विवाहातही ब्राह्मणशाहीने केलेले अन्याय पहा :-

१ वडिलांचे नाव	पित्याचा वर्ण	आईचे नाव	आईचा वर्ण	मुलाचे नाव	मुलाचा वर्ण
१. शंतनु	क्षत्रिय	गंगा	शूद्र	भीष्म	क्षत्रिय
२. शंतनु	क्षत्रिय	मत्स्यगंधा	शूद्र	विचित्रवीर्य	क्षत्रिय
३. पाराशर	ब्राह्मण	मत्स्यगंधा	शूद्र	कृष्णद्वैपायन	ब्राह्मण
४. विश्वामित्र	क्षत्रिय	मेनका	अप्सरा	शकुंतला	क्षत्रिय
५. ययाती	क्षत्रिय	शर्मिष्ठा	असूरी	द्रुत्प	क्षत्रिय
६. जरत्कारू	ब्राह्मण	जरत्कारी	नाग(अनार्य)	असिता	ब्राह्मण

या नियमाला 'पितृसवर्ण्य' असे म्हणत.

स्त्री + शूद्र मिळून एकंदर लोकसंख्येच्या ७५ टक्के आहेत. या प्रचंड लोकसंख्येवर ब्राह्मणशाहीने

कायमचे दास्य व अधोगती अवस्था लादली आहे... म्हणून भारत हे एक विनाशप्रत पोचलेले जवळजवळ मृतवत राष्ट्र बनले (ब्राह्मणशाहीचा विजय, ले.- डॉ.आंबेडकर, पृष्ठ ५५ पहा). म्हणून चातुवर्ण्याचे ध्येयच सदोष आहे. (ब्रा.वि., ले.- डॉ. आंबेडकर, पृष्ठ ५९). त्यामुळे सुरुवातीपासून ब्राह्मणीवर्ण हा शिक्षित पण स्वार्थी राहिला. (पृष्ठ ६०, ब्रा. वि., ले.- डॉ. आंबेडकर).

मनुने ब्राह्मणांना भूदेव (पृथ्वीचा मालक) म्हणून संबोधले व या शब्दाची व्याप्ती वाढवून ब्राह्मणांनी इतर वर्णांच्या स्त्रिया भोगण्याचा हक्क ब्राह्मणाला आहे असा त्याचा अर्थ लावला. हे विशेषत: मलबारमध्ये झाले. अगदी राण्याही या नियमाला अपवाद राहिल्या नाहीत... ज्यावेळी राजा विवाह करतो, त्यावेळी तो अत्यंत सन्मानप्राप्त व अगदी योग्य ब्राह्मण शोधून त्याच्याकडे आपल्या नवविवाहित पत्नीला पहिल्या रात्री झोपण्यास पाठवून तिचे कौमार्य खुडून टाकण्यासाठी योजना करतो."

हॅमिल्टन नावाच्या दुसऱ्या लेखकाने वर्णिलेले केरळातील या नंबुद्री ब्राह्मणांच्या पुरोहितांचे संभोग स्वातंत्र्य इथे लिहू शकत नाही, एवढे जहाल आहे. जिज्ञासूंनी ते ब्रा.वि., ले.- डॉ. आंबेडकर, पृष्ठ ६२ वरून वाचा).

मुंबई प्रातांत वैष्णव पंथातील पुरोहित, स्त्रीच्या कौमार्याचा पहिला उपभोग घेण्याचा हक्क सांगतात, यातून १८६९ मध्ये महाराजा अब्रुनुकसानीचा प्रश्न निर्माण झाला. वैष्णव पंथाच्या मुख्य पुरोहिताने मुंबईच्या उच्च न्यायालयात कर्झनदास मुलजी यांच्यावर खटला भरला होता. यावरून या वेळेपर्यंत आपल्या पंथातील नवविवाहित पत्नीचा प्रथम उपभोग घेणाऱ्या पुरोहिताचा हक्क अंमलात होता हे सिद्ध होते. (ब्राह्मणशाहीचा विजय, लेखक- डॉ.आंबेडकर, पृष्ठ ६२ वरून).

या पुराव्यावरून ह्या मनुप्रणित सडलेल्या सनातन हिंदू धर्माची चीड येते. यामुळे ब्राह्मण व क्षत्रियांच्या लढाया सुरू झाल्या. "खरे पाहता **ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यात असंख्य वर्गयुद्धे झाली.** त्यापैकी जी महत्त्वाची होती त्याच्याच नोंदी प्राचीन हिंदूच्या वाङ्मयात सापडतात. **या सर्व नोंदीचा संग्रह प्रा.मुदिर यांनी आपल्या ओरिजिनल संस्कृत टेक्स्ट खंड १ ला यामधून वाचा.** (ब्राह्मणशाहीचा विजय, लेखक- डॉ.आंबेडकर, पृष्ठ६८ वरून).

ब्राह्मण आणि क्षत्रिय राजे यांच्यातील संघर्षाची नोंद इतिहासात आहे. यापैकी पहिला नोंदविलेला संघर्ष राजा वेणा, दुसरा पुरुवर्याशी, तिसरा नहुशाशी, चौथा निम्मीशी आणि पाचवा सुमुखाशी संघर्ष आहे. यानंतर कृत्ता भृगू वंशातील ब्राह्मणांची क्षत्रियांनी सरसहा कत्तल केल्याचा उल्लेख आहे. ही कत्तल कृतविर्याच्या वंशजांनी केली. त्यानंतर ब्राह्मणांच्या वतीने परशुरामाने सर्व क्षत्रियांची कत्तल केल्याची नोंद आहे. यांच्यातील या संघर्षाची कारणे अनेक आहेत. त्यावरून ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यातील संबंध किती कटू आणि तणावपूर्ण होते याची कल्पना येते. क्षत्रियांना ब्राह्मण बनण्याचा अधिकार आहे काय ? या प्रश्नावर संघर्ष झाला. कोणी कुणाला पहिल्यांदा वंदन करावे आणि कुणी कुणाला प्रथम वाट द्यावी यावरही संघर्ष झाले. ही सर्व युद्धे (हॉपकिन्स हिस्ट्री ऑफ द रूलींग रेसेस) अधिकार दर्जा आणि प्रतिष्ठा या प्रश्नावर झालीत. **ब्राह्मणशाहीने धगक्या देऊन बदनामी करण्याचे साधन आपल्या स्वार्थासाठी नेहमीच निर्लज्जपणे वापरले आहे. (ब्राह्मणशाहीचा विजय, लेखक डॉ.आंबेडकर, पृष्ठ ६८ वरून).**

"**ब्राह्मण हे चातुर्वर्ण्याच्या रक्षणासाठी क्षत्रियांनी लढले.**" (ब्रा.वि., पृष्ठ ६८ पहा).

"ब्राह्मणशाहीने आपलं स्वार्थी राजकारण लपविण्यासाठीच धर्माचा बुरखा पांघरलेला आहे. (ब्रा.वि., पृष्ठ ७० पहा, लेखक- डॉ.आंबेडकर)

ही वृत्ती मनुचे काळात वाढली पण तीच वृत्ती आजच्या काळात भारतीय घटनेप्रमाणे राष्ट्रद्रोह ठरून तो गुन्हा ठरतो.

सारांश :-

१. इ.सन पूर्व १५०० पूर्वीपर्यंत सिंधू संस्कृतीचा प्रभाव काल होता.
२. इ.सन पूर्व ६४२ ते इ.सन पूर्व ४१३ शिशुनाग नावाचा (अनार्य) वंश
३. इ.सन पूर्व ३२२ पर्यंत नंद घराणे
४. इ.सन पूर्व २७३ ते इ.सन पूर्व २३२ सम्राट अशोक
५. इ.सन पूर्व १८५ मौर्यवंशाचे पतन
६. इ.सन पूर्व १८४ मध्ये बृहद्रथ मौर्य राजाचा सेनापती पुष्यमित्र शृंग गोत्रिय ब्राह्मणाने विश्वास घाताने राजहत्या करून सत्ता घेतली.
७. इ.सन पूर्व ७८ पासून लवा कुर्मीयांनी मायभूमी पंजाब सोडला.
८. इ.सन पूर्व ७१ शृंगवंशाचे पतन
९. इ.सन पूर्व ६० सातवाहनांचा उदय.
१०. इ.सन पूर्व ५८ विक्रम संवताचा प्रारंभ

राष्ट्रावाद, हिंदूधर्म, रामजन्मभूमी आदी प्रश्नावर हिंदूचे संघटन कार्य विषमता पूर्ण चातुवर्ण्याने साध्य होईल की समाजविघटन कायम राहील, याचा कोणीच विचार करीत नाही. धार्मिक जन्मजात विषमतेविरुद्ध जैन, बौद्ध, वीरशैव, महानुभाव, वारकरी, स्वामी नारायण आदी धर्मसुधारकांनी ब्राह्मणशाही विरुद्धची बंडे करणारे धर्म व पंथ उदयास आणले, त्यांनी सामाजिक विषमता घटविली. काहींनी या विषमतेस कंटाळून धर्मांतर केले. काहींनी प्रसंगी देशद्रोहीवृत्तीने परकीयांना मदत केली. उदा. जुलमी पेशवाईविरुद्ध इंग्रजांना मदत.

क्षत्रिय कुलोत्पन्न प्रभू रामचंद्राने ब्राह्मणशाहीचा नेता परशुरामाचा पराभव केला. पुढे पुलस्त्य ब्राह्मणांचा वेदशास्त्रसंपन्न गाढा विद्वान धनवान, बलवान, सत्ताधीश पुत्र रावणाने अशा रामाचा पराभव करणे अशक्य म्हणून त्याची पत्नी चोरली. त्याच ब्राह्मण कुळात जन्मलेले ब्राह्मण पुरोहित अयोध्येला स्वहस्ते रामपूजाभिषेक करतात व रामाच्या वंशजांना तेथे स्वहस्ते पूजाभिषेक नाकारतात, तरीही क्षत्रिय समाज अंधश्रद्धेने त्यांना पुरोहित म्हणून मानतो. याला काय म्हणावे ? ब्राह्मणशाहीच्या त्या उन्मत्त रावणाचा पराभव करण्यासाठी रामेश्वरला प्रभू रामाने क्षत्रिय कुलदैवत भगवान शंकराचे ज्योतिर्लिंग स्थापिले. तेथेही क्षत्रियाऐवजी ब्राह्मणच पूजारी आहे. क्षत्रिय कुलदैवत भगवान शंकराच्या त्या ज्योतिर्लिंगावर क्षत्रिय रामाचे वंशजांनाच स्वहस्ते पूजा करण्याची या ब्राह्मणशाहीने अद्यापि मनाई केली आहे. रामवीर्योत्पन्न वंशजांना तो स्वकुल दैवत पूजनाचा अधिकार नाकारून स्वत: जणू त्या वंशात दत्तक गेल्याप्रमाणे ब्राह्मणांनी तो क्षत्रियदैवत पूजेचा अधिकार स्विकारला. हा एक आगळा वेगळा नवीनच पायंडा पुरोहितांनी पाडला. रामाच्या वंशजांना त्यांच्याच कुलदैवताचे पदस्पर्श दर्शन ब्राह्मणांनी बंद केले व क्षत्रिय रामप्रभूचे कुलदैवत पूजन, असूर राक्षस रावणाचे जातभाई करू लागले.

यूथ कॉम्पिटिशन टाईम्स, संपादक आनंद कुमार महाजन, पृष्ठ ४२ वर लिहितात की, "जैन धर्म द्वारा वर्णव्यवस्था को अस्विकार कर कर्मको ही वर्ग तथा जातीका आधार माना गया. जैन ग्रंथो एवम् बौद्ध ग्रंथोंमे क्षत्रियोंकी सामाजिक प्रतिष्ठा ब्राह्मणोंकी अपेक्षा अधिक बताई है।... जैन धर्म बौद्धधर्म की भांति गणतंत्रिय धर्म है। जिसके द्वारा वेदो और ब्राह्मणोके प्राधिकारोंका अस्वीकरण किया गया।" तसेच, पृष्ठ ४० वर आणखी लिहितात की, "क्षत्रिय कुलमे उत्पन्न जैन धर्म के संस्थापक महावीर तथा बौद्ध धर्मके संस्थापक गौतम थे। इन दोने के द्वारा ब्राह्मणोंके प्रभुत्व का विरोध किया गया।... वर्णव्यवस्था और वैदिक कर्मकांडकी बुराईको कम करनेका पहला गंभीर प्रयत्न जैनधर्मद्वारा किया गया है।"

कृत युगात वर्णव्यवस्था नव्हती. पुढे तो अंगभूत गुण व कर्मावर आधारून उदय पावली. **त्रेता युगात जी जन्मधारे फोफावली.** या त्रेता युगात प्रभु रामचंद्रालाही तिचा उपसर्ग झाला. **द्वापार युगात ही चातुवर्ण्य व्यवस्था पराकोटीला पोहोचली, आणि कलीयुगात या चातुवर्ण्याला कंटाळून कित्येक पराक्रमी घराणी व त्याबरोबर इतरही बरेच लोक भगवान महावीराचे प्रेरणेने धर्मांतर करून जैन धर्मात गेले. व काही गौतमबुद्धाचे नेतृत्वाने बौद्ध धर्मात गेले; व अलिकडे डॉ.आंबेडकर यांचे प्रेरणेने हिंदूधर्माचा त्याग करून बौद्धधर्मात गेले. काही मुस्लीम काळात इस्लामधर्मात गेले. तर ब्रिटीश काळात खिश्चन झाले. वर्ण विषमतेला कंटाळून गुरू नानकाचे प्रेरणेने काही शीख धर्मीय झाले आणि चातुवर्ण्यांत ही वर्णविषमता अशीच चालू राहिली, तर पुढे हिंदूधर्म जगातून नामशेषही होईल.** इतर धर्मियांची जनसंख्या वाढते. तशी हिंदूची संख्या वर्णविषमतेचे जनक चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करणाऱ्या सनातन धर्मियांनी वाढवून दाखवावी. नाहीतर ज्या जन्मजात चातुवर्ण्य व जातीभेदातील विषमतेने समाजव्यवस्था सडली ती ''ड कॅन्सरग्रस्त रोग्याप्रमाणे ऑपरेशनने काढून फेकून दिल्याशिवाय हिंदूचे धार्मिक आरोग्य सुधारणार नाही.

राजपूत हिंदू मातेच्या गर्भात यावनी बीजातून जन्मलेला यवन सम्राट अकबर बादशहा इस्लाम धर्माला कंटाळून त्याने इस्लाम धर्माचा त्याग केला. मातेच्या हिंदू संस्कारामुळे हिंदू धर्म त्याला आवडला.

यूथ कॉम्पिटीशन टाईम्स ग्रंथात, पृष्ठ १९० वर- श्री. आनंद कुमार महाजन लिहितात की, "अकबरको हिंदू धर्म ने सबसे अधिक प्रभावित किया। हिंदूधर्म के विद्वानों मे पुरुषोत्तम तथा देवी प्रमुख थे। अकबर रक्षाबंधन, दशहरा, दिवाली बडे उत्साह से मनाया था।"

'युनिफाईड इतिहास' ग्रंथात, डॉ.एम.के. मित्तल, पृष्ठ ३२८ वर लिहितात की अकबराने अथर्ववेद, महाभारत, रामायण या हिंदूधर्मीय ग्रंथांचे पारशीत भाषांतर केले. पृष्ठ ३२९ वर ते पुन्हा लिहितात की, "अकबराने हिंदू समाजातील अनेक वाईट चालीरिती समाप्त केल्या व अनेक सुधारणा केल्यात त्याने गोवध, कन्यावध व सती-प्रथा यांना बंदी केली. बालविवाह बंद केले. जबरी धर्मांतर बंद केले. पृष्ठ ३२६ वर लिहिले आहे की, त्याने अग्नी व सूर्योपासना स्वीकारली होती. त्याने हिंदूवरील जिझिया व तीर्थयात्रकर बंद केले.

अशा हिंदूधर्माकडे ओढलेल्या महाराजाला तत्कालीन सनातनी हिंदू धर्मियांनी हिंदूधर्मात समामेलित केले नाही. म्हणून त्याने दिने-इ-लाई हा नवा धर्म स्थापन केला. जर त्याला हिंदूनी स्वधर्मात स्विकारले असते, तर आज भारताचे चित्र अलगच दिसले असते.

आनंद कुमार महाजनच्या या ग्रंथात, पृष्ठ २३५ वर लिहिले आहे की, अकबराने इस्लाम धर्माचा त्याग केला होता. पृष्ठ २३६ वर लिहिले आहे की, "अकबर के थिक्के पर राम और सीता की मूर्ति है। नागरिय लिपिने 'राम-सिया' लिखा है। जर त्याला सनातनी हिंदूनी आत्मसात केले असते, तर हनुवटीतून खाली पाझरणाऱ्या मुसलमानांच्या दाढ्या उर्ध्व गतीने वाढून टाळूतून वर शेंडीचे रूपाने बाहेर पडल्या असत्या.

या सूर्यवंशाचे माहितीस्तव १९ सर्गे असलेले कालिदासकृत 'रघुवंश' हे महाकाव्य वाचा. (यु.कॉ.पा., पृष्ठ ९३) किंवा क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, ले.- केशवलाल पटेल, पृष्ठ ४४ पासून पुढे वाचा.

तसेच, उदय 'पुरोदय' लेखक भारतेंदु हरिश्चंद्र पहा किंवा अखिल भारतीय लेवा महासंघाचे 'आपलं लेवा परिवार' एप्रिल ते जून १९९४. संपादक श्री.म.ओ. राणे, संपादित, पृष्ठ ५ वरील श्री. वासुदेवराव एच. पाटील इंदूर, यांचा 'चातुवर्ण्यातील पाटीदार वर्णाचे स्थान' हा लेख वाचा.

इ.सन पूर्व १५०० चे सुमारास आर्यांनी भारतातील समसिंधू प्रदेशात वसाहत केली. त्यांचे

तेथील वसाहतीचे मूळ स्थान उर्फ मूलतान येथे त्यांनी सूर्य मंदिर उभारले. ते सूर्योपासक होते. त्या सूर्यवंशी विश्वामित्राने सूर्योपासनेचा सर्वश्रेष्ठ गायत्री मंत्र रचला. तो असा :-

ॐ भूर्भुव: स्व: (मंत्रारंभी म्हणावे).

मंत्र : तत्सवितुर्वरेण्यं । भर्गो देवस्य धीमहि ।

धियो यो न: प्रचोदयात् ।।

अर्थ - तत् - त्या; सवितु: - सूर्याचे, वरेण्यम् - श्रेष्ठ, भर्ग - तेज, देवस्य - प्रकाशमान, धीमहि - ध्यान करतो, धिय: - बुद्धीला, य:- जो, न: - आपल्या, प्रचोदयात् - प्रेरणा देवो.

मराठीत : - "ओम देहे, प्राणे, मने वरणीय जे सवित्याचे तेज देवाचे ध्यावूया, प्रेरो बुद्धिस आमुच्या."

१. यूथ कॉम्पिटिशन टाईम्स, पृष्ठ ८७ वर मंदसौर अभिलेखात वत्सभट्टीने यांच्या सूर्य मंदिराचा उल्लेख मंदसौर उर्फ दशग्रामी केला.

२. मूलतानचे प्रसिद्ध सूर्यमंदिर यवनांनी उद्ध्वस्त केल्यावर पश्चिम माळव्याचे राज्यापाल बंधुधर्माने हे सूर्यमंदिर निर्माण केले.

३. तसेच, इंदौर ताम्रपाटात इ.सन ४६५ मध्ये सूर्यपूजा व सूर्यमंदिरात दीप ज्वलनार्थ धनदान दिल्याचा उल्लेख आहे. त्यात गुप्त संवत् १४६ म्हणजे इ.सन ४६५ हा सन दिला आहे. (पृष्ठ ८८).

४. पुढे आर्यांनी कोनार्कला सूर्यमंदिर १३ व्या शतकात उभारले. तेथे अजूनही माघ सप्तमीस चंद्रभागा मेळा (फेब्रुवारीत) भरून त्यात भारतातून हजारो यात्रेकरू जमतात. (Tourism directory Orissa 3rd Edition 1982 by Department of Tourism Government of Orrissa, Bhuvaneshwar, Page No. 110 to 114). अशा सूर्योपासक सूर्यवंशातील प्रभू रामचंद्राचे महादेव व त्याची पत्नी भवानी हे कुलदैवत होते. बहुधा बहुतेक क्षत्रियांनी भारतात आल्यावर शंकर व भवानी हे कुलदैवत म्हणून स्वीकारल्याचे दिसून येते. व ते त्रिशूळ डमरूधारी सशस्त्र शंकर मूर्ती व सिंह-वाहिनी सशस्त्र अष्टभूजा भवानी पूजतांना ते दिसतात. तिची एक आरती मी रचली.

वृत्त (शा. वि.)

"गावाची कुळदेवता भगवती माता भवानी असे ।
वेशी सन्मुख विघ्न दूर करण्या शस्त्रासवे जी दिसे ।।
घंटा नाद करोनिया सुगजरे बंदून प्रार्थितसे ।
जीची मंगल आरती दरदिनी स्फुर्ती नवी देतसे ।।१।।
रक्षाया सकला जना झडकरी सिंहावरी आरूढे ।
दुष्टांचे दमनार्थ शस्त्र भिजले रक्तात चोहिकडे ।।
तैसे वस्त्रहि रंगले उगवत्या सूर्यापरी तांबडे ।
ऐसे दर्शन रोज होत असता स्फुर्ती मनाला मिळे ।।२।।
जाई कुंदफुले व ताम्रकमळे कंठीही माळा रूळे ।
सांजा भक्षण जो प्रसाद म्हणूनी भक्ताघरी आवडे ।।
तारी भाविक भक्तराज सगळे भक्तीमुळे जी वळे ।
बोला गर्जत रोज रोज सगळे अंबा भवानी बळे ।। **कवी- शं.वि.पाटील**

पाटीलकृत आरतीद्वारे तिची माहीती अशी.

एक स्त्री असून माणसाच्या चौपट हात म्हणजे चौपट शक्तिशाली, क्षत्रियांची कुलदेवता म्हणून सशस्त्र; जंगलचा सर्वश्रेष्ठ राजा सिंह त्यावर आरूढ एवढी शूर अंबामाता ही पावागड येथे

महाकालीचे रूपात भक्तांना स्फूर्ती देते.

अशा ह्या शंकर-पार्वतीचे भक्त असलेला कुणबी क्षत्रिय लेवा पाटीदारांचा मूळ पुरुष हा श्रावस्तीचा राजा लव होता. त्याचा वंशज ध्रुवसिंह राजाचे दोन विवाह झाले. पहिला विवाह कलिंग (ओरिसा) राजकन्या मनोरमाशी तर २ रा विवाह अवंती (उज्जैन) नरेश राजा युद्धजीताची राजकन्या लिलावतीशी झाला होता. असा हा सूर्यवंशी व सूर्योपासक गायत्री मंत्रोपासक कुणबी क्षत्रियांचा वंश होता. 'भारतके प्रमुख तीर्थ' लेखक अशोक कौशिक प्रकाशक डायमंड पॉकेट बुक्स, २७१५, दरियागंज, नई दिल्ली ११०००२, पृष्ठ ४९ वर कोनार्क हे स्थळ भुवनेश्वरपासून ४२ मैलावर आग्नेयेस उत्कल प्रदेशात सौर तीर्थ आहे. चिनाव व सिंधू संगमावरील मूलतानचे सूर्यमंदिर तुर्कांनी उद्ध्वस्त केल्यावर सन १२५० मध्ये कोनार्कला नवे सूर्य मंदिर उभारून चंद्रभागा तीर्थ संस्थापिले. या जागेवरच भगवान कृष्णसूत सांबाने कुष्ट निवारणार्थ पूर्वी इथे सूर्योपासना केली होती. त्याच जागेवर सन १२५० मध्ये हे सूर्यमंदिर उभारले. 'श्री राम जन्म भूमी का रक्त रंजित इतिहास' लेखक- स्व.पंडित रामगोपाल पाण्डेय 'शरद' (साहित्य रत्न) संपादक आचार्य गुदूनजी शर्मा, प्रकाशक- राम लखन गुम. बुकसेलर श्री अयोध्याजी, विशेष संस्करण का पंचम अंक १९८३ पृष्ठ २, परिच्छेद २. "कुछ दिन के बाद श्री. राघवेंद्रके कनिष्ठ पुत्र महाराज कुशने राजधानी अयोध्या का पुनर्निर्माण कराया और सूर्यवंश की ४४ पिढीयोंके बाद बृहद्‌बल तक इनका सन्मान रहा. इसके बाद महाभारत के व्यापक संग्रामने चक्रव्यूह निमित्त होनेपर अभिमन्यू हाथो से कौशल राज बृहद्‌बल वीरगती को प्राप्त हो गये ।" यावरून प्रभू रामाचा धाकटा पुत्र कुश होता. व लव हा ज्येष्ठ पुत्र होय.

कुशाने अयोध्येवर परत शास्मन सुरू केले. **कुशानंतर ४४ वे पिढीमधील बृहद्‌बलचा महाभारत युद्धात पांडवपुत्र अभिमन्यूने चक्रव्यूहात वध केला.**

काही लेखकांनी कुशानंतर ३० वे पिढीत बृहद्‌बल झाल्याचे म्हटले आहे, तर काहींनी कुशानंतर १४ वे पिढीत बृहद्‌बल झाल्याचे लिहिले आहे. कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, ले.डॉ. रामसिया सिंह या ग्रंथात, पृष्ठ ४६ ते ४८ वर दिलेल्या विवस्वान (सूर्य) वंशवृक्षात ४० वे पिढीत लव व कुश जन्मले. व ५२ वे पिढीतील लववंशी प्रसेनजित राजाचा नातू म्हणजेच ५४ वे पिढीतील बृहद्‌बल महाभारत युद्धात अभिमन्युद्वारा मारला गेला असे लिहिले आहे.

श्री राम जन्मभूमिका रक्तरंजित इतिहास, लेखक- पंडित रामगोपाल पांडे, पृष्ठ ३ वर- इ.सनाच्या पहिल्या शतकात बौद्ध राजा मिहिरगुप्ताने प्रभु रामचंद्रसुत लवकुशाने बांधलेले रामजन्मभूमी मंदिर पाडले होते असे लिहिले आहे. यावरून प्रभू रामचंद्र हे इ.सनाच्या पहिल्या शतकापूर्वी होऊन गेले ते सिद्ध होते.

'श्रीराम जन्मभूमि का प्रामाणिक इतिहास' आवृत्ती ७वी, लेखक- श्रीमती किरन सिंह, (एम.ए.) (इतिहास), भीखूसाह मंदिर अयोध्या प्रकाशक : श्री राम जन्मभूमि सेवा ट्रस्ट संस्थान, श्रीराम जन्मभूमी मंदिर (साक्षी गोपाल), अयोध्या (भारत) दूरभाष ५०, पृष्ठ १ वर लिहिले आहे की,- "श्री राघवेंद्र सरकार के कनिष्ठ पुत्र महाराज कुश द्वारा अयोध्या का पुनरुद्धम किया गया। फिर सूर्यवंश के ४४ पिढीयो बाद महाराज बृहद्‌बल महाभारत युद्धमे चक्रव्यूहमें अभिमन्यूद्वारा मारे गये। भगवान बुद्ध के निर्वाणोपरान्त सारे भारतमें बौद्ध धर्म का प्राबल्य हो गया। तत्कालीन सनातनधर्मी जनता रामनवमी के दिन एक वृक्ष के नीचे अपनी श्रद्धासुमन अर्पित कर विशेष उत्सव मनाती थी।

इससे एक शताब्दी पूर्व समयमे सनातन धर्म विरोधी पूर्व भारतीय बौद्ध राज मिहिरगुप्तने लवकुश निर्मित प्राचीन श्रीराम मंदिर को बलपूर्वक गिरा दिया जिससे सनातनधर्मी उत्तेजित हो उठे। फिर शाद्वंशी राजा द्युमत्तसेन ने मिहिरगुप्त की राजधानी कोशाम्बीपर अधिकार कर लिया।

मिहिर गुम मारा गया।"

नंतर (इ.सवी शताब्दी के एक दशक पूर्व मे) महाराजा गंधर्वसेनचा पुत्र तथा महाराज भर्तृहरीचा धाकटा बंधू महाराजा श्री विक्रमादित्याने श्रीराम जन्मभूमीसहित संपूर्ण अयोध्येचा उद्धार केला. अशी लेवा पाटीदारांच्या उगमस्थानाची ससेहोलपट होत आल्याचा इतिहास आहे.

सूर्यवंशीय ३९ वे पिढीत रामचंद्र, ४० वे पिढीत लव व कुश झाले. ५२ वे पिढीत लवाचे पराक्रमी वंशज राजा प्रसेनजित होय. व त्याचा नातू म्हणजे सूर्यवंशाची ५४ वे पिढीतील बृहद्‌बल जो महाभारतीय युद्धात अभिमन्यूद्वारा मारला गेला असा इतिहास आहे.

"कुर्मूवंशी क्षत्रिय कीर्तिकथा", ग्रंथाच्या पृष्ठ ६१, परिच्छेद ३ मध्ये डॉ. रामसिया सिंह लिहितात की, "एक प्रचलित कथा के अनुसार गुजराथ के कूर्मी अयोध्यासे बहिष्कृत होकर मथुरामे बसे थे। फिर वहा से भी विवश होकर हटे और मारवाड होते हुए गुजराथ मे लगभग २००० वर्षपूर्व आबाद हुए।"

'आपले लेवा परिवार' एप्रिल ते जून १९९४, पृष्ठ ५ वरील 'चतुर्वर्णात पाटीदार वर्णाचे स्थान ले. वासुदेवराव एच. पाटील यांनी लेवा पाटीदार वंशाचा इतिहास थोडक्यात वर्णिला. तो विस्तारभयास्तव नुसता नामनिर्देश करून पुढे चालतो.

तसेच, फकिरा हरी लेवा बोर्डींग हाऊसचे सुवर्ण महोत्सवी स्मृतिपुष्प, सन १९६८, संपादक- श्री.ग.वा. पाटील, प्रकाशक- डॉ. गो.दो. बेंडाळे, अध्यक्ष लेवा एज्युकेशन युनियन, जवाहर रोड, जिल्हा पेठ, जळगाव या अंकात पृष्ठ ३७ वर 'अशी संस्कृती-असा समाज' हा श्री देवराम सखाराम बऱ्हाटे पाडळशेकर यांचा अत्यंत अभ्यासनीय लेख आहे. त्यांच्या मते, खादेशस्थ लेवा पाटीदार समाज हा सप्तसिंधू प्रदेशात प्रथम वसाहत करणाऱ्या आर्यापैकी असून गुजराथी लेवा पाटीदार समाजाचा एक तुटलेला भाग आहे. या दोन्ही समाजातील भाषा, आचार विचार व शरीराची ठेवण याचा तौलनिक विचार केल्यावर त्यांच्यातील 'ऐक्य' सुसंगतपणे स्पष्ट होते."

श्री बऱ्हाटे पुढे लिहितात की, "सप्तसिंधू प्रदेशात (हल्लीचा पंजाब) आर्य वसाहत सुस्थिर झाल्यावर वैवस्वत मनुचा पुत्र कश्यपाचे वंशज अध्ययन व अध्यापन करू लागले. काही क्षात्रकर्म करू लागले आणि कश्यप वंशोद्‌भव कूर्म ऋषीचे वंशज कृषक बनले. (ते प्रसंगी क्षात्रकर्म करीत) कूर्म ऋषीचे वंशज म्हणून 'कूर्मी' या नावाने प्रसिद्ध झाले. ते देवीभक्त असून कश्यपवंशीय आर्य होते. (स्कंध पुराणे आदि रहस्ये सह्याद्रि खंड अ-३३ पहा). पिढ्यान् पिढ्या शेती करून ते पंजाबात स्थायिक झाले. चातुवर्ण्य व्यवस्थेचा तो प्रारंभकाल होता. या कूर्मीयांना समाजात अत्यंत श्रेष्ठ स्थान होते. (ऋग्वेद मंडल १, सूक्त ११७, ऋग्वेद मंडल ८, सूक्त ५५, मं.३, सूक्त ३७ पहा). (आणि शतपथका ७ अ. ५ ब्रा.१, का.६ अ, ५ ब्रा. १ पहा).

एका कथेवरून "श्रीराम पुत्र लवाने पंजाब जिंकला व वेदात 'पयोष्णी' व संस्कृत वाङ्‌मयात 'इरावती' नावाने प्रसिद्ध असलेल्या 'रावी' नदीतिरी 'लवपूर' (लाहोर) शहर वसविले. आपले वंशज व अनुयायांना तेथे ठेवून लव अयोध्येस परतला. तेच हे लेवा लोक होत." "लेवा समाजाचे मूलस्थान लाहोर व त्याचा परिसर (पंजाबात) होता."

"पंजाबातील 'गुजराथ' हे इतिहास प्रसिद्ध जिल्हा स्थानाचे शहर आहे. त्याच्या आसपासचा करड व लेयाँ (लेयालपूर -ल्यालपूर जवळ) प्रदेशात कूर्मी लोक प्राचीन काळापासून स्थायिक झाले होते. सुपिक व संपन्न पंजाबवर वारंवार परचक्र येई. यामुळे जीवन अस्थिर होई. म्हणून त्रासून **इ.सन पूर्व ७८ मध्ये कनिष्क काळात पंजाबातील गुजराथ शहरालगतच्या 'करड' व 'लेया' भागातील गुर्जर व कूर्मी लोकांनी बहुसंख्येने स्थलांतर केले. त्यातील 'लेयाँ' प्रदेशातील लोक आनर्त (गुजराथचा एक भाग) प्रदेशात स्थायिक झाले. (बॉम्बे गव्हर्नमेंट गॅझेटियर, व्हॉल्यूम १**

पहा), व एक टोळी मंदसोरमार्गे माळव्यात येऊन बसली. असे पंजाबातील करड भागातले ते करडवा कूर्मी (कडवा कुर्मी) व लेयाँ भागातून आले ते ळेवा कूर्मी (लेवा कुणबी) अशी मूळ स्थानदर्शक जातीवाचक नामे त्यांनी धारण केली. व अद्यापही तीच नावे धारण करीत आहेत. हल्ली पंजाबातसुद्धा हे लोक 'लेवा' म्हणून प्रसिद्ध आहेत. ह्यापैकी ज्या टोळया मध्य हिंद एजन्सी, मध्यप्रांत, खानदेशमध्ये वसलेत ते लोक कडवा व लेवा ही मूल स्थानदर्शक जातीवाचक नावे आजही धारण करीत आहेत. (बॉम्बे गव्हर्नमेंट, व्हॉल्यूम १) बॉम्बे गव्हर्नमेंटने दिलेली ही माहिती विश्वसनीय वाटते. कारण, त्या वेळच्या लेवा पाटीदारांनी ही माहिती त्यांच्या त्यांच्या वही वंशना चोपडिया (वंशावळीच्या वह्या) च्या आधारे सरकारला पुरविली असेल. गुजराथेत ह्या वह्या आपल्याप्रमाणे भाटाजवळ न ठेवता त्या घराण्यातील वडील माणसाजवळ व्यवस्थित ठेवलेल्या असतात. बारोट (भाट किंवा मांगस्या) येऊन वंशावळीची नवीन नावे लिहितो. वंशावळी वाचून दाखवितो व पुन्हा घराण्यातील वडील माणसाजवळ त्या चोपड्या ठेवून देतो. पावाच्या प्रलयाच्या धामधुमित स्थलांतर केल्यानंतर आपल्या वंशावळीच्या वह्या बनावट झाल्याचा संशय आहे. गुजराथी लेवा पाटीदारांच्या ह्या चोपड्या अनेक पिढ्यांपासून पारशी लोकांच्या अग्नीप्रमाणे त्यांनी स्वत: जतन करून ठेवल्या आहेत. म्हणून त्या अधिक विश्वसनीय वाटतात.

पंजाबातून गुजराथेत आल्यावर लेवा लोक पावागडच्या आसपास वस्तीस राहिले व स्थायिक झाले. कडवा लोकांनी उंझा गाव वसवून तेथे उमिया पार्वती देवीची स्थापना केली व आसपासच्या प्रदेशात ते स्थायिक झाले. जयसिंह रावळाच्या कारकीर्दीत गुजराथचा बादशहा महंमद शहा याने स्वारी करून तो मुलूख बेचिराख केला. त्यावेळी सर्व लोक वाट सापडेल तिकडे पळून गेले. यालाच 'पावानो प्रलय' असे म्हणतात. यास ऐतिहासिक आधार म्हणून 'लोकहितवादीकृत गुजराथचा इतिहास' ह्यातील काही पुढे देत आहे.

"पावागडचा गंगादास रावळाचा मुलगा जयसिंग रावळ यालाच पटाई रावळ अथवा बेन्नीराय म्हणत. याचपासून चापानेरचे राज्य महंमद बेगडाने सन १४८४ मध्ये जिंकले. (लोकहितवादीकृत गुजराथचा इतिहास, पृष्ठ १८० पहा). "महंमद शहाने जुनागड, पावागड हे दोन किल्ले काबीज केले म्हणून त्याला महंमद बेगडा हे उपनाव मिळाले होते." (लोकहितवादीकृत गुजराथचा इतिहास, पृष्ठ १८२).

"वात्रक नदी काठी महमूदाबाद आहे. तेच पूर्वीचे चापानेर. चापेनेरचे लोक देशोधडीस लागले. जसा ज्यास आश्रय मिळाला तसा तो तेथे जाऊन राहिला." लोकहितवादीकृत गुजराथचा इतिहास, पृष्ठ १८२).

अडालजची विहीर :- अहमदाबादच्या उत्तरेस सहा कोसावर अडालज गावाजवळ सात मजली टोलेजंग विहीर दगड दुर्मिळ असलेल्या प्रदेशात कोट्यवधी रुपये खर्चून बांधली. तरी त्या कामाचा कोणीच आज वारस नाही. (लोक हितवादीकृत गुजराथचा इतिहास, पृष्ठ २६७). ही विहीर बांधण्याऱ्या महिदास नावाच्या लेवा सरदाराने फार परिश्रम घेतले होते. या विहीर संबंधाने अनेक लोकगीते प्रचलीत आहेत. त्यातील एक ;-

एकर टूर छे सात शत, चौदासो मण तेलजलायो
कंडिया चालिस हजार करे काम पावासे पत्थर लायो
बाव अडालजके खर्चमो अठरा लाख मोहोर कागद चढी
(कंडिया म्हणजे गवंडी ४० हजार काम करीत होते.)

पावा प्रलयानंतर काही लेवा पाटीदार कुटुंबे थोडी सरकून जवळच गुजराथेत चरोत्तर भागात स्थायिक झाले, काही नेमाडात, काही खानदेशात व विदर्भात जाऊन स्थायिक झाले).

कच्छ प्रांतातही 'हलाई' व 'वाघदिया' या नावाखाली लेवा पाटीदार आहेत. (महाराष्ट्रीय ज्ञानकोश, भाग ११, क. कुणबी लेवा.) बरीचशी कडवा पाटीदार कुटुंबेही कच्छमध्ये स्थायिक झालीत.

संवत १५०८ च्या भाद्रपद शुद्ध ११ ला सत्पंथाचा आद्य प्रवर्तक सै. इमामउद्दीन इराणाहून हिंदुस्थानातील गुजराथेत अहमदाबादजवळील गिरमथा गावी आला. त्याचा पंथ स्वीकारल्यामुळे बिटंबना होऊ लागल्याने बरीचशी लेवा व कडवा कुटुंबे कच्छ प्रांतात जाऊन स्थायिक झालीत. (त्यांच्या वही वंशाना चोपडीवरून).

गुजराथेत स्थायिक झाल्यावर 'लेवा' व 'कडवा' लोक शेती करून सरकारी कर वसुल करण्याचे मक्तेही घेत असत. करास गुजराथेत पट्टी अथवा पाटी म्हणतात. म्हणून लेवा व कडवा जातींना पाटीदार ही संज्ञा मिळाली. हे पाटीदार सरकार व शेतकरी यांचे मध्यस्त असत. कर वसूल करण्यात त्यांचा दरारा असे व शासन दरबारी त्यांना मान असे.

गुजराथ व राजस्थानातील लेवा व कडवा पाटीदारांची आडनावे गाव प्रदेशातील स्थलदर्शक ठिकाणांचा अपभ्रंश होऊन पडली असावीत. त्यांच्या उत्पत्ती व उगमाबाबत संशोधनाची आवश्यकता आहे. मात्र, पाटील, चौधरी, महाजन ही कार्यदर्शक आडनावे आहेत. (यासाठी माझ्या मते अगदीच अलीकडे सन १९९१ साली, मनोहर कथा प्रकाशन, मुजुमदार बंगला, पोस्ट ऑफिसचे मागे, गिरीपेठ, नागपूर १० यांनी प्रकाशित केलेला डॉ. रामगोपाल सोनी यांचा 'मराठी आडनावे' हा संशोधन प्रकल्प निश्चित उपयोगी पडेल. त्यातही पृष्ठ १८ वर देशमुख, पृष्ठ २०८ वर पाटीदार, पृष्ठ १०२ वर चौधरी, पृष्ठ ९५ वर देशमुख, पृष्ठ ८९ वर पाटील, पृष्ठ ५३ वर कुशवंशी तसेच, कूर्मवंशी, पृष्ठ ५२ वरील रघुवंशी व सूर्यवंशी, पृष्ठ ४९ वरील गुर्जर/गुजर ह्या आडनावांच्या व्युत्पत्ती श्री. डॉ.रामगोपाल सोनी यांनी इतक्या सुंदर रीतीने व सविस्तर दिल्या आहेत की, त्या लेवा पाटीदार इतिहासाशी संबंधित असल्याने प्रत्येक लेवा पाटीदारांनी एकदा त्या वाचाव्यातच विस्तार भयास्तव ती येथे देण्याची फार गरज असूनही केवळ उल्लेख करूनच पुढील भागाकडे वळू - शां.वि.पाटील).

कोणत्याही समाजाचा गतेतिहास त्याच्या भाषेत दडलेला असतो. त्या दृष्टीने दे.स. बऱ्हाटे लिखित, "खानदेशस्थ लेवा पाटीदारांची भाषा" नावाचा सन १९३२ साली प्रसिद्ध झालेला ग्रंथ वाचनीयच नव्हे तर अभ्यसनीय आहे.

श्री. दे.स. बऱ्हाटे यांनी लेवा पाटीदारांची गतेतिहासातील बोली शब्द, पेहेराव, चालीरीती आदिबाबत या लेखात बरीच आणखीही माहिती दिली ती विस्तारभयाने केवळ 'वाचा' असा उल्लेख करून गाळत आहे.

आपल्याकडे पाडळशे, दाताळा, तळवेल, नशिराबाद हे जसे समाजाचे विभागदर्शक ठाये होते तसेच, गुजराथेतील पाटीदारातही चरोतर, कानम, मातर, वाकुळ असे विभाग असून त्यात बारगामनी गोळ (जणु, ठाया),चौदगामनो गोळ, दशकोशीनो गोळ, सातगामनो गोळ असे गोळ असून आपल्याच गोळात सोयरिका करण्याकडे साधारण प्रवृत्ती आहे.

अशा प्रकारची उत्कृष्ट संशोधनात्मक माहिती कै. वासी दे.स. बऱ्हाटे यांनी या अंकात दिली. ती व्यतिरिक्त ही मी त्यांची १९८४ चे सुमारास मौजे पाडळशे येथे जाऊन त्यांची भेट घेतली. जराजर्जर अवस्थेतही त्यांनी या आवडीच्या विषयावर मला भरपूर माहिती दिली. असो !

तसेच, "क्षत्रिय मराठ्यांची वंशावळी शहाण्णव कुळी आणि सूर्य,सोम, ब्रह्म व शेषवंशीय क्षत्रियांची उत्पत्ती व वंशावळी शहाण्णवकुळी आणि ज्ञातीनिर्णय" लेखक- बाळाजी नथुजी गावंड व गोविंद मोरोबा कार्लेकर, आवृत्ती ९ वी, सन १९९१, प्रकाशक- मधुकर शिवराम कस्तुर,

मॅनेजर, तुकाराम बुक डेपो, बुकसेलर्स व पब्लीशर्स, माधवबाग, मुंबई नं. ४, पृष्ठ ९१ ते ९४ वरील क्षत्रियांचे वंश दिले. पृष्ठ ९१ वर सूर्यवंश पृष्ठ ९२ वर सोमवंश उर्फ चंद्रवंश, पृष्ठ ९३ वर यदुवंश उर्फ ब्रह्मवंश. पृष्ठ ९४ वर शेषवंश उर्फ नागवंश दिला आहे. त्यापैकी पृष्ठ ९१ वरील सूर्यवंशात लेवा पाटीदारांचा वंश-वृक्ष सामावलेला आहे. तो पहा.

श्री. दिगंबरं देवराम भारंबे- प्रमुख, लेवा पाटीदार मित्रमंडळ, ८७/१६०, एलोरा पार्कजवळ, रेसकोर्सजवळ, बडोदा-३९०००७ या संस्थेच्या सन १९८४ च्या स्मरणिकेत श्री. दामोधर कौतिक राणे (अध्यक्ष) लेवा पाटीदार समाज अहमदाबाद यांच्या "लेवा पाटीदार समाज काय होता ? काय झाला ? या लेखात वरील लेखाच्या माहितीची द्विरुक्ती होण्याजोगा भाग गाळून इतर माहिती पुढे देत आहे.

इ.सन ७८८ साली भद्रमातेच्या अवकृपेमुळे पावागड उद्ध्वस्त झाला. कालांतराने यावनी सत्ता आली. सुलतान अहमदशहाने इ.सन १४८४ साली अहमदाबाद शहर वसविले. (डॉ. आनंदकुमार महाजन यांच्या 'यूथ कॉम्पिटिशन टाईम्स' पृष्ठ १५६, वर मात्र इ.सन १४१२ साली अहमदाबाद शहर वसविले असे मत दिले आहे.)

सन १८८४ साली महंमद बेगडाने पावागडवर आक्रमण केले. म्हणून चरोत्तर व खेडा भागातील लेवा पाटीदार चार भागात विखुरले १. खेडा जिल्हा लगतचे चरोतर, २. बडोदा लगतचे विश्वामित्री नदीपर्यंत वाकळ, ३. विश्वामित्री पासून सुरतपर्यंत वसाहत करणारे कानम, ४. सुरतेच्या पुढे तापी तीराने बऱ्हाणपूर मार्गे खानदेश विदर्भात विसावलेले 'लेवा पाटीदार' होत. यापैकी पहिले तीन स्थिरावलेत, पण चवथा भाग महाराष्ट्रात असल्याने स्थलांतर व भाषांतरामुळे येथील स्थानिक भाषा व संस्कृती त्यांनी स्वीकारली. परिस्थिती परवशतेमुळे मूळ गुजराथी भाषा, वेश व संस्कृती सोडून आपण मराठी भाषा, वेशभूषा व महाराष्ट्र संस्कृतीत पूर्ण सामावलो. आपली गुजराथशी असलेली नाळ तुटली. यात आणखीही विभाजन होऊन आपण अल्पसंख्येतून अत्यल्प संख्य होऊ नये म्हणून "शिका, संघटित व्हा व मूळ गुजराथी लेवा पाटीदाराशी परत पूर्ववत नाळ जोडण्यातच आपले भले आहे."

लेवा पाटीदार मित्रमंडळ, बडोदरा, वर्ष ७ सन १९८४- च्या स्मरणिकेत मंडळाचे उपाध्यक्ष श्री. पितांबर धर्मा राणे "लेवा पाटीदाराविषयी थोडक्यात" ह्या लेखात म्हणतात की,- "आज ५ ते ७ लाख लोकसंख्या असलेला हा लेवा पाटीदार समाज गुजराथी समाजापासून पूर्णपणे बाजूला पडला आहे... आपले विभाजन होत चालले आहे. असेच चालू राहिले तर आपल्या संस्कृतीचा नाश होईल व संस्कृती नाहीशी झाली म्हणजे समाजही लयाला जाईल."

प्राचीन काळी सर्व मानवजात विषमभेद विरहीत विश्वाचा एक घटक प्राणी म्हणून मानव रूपाने एकसंघ होता. वस्तुत: सुसंघटित नसला तरी त्यात भेद नव्हते. मानव ठायी ठायी विखुरला गेला होता. त्या मानव समुहात १. मनुर्भरत वंश, २. सूर्यवंश, ३. सोमवंश वा चंद्रवंश ४. ब्रह्मवंश उर्फ यदूवंश, ५. नागवंश; अशा विविध वंशात तो विभागला गेला.

मनुर्भरतवंश वृक्षाप्रमाणे ऋग्वेदानुसार गृत्समद ऋषीचा पुत्र कूर्म ऋषी (कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, पृष्ठ १६ पहा) चाही एक सूर्यवंश होय. "कश्यप ही कूर्म है।" (कु.क्ष. कीर्तिकथा, पृष्ठ १५ पहा.) या कश्यपाची पत्नी म्हणजे गुत्समदाची सून अदितीपासून आदित्य उर्फ सूर्यवंशाच्या पिढ्या मोजतात. ह्या कूर्म महर्षी कश्यपाने ऋग्वेदाच्या प्रथम मंडळात ९९ व्या सूक्ताची रचना केली. ह्याच कश्यपाचे ७२ मंत्र ऋग्वेदात मिळतात. ह्या कश्यपापासून सौ. आदितीस आदित्य उर्फ सूर्यवंशाचा आद्य पुरुष विवस्वान जन्मला. हाच सूर्य होय. ह्यापासून पुढे सूर्यवंश म्हणावा.

लवानंतर १२ पिढ्यांनंतर प्रसेनजित व १४ वी पिढीत बृहत्‌बल होय.

लवानंतर ५५ वे पिढीत सुमित्र व लवानंतर ५९ वे पिढीत कनकसेन जन्मला.

पुरातत्त्व विद लोकांचे मतानुसार इ.सन पूर्व ४०२१ मध्ये मनुर्भरत वंशाचा उदय झाला. व इ.सन पूर्व ३२५० मध्ये मोहेंजोदाडो व हडप्पाची सिंधू घाटी संस्कृती होती. इ.सन पूर्व ४०२१ ते इ.सन पूर्व २७६१ पर्यंत सत्ययुगीन मनुर्भरतवंशीय राजांचा काळ होय. या काळात देव व दानव हा मनुष्यभेद होता.

इ.सन पूर्व ४०२१ मधील मनुर्भरत ते ४५ पिढ्या पासून पुढे.

इ.सन पूर्व २७६१ मधील राजा दक्ष पर्यंत सत्ययुगीन मनुर्भरत वंश होय.

इ.सन पूर्व २७६१ मधील राजा दक्ष ते इ.सन पूर्व १६६९ मधील प्रभूरामचंद्रापर्यंतच्या त्रेतायुगीन सूर्यवंशी मानवाची ३९ पिढ्यांचा त्रेतायुग होय. इ.सन पूर्व १६६९ मधील रामचंद्र प्रभू ते इ.सन १२७७ मधील बृहद्‌बलपर्यंत द्वापारयुगीन सूर्यवंशीय क्षत्रिय कुर्मी वंशाच्या १४ पिढ्या झाल्या. इ.सन पूर्व १२७७ ते आज इ.सन १९९७ पर्वंतच्या कलीयुगीन मानववंश. पहिल्या ४५ पिढ्यात भारताबाहेरही राज्यविस्तार होता. नंतरच्या ३९ व्या पिढ्या अयोध्येस व त्यानंतर १४ पिढ्याही अयोध्येस, श्रावस्ती व लाहोरला नांदतात.

प्रकरण १३

शिक्षणाची सुसंधी

मनुस्मृतीस प्रमाणभूत मानणारे **पेशवे हे मनुवादी सनातन वैदिक परंपराभिमानी** होते. म्हणून त्यांचे राज्यात ब्राह्मणेतरांना धार्मिक, सामाजिक, व शैक्षणिक आदी क्षेत्रात पूर्ण गळेचेपी व गुलामगिरी होती हा इतिहास आहे. ब्राह्मणेतरांना बहुतेक सवलती नाकारल्या होत्या. त्यांचे साठी शिक्षणाची द्वारेही पूर्णपणे बंद होती, तर ब्राह्मणांना पुण्यात दक्षिणा व ब्राह्मण भोजने आदींची खैरात होती.

"नानासाहेब पेशव्यांचे कारकिर्दीत पुण्यात अभिमानी सोवळेपणाचा बराच बोलबाला होता. पेशव्यांचे वाड्यात अगर पेशवे हजर असतील तेथे हरिकीर्तनप्रसंगीही तुकारामी अभंग म्हणू नये असा (राज)दंडक पडला होता. याला कारण काय, तर तुकारामाचे अभंग म्हणजे शूद्र कवन ! त्याचा विटाळ सोवळ्या कीर्तनास नसावा. असे "नाचू कीर्तनाचे रंगी" लेखक- प्रा.डॉ. यशवंत पाठक याचे प्रबंधात- पृष्ठ ६९ वर लिहिले आहे.

वारकरी पंथाचे कळस मानलेले कीर्तन सम्राट जगद्‌गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराज कुणबी असल्यामुळे त्यांचेबद्दल अशी ही भावना होती, तर सामान्य कुणबटांची काय दशा असेल ? ब्राह्मणशाहीचा एवढा तोरा होता की, य:कश्चित गाव जोशाचे ब्राह्मण भूदेव समजून त्याचे पायाचे तीर्थ (चरणतीर्थ) घेऊन ते वडिलांच्या श्राद्धप्रसंगी प्राशन करायचा धर्ममार्तण्डांनी पायंडा पाडला होता. ही परंपरा भारतीय घटना लागू झाल्यानंतर लुप्त झाली (इ.सन १९५० नंतर).

आणि सामान्य जनता एवढी अडाणी ठेवली होती की, नित्याची एकादशी कधीची आहे ते या निरक्षर जनतेला सांगण्याकरिता "तिथी वारंच नक्षत्रं योगम करणंच पंचांग श्रवणेत गंगा स्नानम् उद्याची एकादशी आहे." एवढं धेडगुजरी वाक्य दारोदार गुणगुणणाऱ्या सामान्य भटास गावात एका फेरीत गाठोडेभर ज्वारी व दक्षिणा मिळत असे. महाराष्ट्राचे असे जुलमी स्वातंत्र्य जाऊन परकीय इंग्रजांचे उदारमतवादी राज्य आले. त्याप्रसंगी महाराष्ट्राचे राजधानीत म्हणजे पुण्यात साखर

वाटून जनसामान्यांनी त्या इंग्रजी राज्याचे स्वागत केल्याचे सांगतात. ते काही का असेना पण सामान्य जनासाठी असलेली शिक्षणाची बंदी तोडून सर्व जातीसाठी इंग्रजांनी पाठशाळा काढून केवळ ब्राह्मणासाठी उपलब्ध असणारे शिक्षण सर्व ब्राह्मणेतर जातींना मिळावे म्हणून पाठशाळा सर्वांना खुल्या केल्या. ह्या इंग्रजांच्या उदार शैक्षणिक धोरणामुळे पेशवाईनंतर कुणबी, माळी, तेली, तांबोळी शिकू लागले.

महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, जळगाव जिल्हा, आवृत्ती १९९४, पृष्ठ १०४ वर लिहिले आहे की, "दुसरा बाजीराव पेशवा हा इंग्रजांना शरण येणारा पहिला हिंदी सत्ताधीश ठरला." **इंग्रजांची राजवट भिन्नभिन्न कारणासाठी का होईना, पण अनेकांना हवीशी वाटत होती." (महाराष्ट्र गॅझेटियर जळगाव जिल्हा, पृष्ठ ११० पहा.)** इ.सन १८६२ मध्ये जळगाव जिल्ह्यात प्रथमच रेल्वेचे आगमन झाले. (पृष्ठ १११ पहा). इ.सन. १८६४ साली जळगाव खानदेशमध्ये नगरपालिका स्थापन झाली. सन १८७४ ला खानदेश कापड गिरणीचा पाया घातला गेला. ता. ३ जानेवारी १८६१ ला जळगाव जिल्ह्यात 'प्रबोध चंद्रिका' नावाचे साप्ताहिक प्रथमच सुरू झाले. व **इ.सन १८८६ साली जळगावला ॲंग्लो व्हर्नाक्यूलर शाळा स्थापन झाली**. सन १९०६ मध्ये जळगाव जिल्हा निर्माण केला.

गुजराथेतील मुसलमानी स्वाऱ्यांना कंटाळून अकराव्या शतकात लेवा पाटीदार व लेवा गुजर हे लोक तापीच्या खोऱ्यात आले. अल्लाउद्दीन खिलजीच्या देवगिरीसवरील स्वरीचे वेळी (सन १२९६) मुसलमान प्रथमच या भागात आले.

सन १९२६ मध्ये जोशी वतन बिल पास झाले. त्यामुळे धार्मिक कार्यप्रसंगी ब्राह्मण पुरोहिताला, त्याचे पौरोहित्य स्वीकारले असो अथवा नसो, एक हक्क म्हणून दक्षिणा देण्याची प्रथा समाप्त करण्यात आली. (महाराष्ट्र शासनाचे राज्य गॅझेटियर महाराष्ट्र : भूमि व लोक, संपादक- डॉ.कि.का. चौधरी, सन १९९६, पृष्ठ ४०८).

सन १९०६ मध्ये जळगाव जिल्हा निर्मिती झाली. जिल्हयात सन १९०९ ला चाळीसगावला शिक्षण संस्था निर्मिती झाली. सन १९१६ ला जळगाव, सन १९१७ ला सावदा, व थोरगव्हाण ला शाळा प्रथमच उघडली.

खानदेशातील पहिला पदवीधर (बी.ए. १९११) दामोधर नाना चौधरी हा खिरोद्याचा होता. (जळगाव जिल्हा गॅझेटियर, पृष्ठ ६४६ पहा). लेवा पाटीदार समाजानेही खेड्यापाड्यातून शहराकडे शिक्षणासाठी धाव घेतली, पण रहाण्याची व जेवण्याची सोय नव्हती म्हणून नाईलाज झाला. शेवटी काही दूरदृष्टीच्या लेवा पाटीदारांनी ह्या खेडूत मुलांसाठी 'लेवा बोर्डींग संघ' नावाने इ.सन १९१८ साली जळगावला वसतीगृह काढले. इ.सन. १९३६ साली हेच बोर्डींग 'फकिरा हरी लेवा बोर्डींग' नावाने नामांतरीत झाले. तेथे 'लेवा एज्युकेशन युनियन' स्थापन केले. पुढे इ.सन १९६२ सालापासून डॉ.जी.डी. बेंडाळे व घनश्याम भिका राणे कार्यरत राहिले. तसेच, ता. १८ व १९ मार्च १९८४ रोजी पाडळशे गावी भोरगाव लेवा पंचायतीचे पुनरुज्जीवन केले. या संघटनेने खानदेशापेक्षा श्री. तुकाराम हरी पाटील दाताळकर ह्या निस्वार्थी पुढाऱ्याचे देखरेखीखाली विदर्भात बरेच भरीव कार्य केले. विदर्भातील लेवा समाजाची शिरणगती केली. मलकापूर लेवा भ्रातृमंडळाची प्रचंड वास्तू उभारली. लेवा युवक-युवती मेळावा मलाकापूरला भरवून ता. १३-१-१९८५ रोजी मलकापूरला त्यांचे एक भव्य संमेलन भरविले. त्यानिमित्त श्री. शंकर विठोबा पाटील दुधलगावकर, श्री. खर्चे, श्री. खडसे, श्री. फिरके-श्री. वराडे या संपादक मंडळाने खानदेश विदर्भातील थोर थोर कार्यकर्ते व विचारवंतांचे लेख मागवून संपादित केले. यात १. 'लेवा पाटीदार समाजाचा इतिहास' लेखक- शंकर विठोबा पाटील दुधलगावकर, २. भोरगाव लेवा पंचायत ठाया दाताळा (विदर्भ) लेखक श्री. कृष्णराव शंकर देशमुख दुधलगावकर, ३. आमची विवाह पद्धती व युवापिढी, लेखक : प्रा. डॉ.

भास्कर लक्ष्मण भोळे, नागपूर, ४. 'आपुला आपण करू उद्धार' लेखक- लोकसेवक श्री. मधुकरराव धनाजी चौधरी, खिरोदा, ५. लेवा समाज - ऐतिहासिक संदर्भ व प्रगतिच्या वाटा लेखक, डॉ. जी. डी. बेंडाळे, जळगाव, ६. 'संशोधन प्रवृत्ती आणि लेवा समाज' लेखक- डॉ. विष्णु भिकाजी कोलते नखेलकर, माजी कुलगुरू नागपूर विद्यापीठ, नागपूर, ७. 'सामाजिक वृत्तपत्रांची आवश्यकता' लेखक- डॉ. ज.ह. फिरके, संदापक दहा-दोन तीन नांदुरा, ८. 'लेवासमाज व राजकीय भवितव्य' लेखक- श्री. भागवतराव चौधरी, संपादक- जळगाव समाचार, ९. 'विभागीय कार्याचा आढावा' लेखक- डॉ. पु.भ. पाचपांडे, विभागीय सचिव भोरगावलेवा पंचायत शाखा, मलकापूर इत्यादी अनेक मान्यवरांचे बहुमोल लेख व कविता प्रत्येक लेवा समाज बांधवास प्रेरक ठरतील.

याशिवाय, 'दहा दोन-तीन' या मासिकाचा वर्ष ८, अंक ९, रविवार ता. ९-२-१९८६ चा भोरगाव लेवा पंचायत विशेषांक, संपादक डॉ.ज.ह. फिरके नांदुरा हेही वाचनीय आहेत.

बी/३, रविकिरण, म.फुले मार्ग मुलुंड पूर्व, ४०००८१ येथील श्री. महेंद्र ओंकार राणे कानळदेकर यांनी अखिल भारतीय महामंळळ (नोंदणी क्र. महा/१३७५, जळगाव दि. १७.११.१९९०) नावाची संस्था ता. ३-२-१९९१ रोजी संस्थापिली. त्याचे अधिकृत मुखपत्र 'आपले लेवा परिवार' एप्रिल व मे १९९१ च्या अंकात श्री. रमाकांत त्र्यंबक नारखेडे, १०४, तिलक पथ, इंदौर, पृष्ठ ११ वर "सरदार पटेल" लेखक सेठ गोविंद दास, प्रकाशक, राज्यपाल अँड सन्स, दिल्ली, पृष्ठ ६ चा दाखला देऊन लिहिले आहे की, गुजराथेत मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्री रामचंद्रपुत्र लव व कुशाचे वंशज अनुक्रमे लेवा व कडबा ह्या दोन उपजातीत नांदलेत. गुजराथेत येण्यापूर्वी तो समाज पंजाबात कूर्मी क्षत्रिय नावाने प्रसिद्ध असल्याचे 'भारतमे जन्मी परंपरा' ह्या ग्रंथाचे आधारे सांगता येते. प्रभू रामाने उत्तर कोशल लवासाठी व दक्षिण कोशल कुशासाठी विभाजित केले होते. लवाने रावी नदी तिरीचा प्रदेश जिंकून तिथे नंतर लाहोर शहर वसविले. व ती आपली राजधानी केली. तेथून त्यातील काही लेवा व कडबा कुणबी गुजराथ प्रांतात आले, व त्यांनी गुजराथेत पावागड परिसरात तथा उंझा परिसरात वस्ती केली."

"लेवा परिवार मासिक", संपादक- श्री. म. ओं. राणे, जुलै १९९१ च्या अंकात, पृष्ठ ९ वर इंदूरचे वासुदेवराव पाटील 'लेवा समाजाचा पूर्वेतिहास' या लेखात लिहितात की,- उत्तर प्रदेशात कुशापासून वाढलेल्या वंशाला कुशवाह म्हणतात. कुशवाह आडनावाचे लोक ग्वाल्हेर संस्थान, आग्रा, इटावा, मथुरा लगत विस्तारले. हे लोक स्वत:ला (क्षत्रिय) ठाकूर म्हणून कुशवंशी समजतात. हेच लोक गुजराथेत कडवा कुणबी म्हणून विस्तारले. माळव्यातही यांची बरीच वस्ती आहे.

माळवा व उत्तर प्रदेशात वसलेले लववंशी (लेवा) मध्यप्रदेशात नरसिंहपूर, इटारसी क्षेत्रात रघुवंशी, बडगुजर, रेवा पाटीदार, निमाडात रेवा पाटीदार, लेवा पाटीदार, धार जिल्हचात कोद, बिडवाल या गावाच्या परिसरात रतलाम, मंदसौर, उज्जैन व देवास जिल्ह्यात लेवा पाटीदार, उत्तर मध्यप्रदेशात, जम्मू-काश्मिरातील गुजर हे सर्व समकक्ष लोक आहेत.

लवाने रावीतीरी लवपूर (लाहोर) वसविले व त्यांचे वंशज पंजाबात सप्तसिंधू प्रदेशात विखुरले. रामायणाचे उत्तर कांड, कालिदासाचे रघुवंश यासाठी जरूर वाचा. म्हणजे लक्षात येईल. भरताचा मुलगा पुरुषपूर (पेशावर) व शत्रुघ्नसुतांना मथुरेचे राज्य दिले. लववंश श्रावस्तीस कालांतराने राज्यारूढ झाला. पुरुषपूरला भरत वंश राज्यारूढ झाला. लवाचा वंश ध्रुवसिंहाच्या राज्यात निमाड, माळवा, द.राजस्थान, गुजराथकडे विस्तारला. याच लेखाचा उत्तरार्ध लेवा परिवार, ऑगस्ट १९९१, पृष्ठ ७ वर पहा. यात पंजाबातील कुर्मी लववंशी जमात गुजराथेत कुणब्यात (लेवा कुणब्यात) परीवर्तीत झाली. दक्षिणेकडे राजस्थान, माळवा, गुजराथ आदी प्रांतात स्थायिक होऊन काही खानदेश-विदर्भातही विस्तारलेत. देवास जिल्ह्यात लेवा पाटिदारांच्या नावाला 'सिंह' हे क्षत्रिय

व वीरतासूचक उपनाव जोडतात, तर महाराष्ट्रात 'राव' हे सन्मानदर्शक (म्हणजे राजवंशीय) उपनाव जोडतात.

उत्तर प्रदेशातील गोरखपूरच्या गीता प्रेसने सन १९७९ मध्ये 'कल्याण' या हिंदी मासिकाचा 'सूर्याङ्क' नावाचा विशेषांक प्रसिद्ध केला. त्यात पृष्ठ ३०० वर डॉ. नि.का.चौधरींनी प्रमाणित केले की,- उदयपूर व चितोडचे महाराजा लवाचेच वंशज आहेत व कुशवाह कुशाचेच वंशज आहेत. या लेखावरून लेवा समाज हा क्षत्रिय वर्णाची एक शाखा असल्याचा आधार मिळतो. या समाजाला उत्तर प्रदेशात कूर्मी माळव्यात, कुळंबी, गुजराथेत कणबी, महाराष्ट्रात कुणबी म्हणतात. मात्र कुणबी हा शब्द जातीवाचक नसून व्यवसायवाचक आहे.

म्हणजेच मूळचे क्षत्रिय वर्णाचे असलेले हे लोक, कालांतराने व्यवसायाने कूर्मी उर्फ कुणबी व गुजराथेत शेकडो वर्षांनंतर भूपट्टी वसूल करणारा तो पाटीदार म्हणून ओळखला गेला. तसेच, मूळ कुणबी लोक लेवा व कडबा अशा पंक्तीत विभागला म्हणून पाटीदार झाला. मराठी भाषेचे इतिहासकार प्रसिद्ध लेखक- कै.वि.ल. भावे आपल्या 'महाराष्ट्र सारस्वत' आवृत्ती ४थी, पृष्ठ २१५ वर लिहितात की,- प्रथम लोक वसाहतीत येत, ते 'पाटी' चे असे म्हणवीत. पहिल्या पाटीची दहा-पाच कुटुंबे असत. पुण्याची मूळ वस्ती बारा जणांची होती, हे प्रसिद्ध आहे व हाच प्रकार इतरत्र आढळतो. असे शके १४०० चे सुमारास महाराष्ट्रात आलेल्या लोकांच्या वसाहतीसंबंधी लिहिताना 'पाटी' शब्दाची व्युत्पत्ती देतात, व योगायोगाने शके १४०० च्या सुमारासच लेवा कुणबी गुजराथेतून खानदेश विदर्भात आले हे सर्वांना विदितच आहे. म्हणून ज्या पाटीचे ते पाटीदार गणले गेले असावेत काय न कळे ?

'कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास' लेखक- डॉ. मंगुभाई रामदास पटेल, रीडर गुजराथ विद्यापीठ, अहमदाबाद, गुजराथ हे आपल्या ग्रंथात, पृष्ठ १६० वर विभिन्न ठायी विखुरलेल्या सामान्य कूर्मी क्षत्रिय समाजापैकी उत्तर भारत अयोध्या आदी स्थानातील कूर्मीयांनी कूर्मी क्षत्रिय ही जाती संज्ञा कायम ठेवली. पण मूळ वतनापासून स्थलांतर केल्यावर स्थलांतर, भाषांतर, समाजानंतर यामुळे दूरदर्शन, नभोवाणी, वर्तमानपत्रे, आदिंच्याही पूर्वी जाती संज्ञेत बदल होऊ लागला होता. महाराष्ट्रात मराठा कुर्मी किंवा कुणबी, गुजराथेत कणबी, पूर्व मध्य प्रदेशात कुम्बी व पश्चिम मध्य प्रदेशाच्या माळवा भागात पाटीदार, कुळंबी, कुलमी पटेल, मुकाती, तर तेलंगणा, मद्रास, म्हैसूरवासी कूर्मीयांना तेलंगा, नायडू, कापूरा, वोकालिगर, आदी नावे पडलीत. माजी पंतप्रधान देवेगौडा हे वोकालिगा याच कुणबी जातीने प्रसिद्ध आहेत. तर पृष्ठ १५९ वर डॉ. मंगूभाई पटेल लिहितात की,- "कुणब्याच्या ५२ पुत्रांनी ५२ गावे वसविलीत. त्यांच्या ५२ शाखा गोत्र कुलुम्बियात सुरू झाले. पहिला पुत्र लवसंग मातेची परवानगी न घेताच स्वस्त्रीसह अलग गावी राहू लागला. तो लेवा म्हणून संबोधिला गेला. याचेपासूनच लेवा जातीची उत्पत्ती झाली व बाकी ५१ पुत्रापासून कडवा भाई जन्मले. या ५२ गोत्रोत्पन्न कुलम्बियांच्या दोन पांती पाडल्यात (भाग केलेत). व मुलांना अलग-अलग हक्क दिलेत म्हणून पाटीदार गणले गेले.' ही घटना संवत १६५७ इ.सन १६०१ मध्ये झालेली असावी.

खासदार सेठ गोविंददास लिखित ग्रंथाधारे ७०० राजे एका छत्राखाली आणणारे स्वतंत्र भारताचे १ ले गृहमंत्री लोहपुरुष सरदार श्री वल्लभभाई झवेरभाई पटेल हे लेवा कुणबी जातीतील पाटीदारच होते हे कळते.

'जातिभास्कर' ह्या प्राचीन संस्कृत ग्रंथाधारे बडगुजर ही ज्ञाती क्षत्रिय असून लेवा समाजाचेच अंग आहे. (लेवा परिवार, ऑगस्ट १९९१, पृष्ठ ८ पहा). लेवा समाजात लग्नारंभी वरपक्षाकडून वधूपक्षाकडे निशाण पाठविण्याची प्रथा होती. निशाण हे ध्वजचिन्ह. ध्वज पाठविण्याचा अधिकार

फक्त क्षत्रिय वर्गालाच होता. तसेच, क्षत्रियांचे कुलदैवत शंकर-पार्वती असते. प्रभू रामचंद्राचे कुलदैवत भगवान शंकर होते. याशिवाय वंशावळी लिहिण्याची प्रथा (चारण वा भाटाद्वारे) फक्त क्षत्रियातच असते. कच्छमधील लवाणा (लोहाणा) ज्ञाती लेवा समाजशाखा असून तिला क्षत्रिय म्हटले आहे.

पूर्वी लेवा लोक यज्ञोपवित वापरत, पण कालांतराने मंगल प्रसंगी ते यज्ञोपवित वापरू लागले. म्हणजे ते क्षत्रिय असल्याने त्यांना यज्ञोपवित वापरण्याचा अधिकार होता. गुजराथेतून लेवा इकडे आल्यावर त्यांनी गावोगाव गढ्या उभारल्यात. याबल, वरखेड, बेलखेडा, (हल्लीओसाड) येथे लेवा समाजे किल्ले पण आहेत. खानदेश विदर्भात फक्त लेवा समाजाचेच लोक आहेत, पण कडवा किंवा कुशवंशी पाटीदार आढळत नाहीत. हे लेवा कुणबी लोक इ.सनापूर्वी ७८ ते इ.सन १४४ च्या दरम्यान जसे पंजाबाहून गुजराथेत आलेत तसेच, गुजराथेहून इ.सन १२०० ते १४८४ पर्यंत तापी तीराने खानदेशात, पावाखंड पांजणा प्रदेशातून आले. इकडे आल्यावर गावावरून १.सावदेकर, २. गाडेगावकर (नवघरे), ३. कंडारकर, ४. थोरगव्हाणकर अशा चार उपशाखात विभागले.

असा इथे आलेला हा मूळचा रघुवंशी समाज अलीकडे चातुर्वर्ण्यातील वर्णविषमेताचा कंटाळा येऊन हा समाज सर्वांभूती समदृष्टी। हेचि भक्ती गोमटी॥ (ना.गा. अ., १९१९) या वारकरी ब्रीदाच्या भगव्या पताके खाली 'तो हा माझा विठोबा सर्वांघटी सम। न सांडावे वर्म म्हणे नामा ॥८॥' (ना.गा. अभंग ३७३) असे गर्जत 'आम्हा सापडले वर्म। करू भागवत धर्म॥ (ना.गा. अभंग १४०, चरण १ ला) या ध्येयाने 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी॥' (ना.गा. अभंग १४०३) अशा भावनेने **"सामाजिक विषमतेवर किंवा वर्णविषमतेवर वार करणारा तो वारकरी"** बनला. काहींनी **चातुर्वर्ण्या**ला तिलांजली देणारा महानुभाव पंथ स्विकारला, तर काही उदार मतवादी स्वामी नारायण **पंथी बनले**त.

आपले लेवा परिवार, एप्रिल ते जून १९९४ च्या, त्रैमासिक अंकात, पृष्ठ ५ वर श्री. वासुदेव राव एच. पाटील लिहितात की, "इंपिरीयल गॅझेट ऑफ इंडिया" न्यू एडिशन व्हॉल्यूम १, पृष्ठ ९७, ९८ अहमदाबाद डिस्ट्रीक्टमध्ये म्हटले आहे की, लेवा पाटील व कडवा पाटील रजपूतांच्या बरोबरीच्या जाती आहेत, पण The imperial gazatter of India Volume V Abazai to Arot, New edition, today & tomorrow, Printers and Publishers, 22 B/5, Original Road, New Delhi 5, India. (The Book is referred from is available) Bhopal University Library, Bhopal call No. 910-754, R. book 1, Accession No. 2148, Page 96 to 99 :- "There is no real difference to caste between kunbis and Patidars, though will not now intermarry with ordinary kunbis. The latter are divided into three classes Leva, Kadavas, and Anjanas. Femmal infantieide owing to the ruinous expenses attached to marriage having been found prevelant among kunabis, the provision of Bombay Act VIII of 1870 were applied to the Kadavas and Leve Kunbis.

Next in position to the kunbis are the Rajputs, who still retain to some extent and the look and felling of soldiers.... There is nothing in the dress and habits of the cultivating Rajputs to distingwish them from kunbis, though they are far inferior in skill and less instustrious."

महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, जळगाव जिल्हा आवृत्ती १९९४, पृष्ठ १०४ वर लिहिले आहे की, "दुसरा बाजीराव पेशवा हा इंग्रजांना शरण येणारा पहिला सत्ताधिश ठरला." या पेशवाईचेच कमकुवत नेतृत्वामुळे सन १७६१ साली पानपतच्या तिसऱ्या लढाईत महाराष्ट्राची सर्व तरुण पिढी पानपती गारद झाली, महाराष्ट्रात दोन लाख बांगडी फुटली. देशाचे अपरिमित नुकसान झाले.

आणि या पराभवानंतर ही अठराव्या शतकाचे शेवटी ब्राह्मणेतरांचा कमालीचा द्वेष करणारे हे राज्य गेल्यामुळे सामान्य जनतेने समाधानाचा सुस्कारा सोडला. **महाराष्ट्र गॅझेटियर जळगाव जिल्हा, पृष्ठ ११० वर, तर स्पष्ट लिहिले आहे की- ''इंग्रजांची राजवट भिन्नभिन्न कारणासाठी का होईना अनेकांना हवीशी वाटत होती.''**

म. ज्योतिबा फुल्यासारखे देशभक्त महापुरुषही इंग्रजी राज्याला एक वरदान मानत, कारण पेशवाईचे प्रदूषित स्वातंत्र्याची जनतेला एवढी शिसारी आली. माणूस केवढाही तहानेला झाला तरी गटारातील पाणी पिण्याऐवजी पतिताघरचेही स्वच्छ पाणी आवडीने पिऊन तहान भागवील तसेच, हे होय.

पेशवाईत असलेली स्त्री शूद्रादिकांचे शिक्षणावरील बंदी आंग्लाईत उठली. इ.सन १८५८ साली परकीय व्यापारी कंपनीचे सरकार जाऊन इंग्लंडचे सरकारची शाही सत्ता आली. लगेच सन इंग्रजांनी एतद्देशियांसाठी प्रथमच विद्यापीठ उघडले. इ.सन १८८६ ला सर्वांसाठी शाळा उघडली गेली. सन १९१६ ते १७ मध्ये जळगाव, सावदा, थोरगव्हाणला सर्व जातीसाठी शिक्षणाचे मुक्तद्वार उघडले. सन १९३० ला शेलागाव बाजारला शिक्षणाची सर्वासाठी सोय झाली. खानदेशमधील पहिला पदवीधर बी.ए. १९११ मध्ये दामोदर नाना चौधरी हा खिरोद्याचा हुशार विद्यार्थी होऊन गेला. पुढे शिक्षणाचा वेग वाढला. पेशवाईत पुष्यमित्र शृंगशाहीचा अवतार मनुस्मृतीचे जुलमाने बहुजनांची मने कुस्करीत होता, ती दडपशाही आंग्लाईत गेली. म्हणून लोक आनंदले. पेशवाई आजही असती तर अजूनही स्त्री शूद्रादिकांना ती शिक्षणाची बंदी सनातन्यांनी अजूनही केली असती.

स्वतंत्रभारताचे शासनात अजूनही हिंदूधर्मात लोकशाही नाही. देव, देवळे अजूनही पुरोहितशाहीचे अंमलात आहेत. भारतीय घटनेतील सरनामा हिंदूधर्मियांना धर्मस्थानी अजूनही आचरणीय वाटत नाही.

सन १९०६ साली जळगाव जिल्हा निर्माण झाला. सन १९०९ ते १९१० साली भोरगाव लेवा पंचायतीने पाडळशे येथील सभेत शिक्षण फंड सुरू केला. सन १९१२ साली पुण्यात एक 'लेवा विद्यार्थी क्लब' स्थापन झाला. सन १९१५ साली जळगावच्या सरकारी नोकरांनी विद्यार्थ्यास मदत करणे सुरू केले. ता. ३ एप्रिल १९१६ ला सावद्यास 'लेवा एज्युकेशन सोसायटीची' निर्मिती झाली. या संस्थेत १. श्रीमंत खुशाल हरी चौधरी फैजपूरकर अध्यक्ष, २. भिकू दुर्गा पाटील सावदेकर उपाध्यक्ष, ३.तोताराम इच्छाराम पाटील सावदेकर सचिव, ४. लहानु भाना पाटील जळगावकर सभासद, ५. नथु रामजी पाटील सावदेकर (ऑडीटर), ६.नानाजीराव रावजी चौधरी, खिरोदेकर सभासद, ७. रंगु तुकडू पाटील, सावदेकर खजिनदार, ८. चाफा चावदस महाजन न्हावीकर, सभासद ९. रामचंद्र धर्मा महाजन भालोदकर सभासद, १०. केशव हुना महाजन कोळवदकर सभासद, ११. जगन्नाथ विठ्ठल पाटील सावदेकर सभासद. ही या संस्थेची संस्थापक मंडळी होती.

तोताराम इच्छाराम पाटील मयत झाल्यावर त्यांचे जागी त्यांचे बंधू प्रेमचंद इच्छाराम पाटील हे सचिव झाले.

वाढत्या गर्दीचे सोयीसाठी सिताराम नाना चौधरींनी स्वयंप्रेरणेने एका भाड्याचे घरात 'लेवा बोर्डींग हाऊस' उघडले. ता. १२-११-१९१७ ला फैजपूरला लेवा एज्युकेशन सोसायटी तर्फे 'लेवा शिक्षण संमेलन' झाले. तत्प्रसंगी ते लेवा बोर्डींग व लोकवर्गणीहून जमलेला पैसा सीताराम नाना चौधरींनी लेवा एज्युकेशन सोसायटीकडे हस्तांतरित केला, तिचे सभासद, श्री. लहानु भाना पाटीलांचे साह्याने व मार्गदर्शनाने लेवा बोर्डींगच्या इमारतीसाठी इ.सन १९१८ मध्ये एक शेत खरेदी केले.

'लेवा एज्युकेशन सोसायटी'चे चालकातील मतभेदामुळे सन १९२० पासून लेवा बोर्डींगचे काम त्याच वर्षी स्थापन झालेल्या लेवा बोर्डींग संघास दिले. त्या वेळी शिक्षणविषयक एकही संस्था अस्तित्वात नव्हती. म्हणून संघाने 'लेवा बोर्डींग सेवक संघ' ह्या नावाने संस्था परिवर्तीत केली. यात प्रामुख्याने शिक्षक वर्गाचाच जास्त पुढाकार होता. पुढे संघाने बोर्डींगचा तळमजला, स्वयंपाकघर, भोजनगृह, विहीर आदी बांधकाम करून त्याचे ता. २९-७-१९२८ ला उद्घाटन केले. पुढे कार्यवाही व्यवस्थित चालली.

कालांतराने कार्यकर्त्यातील किरकोळ मतभेदांमुळे लेवा बोर्डींग हाऊसची व्यवस्था सन १९३४ पासून 'लेवा एज्युकेशन युनियन' या संस्थेकडे सोपविली. तेव्हापासून अजूनही तीच व्यवस्था चालू आहे. जळगाव जिलह्यातील पहिले हायस्कुल सन १९३४ साली स्थापन झाले. त्यानंतर दुसरी इंग्रजी शाळा न्यु इंग्लिश स्कूल ही होय. जळगावी नवागत विद्यार्थ्यांचे सोयीसाठी श्री. सिताराम नाना चौधरींनी इ.सन १९१७ साली एक क्लबवजा बोर्डींग सुरू केले. ते ता. १३ मे १९१८ रोजी नवीन मोठ्या जागेत 'लेवा बोर्डींग हाऊस' स्थापन केले. पूर्वी उघडलेला 'लेवा बोर्डींग क्लब' श्री. सीताराम नाना चौधरींनी सन १९१७ साली फैजपूरच्या लेवा संमेलनात लेवा एज्युकेशन संस्थेकडे हस्तांतरीत केला. कै. रामजी चाबदस पाटील व वै.भादू अवसू कुरकुरे यांचे प्रयत्नाने श्री. लहानु भाना पाटील यांच्या सल्ल्याने जी. एस. हायस्कूलचे पश्चिमेकडील श्री. वामन मोतीराम शेठ यांचे जवळून अडीच एकर शेत एक हजार रुपयास विकत घेतले. 'लेवा बोर्डींग हाऊस'ची व्यवस्था सन १९२० साली 'लेवा बोर्डींग सेवक संघ ह्या नव संस्थापित संस्थेस दिली, व ता. १६-१-१९२१ रोजी ती लेवा शिक्षण सेवक संघ नावात परिवर्तीत केली. बोर्डींगचा कोनशिला समारंभ भालोदचे तोताराम तापीराम चौधरींचे हस्ते ता. २१-१२-१९२१ रोजी केला. व पाडळशे पंचायतीच्या शिलकेतून ४५०० रु. बांधकामासाठी मिळाले.

ता.४-१-१९२५ ला कै. सेनु कानजी महाजनांनी लेवा शिक्षण संघाची बैठक भुसावळला घेतली. तीत श्री. विष्णु हरी पाटील सावदेकरांनी त्यांचे वडील बंधू फकीरा हरी पाटीलचे स्मरणार्थ ७००० रुपयांची देणगी दिली. तिथे उपस्थितांपैकी श्री. भिकू दुर्गा पाटील ८०१ रु., श्री. विष्णु हरी पाटील ८०१ रु., श्री. प्रेमचंद इच्छाराम पाटील ८०१ रु, श्री. लक्ष्मण शिवराम चौधरी ८०१ रु. श्री. रंगु तुकडू पाटील २०१ रु., श्री. भागवत नारायण पाटील २०१ रु., अशा देणग्यांमुळे जुलै १९०८ च्या सुमारास तळमजला, स्वयंपाकगृह, भोजनालय बांधून ता. १९ जुलै १९२८ रोजी बोर्डींगचे उद्घाटन अकोल्याचे बॅरिस्टर श्री. तुकाराम शंकर पाटील दाभाडीकर यांचे हस्ते पार पडले. नवीन इमारतीत मुरारी रामजी चौधरी उर्फ तात्या यांना बोर्डींगचे पर्यवेक्षक नेमले.

सन १९३४ ते ३५ चे सुमारास 'लेवा एज्युकेशन युनियन' ही संस्था जन्मली व तिच्याकडे बोर्डींगचे व्यवस्थापन दिले गेले. सन १९४८ साली 'लेवा एज्युकेशन युनियन'ने 'नवभारत ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन' उघडले होते. ते. ता. ३०-४-१९५४ रोजी विद्यार्थ्यांचे अभावी बंद पडले. ता. १८ मे १९५२ रोजी डॉ.जी.डी. बेंडाळे युनियनचे अध्यक्ष निवडले गेले. त्यांनी सन १९५७ साली लोकवर्गणीमधून वरील मजल्यावर बांधकाम पूर्ण केले. पुढे २५ खोल्याही बांधल्या. अशा प्रकारची लेवा समाजाची शैक्षणिक वाटचाल 'रौप्य महोत्सवी स्मृतिपुष्प १९६८' चे आधारे संक्षेपाने दिली आहे.

पूर्वी जळगाव लहान खेडे होते. ते नशिराबाद तालुक्यात होते, पण इ.सन १८६० साली जळगावला रेल्वे सुरू झाली. यानंतर जळगावची वाढ झपाट्याने झाली व त्यात वरील शैक्षणिक विकासाचा आरंभ खानदेश परिसरातील लेवा बांधवांनी कसाकसा केला ते दिले आहे. यानंतर विदर्भातील लेवा समाजाचा शैक्षणिक विकास पाहू.

सन १९०४ साली वऱ्हाड प्रांत इंग्रजांकडे आला. जून १९२२ मध्ये शेकडा ५४% गुणांनी मॅट्रिक उत्तीर्ण झालेले श्री. ओंकार तोताराम पाटील (कोलते) नरवेलकर हे होते. सन १९२२ साली मध्यप्रांत वऱ्हाडातील सर्व २६ जिल्हयातून पास झालेल्यांपैकी फक्त एकच लेवा विद्यार्थी मॅट्रिक पास झाल्याचे कळते.

इ.सन १९१४ साली ब्रिटीशांनी हक्क नोंदणी रजिस्टर उर्फ Record of Rights तयार केले. Berar Land Revenue, code मध्ये त्याबद्दल सविस्तर माहिती मिळू शकेल. त्याचे संपादक हिरूरकर असल्याचे ओझरते आठवते.

इ.सन १९१६ साली मलकापूर तालुक्यात प्लेगची लागण झाली होती.

इ.सन १९१८ साली एन्फ्ल्यूएन्झा उर्फ मानमोडीची साथ भारतात पसरली, तेव्हा मलकापूरला एकही डॉक्टर नव्हते. फक्त श्री.गाडगे हे वैद्यकी करीत असत.

इ.सन १९१९ च्या हायस्कुल एन्ट्रन्स परिक्षेस बुलढाणा जिल्हाचात खामगाव हायस्कुल हे एकमेव केंद्र होते. ह्याच वर्षी तेथे शासकीय वसतीगृह उघडले होते.

ता. २६ जून १९२६ ला श्री. ओंकार तोताराम पाटील (O.T. Kolate) नरवेलकर हे जिल्हाकौन्सिलच्या शाळेत शिक्षक झाले, तेव्हा भिकूजी गणु भोळे सावरगावकर हे तालुका बोर्डाचे सभासद होते. त्यांनी प्रतापसिंह पाटीलांचे चुलत्याचे मदतीने तेव्हाचे जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष श्री. बाबुराव रामजी पाटील नाडगावकर राजपूत याजकडून श्री. ओ.तो. (कोलते) पाटील नरवेलकरांची शेलगाव बाजारला इंग्रजी शिक्षक म्हणून नियुक्ती केली, तेव्हा या शाळेत ५ ते ७ या वर्गमिळून १५० विद्यार्थी पटावर होते. जुलै १९२६ मध्ये श्री.बी.एन. उदासी याही शिक्षकाची नेमणूक शासनाने केली. सन १९२४ साली नागपूर विद्यापीठ स्थापन झाले. त्यातून श्री. ओंकार तोताराम पाटील (O.T. Kolte) नरवेलकर हे इंटर पास झाले. व दरमहा ५० रु. पगारावर काम करू लागले. इ.सन १९३० साली जिल्हाकौन्सिलचे मिडल स्कुलात शेलगाव बाजारला इंग्रजी विषय वर्गाचे ६०० रु. बुलढाणा जिल्हा कौन्सिलात जमा होते, व ६४ डेस्क व ६४ खुर्च्या स्टॉकमध्ये हजर होत्या. त्या वेळी त्यावेळचे पश्चिम विदर्भाचे तपासनीस (D.S.E.) श्री. बोडस साहेबांनी श्री.ओ.तो. पाटीलांना हायस्कूल काढण्याचा सल्ला दिला. व दर सभासदाजवळून ५ रु. सभासद शुल्क घेऊन एकूण २१ सभासद मिळून एज्युकेशन सोसायटी शेलगाव बाजार या संस्थेची तारीख २३ जून १९३० रोजी रीतसर संस्थापना झाली. बुलढाणा जिल्हा कौन्सिलचे वर्ग त्या सोसायटीकडे हस्तांतरीत केले गेले. व सोबत त्या वेळचे ६४ डेस्क, ६४ खुर्च्या व ६००० रुपये रक्कमही हस्तांतरीत होऊन ८ वा वर्ग उघडला. शेलगावात श्री. रामजी कृष्णा पाटील व श्री. विष्णु पांडु पाटील असे दोन गट होते.

या स्थितीत बॅ. तुकाराम शंकर पाटील दाभाडीकर, (अध्यक्ष), डॉ. भगवान चहादू नाफडे मोरखेडकर (उपाध्यक्ष), ओंकार तोताराम पाटील नरवेलकर (सेक्रेटरी व मुख्याध्यापक), भिकाजी गणु भोळे सावरगावकर व श्री. वामन महादेव खर्चे हे सभासद कार्यकारी मंडळात होते.

त्यांनी १. ओंकार तोताराम पाटील नरवेलकर (मुख्याध्यापक), २. श्री. दामोदर कृष्णाची चोपडे शेलगावकर सहाय्यक शिक्षक, ३. श्री. तुकाराम फकिरा खर्चे शेलगावकर (सहाय्यक शिक्षक) ४श्री. एन्.जी. पाटील (वकील) नरवेलकर, (सहाय्यक शिक्षक), ५. श्री. एस्.एन. राणे निपाणेकर (चित्रकला शिक्षक) नेमले होते. श्री. तानाजी मांगो पाटीलांचे माडीवर शाळा व कार्यालयाचा प्रारंभ केला. नंतर हनुमंताचे देवळाचे पूर्वेकडील खोलीत व मारवाड्याचे माडीवर शाळा भरत असे.

या सुमारास मलकापूरच्या गणेश मुद्रणायलयाचे मालकाचे भाऊबंद असलेले श्री. यादवराव खर्चे पाटील हल्ली मुक्काम मलकापूर यांनी श्री.मुकुंद जयराम पाटीलांचे घरासमोरील अंगणात

राष्ट्रध्वज उभारून इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्यार्थ सत्याग्रह आरंभिला. त्या वेळी शेलगावचे स्वदेशभक्तांनी आठल्ये नावेचे तहशीलदाराचे गाडीवर दगड-गोट्यांचा मारा करून त्यास अक्षरश: पिटाळून लावल्याने शेलगाव बाजारला प्रति बार्डोलीचे स्वरूप प्राप्त झाले होते. स्वातंत्र्य आंदोलन भारतभर पसरलेले होतेच. त्याचे पडसाद बुलढाणा जिल्ह्यातही उमटले. त्यावेळचे श्री. एम.डी. सुफी M.A.L.T. हे D.S.E. होते. त्या शिक्षणाधिकाऱ्याचे बुलढाणा येथील हायस्कुलात काळया निशाणांनी स्वागत झाल्याने ते शेलगावलाही शाळा तपासणीस येण्यास भीत होते. पण १. श्री. शामा लुक्ष्मण पाटील व्यापारी, २. श्री. विष्णु पांडु पाटील, ३. श्री. उखा भोनाजी खर्चे आदी लोकांनी त्यांच्या सुरक्षिततेची दक्षता घेऊन श्री. राणे (निपाणेकर) ड्राईंग टीचरचे बैलगाडीतून त्यांना शेलगावला आणले व आवश्यक तो शेरा शाळेस मिळवून घेतला. नंतर बॅरिस्टर तुकाराम शंकर पाटील दाभाडीकरांचे मार्फत श्री. पुंजाजी खर्चे मास्तरांचे अडीच एकर गोविंदसा विष्णुसा सावजी यांचेकडून ६०० रुपयास शाळेसाठी विकत घेतले, व डिसेंबर १९३० मध्ये शाळेसाठी मान्यता मिळविली. नंतर हायस्कूल प्रवेश परिक्षेची पहिली तुकडी परिक्षेस बसविली. त्यात श्री. तुकाराम नागो सुपे शेंबेकरांना १० रु. मासिक शिष्यवृत्ती मिळाली होती.

त्या वेळी शेलगाव बाजारचे वामन महादेव खर्चे पाटील हे शाळेच्या बांधकामाकडे विशेष लक्ष पुरवित असत. शाळेला जयराम उन्हळे तांदुळवाडीकर हा पहिला चपराशी नेमला होता. मार्च १९३१ च्या परिक्षेत मुख्याध्यापक श्री. ओ.टी. पाटील नरवेलकर बी.ए. पास झाल्याने एल्.एल.बी. शिकण्यासाठी गेले. म्हणून त्यांचे जागी श्री. नामदेव गणपत पाटील नरवेलकर वकिलांची मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती झाली. त्यावेळी सहाय्यक शिक्षकांना ३५ रु. व मुख्याध्यापकास ५५ रुपये पगार होता. शाळेस तोटा आल्याने शिक्षकांचे पगार घटविले म्हणून, श्री. के.टी. खर्चे व मुख्याध्यापक श्री. ना.ग. पाटील यांच्यात मतभेद झाले. म्हणून श्री. ना.ग. पाटील नरवेलकरांनी मुख्याध्यापकपदाचा राजीनामा दिला. त्यामुळे पुन्हा श्री. ओ.टी. पाटील नरवेलकर यांची संस्थेने मुख्याध्यापकपदी नियुक्ती केली, पण ता. २४-२-१९३२ला त्यांचे वडील वारले व तारीख ६ मार्च १९३२ ला ते एल.एल.बी. परीक्षा पास झाले. त्यामुळे त्यांनी श्री. रामचंद्र मोतीराम नाफडे मोरखेडकर यांना मुख्याध्यापक पदाचा कार्यभार देऊन त्यांनी ३१ मार्च १९८० पर्यंत वकीली केली. ही माहिती मी प्रत्यक्ष ता. १८-९-१९८४ रोजी श्री. ओंकार तोताराम कोलते नरवेलकरांची प्रत्यक्ष मुलाखत घेऊन मिळविली. व त्या आधारे कथन केले.

तशीच बॅ. श्री. तुकाराम शंकर पाटील दाभाडीकरांचीही ता. २३ सप्टेंबर १९८४ ला मुलाखत घेऊन त्यांना व त्यांचे स्नेहातील इतरांच्या मुलाखती घेऊन पुढील माहिती मिळविली ती अशी :-

बॅ. दादासाहेब, तुकाराम शंकर पाटीलांचा जन्म ता. १९ डिसेंबर १९०० रोजी झाला. पण श्री. श्यामजी पाटील माकोडीकरांच्या मते तो हिंदू पंचांगाप्रमाणे १८ डिसेंबर १९०० रोजी धरावा असे सांगितले होते. त्यांचे आजोळ कुंडाचे व वतन दाभाडीचे आहे. त्यांचे शिक्षण अनक्रमे दाभाडी, मलकापूर, अमरावती, पुना व इंग्लंडात झाले.

कै.दादासाहेब सन १९२० चे सुमारास पुण्याचे फर्ग्युसन कॉलेजात शिकत असताना ते पुण्याहून दाभाडीस दाताळामार्गे येत असताना दाताळा गावचे श्री. राम झोपडीत त्यांचे वडील श्री. शंकर तोताराम पाटील दाभाडीकरांचे अध्यक्षतेखाली लेवा भोरगाव पंचायत ठाया दाताळा ही जात पंचायतीची सभा चालू होती. त्यात अध्यक्ष श्री. शंकर तोताराम पाटील यांचे विरुद्ध काही किरकोळ कारणावरून दाभाडीचे श्री. किसन सीताराम पाटील व श्री. माधव सीताराम पाटील यांनी मतभेद दर्शविले. डॉ. विष्णु भिकाजी कोलते नरवेळकर यांचे वडील श्री. भिकू एकोबा पाटीलही सभेत उपस्थित होते. मतभेद विकोपाला जाऊन प्रतिस्पर्धी पक्षाने बुलढाणा फौजदारी कोर्टात फिर्याद

केल्याचे समजते. तेव्हापासून विदर्भातील भोरगाव लेवा पंजायतीच्या जात पंचायत ठाया बंद झाला होता. त्याचे सुमारे ६४ वर्षांनी सन १९८४ साली पुनरुज्जीवन करण्यासाठी श्री. तुकाराम हरी पाटील दाताळकरांनी खूप प्रयत्न केले होते. बाळासाहेब मधुकरराव चौधरी खिरोदेकरांच्या प्रेरणेने हे जात पंचायत कार्य पुन्हा सुरू केले. त्यात बरेचशे यशही विदर्भात आले होते. मलकापूरला लेवा भ्रातृमंडळाची उर्जितावस्था हे त्यांच्याच प्रयत्नाचे फळ होय. पण कै. तुकाराम हरी पाटीलांच्या मृत्यूनंतर दुसरा कर्तबगार नेता न मिळाल्याने ते कार्य पुन्हा बेमुदत बंद झाले.

श्री. तुकाराम शंकर पाटील दाभाडीकर हे विलायतेस बॅरिस्टरीची परीक्षा देण्यासाठी गेले. त्या वेळी श्री. शंकर तोताराम पाटील दाभाडीकर २००० एकर जमिनीचे एकत्र कुटुंब प्रमुख व सावकार होते. त्यांचे आजोळ दुधलगावकर कुटुंब-नायकच होते.

वर निर्देशिलेल्या मृत झालेल्या जात-पंचायतीचे सन १९२० साली दाताळ्याचे लेवा पंचायतीचे ठायाचे सभेत भोरगाव लेवा पंचायतीचे कुटुंबनायक दुधलगाव व दाताळा येथील सभासद हजर होते. त्यात गणु काशिराम पाटील दुधलगावकर, गोपाळराव बाबू पाटील दाताळकर, मुकुंद सदाशिव पाटील दुधलगावकर ही मंडळी उपस्थित होती.

सन १९२२ ला चि. वासुदेवची पाचवी केल्यावर नारळी पौर्णिमेचे दिवशी कै. दादासाहेब शिक्षणासाठी इंग्लंडला गेलेले विदर्भातील पहिले लेवा पाटीदार होते, आणि त्यांचेनंतर त्या शिक्षणासाठी विदर्भातून एकही लेवा पाटीदार पुढे गेला नाही. तेथे साडेचार वर्षे शिकून डिसेंबर १९२६ साली परतल्यावर ते बॅरिस्टर म्हणून काम करू लागले. मध्यप्रांत वऱ्हाडच्या विधानसभेत १० वर्षे सतत आमदार व १९६० च्या अकोला मतदार संघातून झालेल्या पोट निवडणुकीत ते कॉंग्रेसच्या तिकिटावर एक वर्षभर लोकसभेत दिल्लीला खासदार म्हणून कार्यरत राहिलेत.

'एडेड एज्युकेशन सोसायटी' शेलगावबाजार, या संस्थेचे सेक्रेटरी श्री. भिकाजी गणू भोळे यांनी बुलढाण्यास जाऊन एज्युकेशन सोसायटीचे रजिस्ट्रेशन केले. कै. दादासाहेब तुकाराम शंकर पाटील. दाभाडीकरांचे वजनामुळे शाळेची मंजुरी व ग्रँटची कामे सहज पार पडली.

श्री. शंकर तोताराम पाटील दाभाडीकर हे मलकापुरात येणारे पहिलेच लेवा रहिवाशी असावेत. त्यांनी पारपेटमधील करीम पटवा ह्या मुसलमानाचे मदतीने मलकापूरात ही सावकारी केली, व बरीच मालमत्ता कमाविली. नंतर ते मलकापूरालाच स्थायिक झाले. त्यांचे शिक्षण जरी फक्त तिसरी इयत्तेपर्यंत झाले तरी, समाजहितार्थ त्यांनी बुलढाणा रोडवरील मनोहर पांडुरंग पाटील यांचे हल्ली ताब्यात गेलेल्या शेतात एक लेवा बोर्डींग पाच-सहा वर्षे चालविले होते. त्यात लेवा विद्यार्थ्यांची रहाण्याची व भोजनाची सोय होत असे.

शंकर पाटील दाभाडीकर हे त्या वेळी ऑननरी मॅजिस्ट्रेटही होते. त्यांनी पाडळशे येथील जात पंचायतीत उत्तम भाषण केले होते. समाज सेवेचा त्यांचा वसा श्रीमान दादासाहेबांनी पुढेही चालविला.

त्यांची पत्नी सौ. रुक्मिणीबाई पाटील निरक्षर असून अस्सल प्रतिभावान कवियित्री होती. जणू प्रति बहिणाबाईच. तिच्या उस्फूर्त काव्यगीतांचा संग्रह यवतमाळच्या अमोलकचंद महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक श्री. र.का. कोलते यांनी महानुभाव वाङ्मयाचे अग्रगण्य संशोधक व गाढे अभ्यासक श्रीमान भाऊसाहेब डॉ. वि.भि. कोलते यांचे मार्गदर्शनाखाली संपादित केलेल्या या 'रुक्मिणीगान' काव्यसंग्रहास प्रसिद्ध कवी मंगेश पाडगावकरांची प्रस्तावना आहे. या अभिजात प्रतिभा असलेल्या कवयित्रीचा परिचय मलकापूरच्या सा. सत्यनिष्ठच्या सन १९९३/९४ दिवाळी विशेषांकात शंकर विठोबा पाटील दुधलगावकरांनी दिला आहे. तसेच, जळगावचे श्री. पुरुषोत्तम नारखेडे व अहमदाबादचे श्री. प्रभाकर आनंदा पाटील यांनी संपादित केलेला बहिणाबाई ज्ञानविकास

संस्था जळगावतर्फे बहिणाबाई व सोपानदेव चौधरी विशेषांक शहाणा कागद नावाने काढला आहे. त्याचे पृष्ठ १६ वर दुधलगावकर श्री. शंकर विठोबा पाटील यांनी 'विदर्भाची बहिणाबाई-रुक्मिणीबाई पाटील' या शीर्षकाने ह्यांचा सविस्तर परिचय दिला आहे. जिज्ञासूंनी तो अवश्य वाचावा.

अशा ह्या समाजसेवक बॅ. टी.एस. पाटील दाभाडीकरांनी सन १९३४ ला मोरखेडकर श्री. रामचंद्र मोतीराम नाफडे यांची शेलगावला मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती केली. इ.सन १९३८ साली केवळ ११ विद्यार्थ्यांचे बळावर हायस्कुलचे नवीन वर्ग उघडण्याची श्री. केळकर यांचेकडून परवानगी मिळवून सन १९३८ साली वर्ग ९ व सन १९४१ साली मॅट्रिकची पहिली तुकडी ११ वी जुनी मॅट्रिक म्हणून शालांत परीक्षेस बसविली. तिचा पहिला निकाल शेकडा ६५.६ लागला. श्री. रामचंद्र नामदेव खर्चे (नंतरचे प्राचार्य जनता महाविद्यालय बुलढाणा) यांचा प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांक शाळेच्या प्रथम बॅचला आला. हा विद्यार्थी पुढे नागपूर विद्यापीठातही पहिला आला व डॉ. पंजाबराव देशुमखांनी त्याला बुलढाण्याचे महाविद्यालयाची प्राचार्यपदाची धुरा दिली.

इंदूरच्या होळकर राजाचे सेनादलातील १३० रुपये मासिक पगाराची सन्मानाची जागा सोडून केवळ ५५ रुपये मासिक पगारावर ध्येयवादाला प्रेरीत होऊन मागास भागातील लोकशिक्षणशर्थ समाजसेवा करण्याचे हेतूने ध्येयवादी श्री.रामचंद्र मोतीराम नाफडे मोरखेडकरांनी आपल्यासमोरच समाजसेवेची तळमळ असलेले गुणवान तेजस्वी हिरे निवडून त्यांचे अध्यापनाखाली तनमनधनाने विद्यादानाचे पश्चिम विदर्भात भरीव कार्य केले. त्या वेळी शेलगाव बाजार येथील लोकांचे सक्रीय सहकार्य तर राहोच, पण खडतर विरोधातही त्यांनी नेटाने व थाटाने हे कार्य केले. मात्र यात शेलगावचे श्री. कृष्ण पांडुरंग पाटील व श्री. मनसाराम वामन पाटील या निस्वार्थी व बाणेदार वेकीलाचे पाठिंब्यामुळेच त्यांना हे कार्य शक्य झाले.

अशाही परिस्थितीत सन १९३४ साली शाळेच्या चार खोल्या व १४० विद्यार्थी असलेली ही शाळा ताब्यात घेतल्यावर १४० चे ७४० पर्यंत विद्यार्थी पटसंख्या व ४ खोल्यावरून अठरा खोल्यापर्यंत वाढ करून सत्ताविस शिक्षक, दोन कारकून, चार चपराशी, एक लेबॉरेटरी अटेंन्डंट एवढा स्टाफ वाढवून शिक्षकांची एक सहकारी पतपेढी स्थापन केली, व शेवटी सन १९६९ चे आसपास ते सेवानिवृत्त झाले. मलकापूरच्या एज्युकेशन सोसायटीच्या शाळेचा शेकडा १८ ते २० टक्के निकाल लागला त्या पार्श्वभूमीवर २००० चे आत लोकसंख्या असलेल्या-पक्की सडक व रेल्वेमार्ग नसलेल्या आडमार्गावरील एका लहानशा खेड्यातून ६५ टक्के शालांत परिक्षेचा निकाल प्रतिकुल खेडूत परिसरात लावून दाखविला, हे त्यांना व त्यांचे ध्येयादी सहकारी शिक्षकांना निश्चितच भूषणावह आहे.

मात्र ता. २६ मार्च १९९५ रोजी या संस्थेचे सेक्रेटरी श्री. मनसाराम वामन पाटीलांनी सांगितले की अध्यक्ष बॅरिस्टर टी.एस्.पाटील दाभाडीकर, उपाध्यक्ष तुकाराम सीताराम पाटील तळणीकर, सेक्रेटरी भिकाजी गणू भोळे सावरगावकर व सभासद डॉ. भगवान चहादू नाफडे मोरखेडकर व साभासद कृष्णा पांडुरंग पाटील शेलगावकर ह्या प्रथम कार्यकारिणीची एका शुक्रवारी ११० ते ११५ सभासदांतून निवड होऊन त्यात सेक्रेटरी भिकाजी गणू भोळे निवृत्त झाल्यावर त्यांचे जागी मनसाराम वामन पाटील हे सचिव म्हणून निवडले गेले.

या शाळेच्या मुख्याध्यापक परंपरेत १. ओंकार तोताराम पाटील नरवेलकर, २. नामदेव गणपत पाटील नरवेलकर, ३. ओंकार तोताराम पाटील नरवेलकर, ४. श्री. रामचंद्र मोतीराम नाफडे, मोरखडकर ५. निनु लक्ष्मण खर्चे शेलगावकर, ६. श्री. सुपडा देवाजी पाटील दुधलगावकर, ७. श्री. पुरुषोत्तम माधव खर्चे शेलगावकर, ८. गोविंद तोताराम चोपडे सावरगावकर, ९. श्री. गणपत लक्ष्मण नारखेडे तळणीकर ही मुख्याध्यापक परंपरा कार्यरत राहिली.

या शाळेतून पहिली सेवानिवृत्ती ता. १-२-१९६८ ला श्री दा. कृ. चोपडे यांची झाली. या शाळेस फारसे दाते मिळाले नाहीत, पण शिक्षकांचा त्याग व श्रमदान यावरच या शाळेची प्रगती झाली.

अशा ह्या शाळेचे ता. २३, २४ व २५ नोव्हेंबर १९६७ रोजी एक भव्य स्नेहसंमेलन झाले. त्यात सांस्कृतिक कार्यक्रम, वादविवाद, परिसंवाद, संयोजन, आभार प्रदर्शन, समारोप आदी कार्यप्रसंगी प्रस्तुत ग्रंथ लेखकाचा सक्रीय सहभाग होता, त्यामुळे शाळेचा व शाळेच्या संबंधितांचा जवळून संबंध आल्यामुळे एवढी सविस्तर माहिती लिहू शकलो.

खानदेश विदर्भातील शिक्षणाचा जळगाव व शेलगाव बाजार ह्या गंगोत्रीनंतर भराभर माध्यमिक शाळा व महाविद्यालयातून ज्ञानगंगा वेगाने खळाळत प्रवाहित झाली. नुकतेच जळगावला उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ निघून शैक्षणिक प्रगतीची गरुडझेप एका स्वतंत्र ग्रंथ रूपाने घेता येईल एवढी वाढल्याने केवळ तिचे सूतोवाच करून या ज्ञानगंगेच्या उगमस्थानीच विस्तार भयास्तव थांबतो.

प्रकरण १४

स्वायंभूव मनु ते मनस्मृतीचा काल

मनुर्भरत वंशातील अदितीपासून त्रेतायुगात वाढलेला सूर्यवंश व पुढे द्वापारात झालेले त्यांचे क्षत्रिय वंशातून पुढे कलियुगात कृषीक वृत्तीचा लेवा कुणबी उर्फ लेवा पाटीदार वर्ग उगवला.

या वंशातील चिंतनशील विचारवंतांचे ब्राह्मणात, व शूर लढवय्याचे क्षत्रियात रूपांतर झाले. कृषकांचे आद्य उगमस्थान जो विष्णू हाच मुळी ब्राह्मणवर्गाचा जो जनक ब्रह्मदेव त्या ब्रह्मदेवाचाही बाप विष्णु होय. याचेपासून झालेल्या प्रजेत इ.सन पूर्व १००० पर्यंतच्या सत्ययुगात वर्ण व जातीचा विभाजित समाज नव्हता. नुकतीच कुठे चिंतनशील लोकांच्या ऋषीवर्गातून ब्राह्मण व शूर व साहसी वृत्तीच्या, लढवय्यावृत्तीच्या, लोकांतून क्षत्रिय वर्ग नुकतेच कुठे उगवले होते. पण त्यांच्यात रोटी-बेटी व्यवहार होते. हाच वैदिक काल होय.

मात्र, इ.सन पूर्व १००० ते इ.सन पूर्व ६०० ह्या उत्तर वैदिक कालातूनच वैश्य व शूद्र वर्णांची तथा जातीची निर्मिती झाली. जरी वृत्ती, व्यवसाय व गुणपात्रतेनुसार प्रारंभी हे वर्गीकरण वर्ण व जातीत परिवर्तीत झाले तरी, त्यांच्यात परस्पर रोटी व बेटी व्यवहार प्रारंभी होते ते पुढे बंद होत गेले. प्रारंभी वर्ण व जाती व्यवसायावर आधारित होत्या, व स्वकलानुसार व्यवसाय स्वातंत्र्य होते. स्वेच्छेने व्यवसायांतर व वर्णांतर करता येई. त्यातील परिवर्तनीयता पुढेपुढ कमी कमी होत गेली. व्यवसाय व वर्ण यातील परिवर्तनीयता घटल्याने समाजाचे उत्तरोत्तर विघटीकरण होऊन समाज दूर्बल होऊ लागला. म्हणून पुरोगामी विचारवंतांनी त्यांचे दृढीकरण करण्याविरुद्ध बंड केले. अशा बंडखोरात भगवान महावीराचा जैनधर्म, गौतमबुद्धाचा बौद्ध धर्म, वीर शैव पंथ, महानुभाव पंथ, वारकरी पंथ आदी पुरोगामी पंथ देशहितासाठी झटून समताधर्म व मानवधर्म जागविला याऊलट स्वार्थी परंपरावादी व सनातनी पुरोहितवादी वर्गानी समता धर्माला विरोध करून समताधर्मीय समाजाचा द्रोह व पर्यायाने राष्ट्रद्रोह सुरू केला. असा हा पुरोगामी विरुद्ध प्रतिगामी मार्गाचा झगडा दिवसेंदिवस वाढत गेला.

उत्तर वैदिक काळात (इ.सन पूर्व १००० ते इ.सन पूर्व ६००) ब्राह्मणांनी स्व-वर्णाच्या श्रेष्ठत्वासाठी

चातुर्वर्ण्य व चातुर्वर्ण्यांचे अंतर्गत वर्णविषमतेस खतपाणी घातले. म्हणून समाजात विषमता वाढली. "क्षत्रिय कुलोत्पन्न जैनधर्म संस्थापक महावीर तथा बौद्ध धर्मके संस्थापक गौतम बुद्ध थे। इन दोनोके द्वारा ब्राह्मणोंके प्रभुत्वका विरोध किया गया। (यूथ कॉम्पिटीशन टाईम्स, संपादक आनंदकुमार महाजन, पृष्ठ ४० पहा).

उत्तर बिहार प्रांतात मुजफ्फरपूर जिल्ह्याचे वैशालीच्या कुंडपूर उर्फ कुण्डग्राम या उपनगरात इ.सन पूर्व ५४० मध्ये एका क्षत्रिय कुळात भगवान वर्धमान महावीर जन्मले. (यु.कॉ.टा., पृष्ठ ४१). व राजगीरच्या जवळ पावापूरीस इ.सन पूर्व ४६८ मध्ये महावीराचा मृत्यू झाला. (यु.कॉ.टा., पृष्ठ ४० व ४१). जैनधर्म बौद्धधर्माप्रमाणेच गणतंत्रीय धर्म असल्याने त्यांनी वेद व ब्राह्मणांचे अधिकारास विरोध केला. व वर्णव्यवस्थेचा कडाडून विरोध केला. **जैन व बौद्ध ग्रंथातून क्षत्रियांची सामाजिक प्रतिष्ठा ब्राह्मणापेक्षा श्रेठ दर्शविली आहे. (यु.कॉ.टा., संपादक- महाजन, पृष्ठ ४२ पहा).** जैनधर्म अनिश्वरवादी आहे. (पृष्ठ ४८ पहा).

इ.सन पूर्व ५६३ मध्ये नेपाळच्या तराईत क्षत्रिय कुळातील शाक्य गणांचा प्रधान राजा शुद्धोदन व कोशल देशाची राजकन्या मायादेवी यांचे पोटी सिद्धार्थाचा (गौतम बुद्धाचा) जन्म झाला. जन्माचे सातवे दिवशीच माता मरण पावली म्हणून त्याची मावशी- महाप्रजापती गौतमीने त्याचा सांभाळ केला. १६ वे वर्षी यशोधरेशी विवाह झाला. हिच्यापासून सिद्धार्थाला राहूल नावाच पुत्र झाला. वयाचे २९ वे वर्षी रात्री यशोधरा व राहूलचा त्याग करून वर्णाश्रम धर्माविरुद्ध अनिश्वरवादी बौद्धधर्म स्थापन केला, व वयाच्या ८० व्या वर्षी पावामधील चुंद नावाच्या सोनाराचे घरी भोजन केल्याने उदर विकाराने पिडीत झालेला सिद्धार्थ गौतम बुद्ध कुशीनगर (देवरिया) येथे येऊन इ.सनापूर्वी ४८३ मध्ये तो मरण पावला. कुशीनगरलाच विद्वान लोक देवरियाचे कसिया ग्राम मानतात. (यु.कॉ. टा., संपादक- महाजन, पृष्ठ ४९ पहा).

इ.सनापूर्वी सहाव्या शतकात भारतभर या ब्राह्मणी धर्माच्या विघटणवादी वर्णभेदक चातुर्वर्ण्यास ठिकठिकाणी विरोध झाला. गंगाकिनारी अनेक धार्मिक संप्रदायांचा उदय होऊन पुरोगामी क्रांतीस हातभार लागला. "या युगात लगभग ६२ संप्रदाय ज्ञात आहेत." (यु.कॉ.टा., पृष्ठ ४७ पहा).

"लेखनकला बहुधा अशोकापूर्वी २० वर्षापासून सुरू झाली असावी." (यु.कॉ. टा., महाजन पृष्ठ ५० पहा). राजपूत युगात महात्मा बुद्धाला भगवान विष्णुचा अवतार मानून हिंदू धर्मात त्याला प्रमुख स्थान दिले होते. (यु.कॉ.टा., पृष्ठ ५३ पहा).

"ब्राह्मणवाद शब्द उस सामाजिक, धार्मिक अवस्था का द्योतक है जो उन ब्राह्मणोंकी सर्वोच्चता का स्वीकार करता है। जो यज्ञ करवाते है, जो अपनी सेवाओंके लिए धन लेते है। पतंजलीने पुष्पमित्र शुंगके लिए किए जानेवाले यज्ञ का उल्लेख किया है (यु.कॉ. टा., पृष्ठ ५८) गुप्तकाळ, आंध्र कुषाण काल मे ब्राह्मणवाद व्याप्त है। (पृष्ठ ५९ पहा). तामिळ प्रदेश इ.सनाचे पहिल्या शतकात ब्राह्मणवादाचे प्रभावात होते (यु.कॉ.टा., पृष्ठ ५३). **ब्राह्मण धर्मात बहुदेववाद प्रचलित होता. (पृष्ठ ५४).** विष्णुपुराण, विष्णुस्मृती व भगवत गीता इ.सनाचे ४ थ्या शतकात जन्मली (यु.कॉ. टा., पृष्ठ ५२ पहा).

मात्र, मातृदेवीची उपासना शक्ती, अंबा, दुर्गा, पार्वती, गौरी वैदिक नावाने प्राक्‌वैदिक काळात होती. व इ.सन ३०० ते ७०० पर्यंत शक्ती संप्रदाय जन्मला. लक्ष्मी, पार्वती, काली, दुर्गा यांची पूजा उगवली (पृष्ठ ५६). सहाव्या शतकात तंत्रवाद जन्मला व आठव्या शतकात तो प्रसार पावला (पृष्ठ ५६). तांत्रिक अनुष्ठानात मद्य, मत्स्य (मद्यायी), मांस, मुद्रा (अनाज) व मैथून ही पंच-मकारी पूजा उदय पावली (पृष्ठ ५६).

वीरशैव संप्रदाय प्रवर्तक बसवराजाने वर्णाश्रमधर्म व जातीवादाच विरोध केला. (यु.कॉ.टा., पृष्ठ ५७). नवव्या शतकात पुन्हा ब्राह्मणवाद वाढला. चौदाव्या शतकात जातपात समाप्त करण्यासाठी

लोकभाषातून रामानंदाने प्रसार केला. (यु.कॉ.टा., पृष्ठ ५७).

इ.सन ७८८ मध्ये केरळात आवडीस शंकराचार्य जन्मले. त्यांनी ब्राह्मणधर्माचा प्रसार केला.

चंद्रगुप्त मौर्याचे साम्राज्य इराणपासून दक्षिणेत उत्तर कर्नाटकपर्यंत होते. पूर्वेस मगधपासून पश्चिमेस सुराष्ट्र व सोपारापर्यंत असून पाटलीपुत्र ही त्याची राजधानी होती. (यु.कॉ.टा., पृष्ठ ६३ व ६४ पहा.)

चंद्रगुप्त मौर्याचा शासनकाळ इ.सन. पूर्व ३२२ ते इ.सन पूर्व २९८ पर्यंत होता. वृद्धापकाळी तो जैनधर्मिय बनला होता. त्याचा पुत्र बिंदुसार हा इ.सन पूर्व २९८ ते इ.सन पूर्व २७३ गादीवर होता. तो ब्राह्मणधर्मानुयायी बनला (यु.कॉ.का., पृ. ६६). इ.सन पूर्व २७३ ते इ.सन पूर्व २३० सम्राट अशोकाचे राज्य होते. **मगधापती सम्राट अशोक मौर्य हा ब्राह्मण मातेचा पुत्र असल्याने प्रारंभी तो ब्राह्मणधर्मानुयायी होता. इ.सन पूर्व २६९ मध्ये तो बुद्धधर्मीय बनला.** (यु.कॉ.टा., पृष्ठ ६७). व इ.सन पूर्व २३६ मध्ये तो वारला. अशोकानंतर कुणालपुत्र दशरथ आठ वर्षे गादीवर होता. त्याचेनंतर त्याचा पुत्र संप्रति जैनधर्मी बनला. त्याचे नंतर अधार्मिक, भांडखोर शालिशूक राजा झाला. शालिशूकनंतर देवधर्मन व त्यानंतर शतधन्वा व **मौर्य वंशात शेवटचा मौर्यवंशी बृहद्रथ राजा झाला.** त्याचा सेनापती पुष्पमित्र शुंगाने विश्वासघाताने इ.सन १८४ मध्ये त्याचा खून केला व राज्य घेतले. इ.सन पूर्व ५८ मध्ये विक्रम संवत सुरू झाला.

चष्टन-वंशीय सिथियन शक राजाने उज्ञैन व काठेवाडात क्षत्रप वंशाचे राज्य संस्थापले. **त्याने इ.सनाचे ७८ त्याचा शक चालविला.** चष्टननंतर जयदामन व त्यानंतर रूद्रदामन पश्चिम भारतावर शक राजा झाला. इ.सन १५० पर्यंत उज्ञैनीहून रूद्रदामनाने राज्य चालविले. वैदिक धर्मीय रुद्रदामन इ.सन १३० ते १५० होता. त्याने संस्कृत भाषेस उत्तेजन दिले. इ.सन २२४ ते ३४० पर्यंत शकांचा ऱ्हास काल होय. भारतात युनानी साम्राज्याचा १ ल्या शतकात अंत झाला. व त्याचे जागी विदेशी क्षत्रिय वर्णाचा शकाचा माऊस अथवा मोगने इ.सन पूर्व १८० पासून गांधारमध्ये शक-राज्य संस्थापन केले. कुषाण राज्य संस्थापक किमकैडफिसेसने सन ६५ ते ७८ पर्यंत वायव्य भारतात राज्य केले. **इ.सन ७८ मध्ये कनिष्काने राज्यारोहण केले. (यु.कॉ.टा., पृष्ठ ७९). कनिष्काने प्रारंभीच बौद्धधर्म स्विकारला. त्याने २३ वर्षे राज्य केले. तो सन १०० मध्ये वारला.** नंतर त्याचा पुत्र वासिक सन १०२ ते १०६ पर्यंत राज्यावर होता. नंतर इ.सन २८ ते ६२ वासिष्कानंतर ब्राह्मणधर्मीय हुविष्काने राज्य केले. कनिष्कानंतर त्याचे कुळाचा महान सम्राट सन ६७ ते ९८ पर्यंत अंतिम राजा होता. ह्या कुशान वंशाचे सुमारे ९९ वर्षे राज्य होते. (यु.कॉ.टा., पृष्ठ ८९).

इ.सन २७५ मध्ये गुप्तराज्य संस्थापना, इ.सन ३१९ ते ४१५ पहिला चंद्रगुप्त, इ.सन ३३५ ते ३८० समुद्रगुप्त, इ.सन ३८० ते ४१५ दुसरा चंद्रगुप्त, इ.सन ४१५ ते ४५५ कुमार गुप्त, इ.सन ४५५ ते ४६७ त्याचा पुत्र इ.सन ५५० मध्ये गुप्तवंश लुप्त झाला. वर्णविषमता होती. याच काळात १९ सर्गाचे रघुवंश महाकाव्य कालिदासाने रचले. (यु.कॉ.टा., पृ. ९३) यात सूर्यवंशातील लवाचे वंशज म्हणजे लेवा कुणबी होत.

इ.सन पूर्व २०० ते इ.सन २०० मनुस्मृती रचली. यु.कॉ. टा., पृष्ठ ९५

इ.सन १०० ते इ. सन ३०० याज्ञवल्क्य स्मृती रचली.

इ.सन ३०० ते ४०० नारदस्मृती रचना.

इ.सन ३०० ते ५०० पराशर स्मृती रचली.

वलभीचे राज्य आधुनिक गुजराथ प्रांतामध्ये त्या वेळी होते. तेथील राजा ध्रुवसेन तृतीय हर्षवर्धन (जन्म ५९१) काळात भडोचच्या गुर्जर शाशक्ददच्या समकालीन होता. हा भडोचमध्ये गुर्जर वंशात जन्मलेला होता. कदाचित हा गुर्जरवंशीय मैत्रक सूर्यवंशोद्भव लेवा पाटीदार वंशाचे

पूर्वजांचा सहोदर असावा. (यु.कॉ.टा., पृष्ठ ९९) अंदात करता येतो. यह ध्रुवसेन उर्फ ध्रुवभट्ट इ.सन ६३० मध्ये राज्यारूढ झाला होता. (युनिफाईड इतिहास, ले.- डॉ. मित्तल, पृष्ठ १५६ पहा).

प्राचीन भारतीय इतिहास मे हर्ष की मृत्यूके पश्चात से १२०० इ.तक के काल को राजपूत युग के नाम से जाना जाता (युनिफाईड इतिहास, ले. डॉ. मित्तल, पृष्ठ १९१ पहा). "राजपूतांची उत्पत्ति वैदिक कालीन क्षत्रियापासून झाल्याने राजपूत विरुद्ध भारतीय होते असा उत्तर भारताचा राजनैतिक इतिहास पृष्ठ १२२/२३ चा आधार देऊन डॉ. मित्तल युनिफाईड इतिहास पृष्ठ १९३ वर कथन करतात. त्यापैकी प्रतिहार राजपूत स्वत:ला सूर्यवंशी क्षत्रिय मानत असत. तसेच, चाहमान होती हेही सूर्यवंशी असल्याचे हम्मीर महाकाव्याचा आधार देऊन डॉ. मित्तल युनिफाईड इतिहास,पृष्ठ १९२ वर लिहितात.

डॉ. मित्तल युनिफाईड इतिहास, पृष्ठ २०८ वर लिहितात की, "राजपूतकालीन समाज जन्मानुसार निर्धारणाने चार वर्णात विभाजित झाला होता. छोट्या-छोट्या उपजातीत समाज अपखंडित होऊन समाजात वर्ण-विषमता, अस्पृश्यता, व जातीजातीत उच्चनीच भाव निर्माण होऊन परचक्राचा सामना करण्यात भारतीय दुर्बल ठरून समताधिष्ठित ईस्लाम धर्मियांनी भारतावर यशस्वी आक्रमण केले व भारत परतंत्र झाला."

उज्जैन गुर्जर प्रतिहार शाखेचा संस्थापक नागभट्ट प्रथम (सन. ७३० ते ७५९ पर्यंत) सत्तेवर होता. चोलवंश काळात चार वर्ण होते. दारु प्रथा होती. सजातीय विवाह प्रथा होती. माळव्यातील परमार राजवंशाची धारा नगरीत सियक दुसऱ्याने संस्थापना केली होती.

कन्नोजला हरिश्चंद्राने सूर्यवंशी प्रतिहार राजवंश संस्थापिला होता. तसेच, तंजौरला विजयालयाने चोल वंश संस्थापिला. 'चोल शासक आपली उत्पत्ति सूर्यापासून व पल्लव शासक ब्रह्मापासून मानीत असत. (यूथ. कॉ. टा. पृष्ठ १०० व १२० पहा). मूलराज प्रथमने गुजराथचा चालुक्य वंश अनिलवाडला संस्थापिला. हे राजपूत वंशीय होते.

इ.सन १२९४ मध्ये देवगिरीच्या रामचंद्र देवाचा अल्लाउद्दीनाने पराभव करून त्याचे मुलीशी लग्न केले.

सिकंदर लोदीने (इ.सन १४८९ ते १५१७) मथुरा येथे हिंदूना यमुना नदीत स्नान करणे व क्षौर कर्म करण्यास बंदी केली होती. (यु.कॉ.टा., पृष्ठ १४३ पहा + पृष्ठ १५६ पहा). सुलतान अहमदशहाने इ.सन १४१२ साली अहमदबाद नगरची स्थापना केली. (यु.कॉ.टा., पृष्ठ १५६ पहा.)

इ.सन पूर्व १७० ते १५० या काळात सुमती भार्गवने मनुस्मृती लिहीली, व पुष्पमित्राने ती बौद्धसंस्कृती विरुद्ध राज्यात रूढ केली. तत्पूर्वी मानवधर्म सूत्र, मानव अर्थशास्त्र किंवा मानव राज्यशास्त्र किंवा राजधर्म व मानव गृह्य सूत्र हे ग्रंथ होते. (ब्राह्मणशाहीचा विजय, ले.- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दळवीकृत अनुवाद, पृष्ठ ७ पहा). त्या राज्यात वर्ण कठोर होऊन जाती स्वरूपात बदलले. जन्माधार ठरला. जातीबाहेर विवाह स्वातंत्र्य व व्यवसाय स्वातंत्र्य बंद केले. (यु.कॉ.टा., पृष्ठ ७० पहा). **मौर्यकाळात लोकभाषा पाली होती** व मुख्य धर्म वैदिक, बौद्ध व जैन धर्म होते. (यु.कॉ.टा., पृष्ठ ७३ पहा).

श्री. आनंदकुमार महाजन, आपल्या 'यूथ कॉम्पिटिशन टाईम्स', ह्या प्रसिद्ध इतिहासात पृष्ठ ७६ वर लिहितात की, "सिथियन शक सामोतिक यांने उज्जैन व काठियावाडमध्ये चष्टन वंशाची संस्थापना केली. या क्षत्रियवंशीय चष्टन सिथियन शकाने ७८ इसवी. चा शक चालविला होता. या वंशात जयदामन, रुद्रदामन (इ.सन १३० ते इ.सन १५०) हे पश्चिम भारताचे राजे झाले. रुद्रदामन वैदिक धर्मानुयायी असून त्याने संस्कृतला प्रोत्साहन दिले होते. रुद्रदामनानंतर दामधसद, जीवदामन, रुद्रसेन, सिंहदामन आदि शक राजे झाले. "महाभारताच्या कथनानुसार शक जाती प्रारंभी क्षत्रिय होती." (पृष्ठ ७७). इ.सवी सनापूर्वी पहिल्या शतकात उत्तर-पश्चिम भारतात युनानी साम्राज्याचा

अंत होऊन त्या जागी शक नावाची एका विदेशी जातीने राज्य स्थापन केले. या शकांनी इ.सनाचे तिसरे शतकापर्यंत येथे राज्य केले. या शकांचा पहिला शासक माऊस अथवा मोग याने गांधारमध्ये इ.सन पूर्व १८० मध्ये राज्य स्थापन केले. चष्टन इ.सन १३० मध्ये राज्य करीत होता.

विमकैडफिसेस हा कुजूल कडफिसेसचा पुत्र होता. याने सर्वप्रथम भारतात कुषाण राज्य स्थापन केले. तो इ.सन ६५ ते ७८ पर्यंत राज्यारूढ होता, पण त्यानंतर **शकसंवत ७८ इ. मध्ये कनिष्काने राज्यारोहण केले. हा बौद्धधर्मीय होता.** त्याची राजधानी पुरुषपूर होती. इ.सन १०० मध्ये तो मृत्यू पावला. त्याचेनंतर वसिष्ठ, हुविष्क, कनिष्क द्वितीय, व शेवटी सम्राट वासुदेव याने राज्य केले.

यमुनेच्या पश्चिमेस रहाणारे यौधेय जातीने या कुषाण साम्राज्याचा अंत करून सतलजपर्यंत राज्य स्थापले.

'यूथ कॉंपिटिशन टाईम्स' पृष्ठ ८३ वर आनंद कुमार महाजन यांच्या इतिहास लेखनानुसार प्राचीन भारतीय इतिहासच्या प्रमुख तिथीया :-

इ.सन पूर्व कालीन तिथी :-

२५०० ते १५०० सैंधव सभ्यता व हडप्पा सभ्यता.

१५०० ते ६०० वैदिक काल

१५०० भारतात आर्यांचा प्रवेश काल

१५०० ते १००० ऋग्वेदिक काल

१००० ते ६०० उत्तर वैदिक काल

९०० (लगभग) महाभारत युद्ध

८०० (लगभग) लोहे का प्रयोग

६०० (लगभग) उपनिषध संकलन काल

५१९ (लगभग) इराणी सम्राट सायरसचे भारताचे काही भूभागावर स्वामित्व होते.

५६३ ते ४८३ (लगभग) शाक्य मुनि गौतम बुद्ध

५४० ते ४६८ (लगभग) वर्धमान महावीर स्वामी

४८३ प्रथम बौद्ध संगिती

५४४ ते ४१२ हर्यक वंश

४१२ ते ३४४ शिशुनाग वंश

३८३ द्वितीय बौद्ध संगिती

३६२ महापद्मनंदद्वारा मगधमध्ये नंदवंश राज्य स्थापना

३२७ ते २५ भारतावर सिकंदराचे आक्रमण

३२३ चंद्रगुप्तद्वारा मगधमध्ये नंदवंश स्थापना

३०५ सेल्युकस निकेटराचे भारतीय अभियान

२७३ ते २३२ अशोकाचा शासनकाल

२५० तृतीय बौद्ध संगिती

१८५ (लगभग) मौर्यवंशाचे पतन व पुष्यमित्र शृंगाद्वारा शृंगवंश मगधमध्ये स्थापन झाला.

९० (लगभग) शकांचे उत्तर-पश्चिम भारतावर आक्रमण

७८ (लगभग) लेवा लोक पंजाब सोडून इतरत्र विखुरले. (कु. क्ष. पा. इ. पृष्ठ ४५ पहा)

७१ (लगभग) शुंग वंशाचा अंत

६० (लगभग) सात वाहन वंश स्थापना

५८ इ.सन पूर्व विक्रम संवताचा आरंभ

अशा प्रकारची सनावळी इ.सवी सन पूर्वची यु.कॉ.टा., पृष्ठ ८३ वर आनंद कुमार महाजनांच्या

मते दिली आहे.

मराठी भाषिक लेवा पाटीदार कुणबी क्षत्रिय जातीचा पूर्वेतिहास उत्तर व पश्चिम भारताशी संबंधित आहे. त्याचे रक्तवंशाचे, धर्मविचारांचे, राजकीय जीवनाचे, सामाजिक परिस्थितीचे, भाषिक बदलाचे लागेबांधे उत्तर व पश्चिम भारताच्या पूर्वेतिहासाशी संबंधित असल्यामुळे थोडे विषयांतर झाले तरी, पूर्व माहितीचे संशोधन व आकलन व्हावे म्हणून सविस्तर वर्णन इच्छा नसूनही नाईलाजाने करावे लागत आहे. त्यामुळे काहीवेळा मूळ विषयावरून लक्ष विचलित होत असले तरी, विषय पूर्ण आकलन होण्यास गतिमानता यावी या उद्देशाने हे विस्तृत वर्णन थोडे विषयांतर पत्करून करावे लागत आहे, याबद्दल दिलगिरी व्यक्त करून वाचकांची क्षमा मागतो.

प्रकरण १५

मनस्मृती-काल ते आजपर्यंत

Circa 194 to 185 B.C. पहिल्या शातकर्णी राजाने पश्चिम माळवा जिंकला. (जळगाव जिल्हा गॅझेटियर, पृष्ठ ४५). इ.सन १०६ ते १९० गौतम पुत्र शातकर्णीचे जळगाव जिल्ह्यावर राज्य होते. (ज.जि.गॅझेट, पृष्ठ ४५). इ.सन. २५० पर्यंत सातवाहन घराणे जळगाव जिल्ह्यावर राज्य करीत होते. **इ.सन पूर्व ७८ चे सुमारास लेवा पाटीदार लोकांचे पूर्वज कनिष्काचे कारकिर्दीत पंजाबातील गुजराथ शहरालगतच्या करड व लेया भागातील गुर्जर व कुर्मी लोक गुजराथच्या आनर्त प्रदेशात येऊन राहिले असा बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम १ चा आधार देऊन श्री. दे.स.बऱ्हाटे पाडळशेकरांनी आपल्या 'अशी संस्कृती - असा समाज' - या लेखात लेवा एज्युकेशन युनियनच्या सुवर्णमहोत्सवी स्मृतिपुष्प १९६८, पृष्ठ ३७ वरील लेखात म्हटले आहे.**

तसेच, इ.सन १४४ मध्ये पंजाबातून लेवा पाटीदारांचा लव वंशातील कनकसेन गुजराथेत येऊनप त्याने तेथे वसाहत सन १४४ मध्ये स्थापन केली. व सौराष्ट्रात ह्या कनकसेनाने वल्लभीपूर (विजयपूर) वसविले. व तिथे राज्य स्थापन केले. (पृष्ठ २०, पाटीदारोंका इतिहास, लेखक केशवलाल पटेल व पृष्ठ ६८२, 'उदय पुरोदय' लेखक- भारतेंदु हरिश्चंद्र). असे आपले लेवा परिवार, वर्ष१, अंक २ एप्रिल मे जून १९९४ च्या, त्रैमासिक अंकात, पृष्ठ ५ वरील 'चतुवर्णात पाटीदार वर्गाचे स्थान' या लेखात श्री. वासुदेवराव पाटील इंदूरकर लिहितात.

सेल्यूकस निकेटरचा मगधापती चंद्रगुप्ताने पराभव केला, तेव्हा सेल्यूकसने इ.सन पूर्व ३०६ ते २९८ मध्ये आपली मुलगी चंद्रगुप्ताला देऊन तह केला. त्या वेळी चंद्रगुप्ताच्या सैन्यात भरती होण्यासाठी पंजाबातील कुर्मी बहादूर मगध देशाची राजधानी कुशावतीस सैन्य भरतीत प्रवेशिले. पुढे **इ.सन पूर्व ७५ मध्ये शकांचे पंजाब-सिंध, माळवा व गुजराथपर्यंत आक्रमण झाले.** शकात कनिष्क फार शूर होता. इ.सन पूर्व १८४ मध्ये बृहद्रथ मौर्याचा सेनापती पुष्यमित्र शृंगाने कपटाने बृहद्रथाचा खून करून शृंग वंशाचे राज्य संस्थापिले. (यु.कॉ.टा., पृष्ठ ६८ पहा). या वेळी कुलीन परिवारात बहुविवाह प्रथा होती. समाजात आंतरजातीय विवाह होत असत (यूथ कॉ.टा., पृष्ठ ७१).

इ.सन पूर्व १४८ पुष्यमित्राचा मृत्यू झाला व इ.सन पूर्व ७२ मध्ये कण्ववंशाची स्थापना झाली. इ.सन पूर्व ५७ मध्ये विक्रम संवत सुरू झाला. इ.सन पूर्व २७ मध्ये सातवाहन वंशाची स्थापना. **इ.सन ७८ मध्ये शक संवत, कनिष्क सिंहासनारूढ,** कनिष्ककाळात ४ थी बौद्ध संगिती झाली.

इ.सन १२५ कनिष्काचा मृत्यू. इ.सन १३० गौतमीपुत्र शातकर्णीचा मृत्यू. इ.सन ६४७ हर्षाचा मृत्यू.

सिथियन शकांच्या चष्टन वंशात सामोतिक चष्टनवंशी शक राजाने उज्जैनी व काठेवाडात क्षत्रियांची सत्ता आणली. चष्टनने इ.सन ७८ चा शक संवत चालविला. कनिष्काचे राज्यारोहण. हा कुषाण वंशीय होता. त्याने बौद्ध धर्म स्वीकारला होता. मौर्य कालात कुलीन परिवारात बहुविवाह प्रथा होती, समाजात अंर्तर्जातीय विवाहाचे प्रचलन होते. नियोग प्रथाचेही मौर्यकाळात प्रचलन होते. जनभाषा पाली होती.

कनिष्क काळात इ.सन पूर्व ७८ चे सुमारास पंजाबातील गुजराथ परिसरातून बरेच गुर्जर व कुर्मी मथुरामार्गे आनर्तदेशात (गुजराथेत उर्फ सौराष्ट्रात) गेले. दुसरी टोळी पंजाबातून कोटा व मंदसोरमार्गे माळव्यात गेली. या वेळी पंजाबातील करड जिल्ह्यातून आलेले करडवा कुर्मी व लेयाँ जिल्ह्यातून आलेले लेयाँ कूर्मी त्या नावाने पुढे आलेत. गंगायमुना-दोआब, उत्तर हिंदुस्थान, मध्य हिंदुस्थान, मध्यभारत, खानदेश तथा दक्षिणेत वसाहत केली. त्यांचे वंशज अद्याप लेवा करड ही नावे धारण करतात. तथा आपले मूल स्थान पंजाबातील लेयाँ (लेवा) नावाने ते मशहूर आहे. (बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम नं.१ व कु.क्ष. पाटीदारांचा इतिहास, पृष्ठ ४५ वर, डॉ.मं.रा. पटेल लिहितात).

इ.सन पूर्व तिसऱ्या शतकाचे शेवटी पंजाबात मगध प्रांताची राजधानी. कुशावतीस काही काळ राहिले. (कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, पृष्ठ ४७ पहा). नंतर इ.सनाचे पहिले शतकाचे शेवटी ते माळव्याहून माधावतीस गेले व माधावतीस त्यांनी कूर्मी राज्य संस्थापिले. (कु.क्ष.पाटीदारोंका इतिहास, पृष्ठ ४७ व १८९ पहा.) नंतर मगध देशाच्या क्षत्रियांनी इ.सनाचे पहिल्या शतकात माळवा जिंकला. चष्टन वंशाच्या सामोतिक नंतर त्याचा पुत्र जयदामन राजा झाला. त्याने इ.सन १४० मध्ये सौराष्ट्रात येऊन गिरीनगर (गीरीनार) येथे राज्य स्थापले. क्षत्रिय राजा जयदामाचे काळात माधावतीचे कुर्मी राजे वज्रपालचा पराभव झाल्याने माधावती सोडून तो सिद्धपूरला आला. मातृश्राद्ध केले व इ.सन १५६ (संवत २१२) मध्ये उंझा ग्राम वसवून उमादेवीची संस्थापना केली. तिथे चवथ्या शतकापर्यंत क्षत्रियांचे राज्य होते. नंतर ४१० ते ४७० गुप्तकालीन राजे, सन ५०९ ते ७०० पर्यंत सौराष्ट्रावर वल्लभी राजे वल्लभपूरीमध्ये नांदलेत. याच भडोच, नांदोद, नवसारी येथे चालुक्य व गुर्जरांची लहान-लहान राज्ये होती. तिथे उपसर्ग झाल्याने तेथील कुर्मी लोक इ.सन ५५६ मध्ये भिल्लनगर आशावल्लीस गेले, व काही कूर्मी संवत ८०२ मध्ये (इ.सन ६४६) ईडरकडे गेले तेथे जामळा गावी वस्ती कली.

इ.सन. १०६४ मध्ये करण राजा झाला, त्याने सहा लाख भिल्लांचे (आशा भिल्ल या) सरदाराचा पराभव करून वध केला. सोळंकी वंशानंतर गुजराथवर वाघेलवंश राज्यारूढ झाला. वाघेला वंशाच्या शेवटचा राजा करण अत्याचारी होता. त्याने आपला प्रधान मंत्री माधवचे पत्नीचे हरण केले. त्याचा सूड म्हणून माधवने दिल्लीपती अल्लाउद्दीनास फितुरीने राज्य देऊन करणची पत्नी व कन्याचे अल्लाउद्दीनास हरण करायला लावले. अल्लाउद्दीनाने अनहिलपूरच्या राजपूत नगरीतच तळ ठोकला. त्याच्या त्रासाने कूर्मी लोक साबरमतीतिरी, भाल प्रदेशात, चरोतर व कानम प्रदेशात स्थानांतरीत झाले, व तेथील चापानेर या राजपूत राज्यात वस्ती केली. तिथे त्यामुळे चापानेरचे वैभव दुणावले.

इ.सन १३४७ मध्ये महंमद तुघलग गुजराथेत आला होता. इ.सन १४१२ ते १४ अनहिलपूरावर सुभेदार महंमदशहाचा हल्ला झाला, व तिथे मुस्लीम राजधानी झाली. म्हणून काही लोक चापानेरला गेले, पण तेथेही इ.सन १४८३ मध्ये महंमद बेगडाने स्वारी केली म्हणून तेथील कूर्मी लोक बडोदा व अहमदाबादला वस्तीस गेले. चापानेरच्या लढाईत महंमद बेगडाने कुणबी पाटीदारांचा पुढारी

वैरीसिंह याला पकडून महंमदाबादला कैदेत ठेवले. इ.सन १४७४ मध्ये वैरीसिंह या कुणबी पाटीदाराने अहमदाबादचे सुलतानाचे वतीने महंमद बेगडाचे राज्यावर स्वारी केली होती म्हणून इ.सन १४८२ मध्ये महंमदबादहून मोठे सैन्य घेऊन चापानेरवर महंमद बेगडाने हल्ला केला. ता. १७ मार्च १४८३ ला महंमद बेगडाचे सैन्य पावागडचे तळाशी पायथ्याशी आले. वीस महिने लढाई चालली. शेवटी पावागड किल्ल्याला वेढा पडला. पुढे हलोलजवळ मोठी लढाई झाली, व पुन्हा २८ एप्रिल १४८३ मध्ये परत किल्ल्याला वेढा दिला. त्यात पताई रावळाशी संगनमत करून त्याचा साला सियाजी बाकलीयाचे अन्न-भांडार सेनापती वैरीसिंह या कुणबी नेत्याने जप्त करून सैन्यास वाचविले. म्हणून सियाजी बाकलियाने फित्तूर होऊन सैनापती वैरीसिंहास महंमद बेगडाच्या जाळ्यात अडकविले, व किल्ल्याची गुप्तदारे उघडून शत्रूस पावागड किल्ल्यात घेतले. म्हणून **संवत १५४१ (इ.सन १४८४) साली पौष महिन्याचे तृतीयेस रविवारी एका लष्करानिशी पावागड जिंकून किल्लेदार पताई रावळ मारला गेला, व सेनापती वैरीसिंह सेजवाल भंडारी, सोळंकी राजपूत व खान कुरेशी पकडले गेले. त्यांना महेम्मदाबादला चीनाखान्याजवळ सन १४८४ साली कैदेत ठेवले.**

पुढे मातारिआ राव या राजपूत राजाला धर्मभ्रष्ट करून महंम्मद बेगडाने कैद केले. म्हणून मातारीआ रावच्या मेहुण्याने म्हणजे विरमगावच्या विरमदेव झाला डाकूने महंमद बेगडाच्या पत्नीचे अपहरण केले, तेव्हा आपला कुणबीयांचा अग्रणी राय वैरीसिंह या सेनापतीस कैदेतून मुक्त केले. व त्याचे मदतीने विरमदेवाचा पराभव केला, व वैरीसिंहास तेव्हापासून जहागीर दिले.

महंमद बेगडाच्या चापानेरमधील स्वारीमुळे बरेच कुणबी लोक अहमदाबादला आले. असा इस्लामांचा सतत त्रास झाल्यामुळे सन १४८७ साली लेवा कुणबी पाटीदारांनी पावागड परिसरातून स्थलांतर करीत-करीत ते तापी तीराने खानदेशात आले.

इ.सन १३५१ साली हसन गंगू ब्राह्मणी घराण्याने दिल्ली राज्यातून बंड करून सन १३५१ मध्ये स्वतंत्र बहामनी राज्य पूर्णेच्या दक्षिणेस स्थापन केले. (जळगाव गॅझेटियर, पृष्ठ ५० वरून) आणि लेवा भाटाचे दप्तरानुसार जगदीश पाटीलादी लेवा पाटीदार सन १३५१ मध्ये गुजराथेतून येऊन पूर्णेच्या दक्षिणेस स्थायिक झाले. काहींच्या मते सन १३९७ ते १४०९ पर्यंत मलिक नासेरच्या फारुकी काळात दुर्गादेवीचा दुष्काळ पडला. (जळगाव जिल्हा गॅझेटियर, ५२/५४ पहा). उत्तर बहामनी राज्याचा राजा अल्लाउद्दीन अहमद स्वपत्नीकडे दुर्लक्ष करून एका हिंदू युवतीच्या प्रेमात पडला म्हणून त्याचा मामा नासेरखानने विदर्भावर स्वारी केली. त्यात त्याचा रोहिणखेड येथे पराभव झाला, व तो ता. २०.१०.१४३७ मध्ये मरण पावला.

इ.सन. १८४४ च्या ग्वाल्हेरच्या तहाने एप्रिल १८४४ मध्ये यावल, चोपडा, पाचोरा व लोहारे ब्रिटीशांना मिळाले. इ.सन १८६१ च्या तहाने शिंद्यांनी वरणगाव लगतचा प्रदेश ब्रिटीशांना दिला. (जळगाव गॅझेट, पृष्ठ ८१६ पहा). इ.सन १८६० मध्ये जळगाव, खानदेशात रेल्वे लाईन आली. (जळगाव गॅझेट, पृष्ठ ७८९). इ.सन १९३६ डिसेंबर मध्ये अखिल भारतीय काँग्रेसचे ५० वे अधिवेशन फैजपूरला झाले. इ.सन १९०९ मध्ये खानदेश जिल्हा पूर्व व पश्चिम खानदेशात विभागला गेला. (जळगाव गॅझेटियर, पृष्ठ ४३ वरून) व सन १९६० साली त्याला जळगाव व धुळे ही नावे मिळाली. इ.सन १८६७ मध्ये बुलढाणा जिल्हा स्थळ म्हणून निवडले गेले. (बुलढाणा जिल्हा गॅझेट प्रस्तापना) व सन १९०५ अकोला जिल्हयातील खामगाव व जळगाव तहशीली बुलढाणा जिल्हयात सामील केल्यात. (बुलढाणा जिल्हा गॅझेटियर प्रस्तावना पहा.) व सन १९०३ मध्ये निजामाकडून भारत शासनाने विदर्भ ताब्यात घेतला व मध्यप्रदेशास जोडला. (बुलढाणा जिल्हा गॅझेटियर, प्रस्तावना). इ.सन. १८७० मध्ये सर.ए.सी.आय. यॉल कमिशनर ऑफ ओल्ड बेरार यांनी पश्चिम विदर्भ गॅझेट संपादित केले आहे. (बु.जि. गॅझेट, प्रस्तावना). इ.सन १९१० श्री. अ.ए.नेलसन आय.सी.एस.

यांनी बुलढाणा जिल्हा गॅझेट संपादित केले. व मि. E.V. Kitts Census Report of 1881 मध्ये जात व धर्माची विदर्भात शिरगणती केली आहे. (बु.जि.गॅ., प्रस्तावना). इ.सन १८६४ मध्ये लेवा पाटीदार वस्तीचा मलकापूर तालुका व दुसरे चिखली व मेहेकर यांचा वायव्य जिल्हा व कचेरी जानेफळ केली. इ.सन १८६५ मध्ये ह्या जिल्हयास मेहेकर जिल्हा असे नाव दिले, इ.सन १८६७ मध्ये बुलढाणा जिल्हा असे नाव दिले. म्हणून त्या त्या गॅझेटियरमध्ये त्या त्या काळातील लेवा पाटीदारांचा इतिहास मिळू शकेल यासाठी एवढा लेखन प्रपंच वाढविला.

इ.सन १९५० मध्ये महाराष्ट्र स्टेट कॉर्पोरेशन स्थापन झाले. (महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ स्थापन झाले). इ.सन १९५२ मध्ये जळगाव जिल्हयात एस.टी. बसेस सुरू झाल्या. इ.सन १९०६ मध्ये जळगाव जिल्हा झाला. इ.सन १९८६ चे मार्चमध्ये कलीयुगाचे ५०८७ वे वर्ष चालू आहे. (महाभारत युद्ध कालनिर्णय समस्या, ले.- श्रीराम साठे, पृष्ठ २). कलियुगापूर्वी ३६ व्या वर्षी महाभारत युद्ध झाले. इ.सनापूर्वी ३१०२ वर्षापूर्वी कलीयुगारंभ झाला. (श्री.साठे, पृष्ठ ८). इ.सन पूर्व ३१३८ हा महाभारत युद्धकाल श्री. साठ्यांचे मते ठरतो (पृष्ठ ८) व इ.सन पूर्व १५०० मध्ये आर्यांचे भारतात आगमन (म.का.नि., पृष्ठ २९).

इ.सन पूर्व १२०० वेद काळ. इ.सन पूर्व १५०० च्या सुमारास हिंदू धर्म संस्थापना. (दास्ताने महाराष्ट्र, पृष्ठ ४२). **इ.सन १८२१ पुण्यास पहिले संस्कृत महाविद्यालय निघाले. (महा. दास्ताने, पृेठ ४७). इ.सन १८५१ म. ज्योतिबा फुल्यांनी सर्व वर्णासाठी पहिली शाळा काढली. (महा. दास्ताने, पृष्ठ ४७).** इ.सन १८५७ भारतात पहिले विद्यापीठ मुंबईस सुरू झाले. इ.सन १२६४ महानुभाव पंथाची स्थापना झाली. इ.सन १२७२ (शके ११९४ माघ कृष्ण ४ मध्ये काही ब्राह्मणांनी चक्रधराचा खून केला. ता. ३ जून १८०३ ला भुसावळजवळ बोदवडला शिंदे व भोसल्यांच्या भेटी झाल्या. ता. ६-६-१८१८ला बाजीराव पेशवे हरल्यावर विदर्भ इंग्रजांकडून निजामाकडे आला. **इ.सन १८३७ दाताळ्याचे लढाईस सुरुवात झाली, व सन १८४८ मध्ये दाताळ्याचे लालसिंहाने ३००० हिंदु व ५०० शिखांचे मदतीने मलकापूर लुटले.** इ.सन १८६७ ते १९५६ पर्यंत बुलढाणा जिल्हा मध्यप्रदेशात होता. इ.सन १९५६ मध्ये तो द्विभाषिक मुंबई राज्यास जोडला. व इ.सन १९६० मध्ये महाराष्ट्रास जोडला. (बुलढाणा जिल्हा गॅझेटियर, पृष्ठ १८१). **व सन १९६३ जानेवारीपासून पाटील वतने बंद झालीत. (बु.जि.गॅ., पृष्ठ ९८ वरून).**

वेदपूर्व काळात भारताचे क्षेत्रफळ इराण ते हिमालय हे होते. त्या काळात वर्णभेद व जातीभेद मुळीच नव्हते.

"क्षत्रिय कुलोत्पन्न जैनधर्म संस्थापक भगवान महावीर तथा बौद्धधर्म संस्थापक भगवान गौतमबुद्ध या दोघांनी ब्राह्मणांचे प्रभूत्वाला विरोध केला. (यु.कॉ.टा., संपादक- महाजन, पृष्ठ ४० पहा).

फिरोज तुघलगने ख्वाजा जहा जो वाटून ब्राह्मणांचा मुसलमान झाला होता त्याला प्रथा नसून प्रथमच आपला प्रधानमंत्री बनविले. (पृष्ठ १५८)

विजयानगरचे राज्यवंशी संगम घराणे राज्यारूढ असताना भूस्वामी एवं **पाटीदारच्या मधील** हिश्शेदारीस वारीय व्यवस्था म्हणत (पृष्ठ १६९). पट्टेदार किसान जमीनदारांना (**भूमीस्वामियांना**) उत्पादनातून ५० ते ७५ टक्के कर देत असत.

इ.सनाच्या ५ व्या शतकात भूदान-प्रथा तेजीत होती. सहाव्या शतकात भूमी वेतनाच्या रूपात देऊ लागले. असा भूमिस्वामीवर्ग उगवला. (यु.कॉ.टा., पृष्ठ ९८)

इ.सन १३४७ मध्ये दक्षिण भारतात बहामनी राज्य स्थापन झाले. त्याचे कालांतराने ५ विभाग पडले. त्यापैकी विदर्भाची इमादशाही इ.सन १४८४ ते १५२७ मध्ये होती. आणि काही विद्वानांच्या

८ : विकास

झाले शिक्षक कारकून पदवीधारी तसे जाहले
विद्यार्थी वसती-गृहास जन हे संस्थापिते जाहले
झाले डॉक्टर, डॉक्टरेट पदवीधारी तसे लाभले
आलेही करुनी विदेशगमना विद्यार्जनार्थी भले
झाले लेखक, पत्रकार, कविही, आचार्य, प्राचार्यही
झाले शिक्षणमंत्रि नी कुलगुरु खास्दार आम्दारही
न्यायाधीश वकील नोकर तसे खात्यात सर्वातही
विद्या ही विविध धरूनि हृदयी, उत्कर्ष केला तिही
नी उत्पादन वाढ साधुनि कृषिक्रांतीही केली नवी
झाले बुद्धिजिवी तसे श्रमजिवी, उत्क्रांन्ति आता हवी

९ : भाषी आशा

कोणाच्या न करू चुकूनही कधी द्वेषास आम्ही जगी
आम्हा स्वोन्नति पाहिजे तदितरा आशा नको वाउगी
व्यक्तीची करू उन्नती सहज ती होईल कौंटुबिक
ज्ञातीची प्रगती घडेल सहजी लाभेल सारे सुख
सर्व ज्ञाती तशा करोत प्रगती होवोनिया उन्मुख
आत्मोध्दारचि हा सुराष्ट्र घडवो होवोनिया व्यापक
हो॑वो भारति ज्ञाति ऐक्य, विलसो एकात्मताही; तसा -
सेवो वाचक भृंगवृंद स्मृति-पुष्पातेहि सत्सारसा.

श्री.दे.स. बऱ्हाटे यांनी लेवा पाटीदारांचा गुजराथ सोडतानाचा इतिहास पद्यरूपात दिला आहे. त्याचे परीक्षण करताना काही शंका वाचकांना येतील उदा.- महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, जळगाव जिल्हा, मराठी आवृत्ती (सुधारित), सन १९९४, संपादक- डॉ. कि.का. चौधरी यांच्या लेवा पाटीदार या शीर्षकाखाली पृष्ठ १८३ ओळ ९ मध्ये "भाटांच्या नोंदीवरून दिसून येते की लेवा पाटीदार खानदेशात संवत ११०० च्या सुमारास (म्हणजे इ.सन १०४४ च्या सुमारास गुजराथमधून स्थलांतरीत झालेत).

येथे श्री. बऱ्हाटे यांचे स्मृतिचित्र २ पावानो प्रलय यातील ओळ ८ वी ह्यात विसंगती दिसते.

तसेच, श्री. बऱ्हाटे यांचे स्मृतिचित्र ५ वे 'निर्वासितांचे पुनर्वसन' ओळ तिसरी मध्ये दिल्लीस त्या वेळी अकबर बादशहा होता. त्याने १६०० मध्ये खानदेश जिंकला व त्यांना इनामे दिली असे म्हटले आहे. म्हणजे इ.सन १४८७ पासून ११३ वर्षांनी ह्या निर्वासितांना अकबराने वचने देऊन पुनर्वसन केल्याचे म्हटले आहे, पण तोपर्यंत त्यांचे ११३ वर्षे निर्वासित जीवनच होते काय ? अशी शंका येते.

तसेच, महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, जळगाव, जिल्हा गॅझेटियर, संपादक डॉ. कि.का चौधरी,सन १९९४ मराठी आवृत्ती, पृष्ठ १८६ वर गुजर या शीर्षकाखाली लिहिले आहे की, जळगाव जिल्हयातील गुजर शेती व्यवसायामुळे कुणब्यांचीच पोटशाखा मानली जाते. इ.सन. १९३१ च्या जन्मगणनेनुसार लेवा किंवा रेवा कुणब्यांची संख्या ८२७१४ होती. त्यात प्रामुख्याने लेवा पाटीदार आणि लेवा गुजरांचा समावेश होता. गुर्जर ही पशुपालक जात असून पंजाब, हिमाचल प्रदेश, बुंदेलखंड, राजस्थान, गुजराथ, उत्तरप्रदेश व काश्मिरमध्ये यांची वस्ती आहे. पंजाब व काश्मिरात बाटलेले सुन्नी मुसलमानही पूर्वी गुजर होते.

सन १९१८ मध्ये प्रकाशित झालेल्या लेवा पुराणात त्यांचे मूळ गोत्र काश्यप आहे. मथुरेच्या पश्चिमेकडे लेहकपूर नामक गाव असून तेथे लेवा वंशाची वसाहत होती. विक्रम संवतच्या सुमारे दोनशे वर्षांपूर्वी सिकंदराने पंजाबवर स्वारी केली, तेव्हा तेथील राजाच्या मदतीकरिता गेलेल्या मथुरेच्या सैन्यात लेहकपुरातील लेवावंशी सैनिकही होते. गुजराथमध्ये अजय नामक राजाने लेवा वंश वसविला. चिनी प्रवासी युआन च्यांग हा इ.सन ६४० मध्ये लिहितो की,- गुजराथमध्ये वृध्नगर या सुंदर भागात लेवा व कडबा लोकांची सुखी वस्ती होती. लेवा शाखेतून लेवा गुजर व लेवा पाटीदार (कणबी) आणि कडबा शाखेतून कडवा गुजर व कडवा पाटीदार (कणबी) अशा उपशाखा निर्माण झाल्या असाव्यात (पृष्ठ १८७ जळगाव जिल्हा गॅझेटिअर पहा).

लेवा गुजरांचे आस्थलांतर अकराव्या शतकातील असावे. चोपड्याचे भाटाचे नोंदीनुसार गुजर नंदूरबार मार्गे संवत १२३४ च्या सुमारास खानदेशात आले... इ.सन १२१९ मध्ये जामनेरच्या देशमुखीचे गवळ्याकडून लेवा गुजराकडे हस्तांतर झाले होते. असा खानदेश गॅझेटियर, सन १९८०, पृष्ठ ६३ चा आधार देऊन डॉ. चौधरी, जळगाव जिल्हा, गॅझेटियर सन १९९४, मराठी प्रतीच्या, पृष्ठ १८७ वर लिहितात.

यावनी आक्रमणामुळे म्हणा किंवा दुष्काळामुळे म्हणा गुजराथेतून तेथील जातींचे स्थलांतर साधारणत: एकाच वर्षी झाले असावे. कारण, एका जातीसाठी दुष्काळ एका वर्षी व दुसऱ्या जातीसाठी दुष्काळ दुसऱ्या वर्षी असल्याचे कुठेही आढळत नाही. तसेच, सहसा यावनी परचक्र हे सर्व मुस्लीमेतर जातीला उपद्रव कारी होते. एका ठराविक जातीलाच जाच नव्हता. म्हणून गुजराथेतील यावनी उपद्रवामुळे लेवा पाटीदारादी सर्व हिंदू जाती साधारणत: एकाच वेळी स्थलांतरीत होऊन निर्वासित बनल्या असाव्यात. त्या दृष्टीने हे स्थलांतर अनेकदा झाले असावे. कारण, जळगाव जिल्हा गॅझेटियर, पृष्ठ १८७ नुसार हे अकराव्या शतकात दिले. तर त्याच पृष्ठावर भाटाच्या नोंदीनुसार गुजर नंदुरबार मार्गे १२३४ च्या सुमारास खानदेशात आले (पृष्ठ १८७ पहा). पृष्ठ १८३ वर डॉ. चौधरी लिहितात की लेवा पाटीदार खानदेशात संवत ११०० च्या सुमारास गुजराथमधून स्थलांतरीत झाले. भाटांच्याच मुलाखतीनुसार खानदेशात व गुजराथेत येण्यापूर्वी पाटीदार राजस्थानात होते. राजस्थानातील स्थानिक राजपूत टोळ्यांनी त्यांना हुसकावून लावल्यामुळे ते चितोडगड, मल्हारगड, काठेवाडमार्गे गुजराथेत आले व रेवा नदीकाठी स्थायिक झाले. रेवा नदीकाठी स्थायिक झालेल्यांना रेवा व अपभ्रंशाने लेवा पाटीदार नाव प्राप्त झाले. गुजराथेतील लेवा कणबी उत्तरेकडील गुजर वंशाचे आहेत असे बुलढाणा गॅझेटियर, १९१० पृष्ठ १२५ चा आधार देऊन येथे डॉ. चौधरी लिहितात. येथे एक शंका अशी येते की राजपूत युग हर्षानंतर येते व पाटीदार हर्षापूर्वी कैक शतके गुजराथेत आले. मग रजपूतजातीचे निर्मितेचे अगोदर त्यांनी गुजराथेतील पाटीदारांच्या पूर्वजांना राजस्थानातून कसे हाकलून दिले असो. **माझ्या मते अनेकवेळा अनेक टोळ्या आल्याचे मानल्यास याचे उत्तर मिळते.**

डॉ. मंगुभाई रामदास पटेल, रीडर गुजराथ विद्यापीठ, अहमदाबाद, गुजराथ यांनी संशोधनपूर्वक लिहिलेला 'कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास' ग्रंथ जयंतीभाई पटेल, पाटीदार संशोधन और प्रकाशन ट्रस्ट, गज्जरका बंगला, आस्टोडिया रोड, अहमदाबाद ३८०००१ (गुजराथ) यांनी सन १९९१ साली ४४८ पृष्ठांची पहिली आवृत्ती रूपाने प्रकाशित केला.

१. डॉ. मंगुभाई रामदास पटेल, ६, अरुणोदय पार्क, सेंट झेवियर्स कॉलेज कॉर्नर, नवरंगपुरा अहमदाबाद, ३८०००१, टेलिफोन नं. ४४०२३८, भूतपूर्व सहसचिव, अखिल भारतीय पाटीदार संशोधन और प्रकाशन ट्रस्ट, सचिव, भारतीय पाटीदार समाज संघटन, २. मणिभाई आई पटेल (मम्मी) कल्याणपरा, उंझा (उ.गुजराथ), मंत्री पाटीदार समाज संघटन, ३. जयंतिभाई पटेल, पाटीदार

संशोधन और प्रकाशन ट्रस्ट, गज्जर का बंगला, आस्टोडिया रोड, अहमदाबाद, ३८०००९ (गुजराथ), संपादक, उमियादर्शन (मासिक), अहमदाबाद, ४. केशवलाल वि. पटेल,अध्यक्ष, श्री उमिया माताजी संस्थान, उंझा (उत्तर गुजराथ) एवं अध्यक्ष, अखिल भारतीय पाटीदार समाज संगठण, गुलाब बाग, सिद्धपूर (उत्तर गुजराथ) ह्या महाभागांनी विशेष लक्ष घालून अतोनात पैसा खर्च करून 'कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास' या विषयावर संशोधनपूर्ण व साधार असा इतिहास प्रबंध लिहिला आहे. या ग्रंथातील मते याबाबत प्रमाण मानायला हरकत नसावी. म्हणून शंकास्थानी जिज्ञासूंनी त्या ग्रंथाचे मूळातून अवलोकन करावे.

या ग्रंथात समस्त लेउवा, कडवा, कणबी जातीची उत्पत्ती सांगताना हिंदी भाषिक कवी भीमनाथ रचित 'लेऊवा पुराण' ग्रंथ, इ.सन १९१८ ची आवृत्ती) आधाराला घेतला. त्या ग्रंथाधारे लेवा लोकांच्या ज्या शाखेचे पृष्ठ १८ वर वर्णन केले ती लववंशीय शाखा ही पंजाबातून कनकसेनासोबत सौराष्ट्रात आलेली शाखा नसून त्याच लेवा वंशाची पण दुसरी शाखा असावी, असे चैतन्य प्रकाशन दुधलगाव बुद्रूकच्या संशोधन केंद्राचे मत आहे.

डॉ. मंगुभाई पटेल, कु.क्ष. पाटीदारोंका इतिहास, पृष्ठ २० समस्त लेऊवा, कडवा, कणबीयांची उत्पत्ती लेऊवा पुराणाचे आधारे देत असताना लिहितात की, अयोध्याधिपती राजा रामचंद्राचा पुत्र लवाचे वंशज अजय महाराजाचे पश्चात नव पुरुष झाले. नंतर पुरंजय नावाचा राजा झाला. त्याला बली व भद्र हे दोन पुत्र झाले. त्यांना अनुक्रमे लेहक व कैटभ नावाची मुले झालीत. लेहकाचे वंशज लेउवा व कैटभाचे वंशज कडवा झाले.

लेहकाचे सत्तावीसाव्या पिढीत अजय त्याचा पुत्र महिदास त्याचे वंशज भाण नंतर लवजी, नंतर मुकुंद, नंतर सोम, नंतर श्रवण, श्रवणचा पुत्र अक्षय वसु, अक्षय वसुला सुरज, नंतर अनभंग, नंतर करणु व त्याचे काही पिढ्यांनंतर सुघड, नंतर उदाजी, नंतर धनाजी, नंतर कुशलने संवत ७६१ चे सालात कुशला बावडी बनविली. त्याचे वंशात रूपवर्म उर्फ बलवीर नामक पुरुष झाला. विक्रम संवत ११४४ मध्ये शालिवाहन शक १००९ च्या उत्तरायणात माघ शुक्ल पौर्णिमेस चंद्रग्रहण प्रसंगी पुष्कर क्षेत्री पनिर नामक लेऊवा कुणव्याचा पुत्र बीजी, रजीचा पुत्र आनंद तथा त्याचा पुत्र बलवीरने आनंदपूरीस भूमी-दान दिली. त्या रूपवर्मजी नंतर सोमजी त्याने दुष्काळात संवत ११४८ साली असंख्य लोकांना वाचविले, त्या सोमजीनंतर रामजी ज्याने अडालजला वस्ती केली. हा जसा अयोध्यापती रामचंद्र सूतलवाचा एक वंश झाला तसेच, लवाच्या इतर पुत्राचेही अनेक वंश अनेक ठिकाणी विखुरले गुजराथेहून खानदेश विदर्भात आलेली कुणबी क्षत्रियांची लेवापाटीदार शाखा सूर्यवंशी आहे. अदिती पुत्र वैवस्वत मनुला इला ही कन्या झाली. जी बुधाला दिली होती. तसेच, १. इक्ष्वाकू, २ नृग, ३. धृष्ट, ४. शर्याति, ५. नरिण्यन्ति, ६. प्रांशु, ७. नाभानेष्टि, ८. करथ, ९. प्रषधु ही दहा अपत्य झाली त्यापैकी ईक्ष्वाकूने अयाध्येनगरी वसवून तिथे राज्य केले. त्या सूर्यवंशाच्या ईक्ष्वाकूकाळात वाल्मिकी रामायणानुसार ३९ वा राजा रामचंद्र व ४० वा लव तथा कुश हे झाले. विष्णु पुराण कथानुसार या ईक्ष्वाकू कुळात प्रभू रामचंद्र हा ६५ वा वंशज मानतात. असो.

प्रभू रामचंद्रसूत लवानंतर (१४ पिढ्यानंतर म्हणजे) या ईक्ष्वाकू कुळ परंपरेत ५२ वे पिढीत प्रसेनजित व ५४ वे पिढीतील बृहद्‌बल - जो महाभारत युद्वात अभिमन्यूद्वारा चक्रव्युहात मारला गेला तो झाला. लवानंतर ५५ वे पिढीत सुमित्र व ५९ वे पिढीत कनकसेन इ.सन. १४४ मध्ये गुजराथेत जो आला होता तो झाला. तिथे त्याचाच वंश राज्यारूढ झाला.

मनुर्भरत वंशातील स्वायंभूव मनुचा ४५ वा वंशज जो राजा दक्ष त्याची अदिती नावाची कन्या गृत्समदाचा नातू म्हणजे त्याच्या मरिची नामक पुत्राचा पुत्र कश्यप यास दिली होती ह्या

कश्यपास आदित्य व विवस्वान नावाचे पुत्र झाले. या विवस्वान उर्फ सूर्याचा पूत्र वैवस्वत मनुला जी दहा अपत्ये झाली त्यापैकी ईक्ष्वाकूने अयोध्या राज्य संस्थापिले. त्याचे सूर्यवंशाचा विस्तार वर उल्लेखिलेला आहे. त्याचे सविस्तर माहितीसाठी १. डॉ.रामसिया सिंह याचा कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, पृष्ठ ३५ ते ६३ वर, अध्याय ४, कुर्मवंशी क्षत्रियो के प्रमुख वंश नामक प्रकरण पहा., २. आचार्य चतुरसेन कृत भारतीय संस्कृतिका इतिहास, पृष्ठ १५३, १५४, १६४, ११२, ११३, ३. स्कंध पुराण, सह्याद्रि खंड अध्याय २७, अध्याय ३०, अध्याय ३३, ४. शूद्र मूळचे कोण होते ? लेखक डॉ. भि. रा. आंबेडकर मराठी प्रत पृष्ठ २०८, पृष्ठ १२७, ५. वाल्मिकी रामायण, ६. विष्णुपुराण, ७. श्री. माऊलीसूत 'प्रकाश', लिखित आपले सण आपले उत्सव या मालिकेतील पुष्प १ ले चैत्र प्रकरण १२ श्रीराम नवमी पृष्ठ ७२, ८.श्रीमद् भागवत, ९. कालिदास कृत रघुवंश हे महाकाव्य याद्वारे हा वंश कळेल. रघुवंशात कुशाचे नंतर त्या वंशात २३ वे पिढीतील अग्नीवर्ण. याचे १२ पुत्रांचा, १२ वंश प्रवर्तक, ऋषींचा, १२ गोत्रसमुह कुशवंशीय कडवा क्षत्रियात गुजराथ, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेशात विखुरला आहे.

रामपुत्र लवाचा सूर्यवंशाही वरील प्रदेशात आहे. नेपाळचे महार ाधिराज जयप्रताप मल्लरचित 'नेपाल क्षितीपाल वंशावली'; या ग्रंथात नेपाळ नरेशांना लववंशीय दर्शविल्याचे 'इन्स्क्रिप्शन फ्रॉम नेपाल' पृष्ठ २९ ते ३१ चा आधार, देऊन डॉ. रामसिया सिंह, कुर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, पृष्ठ ६० वर लिहितात. ते पुढे म्हणतात की लववंशी कूर्मी क्षत्रिय हल्ली गुजराथमध्ये बहुसंख्य आहेत. गुजराथेत त्यांना 'लव्याकुणबी' म्हणतात. एका आख्यायिकेनुसार गंगा-यमुना दोआबात रजपूताच्या उपसर्गामुळे लेवा कुर्मी (लववंशी) तेव्हा काही लाहोर व काही गुजराथेत स्थलांतरीत झाले. व तिथे लहान-लहान सत्तास्थाने वसवून कृषिकर्मद्वारा उपजिविका करू लागले. ते सूर्यवंशी क्षत्रिय असल्याचे डॉ. रामसिया सिंह, पृष्ठ ६० वर म्हणतात.

मुंबई गॅझेटियर १ भाग सन १८८९ द्वारा रामचंद्रसूत लवापासून लवगण व कुशापासून कडवा (कुशवंशी कुन्बी) झाले हे जसे लिहिले आहे तसेच, गुजराथी कुणब्यात आंजन, कडवा, लव व मतीया हे चार प्रकार असल्याचेही सांगितले आहे. सन १९०१ मध्ये गुजराथेत लेवा कुणबी ५६८१८९ होते. त्यांच्यात पाटीदार व कृषक असे भेद आहेत. पूर्वी सरकार व कृषक यांच्यात मध्यस्थाचे रूपाने ते करवसुली करीत.

अंजना कुणबी नावापुढे सिंह हे उपपद लावतात. ते भोलावत, चौहाण, यादव, परमार, जरमाल, राठोड, सोळंकी आदि २३ कुळात विभालेले आहेत. तसेच, ते चातुर्य व व्यवसायात रजपूतापेक्षा श्रेष्ठ असल्याचे डॉ. रामसिया सिंह, पृष्ठ ६१ वर लिहितात. मतिया कुणबी इ.सन १९०१ मध्ये फक्त ४०२६ असून शाकाहारी व समृद्ध सत्पंथी कृषक असल्याचे जाणवते.

गुजराथी कुणबी अयोध्येतील स्थानांतरानंतर मथुरा व पुढे मारवाडमार्गे गुजराथेत सुमारे २००० वर्षापूर्वी गेल्याचे डॉ. सिंग म्हणतात.

स्कंध पुराण, सह्याद्रि खंड, अध्याय ३०, श्लोक ६ ते १४ व अध्याय ३० ते ३४ मधील चंद्रवंशीय कुर्मीकुलविस्तार सविस्तर दिला आहे. कश्यपाचा पुत्र अत्रि व अत्रिचा पुत्र चंद्र व चंद्राचा बुध, बुधाचा पुरुखा आदी वर्णन मुळातूनच वाचा.

तसेच, देविप्रसादसिंह लिखित, क्षत्रकुलादर्श, द्वितीय आवृत्ती, पृष्ठ ४० व श्रीमद् भगवद् गीताअध्याय १ ला, महाभारत शल्यपर्व अध्याय ५३ चे दाखले देऊन, डॉ. सिंग यांनी कुरुवंशियांचे व ऋग्वेदातील 'पंचकृष्टी' मधील कुरू, पांचाल, भद्र जातीचे दिलेले वर्णन विस्तारभयास्तव मुळातूनच पहा.

अवतारसूचीत त्रेतायुगात रामचंद्रप्रभूचे अगोदर परशुरामाचा अवतार झाला व द्वापारयुगातील

कर्णालाही ब्रह्मास्त्र त्याने शिकविले असे अनेक युगात एकच व्यक्ती जिवंत असणे ही शुद्ध थाप टाळण्यासाठी बली, व्यास, अश्वत्थामा, कृपाचार्य, मारुती, विभीषण, परशुरामादी सप्तचिरंजिव कल्पिले आहेत. ते जर त्रिकाळ जिवंत आहेत, तर पृथ्वीरील हा वाढता भ्रष्टाचार, बलात्कार, प्रदूषण यांचे निवारणं करण्यास असमर्थ का ठरले ? त्या महापुरुषांना हे अध:पतन कसे पहावते. आदी पुराणातील अशी ही कल्पित कथारूपी बनावट वांगी भूक भागवू शकतील काय ?

तसेच, इ.सन १५६ साली पंजाबातून सौराष्ट्रात वसाहत केलेल्या सूर्यवंशीय कनकसेन तथा अजय आदी लवाचे वंशज येथे येऊन उंझा गाव वसविले व तेथे उमिया माता कुलदेवीची प्रतिष्ठापना केली हा सत्य इतिहास असून 'ब्राह्मणोत्पाती मार्तण्ड' ग्रंथात ग्रंथ लेखक- हरिकृष्ण व्यंकटराम शर्मा लिहितात की, रामचंद्रसूत लव व कुश सिद्धपूरला यात्रे निमित्त गेल्यावर उंझा गावी उमिया मातेच्या दर्शनाला गेल्याचे धडधडीत असत्य लेखन करतात (पृष्ठ १५ पहा). असे हे प्रदूषित विद्वान ब्राह्मण लेखक व त्यांचे महादूषित ग्रंथ आधारादाखल घेण्यास कोणताही माणूस कचरतो. म्हणूनच 'शूद्र मूळचे कोण होते ?' या ग्रंथाचे मराठी प्रतीत पृष्ठ १०८ वर डॉ. बाबासाहेब आंबेडकर विष्णु पुराण ग्रंथातील (मूर, व्हा. १, पान ७७) लिखाणाच्या सत्यासत्यतेची चिरफाड करताना त्यातील व्युत्पत्तीबद्दल अभिप्राय देताना लिहितात की, "आपल्या मनाला पोषक अशा शब्दांच्या खोट्या व्युत्पत्त्या तयार करणे ही एक मोठी कला आहे. आणि या कलेत ब्राह्मण ग्रंथकारांचा जगात कोणीच हात धरू शकत नाही. संस्कृत भाषेत असा एकही शब्द मिळणार नाही की, ज्याच्याबद्दल ब्राह्मण ग्रंथकार व्युत्पत्ती तयार करून ठेवणार नाहीत. कदाचित डॉ. आंबेडकरांचे मत एकांगी व पूर्वग्रहदूषित असल्याची कोणास शंका आली तर याच ग्रंथात पृष्ठ १०९ वर (Upanishads-Introduction P.P. 64-71) प्रो. मॅक्यूलर ह्या परकीय विद्वानाचे मत पाहिल्यास तेही म्हणतात की, "ब्राह्मण ग्रंथकारांनी या बाबतीत स्पष्टीकरण जाणूनबुजून इतकी उलटी पालटी मांडली आहेत की, त्यांच्यातील एकमत कोणत्या स्पष्टीकरणाबद्दल आहे हे समजून घेणे कठीण झाले आहे." म्हणून संशोधन करताना पारखूनच पुरावे घेणे वा पुराव्यांच्या सत्यसत्यतेबद्दल सावधता अंगी बाळगणे इष्ट ठरेल. असो !

तसेच, कवी भीमनाथ विरचित लेऊवा पुराण, पृष्ठ १३ वर लेवकाला १३ राण्यापासून १२१ पुत्र झाले व कैटभाला ८ राण्यापासून ८० पुत्र होते. हे वर्णनही अवास्तव वाटते. (कु.क्ष.पा.इ., पृष्ठ १९ पहा).

तसेच, कवीश्वर दलपतराम लिखित, 'जातिनिबंधात' परशुरामाने पृथ्वी २१ वेळा नि:क्षत्रिय केली हा दाखला कु.क्ष.पा.इ., पृष्ठ २५ वर दिला. तेव्हा प्रभू रामचंद्र, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, जनकादी क्षत्रियांचाही त्यांनी नायनाट केला काय ? किंवा ब्राह्मणांच्या कित्येक पटीने क्षत्रिय बहुसंख्य असून ब्राह्मणच साडेतीन टक्क्याएवढे अल्पसंख्य का राहिले. असे सर्व लिखाण सत्यासत्यतेच्या शुद्ध कसोटीवरच घासून घ्यावे लागेल. याबाबत 'कुर्मी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास ग्रंथात' अशा ग्रंथकारांची खरडपट्टी काढताना श्री. मं.रा. पटेल, पृष्ठ १६ वर लिहितात की, "हरिकृष्णजीने यह पुस्तक लिखकर गपोडे का एक बडा अच्छा भंडार अपने पुस्तकरूपी तोपखानेमे इकट्ठा किया है।"

१) कश्यपवंशीय कूर्म ऋषीपुत्र भूपती अमृत पंजाबात राज्य करीत होते. (कु.क्ष.पा.इ., पृष्ठ ३६). लेवा पाटीदार कूर्मी क्षत्रिय आहेत या संबंधी डॉ.मं.रा. पटेलांनी पृष्ठ ३६ ते ४३ या देशी, विदेशी, तथा प्राचीन व अर्वाचीन ग्रंथाधारे स्पष्ट केले ते विस्तार भयास्तव नुसता नामनिर्देश करतो. जिज्ञासूंनी ते मुळातूनच वाचावेत.

२) हिंदुस्थान इंपिरियल गॅझेटियर (नया संस्करण), पुस्तक ५, पृष्ठ ९७ व ९८, अहमदाबाद

जिल्हा या ग्रंथात "हालाकि पाटीदार व कणबी आपसमे व्याह नही करते. फिरभी दोनोंमे कोई अंतर नही है, तथापि कणबी राजपूतोंसे बढकर है । (कु.क्ष.पा.इ., पृष्ठ ४१ पहा).

३) तसेच, व. शेरिग्ज हिंदू ट्राईब्ज एण्ड कास्टस्, भाग ३, पृ. २५८ हिंदु जातियो मे संबंध या शीर्षकाखाली "मूल कणबी दुसरे रूप से साहसके मामले मे राजपूतोसे काफी समान है । वे राजपुती जैसे धैर्यवान और हिंमतवाले होते है । उनमे कुटिलता एवं तीव्र ग्रहणशक्ती नही है । वे ब्राह्मणोसे कई बातो मे पृथक नजर आते है ।... हिंदूओंका भूषण रूप गुण जो 'स्वाभिमान' है, वह उनमे विशेष है ।... राजपूतोंका घमंड व ब्राह्मणोंका मिथ्याभिमान उनमे नही है ।" (कु.क्ष.पा.इ., पृष्ठ ४२)

"श्री राधाचरण गोस्वामीजीके अध्यक्षतामे 'कणबी क्षत्रिय है या नही" या विषयपर भारतके महान पंडितोंका शास्त्रोक्त वादविवाद हुवा था । उस सभामे उनका क्षत्रिय होना सिद्ध हो चुका है ।" (कु.क्ष.पा.इ., पृष्ठ ४२)

५) "Shivaji was a kurmi and theRajas of Gwalior and Satara are said to be of the same race."

- Hunters Statistical Account of Bengal Vol. XI Pages 46 and 47).

६) The kurmis and Kunbis are in reality one class of people and yet are known in various parts of the country by these spearate disignafions and under them are subdivisions into numbers tribes some of which do not intermarry.

Bombay Presidency and central Provinces.

७) "Ramchandra had two sons, one Lava and one Kush. From Lava came levas and from kush the kadvas." Bombay Gazetteer. Vol. IX Part 1st.

८) "The kurmis and kunbis are in reality one class of people."Revd Sherrings Tribe & Castes Vol. 1st अशी कु.क्ष.पा.इ., ले.- डॉ.मं.रा. पटेल, पृष्ठ ४४३ ते ४४७ वरील विद्वानांची मते दिली आहेत.

भोरगाव लेवा पंचायत पत्रिका, अंक १ ला, डिसेंबर १९८५, वर्ष १ ले, संपादक- प्रा.रा.वा. पाटील व इतर यातील पृष्ठ ६ वरील संस्कार पदयात्रेत दर्शविल्याप्रमाणे ता. २.१०.१९८६ रोजी मौजे **वरखेड** व मौजे **कोल्हाडी** गावांच्या सभांना पदाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार मार्गदर्शन करण्यासाठी प्रस्तुत ग्रंथ लेखक (श.वि.पाटील) गेला असताना तेथील समाज-बांधवांचा ओसंडून वाहणारा उत्साह मी प्रत्यक्ष पाहिला. ता. ७-१-१९८६ रोजी प्रा.रा.वा. पाटीलांचे गैरहजेरीत शेलगाव बाजार येथील सभेस, निवड मंडळ सदस्य श्री.तुकाराम हरी पाटीलांचे आदेशान्वये तेथेही मी एक छोटेसे भाषण केले. तसेच, ता. ९ जानेवारी १९८६ ला दुधलगाव बुद्रूक येथील 'संस्कार पदयात्रा' प्रसंगी झालेल्या सभेचे अध्यक्षस्थानी प्रस्तुत लेखकच होते, व ता. १९ जानेवारी १९८६ ला शेंबा येथील सभेत तेथील सदस्यांना मार्गदर्शनपर मी छोटेसे भाषण केले होते, या संस्कार पदयात्रेच्या दिंडीतील कार्यक्रम प्रसंगी १. वरखेड, २. कोल्हाडी, ३. शेलगाव बाजार, ४. दुधलगाव, बुद्रुक, ५. शेंबा आदि पाच-सहा सभांमधून वक्ता म्हणून सहभाग घेताना व्यासपीठाचे उंच ओट्यावरून जनतेची जी भरघोस उपस्थिती व त्यांचा ओसंडून वाहणारा उत्साह पुरेपूर पाहून मन भरून आले होते. आणि वाटले की एवढा उत्साह असलेल्या उत्सुक लोकांना आमच्यापेक्षा कार्यक्षम व अनुभविक व लायक लोकांनी योग्य नियोजन करून मार्गदर्शन करणारी स्थायी कार्यक्षम समाज संघटना व एक मराठी मुखपत्र असेल, तर याहीपेक्षा कित्येक पटींनी ठोस व भरीव समाज संघटन कार्य विदर्भ विभागाच्या दाताळा ठाया परिक्षेत्रात झाले असते. जनता उत्सुक आहे पण वेळ व पैसा यांचा भरीव त्याग करणारे व कार्यक्षम कार्यकर्त्याची सक्रिय संघटने अभावी हा समाज उन्नती करण्यात

मंदावला आहे.

श्री. दामोदर कौतिकराव राणे. जी.१-११-A, वैंकुठवाडी, कुंभनाथ सोसायटी, घोडसर तोल नाक्याजवळ, मणिपूर, अहमदाबाद, पिन - ३८०००८ हे एक अभ्यासु समाज सेवक आहेत. त्यांच्या एक हस्तलिखित लेख माझ्यामित्राकडे पाहिला. त्यांच्या मते "इ.सन ३०० वर्षांपूर्वीच्या काळात सप्तसिंधू प्रदेशात आर्यांनी वस्ती केली होती. तेथील शेतकरी कूर्मी पुढे स्थानांतरीत झाले. इ.सनापूर्वी ३०० ते १६६ पर्यंत ३३ राजे झाले. त्यापैकी वृजलाला हा कूर्मी क्षत्रिय राजा होता. त्यांचे वंशज इ.सन ३२६ ला गुजराथेत चरोतर प्रांती होते. त्यांच्या पंजाबातील लेहकपूरचे लेहक कुणबी शंकर पटेल ३३ व्या पिढीपैकी आहे. गोकुळचा सोभाभाई पटेल व त्याचा पुत्र अशोक गोकुळदास पटेल (पाटीदारांच्या इतिहासाचे लेखक) होत.

इ.सन १५६ ला व्रजलालचे नेतृत्वाखाली उंझा येथे उमिया मातेचे मंदिर स्थापले. सन १२२७ मध्ये अल्लाउद्दीनाचा भाऊ, अलफखान याने अडालज शहर लुटले. म्हणून सुरत, नवसारी, वगैरे ठिकाणी लेवा समाज गेला. इ.सन १७०३ साली पिंपळगावला शेतकी संमेलन झाले. त्यात शेतांचे व घरांचे मालकी हक्क राजाकडून मिळाले, व कूर्मी, कणबी, कुणबी, पाटीदार नावाने जातीची सरकारी दप्तरी नोंद झाली.

इ.सन १४४९ मध्ये अहमदाबाद व अडालजच्या मध्ये गिरमथा गावी सैय्यद इमामशहाच्या शिक्षा पात्री ग्रंथाच्या प्रभावाने काहींनी पीराचा पंथ स्विकारला व काही मुसलमान सत्पंथी झाले. इ.सन १४४३ साली अहमदाबाद शहर कर्णावती नगराजवळ वसविले. या ऐवजी वादविले असे म्हटल्यास पुढील घटनांची संगती लागते. उदा. त्यापूर्वी सन १४३० सालात चापानेर (पावागड) चा राजा गंगाराम रावळचा पुत्र जयदीप सिंह रावळ पावागडला पराभूत झाला म्हणून लेवा लोक अहमदाबादेत प्रवेशले. इ.सन १४८३ मध्ये महंमद बेगडाने पावागड ताब्यात घेतला. त्यामुळे ते तापीकिनारी नंदिग्राम (नांदेड) ला आले. व तेथून तापीतिराने ११८ खेड्यात विखुरले. ते आज २२० गावात पाटीदार वस्तीने राहतात. इ.सन १९११ मध्ये फाल्गुन वद्य ५ ला अहमदाबादच्या स्वामीनारायण मंदिरातील आचार्याने सत्पंथीयांचे शुद्धिकरण केले. महाराष्ट्रात लेवा पाटीदारांव्यतिरिक्त कडवा पाटीदारांना मराठा म्हणतात.

तसेच, "लेवा पाटीदारांची मराठी बोली" लेखक श्री. तोताराम नामदेव चोपडे भुसावलकर यांचा डेक्कन कॉलेज पुना ६ सन १९७१ चा प्रबंध वाचा."

पामिरवरून अफगाणिस्थानमार्गे काबूल, पेशावर मार्गे भारतात आर्य लोक आले. आर्यकुळीत मनु, कश्यप, कुर्म, ब्लव, ईक्ष्वाकू आदी थोरथोर पुरुष जन्मले. इ.सन पूर्व तिसऱ्या शतकात पंजाबहून मगध देशातही गेले. इ.सन पूर्व ७५ मध्ये गुजराथपर्यंत विस्तारले. पंजाबी गुर्जरात लेवी नावाची जात आहे.

इ.सन ७८८ मध्ये भद्रमातेच्या शापाने पडलेल्या दुष्काळात काहींनी पावागड सोडला. महंमद बेगडाने ता. १७ मार्च १४८३ ला पावागडावर हल्ला केला. २८ एप्रिल १४८३ ला पावागडला वेढा दिला. तिथी तृतीया पौष संवत १५४१ म्हणजे शके १४०६ वा सन १४८४ मध्ये रविवारी पताई राजाचा वध झाला, व पावागडचा पाडाव झाला, असे रासमाला, भाग १, पृष्ठ ६३१ वरील लिखाण कु.क्ष.पाटीदारोंका इतिहास ६६ वरून कळते. व सेनापती राय वैरीसिंह पकडला गेला. त्याला महेम्मदाबादजवळ आणून चीनाखानेजवळ सन १४८४ मध्ये कैद केले. (बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम १, पृष्ठ २४७ पहा). असे कु.क्ष.पा.इ., ले.- डॉ.पटेल, पृष्ठ ६६ वर देतात याच वैरीसिंहाचे मदतीने महंमद बेगडाने विरमदेवाचे राज्य जिंकले. आश्विन शुद्ध २ ते १० शारदीय नवरात्रात पार्वती मातेची महाकालीचे पठारावर महाकालीची शारदीय चांदण्यात उपासना करणारा लेवा पाटीदार समाज शुद्ध १५ ला कोजागिरीचा आनंद लुटतो. या मुहूर्तावर हे नवीन स्वाऱ्या करीत असत. प्रभू

रामचंद्रांनी दसऱ्यालाच रामेश्वर लिंग प्रतिष्ठापून रावणावर स्वारी केली. ह्या लेवा लोकात नर्मदातीरी मांडवगड वि ल्याचा शिल्पकार लेवा होता. त्याचे वंशज धार येथे आहेत. त्यांचे आडनाव फुनगे असे आहे. साळाव्या शतकात यांना पाटीदार हे नाव पडले. शहाजहान बादशहाचे सहीच्या सनदा अशिरगडच्या बाहदूरशहांनी दिल्या आहेत. बडोद्यात मोहनलाल सराफाचे घरगुती वस्तुसंग्रहालयात जातवार दागिन्यांचे वर्गीकरण केले आहे. त्यात लेवा पाटीदारांचे दागिने हेमाडपंती नक्षीचे दाखविले आहेत. अहमदाबादच्या नगरपालिकेच्या सार्वजनिक वाचनालयात अरेबिकमधून लेवा इतिहासदर्शक पेटीभर कागदपत्रे असल्याचे मी ऐकले आहे. त्याचे संशोधन अद्याप झाले नाही. श्री.या.शि. महाजन यांचे सन १९८४ च्या पाडळशाचे सभेतील भाषण. चंद्रकांत धांडे व भादलीकर प्रा. रडे यांचाही लेवा इतिहासाचा थोडाफार अभ्यास असल्याचे डॉ. तो.ना. चोपडे भुसावलकरांनी मला सांगितले. पावागडचा सेनापती कृष्णचंद्र लेवा मारला गेल्यामुळे पावागडहून लेवा पाटीदार चौफेर विखुरले.

"२००० अति विशष्ठ भारतीय इतिहास परिक्षोपयोगी बिंदू" प्रधान संपादक- आनंदकुमार महाजन, हा ग्रंथ यूथ कॉम्पिटिशन टाईम्स, इलाहाबाद येथे प्रसिद्ध झाला. त्या ग्रंथाचे पृष्ठ १५६ वर लिहिले आहे की, सुलतान अहमदबादशहाने इ.सन १४१२ साली अहमदाबाद शहर वसविले. व सन १४२६ ते २७ मध्ये गुजराथच्या सिमेवर अहमदनगरची स्थापना केली.

प्रकरण १८

लेवा पाटीदारांचे प्रमुख उपासना पंथ

शैक्षणिक प्रगतीप्रमाणेच अध्यात्मिक क्षेत्रातही हा समाज या परिसरात आघाडीवरच राहिला.

या लेवा पाटीदारांचे मुख्यत: १. वारकरी पंथ, २. महानुभाव संप्रदाय, ३. स्वामी नारायण मार्ग व ४. सत्पंथ उर्फ पिराणा पंथ हे चारच पंथ असल्याने त्यांचीच स्थूल ओळख पुढे देत आहे.

हिंदूधर्मातील चातुर्वर्ण्यांतर्गत वर्णविषमता, यज्ञ-यागाचे प्रावल्य, बहुदेवोपासना, तीर्थयात्रा, निरनिराळी व्रते आदिंनी समाजाचे पुरोहितांनी शोषण करून त्यांची आर्थिक व मानसिक पिळवणूक करून त्यांना दिवसाढळ्या लुटले. त्यांचेच खाऊन त्यांचे दर्शन न घेता त्यांनाच दर्शन घ्यायला लावले. मुसलमानांचा जिझिया कर तरी वर्षातून एकदाच द्यावा लागतो, पण धर्माचे नावाखाली गर्भधान संस्कारापासून तर त्याचे मृत्यूपर्यंत म्हणजेच बारशापासून तेरवीपर्यंत व वर्षश्राद्ध रूपाने त्यांना बेसुमार लुटून त्यांचाच विटाळ मानणारी निर्दयी वृत्ती, त्यांचेच नमक खाऊन त्यांनाच नमकहराम होणारी हरामखोरी ब्राह्मणशाहीने स्विकारून समाजाचे, धर्माचे व पर्यायाने राष्ट्राचे वाटोळे करणाराविरुद्ध पहिली बंडखोरी सूर्यवंशी लिच्छवी कुलोत्पन्न क्षत्रिय भगवान सिद्धार्थ गौतम बुद्धाने केली, व जनसामान्यांचे हितास्तव अहोरात्र झटून लोकशाही समतेचा बौद्धधर्म संस्थापिला.

तेच कार्य अधिक वेगाने करण्यासाठी भगवान महावीरानेही जैनधर्म संस्थापिला. जगप्रसिद्ध ऑक्सफर्ड शब्दकोशात जैन ह्या शब्दाचा अर्थच (A non-Bramhininical movement in East Indian Sect with doctrines like those of Buddhism. मुळी असा दिला आहे.) पूर्व भारतातील बुद्धमतासमान असलेली ब्राह्मणेत्तर चळवळ असा अर्थ दिला आहे.

त्यानंतर जनजागृतीची तिसरी वीरशैव संतांची चळवळ होय. 'वीर शैव संत साहित्य अभ्यास

ग्रंथ' संपादक- डॉ. कामत व डॉ. पसारकर या ग्रंथात 'अल्लमप्रभू आणि गोरखनाथ' लेखक डॉ. सुधाकर मोगलेवार, पृष्ठ ६७ वर, परिच्छेद ३ मध्ये लिहितात की, "वर्णाश्रम धर्माला कडाडून विरोध करणारे, निरीश्वरवादी, अस्पृश्यता न मानणारे, स्त्रीशूद्रविकास समता प्रदान करणारे, समता व ममता यांचा समन्वय करणारे उदार मताचे लोकभाषेचा आदर व पुरस्कार करणारे नाथ, वीर शैव संप्रदाय आहेत. ह्या पंथानंतर अशीच जनहिताची पुरोगामी चळवळ करणारे अनेक लहान-मोठे संप्रदाय उगवले. त्यापैकी लेवा पाटीदारांना आकर्षित करणारे संप्रदाय पुढे दिले आहेत."

वारकरी संप्रदाय :- चक्रवर्ती भिल्लमाचे काळात शके १११० साली सौम्य संवत्सरी शुक्रवारी श्री. विठ्ठलाचे लहानसे देऊळ बांधले. (वा.स.उ.व.वि., ले.-भा.प. बहिरट व भालेराव, पृष्ठ १८) शके ११७० मध्ये या श्री विठ्ठलाची वारी सुरू झाली असावी (वारकरी पंथाचा इतिहास कालसूचीसह लेखक- शंकर विठोबा पाटील, पृष्ठ १६४ पहा). शके ११८० साली जगत्पाळ राजाने पुळुंज येथील कुलकर्णी यांना देवळाचे व्यवस्थापक नेमले. म्हणून कोळ्याचे व्यवस्थापक जाऊन ब्राह्मणांची बडवेशाही देवदरबारी सुरू झाली. शके १११० नंतर ८४ वर्षांनी रामदेवराव यादव हा पंढरीस पांढरीफड मुख्य झाल्याचा ८४ चा शिलालेख सांगतो. शके ११९२ कार्तिक शुद्ध ११ ते शके १२७२ आषाढ वद्य १३ मध्ये वारकरी संप्रदायाचा आद्य संघटक व आद्य कीर्तनकार संत नामदेव जन्मला. ह्यानंतर शके ११९७ श्रावण वद्य ८ ता. १५ ऑगस्ट १२७५ रोजी संत ज्ञानेश्वर जन्मले. व **शके १२१८ कार्तिक वद्य १३ ता. २५.११.१२९६ रोजी त्यांनी जीवनयात्रा संपविली.** शके १२०८ रोजी वयाच्या ५९ व्या वर्षी ज्ञानेश्वरांचे आईवडीलांनी गंगेत जलसमाधी घेतली. शके १२०९ माघ शुद्ध पंचमीस ज्ञानेश्वरादि भावंडांना जातिबहिष्कृत केले. शके १२१२ च्या चातुर्मासात संत ज्ञानेश्वरांनी जन्मजात वर्णविषमता मानणाऱ्या चातुवर्ण्याचा पुरस्कार करणारी नाथपंथी भावार्थ दीपिका लिहिली. त्यांच्या ह्या जन्मजात वर्णविषमतेचा पुरस्कार करणाऱ्या भावार्थ दीपिकेचा महानुभाव पंडित दामोदर पंतांनी खरपूस समाचारे घेऊन गुणकर्मानुसार वर्णाश्रम मानणाऱ्या समता व ममता यांच्या पायावरील चातुर्वर्ण्य मानणाऱ्या चक्रधरोक्त महानुभावीय तत्त्वज्ञानाने त्यांचा पूर्ण पराभव केल्यामुळे खिन्न झालेले संत ज्ञानेश्वर जीवनयात्रा संपविण्यासाठी ताटी लावून भुयारात बसले, पण संत मुक्ताबाईने त्यांना संत नामदेवाच्या विठ्ठलपंथाचा स्वीकार करण्याचा सल्ला दिला. त्यामुळे वेद व मूर्तीपूजा विरोधी महानुभावापेक्षा वेदाला विरोध न करणारे विठ्ठलमूर्तीपूजक समतावादी संत नामदेवाच्या विठ्ठलपंथात आपल्या नाथ पंथाचे विलिनीकरण करून त्यांनी संत नामदेवाचा विठ्ठलपंथ आषाढ शुद्ध १२ शके १२१७ ला समतावाचक अस्पृश्यता निवारक संत नामदेवी काला खाऊन त्यांनी संत नामदेवाचे हस्ते गळयात तुळशीमाळा घालून त्यांचा विठ्ठल पंथ स्वीकारला, व पूर्वी लिहिलेली ज्ञानेश्वरी प्रतिगामी वाटल्याने पुरोगामी हरीपाठ लिहिला. हीच वारकऱ्यांची संध्या होय. ह्या हरीपाठ ग्रंथामुळेच ते वारकरी पंथात अमर झाले. (ज्ञानेश्वरीमुळे मुळीच नव्हे). ही समताप्रणित पुरोगामिता मानणारा हरिपाठ लिहिल्यामुळे ती आम्हा वारकऱ्यांची माऊली झाली. ते आम्हाला प्राणप्रिय ठरले.

शके १२०८ मध्ये गहिनीनाथांनी ज्ञानेश्वरादी भावंडांना नाथपंथीय दीक्षा दिली.

शके १२१२ मध्ये चार्तुमासात ज्ञानेश्वरी लेखन केले.

शके १२१२ चे शेवटी महानुभाव पंथीय दामोदर पंडिताने नाथपंथीय भावार्थदीपिकेतील जन्मजात चातुर्वर्ण्याचा पूर्ण पाडाव केला. म्हणून संतज्ञानेश्वरांनी जीवनयात्रा संपविण्यासाठी ताटी लावून भूयार प्रवेश केला तेव्हा.

शके ९०२ मच्छिंद्रनाथ

शके ११३० ते १२०० गहिनीनाथ

शके १११० सौम्य संवत्सरी शुक्रवारी श्री विठ्ठलाचे लहानसे देऊळ बांधले. (वा.स.उ.वि., ले.

शं.वि. पाटील, बहिरट व भालेराव, पृष्ठ १८ पहा).

शके ११७० मध्ये श्री विठ्ठलाची वारी पंढरीस सुरू झाली. (वा.पं.इ.. ले.- शं. वि.पाटील)

शके ११८० जगत्पाळ राजाने पुळुंज येथील कुलकर्णी यांना देवळाचे कोळी काढून व्यवस्थापक नेमले. ब्राह्मणांची बडवेशाही सुरू झाली.

शके ११९२ संत नामदेव जन्मले, कार्तिक शुद्ध ११ शके ११९२, मृत्यू आषाढ वद्य १३ शके. १२७२ विठ्ठल पंथी.

शके ११९३ आमणदेवाचा खून करून रामचंद्र यादव गादीवर बसतो.

शके ११९५ विठ्ठलपंतांनी संन्यास सोडून गृहस्थाश्रम स्वीकारला.

शके ११४३ ते ११९६ श्री. चक्रधर प्रभू, जन्म २०-८-१२२१ व खून सन १२७४ (ता.२२-११-१९९२ च्या लोकमत दैनिकात) पेशवाईत पेशव्यांनी महानुभाव पंथ बहिष्कृत केला.

शके ११९७ श्रावण वद्य ८ ता. १५-८-१२७५ ज्ञानेश्वराचा जन्म झाला आणि

शके १२१८ कार्तिक वद्य १३, २५-१०-१२९६ ज्ञानेश्वराचा मृत्यू. नाथपंथातून आले.

शके १२०१ अश्विन शुद्ध १ ते शके १२१९ वैशाख वद्य १० संतमुक्ताबाई

शके १२०२ ज्ञानेश्वरादी भावंडाचा व्रतबंध ब्राह्मणांनी नाकारला.

शके १२०६ ज्ञानेश्वरांचे आई वडिलांचे आत्मसमर्पणार्थ सन. १२८३ गृहत्याग

शके १२०८ ज्ञानेश्वरांचे आईवडिलांना जलसमाधी व गहिनीकृपा.

शके १२०८ गहिनीनाथांची या भावंडांना नाथपंथीय दीक्षा

शके १२०९ माघशुद्ध ५ ज्ञानेश्वरादि भावंडे पैठणकर ब्रह्मवृंदाकडून जातिबहिष्कृत

शके १२१२ आषाढ ते कार्तिक ज्ञानेश्वरांचे 'भावार्थ दीपिका' लेखन

शके १२१२ कार्तिकान्ती संत नामदेवाने आळंदीस जाऊन 'भावार्थ दीपिके'तील जन्मजात वर्णाश्रमाचे चातुवर्ण्य अमान्य केले. म्हणून मुक्ताईचा मार खाल्ला.

शके १२१२ संत नामदेवाच्या समता धर्माचा पराभव केला. हे ऐकून महानुभाव पंडित दामोदर पंतांनी संत ज्ञानेश्वराचे **ज्ञानेश्वरीतील जन्मजात वर्णाश्रम धर्मीय चातुर्वर्ण्य तत्वाचा पराभव केला.** म्हणून ज्ञानेश्वरांनी भूयारात जाऊन आत्मसमर्पणार्थ योगमार्गे समाधीची तयारी शके १२१२ चे शेवटी.

शके १२१२ दामोदर पंडित महानुभावापासून वेद + मूर्तीपूजा + जन्मजात चातुवर्ण्याचे वर्णाश्रम धर्मतत्त्व जिवंत ठेवण्यासाठी संत नामदेवाचे विठ्ठलपंथाशी युती करण्याचा संत मुक्ताबाईचा ज्ञानेश्वरांना सल्ला. (ताटीचे अभंगाद्वारे)

शके १२१३ चे आषाढीत संत नरहरी सोनाराने पंथ त्याग का केला व संत नामदेवाचा विठ्ठलपंथ कसा आहे हे जाणण्यासाठी आयुष्यात दिंडीने व झुंडीने केलेली पंढरीची पहिली वारी केली व संत नामदेवाचे कीर्तन संत ज्ञानेश्वराने ऐकले.

शके १२१३ चे कार्तिकी वारीत संत नामदेवाने ज्ञानेश्वरादिभावंडांची भेट घेतली, व त्यांची परिचयातून मैत्री झाली.

शके १२१७ आषाढ वद्य १४ ला संत सावता माळी वारले ते शके ११७२ ला जन्मले होते.

शके ११८२ ते १२३६ संत नरहरी सोनार (मूळ शैवपंथी)

शके १२१४ आषाढीवारीत संत ज्ञानेश्वरादी भावंडे पंढरीत संत नामदेवाचे कीर्तन ऐकून त्यांनी विठ्ठलपंथ निरीक्षण व परीक्षण केले. तेथील विचार, उच्चार, आचार पाहिला.

शके १२१४ कार्तिकी शुद्ध १५ ते शके १२१७ आषाढ शुद्ध १० अशी २ वर्षे ८ महिने संत नामदेवासह ज्ञानेश्वरांची तीर्थयात्रा.

शके १२१५/१६ उत्तर भारतातील यावनी उपद्रवाचे चक्षुर्वैसत्यम् हाल पाहिले.

शके १२१६ काशीचे दशाश्वमेघ घाटावर गंगाकाठी ज्ञानेश्वरांचे मतपरिवर्तन झाले.
शके १२१७ आषाढ शुद्ध १२ चे पंढरीतील मावंद भोजनप्रसंगी सर्व जातीचे संत पंक्तीचा ज्ञानेश्वराने आस्वाद घेतला. व पौर्णिमेस अस्पृश्यता निवारक काला खाल्ला.
शके १२१८ कार्तिकारंभी अल्लाउद्दीनाने जलालुद्दीनचा खून केला व स्वत: राजा झाला. ता. ३ ऑक्टोबर १२९६ ला दिल्लीवर राज्यक्रांती.
शके १२१८ कार्तिक वद्य १३ ता. २५-१०-१९९६ ज्ञानेश्वरांनी समाधीयोगे प्राणत्याग करून यवनापासून विटंबना वाचविली.
शके १२१७ साली ज्ञानेश्वर हरीपाठ लेखन करतात.
शके १२०९ ते १२१६ या काळात संत नामदेवाने, गणपती, भैराळ, सीतळा या उपासना पंथांचे खंडन करून ज्ञानेश्वराचा नाथपंथही शके १२१६ ते १२१७ मध्ये विठ्ठलोपासनेत सामावून घेतला.
शके १२२३ संत सेना न्हावी बांधोगड रीवा खंड निवासी.
शके ११८९ ते १२३९ संत गोरा कुंभार
शके १२२८ पंडित दामोदर व्यास यांचा मृत्यू झाला. (हे महानुभाव पंथी होते)
शके १२५२ जगमित्र नागा वारले व शके १२५३ कूर्मदास
शके १२६० चैत्र वद्य ५ संत चोखोबाचा मृत्यू
शके १२७३ संत जनाबाईचा मृत्यू
शके १३९० संत कान्होपात्रा
शके १४०८ ते १४५५ बंगाली चैतन्य महाप्रभूने भागवत धर्म व चैतन्य संप्रदाय प्रसार केला.
शके १३७० ते १४३५ संत एकनाथाचे पणजे संत भानुदास सूर्यपंथातून आले.
शके १४२८ ते १४५६ संत भानुदासाचा मुलगा चक्रपाणी
शके १४५२ ते १५२१ फाल्गुन वद्य ६ संत एकनाथ पैठणकर दत्त पंथातून आले.
शके १४२६ फाल्गुन वद्य ६ ते शके १४९७ फाल्गुन वद्य ६ संत जनार्दनस्वामी वारकरी पंथात आले.
शके १५३० ते १५७१ फाल्गुन वद्य २ जगद्गुरू संत तुकोबा देहूकर चैतन्यपंथातून आले.
शके १५९२ ते शके १६७४ संत निळोबा पिंपळनेरकर (शिवूरकरांचे गुरू).
शके १६२९ ते शके १७२१ मल्लाप्पा वासकर (शिवूरकर शिष्य)
शके १५५० ते १६२२ (सन १६२८ ते १७००) संत बहिणाबाई (तुकारामशिष्या,)

आद्य संत सावता

१. संत नामदेव, २. संत ज्ञानेश्वर, ३. संत भानुदास, ४. संत जनार्दनस्वामी, ५. संत एकनाथ, ६. संत तुकोबा, ७. संत बहिणाबाई, ८. संत निळोबा पिंपळनेरकर ९ संत मल्लापा वासकर ह्या अनुक्रमाने वारकरी संप्रदाय वाढत गेला आहे.

संत पुंडलिकाने संस्थापिलेल्या विठ्ठलाचे शके १११० साली पहिले विठ्ठल मंदिर चंद्रभागेतीरी बांधल्याचे विद्वानांचे संशोधन आहे. तसेच, शके ११७० चे सुमारास विठ्ठलाची वारी सुरू झाली असावी. (वा.पं.इ., ले.- पाटील, पृष्ठ १६४).

शके ११७२ ते १२१७ आद्य वारकरी संत सावता माळी.
शके ११८० मध्ये जगत्पाळ राजाने पुळुंजचे कुलकर्णी ब्राह्मण बडवे पुजारी नेमले, व कोळी पुजारी बंद केले.
शके ११९२ ते शके १२७२ वारकरी पंथाचे आद्य फडकरी, आद्य संघटक, आद्य कीर्तनकाराने शके १२०९ ते १२१६ पर्यंत फडाची व विठ्ठलपंथाची उभारणी व संघटना नामदेवाने केली.
शके १२१६ मध्ये काशीस गंगातिरी संत ज्ञानेश्वराने नाथपंथाहून मनाने विठ्ठलपंथ स्वीकारला. व शके १२१७ आषाढ शुद्ध ११ ला संत नामदेवाचे हस्ते वारकरी पंथ दीक्षा पंढरीस घेतली.

शके १२१४ संत नरहरी सोनाराने नाथपंथ सोडून विठ्ठलपंथ स्विकारला. (नंतर गोरोबाने)
शके १२२३ संत सेना न्हावी रीवा खंडातील बांदूगडचे होते.

अशा रीतीने जन्मलेल्या संतांनी इतर आपआपले पंथ सोडून संत नामदेवाच्या विठ्ठलपंथात प्रवेश करून त्याचे अनुयायित्व ज्ञानेश्वरादिक सर्वांनी पत्करले, या पंथाचे लोक १. पंढरीक्षेत्र, २. भिमा उर्फ चंद्रभागानदी, ३. विठ्ठल दैवत, ४. एकादशी व्रत, ५. भक्त पुंडलिक, ह्या पाच गोष्टी क्षेत्र, तीर्थ, देव, व्रत व भक्त यात अनुक्रमे सर्वश्रेष्ठ मानतात, व चतुश्लोकी भागवत, ज्ञानेश्वरांचा हरिपाठ, तुकोबाची गाथा ही मूळ प्रस्थानत्रयी असून अलीकडे एकनाथी भागवत, ज्ञानेश्वरी व तुकोबा गाथा मानायला लागले.

महानुभव पंथ :-

ता. २० ऑगस्ट १२२१ म्हणजे शके ११४२ भाद्रपद शुद्ध द्वितीयेस दुपारी १२ वाजता चक्रधर प्रभू जन्मले, व शके ११६२ ते ११८९ चक्रधरप्रभूचा एकांक काळातील भ्रमणकाळ होय. शके ११८९ ते ११९२ असा तीन वर्षे सहा महिने चक्रधर लिळा चरित्र पूर्वार्ध काळ होय, व शके ११९२ ते ११९६ म्हणजे सन १२७४ पर्यंत उत्तरार्ध काळ होय.

शके ११५५ मध्ये चक्रधर गुजराथेहून महाराष्ट्रात आले. यांच्या महानुभाव पंथाने महाराष्ट्रात प्रथमच समता प्रस्थापित केली. व्रत-वैकल्याचा अतिरेक, सामाजिक विषमता, मुठभर लोकांची संस्कृत देववाणीची मिरास ह्या विरुद्ध बंड पुकारले. लिळा चरित्र (शके ११९८ ते १२०४) म्हाईभट्टांनी ऋद्धिपूर जिल्हा अमरावतीस लिहिले. शके १२१० मध्ये केशिराजाचा सिद्धांत सूत्रपाठ, शके १२११ मधील महदायिसांचे धवळे उर्फ महदंबेचे धवळे हा मराठीतील आद्य स्त्री-ग्रंथ होय.

या पंथाचे श्री. नागदेवाचार्य हे प्रथम आचार्य होत. शके ११८१ मध्ये लोणारला कृष्णदेव यादव व चक्रधरांची भेट झाली. पंथियांच्या मते शके ११५५ चैत्र शुद्ध १५ ते ११८६ पौष शुद्ध पौर्णिमा हा चक्रधर चरित्रातील एकांक काळ होय. याच दिवशी पैठणास त्यांनी संन्यास घेतला. व ४ वर्षे १ महिना पूर्वार्ध व ४ वर्षे ४ दिवस उत्तरार्ध काळ होय माघ कृष्ण ४ शके ११९४ त बेलापूरहून निघाले. एकूण ५२ वर्षे श्री. चक्रधर प्रभू जगले. शके ११९० मध्ये श्री. नागदेवाचार्यांना संन्यास दीक्षा दिली.

शके १२०९ माघ कृष्ण २ ला गोविंदप्रभूंनी देहत्याग केला.

१) आद्य आचार्य श्री. नागदेवाचार्य (वय ६६ वर्षे). बत्तीसावे वर्षी अनुसरण, ४ वर्षे गोसावी संगतीत, १४ वर्षे गोविंद प्रभू संगतीत, नंतर १६ वर्षे धर्मप्रचार असे एकूण ६६ वर्षे जगले.

२) द्वितीय आचार्य कविश्वर व्यास होय. यांचे मूळ नाव भानुभट बोरकर. हे बुलढाणा जिल्ह्यातील मेहेकर तालुक्यातील बोरी गावचे मूळ रहिवासी होय. त्यांनी शिशुपालवध व उद्धवगीता हे दोन ग्रंथ लिहिले.

श्री चक्रधर प्रभूंचा जन्म शके ११४२, गुरूवेध शके ११५५, निर्याण शक ११९४ यांचे नंतर आद्य आचार्य नागदेव भट पूरीकर कारकीर्द शके ११९४ ते १२२४ पर्यंत. यांचेनंतर पंथाची दोन शाखात विभागणी झाली. यापैकी कमळाऊसा उपाध्येची शके १२५० पर्यंत व कविश्वर भानुभट बोरीकरांची शके १२४५ पर्यंत कारकीर्द होय. या कविश्वर भानुभट बोरीकर शाखेत शके १२२४ पासून शके १८९६ पर्यंत एकूण ३० आचार्य झाले. तसेच, दुसऱ्याही शाखेत झाले.

लेवा पाटीदार या जातीचे काही लोक जाळीचा देव येथे दरवर्षी जातात. खानदेशस्थ लेवा पाटीदारात बाह्मनोद परिसरात या पंथाचे अनुयायी जास्त आहेत.

या पंथात प्रमुख तीर्थस्थाने फलटण, डोमेग्राम, पैठण, माहूर, ऋद्धिपूर आदी स्थाने आहेत.

१. हंस अवतार, २. भगवान दत्तात्रय, ३. भगवान श्रीकृष्ण चक्रवर्ती, ४. श्री. चक्रपाणी महाराज, ५. श्री. गोविंद प्रभु महाराज, ६. सर्वज्ञ चक्रधर स्वामी हे प्रमुख अवतार होत. त्यापैकी

लेवा पाटीदारांना जवळचे तीर्थ श्रीक्षेत्र जाळीचा देव, पोस्ट मढ, तालुका व जिल्हा - बुलढाणा येथे श्री. मुरारी मल्लबाबा महानुभाव व सुदामराज पंडित महानुभाव हे महानुभाव साहित्याचे प्रकाशक आहेत. अधिक माहितीसाठी 'महानुभावांचा इतिहास' लेखक- मुरलीधर महानुभाव काळपकर (उपाध्ये), माणिक निवास, मेघराज नगर, लातूर, जिल्हा उस्मानाबाद (धाराशिव). हा शके ११४२ ते १८९४ पर्यंत ७५२ वर्षांचा महानुभावांचा इतिहास पहा). पत्ता : श्री बाबाराव गुरुनाथ आंबेकर, माणिक निवास, मेघराज नगर, लातूर येथे हा ग्रंथ मिळेल. तसेच, संक्षिप्त महानुभाव परिचय लेखक व प्रकाशक महंत गजधर बुवा विद्वांस, महानुभाव आश्रम, मु+पोस्ट = संवत्सर, तालुका = कोपरगाव, जिल्हा = अहमदनगर. तसेच, डॉ. विष्णु भिकाजी कोलते, डॉ. य.खु. देशपंडे, ह.ना. नेने; वा.ना. देशपांडे या लेखकांनी ह्या पंथीय साहित्याचे बरेच संशोधन केले. तसेच, माझे साहित्यिक मित्र- डॉ. अण्णासाहेब अडसांडे. महानुभाव विश्वभारती, नांदगाव खंडेश्वर (अमरावती) पिन - ४४४७०८, महाराष्ट्र (भारत) यांनाही भेटल्यास माहिती मिळू शकेल.

वारकरी पंथाचे अगोदर पुरोगामी परिवर्तनाचे कार्य व प्रभावी साहित्यनिर्मितीचा प्रारंभ या पंथाने केला. वर्णाश्रमातील विषमता घटविण्याचे कार्य व एतेद्देशीय मराठीस धर्मपंथभाषा स्थान देण्याचे कार्य यामुळे हा पंथ एकेकाळी लोकप्रिय ठरला होता. स्त्री-शिक्षणाचा प्रारंभही यांनी केला होता.

श्री. सत् पंथ संप्रदाय (उर्फ पीराणा पंथ) :- इ.सन १५ व्या शतकाच्या मध्यास 'इमामशहा' महाराज नावाचे एक प्रसिद्ध औलिया होऊन गेले. यांचा जन्म हिजरी सन ८५६ म्हणजे इ.सन. १४५२ मध्ये पंजाबात 'उंच मूलतान' गावी झाला. इमामशहा हा कबरूद्दीनच्या तिसऱ्या बायकोचा तिसरा पुत्र होय. त्याचे मूळ नाव सैय्यद अब्दूल रहिम होते. तारुण्यात त्यांना 'इमाम' म्हणत. पुढे त्याचे शिष्य लोक त्याला 'इमामशहा' म्हणू लागले. त्याने सत्पंथी लोकांचे मुख्य आणि परम पवित्र तीर्थस्थान 'पीराणा', 'इमामपूर', 'हेमपूर', 'निष्कलंकीधाम', कुमारिका क्षेत्र वगैरे नावाने ओळखतात. सत्पंथ संस्थापक इमामशहास १. संत भाभाराम, २. साध्वी कीकीबाई, ३. संत नायाकाका, ४. संत शाणाकाका हे चार मुख्य शिष्य होते. इमामशहानंतर संत शाणा काका हे पीराणा येथील गादीवर बसले होते. **या गादीवर पाटीदारच गादीपती म्हणून बसत आले.** सत्पंथात पाचीया, सातीया, आठीया हे भाग आहेत. इमामशहा स्वत: सय्यद फकीर होते.

सद्गुरू इमामशहानी मुलतानच्या खोजापुढे शपथ घेतली की, मी एकाही मुसलमानाला उपदेश देणार नाही, व ते वचन त्यांनी जन्मभर आचरणात आणले.

सत्पंथ घटपाट पूजा विधित घृताच्या तीन ज्योती लावून त्याचे एकरूपतेने,ध्यान करणे ही निर्गुणोपासना व कलश घटपाट पूजाविधी आहे. कलियुगात पश्चिम दिशा पूजनीय, ध्यान करण्यास श्रेष्ठ; मातीचा घटपाट, कलशपूजा व अवतार पात्र एकच श्री. निष्कलंकी नारायण होय. कलियुगात प्रेत संस्कार क्रिया दफन पद्धतीने करतात. शुक्रवार चंद्रदर्शनाचे व्रत, उपवास करणे, भूमीदाग (दफन)*करणे हा आचार आहे.

सय्यद इमामशहाप्रणित मार्गाच्या आचरणामुळे त्यांना वाटलेले मुसलमान समजून त्यांची विटंबना झाली. त्यांच्याशी रोटी-बेटी व्यवहार बंद करून त्यांची मानहानी केली. कित्येक ठिकाणी गुप्त रीतीने हा पंथ पाळण्याची अंध परंपरा आहे. समाजातील उच्चभ्रू लोकांनी या ज्ञानमार्गाची उपेक्षाच केली. इतर समाजबांधवांनी त्यांचा तिरस्कार करून अवहेलना केली.

या पंथाच्या अनुयायात हिंदूच आहेत. त्यात लेवा, कडवा, पाटीदार, मराठा, गुजर, राजपूत, भावसार, माळी, बारी, कासार, सोनार, राणा, काछीया, कोळी, रबारी जाती असून कच्छ, सौराष्ट्र भावनगर, खंबात, उत्तर गुजराथ, साबरकाठा, दक्षिण गुजराथ, काठा विभाग, खानदेश, मध्यप्रदेशात नेमाड विभाग व बनास काठा, विदर्भात आकटे, अंजन भागात या पंथाचे अनुयायी आहेत. पिराणा

हे मुख्य तीर्थ व गुजराथमध्ये भाभाराम (देव), कीकीबाई (रूण), नायकाका, (कुकस) ही तीर्थे आहेत, व भावनगर अंगीया, कादिया, खंबात, आवारवल, सुरत, वडाली गावी यांची मंदिरे आहेत. शिक्षित समाज यापासून बराच दूर राहतो. या पंथाची सविस्तर माहिती फैजपूरच्या मंदिरात मिळते. अहमदाबादपासून ११ मैलावरील पिराणा गाव या पंथाचे मूळ स्थान आहे.

पीरशमच्यानंतर पीर सदरुद्दीनपासून जे लोक इस्लामी धर्म प्रसारार्थ भारतात आले त्यांनी त्यांच्या धर्मप्रसाराच्या विशिष्ट पद्धतीला 'सत्पंथ' हे नाव दिले.

इमामशहाच्या शिष्यसमुदायाचा 'इमामशाही पंथ' किंवा 'सत्पंथ' किंवा 'पीराणा पंथ' याचे अनुयायी फक्त हिंदूच आहेत.

प्रत्येक शुद्ध द्वितीयेस चंद्रदर्शन, उपवास, पूजाविधी असतो. शुक्रवारी चंद्रदर्शन झाल्यास गुरुवार व शुक्रवार असा दोन दिवस निरंकार, निर्जल उपवास करतात. दसवंत (स्वकष्टार्जित कमाईचा दहावा भाग), सुक्रित (विसावा भाग) पूजेत गुरूमुखीच्या हस्ते धर्मास अर्पण करतात.

काहींच्या मते २७ सफर ८४४ हिजरीत जन्म व २५ रमजान ९१९ हिजरीत मृत्यू झाला असे मानतात. 'तवारीखे पीर' च्या लेखकाने हिजरी सन ८५६ तारीख २७ माहे रबी उस्मानीत दर्शविला आहे. इमामशहा गुजराथेत हिजरी सन ८६३ ते ९१७ म्हणजे इ.सन १४५८ ते १५११ या काळात महंमद बेगडाचे कारकिर्दीत आले. कबरुद्दीनच्या सात बायकापासून त्याला अठरा अपत्ये झाली. त्यापैकी तिसऱ्या पत्नीचा हा तिसरा मुलगा होय. हे दिल्लीस गेले तेव्हा तेथे बहलोल लोदी या धर्मवेड्या अफगाणाचे राज्य होते. बॉम्बे गॅझेटियर, हिस्ट्री ऑफ गुजराथ, श्री सत्पंथ संप्रदाय स्वरूप व कार्य लेखिका- सौ. ज्योति सुरेश पाटील, सद्‌गुरू इमामशहा महाराज जीवनवृत्तांत या ग्रंथातून इमामशहाचे चरित्र कळते. इमामशहांनी दिल्ली ते भोपाळ, इंदूर, निमाड, बऱ्हाणपूर, खानदेश, सोनगढ, लाछोरा, नवसारी, सुरत, कानम, खंबायत, भावनगर, जुनागड, राजकोट, बडोदा, पेटलाद, देवा या भागात त्यांनी सत्पंथ प्रचार केला. रमजू कसाई, गोजरी अहिरण, मनरवाडी अहिर येथेही ते गेले.

संत इमामशहाला बाई बुढाई नावाची एक बहीण होती. संत इमामशहाची अकरावी पिढी हल्ली विद्यमान आहे.

गुजराथेत अहमदाबादपासून सात कोसावरील ग्रीमथा गावी अवर्षण काळात त्यांनी पावसाचा योग सांगितला, व त्याप्रमाणे योगायोगाने पाऊस पडला. त्यामुळे तेव्हापासून त्या अवर्षणग्रंस्थ लोकांची यांचेवर दृढ श्रद्धा बसली. यांच्या ज्येष्ठ मुलास महंमद बेगडाची कन्या दिली होती. शिक्षापात्री, मूलबंध, गोरवाणी, योगवाणी हे यांचे धर्मग्रंथ आहेत.

या गादीवरील हल्लीचा धर्मगुरू एक लेवा पाटीदार बालब्रह्म चारी साधू असून त्यास काका म्हणतात. (बॉम्बे गॅझेटियर व्हॉल्यूम चार पहा).

गुजराथेत जन्मलेल्या या पंथात लेवा पाटीदार जास्त आहेत. गुजराथेतून लेवा पाटीदार खानदेशात या पंथासह इकडे आले. बऱ्हाणपूरजवळील बहादूरपूरमधील उरूसात बरेच जातीधर्मीय असतात. खानदेशात सुमारे १०० कुटुंबे सत्पंथीय आहेत. इ.सन १९२३ चे सुमारास फैजपूर तालुका यावल, जिल्हा जळगाव येथील आत्मानंद ब्रह्मचारी हिंदू साधूने ह्या पंथाविरुद्ध लोक जागृती केली, तेव्हा सत्पंथानुयायी आनंदा लहानु किरंगे यांनी इ.पि. कोड कलम २९८ व ५०० या कलमाखाली जळगावचे कोर्टात फिर्याद दाखल केली होती. आरोपीवर गुन्हा शाबित होऊन त्यास ५०० रु. दंड झाला व तो मुंबई हायकोर्टात कायम राहिला. त्या खटल्याची सर्व हकिगत 'सत्पंथ विजय' (आत्मानंदावरील फौजदारी खटला). प्रकाशक- नाटू देवराम महाजन, फैजपूर सन १९२६ या लेवा पाटीदाराचे ग्रंथात सविस्तर पहा.

सत्पंथीय फिर्यादी आनंदा वल्लद लहानु किरंगे उमर ३६ जात लेवे पाटीदार या फैजपूर ता.

यावल, जि. जळगाव विरुद्ध बदरिकाश्रम ज्योर्तिमठस्थ नंदलाल संप्रदायी आत्मानंद ब्रह्मचारी, खंडेरावची वाडी मु. फैजपूर, ता. यावल, जि. जळगाव, जात हिंदू या आरोपीविरुद्ध गुन्हा इंडियन पीनल कोड कलम १५३ अ, २९८ व ५०० प्रमाणे फिर्यादी कोर्टात फौजदारी तारीख ९ जानेवारी १९२३ रोजी दाखल करतो.

भोरगाव लेवा पंचायतीत ५००० जातभाईचे उपस्थितीत भोरगाव पंचायतीचे व्यवस्थापक श्री. भिकू पाटील कुटुंबनाईक यांनी पंचायतीची कार्यवाही सभेत वाचून दाखविली. सत्पंथी लोक गावाच्या उत्तरेला व इतर पाटीदार दक्षिणेला मुडदे गाडतात, अशी फिर्यादीची ता. ४-५-१९२३ रोजी श्री.जी.एस. राजाध्यक्ष मॅ.वर्ग, पूर्वभाग यांचे कोर्टात जबानी झाली होती. व आमच्या पंथीयास पूजास्थानी म्हणजे धर्मशाळेत हिंदू देवांच्या मूर्ती नसतात. जळगवच्या प्रबोधचंद्रिका या वर्तमानपत्रात ता. ४ डिसेंबर १९२२ च्या अंकात पान ६ वर हा धर्म मुसलमानी धर्माचा भाग आहे, ही गोष्ट ता. १३-२-१८८३ रोजी धुळे कोर्टात शाबित झाल्याचे म्हटले आहे. लेवा हिंदूंनी सत्पंथीयांशी रोटीबेटी व्यवहार करू नये असे त्यात आवाहन केले होते. ता. २४-१२-१९२२ रोजी समस्त लेवा पाटीदार भोरगाव पंचमंडळी व कुटुंबनायक मुक्काम पाडळशे यांची रविवार ता. २४.१२.१९२२ रोजी सभा झाली. त्यामध्ये सत्पंथी धर्म हा वैदिक धर्मबाहय आहे म्हणून तो धर्म जातीच्या सर्व लोकांनी सोडावा असे आवाहन केले. ते न मानणाऱ्या ९१ लेवा पाटीदारांना भोरगाव पंचायत पाडळशे यांनी जाती बहिष्कृत केले होते.

आत्मानंद गुरु प्रेमानंद जात- ब्राह्मण, उमर ३०, राहणार फैजपूर, हा आरोपी होता. प्रेत संस्कारात हिंदूंचे डोके दक्षिणेला व तोंड पूर्वेला तर सत्पंथीयांचे डोके उत्तरेला व तोंड पश्चिमेला असते. मेहेरबान जी.एस. राजाध्यक्ष मॅजिस्टेट वर्ग १ व प्रांत मॅजिस्ट्रेट, पूर्वविभाग खानदेशचे जळगाव कोर्टाचा निकाल, खटला नं. १२, सन १९२३, सरकार विरुद्ध आत्मानंद गुरु प्रेमानंद ब्रह्मचारी वस्ती फैजपूर कलम ५०० इ. पि. कोड :-सत्पंथीय हे लेवा पाटीदार या कुणबी जातीचे हिंदू आहेत. सत्पंथाचे चार-पाच उपपंथ आहेत. त्यापैकी अहमदाबाद जिल्हयातील गिरमथा गावच्या या पंथ संस्थापक इमामशहा चे या पंथाचे आद्यपीठ अहमदाबाद जिल्हयात पिराणा येथे ठेवले. तोताराम बधु (भारंबे) महाजन उपाध्यक्ष फैजपूर नगरपालिका या सत्पंथी इममास पंचायतीने २१३६ रु. दंड केला. इ.सन १९७५ ला जातीबाहेर टाकले. सत्पंथीय लोक हिंदू पद्धतीच्या उलट बाजूने मृतास पुरतात; रमजान व मुसलमानी रोजे पाळतात. ते नमाज पडतात. पिराणा येथे जातात. कुराणातून ते कलमा म्हणतात असे आरोपीचे म्हणणे आहे. लेवा पाटीदारांचा कुटुंबनायक भिका सवंदू पाटील हा सत्पंथी तोताराम बधु (भारंबे)चा नातेबाईक आहे. सत्पंथी लोकांचा प्रमुख काका लक्ष्मण करमसीच्या मते शिक्षापात्री, मूळबंध व गुरुयामी हे यांचे पूज्यग्रंथ आहेत. गुजराथ गॅझेटियर खंड ९, भाग १ व अहमदाबाद गॅझेटियर, पान २८८, २९० मुंबई इलाख्यातील फिरत्या टोळ्या व जाती खंड २, पान १५५, बॉम्बे रिपोर्टर, सन १५८ यांचा विचार केल्यावर कोर्टाच्या मते यांना कैदेच्या शिक्षेची जरुरी नाही. आरोपीस ५०० रुपये दंड व तो दिल्यास तीन महिन्यांची साधी कैद सुनावली. ता. १५-११-१९२३ यावर धुळे येथील खानदेश सेशन जज्जचे कोर्टात क्रिमिनल अपील नंबर १७८ सन १९२३ चे अपिलाच्या निकालात वरील कोर्टाच्या निकालानुसार तो अपराध व ती शिक्षा कायम करतो व हे अपील रद्द करतो. असे जे स्कॉटमन सेशन जज्जने निकाल दिला.

आरोपीने मुंबई हायकोर्टात रिव्हीजन अर्ज नंबर १७५ सन १९२४ आनंद गुरु प्रेमानंद व ११ फैजपूर, अर्जदार विरुद्ध सरकार तारीख ९ जून १९२४ यावर एस.जी. देसाई, एस.ए. ४ मोबेड जिल्हा, ॲंड डेप्युटी रजिस्टर व डी.आर वाघ असिस्टंट शिरस्तेदाराच्या सह्या आहेत.

ह्या दाव्याचे मुंबई हायकोर्टाच्या निकालात आत्मानंद गुरु प्रेमानंद अर्जदार विरुद्ध सरकार ह्या खटल्यात हायकोर्टाचा हुकूम रिव्हिजनचा फौजदारी अर्ज नं. १७५, सन १९२४, कोरम:- शहा

ॲक्टींग चीफ जज्ज व फॉसेटजज्ज यांनी 'कादून टाकले'. सही एन.डी. चंद्र. रस्टिस्टर यांचे मुंबई हायकोर्टाचे मुंबई ता. २५-६-१९२४ रोजी निकालपत्र सही शिक्यानिशी दिले आहे. सदर माहिती 'श्री सत्पंथ संप्रदाय स्वरूप व कार्य' लेखिका- सौ. ज्योति सुरेश पाटील, जळगाव व सत्पंथ विजय (आत्मानंदावरील फौजदारी खटला) प्रकाशक नादू देवराम महाजन, फैजपूर, आवृत्ती सन १९२६ आधारे दिली आहे.

या दरम्यान कच्छी पाटीदार रामानी, शांखला, खुरानी, भवानी, लिंबाणी, पोकार, चोपडा आदि शाखात विभाजित होते. त्यांनीही पिराणा पंथ स्वीकारला होता. विक्रम संवत १५ व १६ व्या शतकात त्यांनी आपला मूळ हिंदूधर्म टाकून मुस्लीम मत स्वीकारले होते. इतर स्वजातीयाशी यामुळे संघर्ष होऊ नये. म्हणून गावोगावचे सत्पंथीयांनी स्थानांतरर करून शिकरू गावी जाऊन आपले सहोदर समान स्वधर्मियास मिळून एक नवी जात बनविली. गुरु मुस्लीम व आचार, पोषाख, रहन सहन रीत हिंदूचीच राहिली, व केवळ वार्षिक भेट पिराणास ते पाठवित. पुढे धर्मगुरु प्रागजी काकांनी त्यांना नखत्राणा गावी एकत्र सभा जमवून पौष वद्य १३ संवत १८३२ रोजी हिंदूधर्म त्याग करून मुस्लीम मतानुयायी बनविण्याकडे झुकविले. यामुळे त्यांची हिंदूधर्माशी असलेली नाळ तुटत गेली, व ते बहुअंशी मुस्लीमात परिवर्तित होऊ लागले. (गुजराथ सर्वसंग्रह, पृष्ठ १३७ ते ४२८ पहा) असे वर्णन डॉ. पटेल लिखित कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, पृष्ठ १३८ व १४० वरून कळते. अधिक माहितीसाठी "श्री सत्पंथ संप्रदाय स्वरूप व कार्य". लेखिका सौ. ज्योति सुरेश पाटील, जळगाव व "सत्पंथ विजय" प्रकाशक- नादू देवराम महाजन, फैजपूर हा ग्रंथ पहा.

स्वामी नारायण पंथ :- यानंतर स्वामी नारायण साधूंच्या संपर्कात आलेल्या रेवापर गावच्या केसरी पटेल यांना आपल्या पूर्वजांनी पीराणा पंथ स्वीकारण्याची चूक कळून आली. त्याने हिंमत धरून पिराणा पंथाचा त्याग करून स्वामी नारायण पंथ स्वीकारला. त्याला पिराणा पंथीय स्वकीयापासून बराच त्रास झाला. पण त्याने आपला हट्ट सोडला नाही. त्यानंतर स्वामी ज्ञानानंदने गाढ सीमाचे विख्यात पंडित पीतांबरजीचे सल्ल्याने एक एक गाव पिराणा पंथियांचे पंजातून मुक्त करून परत वैदिक धर्मानुयायी बनविले. स्वामिजींचे परदेश गमनानंतर पिराणा पंथियाकडून ह्या नवपरिवर्तीत वैदिक धर्मानुयायींना बराच त्रास झाला.

नंतर पिराणा पंथातून मुक्त होण्याचे कार्य श्री. नारायणजी रामजीभाई मिस्त्री, राहणार ग्राम विराणी, तालुका नखत्राणा यांनी केले. नारायणने राजकोटजवळील ढोलाराचे महानुभाव ज्योतिषी रामेश्वर मोरारजीच्या सहाय्याने काठीयावाडात बिल्खा गावी येऊन नथुराम शर्माचे सल्ल्याने आपल्या मित्रांसह नाशिकला प्रायश्चित्त घेऊन उपवित धारण केले. या ७ परिवर्तित जनास इतरांनी त्रास दिला. शेवटी स्वामी नारायण संप्रदायाच्या सहयोगाने शेकडो पिराणापंथी मूळ वैदिक धर्मात परत आले. त्यानंतर आपला पूर्वेतिहास जाणण्यासाठी शाहपूर इलाख्यात बारोट रामसिंहजी दोलजीद्वारा जुना इतिहास नखत्राणामध्ये पास झालेल्या प्रस्तावाने मिळाला.

स्वामी नारायण संप्रदायास उद्धव संप्रदाय असेही म्हणतात. या उद्धव संप्रदायाचे प्रवर्तक रामानंद स्वामी हे होत. रामानंद स्वामींचा जन्म संवत १७९५ (इ.सन १७३९) मध्ये अयोध्या येथे झाला. रामानंद स्वामींच्या पित्याचे नाव अजय व आईचे नाव सुमती असे होते. रामानंद स्वामींचे गुरु रामानुजाचार्य हे होते. या उद्धव संप्रदायाची स्थापना संवत १८११ (इ.सन १७५५) मध्ये झाली. या संप्रदायाचे उपास्य दैवत श्री. स्वामी नारायण भगवान हे आहेत.

श्री स्वामी नारायण भगवंताचा पिता 'देवशर्मा' उर्फ हरिप्रसाद हे हेत. मातेचे नाव 'बाला' उर्फ 'भक्ति' हे होते.

धर्मदेवाचे वडील बालशर्मा व आई 'भाग्यवती' हे होते. धर्मदेवाचा जन्म कोशल देशात इटारगाव येथे झाला. व भक्तिमातेचा अयोध्या प्रांतात 'छप्पैया' येथे झाला. भक्तिमातेच्या पित्याचे

नाव कृष्ण शर्मा व मातेचे नाव भवानी होते. धर्मदेवाचा जन्म संवत १७९६ (इ.सन १७४०) मिती कार्तिक शुक्ल ११ ला झाला. व भक्तिमातेचा जन्म संवत १९७८ (इ.सन १७४२) कार्तिक शुक्ल १५ ला झाला.

श्री. स्वामी नारायण भगवंत हे संवत १८३७ मध्ये चैत्र शुक्ल नवमीस दहा घडी रात्र व्यतीत झाल्यावर ता. ३ एप्रिल १७८१ रोजी अवतीर्ण झाले. स्वामी नारायणाचा जन्म उत्तर भारतात अयोध्याजवळ छप्पैया येथे झाला. स्वामी नारायणाचे वडील बंधू रामप्रताप, मधले स्वामी नारायण व धाकटे बंधू इच्छाराम हे होते. स्वामी नारायण भगवान 'सरवरिया' ब्राह्मण जातीचे होते. त्यांचा सामवेद होता व शाखा कौथमी होती. गोत्र सावर्णी होते. स्वामी नारायणांचे गोत्राचे भार्गव, सावेतस, वैतहव्य असे तीन प्रवर होते. मार्कंडेय ऋषीकरवी स्वामी नारायणांना हरि, कृष्ण, हरिकृष्ण, घनश्याम, निळकंठ ही नामे मिळाली. आठव्या वर्षी यज्ञोपवित संस्कार झाला. अकराव्या वर्षी अगोदर त्याची आई व सात महिन्यांनी वडिलांना दिव्यगती प्राप्त झाली. स्वामी नारायणांनी आईला संवत १८४९ मध्ये कार्तिक शुद्ध ११ (इ.सन १७९२) च्या दिवशी दिव्य गती दिली. व पित्याला संवत १८४८ मध्ये ज्येष्ठ वद्य ४ (इ.सन १७९२) ला दिव्य गती दिली. स्वामी नारायणांनी संवत १८४९ मध्ये आषाढ शुद्ध १० दिनांक २९ जून १७९२ रोजी गृहत्याग केला. स्वामी नारायण भगवान ११ वर्षे ३ महिने ३ दिवस घरी राहिले. नंतर मृगचर्म, कौपिन, मुंजेची कटिमेखला, एकहाती पलाश दंड व दुसऱ्या हाती कमंडलू, भिक्षापात्र, पाणी गाळण्यासाठी वस्त्राचा तुकडा, खांद्यावर यज्ञोपवित, गळ्यात तुलसीमाळा, शालिग्रामाचा बटवा व चार सारांचा गुटिका इतक्या साहित्यानिशी स्वामी नारायणांनी ७ वर्षे १ महिना, ११ दिवस वन, विचरण केले. या काळात संवत १८५६ मध्ये श्रावण वद्य ६ रोज बुधवारी संगवकाळी (इ.सन १७९९ रोजी) प्रथम लोज गावात आले. लोजगावात रामानंद स्वामीचे शिष्य मुक्तानंदादी ५० साधू पायविहिरीच्या परिसरात रहात होते. त्या स्वामी नारायण भगवान व रामानंद स्वामींची भेट संवत १८५६ ज्येष्ठ वद्य १२ तारीख १९-६-१८०० रोजी पिपलाना येथे झाली. तेथे कार्तिक शुद्ध ११ ता. २८-१०-१८०० रोजी रामानंदांनी स्वामींना महादीक्षा दिली. स्वामी नारायणांना सहजानंद व नारायणमुनी ही नावे मिळालीत. स्वामी नारायण जेतपूर येथे कार्तिक शुद्ध ११ ता. १६-११-१८०१ रोजी वयाच्या २० व्या वर्षी रामानंद स्वामींचे शिष्य म्हणून गादीवर बसलेत. रामानंद स्वामी 'फणेणी' येथे संवत १८५८ मध्ये मार्गशुद्ध १३ रोज गुरुवार ता. १७-१२-१८०१ ला अक्षर धामात गेले. व नंतर १) अहमदाबाद २) भूज ३) वडताल ४) धोलेरा ५) जुनागड ६) गढपूर येथे मंदिरे बांधलीत. स्वामी नारायणांनी वडताल प्रदेशाचे गादीवर पहिले आचार्य रघुवीर महाराज व अहमदाबाद प्रदेशाचे गादीवर १ ले आचार्य म्हणून अयोध्याप्रसादजींची निवड केली. स्वामी नारायणांनी संवत १८८२ माघ शुद्ध ५ वसंत पंचमीस दिनांक १२-२-१९२६ रोजी वडताळ येथे 'शिक्षापत्री' लिहिली. यात २१२ श्लोक आहेत. त्यात वैदिक धर्म प्रतिपादक स्वामी नारायण संप्रदायाचे बंधारण (नियम) आहेत.

२८ वर्षे ५ महिने २७ दिवस इतका सत्संग केल्यावर ४९ वर्षे २ महिने १ दिवस वय झाले. व श्री स्वामी नारायण भगवान संवत १८८६ ज्येष्ठ शुद्ध १० तारीख २८-६-१८३० रोजी अक्षरधामात गेले. वडताल गादीवर १. श्री रघुवीरजी महाराज, २. भगवत प्रसादजी महाराज, ३. बिहारी लालजी महाराज, ४. लक्ष्मी प्रसादजी महाराज, ५. श्रीपती प्रसादजी महाराज, ६. आनंदप्रसादजी महाराज व हल्लीचे विद्यमान असलेले ७ .नरेंद्र प्रसादजी महाराज हे सात आचार्य झाले, तर अहमदाबादचे गादीवर १. अयोध्या प्रसाद, २. श्री. केशव प्रसाद, ३. श्री. पुरुषोत्तम प्रसाद ४. श्री वासुदेव प्रसाद, ५. देवेंद्र प्रसाद, व हल्ली विद्यमान तेजेंद्र प्रसाद महाराज झालेत.

आपण आचार्य राजा, राजाची माणसे व स्त्रिया यांच्याशी कधीही वादविवाद घालू नये. स्वामिनारायण यांचे विशिष्ठ द्वैत मत होते. अधिक माहितीसाठी श्री. निळकंठदास (वडताल)

यांचा श्री भगवान, श्री स्वामी नारायण यांचे जीवनचरित्र ग्रंथ पहा. शास्त्रीजी महाराजांनी बोचासणजो श्री अक्षर पुरुषोत्तम संस्था संस्थापिली. संस्थेचे 'स्वामी नारायण अक्षरपीठ, शाहीबाग रोड, अहमदाबाद - ३८०००४ येथील स्वामी नारायण प्रकाश' मासिक, स्वामीनारायण पत्रिका नावाने साप्ताहिक, 'प्रेमवती' नावाचे त्रैमासिक ही प्रचारपत्रे निघतात. बोचासण तालुका बोरसद, जिल्हा खेडा गुजराथ हे अक्षर पुरुषोत्तम संस्थेच्या गादीचे मुख्य मंदिर आहे. अधिक माहितीसाठी 'स्वामिनारायण' मंदिरात आम्ही ७ एप्रिल १९८८ ला जाऊन माहिती मिळविली. अक्षरपीठ, शाहीबाग रोड, अहमदाबाद ३८०००४ येथील 'स्वामी नारायण प्रकाश' कार्यालयातूनही काही माहिती मिळाली. तसेच, कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, ले.- डॉ. पटेल यात एक प्रकरण आहे, ते कृपया पहा.

अशा रीतीने ४ अध्यात्मसंप्रदाय लेवा पाटीदारांच्या वेगवेगळ्या घटकांकडून आपआपल्या पसंतीप्रमाणे व्यक्तिशः निवडले आहेत. ह्यापैकी ज्यांना ज्यापैकी पंथाबाबत अधिक माहिती हवी असेल त्यांनी **१) वारकरी पंथाबाबत :-** १. पंढरीस येणाऱ्या भाविकांसाठी मार्गदर्शिका, प्रकाशक- एम्. रामस्वामी आय.ए.एस. कार्यकारी अधिकारी श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र, २. वारकरी पंथाची चैतन्य संप्रदाय परंपरा (साद्यंत झेंडुजी बेळीकर शाखा) पृष्ठ ३५ + २०१ मूल्य १०० रु., लेखक- शंकर विठोबा पाटील, संचालक चैतन्य प्रकाशन, दुधलगाव बुद्रूक, ता. मलकापूर जिल्हा बुलढाणा, (महाराष्ट्र) पिन ४४३१०१ हा ग्रंथ व ह्याच प्रकाशनाचा ३. शंकर विठोबा पाटील लिखित 'वारकरी पंथाचा इतिहास' (कालसूचीसह) पृष्ठे ३४ + १९९ मूल्य ७५ रु. हे तीन ग्रंथ पहा.

२) तसेच, महानुभाव पंथाबद्दल :- १. महानुभावांचा इतिहास, लेखक- मुरलीधर महानुभाव कोळपकर पृष्ठे ४१५, मूल्य ६० रु. पत्ता : महंत श्री. प्रभाकर महानुभाव पुणेकर, श्रीकृष्णमंदिर ३५८, गणेश पेठ, पुणे २, २. महानुभाव तत्त्वज्ञान (१९४५) लेखक- डॉ. विष्णु भिकाजी कोलते ५६५ जुनी रामदास पेठ, मधुबन, नागपूर २०, फोन ५२१०९५, ३. संक्षिप्त महानुभाव परिचय, प्रकाशन- म. राजधर बुवा विद्वांस, परभार्ग साहित्य प्रकाशन. महानुभाव आश्रम. मु + पोस्ट = संवत्सर, ता. कोपरगाव, जिल्हा - अहमदनगर, महाराष्ट्र, पिन - ४२३६०३

३) स्वामी नारायण पंथासाठी :- श्री स्वामी नारायण यांचे संक्षिप्त जीवन चरित्र, लेखक व प्रकाशक- शास्त्री निळकंठदास (वडताल) गुजराथ,. २) स्वामी नारायण, पत्ता- अक्षर पुरुषोत्तम संस्था मंदिर, बोचासण, ता. बोरसद, जि. खेडा गुजराथ, ३. स्वामी नारायण प्रकाश, स्वामी नारायण अक्षर पीठ, शाहीबाग रोड, अहमदाबाद- ३८०००४

४) सत्पंथाबाबत:- १) सत्पंथ विजय, प्रकाशक- नाटू देवराम महाजन, फैजपूर तायावल जिल्हा जळगाव, २. श्री सत्पंथ संप्रदाय स्वरूप व कार्य, लेखिका- सौ. ज्योति सुरेश पाटील, प्रकाशक- आचार्य श्री जगन्नाथ महाराज सत्पंथी मंदिर फैजपूर, ता. यावल, जिल्हा जळगाव ३. आचार्य श्री करसनदासजी महाराज गादीपती, इमामशहा महाराज संस्थान, शुभस्थान, पीराणा पीठ, जि. अहमदाबाद येथील अनेक ग्रंथ पहा, व महात्मा सत्गुरू इमामशहा जीवनवृत्तांत लेखक गुरुवर्य पुरुषोत्तम गुरु धर्माबुवा महाराज श्री सत्पंथ मंदिर फैजपूर, ता. यावल, जिल्हा जळगाव, प्रकाशक- इच्छाराम यमाजी झोपे सन १९६७ मु. पोस्ट खिरोदे, हे ग्रंथ पहा.

या चार पंथाशिवाय इतर पंथाची लेवा पाटीदार जातीत सामुहिक उपासना संघटितपणे झाल्याचे दिसत नसल्याने त्यांची माहिती देण्याची गरज नाही.

प्रकरण १८

लेवा वंश-विस्तार (थोड्या पुरवणीसह)

स्वायंभूव मनुप्रजापती + त्याची पत्नी शतरुपा ही आद्य मानव समाजातील सुसंस्कृत मनुर्भारत वंशाची पहिली पिढी होय. ह्या स्वायंभूव प्रजापती मनुपासून ४५ वे पिढीतील दक्षराजापर्यंत मनुर्भरत वंशाचा काळ हा सत्ययुगीन देव दानवाचा काळ मानतात. ह्या काळात चातुर्वर्ण्य जन्मले नव्हते. वर्ण व जातींचा उगम झाला नव्हता. त्या काळात मानवाची पहिली अवस्था शिकारी अवस्था होती. त्यानंतर पशुपाल अवस्थेत मानव गेला. ही मानवी प्रगतीची दुसरी अवस्था. ह्यानंतर कृषीचा शोध लागून तिसरी कृषक व्यवस्था ही मानवी प्रगतीची पुढची झेप, कुटुंबी अवस्था, स्थायी जीवन, कृषीकर्म म्हणजेच कुर्मी जीवन ही मानवी प्रगतीची नंतरची झेप होय. ह्या कृषक अवस्थेत शेती व पशुधन, संपत्ती, जीवन संरक्षक क्षत्रिय वर्ण निर्माण झाला. संपत्ती संचयास प्रारंभ झाला.

"कृषक क्षत्रियोसेही चिन्तनशील प्रबुद्ध ब्रह्मज्ञानी लोग निकले जो ब्राह्मण कहलाते गये।" कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, लेखक- डॉ. रामसिया सिंह, पृष्ठ १२, परिच्छेद ४ मध्ये संशोधन संकेत सादर करतात. या कृषक क्षत्रियांचीच चिंतनशील मुले ब्राह्मण म्हणून उदयास आली. म्हणजेच ब्राह्मणवर्गाचा जनक वर्ण कृषक क्षत्रिय असल्याने कृषक क्षत्रियांची गोत्रे ब्राह्मण वर्णास अनायसेच मिळाली. याबाबत साप्ताहिक सहारा, दिवाळी अंक १९९६, पृष्ठ ३१ वरील क्षत्रिय मराठा समाज शहाण्णवकुळी देवक-देवता-गोत्रे व प्रवरे, संकलन- वसंतराव शिंदे संपादक, साप्ताहिक सहारा, यमुनानगर, सेक्टर नं. २१, स्कीम नंबर ६, बिल्डिंग नं. ३६, फ्लॅट नंबर ९ प्राधिकरण, निगडी, पुणे ४११०४४, दूरध्वनी - ७७२४२८ वर चौकशी केल्यास आपणास स्पष्टीकरण लाभेल. श्री. शिंदे पुढे म्हणतात की ब्राह्मणांची गोत्रे सप्तर्षी वंशोद्भव समजतात. हे सात ऋषी प्रामुख्याने क्षत्रियच होते व याहूनच राजर्षीचे ब्रह्मर्षी होण्याचा तो काळ होता. सविस्तर स्पष्टीकरण शिंदेच्या या लेखात पृष्ठ ३१ व ३२ वर पहा.

कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, पृष्ठ १४ वर लिहिले आहे की "कूर्म कश्यपको संपूर्ण मानव जातीका पूर्वज कहना उचित है। संसारकी सारी जातिया कूर्म कश्यपसे उत्पन्न हुई है। परंतु, अपने मूल पुरुष को भूल गई है। कूर्म कश्यपकी संतान कूर्मी जाती उस आदी पूर्वजके नामपर स्वयंमको कूर्मवंशी, कूर्मी, काश्यप, काश्यपगोत्री आदी मानवी और कहती है। महान गोत्र प्रवर्तक कूर्म कश्यप की कीर्ति अमर है।

"मूल गोत्राणि चत्त्वारि समुत्पन्नानि भारत।
अंगिरा, कश्यपश्चैव वशिष्ठो भृगुरे वच ॥७॥
कर्मतोऽन्यानि गोत्राणि समुत्पन्ना नि पार्थिव।
नामधेयामि तपसा तांनि च ग्रहणं सताम ॥८॥

महाभारत, शांतिपर्व: २९६/१७-१८

महाभारतानुसार प्रारंभी फक्त ४ च मूळ गोत्रे होती.

कश्यप चुकि संपूर्ण मानव जाति के आदि पुरुष थे। अत: उनका गोत्र सर्वाधिक प्राचीन, लोकप्रिय और बडा है। कश्यप और कूर्म दोनो एकही शक्तिके दो पहलू है।

"(समस्त भू:) परमेश्वर भेद सकल जगत क्रियते तस्मात्तस्य कूर्म इति संज्ञा। कश्यपोवै कूर्म इत्यनेन परमेश्वरस्यैव कश्यप इति नाम्नास्ति।" (ऋग्वेदादि भाष्य भूमिका, पृ. ३१५ असा कूर्मवंशी

कीर्तिकथा, पृष्ठ १५ वरील हवाला स्पष्ट करतो.

राजर्षि कूर्म सुप्रसिद्ध वैदिक ऋषी गृत्समदके सुपुत्र थे ।। कूर्मो गार्त्समदो गृत्समदो वा ऋषि । ऋग्वेद १/२७ पहा. (कू.कि.कथा, पृष्ठ १६ ले.सिंग), यावरून अतिप्राचीन काळी त्या महान कूर्म ऋषींचे वंशज कुर्मी गणले गेले. डॉ. सिंह, पृष्ठ १७ वर लिहितात की, "महर्षि कश्यपाची पत्नी दक्ष प्रजापतीची अदिती नावाची कन्या होती. दक्षाची कन्या म्हणून दाक्षायणीही म्हणत." ऋग्वेद मंडल ४, सूक्त १८ चा मंत्र ७ वा अदिती विरचितच आहे. तसेच, ऋग्वेद मंडल १०, सूक्त ७२ चा मंत्र १९ दाक्षायणी अदितीचे नावावर आहे या अदिती सुतांनाच आदित्य म्हणतात. त्यातील ज्येष्ठ पुत्र वरुण होता. यालाच पुराणात ब्रह्मा म्हणतात. (कूर्मवंशी कीर्तिकथा, पृष्ठ १७ पहा).

या अदितीचा धाकटा पुत्र विवस्वान हाच वैवस्वत मनु होय दक्षाची ४५ पिढी तर कश्यप + अदितीची = मानवजातीची ४६ वी पिढी होईल, व वैवस्वत मनु ४७ वे पिढीतील आद्य सूर्यवंशी पिढी गणली जाईल.

ऋग्वेदाचे प्रथम मंडलाचे ९९ वे सूक्त कश्यपानेच रचले आहे. हली कश्यपाचे ७२ मंत्र ऋग्वेदात मिळतात. अशा ह्या अदिती कश्यपापासून झालेला विवस्वान ह्याच.. पर्यायाने ४७ वी पिढी येईल. व वैवस्वत मनुची ४८ वी पिढी म्हणजे सूर्यवंशातील दुसरा वंशज मनु ठरेल. व सूर्य वंशातील ३९ वा वंशज प्रभू रामचंद्र होता. विष्णु पुराणाप्रमाणे ६५ वा वंशज प्रभू रामचंद्र होता तर वाल्मिकी रामायणानुसार तो ३९ वा सूर्यवंशीय वंशज मानतात.

म्हणून ४५ + ३९ = ८४ वी पिढी धरल्यास त्याचा पुत्र लवाची ८५ वी पिढी ठरेल. भगवान मनू (४८ वी पिढी) चा प्रथम पुत्र ईक्ष्वाकूने आपले राज्य अयोध्येत संस्थापिले (कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, ले.- डॉ. मं.रा. पटेल, पृष्ठ ४४, ओळ २ री पहा). म्हणजेच **पूर्वी भारताबाहेर कश्यपकाळात कास्पियन समुद्रापासून** (पारस का इतिहास, हिस्ट्री ऑफ पर्शिया खंड १, पृष्ठ २८ चा, डॉ.सिंह निर्देश करतात). **हिमालयापर्यंत भारत असावा.**

दक्षानंतर सप्तसिंधू प्रदेशात वास्तव्य व या काळात हा कूर्मवंशी क्षत्रिय उर्फ कूर्मी समाज या नावाने महशूर होता, पण अयोध्येस गेल्यावर आदित्यवंशी म्हणून सूर्यवंशी २ री पिढी, कूर्म क्षत्रिय नावाने ओळखू लागले, व सूर्यवंशी हे नाव अयोध्येस गेल्यापासूनच गाजले. पुढे सूर्यवंशात ४० वी लवाची पिढी हीच मानव वंशाची ८५ वी पिढीपासून अयोध्या सोडून तो वंश पंजाबात लाहोर येथे वस्तीस राहिला. त्या परिसरात कास्पियन समुद्राकडून आलेली गुर्जर क्षत्रिय टोळीही याच सप्तसिंधू प्रदेशात उतरली. ते स्थान गुजराथ शहर म्हणून हल्ली पश्चिम पंजाबात एक प्रमुख शहर आहे. क्षत्रिय आर्यांचा भारत प्रवेश झाला व ते मूल स्थान (मूलतान) स्थळी उतरले. कालांतराने याच आर्योद्भव कूर्म ऋषीचा वंश म्हणून कूर्मी म्हटले व पुढे क्षात्रकर्मामुळे क्षत्रिय गणले. या कूर्मी समाजाच्या क्षत्रिय सूर्यवंशी टोळीने अयोध्या वसविली. तिचा नेता ईक्ष्वाकू हा होता. **मानव वंशाचे ८५ वे पिढीतील (सूर्यवंशाची ४० वी पिढी) लव पंजाबात गेला. त्याने लवपूर उर्फ लाहोर वसविले. लवानंतर ५५ वे पिढीतील (म्हणजे मानवंशातील १४० वे पिढीतील) शेवटचा राजा सुमित्र हा इ.सन पूर्व ७८ चे सुमारास सत्ताहीन झाला.**

इ.सन पूर्व १८०० मध्ये असीरियांची सम्राज्ञी सेमिरामिसने पंजाबवर स्वारी केली होती. कालांतराने मिश्रदेशाचा राजा सेसोट्रिसने पंजाबवर स्वारी केली. पुढे इ.सन पूर्व ५१८ मध्ये ईराणचा पारशी राजा दरवेश गुस्तास्पेने पंजाबवर स्वारी केली. नंतर इ.सन पूर्व ३३७ मध्ये ग्रीसमधील सिकंदरने पंजाबचा राज पोरसवर स्वारी केली. त्यानंतर त्याचा प्रधान सेल्यूकस निकेटरने पंजाबवर स्वारी केली, पण मगाधिपती चंद्रगुप्ताने त्याचा पराभव केला. (इ.सन. पूर्व ३०६ ते २९८) इ.सनाच्या तिसऱ्या शतकाचे शेवटी बरेच कूर्मी सरदार पंजाब सोडून मगधची राजधानी कुशावतीस चंद्रगुप्त

राजाचे सेनेत भरती झाले होते. त्यानंतर तातार देशाच्या शकांनी पंजाबवर स्वारी करून पंजाब जिंकला. इ.सन पूर्व ७५ चे सुमारास त्यांचा राजा कनिष्क मोठा वीर पुरुष झाला. कनिष्कानंतर अवंतीस वीर विक्रमादित्य राजा झाला (माळवा देशात).

इ.सन पूर्व ७८ चे आसपास क्षत्रिय राजा कनिष्क काळात पश्चिम पंजाबातील गुजराथ शहरालगतचे बरेच गुर्जर आपल्याबरोबर अनेक कूर्मी लोकांसह मथुरेकडे जाऊन राहिलेत. बॉम्बे गॅझेटियर, व्हॉल्यूम १ चे आधारे, कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, पृष्ठ ४५ वर डॉ. मंगुभाई रामदास पटेल लिहितात की तेथून ते आनर्त देशांकडे गेले.

नंतर पंजाबातील दुसरी टोळी पंजाबातून कोटा व मंदसोर मार्गे माळव्यात आली (कु.क्ष.पा.इतिहास, पृष्ठ ४५ पहा).

अशा रीतीने पंजाबातील करड प्रांतातील करडवा कुर्मी व लेयाँ प्रांतातील लेया कूर्मी (लेवा कुणबी) ही नावे धारण करून ते कूर्मी लोक गंगा-यमुना किनाऱ्याने उत्तर भारतात मध्य हिंदुस्थान एजन्सी, मध्यप्रांत, खानदेश तथा दक्षिणेकडे येऊन वास्तव्य करू लागली. त्यांचे वंशज आजही लेवा व करड नावाने पंजाबातील आपले मूल स्थान लेयाँ (लेवा) नावाने महशूर आहेत असे 'कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास', पृष्ठ ४५ वर डॉ. पटेलांनी बॉम्बे गॅझेटियर, व्हॉल्यूम एकचे आधारे म्हटले आहे.

आजही आपल्या पंजाबातील मूळस्थानदर्शक नावाने त्यांच्यापैकी ५२ शाखांच्या निर्देश डॉ.मं.रा. पटेलांनी पृष्ठ ४६ वर केला आहे. त्यानंतर सिद्धराजचे काळातही आणखी ४२ टोळ्या मगधमध्ये, कुशावतीमार्गे माळवा व गुजराथेत इ.सनाचे पहिल्या शतकाचे शेवटी राज्य संस्थापू लागलेत असे गुजराथचा प्राचीन इतिहास तथा देसाई व पटेलांचे पुश्तनामे (भाटांच्या चोपड्या) यावरून कळते असे डॉ. पटेल म्हणतात.

इ.सन १४० मध्ये राजा जयदामाकाळात कूर्मी यांनी ईडर व वासवाडा प्रदेशातून अनेक कुणब्यांनी आनंर्तपूर इलाख्यात येऊन वडनगर व श्रीस्थल (सिद्धपूर) च्या आसपास वस्ती केली. नंतर इ.सन १५६ मध्ये उंझा ग्राम वसविले, व कडवा कुळदैवत उमियाजीची स्थापना केली.

चौथ्या शतकापर्यंत तेथे क्षत्रियांचे राज्य होते. नंतर इ.सन ४१० ते ४७० गुप्त शासक गिरीनारला राज्य करीत. त्यांचे त्यावेळी आनर्त व ऊंझा प्रदेशातील कूर्मी लोकांकडे दुर्लक्ष होते.

पुढे मानव वंशाचे १४४ वे पिढीत इ.सन १४४ मध्ये पंजाबातून गुजराथेत स्थानांतर केले. ह्या लवाचा वंश पंजाबात ज्या भागात वसला तो लेयाँ प्रदेश व त्यातील रहिवाशी लेयाँ उर्फ लेवा हे नाव इ.सन १४४ नंतर मिळाले. यापूर्वी कूर्मी क्षत्रिय हे जातीचे नाव होते. पण सन १४४ पासून लेयाँ कूर्मी उर्फ लेवा कूर्मी उर्फ लेवा कुणबी जातीचे नामविधान झाले. व पंजाबातील लेया प्रदेश सोडल्यापासून कोणाचे वंशज व कोठले रहिवाशी म्हणून मानव वंशाचे १४४ वे पिढीत लेवा कूर्मी ठरले.

पुढे इसवी सन १०९४ मध्ये सिद्धराज जयसिंहाचे यशोवर्माशी झालेल्या दीर्घकालीन संघर्षामुळे उजाड पडलेली गावे आबाद करण्यासाठी लेवा कूर्मी लोकांना ५२ कुटुंबांना ५२ गावे वसतीसाठी दिली, व नंतरच्याही ४३ परिवारांना ४३ गावे दिली. ५२ + ४३ = ९५ गावांची जमीन त्यांना कायम पट्ट्याने देऊन त्यांना भूमिस्वामी बनविले. **तेव्हापासून त्यांना पाटीदार म्हणू लागले.** सन १०९४ पासून जमिनीचे कायम पट्टे मालकीचे होऊन भूमिपट्टे भरणारे म्हणून ते पाटीदार ठरलेत. (कूर्मी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास ले.डॉ. पटेल, पृष्ठ ५६ पहा).

'कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास' लेखक- डॉ.मं.रा. पटेल, प्रकरण ६, पृष्ठ १५९ वर 'मालवा - निमाड - राजस्थानचे कुलमियों का विस्तार' नावाचे प्रकरणात गुजराथेत अहिमहीचे राज्यात

५२ पुत्रांनी ५२ गावे वसविलीत. त्यात एका पुत्राचे शाखेपासून लेवा भाई उत्पन्न झाले, व ५१ पुत्रापासून कडवादि पोटजाती जन्मल्या. या ५२ गोत्रापासून गुजराथेतील कुणब्यांची उत्पत्ती झाली. काहींच्या मते मातेने कुणब्यांचे दोन वर्ग किंवा दोन पाती पाडल्या म्हणून हे पाटीदार म्हटले गेले. (असे पृष्ठ १५९ ओळ २३ वर पहा).

पृष्ठ १८५ वर "महंमद बेगडाके शासन काल मे गुजराथ का किसान - कणबीसे पाटीदार बना। यद्यपि उसने कृषिका त्याग नही किया। पत्ती याने कि पांती-भाग, हक। पत्तीदार होने से किसान अब जमीन का मालिक बना और पत्तीदार एवं पाटीदार कहलाया।" काही का असेना पण **पाटीदार नावाचे शेपूट गुजराथेत आल्यावर सन १०९४ ते १५०० पर्यंत हे नाव पडले असावे. सन १४४ मध्ये लेयाँ प्रदेश सोडल्यावर लेवा व भूमीपट्टे स्वामित्त्व मिळविल्यावर सुमारे १०९४ ते १५०० मध्ये त्यांना पाटीदार हे जातीचे नाव प्राप्त झाले असावे.**

तसेच, इ.सन १४८४ मध्ये पावागड किल्ल्यावर पराभव झाला व तेथील सभोवारच्या पांजणा प्रदेशातील लेवा कुणबी पांजणा प्रदेश सोडून तापीतीराने खानदेश विदर्भात मानव वंश पिढीचे १९८ वे पिढीत आलेत. ते पांजणा प्रदेशाहून आले म्हणून पाजणे कुणबी हे आणखी जास्तीचे नवे नाव मिळाले. भारतात ठिकठिकाणी कूर्म ऋषीचे वंशज कूर्मी उर्फ कुणबी लोक कृषीकर्मी म्हणून जगतात. **हा पांजणा प्रदेश (पावाखंड) सोडून आलेली १४०० गाडीची टोळी गुजराथेतील बहुसंख्य कुणब्यांना सोडून इकडे आली. तिलाच पांजणे कुणबी नाव पडले.** मात्र गुजराथेतील पांजणा प्रदेश सोडून न आलेल्या लोकांना पूर्ववत लेवा कुणबी किंवा लेवा पाटीदार **या ज्ञातीनामानेच संबोधिले गेले,** पण १४०० गाड्यांहून तापीतिरी वसलेल्या ह्या स्थानांतरीत निर्वासितांना मानववंश पिढी १९८ पासून पांजणे नाव पडले.

बुलढाणा जिल्हा गॅझेटियर, आवृत्ती २ री (सुधारित) सन १९७६, पृष्ठ २२७, परिच्छेद २ मध्ये "The word Pajne is traced in Pavakhand which they say formarly formed a part of Gujarath and Reva is supposed to be derived from the river Reva in Gujarath." असे इ.सन. १४८४ नंतर पाजणे हे जातीचे नाव पडले. इ.सन १५०० चे सुमारास तापी खोऱ्यात हे लोक जमिनीच्या कमी-जास्त सुपिकतेनुसार वस्तीसाठी विखुरले. तेव्हापासून सावदेकर, गाडेगावकर, कंडारीकर, थोरगव्हाणकर अशा गावच्या नेतृत्वाने वसाहत करणाऱ्या चार विभागात ते विभागलेत असे धर्म,वर्ण, जात, वंश, कुळ असे उपगट पडत-पडत व्यक्तिनिर्देश होऊ लागला.उदा. प्रस्तुत लेखकाचा व्यक्तिनिर्देश करायचा झाल्यास जगातील सात संस्कृतीपैकी सिंधू संस्कृतीमधील त्यातही असलेल्या गटापैकी आर्य गटातील म्हणून निर्देशिले जाईल. आर्यातही हिंदू, मुस्लीम, बौद्ध, जैन, शीख आदी धर्मानुसार विभागणी झाल्यामुळे हिंदू म्हणून निर्देश करताना हिंदूचा क्षत्रिय वर्ण व त्यातही कुर्मवंशीय म्हणून कुणबी असा निर्देश होईल. कूर्मीवंशीयातही लवाचे वंशज व पंजाबातील लेयाँ प्रदेशातून आलेले म्हणून लेवा व गुजराथेतील भूमि स्वामित्वाचे भूमीपट्टे देणारे म्हणून पाटीदार ठरलेत. व पाटीदारांपैकी गुजराथेतील पावखंड उर्फ पांजणा प्रदेशाहून निर्वासित म्हणून तापी खोऱ्यात वसलेले ते पाजणे म्हणून निर्देशिले गेले. व त्यानंतरही ज्या गावच्या नेत्याचे नेतृत्वाने समाजसंघटन केले ते सावदेकर, गाडेगावककर, कंडारीकर, थोरगव्हाणकर म्हणून पुन्हा विभागले गेले. तसेच, प्रादेशिक विभक्ततादर्शक आरपट्टी व पारपट्टी अशा मोजपट्टीने गणलेले पट्टीचे बहुरूपी पाटीदार पुन्हा पुन्हा खानदेशकर व वऱ्हाडकर या प्रादेशिक नावाने पुन्हा निर्देशिले गेले.

अशा हा अनेक कारणांनी वंश संकोच दर्शविल्यामुळे, प्रादेशिक स्थानांतरामुळे, व्यवसायातील पट्टीदार > पाटीदार आदी प्रकारांनी तेरड्याचे फुलाप्रमाणे रंग बदलतो तसे जातीची उपगटात

कितीही नावे बदललीत, तरी आपली खरी जात वऱ्हाडे नव्हे, पांजणे नव्हे, पाटीदार तर नाहीच नाही, पण लेवाही आपली जात नाही, तर आपली खरीखुरी जात कुणबी उर्फ कूर्मी असून आपण उपजातीचे गटात विभागून वेळोवेळी ज्ञातीनामाच्या वेगवेगळ्या टोप्या बदलत-बदलत जाणारे मानव आहोत. नाहीतरी टोपी फाटली की नवी टोपी घालतोच की नाही ? पण लोकशाहीचे काळात व व्यवहारात लहान कुळ, लहान गोत्र, लहान जात, म्हणजे संख्येने अल्पसंख्य असणे हे फार कुचंबणेचे व अहिताचे असते हे जाणून एका विशाल गटाची एकात्मता कायम टिकविण्यासाठी ब्राह्मण लोकांनी जात, पोटजात, शाखा, गट, वर्ण, गोत्र, कुळ हे जातीचे स्तंभात निर्देशित करण्याएवजी जात ब्राह्मण असा विशाल वर्णाचा ज्ञातीनाम म्हणून जिरेटोप डोक्यावर घालून वावरतात. याउलट आपली अदूरदर्शी जमात छोटे-छोटे ज्ञातीगटात विभागून राजकारण, जातकारण, समाजकारणादी क्षेत्रात वेगवेगळ्या स्वतंत्र चुल्ही थाटून अल्पसंख्य होत-होत परस्परात हेव्यादाव्याने भांडत अधोगामी बनून गडबडत खोल गर्तेत चाललो आहे. असे वंशानुसार, प्रदेशानुसार (स्थानांतराने), व कालानुसार आपल्या लेवा कुणब्यांच्या जाती नावाचा इतिहास पाहिल्यावर आता मी मानववंशाचे २१३ वे पिढीत म्हणजे सूर्यवंशाचे १६८ वे प्रस्तुत पिढीत जगत ह्या जातीच्या इतिहास संशोधनाची केवळ हौस म्हणून दुधलगावी शोधाशोध करीत आहे. याचा वाचकांनी कृपया तारतम्याने विचार करून चुकले ते सोडून द्यावे व पटेल ते स्वीकारावे, ही विनंती. असो.

वरीलप्रमाणेच आपल्या जातीचे इतिहासात आपल्या बोलभाषेतही बदल होत गेले असावेत. उदा. प्रारंभी खाणाखुणांची भाषा, पुढे मोडकीतोडकी आद्य मानवी बोली, नंतर मानववंशाचे ९९ वे पिढीपर्यंत संस्कृत भाषा असावी, व नंतर मानववंशाचे १४४ वे पिढीपर्यंत कदाचित् पाली बोली असावी, व त्यानंतर निर्वासित जीवनात वसाहत केलेल्या ठिकाणची १४४ वे पिढीनंतर गुजराथेत प्राकृत आपली बोलभाषा असावी असा अंदाज आहे व मानववंशीय १९७ वे पिढीनंतर तापी खोऱ्यात स्थानांतरीत झालेल्यांनी मराठी बोली स्वीकारून आत्मसात केली असावी. यापुढेही भावी काळात काय बदल होईल ते देव जाणे,

बदल हा निसर्गाचा नियम आहे. त्यानुसार वरीलप्रमाणेच आपले पोशाख, खाद्यपरंपरा, घरे, शिक्षणादी क्षेत्रातील बदलांच्या विषयाचे संशोधन स्थानाभावी थांबविणे क्रमप्राप्त ठरते.

हाच नियम बदलत्या कृषी व्यवसायातही कार्यक्षम आहे. Change is the law of life याचा दाखला 'कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास', ले.- डॉ.पटेल, पृष्ठ १८६ वर पहा. उदा. गुजराथेतील लेवा पाटीदार चरोत्तर भागात तंबाखु पिकवितो, सौराष्ट्रात मूंग फल्ली, माळवा व नेमाडातील लेवा पाटीदार आलू, अफीम व लसुण, खानदेशातील लेवा पाटीदार केळी व गहू पिकविल, तर वऱ्हाडचा लेवा पाटीदार कापूस, ज्वारीची पैदास वाढविल. असे वैचित्र्य रहाणारच. गुजराथेत उद्योगधंदे करील, श्री. बहेचरदास लष्करी, श्री मफतलाल मंगलदास जयकृष्ण हरी वल्लभदास, धर्मेंद्रसिंह देसाई, तक्ताबाला, करसनभाई पटेल (निरमावाले), केशवलाल विठ्ठलदास पटेल (केशुभाई पटेल) यांनी आवडीचा व्यवसाय व निवडीचे क्षेत्र याद्वारे प्रगतीचा उच्चांक गाठला. **पण आमच्यात राष्ट्रीय स्तरावरचे वक्ते नाहीत. सर्वोत्तम नट नाहीत. राष्ट्रीय किंवा प्रादेशिक स्तरावरील नावाजलेली फारशी दैनिके नाहीत, सर्वोत्कृष्ट मासिकेही नाही वहातुकीच्या पेढ्या नाहीत, आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे गावागावात संघटन करणाऱ्या अखिल भारतीय स्तरावरील समाज संघटना नाहीत. ज्या ज्या आहेत त्यांचे कार्य खेड्यापाड्यातून कार्यरत नाही. ते उंटावरून शेळ्या हाकण्याप्रमाणे शहरी विभागातच घुटमळतात, पण प्रत्येक खेड्यात त्यांचे भ्रमण, परिभ्रमण नाही. केवळ समाजकार्याला वाहून घेतलेले समाज महर्षी लेवा कुळात जवळजवळ नाहीत. राष्ट्रीय स्वयं संघटनेची जिद्द व चिकाटी लेवा समाजात नाही हे दुर्दैव होय.**

तरी पण लेवा पाटीदार कुळात अभिमानास्पद जन्मलेल्या रत्नांपैकी लोहपुरुष सरदार वल्लभभाई

पटेल हे एक समाज भूषण व्यक्तिमत्त्व जन्मले. त्यांचे प्रेरणादाई चरित्र प्रत्येक लेवा पाटीदाराला माहित असावे म्हणून पुढे देत आहे :-

मध्यप्रदेश व राजस्थान पाटीदार समाजाचे प्रमुख मासिक पत्र 'पाटीदार जागृति' वर्ष १५, अंक १०, ऑक्टोबर १९९७, पृष्ठ १८, राष्ट्रीय एकता के प्रतिक सरदार पटेल, लेखक- सुरेश्चंद्र पाटीदार देवरी खबासा, जिल्हा मंदसौर (म.प्र.) या लेखात दिले की, "लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल जन्मतारीख ३१ ऑक्टोबर १८७५ व मृत्युतिथी १५ डिसेंबर १९५० रोजी ९ वाजून ३७ मिनिटांनी सकाळी झाला.

१२ वर्षाच्या झबेर बा नामक मुलीशी १८ व्या वर्षी त्यांचा विवाह झाला, व ३५ व्या वर्षी ती मरण पावली. वल्लभभाईंचा म. गांधीशी सर्वप्रथम परिचय सन १९१६ साली आला. गुजराथ राज्यात पेटलाद तालुक्यात करमसद गावी श्री. झवेरभाई पटेल नावाच्या शेतकऱ्याचे घरी जन्मलेल्या सरदार वल्लभभाई पटेलांची आई श्रीमती लाडबाई व वडील श्री झबेर पटेल हे होते. बहीण डाहीबा, भाऊ शोभाभाई, नरसिंहभाई, विठ्ठलभाई, वल्लभभाई, काशीभाई हे असून मूळ गाव करमसद होते तेथे भगवान रामचंद्राचे वीर पुत्र लव व कुशापासून वंशोद्भव 'लेवा' व 'कडवा' ह्या प्रमुख दोन जाती होत्या. त्यापैकी 'लेवा' जातीत यांचा जन्म झाला. शिक्षण नदियादहून मॅट्रिक, व विलायतेत बॅरिस्टर झाले. यांनी ५६२ राज्यांचे एकत्रिकरण केले. याच अंकात पृष्ठ ९ वर सुभाष पाटीदार, खजुरिया, सारंग जिल्हा, मन्दसौर लिहितात की, "लोहपुरुष सरदार वल्लभभाई बोरसद तालुक्यात करमसद गावी ता. ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी जन्मले. हे १५ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र भारताचे उपप्रधानमंत्री तथा गृहमंत्री झाले."

प्रकरण १९

अखिल भारतीय कूर्मी क्षत्रिय महासभा

इ.सन १८७० मध्ये दानापूर, मगध, बिहार प्रदेशातील कूर्मी क्षत्रियात दानापूरचे श्री. जनकधारी लालजी यांनी समाज जागृतीस चालना दिली. त्यांनी सन १८७० मध्ये दानापूरला स्वजातीबांधवांची एक छोटी सभा घेतली. त्यानंतर इ.सन १८९० मध्ये बिहार प्रांतात सोनपूरमधील हरिहर क्षेत्रातील प्रसिद्ध कार्तिकी मेळाव्यात श्री. रायसाहेबांनी कूर्मी जातीची विशाल सभा आयोजित केली होती.

इ.सन १८५७ सालच्या स्वातंत्र्य आंदोलनात कूर्मी लोकांनी राजा जयलालसिंह याच्या नेतृत्वाने स्वातंत्र्यासाठी इंग्रजांविरुद्ध प्रखर संग्राम केला होता. त्यामुळे ता. २ फेब्रुवारी १८९४ ला ब्रिटीश शासनाने एका परिपत्रकाद्वारे कूर्मी लोकांचा पोलीस खात्यात भरणा करू नये असा आदेश काढला होता.

त्या आदेशास विरोध करण्यासाठी वनविभागाचे फॉरेस्टर असलेले बाबू रामाधिन सिंह यांनी नोकरीचा राजीनामा दिला. लखनौचे ते रहिवाशी असल्यामुळे त्यांनी लखनौच्या स्थानिक रहिवाशी कूर्मी लोकांची एक सभा आयोजित केली होती. जरी ती स्थानिक सभा होती तरी तिचा विकास करताना 'कूर्मी सदर सभा लखनऊ' या संस्थेची इ.सन १८९४ मध्ये स्थापना केली, व त्या सभेचे सन १८९४ मध्ये विशेष अधिवेशन आयोजित केले गेले. त्यामध्ये असे ठरले की, अखिल भारतीय स्तरावर एक अधिवेशन भरवावे. यासाठी बापू रामाधिन सिंहानी 'कूर्मी सदर सभा लखनऊ' सभेचा उद्देश, विस्तार क्षेत्र, कार्याची कार्यवाही आदींची सुसंघटित योजना आखण्यासाठी चहूकडे शिष्ट

मंडळे पाठविलीत. ह्या रीतीने अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय महासभेच्या पहिल्या अधिवेशनाची पूर्व तयारी झाली. धीरे-धीरे ही महासभा विकसित होत गेली. विभिन्न प्रदेशात विभिन्न वर्षात तिची अधिवेशने भरू लागलीत.

वरील परिपत्रकामुळे कूर्मी लोकात खळबळ उठली. फलस्वरूप ता. २९,३० डिसेंबर १८९४ रोजी कूर्मी सदर सभा गठीत करून सन १८९४ कूर्मी सदर सभा लखनाऊ ची संस्थापना झाली. तिचे पहिले अधिवेशन इ.सन १८९४ मध्ये फरूखाबादचे महाशय रोंदनलाला बी.ए.एल.एल.बी. वकील यांचे अध्यतेखाली भरले. 'कूर्मी सदर सभा लखनाऊच्या' प्रयत्न व प्रतिकारापुढे सरकार झुकले व एक आदेश क्रमांक २५१ आठ/-१८६-ए-६ दिनांक २१-३-१८९६ रोजी पुढील आदेश काढला. "गव्हर्नरच्या मते कूर्मी एक सन्मानीत समुदाय आहे. त्यांना शासन सेवेतून बाहेर ठेवणे अनुचित आहे.

२) महासभेचे द्वितीय अधिवेशन लखनाऊ निवासी श्री.नंदलालजीच्या अध्यक्षतेखाली ता. २९,व ३० डिसेंबर १८९५ ला लखनाऊ येथे संपन्न झाले. बाबू नंदलाल (कस्टम विभाग) पर्यवेक्षक होते.

पहिल्या अधिवेशनात सन १८९४त प्रमुख प्रस्ताव होते की लखनाऊ मध्ये 'कूर्मी समाचार पत्र' काढून विभिन्न स्थानी कूर्मी सभांनी संस्थापना करावी. हे जसे ठरविण्यात आले होते तसेच, ह्या दुसऱ्या अधिवेशनात कूर्मीवंश विकासासंबंधी एक बैठक झाली. ज्यामध्ये बुलंद शहरवासी श्री. साधुसिंहानी स्कंध पुराणाधारे दर्शविले की, कूर्म शब्दातच भाषा भिन्नतेमुळे कूर्मी, कुणबी, कणबी इत्यादी शब्द बनलेत.

३) महासभेचे तृतीय अधिवेशन पीलीभीतमध्ये तारीख २८-२९ डिसेंबर १८९६ रोजी बिहारमधील बाजीपूरचे ॲडव्होकेट श्री. मिथिलाशरण सिंहाचे अध्यक्षतेखाली पार पडले, व पुढील ठराव त्यात पारित केला की, "या सभेने निर्णय घेतला की, पुत्रीरक्षक कायद्यान्वये जमविलेले ७०००० **रुपये मुंबई शासनाजवळ अनामत म्हणून ठेवले. त्याचे व्याजातून मुंबई विद्यापीठातील कुणबी जातीचे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जावी.** गुजराथ महाविद्यालयात जे लेवा व कडवा कणबी शिकत होते त्यांना त्याच इन्फटीसाईड फंडातून शिष्यवृत्ती मिळत होती. त्या अधिवेशनात बिहारचे अनेक प्रतिनिधी सामील झाले होते.

या अधिवेशनानंतर कित्येक वर्षापर्यंत अधिवेशन भरले नाही. परंतु, सन १९०८ साली चौधरी दीप नारायण सिंह (मिर्जापूर) यांनी 'कूर्मी क्षत्रिय हितैषी' नामक मासिक पत्रिका सुरू केली. ह्याच मासिकाच्या माध्यमातून पुढील अधिवेशनाची योजना साकारली. ह्या वेळी गुजराथमध्ये पाटीदारांनी अनेक पत्र-पत्रिका काढण्याबरोबरच जातीय सुधार संस्थाही स्थापन केल्यात. दक्षिणेत मराठा, वक्कलिगर आणि रेड्डी इत्यादिंनीही समाजसंस्था काढून पत्रिका काढणे सुरू केले होते. यानंतर १३ वर्षे पर्यंत कोणतेच अधिवेशन भरले नाही.

४) ता. २८, २९ डिसेंबर १८९६ नंतर तेरा वर्षांनी इ.सन १९०९ मध्ये मिथिलाचरण सिंहाचे अध्यक्षतेखाली महासभेचे चौथे अधिवेशन बिहार प्रांतातील एखलामपूर, जिल्हा शाहादाबाद येथे भरले. त्यात कित्येक प्रदेशाहून लोक आले होते. त्यांनी कूर्म जातीच्या उत्पत्तीचे संक्षिप्त विवरण केले. त्यामुळे देशाचे विभिन्न भागातील लोक त्यात सामील होऊन केवळ सहा महिन्यानंतरच पुढचे पाचवे अधिवेशन आयोजित झाले.

चौथ्या अधिवेशनापर्यंत महासभेचे संविधान ठीक नव्हते. दळणवळणाचे मार्गाचे अभावी नभेत आलेल्या सभासदांची ठीक व्यवस्था व आतिथ्य करणे कठीण गेले. सभेच्या आयोजनाच्या खर्चाचा बोजा स्थानिक सभासदांवर पडल्यामुळे पुढील संमेलनास निमंत्रण देण्याचा उत्साह मंदावला. मात्र, स्थानिक सभा होतच होत्या. सन १९०८ मध्ये चुनारमध्ये बाबू दीपनारायण सिंहांनी 'कूर्मी क्षत्रिय हितैषी' नावाचे मासिक सुरू केले. त्याद्वारे समाज सुधारणा व शिक्षणाची

आवश्यकता जनमानसात ठसविली. परिणामत: ज्ञातीबांधवामध्ये पुन्हा उत्साह निर्माण होऊन इ.सन १९०९ मध्ये एखलासपूरला महासभेचे चौथे अधिवेशन भरले. त्यात ३००० ज्ञातीबांधव उपस्थित राहिले. याच सभेत बाबू देविप्रसादजीच्या भाषणाचा प्रभाव पडून आम्ही सर्व ज्ञातीबांधव एकाच आईबापांची औलाद आहे ही भावना जागृत झाली. बाबू जनकधारीलाल सुद्धा महान समाजसुधारक होऊन गेले.

५) महासभेचे पाचवे अधिवेशन ता. २८ ते ३० डिसेंबर १९०९ मध्ये म्हैसूरचे सेशन जज्ज श्री.बी. नागप्पा यांचे अध्यक्षतेखाली उत्तर प्रदेशात चुनारमध्ये भरले. केवळ सहा महिन्यानंतरच भरलेल्या ह्या अधिवेशनाचे अध्यक्ष मि. नागप्पा बॅरिस्टर हे निवडले गेले. हे बंगलोरला जज्ज होते. मद्रास इलाख्यातील वोकलीगर जातीचे ते कूर्मी हेते. अशा रीतीने कूर्मी क्षत्रिय महासभेचे क्षेत्र विस्तारले, आणि ह्यामुळेच महासभेचे "समस्त भारत वर्षीय कूर्मी क्षत्रिय असोशिएशन" असे नामाभिधान झाले. यानुसार आमच्या जातीचे मागासलेपणाचे मुख्य कारण आमची अनेक वर्गात झालेली विभागणी हे होय. म्हणून उन्नतीसाठी आम्हास संघटित होणे जरूरीचे आहे.
या अधिवेशनात दक्षिणेहून दूरदूरचे कुणबी प्रतिनिधींनी सुद्धा सहभाग घेतला होता. ह्या सभेत ठरविल्याप्रमाणे ता. ५ मार्च १९१० रोजी बिहारमधील बाकीपूर मध्ये कूर्मी क्षत्रिय महासभेचे "अखिल भारतीय कूर्मी क्षत्रिय महासभा" या नावाने पंजीकरण केले गेले.

६) महासभेचे सहावे अधिवेशन पीलीभीत (उत्तर प्रदेश) मध्ये २५ ते २७ डिसेंबर १९१० मध्ये नागपूरचे बॅरिस्टर सी.बी. नायडू यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. अध्यक्ष बॅरिस्टर मि. कोथारी व्यंकटराव नायडू नागपूरकर यांनी म्हटले की, "आमचे मुख्य कर्तव्य आहे की आपल्या विभिन्न उपजातींचे एका मुख्य जातीत संघटन करून एकच प्राचीन "क्षत्रिय" जातीचे पुनर्निमाण करणे जरुरीचे आहे."

७) ता. २७ ते २९ डिसेंबर १९११ मध्ये उत्तरप्रदेशात इटावा शहरी भरले. बिहारचे पटना जिल्ह्यातील बाकीपूर शहरचे शिक्षण निरीक्षक श्री. संजीवनलाल सिंह यांचे अध्यक्षतेखाली उत्तरप्रदेश मध्ये इटावा शहरी संपन्न झाले.

८) आठवे अधिवेशन ता. २४ ते २६ डिसेंबर १९१२ रोजी गुजराथ महाविद्यालय **अहमदाबादचे गणिताचे प्राध्यापक- श्री. जेठालाल स्वामीनारायण यांचे अध्यक्षतेखाली उत्तर प्रदेशात बाराबंकी येथे संपन्न झाले.**
अध्यक्षांचे मते, "आतापर्यंत आमची धारणा अशी होती की, कूर्मीजाती केवळ गुजरात व काठिवाडपर्यंतच मर्यादित आहे. परंतु, अधिवेशनाद्वारे ही जाणकारी प्राप्त झाली की, कूर्मी ही जाती पूर्ण भारतभर विखुरलेली आहे. या अधिवेशनाची संस्मरणीय फलश्रुती ही आहे की, **गुजराथचे पाटीदार उत्तर भारतातील कूर्मीयांचे अधिक परिचयात आले.** गुजराथ व उत्तर भारतातील जाती मैत्री सुदृढ झाली. असेच जाती ऐक्य या परिषदाद्वारे गुजराथ-मध्यप्रदेश (माळवा-निमाड) राजस्थानातील ज्ञातिबांधवात दृढ झाले.

९) महासभेचे नववे अधिवेशन ता. २७ ते २९ डिसेंबर १९१३ मध्ये गुजराथेतील अहमदाबाद येथे सुप्रसिद्ध बॅरिस्टर तथा **समाजसेवक श्री. विठ्ठलभाई पटेल या लेवा पाटीदार कुणब्याचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले.** ह्या अधिवेशनात अध्यक्षांचे धाकटे बंधू लोहपुरुष सरदार वल्लभभाई झवेरभाई पटेल लेवा पाटीदार यांच्या उपस्थितीमुळे अधिवेशनांची गरिमा वाढली गेली. या अधिवेशनात लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल या महासभेच्या कार्यकारिणी समितीचे सदस्य म्हणून निवडले गेले.
ह्या भारतवर्षीय कूर्मी क्षत्रिय असोसिएशनचे अधिवेशन गुजराथमधील गणपतपुरामध्ये आयोजित करण्याचे निमंत्रण मि. छोटाभाई रामजीभाई यांनी दिले होते. या अधिवेशनाचे नियोजित स्थळ

बदलून अधिवेशन **अहमदाबाद शहरात सरदार पटेलांचे बंधू आणि भारताच्या उच्च सदगृहाचे अध्यक्ष माननीय श्री. विठ्ठलभाई पटेल व लेवापाटीदार सांसदाचे अध्यक्षतेखाली झाले होते.** या अधिवेशनात समाज व जातीमध्ये सुधारणा व प्रगती या हेतूंनी अनेक प्रस्ताव पारीत केले गेले.

त्यानंतर प्रत्येक राज्यात अशी प्रवृत्ती चालू राहिली की, अनेक स्वरूपात परिषदांचे आयोजन होऊ लागले, असे चालत राहून भिन्न भिन्न स्वरूपात पाटीदार संमेलने, परिषदा, सभा, अधिवेशने होत राहिलीत.

सन १९१४ मध्ये द्वितीय विश्व युद्धामुळे अधिवेशन आयोजित केले नाही.

१०) महासभेचे दहावे अधिवेशन ता. २७ ते २९ डिसेंबर १९१५ रोजी लखनाऊमध्ये बडोद्याचे महाराज सर सयाजीराव गायकवाड यांचे छोटे बंधू श्रीमंत संपतराव गायकवाड यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

११) अखिल भारतीय कूर्मी क्षत्रिय महासभेचे ११ वे अधिवेशन २९ ते ३१ डिसेंबर १९१६ रोजी आगरा मध्ये **अहमदाबादचे बॅरिस्टर मगनभाई चतुरभाई पटेल यांचे अध्यक्षतेखाली पार पडले.**

१२) या सभेचे बारा वे अधिवेशन ता. ३० मार्च व १ एप्रिल १९९८ पर्यंत देवास (द्वितीय श्रेणी) चे महाराज छोटेभाई श्रीमंत सदाशिवराव पवार खासेसाहेब (सह सचिव), ग्वालियर राज्य यांचे अध्यक्षतेखाली मोठ्या धूमधाममध्ये वढपूर, फरुकाबाद, उत्तरप्रदेशात संपन्न झाले.

१३) या महासभेचे तेरावे अधिवेशन ता. १९ ते २१ एप्रिल १९१९ मध्ये कोल्हापूरचे महाराज कर्नल सर शाहू छत्रपती महाराजांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले ते छत्रपती श्री. शिवाजी महाराजांचे वंशज होते.

१४) या महासभेचे चौदावे अधिवेशन २९ ते ३१ डिसेंबर १९२४ मध्ये सीतापूर येथे महाराजा देवास, सर श्री तुकोजीराव पवारांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले.
या अधिवेशनात कूर्मी क्षत्रिय नवयुवक समितीचे गठण महाराज कुमार श्रीमंत विक्रमसिंहराव पवार यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी श्री बेचनसिंहच्या प्रयासामुळे "अखिल भारतीय कूर्मी क्षत्रिय भवयुवक संघ" ही संस्था स्थापन झाली.

१५) या महासभेचे विशेष अधिवेशन ता. २७ ते २८ डिसेंबर १९२६ मध्ये मराठा शिक्षण परिषदेचे प्रधानमंत्री राव बहादूर रामचंद्रराव विठ्ठलराव वाण्डेकर, जनरल सेक्रेटरी मराठा एज्युकेशन कॉन्फरन्सचे अध्यक्षतेखाली देवासमध्ये महासभेचे विशेष अधिवेशन संपन्न झाले. देवास (प्रथम) चे महाराज श्री. तुकोजीराव पवारांनी या अधिवेशनाचे उद्घाटन केले होते.

१६) या महासभेचे पंधरावे अधिवेशन ता. १ ते ३ मार्च १९२७ मध्ये उत्तरप्रदेशातील लखीमपूर खीरी येथे श्री. जगदेवराव पवार उर्फ भाऊसाहेब देवास (प्रथम श्रेणी) यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले.
या अधिवेशनसमयी कूर्मी क्षत्रिय महिला परिषदेची स्थापना निमगाव लखीमपूरची राणी साहेबा श्रीमती चंपाकुमारी यांचे अध्यक्षतेखाली झाले.

१७) या महासभेचे सोळावे अधिवेशन ता. २७ ते २९ डिसेंबर १९२८ मध्ये श्री. वृंदावनलाल कटिहार, ॲडव्होकेट यांचे अध्यक्षतेखाली जबलपूरमध्ये संपन्न झाले. कुमारी श्री. सीमा सचान यांच्या मते डिसेंबर १९१७ रोजी हे अधिवेशन भरले होते.

१८) या महासभेचे सतरावे अधिवेशन श्रीमंत जगदेवराव पवार यांचे अध्यक्षतेखाली ता. २६ ते २८ डिसेंबर १९२७ मध्ये उत्तरप्रदेशातील मुजफ्फरपूर येथे संपन्न झाले.
ज्येष्ठ भ्राता महाराजाच्या प्रकृतीस्वास्थाचे अभावी ते स्वत: उपस्थित राहू शकले नाहीत, तेव्हा त्यांचे अध्यक्षीय भाषण त्यांचे प्रतिनिधी सरदार सीताराम लक्ष्मण बागवेद्वारा वाचून दाखविले

गेले. सभा संचलनही त्यानीच केले होते.

या अधिवेशन समयी ठाकूर शरणसिंह यांचे अध्यक्षतेखाली कूर्मी क्षत्रिय नवयुवक संमलेनसुद्धा झाले. या संमेलनात सायमन कमिशनवरील बहिष्कार प्रस्ताव पारीत केला गेला.

१९) या सभेचे अठरावे अधिवेशन तारीख १९ ते २१ एप्रिल सन १९३० मध्ये श्री. रामचंद्रराव अर्जुनराव गोळे, प्रधान मंत्री, मराठा शिक्षण परिषद यांचे अध्यक्षतेखाली मध्यप्रदेशात रायपूर येथ संपन्न झाले.

२०) या महासभेचे एकोणीसावे अधिवेशन तारीख ३ ते ५ एप्रिल १९३१ मध्ये मुंबई विधान परिषदेचे उपाध्यक्ष माननीय नामदेव एकनाथ नावले यांच्या अध्यक्षतेखाली पश्चिम बंगालातील पुरुलिया येथे संपन्न झाले. **अध्यक्षांचे मतानुसार गुजराथ व खानदेशचे लेवा, दक्षिणेकडील मराठे तथा उत्तर भारतातील कूर्मी एकाच मूळ कूरमी क्षत्रिय ज्ञातीपासून** उत्पन्न झाले. **असे कुमारी सीमाताई** सचान यांचे इटारसी नगरकी कुर्मी महिलाओंका एक समाज शास्त्रीय अध्ययन ह्या सन १९९३ मध्ये भोपाळच्या बरकतउल्लाह विद्यापीठात आचार्य उपाधि (पीएच.डी, समाजशास्त्र) साठी डॉ. गौतम ज्ञानेंद्र रीडर या शोध निर्देशिकाचे मार्गदर्शनाखाली ता. ५ जुलै १९९३ रोजी विद्यापीठास सादर केलेल्या (संशोधन) शोध प्रबंधात- पृष्ठ क्रमांक १७ वर नमूद केले आहे.

२१) या महासभेचे विसावे अधिवेशन हरनोत (पटना) येथे ग्वालेहर राज्याचे गृहमंत्री महाराज सदाशिवराव पवार खासेसाहेब, देवास (द्वितीय) यांचे अध्यक्षतेखाली तारीख २७ ते २९ डिसेंबर १९३३ मध्ये संपन्न झाले.

२२) या महासभेचे एकविसावे अधिवेशन तारीख २९ ते ३१ डिसेंबर १९३७ मध्ये बिहार राज्यातील छपरा, सारन, बिहारमध्ये बॅरिस्टर बापू ब्रजनंदनलाल यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

२३) या महासेभेच बाविसावे अधिवेशन तारीख ७ ते ९ एप्रिल १९३९ मध्ये बंगाल प्रांतात मिदनापूर जिल्हयातील झारग्राम उर्फ भारग्राम येथे पाटण्याचे ॲडव्होकेट श्री. दाससिंह यांचे अध्यक्षतेखाली पार पडले.

या अधिवेशनास बहुसंख्यांक बंगाली भाषिक श्रोत्यांपुढे यांचे भाषणाचा बंगालित अनुवाद करून ऐकविला होता.

२४) या महासभेचे तेविसावे अधिवेशन ता. ७ ते ९ एप्रिल १९४४ (७ ते ९-४-१९४४) मध्ये उत्तर प्रदेशातील इटावा शहरात मध्यप्रांताचे भूतपूर्व शिक्षणमंत्री बॅरिस्टर डॉ.पंजाबराव देशमुख यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आले होते.

२५) या महासभेचे चोविसावे अधिवेशन ता. ७ ते ९ मे १९४८ हारामऊ (पुखराया-कानपूर) येथे डॉ. बाबू खूबचंद बघेल यांचे अध्यक्षतेखाली पार पडले.

या अधिवेशन काळात बिहार विधानसभा आणि भारतीय संविधान सभेचे सदस्य श्री. गुमनाथ सिंह यांचे अध्यक्षतेखाली कूर्मीक्षत्रिय नवयुवक संमेलन संपन्न झाले. चोविसाव्या अधिवेशनात श्री.गुमनाथ सिंहजींना महासभेचा प्रधानमंत्री म्हणून निवडले गेले.

२६) या महासभेच्या चोविसाव्या अधिवेशनानंतर १० वर्षे एकही अधिवेशन झाले नाही. पण शेवटी कलकत्त्याचे धनवान श्री. लक्ष्मणचंद्र सिंह यांच्या प्रयत्नामुळे ता. २५ ते २६ डिसेंबर १९५८ रोजी कलकत्ता शहरात श्री. पंजाबराव देशमुखांची धर्म पत्नी श्रीमती विमला देशमुख यांचे अध्यक्षतेखाली या महासभेचे पंचविसावे रजत जयन्ती अधिवेशन संपन्न झाले.

या वेळी कलकत्त्याहून **'कूर्मी क्षत्रिय जागरण'** नावाचे मासिकाचे प्रकाशन करून त्या मासिकाचा प्रारंभ केला, पण लवकरच ते बंद पडले.

२७) या महासभेचे सव्वीसावे अधिवेशन ता. २५ ते २८ फेब्रुवारी १९६० च्या अवधीत उडीसा प्रदेशातील रायरंगपूर, मयुरभज, उडीसा येथे जबलपूरनगर निगमचे मुख्य प्रशासनिय अधिकारी श्री. रामदीन

गौर (आय.ए.एस.) (सेवानिवृत्त) (रेव्हेन्यू कमिशनर) यांचे अध्यक्षतेखाली पार पडले.

२८)'कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा', लेखक- डॉ. रामसिया सिंह, पृष्ठ ६८ वरून असे कळते की या अखिल भारतीय कूर्मी क्षत्रिय महासभेचे सत्ताविसावे अधिवेशन तारीख २६ ते २८ मे १९६१ ला होशंगाबाद मध्यप्रदेश येथे झाले. या वेळी बैतुलचे समाजसेवक श्री. कृष्णकुमार देशमुख यांचे अध्यक्षतेखाली ते संपन्न झाले.

तर 'इटारसी नागरकी कूर्मी महिलाओंका एक समाजशास्त्रीय अध्ययन' या विषयावर शोध निर्देशक- डॉ. गौतम ज्ञानेंद्र रीडर, बरकत उल्लाह विद्यापीठ भोपाळ यांचे निर्देशनाखाली बरकत उल्लाह विद्यापीठ भोपाळच्या आचार्य उपाधी (पीएच.डी., समाजशास्त्र) हेतु कुमारी सीमा सचान यांनी प्रस्तुत केलेल्या ५ जुलै १९९३ च्या शोध प्रबंधाचे, पृष्ठ १९ वरून असे म्हणता येईल की अखिल भारतीय कूर्मी क्षत्रिय महासभेचे सत्ताविसावे अधिवेशन डिसेंबर १९६० मधये सौरठ (दरभंगा) येथे कूर्मी क्षत्रिय दिवाकर, चे तत्कालिन संपादक- श्री शिवराव सिंहचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

याचा अधिकृत खुलासा प्राप्तीसाठी जिज्ञासूंनी अखिल भारतीय कूर्मी क्षत्रिय महासभेच्या मुख्य कार्यालयातून पत्राने संपर्क साधून शंका निरसन करावे.

२९) या महासभेचे अठ्ठाविसावे अधिवेशन १० ते १२ डिसेंबर १९६६ मध्ये नागपूरला संपन्न झाले. छत्तीसगड मध्यप्रदेशाचे सुप्रसिद्ध समाजसेवी डॉ. खूबचंद्र बघेलचे अध्यक्षतेखाली ते पार पडले. या अधिवेशनाचे उद्घाटन केंद्रिय मंत्री श्री. अशोक मेहतानी केले होते. असे कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, ले.- डॉ. सिंह, पृष्ठ ६८ वरून कळते.

तर मे १९६१ मध्ये मध्यप्रदेशातील हौशंगाबाद येथे कृष्णकुमार देशमुख यांचे अध्यक्षतेखाली भरलेल्या या अधिवेशनाचा क्रमांक अठ्ठाविसावा असल्याचे कु. सीमा सचान आपल्या शोध प्रबंधात वेगळाच सूर काढतात. म्हणून याबाबतही अधिकृत खुलासा महासभेच्या केंद्रीय कार्यालयातून पत्रद्वारा प्राप्त करता येईल.

प्रस्तुत ग्रंथ-लेखक नागपूरच्या महाविद्यालयीन जीवनात कुणबी समाजाचे कार्यात सहभागी होत असल्याने अखिल भारतीय कूर्मी क्षत्रिय महासभेचे २८ वे अधिवेशन ता. १०, ११ व १२ डिसेंबर १९६६ ला झाले. त्याची प्रस्तुत ग्रंथ लेखकाचे कार्यालयात असलेली निमंत्रण पत्रिका स्वागत समिती कार्यलय, अखिल कुणबी समाज चिटणवीसपूरा, नागपूर-२, फोन - २४७७४ येथून आली होती.

प्रस्तुत अधिवेशनास प्रकृतीस्वास्थ्याचे अभावी प्रस्तुत लेखक जरी उपस्थित राहिला नाही तरी, त्याला आलेली निमंत्रण-पत्रिका व प्रस्तुत लेखकाला त्या निमित्त त्या काळात आलेल्या अखिल कुणबी समाजाचे प्रथम तथा अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय महासभेचे २८ वे अधिवेशन परिपत्रक क्रमांन २, (मराठी) ग्रंथ लेखकाचे संशोधन गृहात अजूनही उपलब्ध आहे. यावरून खुलासा देत आहे.

अखिल कुणबी समाजका प्रथम एवं अ.भा.कूर्मी क्षत्रिय महासभा का २८ वा अधिवेशन ता. १०, ११ व १२ डिसेंबर १९६६ स्थळ - अखिल कुणबी समाज के विशाल प्रांगण मे चिटणीस पुरा, सक्करदरा रोड, नागपूर - २, अध्यक्ष, डॉ. खुबचंद बघेल, संसद सदस्य, रायपूर (म. प्र.) व उद्घाटक मान. श्री अशोक मेहता, केंद्रिय नियोजन मंत्री, दिल्ली तथा छात्र परिषद उद्घाटक माननीय, श्री. नरेंद्र तिडके, श्रम मंत्री (महाराष्ट्र राज्य) मुंबई, परम पूजनीय उपस्थिती : १. श्री राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, २. श्री. संत गुलाबबाबा, ३. श्री. स्वामी आत्मानंदजी, अध्यक्ष, रामकृष्ण आश्रम, रायपूर, भवदीय ॲड. ओं. वि. देशमुख मुख्य स्वागत मंत्री व ॲड. मा. वि. निकम स्वागताध्यक्ष, श्री. सं.रा. कढव, श्री. रा.ना. बूचे, श्री. रामराव बाळबुधे - एम. एल.

मी., रामाजी डाफ, शंकरराव अतकरे (उप स्वागताध्यक्ष) या महाभागांचे उपस्थितीत **'समाजदर्शन'** स्मृतिग्रंथाचे प्रकाशन राष्ट्रसंत तुकडोजीचे हस्ते ठरले होते.

फेब्रुवारी १९६५ च्या परिपत्रक क्रमांक २ (मराठी) यात पृष्ठ २,परिच्छेद २ मध्ये लिहिले आहे की, "आपला समाज महाराष्ट्रातच नव्हे तर भारताच्या विभिन्न भागात मोठ्या संख्येने पसरलेला असून वैदिक काळापासून शेती करीत आहे. आर्यभाषेत आपण कूर्मी म्हणून ओळखले जात होतो. परंतु, काळ व भाषाभेदामुळे कूर्मी शब्दाचे अनेक नावान रूपांतर झाले जसे. कूर्मी, कूरमी, कुणबी, लेवा-पाटील, देशमुख, मराठा, कुळंबी, कुलवाडा, कापु, कापेवार, रेड्डी, नायडू, वक्कलीगार, विकालजिया, पाटीदार, पटेल, कणबी आदी. मात्र, आपण सर्व एकाच आर्य परिवारातील सदस्य आहोत... सर्व भाषीय व प्रांतीय कूर्मी बंधूना एका सूत्रात संग्रहीत करून त्यांची भारतीय संस्कृतीच्या आधारावर निर्मित वर्णव्यवस्थेच्या अंतर्गत देशव्यापी संघटना निर्माण करण्याचे महत्त्वाचे सामाजिक कार्य 'अखिल भारतीय कूर्मी क्षत्रिय महासभा' ही संस्था १८९४ सालापासून करीत आहे." उर्वरीत खुलाशासाठी संस्थेच्या कार्यालयात चौकशी करावी. असो.

३०) या महासभेचे एकतिसावे अधिवेशन तारीख २७ फेब्रुवारी ते १ मार्च १९७० मध्ये मेकीपूर, नाजिरा शिवसागर, असम येथे महासभेचे कोषाध्यक्ष श्री. लक्ष्मणचंद्र सिंह यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

३१) महासभेचे तिसावे अधिवेशन ३० एप्रिल ते २ मे १९७१ मध्ये बिहार प्रदेशातील **पटणा शहरात राष्ट्रनिर्माता लोहपुरुष सरदार वल्लभ भाई पटेल** या लेवा पाटीदाराचे सुपुत्र श्री. **डाह्याभाई वल्लभभाई पटेल यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले.**

३२) महासभेचे एकतिसावे अधिवेशन ता. ३० एप्रिल ते २ मे १९७५ मध्ये उडीसा प्रदेशातील गंजाम जिल्ह्यात भंजनगर येथे हिंदी मासिक पत्रिका 'चंदामामा'चे सुप्रसिद्ध संपादक श्री बालशौरी रेड्डी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

या अधिवेशनात श्री. गुदानाथसिंहजीच्या प्रकृती स्वास्थ्याचे अभावी पटना येथील श्री सिद्धेश्वर प्रसाद यांना महासभेचे महामंत्री म्हणून निवडले गेले.

३३) महासभेचे बत्तीसावे अधिवेशन दिल्लीचे रामलीला मैदानावर ता. १० व ११ जून १९७८ रोजी **गुजराथचे लोकसभा सदस्य, श्री. आर. के. अमीन** यांचे अध्यक्षतेखाली मोठ्या धूमधाममध्ये संपन्न झाले. भारत सरकारचे तत्कालीन दूरसंचार मंत्री श्री. वज्रलाल वर्मा हे या अधिवेशनाचे प्रमुख अतिथी होते. डॉ. दिलावर सिंह जयसवार, अध्यक्ष कूर्मीक्षत्रिय समाज, दिल्ली हे या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष व श्री. सी.बी. सिंह हे संयोजक होते.

३४) महासभेचे तेहेतीसावे अधिवेशन झालदा, जिल्हा पुरलिया-पश्चिम बंगाल येथे ता. ८ व ९ मार्च १९८० रोजी सुप्रसिद्ध संत स्वामी आत्मानंदजीचे पिता श्री. धनीराम वर्मा, रायपूर (मध्यप्रदेश) यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

३५) महासभेचे चौतिसावे अधिवेशन ता. २९ मे ३१ मे १९८३ मध्ये मध्यप्रदेशात रायपूरला श्री. धनीराम वर्मा यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

३६) महासभेचे पस्तीसावे अधिवेशन ता. ३० सप्टेंबर १९८३ ते २ ऑक्टोबर १९८३ मध्ये **महाराष्ट्र लेवा संघ सभागार, मुलुंड, मुंबई** येथे श्री. धनीराम वर्मा यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या अधिवेशनात श्रीपती इंदूमती त्रिभूवन पटेल (पार्षद नगर निगम, मुंबई) यांचे अध्यक्षतेखाली महिला संमेलन तथाश्री. अनिल सचान यांचे अध्यतेखाली युवा संमेलन संपन्न झाले. महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांनी अधिवेशनाचा समारोप केला होता. त्यांनी म्हटले, "भारतमे समस्त कुर्मी एक है. अंतर केवळ उपनामका है। हम [illegible] कूर्मी है। खेती हमारा धंदा है। मैने खुद अपने हाथसे हल चलाया है। ग्राम जनता की [illegible] दूर, हम

राजनेता लोग भी,एक दुसरेको नही पहचानते कि हम कूर्मी है।" इस अधिवेशनमे "जागो कूर्मी महान" हे अत्यंत प्रेरणादायक ध्वजगीत सादर केले होते.

• डॉ. देशराज कटियार, फरुखाबाद हे महासभेचे अध्यक्ष तथा डॉ. बलराम सिंह वाराणसी हे महामंत्री म्हणून निवडले गेले होते, तर सीमाताई सचान यांचे शोध प्रबंधात पृष्ठ क्रमांक २० वर- "पैतिसवा अधिवेशन सन १९८४ मे बंबई मे श्री. देशराज कटियार की अध्यक्षतामे हुआ।" असे लिहिले आहे. ही विसंगती अ.भा. कूर्मी क्षत्रिय महासभेच्या कार्यालयात चौकशी करता दूर होईल.

३७) छत्तीसावा अधिवेशन हीरक जयंती समोराहच्या रूपाने ता. १४ व १५ फेब्रुवारी १९८७ रोजी सारनाथ (वाराणसी) येथे श्री. महेंद्रसिंग गंगवार यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. याही अधिवेशनाचा सन डॉ. रामसिया सिंहाचे मते १९८७ तर कु.सीमा सचानच्या मते १९८६ ह्या विसंगतीसह नोंदलेला दिसतो. (पृष्ठ २० पहा).

३८) 'अखिल भारतीय कूर्मीमहासभा' चे नावाने ता. १६ व १७ मार्च १९९१ ला पटना येथे सदोतिसावे अधिवेशन संपन्न झाले. अध्यक्षस्थान श्री. महेंद्रसिंह गंगवार द्वारा भूषविले होते. या अधिवेशनात राजनैतिक पहलूवर अधिक जोर दिला, असे डॉ. सिंह (पृष्ठ ७० वर) लिहितात.

३९) कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, लेखक- डॉ. राममिया सिंह, समता प्रकाशन, सरस्वती विहार, कॅम्प रोड, कृष्णा दाल मिलचे समोर, सतना, मध्यप्रदेश नवीन आवृत्ती १९९२ पृष्ठ १०५, अध्याय १४ अखिल भारतीय प्रगतिशील कुर्मी क्षत्रिय संमेलनाचे संयुक्त घोषणापत्र दिनांक १९ ते २३ एप्रिल १९९१ पर्यंत शांतीकुंज हरिद्वार येथे गायत्री परिवारच्या आवाहनारूप अखिल भारतीय कूर्मी क्षत्रिय संम्मेलनाचे आयोजन केले गेले. त्यात पहिलाच प्रस्ताव पारित केला की, "विवाह संबंध उपजातीयो की सीमा से बाहार निकलकर कूर्मी क्षत्रिय जाति मात्र मे किये जाय जिससे भेदबुद्धी समाप्त हो और उपयुक्त वर कॅन्याओंके चुनाव हेतु व्यापक क्षेत्र मिल सके।"
संमेलनात आणखी, ११ क्रमांकाचा प्रस्ताव (कु.वं.क्ष. की. ले. सिंह, पृष्ठ १०७) दिला की, अखिल भारतीय कूर्मी क्षत्रिय महासभेच्या कित्येक सदस्यांनी प्रस्ताव पारित केला की, भावी संमेलन शांतिकुंज मध्येच ता. २० ते २४ ऑक्टोबर १९९१ या कालावधीत आयोजिले जावे. उर्वरीत माहिती अद्याप प्राप्त झाली नाही. जिज्ञासूंनी 'कूर्मी क्षत्रिय जागरण', सरदार वल्लभभाई पटेल स्मारक, एस् १४/८३, नलिया बाग, वाराणसी (उत्तरप्रदेश) या नियतकालिकाकडे किंवा महासभेच्या केंद्रिय कार्यालयात पत्रद्वारे चौकशी करावी. त्यासाठी पत्ता :- अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय महासभा, मुख्यालय. १८६/अ. दारूलशफा, लखनऊ, उत्तर प्रदेश.

१) वर्तमान अध्यक्ष (सन १९९६ मध्ये) मे. जनरल केदारनाथ सिंह, अध्यक्ष ४, बी, अनुसुइया अपार्टमेंट, शास्त्री नगर, पटना - १४,
२) राजकुमार वर्मा, विधायक उत्तरप्रदेश महामंत्री
३) कोषाध्यक्ष पटेल रामबाबू गंगवार, अ/१८६, दारूशफा, लखनाऊ, दूरभाष (निवास) ३८००१२
४) कूर्मी क्षत्रिय जागरण-प्रधान संपादक (पदेन) पटेल राजकुमार वर्मा, डी-७, बटलर पॅलेस कालोनी, लखनऊ, फोन - २७३५१८
५) प्रबंध संपादक : पटेल राजकुमार सचान 'होरी', 'मातृभाषा',१६ वसंत विहार, पिकनिक स्पॉट रोड, इंदिरानगर, लखनऊ १, दूरभाष : ३८५९४२
६) मदन मोहन पटेल, पटेल निवास, ४ नवाइसा, गणेश गंज, लखनऊ, (उ.प्र.) दूरभाष : २७२०२५ (हे कुर्मी क्षत्रिय जागरणचे संपादक आहेत). पिन - २२६०१८ हा आहे.

प्रकरण २०

माळव्यातील पाटीदार

उत्तर भारतातील कूर्मीबंधू श्री. नारायण शेठने सर्वप्रथम 'कुलमी कुलादर्श' ग्रंथ प्रकाशित केला. सन १९०६ मध्ये ड्याह्याभाई लक्ष्मणभाई पटेलने 'वडनगरा कणबी क्षत्रिय उत्पत्ती' नावाचा ग्रंथ लिहिला. सन १९१० मध्ये श्री. पुरुषोत्तम ललुभाई परिखने कणबी क्षत्रिय उत्पत्ति और इतिहास नावाचा ग्रंथ लिहिला. श्री. नारायण मिस्त्री कच्छी पटेल आर्य समाजिस्ट यांनी 'पिराणा पंथनी पोल' हा ग्रंथ प्रकाशित केला. डॉ. मंगुभाई रामदास पटेल यांनी इ.सन १९८५ मध्ये रायबहादूर बहेचरदास अंबाईदास लष्करी (१८५८ ते १८८९) काळातील 'औद्योगिक व सामाजिक नेत्यांचा जीवनवृत्तांत' नावाचा ग्रंथ लिहून डॉक्टेरट (पीएच. डी) करिता सादर केला. यावरून पाटीदारांच्या इतिहासाची कल्पना येते.

कडवा पाटीदार दहा वर्षातून एका वेळी विवाह करतात. त्यांच्यात विधवा विवाह होतात. ह्या दोन्ही चाली लेवा पाटीदारामध्ये पूर्वीपासून नव्हत्या. (कु. क्ष. वा. इ. पृष्ठ १९२)

मध्यप्रदेशात श्री. माळवा कुलमी पाटीदार श्री राम मंदिर हनुमानगढी न्यास उज्जैन हे प्रसिद्ध मंदिर आहे. पूर्वी भारतातील प्रसिद्ध १२ ज्योर्तिलिंगांपैकी उज्जैनीचे महाकालेश्वर मंदिराजवळ क्षिप्रा नदीतटावर रामघाटाजवळ हनुमान गढीवर श्री राम-जानकीचे एक छोटे मंदिर होते. ते पूर्वापार पाटीदार समाजाचा प्रेरणास्त्रोत होते. त्या मंदिराची व्यवस्था स्वामी रामदासजी महाराज पहात असत. सन १९२० साली श्री. लालचंद्र महाजन वाकडिया बड उज्जैनचे रहिवाशी यांनी महंत श्री. रामदास गुरु १०८ स्वामी हरभजनदास यांना हे रामजानकी व हनुमानजीचे मंदिर दान दिले.

पाटीदारांनी पौष शुद्ध १५ संवत १९९१, तारीख १९ जानेवारी १९३५ रोजी श्री. महंत रामकृष्णदासजी गुरु १०८ श्री. रामदासजी काठिया खाकी आखाडाच्या मार्गदर्शनाने श्री. मुकाती अंबारामजी पिता श्री. मातोजी, राहणार ढोलाणा ठिकाणा मूलधान व धार जिल्हयातील बिडवाल गावचे कुणबी श्री. भगत घासीरामजी तरोद्या ह्यांनी ११ सदस्यांची कुलंबी पंचकमेटीनेमली व **"श्री कुलंबी कुलभूषण"** ग्रंथ प्रसिद्ध केला. (क.क्ष.पा.इतिहास, ले.- डॉ. पटेल, पृष्ठ २६८ पहा).

ता. २७-२-१९३४ ला उज्जैनीचे सब रजिस्ट्रार कार्यालयात क्रमांक ४३० सन १९३४ ला पंजीकरण करून श्री रामजानकी हनुमान गढीसह कुलमियांचे वरील कमेटीस हस्तांतरीत केला. ता. १-८-१९५३ ला मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचे पाटीदारांनी ठरविले. ता. १-४-१९७४ चैत्र शुद्ध ९,संवत २०३१, तारीख १-४-१९७४ रोजी मंदिरात राम, लक्ष्मण, सीता,अंबाजी, भगवान शिव यांच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा केल्या.

अवंतिका नगरीत १. माळवा कुलमी पाटीदार, श्रीराम मंदिर हनुमान गढी उज्जैन १९७८, २. श्री कडवा कुलमी पाटीदार, धर्मशाळा, कुशलपुरा, उज्जैन १९७८, ३. श्री. लेवा कुलमी पाटीदार मंदिर व धर्मशाळा, श्री लालबाई फुलबाई चौक, उज्जैन १९७८. ४. श्री अंबिका मंदिर धामनोद जिल्हा निमाड, ५. श्री. अंबिका मंदिर निमाड, ६. श्री. अंबिका पाटीदार समाज धार्मिक व पारमार्थिक ट्रस्ट जिल्हा इंदौर (म.प्र.) कार्यालय रंगवासा (राऊ) र.नं. १९७ इंदोर जिल्हा, इंदौर (म.प्र.), ७. पाटीदार धर्मशाळा ओंकारेश्वर, पूर्व निमाड, ह्या पाटीदार समाजाच्या संस्थांमधून बरेच समाजकार्य चालते.

प्रकरण २१

पाटीदारांच्या परिवर्तनाची वाटचाल

ता. २६ नोव्हेंबर १९४९. आपण भारतीयांनी भारत हे एक सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक गणराज्य निर्माण करण्याचे ठरविले, व येथील सर्व नागरिकांना सामाजिक आर्थिक व राजकीय न्याय, विचार, उच्चार, समजुती, श्रद्धा व पूजा यांचे स्वातंत्र्य, दर्जा संधीची समानता, ही प्राप्त होऊन राष्ट्रैक्य व व्यक्तिप्रतिष्ठा या संबंधी भरवसा देऊन भ्रातृभाव वाढविण्यासाठी भारतीय राजघटना मान्य केली. तिच्या सरनाम्यानुसार आपल्या परिवर्तनाच्या वाटचालीने आपण आपले व राष्ट्राचे जीवन घडविण्याचे ठरविले आहे.

म्हणून या उलट जाणारी वाटचाल ही प्रतिगामी होय, व ह्या सरनाम्यानुसार वाटचाल ही पुरोगामी वाटचाल होय. ही वाटचाल बिनधोकपणे करता यावी म्हणून प्रत्येक नागरिकास घटनेने काही मूलभूत हक्क प्रदान केले आहेत. त्या हक्कामुळे आपल्या प्रगतीसाठी आपल्या परिवर्तनाच्या दिशेने आपण वाटचाल करू शकतो.

८४३९३०८६१ लोकसंख्या असलेल्या आजच्या भारतात सुमारे ४२ कोटी मतदार असून ते २५ राज्ये व ७ केंद्रशासित प्रदेशातून एकुण ५४२ खासदार लोकसभेत पाठवितात, व २ ॲंग्लो इंडियन वंशाचे शासन नियुक्त खासदार मिळून ५४४ खासदारांची लोकसभा + भारतीयांनी अप्रत्यक्ष मतदान पद्धतीने राज्य सभेवर निवडलेले २५० खासदार मिळून = ७९४ खासदारांची द्विसभागृही संसद असते.

माझ्या अंदाजाप्रमाणे पूर्ण भारताचे प्रतिनिधित्व करीत असलेल्या या संपूर्ण संसदेत फक्त एखादाच मराठी भाषिक लेवा पाटीदार खासदार जाऊ शकतो. इतके आपण अल्पसंख्यांक किंवा अत्यल्प संख्य आहोत. अनुसूचीत जाती-जमातीचे आपल्या मराठी भाषिक लेवा खासदारांच्या शेकडो पटीने खासदार असतात, तर जळगाव मतदार संघासारख्या लेवा वस्तीच्या मतदार क्षेत्रातून एखादा खासदार संसदेवर निवडून येतो. पण पूर्ण भारतीय संसदेत त्याला अनुमोदक म्हणून एखादाही दुसरा मराठी भाषिक लेवा पाटीदार खासदार अद्याप निवडला गेला नाही, हा इतिहास आहे. मग संसदेत तुमचे प्रश्न अनुमोदनासह मांडायला तुम्हास अडचण पडते. त्यासाठी इतर अनुसूचित वा इतर अन्य जातीचा अनुमोदक शोधावा लागेल, व अशा वेळी लेवा जातीचे हिताचा प्रश्न मांडण्यासाठी हिंदी व गुजराथी भाषिक लेवा पाटीदार खादासरांची मिळून एक लॉबी संसदेत होऊ शकते. यासाठी ज्ञातीय एकात्मक व्यासपीठ असणे आवश्यक आहे. कारण, गुजराथेतील, मध्यप्रदेशातील, राजस्थानातील गुजराथी आणि हिंदी भाषिक लेवा खासदारामध्ये महाराष्ट्रातील मराठी भाषिक खासदारांची जातीय प्रश्न मांडण्यात युती होऊ शकते.

एवढेच काय पण लेवा खासदार + कडवा खासदार मिळून पाटीदार खासदारांची युती आणखी बहुसंख्य करण्यासाठी कुणबी खासदारांची जबरदस्त लौबी संसदेत प्रभावशाली राहू शकेल. यासाठी तिरोळे, कुणबी, माना कुणबी, खैरा कुणबी, लोणारी कुणबी, खेडुला कुणबी, बावना कुणबी, धनोजे कुणबी, वंजारी कुणबी, दखना कुणबी, आदि कुणबीयांच्या पोटजाती, पोटजातीचा उल्लेख न करता व्यवहारात कुणबी म्हणूनच वावरतात. शाळा, कॉलेज, नोकरी, शासकीय दप्तर हर ठिकाणी कुणबी हाच निर्देश करतात. फक्त लग्नसंबंधाचे ठायीच पोटजात पाहतात. ते प्राथमिक पाऊल उचलून इतर कुणब्यांचे लेवा पाटीदारांनी अनुकरण करणे. हितावह राहील, व यातूनच

पुढे पोटजातीही नष्ट करून सर्व कुणबी जातीने ब्राह्मण जातीप्रमाणे रोटी-बेटी व्यवहारात एकात्मतेची वाटचाल करावी. कारण, विभक्तीकरण हे दुर्बलतेकडे नेणार आहे.

एवढेच काय आम्ही कुणबी नसून मराठा क्षत्रिय उच्च जात असल्याचे निर्देशिल्यामुळे इतर मागास जातीचे सवलत प्रसंगी विभक्तीकरणाने समाजाचे अनहीत होते, हे श्री. दरेकर यांनी बुलढाणा पत्रिका-संपादक : श्री. ना. जा. दांडगे, वॉर्ड नं. १७, बुलढाणा यांचे साप्ताहिकात मोठे मुद्देसूद रीतीने विश्लेषण केले होते त्याचाही विचार करणे हितावह नाही काय ?

लेवा पाटीदार कुणबी जाती ऐवजी लेवा पाटील / लेवा पाटीदार / लेवा कुणबी अशी पोटजात शाळा, कॉलेज, कोटवारबुक, खरेदी-विक्री पत्र, आदी ठिकाणी लिहिता. त्यमुळे इतर मागास जातीचे (ओबीसी) प्रमाणपत्र मिळविताना प्रत्येकाला ॲफेडेव्हीट करून कुणबी म्हणून प्रमाणपत्र घ्यावे लागते. त्या अडसरामुळे नोकरी-शाळा प्रवेशाचे क्वचित विलंब झाल्यास जन्माचे नुकसान होते. तो त्रास पोटजात न लिहिता जात (कुणबी) लिहिणारांना होत नाही. शिवाय भारतीय प्रदेशात कुणबी समाजासाठी राखून ठेवलेल्या काही दानशूरांच्या शिष्यवृत्तीस लेवा समाज पोटजातीचा शाळा, कॉलेज व शासन दप्तरी निर्देश केल्यामुळे आपण अल्पसंख्यच नाही तर अत्यल्प संखीय समाज बनतो. पर्यायाने दुर्बलतेची ही आपली वाटचाल (United we stand, Divided we fall) विनाशकारी ठरते.

एका खासदाराचा मतदारसंघ सुमारे साडेसात लाख लोकवस्तीचा असतो. कदाचित भारतात मराठी भाषिक लेवा पाटीदारांची जनगणना केल्यास ती साडेसात लाखापेक्षाही कमीच भरेल असे असताना या मराठी भाषिक लेवा पाटीदारांना जाग कशी येत नाही. विदर्भातील ८० गावे + खानदेशातील १४० गावे + नोकरीनिमित्त या मूळ प्रदेशातून स्थानांतरीत झालेली अंदाजे ३० शहरातील भ्रातृमंडळे = एकूण जास्तीत जास्त २५० गावातच एकूण सर्व मराठी भाषिक लेवा पाटीदार जात नांदते.

याउलट मध्यप्रदेश व राजस्थानच्या केवळ १७ जिल्ह्यातून हिंदी भाषिक लेवा पाटीदारांची एकूण ५२९ गावे आहेत + कडवा पाटीदारांची ७०५ गावे आहेत + हिंदी भाषिक हे उभय पाटीदारांची मिश्रवस्ती असलेली एकूण ३९ गावे आहेत. म्हणून = हे एकूण हिंदी भाषिक पाटीदार ५२९ + ७०५ + ३९ = १२७३ गावातून लेवा पाटीदार वा कडवा पाटीदार ही पोटजात न लिहिता केवळ पाटीदार म्हणून ज्ञातीचा निर्देश करतात, व वरसंशोधनास अधिक वाव रहावा व राजकारणात बहुसंख्यतेची बलदंडता यावी म्हणून सन १९७४ पासून या दोन्ही उपजातींनी आपली विभक्ततेची सीमा रेषा पुसून आपसात रोटी-बेटी व्यवहार सुरू केला व दोन्ही पाटीदार समाजाची एकीकृत एक पाटीदार जात निर्माण केली.

आणि मराठी भाषिक लेवा पाटीदारांची एकूण लोकसंख्या फक्त साडेचार लाख (पिंपरूड कोल्हे वृत्तांत, लेखक- डॉक्टर आ. कौ. कोल्हे, पृष्ठ ३, परिच्छेद ३ पहा). असल्याचे डॉ. कोल्हे यांच्या निर्देशनावरून कळल्यावरही आम्ही अजून जागे होत नाही याचेच नवल आहे.

धर्म व जातीच्या आधारावर संविधान, राज्याचे कायदे, प्रतिज्ञा, युवा संघटन, आदिद्वारा हिंदी भाषिक लेवा पाटीदार व हिंदी भाषिक कडवा पाटीदारांनी समाज परिवर्तन घडविणे शक्य आहे असे द्रष्टेपणाने माळवा निवासी हिंदीभाषिक लेवा व कडवा पाटीदारांनी हेरले व मध्यप्रदेशात प्रादेशिक समाज संघटनाद्वारे सन १९७४ पासून कडवा पाटीदार व लेवा पाटीदार या कुणबी जातीच्या दोन्ही पोटजातीत परस्पर रोटी-बेटी व्यवहार सुरू करून सामाजिक एकात्मतेच्या परिवर्तनाच्या दिशेने एक पायरी तत्रस्थ पाटीदारांनी ओलांडली याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहे. एवढेच काय पण गुजराथी भाषिक लेवा कडवा पाटीदार तथा मराठी भाषिक लेवा व कडवा पाटीदारांशी

प्रदेश व भाषाभिन्नतेमुळे दुरावलेले रोटी-बेटी व्यवहार ते परत रूढ करण्याचे तयारीत आहे. कदाचित हे शक्य झाल्यास या पुढची पायरी म्हणून तिरोळे, माना, खैरे, लोणारी, खेडुला, बावना, धनोजे, वंजारी, दखना आदी कुणब्यांच्या सर्व पोटजाती मोडून परस्पर रोटी-बेटी व्यवहाराने एकात्म विशाल कुणबी जातीचे पुनर्निमाण करणेही अशक्य नाही, आणि आपल्या उन्नतीसाठी हे सर्व पोटजातींना आवश्यक आहे. हाच मंत्र ब्राह्मणांनी अनुसरून सर्व जातीचे एका ब्राह्मण वर्णात त्यांनी रूपांतर करून ब्राह्मण वर्णालाच ब्राह्मण जात बनविले व उन्नती साधली याचा सर्वांनी बोध घ्यावा.

ह्या एकीकरणाचे महत्त्व जाणून मध्यप्रदेशात हिंदी भाषिक लेवा पाटीदार व हिंदी भाषिक कडवा पाटीदार ह्या दोन उपजातीचे एका एकात्म हिंदी भाषिक पाटीदार जातीत रूपांतर करण्याचा श्री गणेशा १०८ श्री महंत रामकृष्णजी हनुमानजी उज्जैन यांनी 'कुलमी कुलभूषण' नावाचा ग्रंथ लिहून त्यानुसार कार्यवाही सुरू केली. त्यासाठी जाति संविधान बनवून त्याद्वारे सन १९७४ पासून ही समाज परिवर्तनाची वाटचाल सुरू केली. (कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, लेखक डॉक्टर मंगुभाई रामदास पटेल, पृष्ठ ३०२ पहा).

पुढे बांझ, मोठा भावनगर, सौराष्ट्रात गोंडल, आदी स्थळी पाटीदारांच्या जाती सभा झाल्या. सौराष्ट्रातील गोंडलच्या पाटीदार जाति-परिषदेचे अध्यक्ष खुद्द महात्मा गांधी होते. पाटीदार समाज प्रगतिस्तव त्यांनी बहुमोल सूचनाही अध्यक्षपदावरून केल्या होत्या असे कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, पृष्ठ ३७० वर डॉ. मंगूभाई रामदास पटेल लिहितात.

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल, नरसीभाई पटेल, (संपादक : पाटीदार), बॅरिस्टर मगनभाई, गोविंदभाई, दरबार गोपालदास देसाई, सरदार पटेलाची सुपूत्री कुमारी मणिबेन पटेल दरबार गोपाल दासची पत्नी इत्यादी गुजराथी भाषिक लेवा पाटीदारांनी गुजराथी भाषिक कडवा पाटीदारांच्या जाती-परिषदांची आतिथ्यपदेही स्वीकारली होती व कडवा-लेवा भेद मिटविण्याचा त्यांनी गुजराथेत उपदेशही केल्याचे कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, पृष्ठ ३७१ वर डॉ. मंगुभाई रामदास पटेल लिहितात,

याच पृष्ठावर पुढे डॉ. मंगुभाई पटेल लिहितात की, **"अहमदाबादमे कडवा पाटीदार युवा संघटनाने प्रेत भोज उन्मलन हेतू जाफराबादमे संघर्ष किया तब लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेलने पूर्ण सहयोग दिया था। दरबार गोपालराय और सरदार पटेलने बाल-शादी के खिलाफ आवाज उठाई थी। परिणाम स्वरूप सरदार को भी जाति-बहिष्कार का भोग बनना पडा था।"**

"जब आर्य समाजी नारायणजी मिस्त्रीने पीराणा पंथ के खिलाफ आवाज उठाई और स्वधर्म मे वापस आने की बात की तब कई महिलाओने पीराणा पंथ छोडकर हिंदू बननेके आंदोलन मे सहयोग दिया था।

कु. मणिबेन पटेल (सरदार पटेलकी कन्या), श्रीमती भक्तीबा देसाई, श्रीमती डाहीबेन और श्रीमती पार्वतीबेन देसाई जैसी महिलाओंने लेऊवा समाज मे दहेज और विधवाओं पर हुऐ अत्याचारोके विरोधमे आवाज उठाई। कुलीनशाही के विरुद्ध भी संघर्ष किया।"(कुलमी पाटीदारोंका इतिहास,पृष्ठ ३७१ लेखक डॉ.मं.रा. पटेल).

मध्यप्रदेश राजस्थानमध्ये बराच हिंदी भाषिक पाटीदार समाज आहे. त्याचे विवरण मध्यप्रदेश समाज स्मारिका सन १९७८ वरून"कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास" लेखक- डॉ. पटेल, पृष्ठ ३७८ वर पुढीलप्रमाणे दिले आहे.

सन १९७८ मध्ये माळवा, नेमाड व राजस्थानात पाटीदारांची लोकवस्ती पुढीलप्रमाणे होय.

हिंदी भाषिक कडवा पाटीदार लेवा पाटीदार यांची गावे

अ.नं.	जिल्हा	प्रदेश	पाटीदारांची गावे	कडवा पाटीदारांची गावे	लेवा गावे	मिश्र वस्तीचेगावे
१.	राजगड	मध्यप्रदेश	३१	८	२२	१
२.	राजापूर	मध्यप्रदेश	१४२	६४	७७	१
३.	उज्जैन	मध्यप्रदेश	८८	८०	६	२
४.	भोपाळ	मध्यप्रदेश	१५	४	९	२
५.	सिहोर	मध्यप्रदेश	२३	१८	५	-
६.	देवास	मध्यप्रदेश	५१	५१	-	-
७.	इंदोर	मध्यप्रदेश	१९	१९	-	-
८.	रतलाम	मध्यप्रदेश	१६९	९१	६९	९
९.	झयाबूआ	मध्यप्रदेश	१९	४	१३	२
१०.	धार	मध्यप्रदेश	१६३	५६	१०४	३
११.	खरगोण	मध्यप्रदेश	१६२	२०	७२	-
१२.	खंडबा	मध्यप्रदेश	७	-	६	१
१३.	मन्दसौर	मध्यप्रदेश	२५९	१८१	६६	१२
१४.	झालावाड	राजस्थान	७५	१५	५६	४
१५.	चितोडगड	राजस्थान	४२	१९	२२	२
१६.	उदयपूर	राजस्थान	३	-	३	-
१७.	कोटा	राजस्थान	५	५	-	-
एकूण			१२७३	७०५	५२९	३९

ता. १९ ते २१ फेब्रुवारी १९४६ ला उज्जैनी ते भोपाळ लोहमार्गावरील कालिसिंधच्या कूर्मी क्षत्रिय बंधू संघ मध्यभारताच्या द्वितीय अधिवेशनाचे स्वागतमंत्री परबतसिंह जगन्नाथसिंह म्हणतात की, "असंघटित जातियां का अस्तित्व खतरेसे खाली नही है ।"

कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, लेखक- डॉ. पटेल, पृष्ठ ३६७ वरून कळते की, गुजराथच्या पाटीदारांनी लंडन व आफ्रिकामध्ये इ.सन १९०२ पासून संघटन सुरू केले. रंगून व बर्मामध्ये (ब्रह्मदेशात) मोती व माणिकांच्या उद्योगात तिथे भरपूर पाटीदार गेले होते. आफ्रिकात म. गांधींना पाटीदारांनी सहयोग दिला व रंगूनमध्ये व बर्मामध्ये सुभाषचंद्र बोसच्या आझाद हिंद फौजेस पाटीदारांनी सहयोग दिला (कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, पृष्ठ ३६८ पहा). पंजाबातून पहिल्या शतकानंतर पाटीदार भारतभर विखुरलेत. (पृष्ठ ३६८ पहा). इ.सनाच्या ९ व्या शतकारंभी व १६ व्या शतकान्ती गुजराथेतील पाटीदार मध्यप्रदेशात स्थलांतरीत झाले. (कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, ले.डॉ. पटेल, पृष्ठ ३६९ पहा). इ.सन १९४८-४९ मध्ये शाजपूर, राजगड व झालावाड जिल्हयातील प्रसिद्ध व दानशूर समाजसेवक स्व. शेठ श्री. नाथुलालजी पटेल राजगढ व स्व. तपस्वी रामलखनदासजीने लेवा कूर्मी समाज हितैषी समाज संघटन कायम केले. त्याचे सन १९४९ चे प्रथम अधिवेशन श्री. बालाजी (मध्यभारत)मध्ये झाले. सिद्धनाथ पटेल (मताना) श्री. हरि नारायणजी पटेल (मोमन बडोदिया) व सीतारामजी पटेल खोरिया (मा. शाजापूर) आदिंनी 'श्री लेवा कुलमी समाज संघ मध्यप्रदेश व राजस्थान' नावाने संघटन सहकार्य केले.

पुढे ता. २-१०-१९७४ रोजी मध्यप्रदेश पाटीदार समाज संघटनेची स्थापना झाली ता. २-१०-१९८१ रोजी 'पाटीदार जागृति' मासिकाच्या प्रथम अंकाचे प्रकाशन झाले, व खेमचंद्र भाई हे प्रथम संपादक बनले. पुढे प्रल्हाद पाटीदार व्याख्याता मंदसौर हे प्रबंध संपादक व रामेश्वर

पाटीदारांना प्रधान संपादक नेमले.

पुढे गुजराथ व म.प्र. पाटीदार समाजद्धारा अखिल भारतीय पाटीदार समाज गठण केले. सन १९८७ मध्ये उंझा येथे कार्यकर्ता संमेलन झाले. मध्यप्रदेश पाटीदार समाजाची सन १९५० व १९८८ पर्यंत प्रगती झाली. त्याची पाच अधिवेशने झाली. त्यापैकी दुसऱ्या अधिवेशनाची स्मरणिका मला उज्जैनीच्या कार्यालयात सापडली. तीत मध्यप्रदेशाच्या माळवा, निमाड व राजस्थानच्या १७ जिल्ह्यांतील पाटीदारांची जनगणना दिली आहे. मागील पृष्ठावर त्याचा संक्षिप्त गोषवारा दिला आहे. सविस्तर माहितीसाठी जिज्ञासूंनी ती मूळातूनच वाचून काढावी.

पाटीदार समाज प्रांतीय विशाल पंचम अधिवेशन ता. २१ व २२ मे १९८८ रोजी पाटीदार छात्रावास प्रांगण, मह नसोराबाग रोड, नीमच, जिल्हा मंदसौर येथे झाले. त्यात मध्यप्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र व गुजराथचे प्रबुद्ध विद्वान निमंत्रित केले होते. त्या वेळी ७००० प्रतिनिधी श्री. चैनसिंह पाटीदारांच्या अध्यक्षतेखाली प्रथम माँ. अंबाजी व नंतर सरदार पटेलांच्या छायाचित्राला फुलमाला चढविली. त्या अधिवेशनात **"नारी सिंह वाहिनी दुर्गा अंबा है।"** हा दाखला देऊन पाटीदार महिलांना प्रोत्साहन दिले (कूर्मी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, ले.डॉ.पटेल, पृष्ठ ३८८).

अध्यक्षीय भाषणात चैनसिंह पाटीदार म्हणाले की, कूर्मी, कुनबी, पटेल, पाटीदार आदी नावाने आमचा समाज उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, बिहार, उडिसा, राजस्थान, महाराष्ट्र, गुजराथ आदी प्रांतात वस्तीस आहे. स्कंद पुराणात कूर्मऋषीच्या परंपरेत ८० वंशांचा उल्लेख आहे. वेद पुराणादी ग्रंथातून पाटीदार समाज महात्म्याचे पुरावे मिळतात. अशा या मध्यप्रदेश पाटीदार समाज संघटनांची स्थापना ता. २.१०.१९७४ ला उज्जैनीला मंदसौर निवासियांनी केली. याचे पहिले अधिवेशन ता. १० व ११ जानेवारी १९७६ ला किशनभाई मुकाती इंदौरकर यांच्या अध्यक्षतेखाली उज्जैनीला झाले. दुसरे अधिवेशन उज्जैनीस ता. १३ व १४ मे १९७८ रोजी खेमचंद्र भाईच्या अध्यक्षतेखाली व तिसरे अधिवेशन ता. २ व ३ जून १९७९ रोजी इंदूरला झाले व ४ थे अधिवेशन शाजापूरला, ता. ३० व ३१ मे १९८१ रोजी श्री. परशुराम पाटीदार मंदसौरवासीयांचे अध्यक्षतेखाली झाले व पाचवे अधिवेशन ता. २१ व २२ में १९८८ रोजी चैनसिंह पाटीदारांच्या अध्यक्षतेखाली सन १९८८ साली मंदसौर जिल्ह्यात नीमच नगरीत झाले.

या अधिवेशनाचे अध्यक्षीय भाषणातून चैनसिंह पाटीदार म्हणाले, की **वर्तमान काळात देवालयापेक्षा शिक्षालयाची (शाळांची) अधिक जरूरत आहे.** स्त्री-शिक्षण, युवा संघटन, वसंत पंचमी, अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर सामुहिक विवाह, राजनिती व धर्मनितीमध्ये सक्रीय सहभागाचा आदेश दिला, व "पाटीदार जागृति" ह्या मुखपत्राचे प्रचारावर भर दिला.

"मध्यप्रदेश एवं राजस्थान पाटीदार समाज संघटन" प्रधान कार्यालय, श्रीराम मंदिर हनुमानगढी उज्जैन (म.प्र.) या संस्थेचे मासिक मुखपत्र, 'पाटीदार जागृति प्रबंध', संपादक - डॉ. प्रल्हाद पाटीदार, मंदसौर, प्रकाशक- श्री रणछोडलाल पाटीदार, करवड, प्रबंध न्यासी पाटीदार जागृती न्यास, मंदसौर (म.प्र.), प्रकाशन कार्यालय, पाटीदार समाज छात्रावास मंदसौर वार्षिक वर्गणी ४० रु. (म.प्र.).

संस्थेचे अध्यक्ष डॉ. रमेशचंद्र बेलावत, अध्यक्ष म.प्र.एव राजस्थान पाटीदार समाज संघटन, एफ/१, पशु चिकित्सा कॉलनी, ए.बी.रोड, सारंगपूर, जिल्हा राजगढ (ब्यावरा) मध्यप्रदेश - ४६५६९७, फोन (०७३७१), २२५४०, ४७२८० तसेच, नुकतेच त्यांचे मला दिवाळीनिमित्त शुभेच्छा पत्र आले त्यात त्याचे निवासी, किलोदा तहसील एवं जिल्हा शाजापूर (म.प्र.) दूरभाष ४७२८० येथून त्यांचे मला पत्र आले यांचे सोबत श्रीमती सावित्रीदेवी बेलावत महिला उपाध्यक्ष, जिल्हा पाटीदार समाज, जिल्हा राजगड यांचेकडून आलेल्या शुभ दीपावली संदेशातही हाच पत्ता दिला आहे.

श्रीमान डॉ. रमेशचंद्र बेलावत हे प्रांताध्यक्ष, म.प्र.एवचे राजस्थान पाटीदार समाज संघटन २. अध्यक्ष म.प्र. व्हेटर्नरी सर्जन एसोसिएशन, जिल्हा राजगड ३. म.प्र. राज्य कर्मचारी संघ तहसील सारंगपूर, ४. ट्रस्टी, गायत्री आश्रम स्कूल, अभयपूर, ५. ट्रस्टी, पाटीदार समाज शैक्षणिक न्यास शुजालपूर, ६. ट्रस्टी, रामलखन पाटीदार समाज धर्मशाळा उज्जैन, ७. सचिव, पूर्व सचिव, रोटरी क्लब, राजापूर, ८. सह संघटन मंत्री, विश्व हिंदू परिषद. जिल्हा शाजापूर, ९. व्हेटनेरी सर्जन पशुचिकित्सालय, सारंगपुर आदि पदे भूषविणारे अत्यंत कार्यक्षम समाजसेवक आहेत.

यांच्याशी झालेल्या पत्रव्यवहारातून उत्तरे देण्यात ते अत्यंत दक्ष असल्याचा मला प्रत्येक वेळी अनुभव आला आहे. कार्याचा व्याप असूनही पत्रव्यवहारात ते दक्ष असल्याचा आगळा वेगळा अनुभव पाहून अवाढव्य व्यापातही डॉ. भाऊसाहेब वि.भि. कोलतेही या वयात असेच पत्रोत्तरात दक्षता ठेवतात. हे पाहून यांच्याविषयीचा आदर दुणावतो. व आपल्या समाजाने हा आदर्श जरूर गिरवावा असे वाटते.

पाटीदार समाज व त्यांचे संघटनाबाबत स्थूल माहितीसाठी तत्रस्थ कार्यकर्त्यांचे पत्ते पुढे देत आहे :-

१) श्री. मोहनलाल पाटीदार, शिक्षक, सचिव, म.प्र. एवं राजस्थान पाटीदार समाज, डी, २०६, अलकापूरी, रतलाम (म.प्र.) दूरभाष : ३२४२६
२) श्री. खेमचंदभाई पाटीदार, पाटीदार मशिनरी स्टोअर्स, मनावर जिल्हा धार (म.प्र.)
३) श्री. परशुरामजी पाटीदार. माजी अध्यक्ष, म.प्र. पाटीदार समाज नयी आबादी, पोस्ट मंदसौर, जिल्हा - मंदसौर (म.प्र.).
४) श्री. चतुरभूजजी पाटीदार, रामस्नेही भवन, ए.बी.रोड, मु+पोस्ट = राऊ, जिल्हा = इंदौर (मध्यप्रदेश).
५) श्री. मांगीलाला पाटीदार, मु. कवड्या पोस्ट, व्हाया मंडेश्वर, तहशील महेश्वर, जिल्हा - खरगोण (म.प्र.)
६) चैनसिंह पाटीदार मु+पोस्ट = अभयपूर तहशील व जिल्हा शाजापूर (म.प्र.)
७) प्रो. प्रल्हाद पाटीदार, मनावर, जिल्हा - धार (म.प्र.)

मध्यप्रदेश, राजस्थान व गुजराथच्या कार्यकर्त्यांचे तारीख १४ व १५ नोव्हेंबर १९८७ रोजी उंझा (गुजराथ) येथे श्री. केशवलाल विठ्ठलदास पटेल यांचे अध्यक्षतेखाली सुमारे ७५० कार्यकर्त्यांचे सेमिनार झाले. त्या चर्चासभांच्या दुसऱ्या सभेत या वेळी म.प्र. व राजस्थान निवासी कार्यकर्त्यांनी एका सुरात 'कडवा', 'लेवा' शब्दका प्रयोग मत करो। पाटीदार शब्दका प्रयोग वा उपयोग करो, पाटीदार बनो असे नारे लावले होते.

माळवा कुणबी 'दरा' व 'कराड' या विभागातील नावाने प्रसिद्ध आहे. पूर्व खानदेश पश्चिम विदर्भ यातही लेवा पाटीदार आहेत. त्यांची मातृभाषा मराठी असल्याने ते संपर्कातून दूरावत चालले. पंजाबच्या गुजराथ शहराजवळ लेवी नावाची प्रजाति आहे. गुर्जर व जाट सुद्धा लेवा व कडवा पाटीदार रक्तगटातीलच आहेत.

ता. १४ व १५ नोव्हेंबर १९८७ रोजी श्री. उमिया माताजी संस्थान उंझा द्वारा आयोजित मध्यप्रदेश, राजस्थान तथा गुजराथच्या पाटीदार कार्यकर्त्यांची सेमिनॉर उंझा येथे माताजी सभागृहात श्री. उमिया माताजी संस्थान, उंझाचे अध्यक्ष सेठ श्री. केशवलाल विठ्ठलदास पटेल यांचे अध्यक्षतेखाली झाली. तीत सुमारे ७५० कार्यकर्ते उपस्थित होते. त्यात सुमारे ७० महिलासुद्धा होत्या.

या सभेच्या स्वागतपर भाषणात श्री. केशवलाल पटेलांनी म्हटले की, आज समाजात परिवर्तनाची जरुरत आहे. कारण **जगातील सारे समाज परिवर्तनाकडे वाटचाल करीत आहेत. म्हणून अखिल भारतीय स्तरावर पाटीदार समाज संघटनाची जरूरी आहे**. असे सांगितले तर पश्चिम निमाड

(खरगोण) चे मांगीलालजी पाटीदार म्हणाले की, "राष्ट्र के नक्शेपर हमारा कोई निशान नही है, इसलिए अखिल भारतीय पाटीदार समाज संघटन बनाना चाहिए। (कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, लेखक डॉ. पटेल, पृष्ठ ४३३).

या सभेत ग्राम, तहसील, जिल्हा स्तरावर संघटन करण्याचे ठरले. या अखिल भारतीय पाटीदार समाज संघटनाचे प्रधान कार्यालय श्री. चतुर्भूज पाटीदारांचे निवासस्थानी आहे. पत्ता - रामस्नेही भवन, ए.बी. रोड, राऊ, जिल्हा, इंदौर (म.प्र.) येथे अ.भा.कार्यकारिणीच्या बैठकी होतात. असे कळताच दुधलगावकर श्री. रमेश एकनाथ पाटील नाबार्ड बँकेचे एक कार्यक्षम अधिकारी यांना सोबत घेऊन मी त्यांचे कार्यालयात गेलो तेव्हा त्यांनी कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, लेखक डॉ. मंगूभाई रामदास पटेल, मूल्य १८० रुपये हा अमोल ग्रंथ व श्री अंबिका पाटीदार समाज धार्मिक एवं पारमार्थिक ट्रस्ट, रंगवासा, राऊ जिल्हा, इंदौर (म.प्र.) या संस्थेची प्रधान संपादक श्री. पुरुषोत्तम मुकाती यांनी संपादित केलेली 'पाटीदार-दर्पण' ही बहुमोल स्मारिका आम्हास सप्रेम भेट म्हणून दिली, व वरील प्रतिष्ठानाचा १४ एकर भूमिवरील प्रारंभ केलेला नियोजित उमियाधाम प्रकल्प दाखविला. तसेच, श्री. मालवा कुलमी पाटीदार श्रीराम मंदिर, हनुमान गढी न्यास उज्जैन (म.प्र.) या प्रतिष्ठानची १९५६ ते १९८२ चा पुष्पांजलिनामक रजत जयंती वर्षानिमित्त काढलेली स्मारिका सुद्धा दिली. त्यातील माहिती आधारे हिंदी भाषिक लेवा पाटीदार व कडवा पाटीदारांचे समाज कार्य पाहून मन थक्क होते, व तसेच, कार्य खानदेश विदर्भात का होऊ नये ? असे मन मनाशीच गुणगुणते.

तेथे अखिल भारतीय पाटीदार समाज संघटनाचे संविधान तयार झाल्याचेही त्यांनी सांगितले, व त्या संघटनाचे पदाधिकारी पुढीलप्रमाणे असल्याचेही कळाले :-

१. संयोजक - खेमचंदभाई पाटीदार इंदौर, २. सचिव, चतुर्भूज पाटीदार, राऊ जिल्हा इंदौर (म.प्र.), ३. कोषाध्यक्ष :- रामजीभाई पटेल इंदौर, ४. विधि सल्लागार - आर. सी. मुकाती एडव्होकेट, हायकोर्ट इंदौर व परशुराम पाटीदार एडव्होकेट मन्दसौर, ५. सह संयोजक - डॉ. मंगुभाई पटेल, अहमदाबाद (गुजराथ), हिरालाल पाटीदार झालवा पाटन (राजस्थान), ६. सहसचिव - मांगीलाल पाटीदार कवडिया (महेश्वर), ७. संघटन सचिव- राजाराम पाटीदार, उमरी खेडा, तहशील महू जिल्हा, इंदौर, आत्माराम पाटीदार - बडिया मांडू (देवास) हे आहेत.

कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास, लेखक डॉ. मंगुभाई रामदास, पटेल- रीडर, गुजराथ युनिव्हर्सिटी, अहमदाबाद (गुजराथ), पाटीदार संशोधन और प्रकाशन ट्रस्ट अहमदाबाद या ग्रंथाचे 'उपसंहार नामक' प्रकरणात, पृष्ठ ४४० वर लिहिले आहे की, कुलमीओंकी उत्पत्ति, उनके स्थानांतरण, उनके आंतरिक गुण एवं विशिष्ठताओं का निष्कर्ष है की, **पाटीदार मूलत: क्षत्रिय है। उसकी रग रग मे क्षात्र रक्त बहता है।** भारत भर मे बस रहे विविध शाखाओंके क्षत्रिय एकही जाति के थे। एक लम्बे कालक्रममे उनके स्थानांतरण एवं व्यवसायभेद के कारण उनके कुल व रहन सहन मे निरंतर परिवर्तन आते रहे है।

गुजराथ, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तर भारत और राजस्थान के पाटीदारोंमे काफी आत्मीय संबंध रहे थे। **मालवा के कुणबी पाटीदारोंके दो विभाग है। 'दरा' और 'कराड' नाम से वे पहचाने जाते है।** खानदेशके पूर्व भागमे कुछ लेऊव पाटीदार है। पंजाबके गुर्जरोमेंभी लेवा नामकी प्रजाति है। **गुर्जर और जाठ भी लेऊवा - कडवा पाटीदार ही है।** उनमे विवाह की रस्मे काफी मिलती जुलती है। सन १९११ मे संपन्न आखिरी दस वर्षीय विवाह के बाद उस प्रथा मे परिवर्तन आया। मध्यप्रदेश पाटीदार समाज की संरचना के आधारस्तंभ एवं **'कुलमी कुलभूषण'** के रचयिता श्री रामकृष्ण दासजीने भी अपने उपदेश व लेखनमे परिवर्तन को चालना दि।"

समाजसंघटनाद्वारे परिवर्तनाची वाटचाल हाच एकमेव प्रगतीचा मार्ग आहे. हे जाणून महाराष्ट्रातील

मराठी भाषिक लेवा पाटीदारांचीही अशी राष्ट्रीय स्तरावरील समाज संघटना असावी असे वाटल्याने माझे मित्र- श्री. महेंद्र ओंकार राणे,संस्थापक, अध्यक्ष अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळ, नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/१३७५, जळगाव- दिनांक १७-११-१९९० यांनी, मुंबई, ठाणे, पुणे, बडोदे, जळगाव, नागपूर येथील विश्वस्थांचे सहकार्याने एक संघठनाचा उपक्रम सुरू केला. ह्या महामंडळास संलग्न मंडळासाठी आजीव सभासद फी रु. अकराशे आहे. हल्ली देशात सुमारे २० संलग्न मंडळांची सूची त्याचे त्रैमासिक मुखपत्रातून दिली आहे. त्या विविध मंडळांची माहिती या इतिहासात घेण्यासाठी प्रयत्न केला, पण त्यांनी कोणत्याच अंकात त्यांचे पूर्ण पोस्टल पत्ते पिनकोड, व असल्यास फोन सह पत्ते दिले नसल्याने ही माहिती या आवृत्तीत देऊ शकलो नाही, याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो.

मागे पाडळशेच्या भोरगाव लेवा पंचायतीचे पुनरुज्जीवन प्रसंगीही मोठ्या उत्साहाने समाज संघटन कार्य सुरू झाले होते. 'आरंभ शूरः खलु दाक्षिणात्य' अशी काहीशी म्हण आहे. तिला अनुसरून अशा बऱ्याच संस्था स्थापन झाल्या. आपआपल्यापरी समाजोपयोगी कार्य करून गेल्या, पण दुर्दैवाने बऱ्याच विराम पावल्या. संस्थापकांचे हेतु उत्तम होते व आहेत. त्यांचे प्रयत्नही प्रशंसनीय होते व आहेत, पण सन १९८४ च्या भोरगाव लेवा पंचायतीच्या विशाल सभेत **माननीय श्री. बाळासाहेब मधुकरराव चौधरी खिरोदेकर म्हणाले होते की, ''बंधूंनो, समाजसेवेचा इतिहास हा पराभवाचा इतिहास असतो. परंतु, त्यामुळे निराश होण्याचे कारण नाही.''** पण या पराभवाची मिमांसा कोणी करीत नाही. त्यामुळे प्रगतीची वाट धूसर होते. माझ्या मते या थोर समाजसेवकांनी महान त्याग व कष्ट करूनही जी समाजसेवा केली तरी **पदरी पराभव आला त्याची मिमांसा करणे उपकारक ठरेल.** अशी मिमांसा संबंधितांना निश्चितच आवडत नाही. म्हणून ती फारशी कोणी करीत नाही. तरी पण समाजहितास्तव थोडी अप्रियता झाली तरी ती स्वीकारून संबंधित पूर्वीच्या सर्व त्यागी व कर्मयोगी कार्यकर्त्यांची तथा ज्येष्ठ व श्रेष्ठ पूर्वसूरींची क्षमा मागून माझे मत मांडतो की, संघटना झाल्या, आहेत व अधिकही होतील पण काही अपवाद सोडल्यास सामाजिक शिरगणती अद्याप नव्याने झाली नाही. पुण्याचे भ्रातृमंडळाने सभासदांच्या पूर्ण पत्त्यांची मूळगाव, हल्लीचा पत्ता, कार्यालयीन पत्ता, दूरध्वनी क्रमांक याची सूची देण्याचा जो उपक्रम केला तो अत्यंत उपयोगी आहे. समाजोपयोगी पायंडा त्यांनी रूढ केला. त्याचा अन्य भ्रातृमंडळांनी कित्ता गिरवावा असे वाटते. तसा उपक्रम श्री. तुकाराम हरी पाटील दाताळकरांनी विदर्भातील भोरगाव लेवा पंचायत विभागात काहीसा राबविला होता. पण खानदेशातील कार्यकर्ते याबाबतीत कार्यक्षम ठरले नाहीत हे सामाजिक दुर्दैव होय. विदर्भातील लेवा पाटीदारांच्या ८० गावांपैकी सुमारे ६३ गावांची संपूर्ण वसतीपत्रके परिपूर्ण माहितीसह तत्कालीन वैदर्भीय लेवा पाटीदार कार्यकर्त्यांनी तयार केली. ती फार उपयुक्त आहेत. तशी खानदेशात झाली नाहीत. असे खेदाने म्हणावे लागते.

तसेच, **सामाजिक प्रचार कार्य हे मुखपत्राशिवाय होऊ शकत नाही**. हे सत्य माहीत असूनही भोरगाव लेवा पंचायतीने त्याकडे फारसे लक्ष दिले नाही. खाजगी वितरणासाठी का होईना पण डिसेंबर १९८५ ला १ला अंक वर्ष १ ले भोरगाव लेवा पंचायत पत्रिका हे भोरगाव लेवा पंचायत, पाडळशे या संस्थेच्या मालकीचे हे पत्रक अण्णासाहेब डॉ. जी.डी. बेंडाळे, कार्याध्यक्ष, भोरगाव लेवा पंचायत यांनी श्री. फकिरा हरी लेवा बोर्डींग, जळगाव, ४२५००१ येथून प्रकाशित करायला प्रारंभ केला, पण लगेच ते बंद पडले हे सामाजिक दुर्दैव होय.

तसेच, श्री. महेंद्र ओंकार राणे यांनी अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळाचे फक्त सभासदांसाठी लेवा परिवार हे मासिक मुखपत्र काढले होते. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो, पण एक वर्षभर चालविल्यानंतर त्या मासिकाचे त्रैमासिकात रुपांतर झाले आणि २५१ रु. आजीवन सदस्य वर्गणीदारांनाही ते वर्ष ३ अंक १, जानेवारी ते मार्च १९९६ पासून पाचवर्षासाठी सदस्य

वर्गणी २५१ रु. जुन्या आजीवन सदस्य वर्गणीदारांना सुद्धा परत २५१ रु. करून भरल्याशिवाय मिळणे बंद झाले, त्यामुळे मंडळाचे प्रचारकार्य वाढू शकले नाही, हे सामाजिक दुर्दैव होय.

लेवा पाटीदार समाज कार्यासाठी पूर्ण मुखपृष्ठभर माहिती देणारे १.दहा दोन तीन, संपादक- डॉ. ज.ह. फिरके वर्ष ७, अंक ९ + १० तारीख २० जानेवारी १९८५, २. साप्ताहिक बुलढाणा टाईम्स संपादिका- शोभा निवृत्ती खर्चे, वर्ष १६, अंक ३५ , रविवार ता. २९-७-१९८४, ३.बुलढाणा पत्रिका- वर्ष ६, अंक १५, ता. ५-८-१९८४, संपादक- श्री. ना.जा. दांडगे, ४.जळगाव,दिनांक वर्ष ११ अंक ५, संपादक- श्री. अजित चौधरी, जळगाव, शनिवार दिनांक २९-२-१९९२ या लहान लहान वृत्तपत्रांनी पहिल्या पानावरच पानभरून माहिती दिली तशी महान महान दैनिकांना पहिल्या पानभर माहितीची गरज भासली नाही असे दिसते. त्या मनोवेधक प्रचारासाठी सामाजिक मुखपत्रे हवी असतात. तशी तळागाळापर्यंत पोहोचणारी नियतकालिके नाहीत. त्यामुळे समाजव्यापी प्रचार होत नाही.

५. मुंबई व परिसर, लेवा मंडळाचे मुखपत्र लेवा प्रबोधन पत्रिका, संपादक- राम नेमाडे,
६. समस्त लेवा समाजाची अस्मिता जपणारे त्रैमासिक, लेवायन, संपादक- राम नेमाडे.
७. भ्रातृमंडळाचे वार्षिक अंक सभासदासाठी वितरीत होतात.
८. स्नेहबंधन ठाणे
९. वर्षारंभ पुणे
१०. नूतन वर्षांक - लेवा युवा संघ, जळगाव, सन १९८८-८९
११. स्मरणिका ता. १३-१-१९८५ भोलेप, मलकापूर व इतर स्मरणिका.
१२. सुवर्ण महोत्सवी स्मृति-पुष्प १९६८, लेवा एज्युकेशन युनियन, जळगाव,
१३. दहा दोन तीन, वर्ष ६, अंक ९ ता. ९-२-८६ चा 'भोरगाव लेवा पंचायत विशेषांक' संपादक, डॉ. ज.ह. फिरके.
१४. आणि इतर

अशा मर्यादित प्रचारक्षेत्राची अनियमित नियतकालिके व स्मारिका यांनी जे कार्य होते त्यापेक्षा १. गुजराथी मधील अहमदाबादचे 'उमिया दर्शन' संपादक- जयंतीलाल पटेल व हरेश पटेल किंवा हिंदीत मध्यप्रदेश एवं राजस्थान पाटीदार समाजाचे मासिक मुखपत्र 'पाटीदार जागृति', ३. मध्यप्रदेश कूर्मी क्षत्रिय युवा संघटनद्वारा गिरवर सागर, मध्यप्रदेशहून निघणारे हिंदी त्रैमासिक 'कूर्मी क्षत्रिय जागृति', ४. अखिल भारतीय कूर्मी क्षत्रिय महासभेचे मासिक मुखपत्र कूर्मी क्षत्रिय जागरण, संपादक- मदन मोहन पटेल, ही नियमित निघणारी समाज प्रचारक मुखपत्रे अमर्याद प्रचार क्षेत्र विस्तारू शकतात. व्यक्तीला मुखावाचून जसे बोलता येत नाही. विचार प्रदर्शित करता येत नाही, तसेच, संघटनेला मुखपत्रावाचून विचार प्रदर्शित करता येत नाहीत. म्हणजेच पर्यायाने मुखपत्र नसलेले मुखदुर्बल समाज संघटन कार्यक्षमता वाढवू शकत नाही.

तिसरी गोष्ट अशी की, समाज संघटनेत प्रादेशिक समतोल प्रतिनिधित्वाशिवाय कार्यक्षमता वाढत नाही. प्रादेशिक असमतोल असलेल्या समाज संघटना वांझ ठरतात. त्यांचेकडून उत्कृष्ट कार्य प्रसुति होत नाही. हा सिद्धान्त जाणून मराठी भाषिक लेवा पाटीदार समाज संघटना अधिक कार्यक्षम करायच्या असल्यास प्रथम प्रादेशिक समतोल प्रतिनिधी असावे. समतोल प्रतिनिधित्व करण्यासाठी प्रथम प्रादेशिक जनगणनेची जाण हवी. त्यांचे प्रतिनिधित्व हवे. भारतात मराठी भाषिक लेवा पाटीदारांची वस्ती फक्त २५० गावातून अंदाजे साडेचार लाख लोकापर्यंत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी विभागाने प्रसिद्ध केलेल्या 'महाराष्ट्राचे जिल्हे जळगाव' पृष्ठ १३ वर "जळगाव जिल्हयाचे पूर्व व मध्य भागात सुमारे १४० गावात लेवा पाटीदार यांची वस्ती आहे." असे लिहिले आहे.

तसेच, सन १९७६ साली महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या बुलढाणा जिल्हा गॅझेटियर आवृत्ती

२ री (सुधारित) इंग्रजीप्रत, पृष्ठ २२७ वर म्हटले आहे की,- "The sect of kunabis known as the levá patidar (Pájane) are found in about 80 villages near khandesh. Another local name for them is Revas, which is apparently a variant of Levas who form the largest subcaste of kunbis in Gujarath. The word Pajane is traced to Pavakhand which they say formarly formed a part of Gujrath and Reva is supposed to be derived from the River Reva in Gujrath... The Leva Kunbis of Gujarath are really of Gujar origin."

म्हणजेच जळगाव जिल्ह्यातील रावेर, यावल, जळगाव, भुसावळ, एदलाबाद ह्या पाच तालुक्यतील १४० गावातून + बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर, मोताळा व नांदुरा ह्या तीन तालुक्यातील ८० गावातून मूळ मराठी भाषिक लेवा पाटीदार वस्ती आहे. व या १४० + ८० = २२० गावाव्यतिरिक्त अंदाजे ३० शहरातील भ्रातृमंडळांच्या परिसरात नोकरी व व्यापार व्यवसाया निमित्त लेवा लोक गेले. म्हणजेच १४० + ८० + ३० = २५० गावातूनच फक्त हे मराठी भाषिक सुमारे साडेचार लाख लेवा लोक राहातात. **ह्या २५० गावांची संपूर्ण पोस्टल पत्त्यांची जंत्री म्हणजेच पूर्ण भारतातील मराठी भाषिक लेवा व्याप्त परिसर जंत्री ठरेल.** ह्या २५० पत्त्यांची १. मुक्काम, २. पोस्ट, ३. तालुका, ४. जिल्हा, ५. पिनकोड, ६. असल्यास पी.सी.ओ., ७. जवळचा मोटार स्टँड कोणता व किती किलोमीटर अंतरावर आहे. ८. कोणत्या पोलीस स्टेशन अंतर्गत आहे ? **एवढी आठ स्तंभात २५० गावांची फक्त २५० ओळीत दिलेली पोस्टल पत्त्यांची जंत्री प्रत्येक संघटन कार्यालयात असणे आवश्यक आहे.** ज्यांचे संघटन करायचे त्याचे नाव गाव माहीत नसलेल्या समाज संघटना काय कार्य करू शकतील ?

आदर्श संघटना संस्था मराठी भाषिक लेवा समाजात उभारण्यासाठी प्रत्येक रेव्हेन्यु सर्कलचा एक प्रतिनिधी घेतल्यास खानदेशातील पाच, व वऱ्हाडातील तीन तालुके मिळून एकूण आठ तालुके लेवा व्याप्त प्रदेश आहे. अंदाजे एका तालुक्यात चार रेव्हेन्यु सर्कल धरल्यास (८ गुणिले ४ बरोबर ३२) एकूण ३२ सर्कलमधून प्रत्येकी एक प्रतिनिधी निवडल्यास त्या प्रत्येकाकडे एक एक सर्कलची एकूण मराठी भाषिक लेवा वस्तीची गावे शोधून त्यांची जंत्री जोपर्यंत होत नाही तोपर्यंत त्या लेवा पाटीदार समाज संघटना योग्य फलदायी न ठरता वांझ ठरतील.

मराठी भाषिक लेवा पाटीदारांच्या या आठ तालुक्यात म्हणजे अंदाजे ३२ साझ्यात वा सर्कलमध्ये केंद्रस्थानी भुसावळ शहर येते. ते सर्व परिसराशी रेल्वे व सडकांनी जोडलेले आहे. म्हणून भुसावळस्थानी मराठी भाषिक लेवा पाटीदार समाज संघटन कार्यालय असणे अधिक कार्यक्षम ठरेल. शिवाय दैनिक वर्तमानपत्रे बुलढाणा, जळगाव जिल्हा हे वेगवेगळ्या प्रादेशिक रेव्हेन्यू विभागात विभागले असल्याने "दोन डोळे शेजारी । भेट नाही संसारी ।।" अशी त्यांची स्थिती होते. या दृष्टिकोनातून **"भुसावळ जिल्हा व्हावा. ८० गावे जोडावित."** लेखक- शंकर विठोबा पाटील या नावाचा लेख आपले लेवा परिवार ऑक्टोबर ते डिसेंबर १९९४ च्या अ.भा.लेवा पाटीदार महामंडळाच्या त्रैमासिक मुखपत्रात पृष्ठ ९ वर, संपादक- मुंबईचे महेंद्र ओंकार राणे यांनी संपादित केला आहे तो जरूर वाचा. म्हणजे वरील विश्लेषणाचा धागा लक्षात येईल.

दुसरी गोष्ट अशी की, खानदेश जमिनीच्या सुपिकतेमुळे व जल-संपत्तीच्या विपुलतेमुळे तुलनेने विदर्भवासीय लेवा पाटीदारापेक्षा अधिक श्रीमंत आहे. म्हणून जास्त शिकू शकला. व ८० गावांतील विदर्भवासीयांचे तुलनेत खानदेशातील १४० भरगच्च वस्तीच्या गावाहून बहुसंख्येने वास्तव्य करीत असल्यामुळे विदर्भवासीयांचे तुलनेत जन, धन, जल, शिक्षण आदी क्षेत्रात अधिक बलदंड आहे, सुसंघटित आहे. विदर्भात ती स्थिती नाही. म्हणून स्वातंत्र्य मिळाल्यापासूनही विदर्भात एकही लेवा पाटीदार आमदार निवडला गेला नाही.

आणि तशातच प्रत्येक शहरातून खानदेशच्या तुलनेत अल्पसंख्य व दरिद्री असल्याने प्रत्येक लेवा भ्रातृमंडळात शहरोशहरी काही अपवाद वगळता तो पूर्णतया उपेक्षिला आहे. नुकताच नाशिकला माननीय एकनाथराव खडसे यांचा भव्य सत्कार झाला. भरगच्च लेवा पाटीदार उपस्थित होते. सर्व विभाग व शाखांच्या लेवा संघटनांची एकात्मता साधण्याचे हेतुने जमलेल्या ह्या नव्या मंडळात रंगमंचावर एकही विदर्भवासी लेवा नसल्याचे उपस्थित वैदर्भीयांकडून कळते.

अहो तिथेच काय, पण खुद्द लेवा वस्तीच्या परिसरात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे सुशिक्षित जळगाव स्थानी सर्व लेवा पाटीदार जातीने एकमताने भोरगाव लेवा पंचायतीचे निवडलेले अध्यक्ष माझे मित्र सन्माननीय डॉ. गोपाळ दोधू बेंडाळे यांचा भव्य सत्कार झाला. डॉ. बेंडाळे थोर कार्यकर्ते आहेत. विदर्भाचे लेवा पाटीदार केंद्रस्थान, मलकापूरला लेवा भ्रातृमंडळास त्यांनी भरघोस रक्कम देऊन आपले विदर्भावरील प्रेम व्यक्त केले. विदर्भात गावोगाव हिंडून पंचायतीचे कार्यही त्यांनी जीवाभावाने केले. त्यामुळे विदर्भातील लेवा पाटीदारांचेही त्यांच्यावर अकृत्रिम प्रेम आहे, पण त्यांच्या सत्कार समितीत वैदर्भीय लेवा पाटीदारांना स्थान व मान नव्हता. त्यांचा ह्या सत्कार समारंभात अमृत महोत्सवी ग्रंथ 'आनंदयात्री' म्हणून प्रसिद्ध झाला. प्रा. रा.वा. पाटील यांनी खूप मेहनत घेऊन उत्कृष्ट ग्रंथ संपादिला. सुमारे ४१ लोकांचे लेख संग्रहित केले. त्यात लेवा जाती व्यतिरिक्त लेख संपादकांनी घेतलेत. विदर्भवासीयांच्या मनात डॉ. बेंडाळे विषयी प्रगट आदर असूनही विदर्भवासियांचे लेख स्वीकारण्यात तेथे वैदर्भीय लेवा पाटीदार हे संपादक समितीला अस्पृश्य वाटले की काय न कळे ? विदर्भात प्रभावी भ्रातृमंडळ असावे म्हणून भरघोस देणगी देणारे खानदेशस्थ डॉ. बेंडाळे विदर्भवासियांचे जीवाभावाचे स्नेही असूनही त्यांच्या अमृत महोत्सवी गौरव ग्रंथात विदर्भातील लोकांना अस्पृश्यवत दूर ठेवल्याने समाजात एकता वृद्धिंगत होईल काय ? याउलट विदर्भातील सर्वश्रेष्ठ व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वि.भि. कोलते यांच्या सत्कार प्रसंगी रंगमंचावर डॉ. बेंडाळे, भागवतराव चौधरी आदी खानदेशस्थांचा मान व सन्मान विदर्भात वैदर्भियांनी केला, ही एकात्मता खानदेशवासियात तुलनेने घटत्या प्रमाणात दिसते, हे दुर्दैव होय. तसेच, सर्व लेवा जातीच्या लोकांनी एक मुखाने अध्यात्मिक नेतृत्व मान्य केलेल्या झेंडुजी महाराज बेळीकर मठात पैठणला असे ऐकतो की, विदर्भवासीय दिंडीला स्थान नाही की मान नाही. ही कोणती आत्मीयता ? वा ही कोणती एकात्मता ?

सामाजिक एकात्मतेसाठी कमकुवत घटकाबद्दल मनात उदार दृष्टिकोन असायला हवा असतो. सत्ता, संपत्ती, धन, बळ आणि अविवेकता एकात्मतेला तडे देतात. म्हणतात ना, "यौवनम् धनसंपत्ती प्रभुत्वम् अविवेकता। एकेकं अपि अनर्थाय किंम यत्र चतुष्टयम्॥" **जगाचा पूर्वापार इतिहास अभ्यासिल्यास आत्मपरीक्षण हे प्रगतीचे पहिले पाऊल ठरते.** ह्या दृष्टीने **"लेवा पाटीदार समाज सामुहिक आत्मपरिक्षणाचा एक प्रयत्न"** या लेवा पाटीदार समाज सामुहिक चर्चेचा गोषवारा विदर्भातील नागपूरच्या भ्रातृमंडळात विद्वतजनांनी केल्याचे ऐकतो. त्याचे शब्दांकन प्रा.डॉ. भा.ल. भोळे, नागपूर यांनी केले.

त्यांचा तो लेख ओझरता आठवतो. त्यात लेवा पाटीदारांना समृद्धीची हाव आहे, पण सांस्कृतिक संपन्नतेची आस नाही. हा समाज भक्तिमार्गी आहे, पण भक्तिसंप्रदायातील समूहभावना, सहकार्यवृत्ती व सामाजिक सुधारणा या संस्कारांचा त्या लोकात अभाव दिसतो. उच्च पदस्थ लेवा व्यक्तीपासून समाजातील गरजूंना फारसा फायदा होत नाही. कारण, भ्रातृमंडळासारख्या संस्थांतून हे समन्वयाचे कार्य पुरेशा प्रमाणात होत नाही. कोण व्यक्ती कोणत्या कार्यालयात वा क्षेत्रात आहे याची एक सूची नाव व पत्त्यासह तयार करणे उपयुक्त ठरेल. इतर सर्व समाजातील सहकार्याची भावना लेवा समाजात तुलनेने कमी भासते. कमाईपूत लेवा व्यक्ती जीवनाचा बहुमुखी आनंद घेत नाही. उत्तम करीयर व अर्थार्जनासाठी शिक्षण घेतो. मात्र, व्यक्तित्वाच्या विकासाची संधी म्हणून विचार करीत

नाही. राजकीय जीवनाविषयी अनास्था दिसते. आमच्यात प्रभावी राजकीय नेतृत्व नाही. सामाजिक नेत्यांचा तर अभावच आहे. लेवा माणूस राजकीय प्रभुत्व गाजविण्यात कमी पडतो. बहुसंख्य पदवीधर असूनही पदवीधर मतदार संघात एकही जागा जिंकू शकला नाही. यशस्वी व कर्तबगार लेवा व्यक्ती समाजाच्या सामूहिक कल्याणाबाबतही अनास्थेवाईक का असतो ? आत्मकेंद्री वृत्ती व स्वार्थी यांनी समाजात निर्मिलेला, दुरावा नष्ट करणे ही काळाची गरज आहे. राजकीय पिछेहाटीमुळे साहस प्रवृत्ती, सहकारातून प्रगतीची नवी क्षेत्रे पादाक्रांत करण्याची महत्त्वाकांक्षा नाही. नवशक्ती प्रवाहाने नव्या समाजाशी एकरूप होता येण्यास हा समाज मागासला आहे. धोका पत्करण्यास लेवा पाटीदार कच खातो. स्पर्धा परिक्षाही सहसा तो देत नाही. पुढाकार व आत्मविश्वासाच्या अभावामुळे उद्योजकाचे प्रमाण कमीच आहे. व्यवस्थापकीय व मालकीची सूत्रे स्वीकारण्याकडे त्याचा कल कमीच आहे. समाज बांधवाकडून सहसा प्रोत्साहन व सहानुभूती ऐवजी उपेक्षा व कुत्सितपणाचाच अनुभव येतो. वेगळ्या वाटांनी जाणारांना मुलीही देण्याकडे कल कमी असतो. स्पर्धा परिक्षेची तयारी करून घेणारे अभ्यासवर्गही नाहीत. व्यवसाय मार्गदर्शन केंद्रे नाहीत. चाकोरी बाहेर रोजगार क्षेत्रातील व्याख्यानमाला सुरू करण्यात स्वयंरोजगारास प्रोत्साहनाचा अभाव आहे. यशस्वी उद्योजकांनी व इतर क्षेत्रातील व्यक्तींनी आपल्या यशामागे दडलेल्या तपश्चर्येचा परकीय तरुणांना परिचय करून द्यावा व त्यांचा आत्मविश्वास वाढवावा. चाकोरीबाहेरच्या प्रगतीच्या वाटा शोधा व अशा तरुणाबद्दल सहानुभूती बाळगा. नाटक, चित्रे, साहित्य, शिल्प, नृत्य, संगीत, इत्यादी सर्जनशील क्षेत्रात या समाजातील व्यक्ती अभावानेच आढळतात. आपले व्यवसायक्षेत्र सोडून इतर क्षेत्राकडे ह्या समाजातील लोक फारसे लक्ष देत नाहीत म्हणून चतुरस्त्र नाहीत. कलोपासना, समाजसेवा या क्षेत्राकडे कल कमी आहे म्हणून कलावंत, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, प्रभावी वक्ते यांची प्रतिष्ठा अर्थार्जन करणाऱ्या श्रीमंतापेक्षा कमी लेखण्याचा लेवा लोकांचा कल आहे. सहकार्य भावनेचा लेवा लोकात अभाव आहे. म्हणून शेतमालावरील प्रकीयांचे उद्योग तो उभारू शकत नाही. हुंड्याची अमानुष प्रथा आहे. भाऊ बंदकी आहे. अती व्यवहारीपणा, स्वार्थी मतलबीपणा जास्त आहे. हे व असे दोष प्रामाणिकपणे मान्य करण्यातूनच ते दूर करण्याचे मार्ग दिसतात. आणि हे दूर करण्यास संघटना व संघटित प्रयत्नांची गरज आहे. पूर्वी सांगितलेल्या २५० लेवा वस्तीच्या गावांची एक केंद्रीय मराठी भाषिक लेवा संस्था असावी. तिची एक सर्व प्रदेशव्यापी घटना असावी. या घटनेत वरील ८ तालुक्यातील (३२ साझ्यातील) प्रत्येकी एक प्रतिनिधी नेमून त्याने आपल्या साझ्यातील आपल्या गावांची यादी पूर्ण पोस्टल पत्त्यासह तयार करावी. प्रत्येक गावच्या मतदार यादीतून लेवा नागरिकांची जनगणना, कुळे, गोत्रे, यांची गाववार प्रतिनिधीद्वारे अंदाजे २५० प्रतिनिधद्वारा एक यादी करून केंद्रीय लेवा समाज, कार्यालयात एकत्रित सूची बनविण्यासाठी पाठवावी. ह्यासाठी 'मराठी भाषिक लेवा पाटीदार' या नावाचे मासिक समाज संघटनेने मुखपत्र म्हणून सुरू करावे. त्यातून ह्या गावच्या साझावाईज पूर्ण पत्त्याची यादी कुळे, गोत्रे, आडनावे, कुळदैवते यांची सूची प्रसिद्ध करावी. व या आठ तालुक्यातील सुमारे ३२ साझ्यांचा (रेव्हेन्यू सर्कल मिळून) एक जिल्हा व्हावा ह्या दिशेने चळवळ उभारावी. संघटनेचा एखादा अध्यक्ष विदर्भातील तर सचिव खानदेशातील असावा, तर दुसऱ्यांदा अध्यक्ष खानदेशातील तर सचिव विदर्भातील असावा. यात प्रादेशिकतेचा हट्ट नाही. कारण, १४० गावाच्या २/३ मताधिकाने ही संघटना सदैव खानदेश नियंत्रणाखालीच राहून अल्पसंख्यांक वैदर्भियासाठी राखीव पदे असल्यासच आदर्श एकात्मता रूजेल.

या दृष्टीने एदलाबाद कोथळीचे मुक्ताबाई मंदिर हे केंद्रस्थान पूर्वी लेवा वारकरी नेत्यांनी दर वद्य एकादशीचे मासिक वारकरी संमेलनात वारीसाठी निवडले होते. भुसावलकर धनजी महाराजांनी मासिक वारी सुरू करून वर्तमानपत्राचे काळापूर्वी लेवा समाजाचे सामाजिक वर्तमान गावोगावच्या

वारकऱ्यांद्वारे वारीचे निमित्ताने आपआपसात विदित होई. या केंद्रांतून सामाजिक परिचय व त्यातून सगाईसंबंधाची जुळवाजुळव सुलभ होई. अशी सामाजिक एकात्मता साधण्याचा प्रारंभ करणारे धनजी महाराज भुसावलकर तत्कालीन वारकरी समाजाचे अग्रणी नेते होते. त्यांनीच तत्कालीन मराठा समाजास वारीचे वळण लावले होते. असे विठ्ठलराव वकटे महाराज वडाळीकर आपल्या 'ब्रह्मचित्कलादर्शन' ग्रंथातील आवृत्ती १ च्या पृष्ठ ४४४ वर म्हणतात. तेथे दैनिक मुखपत्राचे व वधुवर सूचीचे अभावी मासिक वारीतून मुक्ताबाई वारीचे मेळाव्यात गाठीभेटीद्वारे विचार विनिमय होऊन सगाई संबंधास सामाजिक चालना गतिमान होई.

आता कौळ बदलला. दैनिके सुरू झाली. त्याद्वारे वारीतून त्या काळी होत असलेले हे कार्य आता घरबसल्या वर्तमानपत्र व वधू-वर सूचीद्वारे होऊ लागले. "लेवा पाटीदार समाज सामूहिक आत्मपरिक्षणाचा एक प्रयत्न, हा उपक्रम जसा विदर्भातील नागपूरच्या भ्रातृमंडळाने राबविला तसा इतर कोणत्याही भ्रातृमंडळाने किंवा लेवा संघटनेने अद्याप राबविला नाही. जळगावच्या लेवा बोर्डींगने प्रथम लेवा बोर्डींग काढले, व तसेच, मलकापूरला शंकर तोताराम पाटील दाभाडीकरांनीही काढले होते, तर पुण्याचे भ्रातृमंडळाने सभासदांचे घरचे व कार्यालयीन पत्त्यांची आदर्श व उपयुक्त सूची बनविली, आणि ऐकून कळते की, बडोद्याचे लेवा मंडळाने आदर्श वधूवर मेळावा व वधुवर सूचीचे आयोजन केले. मलकापूर भ्रातृमंडळ निगडीत तत्कालीन भोरगाव लेवा पंचायतच्या मलकापूर विभागीय शाखेने वैदर्भीय वसतीपत्रके भरून उत्तम जनगणना समाजात राबविली, तसेच, ठाणे जिल्हयातील लेवा पाटील समाज संघटनेच्या भाईदर शाखेने लेवा पाटीदारोपयोगी माहिती प्रकाशित करून जणू लेवा पाटीदारासाठी एक अनुपम संदर्भ ग्रंथच तयार केला आहे. लेवा समाजाशी संबंधित नसलेल्या लेखांना कटाक्षाने गाळून एक उपयुक्त समाज स्मरणिका काढण्याचा त्यांनी उत्कृष्ट पायंडा पाडला. अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळाने मर्यादित लेवा पाटीदार सभासदासाठी का होईना पण 'आपले लेवा परिवार' हे समाजाच्या सर्व भागात वितरीत होणारे त्यांच्या समाजसंघटनेचे मुखपत्र चालविले. या व अशा सर्व लेवा पाटीदार समाजव्यापी उपक्रम, कार्यक्रम व विक्रमांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो व स्वागत करतो.

तसेच, प्रस्तुत लेखकाने संपूर्ण मराठी भाषिक लेवा समाजातील सर्व खानदेश विदर्भातील वारकरी लेवा दिंड्यांचे व त्यांच्या परंपरांचे संशोधन करून त्याला लेवा पाटीदार समाजातील अग्रगण्य साहित्यिक व संशोधक माननीय डॉ. भाऊसाहेब वि.भि. कोलते यांची प्रस्तावना शुभाशीर्वादा-दाखल घेऊन जो ग्रंथ प्रसिद्ध केला त्या ग्रंथाद्वारे सर्व वारकरी संतांच्या लेवादिंड्यांची व त्यांच्या परंपरांची ओळख होते. ह्या वारकरी संतांनी व्यसनमुक्ती, भजनानंद, सद्गुण संवर्धन आदी सामूहिक प्रेरणांना पुष्टी दिली.

शेवटी 'मराठी भाषिक लेवा पाटीदारांचा इतिहास' ह्या विषयावर मराठी भाषेत प्रस्तुत ग्रंथ, हा एकमेव व आद्य ग्रंथ होय. वाचकास हा आवडल्यास पुढील भाग प्रकाशित करण्यास आमचे चैतन्य प्रकाशन, दुधलगाव बुद्रूक, अधिक गतिमान होईल. कृपया आपल्या सूचना माझे पत्त्यावर कळवा.

प्रकरण २२

स्वजातीय समाजसंघटना व त्यांची मुखपत्रे

१) श्री. फकिरा हरी लेवा बोर्डींग हाऊस जळगाव (पूर्व खानदेश) :- लेवा एज्युकेशनल युनियन, जळगाव रजि नं. अ ४१० इ. के. या संस्थेने चालविलेले लेवा बोर्डींग हाऊसने प्रभावी सामाजिक कार्य केले. तारीख ३-४-१९१६ ला सन १९१६ साली लेवा एज्युकेशन सोसायटी स्थापन झाली. लेवा शिक्षण परिषदेची पहिली बैठक सन १९१७ साली फैजपूर मुक्कामी व दुसरी बैठक पाडळशे मुक्कामी झाली. दुसऱ्या बैठकीत कै. गोविंद चावदस इंगळे यांनी लेवा भ्रातृमंडळाची कल्पना मांडली, व त्यानुसार लेवा विद्यार्थी भ्रातृमंडळ कार्यान्वीत झाले.

२) लेवा बोर्डींग सेवक संघ :- ता. १३-१-१९२१ रोजी 'लेवा शिक्षण सेवक संघ' नावाने आद्य लेवा शिक्षण विषयक संस्था स्थापन केली. सन १९२८ अखेर तळमजला बांधला. व पुढे मतभेद झाल्याने सन १९३४ पासून लेवा बोर्डींग हाऊसची व्यवस्था लेवा एज्युकेशनल युनियन या संस्थेकडे सुपूर्द केली.

जळगाव जिल्ह्यातील पहिले हायस्कूल सन १९३४ साली स्थापन झाले.

सन १८६० साली जळगावला रेल्वे सुरु झाली. व सन १८८५ मध्ये नशिराबादची तालुका कचेरी जळगावला आली. सन १९०६ साली जळगाव खानदेश जिल्हयाची निर्मिती झाली. सन १९४५ साली मूळजी जेठा कॉलेज स्थापन झाले. त्यामुळे लेवा बोर्डींग हाऊसमध्ये विद्यार्थ्यांची गर्दी वाढली.

३) भ्रातृमंडळ नागपूर :- ही संस्था प्रारंभी ५६ सभासदांवर सुरू झाली. मुंबई पब्लिक ट्रस्ट अॅक्ट- १९५० साली ८-८-१९६६ ला पंजियन क्रमांक इ-४२२ (N)ने पंजिबद्ध झाली. सन १९६५ साली तेथे ग्रंथालय सुरू झाले. नागपूर सुधार प्रन्यासकडून तेलंखेडी ले आऊट मध्ये ९ नंबरचा १३००० चौ. फूट प्लॉट २३८८ रुपयास विकत घेतला. आद्य मराठीतील प्राचीन गद्यपद्य वाङ्मयाचे महान संशोधक पद्मश्री डॉ. विष्णु भिकाजी कोलते हे नागपूरच्या भ्रातृमंडळाचे प्रेरक व जनक असून हल्ली ते अध्यक्षही आहेत. सन १९६१ साली नागपूर भ्रातृमंडळ शिलान्यास समारंभ प्रसंगी एक स्मृति ग्रंथही निघाला होता.

इ.सन १९४४-४५ मध्ये अनौपचारिक रीतीने सुरू झालेल्या बैठकीतून विकसित झालेल्या भ्रातृमंडळाची रीतसर स्थापना इ.सन १९६१ मध्ये झाली. सन १९७७ साली मंडळात १२३ आजीव सभासद होते. मंडळाचे ग्रंथालय सन १९७२ पासून मंडळाच्या इमारतीत हलविले.

भ्रातृमंडळाचे एक छोटेसे वसतीगृहही असून त्यात सन १९७७ ला १५ विद्यार्थी होते. दरवर्षी मंडळ गणराज्य दिन, स्वातंत्र्य दिन, राष्ट्रीय पुढाऱ्यांचे स्मृति दिन, विजयादशमी, संक्रांत आदी उत्सव साजरे करते. इ.सन १९७२ पासून मंडळाने स्नेहसंमेलनाचा उपक्रम सुरू केला.

ता. ३० जुलै १९८३ रोजी भ्रातृमंडळाने डॉ. भाऊसाहेब कोलते 'अमृत महोत्सव' स्मरणिका प्रसिद्ध केली. प्रकाशक- श्री प्रल्हाद शंकर नारखेडे दुधलगावकर, कार्यवाह भ्रातृमंडळ, नागपूर - ९, रामनगर, नागपूर १० हे होते.

४) भ्रातृमंडळ पुणे :- अध्यक्ष डॉ. राम खर्चे, (एम.ए.,एम.एस.सी.,एल.एल.बी., पी.एच.डी.,) भ्रातृमंडळ, पुणे, वारजे जकात नाक्यामागे, वारजे, पुणे - ४११०२९, फोन (०२१२) ३६१ ७४०.

भ्रातृमंडळ पुणे, सर्वे नंबर १२५ अ + १अ/२ वारजे जकात नाक्यामागे वारजे पुणे ४११०२९ नोंदणी क्रमांक महा/३७४६/८७ पुणे, ट्रस्ट नोंदणी क्र. एफ ४८३९ पुणे या संस्थेचे डिसेंबर १९९६ अखेर मंडळाचे १३५० आजीव सभासद होते. संस्थेचे वर्षारंभ नावाचे वार्षिक मुखपत्र निघते. संस्थेने विद्यार्थ्यांसाठी एक वसतीगृह ता ३ मे. १९९२ ते १ ऑक्टोबर १९९५ च्या काळात उभारले. मंडळ दरवर्षी वधूवर यादी प्रसिद्ध करून एक वधूवर मेळावाही आयोजित करते, असे ऐकतो.

मंडळाने बहिणाबाई महिला नागरी सहकारी पतसंस्था सुरू केली आहे.

मंडळास श्री. भगवानदासजी जे पटेल व कुटुंबीय यांनी पाच लाख रुपयांची देणगी दिली आहे. श्री पाटील लिलाधर नारायण यांनी सुमारे एक लाख रुपयांची वसतीगृहात इलेक्ट्रीक फिटींगसाठी देणगी दिली आहे. इतरही देणगीदार उत्तम प्रतिसाद देत आहेत. तसेच, आजीव सभासद सूची मूळगाव, घरचा पत्ता, कार्यालयाचा पत्ता व फोन नंबरसह दिली आहे. इतर भ्रातृमंडळांनीही तो अनुसरावा इतका तो स्तुत्य उपक्रम वाटतो. तसेच, यांनी लेवा पाटीदार कार्यकर्त्यांचा राष्ट्रीय मेळावा यशस्वी रीतीने आयोजित केला.

५) भ्रातृमंडळ, सिडको नाशिक :- या मंडळाचे प्रथम पुष्प २६ जानेवारी १९९४ ला प्रसिद्ध झाले. त्यानुसार कार्यकारी मंडळात एकूण १५ सदस्य आहेत. संस्थापक श्री दत्तात्रय राजाराम कोल्हे व सचिव श्री. जानकीराम रामदास कोल्हे हे आहेत. ता. ७ जानेवारी १९९३ रोजी हे मंडळ स्थापन झाले. मंडळाची एकूण १४३ सभासद सूची पूर्ण पत्त्यासह दिली आहे.

६) सातपुडा विकास मंडळ, नाशिक :- ता. २६-१-१९९६ रोजी या मंडळाचे द्वितीय पुष्प वाचले. अध्यक्ष श्री. अशोक नेसिदास चौधरी हे आहेत. सभासदसूचीत जुने व नवीन सिडको मधील २६ सभासद, गणेश चौकातील ३३, पवननगरातील २१, पाटीलनगर मधील १९, रायगड चौक व सावतानगर मधील १४, शिवशक्ती ते डी.जी.पी. नगरमधील २५, उत्तम नगर व सिंहस्थ नगरमधील १९, इंदिरानगर, साईनगर व राजीव नगरमधील ४१ सभासद सूची पूर्ण नाव, पत्ता, नोकरी, मूळगाव यासह दिली आहे.

७) भ्रातृमंडळ एकलहरा :- अध्यक्ष श्री. रमेश पांडुरंग पाटील यांनी भ्रातृमंडळ सिडको नाशिक या मंडळास मोलाचे सहकार्य मिळाल्याचे त्या मंडळाचे प्रथम पुष्प पृष्ठ ४ वर लिहिले आहे.

८) औद्योगिक विकास नागरी सहकारी पतपेढी मर्यादित पिंपरी, चिंचवड (द्वारा इन्स्टिटयूट ऑफ बिझिनेस मॅनेजमेंट अँड रिचर्स) एम्.आय.डी.सी., ब्लॉक सी., प्लॉट नं. ९०, चिंचवड, पुणे ४११०१९ - नोंदणी क्रमांक P.N.A./H.L.S./R.S.R./C.R./417/85-86 या संस्थेचा सन १९९२/९३ चा आठवा वार्षिक अहवाल पाहिला. सभासद संख्या ११६७ असून संस्थेचा अहवाल वर्षात २,७४,०५४ - २५ रुपये नफा झाला.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. आर. पाचपांडे. M.Sc.Ph.D., संस्थापक व सेक्रेटरी श्री शिक्षण मंडळ पिंपरी चिंचवड हे असून व्यवस्थापक श्री. पी.आर. भंगाळे हे आहेत. संस्थेत लेवा पाटीदार व्यतिरिक्त इतरही सभासद आहेत.

९) मुंबई व परिसर लेवा मंडळ, डोंबिवली-मुंबई :- सुमारे १९६८ पासून कार्यरत, मंडळाच्या मालकीची वास्तू, 'लेवा प्रबोधन पत्रिका' हे मंडळाचे मुखपत्र संपर्कासाठी पत्ता :अ-२०४, जागृती सहकारी निवास मंडळ, भटवाडी, घाटकोपर (ए), मुंबई ८४, फोन - ५१२८९६६

१०) लेवा पाटीदार समाज मंडळ, डोंबिवली-ठाणे (नोंदणीकृत) :- सुमारे १९६९ पासून कार्यरत, लेवा भवन, मातोश्री सगुणाबाई नेमाडे सभागृह, कै. एन.डी. चौधरी उर्फ बाळूदादा सभागृह, स्टेजवरील खोल्या यांचे बांधकाम, स्नेहसंमेलन, वधूवर परिचय मेळावा हे कार्यक्रम ह्या जमेच्या बाजूंची माहिती मिळविण्यासाठी संपर्क पत्ता :- लेवा भवन, प्रकाश को.ऑ.सोसायटी, ध.ना.चौधरी

मार्ग, रामनगर, डोंबिवली (पूर्व).

११) भ्रातृमंडळ मुंबई (नोंदणीकृत) :- स्थापना १९९०, दरवर्षी स्नेहसंमेलन, वाढता जनसंपर्क, नवोदित असल्याने आर्थिकदृष्ट्या कमकुवत. संपर्कासाठी पत्ता :- श्री. हरीभाऊ नारायण इंगळे, ४०२, उषा अपार्टमेंटस्, साने गुरुजी नगर, मुलुंड (पूर्व)- मुंबई ४०००८१

१२) लेवा पाटीदार मंडळ, कल्याण (पूर्व) :-

१३) **बहिणाबाई चौधरी रसगंगा मंडळ, उल्हास नगर (पंजिबद्ध)**

१४) **विरार परिसर लेवा मंडळ, विरार**

१५) **लेवा समाज विकास मंडळ, तुर्भे, नवी मुंबई**

१६) **लेवा पाटीदार समाजसेवा मंडळ, उल्हासनगर**

१७) **लेवा पाटीदार समाजसेवा मंडळ, बदलापूर**

१८) **शहापूर तालुका लेवा पाटीदार समाज मंडळ, शहापूर** :- यांनी विद्यार्थी, शिक्षक-शिक्षिका यांचा समाजातील मान्यवरांचे उपस्थितीत गौरव केला.

१९) **लेवा पाटीदार समाज मंडळ, अंबरनाथ (पूर्व)** नोंदणीकृत :- स्थापना १९९०, नोंदणी १९९२, पुस्तक पेढी, वधूवर सूचक नोंदवारी, आरोग्य शिबीर, नेत्रविषयक मार्गदर्शन, रक्तगट तपासणी, व्यवसाय मार्गदर्शन, शैक्षणिक उपक्रम आदी गोष्टींमुळे सभासद संख्या **२६० पर्यंत** वाढली.

उल्हास नगर, कल्याण, मोहने, डोंबिवली, मुंडा, ठाणे, कलवा, बदलापूर, टिटवाळा, भाईंदर, भिवंडी, बोर्डी येथील कार्यकर्ते धरून ४१० सभासद संख्या झाली. मध्यवर्ती कार्यालय व कार्यक्षेत्र ठाणे जिल्हा. जळगाव व बुलढाणा जिल्ह्यातील समाज बांधव आहेत.

(**टीप** :- क्रमांक९ ते १९ मंडळाची माहिती 'स्नेहबंधन १९९५' ठाणे येथील अंक १ला संपादक, संस्थापक सदस्य व आश्रमदाता लेवा पाटीदार समाज मंडळ, अंबरनाथ (पूर्व) **यांचे पृष्ट २ व ३** वरून घेतली आहे.) यांच्या पोट मंडळाबद्दल श्री. सोपान नामदेव इंगळे, प्लॉट नं. ३५, फार्मिंग सोसायटी, कैलासनगर जवळ, अंबरनाथ (पूर्व) यांचे टीपणाद्वारे).

अ) **कल्याण उपशाखा** - स्थापना २५-७-१९९३ सभासद ८३, कार्यवाहाचा पत्ता - श्रीकांत नारायण फिरके (कार्यवाह), दत्त कॉलनी, बेलूरकर वाडा, कल्याण (पश्चिम)

ब) **उल्हासनगर उपशाखा** - स्थापना ४-१-१९९४, सभासद ५८, पत्ता - श्री हरिभाऊ विठ्ठल खर्चे (कार्यवाह), शिवसागर कॉलनी, सेक्शन २५ उल्हासनगर ४.

क) **भाईंदर उपशाखा** - स्थापना दि. २७-११-९४, सभासद ४६, संपर्क पत्ता : श्री दिगंबर एकनाथ फिरके (कार्यवाह) २१५ डी, कल्पतरु, नवघर रोड, भाईंदर (पूर्व), जिल्हा ठाणे. कार्यालयाचा पत्ता - C/o श्री. दिलीप निवृत्ती बोरले. दत्तनिवास रुम.नं. ५, कुणाल कुटिमागे, नवघर गाव, भाईंदर पूर्व, जिल्हा - ठाणे, या संस्थेने, 'स्नेहबंधन १९९६' हा उत्कृष्ट अंक काढला आहे. यांनी लेवा पाटीदारांचा प्रथमच एक राष्ट्रीय मंच उभारला. अभिनंदन.

ड) **डोंबिवली प्रतिनिधी** :- सभासद २३, पत्ता - श्री. अरुण रामचंद्र डहाके, ए/३, बाळकृष्ण को.ऑ.हौ.सोसायटी, राजेंद्र प्रसाद रोड, टिळक नगर, डोंबिवली (पूर्व)

इ) **मोहोने उपशाखा** :- स्थापना १६-१-१९९४ सभासद ४०, पत्ता :- श्री. निवृत्ती तुकाराम पाटील (कार्यवाह) एन.आर.सी. कॉलनी, आर.एस. ११/८४ मोहोने, ता. कल्याण, जिल्हा-ठाणे. ह्या सर्व उपशाखा लेवा पाटीदार समाज मंडळ अंबरनाथ येथील मध्यवर्ती कार्यकारणीचे सल्ल्याने कार्यरत राहतात.

२०) **लेवा पाटील समाज मंडळ**, रजि. क्र. महा/२०७-९२ ठाणे, दिनांक २७-११-१९९२, c/o

प्लॉट नं. ३५, फार्मिंग सोसायटी, कैलासनगरजवळ, शिवाजी नगर, **अंबरनाथ, (पूर्व)** ४२१५०१, पब्लिक ट्रस्ट रजि. नं. एफ ३३५३ ठाणे दिनांक २३-२-१९९३, अध्यक्ष :- श्री. निनु गोविंद नारखेडे.

कार्यालय - c/o प्लॉट नं. ३५,अंबरनाथ सामूहिक शेतकी सोसायटी, शिवाजी नगर, M.I.D.C. रोड, अंबरनाथ (पूर्व), ४२१५०१.

या संस्थेचे स्नेहबंधन १९९५ चे प्रथम स्मारिका पुष्प उत्तम उतरले. त्यातील समाजवृत्त ले. श्री. सो.ना. इंगळे, 'मंडळाच्या कार्याची वाटचाल' ले. श्री. सो.ना. इंगळे, ओ.बी.सी. नवीन तरतूद ले. श्री. पु.नि. सुपे, मंडळाची सभासद सूची, विवाहेच्छू युवकांची युवतींची परिचय सूची हे लेख उत्तम वाटले.

२१) विकास मंडळ मुलुंड (नोंदणीकृत) :- स्थापना १९७०, रौप्य महोत्सवी वर्ष सुरू, विद्यार्थ्यांच्या स्पर्धा, दसरा स्नेह संमेलन, वार्षक स्नेहसंमेलन, वधूवर मेळावा, हे कार्यक्रम मंडळाचे मालकीची वास्तू व सुदृढ आर्थिक स्थिती व अद्ययावत हिशेब. संपर्क पत्ता :- १०१ जयलक्ष्मी नारायण हौ. सोसायटी, लो.टिळक मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०००८१.

२२) अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळ :- सोसायटी नोंदणी क्र. महा.१३७५ जळगाव विश्वस्थ नोंदणी क्रमांक एफ . १३४१ जळगाव, मुखपत्र, 'आपले लेवा परिवार' त्रैमासिक, संपादक श्री. महेंद्र ओंकार राणे, संस्थापक अध्यक्ष, अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळ, पत्ता, बी/३, रविकिरण, म.फुले मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०००८१ ह्या मंडळाच्या देशभर सुमारे २० संलग्न संस्था आहेत. त्या अशा :-

१. भ्रातृमंडळ, पुणे २. लेवा भ्रातृमंडळ, इंदौर (म.प्र.), ३. यावल तालुका लेवा पाटीदार विचार, मंच, बाणमोद, जिल्हा - जळगाव, ४. स्नेहसंवर्धक मंडळ, भिलाई नगर (म.प्र.), ५. लेवा पाटीदार भ्रातृमंडळ, भोपाळ (म.प्र.), ६. लेवा पाटीदार समाज, अहमदाबाद (गुजराथ), ७. लेवा पाटीदार मित्र मंडळ बडोदा (गुजराथ), ८. लेवा पाटीदार संघ सुरत, ९. विरार लेवा मंडळ, विरार जिल्हा ठाणे, १०. लेवा युवा संघ, कानळदा, जिल्हा-जळगाव, ११. लेवा पाटीदार समाज कल्याण मंडळ, चाळीसगाव, जिल्हा - जळगाव, १२. लेवा पाटीदार समाज मंडळ, वर्धा (विदर्भ), १३. संत मुकुंद महाराज लेवा संघ एणगाव परिसर, जिल्हा जळगाव, १४. समस्त लेवा पाटीदार समाज मंडळ, जामनेर जि. जळगाव, १५. लेवा पाटीदार युवक संघटना, सावदा, जि. जळगाव, १६. लेवा युक संघ यवतमाळ (विदर्भ), १७. संत नागोजी महाराज लेवा पाटीदार मंडळ, तळवेल, जिल्हा - जळगाव, १८. बहिणाबाई चौधरी रसगंगा मंडळ, उल्हासनगर, जिल्हा ठाणे, १९. लेवा समाज विकास मंडळ, नवी मुंबई, परिसर, नवी मुंबई, २०. बहिणाबाई ज्ञानविकास संस्था, जळगाव जिल्हा, अशा अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळाच्या देशात एकूण २० संलग्न घटक संस्था आहेत.

या संस्थेचे मुख्यालय मुंबईस असून संलग्नता शुल्क ११०० रुपये आहे. व "आपले लेवा परिवार" या त्रैमासिक मुखपत्राची पाच वर्षासाठी सदस्य वर्गणी २५१ रुपये आहे. संस्थेची मलकापूर, मोताळा, नांदुरा ह्या तीनही तालुक्याच्या मुख्य लेवा वस्तीत अद्याप विस्तार व्हायचा आहे. निदान ह्या तिन्ही तालुक्यात प्रत्येकी एक एक शाखा असणे समाज संघटनास गतिशील वा पूरक ठरेल.

या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष असलेले माझे मित्र श्री. महेंद्र ओंकारराव राणे हे मोठे तळमळीचे, उत्साही व जिद्दीचे समाजसेवक आहेत. खानदेशातील पाच तालुके व विदर्भातील तीन तालुके लेवा वस्तीचे आहेत. ह्या तालुक्या बाहेरच्याही लेवा समाजात त्यांनी धडाडीने संलग्न शाखा उघडल्यात. व दूरदूरच्या शाखांशी ते संपर्क ठेवून असल्याचे ऐकतो.

प्रस्तुत विद्यमान संलग्न शाखांचे पत्रव्यवहारार्थ पूर्ण पत्ते हवे असल्यास माझे मित्र- श्री. महेंद्र

ओंकारराव राणे यांचेशी वरील पत्त्यावर संपर्क साधल्यास ते जरूर कळवतील.

२३) **लेवायन :-** संपादक, राम नेमाडे, २/अ, गणेश पॅलेस, चित्तरंजन रस्ता, रामनगर, डोंबिवली, (पूर्व) जिल्हा, ठाणे, महाराष्ट्र. वा. वर्गणी. २५ रुपये. समस्त लेवा समाजाची अस्मिता जपणार त्रैमासिक प्रकाशक सौ. कुसुम नेमाडे ९ पाम व्हयू रामनगर, डोंबिवली पूर्व.

२४) **सातपुडा सहकारी पतपेढी मर्यादित.** कार्यालयाचा पत्ता :- कृष्ण पिंगाक्ष कृपा, त्रिमूर्ती को.ऑ.हा. सोसायटी लि. शिवाजी पथ क्र. २, गणेश नगर, डोंबिवली, (प.) ४२१२०२ ह्या संस्थेच्या व्यवस्थापकात बहुसंख्य लेवा पाटीदार आहेत. अध्यक्ष श्री. गिरधर काशीराम धांडे हे आहेत.

२५) **लेवा प्रबोधन पत्रिका,** संपादक :- राम नेमाडे, हे मुंबई व परिसर लेवा मंडळाचे मुखपत्र होते. पत्ता:- केशव भिरुड, १०२, पलाय ओव्हर अपार्टमेंट ऑफ ब्रीज, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०००६९ चा वर्ष २, अंक १ रा, नोव्हेंबर १९८१ चा फक्त पहायला मिळाला. इतर माहिती वरील पत्त्यावर.

२६) **दहा दोन तीन** :- हे पाक्षिक संपादक डॉ. ज.ह. फिरके, प्राचार्य डी.एड. कॉलेज नांदुरा (विदर्भ) या पाक्षिकाचे ५ सप्टेंबरचे 'शिक्षक दिन विशेषांक' मोठे माहितीपूर्वी राहिले.

२७) **मध्यप्रदेश एवं राजस्थान पाटीदार समाजाची प्रमुख मासिक पत्रिका "पाटीदार जागृति." प्रबंध संपादक "पाटीदार जागृति"** पाटीदार समाज छात्रावास, संजीत मार्ग, मंदसौर ४५८००१. मध्यप्रदेश, वर्गणी दरवर्षी ५० रुपये फक्त.

२८) **लेवा युवा संघ जळगाव** :- अध्यक्ष कृष्णभाऊ खडके, जळगाव, सरचिटणीस दिवाकर नामदेव महाजन. ता. २७ जून १९८८ ला पंजिबद्ध झाला. रजि नं. म/९४२/२७ जून १९८८ व संस्था नोंदणी अधिनियम १८६० व सन १९५० च्या सार्वजनिक विश्वस्त निधी कायद्यानुसार नोंदली आहे. १५०० सभासद आहेत. वयोमर्यादा १८ ते ४० वयोगटाची आहे. या संस्थेचा १९८८-८९ चा नूतन वर्षांक प्रसिद्ध झाला. तो उत्तम आहे.

२९) **स्वामि नारायण प्रकाश मासिक** दर २१ तारखेला प्रसिद्ध होते. द्विवार्षिक चंदा १२ रु. मार्च १९८८ च्या अंकावरून पत्ता :- स्वामी नारायण अक्षर पीठ, शाहीबाग रोड, अहमदाबाद ३८०००४, प्रकाशक- शास्त्री स्वयंप्रकाशदास पत्ता वरीलप्रमाणे, या पंथात खान्देशस्थ लेवा पाटीदार बरेच आहेत.

३०) जळगाव जिल्हा **लेवा समाज मंडळ, पिंपरी, चिंचवड परिसर. पुणे ४४.**, कार्यालय C/o रविंद्रनाथ पाटील, यशवंती फ्लॉट नं. ९० सेक्टर नं. २७, शरयू नगर, प्राधिकरण, पुणे - ४११०४४.

या संस्थेचे सभासद ६२८ चे वर आहेत संस्था वधूवर सूचक योजना, सुशिक्षित बेकार योजना, सांस्कृतिक कार्य हे विभाग आहेत. येथे कार्यक्रमामध्ये लागणारो स्वयंपाकाची भांडी व इतर वस्तू भाड्याने मिळतात. पत्ता :- हरी बऱ्हाटे, दीपगंगा निवास, प्लॉट नं. १७७, सेक्टर नं. २८, प्राधिकरण, निगडी, पुणे ४४.

३१) **लोकसेवा शिक्षण मंडळ, मलकापूर** या लेवा पाटीदार संस्थेने जनता कला वाजिज्य महाविद्यालय व नूतन विद्यालय या दोन शैक्षणिक संस्थाचे संचलन केले व करीत आहे.

३२) **भ्रातृमंडळ मलकापूर** :- अध्यक्ष, भ्रातृमंडळ, विठ्ठल मंदिर वॉर्ड, ४० बिधा, मलकापूर, जिल्हा बुलढाणा. हा पत्ता आहे. येथे विशाल सभागृह, मंगल कार्यालय, स्वयंपाकाच्या सर्व सोयीसह असून मोठे पटांगण व विठ्ठल मंदिर आहे. त्यात सतत दैनिक स्वाध्याय चालतो. दुमजली प्रशस्त इमारती असून लग्न व इतर कार्यक्रमास उपयोगी आहे. सचिव प्रा. बा. वि. कोलते, ४० बिधा, विठ्ठल मंदिर वॉर्ड, मलकापूर हे आहेत.

३३) **ह.भ.प. यादव काशिराम वराडे, आडविहिरकरांची दिंडी** :- ही लेवा संस्था वारकरी कार्यक्रम विदर्भातील सुमारे ८० गावातून करते. दरवर्षी आषाढी पंढरी यात्रा व मासिक एदलाबाद वारी,

वार्षिक पैठण व त्र्यंबकेश्वर यात्रा विदर्भवासी लोकासह करतात.

३४) **ह.भ.प. राजाराम शास्त्री शेळगावकरांची दिंडी** :- ही खानदेशस्थ लेवा पाटीदारांची प्रमुख वारकरी दिंडी सर्व वारकरी प्रमुख स्थळी जाऊन वार्षिक यात्रा करते.

३५) **ह.भ.प. अंजाळेकर जगन्नाथ महाराजांची दिंडी** :- ही भुसावळ परिसरातील लेवा पाटीदार वारकऱ्यांसह सर्व वारकरी तीर्थे, यात्रा व पुण्यतिथ्यादि कार्यक्रम करते.

३६) **औद्योगिक विकास नागरी सहकारी पतपेढी मर्यादित. पिंपरी चिंचवड**, नोंदणी क्रमांक : PNA/HLI/RSR/CR/417/85-86 पत्ता : c/o इन्स्टिटयूट ऑफ बिझिनेस मॅनेजमेंट अँड रिसर्च ब्लॉक सी चिंचवड, M.I.D.C. कमर्शियल बिल्डिंग शेजारी, पिंपरी. टेल्को रोड, चिंचवड, पुणे ४११०१९, अध्यक्ष- प्रा. डॉ. र.रा. पाचपांडे व्यवस्थापक, श्री. प्र.द. उत्तरदे. चिटणीस, श्री. रविंद्र पाटील, उपाध्यक्ष- डॉ. पु.दे. पाटील, चौथा वार्षिक अहवाल १९८७ जळगाव जिल्हा लेवा समाज मंडळ पिंपरी-चिंचवड परिसर पुणे ४४ चे मल पृष्ठावर, प्रकाशक- रविंद्रनाथ पाटील, यशवंती, प्लॉट नं. ९०, सेक्टर नं. २७, शरयू नगर, प्राधिकरण, पुणे - ४४ पत्ता दिला आहे.

३७) **भोरगाव लेवा पंचायत, मु. पाडळसे**, ता. यावल, जिल्हा जळगाव, कार्यालयाचा पत्ताही हाच आहे. या संस्थेत लेवा पाटीदार, लेवा पाटील, लेवा कुणबी, रेवा कुणबी यात कंडारकर, साक्रीकर, नवघरे ह्यांचाही समावेश राहील. दरवर्षी १५ रु. क्रियाशील सदस्य फी भरून किंवा १५१ आजीव सदस्य फी भरून सदस्यत्व कायम रहाते. कुटुंब नायक हे भोरगाव लेवा पंचायतीचे कुटुंबनायक हे सर्व प्रमुख राहतील. विदर्भातील तीन व खानदेशातिल पाच तालुके मिळूनची मूळ वस्ती यात प्रामुख्याने राहील.

या भोरगाव लेवा पंचायतीचे मुख्यालय भुसावळचे उत्तरेच ७ किलो मीटरवरील तापीपलिकडचे मोर नदी काठी पाडळशे गाव आहे. पाडळशेजवळून सन १९४३ साली भुसावळ सावदा रोड गेला आहे. इ.सन १३७० ते १६०० पर्यंत खानदेशावर फारुकी अंमल होता. त्यांनी लेवा पाटीदारांना वतने दिलीत. गावाशेजारी पराशर ऋषीचे पुरातन स्थान आहे. येथील श्री. भागवत मारुती पाटील (डीं.वाय. एस.पी.) यांना सन १९७० साली राष्ट्रपति पदक मिळाले होते.

गावाला '**धूळ** पाटीने' प्राथमिक शिक्षणाची सुरुवात झाली. नंतर पंतोजी पद्धतीची गावठी शाळा सुरू झाली. सन १८८२ ते १९१४ पर्यंत सरकारी शाळेतून फक्त चौथीपर्यंत शिक्षण दिले जाई. मात्र, खाजगी इंग्रजी वर्ग काढलेत. पुढे सन १९५९ साली लोक विद्यालय नावाची माध्यमिक शाळा निघाली. लेवा पाटीदारांचा हा मुख्य ठाया आहे. ठाया प्रमुखास कुटुंबनायक म्हणतात. धोंडूबापू पाटील, भिकू सवंदू पाटील, विठू गणू पाटील, रमेश विठू पाटील या क्रमाने कुटुंबनायक झालेत. रावसाहेब रूपचंद यांचे अध्यक्षतेखाली सन १९१५ मध्ये खानदेश विदर्भातील लेवा पाटीदारांचे शिक्षण संमेलन पाडळशे येथे झाले होते. हीच लेवा समाजाची उत्क्रांती होय. ता. १३ मे १९४१ रोजी ग्रामपंचायत पाडळशे ही संस्था सुरू झाली. येथील डॉक्टर के.एम. पाटील यांनी 'लेवा समाज सेविका' मासिकाचे संपादन केले होते. गावाची लोकसंख्या ३५६७ आहे. सन १९७० मध्ये ग्रामपंचायतीने 'उज्वल' नावाचा म.गांधी जन्मशताब्दी विशेषांक काढला आहे.

भोरगाव लेवा पंचायत, पाडळशे- पब्लिक ट्रस्ट, रजिस्टर नंबर अे -११७ जळगाव हा आहे. या संस्थेचे ता. १८ व १९ मार्च १९८४ रोजी एक भव्य अधिवेशन झाले होते. ता. २४ जानेवारी १९६७ नंतर सुमारे १७ वर्षांनी भोरगाव पंचायत भरली होती. त्यात कुटुंबनायक रमेश विठू पाटील लोकसेवक बाळासाहेक मधुकरराव चौधरी, भाईसाहेब या.शि. महाजन, दादासाहेब श्री. हि.के. कोल्हे, अण्णासाहेब डॉ. जी.डी. बेंडाळे, श्री. प्रकाश चौधरी, डॉ. रु.गो. चौधरी, दादासाहेब जे.टी. महाजन, डॉ. के.एम. पाटील, अँड डी.डी. चौधरी, श्री. रा.वा. पाटील यांची तारीख १८

मार्च १९८४ ला भाषणे झालीत. व ता १९ मार्च १९८४ ला श्री. निळकंठराव पाटील प्रा. श्री. वायकोळे, श्री. शंकर वाघुळदे. डॉ. एस.आर. चिरमाडे, श्री. एन.सी. पाटील, कु. साधना नारखेडे, कु. उषा पाटील, सौ. कुसुमताई चौधरी यांनीही या चर्चेत भाग घेतला होता.

या दुसऱ्या सत्रात १६००० स्त्री-पुरुष हजर होते. बऱ्याच लोकांनी चर्चेत सहभाग घेऊन विचार मांडले. ता. १९ मार्च १९८४ ला १६००० स्त्री-पुरुषांची सभेत विदर्भातून फक्त २० लेवा पाटीदारच ह्या सभेला उपस्थित होते, असे दैनिक तरुणभारत नागपूर, ता. ३ मार्च १९८४ चे अंकात चांदूरबिसवा येथील तरुणभारत वार्ताहराने प्रसिद्ध केले होते. बुलढाणा जिल्ह्यात दीड ते दोन लाख लेवा समाज आहे. त्यापैकी फक्त २० प्रतिनिधी हजर होते. याबद्दल दुःख व्यक्त करण्यात आले होते. असेही वार्तेत नमूद केल्याचे समजते.

श्री. शंकर विठोबा पाटील दुधलगावकर म्हणाले की, "दाताळे हे कुटुंबनायकाचे स्थान आहे. तेथील मिळकतीचा विचार तिकडील लोकांच्या गैरहजेरीत येथे करता येईल का ? कारण विदर्भाहून येथे आलेल्यांची संख्या २० पेक्षा जास्त नाही." असे भोरगाव ले[illegible] पंचायत पाडळशे पब्लिक ट्रस्ट र. नं. ए-११७ जळगाव संस्थेचा अहवाल सन १९८४ पृष्ठ ४[illegible] वर नमूद केलेल्या प्रश्नाला स्पष्टीकरण करताना ॲडव्होकेट डी.डी. चौधरी म्हणाले की, "अगोदरपासून अस्तित्त्वात असलेली संस्था व त्या संस्थेची मिळकत असल्यास ती मिळकत तशीच असावी." असे त्या अहवालात पृष्ठ ४७ वर स्पष्टीकरण दिले आहे.

मलकापूर विभागातील लेवा समाजाचे अधिवेशन ता. २९-७-८४ रोजी रविवार रोजी मलकापूरच्या जनता कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्रांगणात श्री. पां.गो. भंगाळे यांचे अध्यक्षतेखाली भरले होते. त्यात श्री. निवृत्ती एकनाथ पाटील-कुंड, श्री. मधुकरराव चौधरी खिरोदा, डॉ. जी.डी. बेंडाळे- जळगाव, सौ. श्यामलाताई सरोदे व सौ. कुसुमताई चौधरी पूर्व खानदेश यांची भाषणे झालीत. डॉ. पुरुषोत्तम भगवान पाचपांडे कुंड, प्रा. रा.वा. पाटील जळगाव, श्री. भागवतराव चौधरी- संपादक, जळगाव यांनीही या सभेत सहभाग घेतल होता. या अधिवेशनात सर्वश्री कुटुंबनायक रमेश विठू पाटील-पाडळशे, कोषाध्यक्ष, हिरामण भाऊ कोल्हे, मनोहर लहू पाटील, तुकाराम हरी पाटील दाताळकर, सौ. सिंधूताई चौधरी, सौ. द्वारकाबाई पाटील, सौ. शकुंतलाबाई राणे, सौ. मीनाताई फिरके इत्यादी मान्यवर मंडळी उपस्थित होती. त्यात खानदेश-विदर्भाची दिलजभाई श्री. बाळासाहेब चौधरींचे नेतृत्वाखाली झाली. कार्यक्रमाचे संचालन श्री. ना.गो. खडसे यांनी केले, तर सौ. कुसुमताईने पसायदान म्हटल्यावर कार्यक्रमाची सांगता झाली. या सभेला विदर्भातून सुमारे २२००० लेवा पाटीदार उपस्थित असल्याचे श्री. ना.जा. दांडगे, संपादक, बुलढाणा पत्रिका प्रथम पृष्ठावर ता. ५-८-१९८४ चे अंकात नमूद करतात.

इ.सन १९५६ साली मध्यप्रांत वऱ्हाडच्या शासनाने प्रकाशित केलेली, बुलढाणा जिल्हा दर्शनिका संपादक N.Co. Nicolson यांनी बरीच माहितीपूर्ण दर्शनिका संपादन केली होती, असे मी ऐकले आहे. पण तो ग्रंथ पहायला मला मिळाला नाही.

सन १९१८ साली पाडळशेच्या सभेत लेवा जातीचे पहिले भ्रातृमंडळ स्थापन झाले होते. सन १९१९ चे उन्हाळ्यात नरवेल येथे दुसरे भ्रातृमंडळ उघडले. ता. ६ एप्रिल १९२१ ला आकाराम गणू पाटील नरवेलकरांनी विदर्भातील ७८ गावांची ६८७ पृष्ठांत १७ रकान्यात ४४७० घरांची १७१७५ लेवा पाटीदारांची खानेसुमारी केली होती. तसेच, १९२० ला हिवाळ्यात फैजपूरला लेवा पाटीदार विद्यार्थी स्नेहसंमेलन झाले होते.

दाताळा ठायाचे पंचायत सेक्रेटरी रामकृष्ण नारायण नाफडे चौधरी हे होते. अध्यक्ष शंकर तोताराम पाटील दाभाडीकर होते. एकूण नऊ सभासदांची कार्यकारिणी असून त्यात दुधलगावचे

श्री. गणू काशीराम पाटील हे सभासद होते.

ता. ५ जुलै १९८४ रोजी मलकापूर तहशील ग्रोअर्सचे गोडाऊनमध्ये श्री. सोपान निनू पाटील तांदुळवाडीकरांचे अध्यक्षतेखाली श्री. पी.डी. महाजन उपप्राचार्य मूळजी जेठा महाविद्यालय जळगाव यांचे मार्गदर्शनाने विदर्भातील लेवा पाटीदार कार्यकर्त्यांची सभा होऊन त्यात प्रबोधन + संघर्ष + रचना = कार्य हा निष्कर्ष काढला होता.

ता. २८ जुलै १९८५ रोजी, रविवार दुपारी १२ वाजता, जनता कला वाणिज्य महाविद्यालयात श्री. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे कार्याध्यक्ष भोरगाव लेवा पंचायत पाडळसे यांचे अध्यक्षतेखाली श्रीमान रमेश विठू पाटील कुटुंबनायक व माननीय दादासाहेब वाय.एम्. बोरोले व तुकाराम हरी पाटील दाताळकर नियामक मंडळ सदस्यांचे उपस्थितीत आम सभा झाली.

गतवर्षी २६७ ट्रॅक्टर्स व काही मेटॅडोर आदी साहित्यानिशी मलकापूरला लेवा लोक सभेसाठी जमले होते. २१ सदस्यांची अस्थायी समिती नेमल्यावर डॉ. रु.गो. चौधरीचे अध्यक्षतेखाली हा भव्य नवयुवक युवतींचा मेळावा पार पडला. त्यानंतर ही सभा झाली. डॉ. बेंडाळे कार्याध्यक्षांनी विदर्भ विभागाचे समाजकार्य जातीच्या सहा विभागातून सर्वोत्कृष्ट असल्याची ग्वाही दिली, व खानदेशापेक्षा विदर्भातील नेतेच समाजोत्थानात प्रभावी ठरल्यानेच हे घडले, असा त्यांनी निर्णय दिला. श्री. ना.गो. खडसेंनी आभारप्रदर्शन केल्यावर पसायदानाने सभेची सांगता झाली.

भोरगाव लेवा पंचायत कार्य (दाताळा विभाग) कार्यकर्ते श्री. शंकर तोताराम पाटील दाभाडीकरांनी मलकापूर ते बुलढाणा रोडवरील त्यांचे शेतात सन १९१९ ला ५०० लेवा पाटीदारांचे उपस्थितीत लेवा बोर्डींग उघडले होते. मलकापूरचे तहशीलदार, सावदेकर श्री. भिकू दुर्गा पाटील, सीताराम नाना चौधरी, भिकू एकोबा पाटील नरवेलकर हे तीन सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते हजर होते. श्री. निनाजी श्यामाजी भोळे झोडगेकर, ता. मलकापूर जि. बुलढाणा हे ५ ते ८ पर्यंत अंदाजे १९२४ ते २८ सालात लेवा बोर्डींगचे विद्यार्थी होते. श्री. शंकरराव भोळे हे लेवा वसतीगृहाचे माननीय अधीक्षक होते. बुलढाणा रोडवरील अर्ध वर्तुळाकार इमारतीत ९ ते १० खोल्या होत्या. उत्तर बाजूस चार खोल्या, पश्चिमेस एक स्टोअररूम व एक स्वयंपाकघर व एक होस्टेल प्रिफेक्टची खोली होती. दक्षिण बाजूस प्रिफेक्ट रूम शेजारी एक हॉल होता. या हॉलचे पूर्वेस अधीक्षकाची खोली असून मध्यभागी रेती टाकलेले पटांगण होते.

या होस्टेलपुढे एक टूमदार बगीचा होता. बगीचा पुढे एक फाटक होते. त्याचे पुढे उत्तर दक्षिण बुलढाणा रोड होता. या होस्टेलमध्ये श्री. निनु निंबाजी इंगळे झोडगेकर विद्यार्थी म्हणून होते व त्यांची आई पुताबाई स्वयंपाक करीत असे. तिच्या मदतीला आनंदाबुवा नावाचा नोकर होता. या लेवा बोर्डींग हॉलमध्ये दर गुरुवारी भजन होई. तेथे एक दत्ताचा फोटोही होता. पुताबाई इंगळे झोडगेकर बाई उत्तम स्वयंपाक करीत असे. बॅ. तुकाराम शंकर पाटीलांना विलायतेत शिक्षणार्थ जाण्यापूर्वी येथेच समाजाने निरोप समारंभ केला होता. व परत आल्यावरही याच वसतीगृहात सर्व समाजाने त्यांचे स्वागत केले होते. अशी ही माहिती श्री. निनाजी श्यामाजी भोळे झोडगेकरांनी मला ता. ७ जानेवारी १९८५ रोजी प्रत्यक्ष कथन करून सांगितली होती. गरिबीत पूताबाईने स्वयंपाक करून मिळणाऱ्या वेतनावर श्री. बिनु निंबाजी पाटीलांना शिकविले. हा मुलगा सेवानिवृत्त उपजिल्हाध्यक्ष Deputy Collector असताना मी पाहिला होता. नंतर ही होस्टेलची जागा श्री. पांडुरंग सखाराम पाटील दाभाडीकरांचे हिश्यावर गेल्यावर त्यानी ते होस्टेल बंद केले ते समयी २० ते २५ घरांची फक्त मलकापूरात लेवा वस्ती होती. बाकी इतर जातीचेच संख्याधिक्य होते.

लेवा भाट पोथी सांगते की, सन १२७५ साली भीमसेन राजपूत बडोद्यास राज्य करीत होता. तेव्हा तेथे लेवा पाटीदार सुखानेनांदत होते., पण अल्लाउद्दीन खिलजी व महंमद घोरीने त्यांच्यावर

हल्ला केला. कर्णरायसिंह व पतियाळा राऊळ यांचीही छोटी-छोटी राज्ये गुजराथेत होती. तेथील अत्याचाराला कंटाळून तापी-पूर्णा खोऱ्यात वसाहत केल्यावर ही भोरगाव लेवा पंचायत संस्था निर्माण झाली.

महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, जळगाव जिल्हा, संपादक- डॉ. कि.का. चौधरी मराठी प्रत, १९९४, पृष्ठ १८२ वर, लेवा पाटीदार, ह्या प्रकरणात ते लिहितात की, "लेवा पाटीदारांची गणना कुणब्यात होत असल्याने इ.सन १९११ नंतर स्वतंत्र आकडेवारी उपलब्ध नाही. महाराष्ट्रात फक्त यावल, रावेर, एदलाबाद, भुसावळ, जळगाव, मलकापूर, मोताळा, नांदुत ह्या आठ तालुक्यात व एरंडोल तालुक्यातील नांदेड साळवे व जामनेर तालुक्यातील हरताळे व इतर काही ठिकाणी फक्त लेवा पाटीदार वस्ती महाराष्ट्रात सापडते.

पाटीदारांची वस्ती मध्यप्रदेश, राजस्थान व बंगालातही आहे. देविसिंग चौहाणांच्या मते हे लोक इराणहून खैबर खिंडीमार्गे भारतात आले. भाटांच्या नोंदीवरून कळते की, लेवा पाटीदार संवत ११०० च्या सुमारास गुजराथेतून स्थलांतरीत झाले. गुजराथेत हे राजस्थानातून चितोडगड, मल्हारगड, काठेवाडमार्गे आलेत. इ.सन १९१० च्या बुलढाणा गॅझेटियर, १९९४ च्या मराठी प्रतीत लिहितात की, "गुजराथमधील लेवा कुणबी उत्तरेतील गुजर वंशाचे आहेत." जिल्ह्यात यांना पूर्वी पांजणे कुणबी म्हणत. पाजणे शब्द पावाखंडाशी जोडला असून पावाखंड गुजराथचा भाग मानत (कित्ता, पृष्ठ १०४). गुजराथेतील यावनी आक्रमणात खेडा ज़िल्हचातील लेवा पाटीदार पावागडला गेलेत. काही पिढ्यानंतर पावागडवरही यावनी आक्रमण झाल्यावर ते खानदेशात आलेत. त्यांच्या रेवा उर्फ लेवा, नवघरे, कंडारकर, थोरगव्हाणे व साक्रीकर ह्या शाखा आहेत.

पूर्वी पांजणा जातीचा पंचायत प्रमुख देशमुख घराण्यातील थोरगव्हाणे होता. (खानदेश गॅझेटियर १८८०, पृष्ठ ६८ पहा). हे चार विभाग झाल्यावर यावलचा देशमुख फक्त थोर गव्हाणे पोट प्रमुखच राहिला, व बाकीच्या लेवा पोटभेदांचे पंचायत प्रमुखपद भोरटेक येथील लेवा पाटलाकडे गेले. भोरटेकच्या पाटीदारांना तत्रस्थ कोळ्यांनी हुसकून लावल्यावर पाडळशेचा पोलीस पाटील लेवा पाटीदार पंचायत प्रमुख झाला. गुजराथेतील मोमना कुणबी हे स्वत:ला लेवा पाटीदार समजतात. ते सत्पंथी आहेत. लेवा भोरगाव पंचायत पाडळशे व यावल तालुक्यातील भोरटेक ह्या गावाजवळील मोर नदीकाठी वर्षातून एकदा घेत असत.

लेवा पाटीदारांना आपली गोत्रे माहीत नाहीत. (पृष्ठ १८४, जळगाव जिल्हा गॅझेटियर). लग्न जुळविताना लेवा पाटीदार गोत्रापेक्षा कुळांना अधिक महत्त्व देतात. हे सगोत्र विवाह करीत नाहीत. परंतु, निषिद्धही मानत नाहीत. (गॅझेटियर, पृष्ठ १८५ पहा). बहुतांश आडनावे म्हणजे कुळे असतात. पूर्वी विवाह पाच दिवस, तीन दिवस, दोन दिवस चालत असत. आता एका दिवशीच हा विवाह-विधी आटोपतो.

सन १९१८ मध्ये प्रकाशित झालेल्या 'लेवा पुराण ग्रंथा'नुसार लेवा गुजरांचे मूळ गोत्र काश्यप असून सोमवंशीय राजा बळीचा पुत्र लेहक पासून लेवा व बळीचा भाऊ भद्रचा पुत्र कैटभपासून कडवा शाखा जन्मली. गुजराथेत अजय नामक राजाने गुजराथेत लेवा वंश वसविला. इ.सन ६४० मध्ये गुजराथेत लेवा व कडवा सुखाने नांदत होते. काहींच्या मते यांच्यातूनच लेवा गुजर व लेवा पाटीदार व कडवा गुजर व कडवा पाटीदार ह्या कुणब्यांच्या उपशाखा निर्माण झाल्या. राजस्थानातील रणथंबोरवरून जुनागडला व तेथून ते अहमदाबादला आल्यावर पाच पिढ्या राहिलेत. तेथूनही पावागड व चापानेरला नांदलेत. तेथून ते नेमाड, करगुंद, थाळमार्गे असीरगड येथे अकराव्या शतकात आले. भाटानुसार गुजर सन १२३४ मध्ये खानदेशात आलेत.

सन १२२४ ला देवगिरीवर अल्लाउद्दीनचा हल्ला झाला. ता. ३-१०-१२९६ ला अल्लाउद्दीन खिलजी

दिल्लीपती झाला. ता. २० एप्रिल १३९७ साली महंमद दुसरा मेला. १४८३ मध्ये महंमद बेगडा व लेवा पाटीदारात दोन वर्षे संग्राम झाला. लेवा हरलेत. बडोदा गोध्रा मार्गावरील महाकालीचे पठारावरील पावागड येथे लेवा पाटीदारांचे आद्य कुलदैवत महाकाली देवी माता नांदते. तिचे देवास जिल्ह्यातील हिंदी भाषिक उपासक लेवा पाटीदार लोक आपल्या नावापुढे सिंह हे उपपद लावतात, तर मराठी भाषिक लेवा पाटीदार नावापुढे 'राव' हे उपपद लावतात. यांची एक शाखा कच्छमध्ये 'लवाणा' लोहाणा ज्ञातीत असून क्षत्रिय आहे. हे लोक गुजराथेतून सन १३१० व सन १३७० मध्ये दोनदा स्थानांतरीत झालेत. ता. ३१-१०-१८७५ ला सुरतजवळील नडीयादला लोहपुरुष सरदार वल्लभभाई झंवेरभाई कोलते पटेल या लोह पुरुषाचा जन्म झाला. व ता. १५ डिसेंबर १९५० रोजी त्यांचा मुंबईस मृत्यू झाला.

सरदार वल्लभभाई झवेरभाई (कोलते) पटेल या लोहपुरुषाचा गुजराथेत सुरतजवळ नडीयाद शहरी ता. ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी जन्म व १५ डिसेंबर १९५० ला मुंबईत मृत्यू झाला असे न्यू एनसायक्लोपिडिया ऑफ ब्रिटानिकाच्या मायक्रोपिडिया भाग १३ फाऊन्ड १७६८ आवृत्ती १५ मध्ये लिहिले आहे. गुजराथेत सन १२७५ साली कर्णरायसिंह राज्य करीत होता व सन १२९६ साली लेवा पाटीदार लोक पतियाळा राऊळचे राज्यात चापानेरला गेले. कालंका देवीचे शापाने पावागड ओस पडला म्हणून स्थलांतराने हे लेवा लोक १. चापानेर, २.धनदेवी, ३. पालनपूर, ४. धवडके धुंडके, ५. कडवीर, मंगळावती, ६. अहमदाबाद, ७. बडोदा, ८. भडोंच (पूल), ९. सुरत, १०. नवापूर, चिरमाडे, नंदूरबार, सोनगड, ११. रनाळे, १२.दोंडाईचा, १३.नरशी दबाशी, १४.नांदेडहून सन १३५१ साली तापीतीराने खानदेशमधून चांगदेवमार्गे दुधलगाव दाताळा येथे आलेत.

कल्याण मासिक, गोरखपूर सन १९७९ चा सूर्याङ्क पृष्ठ ३०० वर डॉ. निरंजन कानदेव चौधरी विद्यार्णव (M.A.LLB, Ph.D.) लिहितात-की, उदयपूर व चितोडचे महाराज लवाचेच वंशज आहेत. कुशवाह कुशाचेच वंशज आहेत. ह्यावरून राजपूत व लेवा पाटीदार हे क्षत्रिय वर्णातून उदय पावलेले दिसतात. या समाजास इतर प्रदेशात कूर्मी, माळव्यात कुलमी व गुजराथेत कणबी, महाराष्ट्रात कुणबी म्हणतात.

'लेवा परिवार' एप्रिल व मे १९९१ वर सरदार पटेल, लेखक सेठ गोविंददास, प्रकाशक- राजपाल अँड सन्स, दिल्ली, पृष्ठ ६ वर क्षत्रिय कुलोत्पन्न लेवा व कडवा असल्याचा उल्लेख करतात.

रामायणाचे उत्तर कांड व कालिदासकृत रघुवंशात लेवा पाटीदारांचे उगमस्थान शोधा. सन १९७१ साली पुणे विद्यापीठास आचार्य (पीएच. डी) साठी तोताराम नामदेव चोपडे यांनी मराठी भाषेत 'लेवा पाटीदारांची मराठी बोली' हा शोध प्रबंध सादर केला आहे. तोही वाचून पहा.

क्षत्रिय कुलदैवत :-

आश्विन शुद्ध २ ते ९ पर्यंतच्या नवरात्रात १.बंगालात - कालीमाता, २. माहूरला - रेणूका माता, ३. कोल्हापूरला - महालक्ष्मी, ४. तुळजापूरला - भवानी, ५. वणीला - सप्तशृंगी, ६. उंझाला - उमिया माता, ७. बेचराजजीला - अंबामाता, ८. उज्जैनीस - भवानी, ९. अमरावतीस - अम्बा, १०. काश्मिरात - वैष्णवदेवी, ११. बडोदा-गोध्रा मार्गावर पावागडचे पठारावरील महाकाली माता हे लेवा पाटीदारांचे आद्य कुलदैवत आहे., १२. हिमकन्या हिमायलयातील कैलासची पार्वती अशी बारा ज्योर्तिलिंगाचे अर्धांगीसह शिव-पार्वती ही क्षत्रियांचीही कुळ दैवते आहेत.

इ.सन पूर्व ७८ चे सुमारास कनिष्काचे कारकीर्दीत पंजाबातील लेया व करड भागातून गुजर व कूर्मी लोकांनी स्थलांतर केले होते.

या लोकांचे अध्यात्मिक अधिष्ठान श्री. रामचंद्र प्रभूची मंदिरे यावल, पाडळशे, दाताळा (राम झोपडी), दुधलगावचे राममंदिर ही सर्व राममंदिरे पूर्वाभिमुख आहेत.

इ.सन ७४६ मध्ये चावडावंशी वनराजाने अर्नहिलपूर पाटण वसविले. त्याचा मंत्री चापराजने पठारावर चाप.नेर बसविले, पण दुष्काळामुळे इ.सन ७८८ नंतर जयदीपसिंह रावळाचे राज्य उद्ध्वस्त झाले. म्हणून कालांतराने सोळंकी वंश नष्ट होऊन वाघेल वंश सिंहासनारूढ झाला. त्याचा शेवटचा राजा करण वाघेलाचा मंत्री माधवने सन १२९४ ला अल्लाउद्दीन खिलजीला स्वारी करण्यास आमंत्रिले होते. सन १३०७ला करण हरला. कमलकुमारी व देवलदेवीचे हरण अल्लाउद्दीनाने केले. पुढे पावागडचा सेनापती कृष्णचंद्र लेवा पाटीदार मारला गेला. व पावागड पडला. म्हणून लेवा पाटीदार लोक पताई रावळच्या चापानेरला गेले. पण त्याचाही सेनापती वैरीसिंह पाटीदार हा सियाजी बाकलीवालच्या फितुरीमुळे पराभूत झाला. म्हणून सन १४८३ त महंमद बेगडाने लेवा पाटीदारांची कत्तल केली. त्यांचेवर जिझिया कर बसविला. नंतर विरमदेवाचा पराभव केला. म्हणून चापानेरहून धनदेवीस लेवा लोक आलेत. त्यानंतर ४ पालनपूर, ५. धवडके, ६. कडबीर, मंगळावती, ७. अहमदाबादेस एकवटले, ८. तेथून बडोदा, ९. भडोच, १०. सुरत, ११. सोनगड, १२. रनाळे, १३. दौंडाईचा, १४. नरशी दबाशी, १५. नांदेड-साळवा मार्गे तापीतिराने बऱ्हाणपूर मार्गे पाडळशे चांगदेवहून दुधलगाव दाताळा भागात सन १३५१ मध्ये विस्तारलेत. लेवा भाटाचे पोथीनुसार, सन १२७५ साली पावागडहून सन १३५१ मध्ये दुधलगाव पर्यंतच्या स्थानांतरण वाटचालीत एक-दोन पिढ्या गेल्या असाव्यात असा अंदाज आहे. श्री. देवराम सखाराम बऱ्हाटे पाडळशेकरांचे मते इ.सन १४८४ मध्ये इकडे आलेत.

कच्छ प्रातांत हलाई व वाघदिया (महाराष्ट्रीय ज्ञानकोश, भाग ११ कुणबी शब्द पहा). हे लेवा पाटीदारच आहेत. यांनी भटके जीवन सोडून राजकर्त्याजवळून भूमिपट्टे मिळवून ते पट्टीदार उर्फ पाटीदार झाले. व सन १७०३ पासून ते उपपट्टीदारांना भूमीपट्टी देऊन पट्टी वसूल करणारे भूमी-स्वामी झालेत.

३८) लेवा संस्था क्रमांक- **लेवा समाज कल्याण मंडळ, नासिक,** रजि नं. महा/४६६/७८ लेवा पाटीदार समाजाकरिता मर्यादित.

अध्यक्ष : श्री.डी.सी. राणे (नाशिक)
उपाध्यक्ष : १. श्री.पी.सी. महाजन (नाशिक)
२. डॉ.बी.टी. चौधरी (नाशिक)
चिटणीस : श्री.एस.एल. भारंबे (ओझर टाऊनशिप)
सहचिटणीस : १. श्री. सूर्यकांत पाटील (ना.रोड.)
२. श्री. एस.एस. पाटील (नेहरू नगर)
खजिनदार : श्री. आर.डी. भंगाळे (नाशिक)
ऑडीटर : श्री. व्ही. एल. चौधरी (नाशिक)
यांची एक २३ कलमी सुंदर घटना आहे.

३९) **कडवा पाटीदार परिवार ट्रस्ट : रजि नं. इ ३६६४ अहमदाबाद,** मासिक (रजि. नं. १२-१४/जी.आर.जे/२०८), मुख्य कार्यालय : जिल्हा बँक भवन, दुसरी मंजिल, रीलिफ रोड. अहमदाबाद १, फोन नं २२७१८, २५०९६. शाखा - व्हाईट हाऊस, गोंडल रोड, राजकोट यांनी समाजाची एक डिरेक्टरी प्रसिद्ध केली आहे. तसेच 'कडवा पाटीदार परिवार' हे मासिक मुखपत्र प्रसिद्ध होते, असे श्री. भिकूभाई पटेल, मानद मंत्री, कडवा पाटीदार ट्रस्ट कळवितात.

४०) **श्री. अंबिका पाटीदार समाज, धार्मिक एवं पारमार्थिक ट्रस्ट, उमियाधाम रंगवासा राऊ** जिल्हा इंदौर (म.प्र.).,अध्यक्ष - रामचंद्र पाटीदार, उपाध्यक्ष - चतुर्भज पाटीदार व पुरुषोत्तम पाटीदार, सचिव - पुरुषोत्तम मुकाती, कोषाध्यक्ष - बोंदरमल सुळे, सहसचिव : रमेशचंद्र सूर्या,

पदेन सदस्य - श्री. केशवलाल पटेल, अध्यक्ष- श्री. उमिया माताजी संस्थान, उंझा (गुज), श्री. मदनलाल पाटीदार, अध्यक्ष श्री. राम मंदिर उज्जैन ३ श्री. शोभाराम पाण अध्यक्ष, ओंकारेश्वर, धर्मशाळा.

४१) **पाटीदार जागृति न्यास,** कार्यालय, पाटीदार समाज छात्रावास, संजीत मार्ग, **मंदसौर** (म.प्र.), अध्यक्ष- परशुराम पाटीदार, अध्यक्ष- पाटीदार जागृति न्यास, संजीत मार्ग, मंदसौर ४५८००१ (म.प्र.)

४२) **मध्यप्रदेश एवं राजस्थान पाटीदार समाज**

अध्यक्ष : डॉ. रमेशचंद्र बेलावत, (B.V.Sc. D. A.H.) एफ १, पशुचिकित्सा कॉलनी, ए.बी.रोड, सारंगपूर, जिल्हा राजगढ (ब्यावंरा), पिन - ४६५६९७, एस.टी.डी. (०७३७), फोन २५४० (म.प्र.).

४३) **कूर्मी क्षत्रिय जागृती त्रैमासिक पत्रिका,** आर.एस. पटेल, संपादक कूर्मी क्षत्रिय जागृति, गीरवर सागर, म.प्र. ४७०००१. या त्रैमासिकात कुणबी समाजाचे उत्तम विशेषांक निघतात. उदा. कूर्मीक्षत्रिय जागृति, जुलै १९९३ चा छत्तीसगड विशेषांक, तसेच, कूर्मीक्षत्रिय जागृति जानेवारी १९९४ चा, बिहार विशेषांक (प्रथम) वाचनीय आहेत. वार्षिक वर्गणी २५ रु. आजीव २५० रु.

४४) **कूर्मी क्षत्रिय जागरण** - हे अखिल भारतीय कूर्मी क्षत्रिय महासभेचे मासिक मुखपत्र आहे. **प्रधान संपादक :** पटेल रामकुमार वर्मा, डी-७, बटलर पॅलेस कॉलनी, लखनऊ., फोन - २७३६१८, प्रबंध संपादक : पटेल राजकुमार सचान 'होरी' 'मातृभाषा' १६, वसंत विहार, पिकनिक स्पॉट रोड, इंदिरानगर, लखनऊ, दूरभाष :- ३६५९४२.

पत्ता : **कूर्मी क्षत्रिय जागरण**, ए-१८६, दारूलशफा, लखनऊ (उ.प्र.)

संपादक : मदन मोहन पटेल, पटेल निवास, ४ नवइया गणेश गंज, लखनऊ (उ.प्र.)., पिन- २२६०१८, दूरभाष : २७२०२५ (उ.प्र.) -

४५) **श्री. मालवा कुलमी पाटीदार, श्री राम मंदिर, हनुमान गढी, उज्जैन,** अध्यक्ष - श्री. अंबारामजी गामी, देवगड (देवास) (म. प्र.)

४६) **श्री. कडवा कुणबी पाटीदार धर्मशाळा, कुशलपुरा, उज्जैन,** व्यवस्थापक - १. श्री. तखतसिहंजी नाहर बेरछा, २. लक्ष्मीचंदजी नाहर बेरछा (शाजापूर).

४७) **श्री. लेवा कुलमी पाटीदार मंदिर एवं धर्मशाळा** श्री. लालबाई, फुलबाई चौराहा, उज्जैन. व्यवस्था - श्री. लेवा कुलमी पाटीदार समाज संघ, म.प्र. व राजस्थान द्वारा, अध्यक्ष - श्री. सिद्धनाथ सिंहजी मताना (शाजापूर).

व्यवस्थापक - मथुरालालजी खोरियाएमा (शाजापूर).

४८) **मध्यप्रदेश पाटीदार समाज** - द्वितीय संमेलन १९७८ (स्मारिका),श्री रामंदिर हनुमान गढी **उज्जैन (म.प्र.)**

अध्यक्ष :- श्री खेमचंद भाई पाटीदार, मशिनरी स्टोअर्स, मनावर जिल्हा धार, सचिव श्री. राजारामजी पाटीदार, (बी.एस्स.सी.), ५ अशोक नगर, उज्जैन, म.प्र.

४९) **आपले लेवा परिवार मराठी त्रैमासिक**

अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळाचे त्रैमासिक मुखपत्र, संपादक- महेंद्र ओंकार राणे, बी/३, रविकिरण, म.फुले मार्ग, मुलुंड (पूर्व) ४०००८१, वर्गणी २५१.

लेवा पाटीदार संघटन संस्था क्रमांक ५०.

लेवा पाटीदार मित्र मंडळ, सांगवी परिसर, पुणे २७. पत्ता :- लेवा पाटीदार मित्रमंडळ सांगवी परिसर, पुणे २७ या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष- डॉ. एस्.जी. पाटील (दुधलगावकर)M.Sc. Ph.D.,२ घर नंबर ९३, सर्वे नंबर १६, गल्ली नंबर ३, मधुबन, सांगवी, पुणे ४११०२७ (महाराष्ट्र), एस.टी.डी. ०२१२, फोन नंबर ७२०५५१ हे असून संस्थापक सचिव, टी.एम्. फिरके, माध्यमिक

शिक्षक, ढोरे नगर, सांगवी, पुणे - ४११०२७, शिक्षक, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन प्रशाला बोपोडी, पुणे - ३ हे आहेत.

लेवा पाटीदार भ्रातृमंडळ, पुणे हे शहराच्या व्यापाचे मानाने बरेच लांब पडते. सुदर्शन नगर, कवडेनगर, नवी सांगवी, जूनी सांगवी, ढोरे नगर हा पुणे शहराचा पिन कोड, क्रमांत २७ चा परिसर स्थानिक लेवा पाटीदार संघटन संस्था काढावी या गरजेतून एकत्र आला. लेवा पाटीदार भ्रातृमंडळ पुणे येथे सायंकाळी कार्यक्रम आटोपून जाण्या-येण्यात दिवस जातो. बस व रिक्षादी भाडे साधारणत: ३० रु. जाणे-येण्याचे पडून वेळेवर बसेस नगरातून पुरेशा नाहीत. वेळेचा अपव्यय होतो. आदी बाबींमुळे शहरात एक केंद्रिय लेवा पाटीदार संस्था असूनही डॉ. एस्.जी. पाटील, श्री. एम.के. बोरोले, श्री.पी.के. भंगाळे, श्री. टी.एम्. फिरके इत्यादी कार्यकर्त्यांनी वरील संस्था ता. १३ मार्च १९९७ रोजी स्थापन केली. या संस्थेने ता. ३ ऑगस्ट १९९७ रोजी नृसिंह हायस्कूल सांगवीत गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांचे पालकांचा सत्कार समारंभ, ता ९-११-९७ ला सुमारे ३०० सभासदांचा रविवारी एक स्नेह भोजन मेळावा आयोजित करून बापले, भाजी-वरणभात जेवणाचा कार्यक्रम सहविचारक भेटीसाठी, ओळख परिचयार्थ ठेवला होता. ही बाल्यावस्थेतील संस्था जगविण्यास बरेच श्रम, कार्यकर्ते, पैसा असल्यास भावी काळात भराराटेत.

५१) **भोरगाव लेवा पंचायत, मलकापूर विभाग, युवक-युवती मंडळ** - या मंडळाचे विभागीय अध्यक्ष, श्री. अनिल झोपे यांनी भोरगाव लेवा पंचायत मलकापूर विभागाच्या अंतर्गत युवक युवती मंडळातर्फे समाजातील विवाहेच्छुक युवक-युवतींची सूची प्रकाशित करण्याचा ता. १५ ऑगस्ट ९७ते ३०-११-९७ पर्यंत तालुका निहाय केंद्रे नियोजित करून मलकापूर, नांदुरा, मोताळा, बुलढाणा, एदलाबाद, बोदवड आदी ठिकाणाहून वधू-वर परिचय पत्रिका भरून त्या माहितीचे आधारे सर्व नोंदणी केंद्रावर तसेच, मलकापूर विभागातील प्रत्येक गाव प्रमुखाकडे व बाहेरच्या सर्व सामाजिक मंडळाकडे माहिती व उपयुक्त कार्यवाहीस्तव विनामूल्य वितरीत करण्याच्या हेतूने कार्याची आखणी करून कार्यारंभ सुरू केला आहे.

सदर सूची प्रकाशन सन १९९८ चे प्रारंभी जानेवारीचे १ ले आठवड्यात मलकापूर भ्रातृमंडळात करण्याचे घाटत आहे.

५२) **चैतन्य प्रकाशन संस्था, मुक्काम पोस्ट - दुधलगाव,** बुद्रूक, ता. मलकापूर, जिल्ह - बुलढाणा (महाराष्ट्र) पिन - ४४३१०१, एस.टी.डी. क्रमांक (०७२६७) फोन नंबर ५२०२५ हा आहे.

ही संस्था मुंबई-भुसावळ-मलकापूर-नागपूर-कलकत्ता ह्या ब्रॉडगेज रेल्वे मार्गावरील सेंट्रल रेल्वेवर मलकापूर रेल्वे स्टेशनपासून १३ किलोमीटर अंतरावर बारमाही पक्क्या सडकेने जोडलेल्या दुधलगाव बुद्रूक ह्या गावी आहे.

इ.सन १८६७ पासून वहातुकीस खुला केलेल्या ह्या रेल्वेमार्गाचे सन १९१८ ते २२ मध्ये दुहेरीकरण झाले. मुंबईहून ४९५ किलोमीटर अंतरावर मलकापूर रेल्वे स्टेशन आहे व मलकापूरहून ५२ किलोमिटरवर म्हणजेच मुंबईहून ५४७ किलोमीटरवर संत गजानन महाराजांचे शेगाव हे प्रसिद्ध समाधिस्थान आहे.

तसेच, मुंबई-धुळे-मलकापूर-अकोला-अमरावती-वर्धा-नागपूर -कलकत्ता ह्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर नागपूरपासून पश्चिमेस २३९ मैलावर मलकापूर बस स्थानक आहे.

ह्या रस्त्यावरून फाकणारा मलकापूर ते जालना ते उस्मानाबाद ते सोलापूर हा प्रमुख राज्य मार्ग जातो. त्यावरून मलकापूराहून २४ किलोमीटरवर मोताळा, ४५ किलोमीटरवर बुलढाणा, ६८ किलोमीटरवर चिखली, १०६ किलोमीटरवर देऊळगाव मही, १२३ किलोमीटरवर देऊळगाव राजा ह्या बुलढाणा जिल्हयातील गावावरून मराठवाड्यात हा राज्य मार्ग जातो.

बुलढाणा जिल्हयातील प्रमुख २५ जिल्ह्यांमार्गापैकी मलकापूर ते बोदवड हा प्रमुख जिल्हामार्ग

मलकापूर ते मोताळा ते बुलढाणा ते जालना ते सोलापूर ह्या राज्यमार्गावर मलकापूरच्या दक्षिणेस सुमारे एक किलोमीटर अंतरावरून पश्चिमेस नळगंगा नदी ओलांडून धावतो.

अशा ह्या फाकलेल्या मलकापूर ते बोदवड ह्या प्रमुख जिल्हा मार्गावरून सुमारे ५ किलोमीटर अंतरावर दक्षिणेकडे धावणारा मलकापूर ते पिंपळगावदेवी हा १९.९० किलोमीटर लांबीचा प्रमुख जिल्हा मार्ग थेट पिंपळगावदेवीपर्यंत जातो. की जेथून जळगाव जिल्हयाची हद्द फक्त दोन मैल चार फर्लांग अंतरावर रहाते.

अशा ह्या मार्गाने मलकापूरपासून तेरा किलोमीटर अंतरावर दुधलगाव बुद्रूक हे २००० लोक वस्तीचे खेडेगाव आहे. मलकापूरहून पक्क्या सडकेवर बाराही महिने वाहतुकीने जोडलेले दुधलगाव आहे. साडेतीन रुपये बस भाडे देऊन किंवा पाच रुपये दरडोई ॲटोरिक्षा भाडे देऊन तेथे जाता येते. दर तासाने एस.टी. बस मिळते.

असे हे दुधलगाव, मलकापूर बस स्थानक तथा मलकापूर रेल्वे स्टेशनशी असे जोडले गेल्याने जणू मलकापूरचे उपनगरच वाटते, इतके ते जवळ आहे. अशा ह्या मलकापूरच्या (जणू) उपनगरात श्री. शंकरा विठोबा पाटील दुधलगावकरांनी एक लाख रुपये खर्चून संदर्भ साहित्य जमविले आहे. तेथे इतिहास संशोधनार्थ एक संशोधन केंद्र कार्यरत केले आहे. त्या संशोधन केंद्रात कुर्मी उर्फ कुणबी जातीचा, तिच्या लेवा पाटीदार ह्या पोटजातीचा व विशेषत: त्यातील मराठी भाषिक लेवा पाटीदार शाखेचा, तिच्या सावदेकर, गाडेगावकर, कंडारकर, थोरगव्हाणकर आदी उपशाखेसह इतिहास संशोधित केला जातो.

या जातीचा इतिहास व ह्या जातीतील संत परंपरांच्या संशोधनार्थ श्री. शंकर विठोबा पाटील दुधलगावकर यांनी सहकुटुंब भारतभ्रमण केले. चार धाम बारा ज्योर्तिलिंगे, पंचनाथ, हिमालयातील पंचप्रयाग, गंगासागरादी महातीर्थे, महाराष्ट्रातील अष्टविनायक स्थाने, सप्त महापुऱ्या, भारतातील सप्त महानद्यातीरींची तीर्थस्थाने आदी स्थळी प्रत्यक्ष गेलो. संबंधित पंथ, संत, ग्रंथ यांचा शोध घेत गेलो. तसेच, यासंबंधीच्या स्मरणिका, मार्गदर्शिका, चरित्रे, इतिहासाची बाडे अवलोकिलीत. त्यासाठी ज्येष्ठ संशोधक, लेखक, कीर्तनकार, यात्रेकरू, प्रवचनकार आदींचे मार्गदर्शन घेतले, कीर्तने, प्रवचने, व्याख्याने यांच्या ध्वनिफिती खरीदल्या. मातृगयादी तीर्थे, ऐतिहासिक स्थळे, आश्रम, गड, किल्ले हिंडून माहिती मिळविली. संत, पंत, महंत, विचारवंत यांची दर्शने घेतली. आशीर्वाद घेतले, मुलाखती घेतल्या. बगलेतील शबनममध्ये निरनिराळे नकाशे, प्रवासी डायऱ्या, हाती दुर्बीण, गळयात कॅमेरा, खिशात पेन व लेटर पॅड आदी सामुग्रीसह अटीतटीचा प्रयत्न करून जास्तीत जास्त पुरावे धुंडाळत अशी तीळतीळ जी माहिती जमविली; त्यांची कालखंडवार छाननी केली. नंतर यथायोग्य जुळणी केली. महाप्रयासाने कालसूच्या तयार केल्यात, त्याआधारे मार्ग काढीत-काढीत बुद्धिवादी विचारसरणीचा आश्रय करून या इतिहासाचे संशोधन व संकलनार्थ काश्मिर ते कन्याकुमारी व द्वारका ते जगन्नाथपुरीपर्यंत भारतभ्रमण करून संशोधन कार्य केले. त्या भारतभ्रमंतीचा इतिहास **"तीर्थरूप भारत दर्शन"** या नावाने लिहून पुण्याचे द्वारका प्रकाशन द्वारे तो सन १९९० साली प्रसिद्ध केला.

त्यानंतर कुणबी, माळी, तेली, तांबोळी आदी बहुजनांचा वारकरी पंथ ह्या उपासना मार्गावरील संत परंपरा संशोधिल्या. त्यापैकी लेवा व मराठा कुणब्यांच्या संत परंपरा निवडून त्या 'वारकरी पंथाची चैतन्य संप्रदाय परंपरा' ह्या नावाने ग्रंथरूप करून तारीख १५-२-१९९२ ला त्या प्रसिद्ध केल्या. त्या ग्रंथाला मराठीच्या आद्य सारस्वताचे संशोधक, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू, कुणबी कुलभूषण, परिणतप्रज्ञ व प्रथितयश विद्वमान्य ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यिक, श्रद्धेय गुरुवर्य पद्मश्री डॉ. वि.भि. उपाख्य भाऊसाहेब कोलते यांची बहुमोल प्रस्तावना लाभली आहे.

त्यानंतर बहुसंख्य लेवा पाटीदारांना आवडणाऱ्या 'वारकरी पंथाचा इतिहास' दुधलगावच्या या संशोधन

केंद्रात संशोधित करून तारीख १४ मार्च १९९५ ला प्रसिद्ध केला. त्याला मराठी साहित्याचे गाढे अभ्यासक, थोर साहित्यिक, औरंगाबादचे डॉ. यू.म. पठाण यांच्या वाङ्मय तपस्येतून लाभलेली बहूमोल प्रस्तावना लाभली आहे.

आणि आता अशा ह्या कूर्मी उर्फ कुणबी जातीचे, तिच्या लेवा पाटीदार ह्या पोटजातीचे व त्यातील मराठी भाषिक शाखा व उपशाखांच्या इतिहासाचे साधार, साद्यंत व सविस्तर संशोधन करून तो प्रसिद्ध करण्याची या संशोधन केंद्रात अहोरात्र धडपड चालते. **अशा पैशाचे दृष्टीने अनुत्पादक बाबीकडे लक्ष द्यायला ज्येष्ठ व श्रेष्ठ विद्वत्जनांना फुरसद नाही. गडगंज संपत्ती कमवण्याचा हव्यास असलेल्या धनवानांना त्यात सहभाग घ्यावासा वाटत नाही. म्हणून नाईलाजाने एकांडे शिलेदार वृत्तीने समाजसेवा हीच ईश्वरसेवा या भावनेने अहर्निश या ठिकाणी जे इतिहास संशोधन चालते, अद्याप त्याला कोणाची भारघोस मदत मिळाली नाही. किंवा त्याचे समाज बांधवांकडून भरघोस कौतुकही झाले नाही तरी, कष्टाने व निष्ठेने पराकाष्ठेचा प्रयत्न करून ते श्रेष्ठ कार्य करण्याचा या संशोधन केंद्राने जो चंग बांधला आहे** त्याचे कनिष्ठांपासून तर ज्येष्ठांपर्यंत स्वागत व्हावे या उद्दिष्टाने विनम्र भावनेने हा इतिहास आपल्यासमोर सादर करीत आहे.

हे कार्य करीत असताना सौ. लक्ष्मीबाई शंकर पाटील दुधलगावकरांनी भारतभर भ्रमंतीत बहुमोल साथ दिली. एवढेच नाही तर पैशाचे अभावी हे संशोधन कार्य बंद पडले, तेव्हा **हे समाजकार्य थांबू नये म्हणून सौ. लक्ष्मीबाई पाटीलांनी आपले सोन्याचे दागिने मोडून सहकार्य केले त्यामुळेच हे संशोधनकार्य येथपर्यंत आले.** पण त्यांना आता कॅन्सरचा दुर्धर आजार झाला. सन १९९७ मध्ये एका वर्षात त्यांचेवर पुण्याचे के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये तीन वेळा प्रदीर्घ शस्त्रक्रिया करण्यात आल्याने पुढील संशोधन कार्य पैशाचे अभावी थांबले. लेवा पाटीदारांची आकडेवार माहितीची कोष्टके व विविध नकाशे तयार करण्याचे त्यामुळे राहून गेले. शेवटी अपूर्ण का होईना पण झालेला संशोधित इतिहास प्रसिद्ध करीत आहोत. सौ. लक्ष्मीबाई च्या ह्या दुर्धर आजारामुळे संशोधित माहितीची छाननी, योग्य जुळवणी करून उठावदार मांडणी करण्यासाठी आता मनाची एकाग्रता होऊ शकत नाही. म्हणून ह्या साहित्याचे आधारे कोणी एका संशोधकाने त्यावर प्रक्रीया करून लेवा पाटीदारांचा उत्कृष्ट इतिहास लिहावा. एवढ्यासाठीच अकस्मात चालून आलेल्या आपत्तीतही हा समाजोपयोगी उपक्रम आपल्यापुढे सादर करीत आहे. त्यातील असंख्य त्रुटी माहित असूनही चित्ताचे एकाग्रतेवाचून त्या त्रुटी भरून काढता येत नाहीत म्हणून दिलगिरी व्यक्त करतो.

५३) **भ्रातृमंडळ, अकोला (विदर्भ)** : पत्रव्यवहाराचा पत्ता - अध्यक्ष, भ्रातृमंडळ, अकोला ५, प्रभा ले आऊट, शास्त्रीनगर, दुध डेअरीचे मागे, अकोला ४४४००१.

इ.सन. १९५६ ते १९५८ च्या दरम्यान अकोला शहरात नोकरी धंदा व शिक्षणाचे निमित्ताने लेवा समाजातील साधारण १०० ते १२५ लोक रहात असत.

दिनांक १५/८/१९५८ श्री.वासुदेव रामचंद्र नारखेडे (झोडगेकर) पोलीस प्रासिक्युटर यांचे पुढाकाराने 'लेवा मित्र मंडळाची' स्थापना झाली.

मंडळाचे पहिले अध्यक्ष डॉ. एन. एन. भोळे हे होते. सन १९६८ साली कैलास गृहनिर्माण संस्थेत मंडळासाठी ३००० चौरस फुट प्लॉट विकत घेतला. पण सदरप्लॉट लहान होईल असे मंडळास वाटले. म्हणून तो प्लॉट विकून ता. ६-१०-१९७७ रोजी प्रभा ले आऊट दूध डेअरीचे मागे ५६०० चौरस फूट क्षेत्रफळाचा नवीन प्लॉट विकत घेतला.

डिसेंबर १९७६ मध्ये भ्रातृमंडळ नागूपर ह्या समउद्देशीय मंडळाशी सुसंवाद साधण्याचे हेतुने 'लेवा मित्र मंडळ' हे नाव बदलून "भ्रातृमंडळ अकोला" असे नामकरण करण्याचा निर्णय कार्यकारी मंडळाने मंडळाच्या आमसभेत घेतला.

ह्या मंडळाचे अध्यक्ष श्री. ज्ञानेदव निनु पाटील उपाख्य नानासाहेब पाटील व सचिव श्री. वासुदेव

रामभाऊ भंगाळे रुईखेडकर ह्यांचे कार्यकालात भ्रातृमंडळाची आर्थिक उन्नती करण्यासाठी चॅरिटी शोद्वारे पैसा मिळविल्यामुळे भ्रातृमंडळाची आर्थिक स्थिती मजबूत झाली. त्यामुळे मंडळ स्वत:चे जागेवर बांधकाम करण्याचे मार्गावर आहे.

नुकतीच या मंडळाची नवीन निवडणूक होऊन श्री. दिनकरराव नाकडे तळणीकर व त्यांचे सहकारी निवडून आले. भावी सूत्रे त्याचे हाती येत आहेत.

५४) **राष्ट्रीय एल.पी. समाजसेवा फाउंडेशन, पुणे,** या प्रतिष्ठान तर्फे डॉ. भाऊसाहेब वि.भि. कोलते यांचे स्मरणार्थ, राष्ट्रमित्र पुरस्कार १९९८, दिला जाईल. साहित्य, न्यायदान, पोस्ट, कामगार चळवळ, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक उल्लेखनीय कार्यकर्त्यास पुरस्कार मिळू शकेल. दोन फोटोसह सामाजिक कार्याची फाईल व अर्ज २० दिवसाचे आत पाठवावा.

पत्ता :- १. एस.डी भोळे,धनकवडी, ३७/४, एस.एस. एंटरप्रायझेस पुणे, दूरध्वनी ५२२२०२, ५७७५००, २. कृष्णा त्र्यंबक खडसे, (एल.पी.एस.एफ), सुदर्शन नगर, पिंपळे गुरव, पुणे २७, ३. स्व. डॉ. मणिभाई देसाई, प्रतिष्ठान, उरळी कांचन, म. गांधी रोड, फोन नं. ८१६७८१.

प्रकरण २३

लेवा पाटीदारांचे सांस्कृतिक योगदान

लेवा पाटीदारांची साहित्य सेवा :

लेवा पाटीदारात साहित्यिक जन्मलेत, पण साहित्य संघटनेस लेवा पाटीदार समाजात स्थान नाही. लेवा पाटीदारांची साहित्य सेवा, लक्षणीय असली तरी, साहित्य संघटनेच्या दृष्टीने लेवा समाज संघटना वांझ आहेत. डॉ. कोलते ,भालचंद्र नेमाडे, बहिणाबाई आदि श्रेष्ठींचेही तिकडे फारसे लक्ष गेले नाही. जळगाव जिल्ह्यात सुकी, गुळी, खडकी, वाघूर, तितूर, पूर्णा, भोर, भोगावती, रानावती, अंजनी, अनेर व गिरणा ह्या तेरा नद्या तापी व तिची उपनदी गिरणात येऊन मिळतात. चोपडा, यावल, रावेर, भुसावळ, एदलाबाद, जामनेर, अमळनेर, पारोळा, भडगाव, चाळीसगांव, एरंडोल, जळगाव, पाचोरा असे तेरा तालुके जळगाव जिल्ह्यात आहेत. येथे बारा विधान सभा मतदार संघ दोन लोकसभा मतदार संघ आहेत. रामायणाचे आद्य लेखक वाल्मिक ऋषी चाळीसगाव जवळ वालझरी येते राहात असत. चोपडे तालुक्यात अडावदपासून तीन मैलांवर उपनदेवचे उष्ण झरे प्रसिद्ध आहेत. एरंडोलला पांडव काही काळ राहिलेत. पद्मालयात भीमाने येथेच बकासुराचा वध केला. कानळद्याचा कण्वाश्रम, व्यासाची समाधी अशा ह्या पावन परिसरात श्रीराम अत्तरदे, 'आत्मोद्धार' ह्या प्रागतिक साप्ताहिकाचे संपादक- सीताराम नाना चौधरी, 'बातमीदार' साप्ताहिकाचे संपादक- श्री. वि.चा. नेहतेमास्तर, 'जागृति' चे संपादक- भागवतराव चौधरी, सर्वात महत्त्वाचे म्हणजे मराठी काव्याचे क्षेत्रात एक चमत्कार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, स्वत: निरक्षर असून ग्रामीण बोलीतील रसाळ कविता लिहिणाऱ्या निसर्गकन्या कवयित्री बहिणाबाई या जळगावच्याच. जळगावपासून सहा किलोमीटर अंतरावरील असोदा हे माहेर व जळगाव हे सासर होते. श्रेष्ठ मानवी मूल्याचा संदेश अतिशय सोप्या भाषेतून देणारी कविता निसर्गकन्या बहिणाबाईंनी याच परिसरात लिहिली. बहिणाबाईंची कविता आज महाराष्ट्रातील घराघरातून सर्वतोमुखी झालेली आहे असे ५८ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन, जळगाव ता. २८,२९ व ३० जानेवारी १९८४ च्या 'गौराई' या स्मरणिकेत, स्मरणिका समितीतर्फे प्रसिद्ध केलेल्या 'जळगाव जिल्ह्याची साहित्य परंपरा' ह्या लेखात, पृष्ठ ६ वर दिले आहे.

बहिणाबाई ज्ञानविकास संस्था, जळगाव तर्फे बहिणाबाई व सोपानदेव चौधरी विशेषांकात 'शहाणा कागद' संपादक- पुरुषोत्तम नारखेडे उर्फ मालतीकांत- जळगाव व प्रभाकर आनंदा पाटील अहमदाबाद यांनी ता. २९ नोव्हेंबर १९९३ ला प्रसिद्ध केलेल्या अंकात, पृष्ठ ७१ वर बहिणाबाईंचा जन्म नागपंचमी, सन १८८० व स्वर्गवास ता. ३ डिसेंबर १९५१ हा दिला आहे. पाटीचाही संस्कार नसलेल्या ह्या पाटीदार कवयित्रीने काव्यक्षेत्रात पट्टीचे स्थान पटकावले. हिच्या पोटी १६ ऑक्टोबर १९०७ मध्ये कविवर्य सोपानदेव चौधरी या महाराष्ट्र कोकिळाचा असोदा येथे जन्म झाला. सन १९५२ साली त्यांच्या कवितांची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली. त्यांच्या वयाच्या तिसाव्या वर्षी त्या विधवा झाल्या. त्यांना ओंकार व सोपान या नावाची दोन मुले होती. बहिणाबाईचे लग्न प्रसंगी वय १३ वर्षाचे होते. त्यांचे पती नथु चौधरी सन १९१० साली वारले.

बहिणाबाईंना आचार्य प्र. के. अत्रे यांनी प्रकाशात आणले. तसेच, नांदुऱ्याचे उदयोन्मुख साहित्यिक- कृष्णकुमार कोलते यांचेही आचार्य अत्र्यांनी मनापासून कौतिक केले होते.

"ग्रामीण जीवनाचे अनुभव अत्यंत समर्थपणे आपल्या कथा, कांदबऱ्यांतून व कवितांमधून घडविणारे के. नारखेडे या लेवा पाटीदार समाजातच भुसावळ येथे होऊन गेले. त्यांच्या 'आनंदवन' व 'जलवंती' या मुलासाठी लिहिलेल्या कांदबऱ्यांना राज पुरस्कार लाभलेला आहे. त्यांची 'अंजनी' ही प्रादेशिक भाषेतील कादंबरी व 'शिबार' हा काव्यसंग्रह रसिकमान्य झालेला आहे. ('गौराई', पृष्ठ ७ पहा).

अतिशय तालबद्ध व लयबद्ध रचना करणारे बहिणाबाईचे सुपुत्र कवि सोपानदेव चौधरी यांचेही नाव महाराष्ट्राला सुपरिचित आहे. तसेच, श्री. तु.बा. बेंडाळे हे कवी, वयोवृद्ध लेखक मि.द. फालकांनी लहान मुलासाठी तसेच, प्रौढ माणसांसाठी काव्य, नाटक, चरित्रलेखन केले.

तसेच, कवी राजा महाजन, भालचंद्र नेमाडे जळगाव जिल्ह्यातच झाले. श्री. भालचंद्र नेमाडे यांचे टीका 'स्वयंवर ग्रंथाची' महाराष्ट्रात प्रसिद्धी गाजली. पुरस्कार मिळाले. कसदार काव्यलेखन केलेले भानु चौधरींचा 'अंधार योगी' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. डांभूर्णीचे गणेश चौधरींच्या 'तृषार्त' ह्या काव्य संग्रहाला 'केशवसूत' पारितोषिक मिळाले. पद्मावती जावळे, पुंडलिक नेमाडे, प्रमिला भिरुड, पुरुषोत्तम नारखेडे, मि.भु. भोळे, स्नेहलता चौधरी उर्फ कुसुमताई चौधरी, वि.भा. नेमाडे यांचा 'आकाश तंद्री' हा काव्यसंग्रह, कवी भानु चौधरींनी लिहिलेले 'कर्मयोगी' हे धनाजी नानांचे चरित्र लक्षवेधी ठरले आहे. कवी गणेश चौधरींच्या 'सूर्य मध्यरात्रीचा' व इतर एकांकिका हा संग्रह प्रसिद्ध झाला. रहस्यकथाकार दिवाकर नेमाडे, 'कोसला' कार भालचंद्र नेमाडे हे मराठीचे आघाडीचे कांदबरीकार व समीक्षक म्हणून ओळखले जातात. श्रीराम अत्तरदेची 'साऊलीच्या उन्हात' ही कांदबरी, डॉ. रु.गो. चौधरी, प्रकाश फेगडे, डॉ. तो.ना. चोपडे, बाळासाहेब मधुकरराव चौधरी, के.जी. झांबरे हेही साहित्य क्षेत्रात कार्य करून गेले.

'शेतीनिष्ठ' बहुमान मिळविणाऱ्या शेतकऱ्यांत बिनीचे शेतकरी श्री. तुकाराम हरी पाटील दाताळकर यांना १९६७ साली शासकीय पुरस्कार मिळाला होता. त्यांच्या बुलढाणा जिल्ह्यातही वाङमय क्षेत्रात लेवा पाटीदारांनी मानाचे योगदान दिले आहे.

आद्य मराठी भाषेतील महानुभाव वाङ्‌मयाचे संशोधक, मराठी साहित्यातील भीष्माचार्य पद्मश्री- डॉ. वि.भि. कोलते यांनी भोपाळला सन १९६७ साली अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भुषविले होते. मला वाटते अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे लेवा पाटीदार समाजातील अध्यक्षपद भूषविलेले ते एकमेव मराठी साहित्यिक होय. डॉ. वि.भि. कोलते नरवेलकरांचा जन्म २२ जून १९०८ ला नरवेल, ता. मलकापूर, जिल्हा बुलढाणा (विदर्भ) येथे एका शेतकरी कुटुंबात झाला. शिक्षण एम.ए. (१९३१), एल्.एल्.बी. (१९३१) पीएच.डी. (१९४८), डी.लिट्‌ (१९९४) हे मराठीचे प्राध्यापक १९३१ ते ५६, प्राचार्य १९५६ ते १९६६ कुलगुरू

नागपूर विद्यापीठ सन १९६६ ते १९७२. पद्मश्री भारत सरकार (१९९१), मुख्य अतिथी दीक्षांत समारंभ नागपूर विद्यापीठ (१९८३) जागतिक मराठी परिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनात गौरव (१९९४), अशा ह्या महाराष्ट्र शारदेच्या सुपुत्राने २० ग्रंथ लिहिलेत व १५ ग्रंथांचे संपादन केले आहे. प्रस्तुत ग्रंथ लेखकाच्या 'चैतन्य संप्रदाय परंपरा' ह्या ग्रंथाला त्यांची बहुमोल प्रस्तावना लाभली असून ती त्यांच्या सन १९९३ मध्ये प्रकाशित झालेल्या 'धन्यतेची थाप' ह्या प्रस्तावना संग्रहाद्वारे साहित्य रसिकांसमोर परत अवतरली आहे. असे डॉ. कोलते हे पुरोगामी वृत्तीचे, खंदे संशोधक, अग्रणी रसिक लेवा पाटीदार बुलढाणा जिल्ह्यात जन्मलेत हे या जिल्ह्याचे व लेवा समाजाचे महान भाग्य होय.

विदर्भाची बहिणाबाई म्हणून प्रसिद्ध असलेल्या मलकापूरस्थ कै. रुक्मिणीबाई तुकाराम पाटील दाभाडीकर या निरक्षर कवीयत्रीची निसर्गदत्त कवित्त्वशक्ती होती. त्यांचा 'रुक्मिणीगान' हा काव्यसंग्रह प्रा. रा.का. कोलते यवतमाळ यांनी संपादित केला आहे. या कवयित्रेचे संपूर्ण चरित्र बहिणाबाई ज्ञानविकास संस्था जळगाव व बहिणाबाई व सोपनादेव चौधरी विशेषांक- 'शहाणा कागद' संपादक- पुरुषोत्तम नारखेडे, पृष्ठ १६ वर 'विदर्भाची बहिणाबाई रुक्मिणीबाई पाटील, लेखक- शंकर विठोबा पाटील दुधलगावकर यांनी लिहिले आहे, व साप्ताहिक 'सत्यनिष्ट' दीपावली विशेषांक १९९३/९४ च्या अंकात वैदर्भीय बहिणाबाई सौ. रुक्मिणीबाई पाटील, लेखक - शंकर विठोबा पाटील दुधलकराचा लेख पहा.

शंकर यादव नेमाडे व रामचंद्र कृष्णाजी चोपडे शेलगावकरांनी विपूल शालोपयोगी लेखन केले आहे. हेही बुलढाणा जिल्ह्यातील लेवा पाटीदार होत. धरणगाव जिल्हा बुलढाणा येथील श्री. ना.गो. खडसे ऊर्फ कवि नागेश यांची 'गंधरेखा' ही काव्यपंक्ती प्रसिद्ध झाली आहे. श्री. मनोहर शंकर नेमाडे हे कथाबरोबर सिनेमाची परिक्षणेही लिहितात.

नरवेलचे डॉ. रमाकांत काशीनाथ कोलते हल्ली मुक्काम यवतमाळ, यांचा 'नलगे वैकुंठ' हा ग्रंथ वाचनीय आहे.

नागपूरचे डॉ.भा.ल. भोळे, तळणीचे डॉ. राम खर्चे हेही विद्वान ग्रंथ लेखक सरस्वतीचे दरबारात बसले आहेत. डॉ. खर्चेसाहेबांचा 'स्ट्रॉबेरी' हा ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला आहे.

प्रस्तुत ग्रंथ लेखक शंकर विठोबा पाटील दुधलगावकर, जन्म ता. ९-११-१९२६ यांनी सन १९९० मध्ये 'तीर्थरूप भारत दर्शन' हे प्रवासवर्णन, २. सन १९९२ मध्ये वारकरी पंथाची चैतन्य संप्रदाय परंपरा (साद्यंत झेंडुजी बेळीकर शाखा), ३. सन १९९५ मध्ये 'वारकरी पंथाचा इतिहास' (कालसूचीसह) हे तीन ग्रंथ लिहून प्रकाशित केले. व प्रदीप हे नागपूर विद्यापीठ प्रशिक्षण महाविद्यालयाचे वार्षिक सन १९६१/६२, भोरगाव लेवा पंचायत स्मरणिका सन १९८५ या दोन नियतकालिकांचे संपादन केले. व महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेच्या बुलढाणा जिल्हा स्तरीय निबंध वाचन स्पर्धा १९८१-८२ मध्ये पारितोषिक विजेत्या निबंधाचे लेखन केले आहे. तसेच, मासिकातून केलेले स्फूट लेखन व काव्य लेखनही प्रसिद्ध केले आहे. आणि जिज्ञासू व वाचकांच्या सेवेसाठी प्रस्तुत लेवा पाटीदारांचा इतिहास (संशोधन) प्रसिद्ध करीत आहे. यामुळे नुकताच ता. २७ डिसेंबर १९९७ रोजी पुण्याचे विमल विद्याकुंज सभागृह, वारजे, पुणे येथे आयोजिलेल्या लेवा पाटीदार समाजातील कार्यकर्त्यांचे राष्ट्रीय अधिवेशनात मा. टी.के. चौधरी, सह. आयुक्त पोलिस (प्रशासन) मुंबई यांचे अध्यक्षतेखाली सदर अधिवेशनाचे प्रमुख पाहुणे लेवा पाटीदार समाजातील तरुण, कर्तबगार आणि लोकप्रिय समाजसेवक मा. नामदार श्री. एकनाथरावजी खडसे, पाटबंधारे मंत्री, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे हस्ते **'इतिहासकार व थोर समाजसेवक'** म्हणून पुष्पगुच्छ, श्रीफल व स्मृतिचिन्ह देऊन पुण्याचे भ्रातृमंडळाने 'मान्यवरांचा सत्कार' ह्या कार्यक्रमात श्री. शंकर विठोबा पाटील यांचाही सत्कार केला.

शेंब्याचे श्री. सोपान विष्णुपंत सुपे यांनी शेती विषयावर लेखन केले आहे. तसेच, दुधलगावकर डॉ. सुपडा गोविंद पाटील यांचा एक विज्ञानविषयक उत्तम लेख माझ्या नुकताच वाचण्यात आला.

नांदुऱ्याचे अकाली मृत्यू पावलेले प्रतिभावान साहित्यिक कृष्णकुमार कोलते यांच्या लेखनाची आचार्य प्र.के. अत्र्यांनीसुद्धा कौतुकाने दखल घेतली होती.

नांदुरा येथील डॉ. ज.ह. फिरके यांचे 'दहा,दोन,तीन' हे पाक्षिक, ह.भ.प. रामचंद्र गोपाळ पाटील नांदुरेकरांची संपादित पुस्तके माझे संग्रही आहेत. झोडगेकर श्री. नारखेडे यांनी पोलीस कायद्यावर एक उत्कृष्ठ ग्रंथ प्रकाशित केल्याचे ऐकले आहे.

याशिवाय मुंबईचे राम नेमाडे, जळगावचे साहित्यिक व उद्योजक श्री. अरुण श्रीपत नारखेडे साळवेकर यांनी कादंबरी, काव्य क्षेत्रात लेखन केले. प्रभाकर आनंदा पाटील तळवेलकर, हल्ली मुक्काम अहमदाबाद हे पत्रकार क्षेत्रात लेखन करतात. इंदौरचे निवृत्त पोलीस निरीक्षक श्री. वासुदेवराव पाटील यांचे स्फुट लेख. श्री. महेंद्र ओंकार राणे-संपादक, 'आपले परिवार', देवराम सखाराम बऱ्हाटे पाडळशेकर, दामोधर कौतिकराव राणे, निळकंठराव एस. पाटील, संपादक- जनसेवक जळगाव, लेवा पाटीदार समाजातील रुढीनुसार अंत्येष्टीविधी वरील श्री. यशवंत गोविंदराव पाटील यांचा ग्रंथ हे साहित्य प्रसिद्ध आहे. श्री. देवराम नारखेडे साळवेकरांनी १९७२ च्या स्वातंत्र्य दिन रौप्य महोत्स्वी स्मरणिकेतील स्वातंत्र्य लढ्यातील जळगाव, जिल्हा, विस्तार भयास्तव थांबतो अशी थाप मारण्याऐवजी मी एका एकाकी खेड्यात हल्ली पुरेसे संदर्भग्रंथ नसलेल्या जागी दुधलगावला सेवानिवृत्त जीवन जगत आहे. तिथे मी उर्वरित साहित्यिकांची माहिती मिळवू शकलो नाही. म्हणून मला येथे थांबावे लागत आहे. तरी लेवा पाटीदारांच्या कोण्या एका भाग्यवंताने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातून संदर्भ सहाय्य व मार्गदर्शन घेऊन संपूर्ण लेवा पाटीदार समाजातील साहित्य व साहित्यिकांचा इतिहास संशोधनपूर्वक साद्यंत व सविस्तर लिहिल्यास तो समाजाला मोठा उपयुक्त ठरेल. पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्यभावी काल, ह्या दृष्टीने ती लेखन परंपरा पुढे नेण्यासाठी प्रेरणादायी ठरेल. यासाठी कोणाही विद्यापीठातून आचार्य, प्राचार्य, भट्टाचार्य, प्रभट्टाचार्य यांनी याबाबत प्रेरणा व मार्गदर्शन देऊन प्रबंध लेखन घडवून आणल्यास ती एक मोठी समाजसेवा घडेल किंवा कोण्या भ्रातृमंडळानेही ही त्या दिशेने अद्याप शुभारंभ केला नाही तो जरूर करावा, असे म्हटल्यास अनाठायी होणार नाही.

लेवा पाटीदाराची समाजसेवा :- लेवा पाटीदार समाजात समाजसेवेचा दुथडी भरून वाहणारा प्रवाह नाहीच. तरी पण तो थोडासा अपवादात्मक झूळझूळता प्रवाह आहे त्याचा उगम भोरगाव लेवा पंचायत या संघटनेने लेवा समाजातील लोकास लोकसेवेचे पहिले वहिले धडे दिले. त्यांच्या सर्व ठायांच्या कुटुंबनायक व सचिवांची सर्व परंपरा पूर्वी दिलीच आहे. त्या व्यतिरिक्त समाजसेवक धनाजी नाना चौधरी खिरोदा, सीताराम नाना चौधरी, समाजसेवक मधुकरराव चौधरी खिरोदा, डॉ. जी.डी. बेंडाळे- जळगाव, श्री. शंकर तोताराम पाटील दाभाडीकर, तुकाराम हरो पाटील-दाताळकर, आत्माराम गणु पाटील नरवेलकर, भिकू एकोबा कोलते नरवेलकर श्री. गजाभाऊ खर्चे मलकापूर, भोरगाव लेवा पंचायतीचे सर्व कुटुंबनायक भारतातील सर्व भ्रातृमंडळें व इतर लेवा संघटन संस्थांचे सर्व पदाधिकारी, डॉ. वि.भि . कोलते नागपूर, शंकरारव कोलते नरवेलकर इत्यादी बऱ्याच लोकांनी अल्पस्वरूप प्रमाणात समाज कार्य केले. पण राष्ट्रीय वा प्रादेशिक स्तरावर समाज महर्षीपदाचा अमरमान असलेले समाजासाठी जीवन अर्पण केलेले महान समाज सेवक या समाजात अजून जन्माला यायचे आहेत.

काहींच्या मते हा समाज फारसा परोपकारी व परदु:खात धावून जाण्यात अग्रेसर नाही. स्वार्थाकडे झुकलेला हा 'लेवा' आहे. त्याने 'देवा' होऊन दातृत्वाने देवाशी नाते जोडावे असे वाटते.

लेवा पाटीदारांचे राजकीय कार्य :- मराठी भाषिक लेवा पाटीदारांच्या अंगी जसे समाज कार्य

करण्याचे गुण अभावानेच सापडतात. तसेच, राजकीय क्षेत्रातही नेतृत्व गुण त्यांच्यात फारसे नाहीत. लेवा पाटीदार ह्या मूळ जातीतून महाराष्ट्रात आलेल्या शाखेने आपली राजकीय नेतृत्वाची परंपरा विसरली.

मूळ लेवा पाटीदार जातीत राष्ट्रनिर्माते लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल, विठ्ठलभाई पटेल आदी असामान्य राजकीय नेते झाले. ती परंपरा गुजराथ सोडून महाराष्ट्रात आलेल्या मराठी भाषिक लेवा पाटीदारांनी विसरली. कारण, यांच्यात इथे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, केंद्रिय कॅबिनेट मंत्री व केंद्रीय मंत्रिमंडळातील दुय्यम दर्जाचे राज्यमंत्री व इतर कोणतेही राष्ट्रीय स्तरावरील मंत्रिपद अद्याप त्यांना प्राप्त करता आले नाही. हल्ली नाही व पुढेही फारशी आशा नाही.

फार काय महाराष्ट्राचा मुख्यमंत्रीही त्यांच्यातून अद्याप झाला नाही. कोणत्याही भारतीय वा प्रादेशिक राजकीय पक्षाचे प्रमुख नेते पदही त्यांच्यात नाही.

आमदार, खासदार व महाराष्ट्राचा मंत्री व कॅबिनेट मंत्री एवढीच त्यांची आतापर्यंत कुवत राहिली. त्यातही धनाजी नाना चौधरी-खिरोदा, बॅ.तुकाराम शंकर पाटील दाभाडीकर, बॅरिस्टर यादव शिवराम महाजन, जळगाव, खासदार शिवराम रंगो राणे-जळगाव, उल्हासराव पाटील जळगाव, खासदार गुणवंतराव सरोदे, सावदा, जिल्हा परिषद अध्यक्षपद भूषविलेले भगवान केशव पाटील दाभाजी, श्री. वाय.जी. महाजन सर नशिराबाद तसेच, महाराष्ट्र विधान सभापति व बऱ्याच वेळा महाराष्ट्र मंत्रिमंडळात असलेले समाजसेवक बाळासाहेब मधुकरराव चौधरी-खिरोदा, दादासाहेब जि.तु. महाजन न्हावी, माननीय एकनाथराव गणपतराव खडसे-एदलाबाद कोथळी ही राज्यमंत्री मंडळातील पदे भूषविलेली मंडळी तसेच, आमदार देविदास भोळे, आमदार फालक, र.वि. पाटील, आदी लोकांनी राजकीय नेतृत्त्वातील पोकळी भरून काढण्याची भरीव व यशस्वी धडपड केली याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. तसेच, एकनाथ सदू पाटील शेलगावकर व मुरलीधर चांगो पाटील नरवेलकर या स्वातंत्र सैनिकांचेही अभिनंदन करतो.

लेवा पाटीदारांचे शैक्षणिक कार्य :- यवनांच्या आक्रमणात हिंदूंचे ग्रंथ जाळून टाकले. त्यांची शैक्षणिक परंपरा खुंटविली. पुढे पेशवाईत तर "ब्राह्मण पंडितांनी दावा केला की, अस्सल क्षत्रिय व वैश्य हे आता अस्तित्वात नसल्यामुळे समाजात ब्राह्मण व शूद्र हे दोनच वर्ण अस्तित्वात आहेत व वेदोक्त संस्कारांचा अधिकार फक्त ब्राह्मणांनाच आहे." (महाराष्ट्र शासन राज्य गॅझेटियर, महाराष्ट्र भूमि व लोक, संपादक- डॉ.कि.का. चौधरी, सन १९९६ पृष्ठ १८५ पहा). त्याचप्रमाणे निम्न जातींना "शाळा, दवाखाना, सार्वजनिक पाणवठा, न्हाव्याकडून केस कापणे इत्यादी नागरी सुविधांचा वापर करता येत नव्हता." (महाराष्ट्र भूमि लोक, संपादक- चौधरी, पृष्ठ १८६ पहा). म्हणून धार्मिक क्षेत्रातील पुरोहितशाहीविरुद्ध म. ज्योतिबा फुल्यांनी बंडाचा झेंडा उभारून शूद्रातिशूद्रांना धार्मिक, सामाजिक व राजकीय समता प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने ता. २४ सप्टेंबर १८७३ रोजी 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. ज्योतिबांच्या मृत्यूनंतर (१८९०) या आंदोलनाची सूत्रे कोल्हापूरचे शाहू महाराजांनी आपल्याकडे घेतली व महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळ प्रभावी केली. (महाराष्ट्र गॅझेटियर महाराष्ट्र भूमी व लोक, ले. चौधरी, पृष्ठ १७८ पहा). तसेच, "पेशव्यांनी महसूल व्यवस्थेत मामलेदारांच्या पदाची निर्मिती करून त्यावर ब्राह्मण अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची पद्धत सुरू केल्यामुळे पाटील व देशमुख यांच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेतील परंपरागत प्रभावास धक्का बसला. तसेच, ब्रिटीश राजवटीच्या काळातील धोरण-पाटील देशमुख यांच्या ग्रामीण व्यवस्थेतील परंपरागत प्रभावास मारकच होते. त्यामुळे या कालखंडात मराठा जातीचा प्रभाव काहीसा क्षीण झाला होता."(महाराष्ट्र गॅझेटियर, महाराष्ट्र भूमि व लोक, ले. चौधरी, पृष्ठ १८९). स्वातंत्र्यपूर्व काळात वकील, प्राध्यापक, डॉक्टर, अभियंते यासारख्या समाजात मानमरातब मिळणाऱ्या व्यवसायाच्या क्षेत्रात ब्राह्मण जातीने आपले प्रभुत्व प्रस्थापित केले हेते. परंतु, बहुजन समाजातील कर्मवीर

भाऊराव पाटील, महर्षी वि.रा.शिंदे, पंजाबराव देशमुख इत्यादी नेत्यांच्या प्रयत्नांमुळे या परिस्थितीत बदल होण्यास स्वातंत्र्यपूर्व काळातच सुरुवात झाली होती." (महाराष्ट्र शासन राज्य गॅझेटियर, महाराष्ट्र भूमि व लोक, ले. चौधरी, पृष्ठ १२४ पहा.) "ज्ञान हे धार्मिकदृष्टचा पवित्र मानले गेले होते, व त्यामुळे ते अपवित्र मानल्या गेलेल्या जातींना नाकारण्यात आले होते." (महाराष्ट्र गॅझेटियर भूमि व लोक, ले. चौधरी, पृष्ठ १५७ पहा).

ता. २१ डिसेंबर १८१७ च्या लढाईतील होळकराने सातपुड्याच्या दक्षिणेकडील आपला सर्व मुलूख खानदेशचा संपूर्ण भाग इंग्रजांना सूपूर्द करण्याचे होळकराने मान्य केले. (महाराष्ट्र गॅझेटियर भूमि व लोक, ले. चौधरी, पृष्ठ १०३) इ.सन १८८६ साली जळगावला अॅंग्लो व्हर्नाक्यूलर शाळा स्थापन झाली. (महाराष्ट्र गॅझेटियर, चौधरी, पृष्ठ ११५), खानदेशात इ.सन १८२१ मध्ये १८ पैकी १७ मामलेदार दक्षिणी ब्राह्मण होते.

जळगाव जिल्हयात १९१६ मध्ये एज्युकेशन युनियन, लेवा सेक्रेटरी एज्युकेशन सोसायटी सावदा सन १९१७, एज्युकेशन सोसायटी थोरगव्हाण १९१७, सेकंडरी एज्युकेशन सोसायटी भालोद १९२२, भुसावळ एज्युकेशन सोसायटी १९३५, जनता शिक्षण मंडळ खिरोदा १९३८, शिक्षण मंदिर, जळगाव १९४१ खानदेश एज्युकेशन सोसायटी जळगाव १९४४, वरणगाव एज्युकेशन सोसायटी १९४४, बोदवड सार्वजनिक को.ऑ. एज्युकेशन सोसायटी १९४५, नशिराबाद एज्युकेशन सोसायटी १९४५, सातपुडा विकास मंडळ पाल १९५०, सर्वोदय को.ऑ. आश्रम, यावल १९५० आदी शैक्षणिक संस्था स्थापन झाल्या.

धनाजी नाना चौधरी, धनजी महारू बोंडे, डॉ. जी.डी. बेंडाळे, श्यामू रा. चौधरी, के. नारखेडे, भागवत ना.पाटील, फकिरा हरी पाटील, व्ही. के. चौधरी, मधुकरराव चौधरी या शिक्षणप्रेमींनी १९४५ मध्ये जळगाव व अंमळनेर भागात महाविद्यालये स्थापिली. यापूर्वी मुंबई ते जळगावपर्यंत नाशिकचा अपवाद सोडल्यास एकही महाविद्यालय नव्हते. येथील विद्यार्थ्यांना पुण्या-मुंबईस महाविद्यालयीन शिक्षणासाठी जावे लागे म्हणून उच्च शिक्षण जवळजवळ नव्हतेच.

खानदेशातील पहिला पदवीधर बी.ए. १९११, दामोदर नाना चौधरी- हा खिरोद्याचा हुशार विद्यार्थी होता. नंतर शिक्षणाचा जोराने प्रसार झाला. इ.सन १९७० ते १९९३ या काळात जळगाव जिल्ह्यात जोराने शिक्षणप्रसार झाला. ता. १५ ऑगस्ट १९९० पासून जळगावला उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना झाली. पूर्व खानदेशात पहिले ग्रंथालय नेटिव्ह जनरल लायब्ररी १९६८ व सार्वजनिक वाचनालय भुसावळ १८७० हे होत.

इ.सन १८८१ मध्ये प्रबोधचंद्रिका, संपादक- फडणीस हे पूर्व खानदेशात सुरू केलेले आद्य नियतकालिक होय. बहुजनसमाज हितास्तव सन १९२३ मध्ये सीताराम नाना चौधरी यांनी खिरोद्याहून 'आत्मोद्धार' साप्ताहिक सुरू केले होते. त्यांनी 'सेवा संजीवन' मासिकही काढले होते. सन १९३५ मध्ये निघालेले 'बातमीदार' नियतकालिक बरेच कार्य करून गेले. हे जळगाव जिल्ह्याचे आद्य दैनिक असावे. सन १९६० मध्ये भागवत चौधरींचे नवजागृती साप्ताहिक होय.

विदर्भात सुद्धा बॅरिस्टर तुकाराम शंकर पाटील- माजी खासदार, दाभाडीकर, डॉ. वि.भि. कोलते नरवेलकर, सोपान निनु पाटील तांदुळवाडीकर, शंकर सुखदेव पाटील तळणीकर, मनसाराम वामन पाटील दाभाडीकर, डॉ.रा.गो. देशमुख, दाताळा हायस्कूलचे शुभारंभीचे मुख्याध्यापक, शंकर विठोबा पाटील दुधलगावकर , नरवेल हायस्कूलचे शुभारंभाचे मुख्याद्यापक, वि.वि. कोलते, धरणगाव हायस्कूलचे पहिले मुख्याध्यापक दगडू तोताराम खडसे कुंडकर, वडजी हायस्कूलचे श्री. फिरके-एणगावच्या हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. फिरके, दुधलगाव हायस्कूलचे श्री. पाटील सर, यांनी सहाय्याक शिक्षणप्रेमी रघुनाथराव पाटील एदलाबाद, नाथाभाऊ खडसे कोथळी, के. नारखेडे भुसावळ, दिगंबर विठू पाटील चिनावल, निवृत्तीभाऊ बोंडे एणगाव इत्यादी बरीच मान्यवर

मंडळी शैक्षणिक क्षेत्रात लेवा पाटीदार समाज उदास नाही याची साक्ष देणारे आहे. पण सर्वात डोळ्यात भरणारी गोष्ट अशी की, डॉ. पंजाबराव देशमुखांनी ज्यांच्याकडून शिवाजी एज्युकेशन सोसायटी ह्या विदर्भातील सर्वात मोठ्या शिक्षण संस्थेचा प्रारंभ केल्याची नोंद दैनिक तरुण भारत-नागपूरच्या जानेवारी १९९२ च्या डॉ. पंजाबराव देशमुख विशेषांकात पृष्ठ ३२ वरील 'कृषिरत्न' भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जीवनपट यामध्ये १९३२ सालची घटना म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेची श्री. आनंद वामन पाटील यांच्या सहकार्याने डॉ. पंजाबराव देशमुखांनी संस्थापना केली. हे मूळ संस्थापक लेवा पाटीदार समाजातील बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा तालुक्यातील शेलगाव बाजारच्या खर्चे कुळात जन्माला आलेले विद्वान होत. शेलगाव बाजारच्या प्रसिद्ध हायस्कूलचे व्यवस्थापक श्री. मनसाराम वामन पाटील वकील यांचे ते सख्खे भाऊ होत. हे दोन्ही शिक्षणप्रेमी शेलगाव बाजारचे शिक्षणमहर्षी शिस्तीचे कठोर शिक्षक श्री. वामन महादेव खर्चे पाटील यांचे हे दोन्हीं चिरंजीव लेवा समाजात चिरंजीव कार्य करून चिरंजीव झाले.

अध्यात्मिक जागृती करणारे महर्षी :- झेंडुजी महाराज बेळीकर, धनजी महाराज भुसावलकर, नागोजी महाराज तळवेलकर, मुकुंद महाराज एणगावकर, तोताराम महाराज गाडेगावकर, झेंडुजी महाराज असोदेकर, राजाराम शास्त्री शेळगावकर, मोतीराम महाराज एणगावकर, काशिराम महाराज आडविहिरकर, यादव भाऊ आडविहिरकर, जगन्नाथ महाराज अंजाळेकर, लक्ष्मण बुवा कुंडकर, दिगंबर बुवा चिनावलकर, विठ्ठल बुवा हंबर्डीकर, निवृत्ती महाराज देशमुख शेलगावकर, खुशाल तोताराम पाटील दुधलगावकर, शंकरराव कोलते पाटील डिधीकर, निवृत्ती भाऊ बोंडे एणगावकर, गोविंद बुवा बोंडे एणगावकर ह्या वारकरी संप्रदायातील पंढरीच्या श्री विठ्ठलाचे उपासक मंडळींनी लेवा पाटीदार समाजास विठ्ठलभक्तीमार्गात मार्गदर्शन, मदत व सहकार्य केले.

नरवेलकर प्रा. रमाकांत काशीनाथ कोलते, डॉ. सौ. मालती पाटील नागपूर, राजारामशास्त्री शेळगावकर, शंकर विठोबा पाटील दुधलगावकर ह्या चौघांनी वारकरी पंथीय वाङ्मय प्रकाशित करून आपले योगदान दिले.

तर डॉ. भाऊसाहेब वि.भि. कोलते यांनी महानुभाव साहित्याची व आद्य मराठी साहित्यातील अध्यात्मिक दालनाची ओळख करून दिली.

श्री. रा.वा. पाटीलांनी शास्त्री निळकंठ दास (वडतालकर) लिखित भगवान स्वामी नरायणाचे जीवन चरित्राचे संशोधनपूर्वक प्रकाशन कार्य केले. मोलाचे सहाकार्य केले. सौ. ज्योति सुरेश पाटील जळगावकरांनी सत्पंथ संप्रदायाचे स्वरूप व कार्य विषद करून सांगितले.

आर्थिक क्षेत्रात प्रगति करणारे समाज बांधव :-

१) श्री. भिकू एकोबा पाटील नरवेलकरांचे अरुण मुद्रणालय.

२) श्री. तुकाराम हरी पाटील दाताळकरांनी केलेली कृषिक्रांती व काढलेला कागद कारखाना. यात कित्येक ज्ञातिबांधवांना नोकऱ्या दिल्या आहेत. यांनी ज्योतिसिंड कॉर्पोरेशनद्वारे विदर्भात खत, औषधी, बि-बियाणे याद्वारे विदर्भातील लेवा पाटीदारांची आदर्श सेवा केली आहे.

३) सोपानराव निनु पाटील, तांदुळवाडीकरांचे कृषि केंद्र मलकापूर व राधाकृष्ण थिएटर अकोला, इलाईट प्रमोटर्स अँड बिल्डर्स, ९३ बी/६, सेनापती बापट रोड, शिवाजी नगर, पुणे १६, फोन :- (०२१२) ३५०८७५, निवास, (०२१२) ३५३५६५, कार्यालय (०२१२) ३५३५९५ यांनी बरेच लेवा पाटीदार लोकांना त्यांच्या प्रतिष्ठानात नोकऱ्या देऊन स्वार्थाबरोबर परमार्थ साधला. ज्ञातिसेवेचेच हे एक रूप आहे.

४) श्री. भगवान केशव पाटील दाभाडीकरांनी शेतकी उत्पादकांसाठी सहकार क्षेत्रात ग्रोअर्स असोसिएशन द्वारा मलकापूर तालुक्याची सेवा केली. तेथे बऱ्याच लेवा पाटीदारांना त्यांनी नोकऱ्या दिल्या. हीसुद्धा समाजसेवाच होय.

५) नचिकेत इरेक्टर्स प्रा.लि. पुणे ह्या कंपनीचे श्री. कमलाकर शंकरराव पाटील, एम.एस्सी.(कृषी) दाभाडीकरांनी पडिक जमिनीवर फळबाग लागवड असा महत्त्वाकांक्षी प्रयोग पुणे येथे सन १९९५ पासून साकार केला.
त्याचा पत्ता :- १४, आर्केड, दिवगी मेटल जवळ, एरंडवणे, पुणे ४. (नचिकेत इरेक्टर्स प्रा. लि. डेव्हलेपर्स अँड बिल्डर्स, १४, पाटील आर्केड. शारदा सेंटर समोर, कर्वे रोड, पुणे ४११००४, फोन - ३३५९५१, मोबाईल ९८२२०२२३९६ हा आहे. डेक्कन जिमखान्यापासून २४ किलोमीटरवरील मुळशी तालुक्यांत यांचा मृगविहार प्रकल्प कृषि क्रांतीकारकांना मार्गदर्शक ठरेल.

६) श्री. कोलते पाटील आणि कंपनी, पुना बिल्डर्स, पुना ६, लेवा पाटीदार प्रतिष्ठानने पुण्यात बरीच आर्थिक प्रगती करून लेवा बांधवास एक आदर्श निर्माण करून दाखविला.

१) श्रीनिवास आनंदराव खर्चे शेलगावकर, हल्ली मुक्काम मद्रास हे एक उत्कृष्ट चित्रकार आहेत. इंग्लंडात जाऊन शिक्षण घेऊन धंद्यात जम बसविला. अभिनंदन. याशिवाय आर्थिक प्रगती कारांची आर्थिक क्षेत्रातील विज्ञापने पुढील नियतकालिकात वाचून उर्वरित अर्थतज्ज्ञाचा परिचय घडेल. ती नियतकालिके अशी :-

१. "पाटीदार जागृती" हे म.प्र. व राजस्थानच्या पाटीदारांचे प्रमुख नियतकालिक. वार्षिक वर्गणी ५० रु. आजीवन ३२५ रु. दरमहाचे वर्गणीदार ग्राहक ता. ३१-३-१९९७ रोजी २८९५ हिंदी भाषेतून. पत्ता :- प्रबंध संपादक, **"पाटीदार जागृति"** पाटीदार समाज छात्रावास,संजीत मार्ग, मंदसौर ४५८००१ (म.प्र.)

२) अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळाचे त्रैमासिक मुखपत्र 'आपले लेवा परिवार त्रैमासिक' भाषा मराठी. पाच वर्षांसाठी वर्गणी २५१ रुपये. पत्ता :- अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळ, बी/३, रविकिरण, फुले मार्ग, मुलुंड (पूर्व) मुंबई, पिन - ४०००८१.

३) कुर्मि क्षत्रिय जागृति, त्रैमासिक पत्रिका (हिंदी) वार्षिक वर्गणी २५ रुपये फक्त. पत्ता - प्रबंध संपादक + प्रधान संपादक, कूर्मी क्षत्रिय जागृति गिरवर (सागर) म.प्र. ४७०००१.

४) अखिल भारतीय कूर्मी क्षत्रिय महासभेचे मासिक मुखपत्र "कूर्मी क्षत्रिय जागरण" हे हिंदी मासिक मुखपत्र वार्षिक सदस्यता शुल्क ५० रुपये, पुढील पत्त्यावर पाठवा नि मिळवा. पत्ता:- **कूर्मी क्षत्रिय जागरण**., ए-१८६, दारूल शफा, लखनऊ (उत्तर प्रदेश). कोषाध्यक्ष, पटेल रामबापू गंगवार यांचा दूरध्वनी क्रमांक (निवास)३८००१२ हा आहे.

५) काही लेवा पाटीदार समाजाचे वार्षिक व स्मरणिकादी नियमित व अनियमित पत्रिका.
सारांश, जो समाज सुसंस्कृतेत जसजसा अग्रेसर होत जातो तसतसे त्याचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक योगदान वाढत जाते. लेवा पाटीदार समाजात निसर्गकन्या बहिणाबाई, महाराष्ट्र कोकीळ सोपानदेव चौधरी, अखिल मराठी भाषिक लेवा समाजाला ललाभभूत असणारे डॉ. भाऊसाहेब वि.भि. कोलते, उत्कृष्ठ कादंबरीकार- डॉ. भालचंद्र नेमाडे, श्री. के. नारखेडे, श्री. श.रा. राणे, श्री. राजा महाजन, विदर्भातील रुक्मिणीबाई पाटील आदी जातीवंत सरस्वती - पुत्र जन्मलेत. त्यांनी उत्कृष्ठ सारस्वत निर्माण केले, पण काही अपवाद वगळता साहित्यिक संघटना, बांधल्या नाहीत. स्वसमाजाची साहित्यिक संमेलने घेतली नाहीत. किंवा लेवा पाटीदार साहित्यिकांचे व साहित्याचे इतिहास लेखन कोणी केले नाही. त्यांचे सूचीलेखनही केल्याचे दिसत नाही. कोण्या भ्रातृमंडळातही त्याबाबत कोणी आस्था दाखविली नसल्याने बहुतेक भ्रातृमंडळे लेवा समाज संघटना त्या दृष्टीने वांझ ठरल्यात.
साहित्यिकांची व साहित्याचीच नव्हे तर सामाजिक, राजकीय, अध्यात्मिक, संगीत, कला, उद्योजक आदी क्षेत्रातील समाज रत्नांची सूची व वेगवेगळा प्रकल्प स्वरूप इतिहास लेखन झाल्यास ते समाजाला उपयुक्त व मार्गदर्शकच ठरेल

प्रकरण २४

लेवा पाटीदारांची गावें, कुळें, गोत्रें, दैवतें

तालुका	गावे		शहरे	
१ जळगाव	९०	+	१	
२ भुसावळ	१०२	+	३	
३ यावल	८८	+	२	
४ रावेर	१११	+	२	
५ एदलाबाद	७९	+	०	
६ मलकापूर	७२	=		६१ आबाद गावे + ११ उजाड गावे
७ नांदुरा	१०४	=		९० आबाद गावे + १४ उजाड गावे
८ मोताळा	१२२	=		१०४ आबाद गावे + १८ उजाड गावे

वरील आठ तालुक्यातील एकूण गावे दिलीत. त्यापैकी लेवा पाटीदारांची वस्ती असलेली गावे प्रयत्न करून निवडा व त्याची सूची तयार करा. अशा प्रकारची लेवा समाजाच्या गावांची यादी भोरगाव लेवा पंचायत पाडळशे ता.यावल, जिल्हा जळगाव यांना मी जानेवारी १९८५ साली मागितली होती. माझ्या विनंतीनुसार भोरगाव लेवा पंचायत पाडळशे यांचे कुलसचिवांनी ता. ८-२-१९८५ रोजी पुढीलप्रमाणे यादी जळगाव जिल्ह्याची सूची पाठविली ती अशी.

१. जळगाव गट - १.जळगाव शहर, २. आसोदा, ३. भादली बु., ४. शेळगाव, ५. कडगाव, ६. तरसोद, ७.नशिराबाद पेठ, ८. निमगाव, ९. बेळी, १०. अडगाव, खुर्द, ११. खिर्डी, १२. कानळदा, १३. ममुराबाद, १४. उदगाव, १५. आवार, १६.तुरखेडा, १७. मेहरूण, १८. साळवे, ता. एरंडोल, १९. नांदेड, ता. अंमळनेर, २०. टहाकळी, तालुका एरंडोल, २१. वाघळी, तालुका, चाळीसगाव. २२. हातळे तालुका चाळीसगाव.

२. भुसावळ गट - १. भुसावळ शहर, २. साकेगाव, ३. कंडारी, ४. फेकरी-दीपनगर, ५. साकरी, ६. खडके, ७. किन्ही, ८. कन्हाळे, ९. शिंदी, १०. गोजोरे, ११. वराडसीम, १२. सुनसगाव, १३. बेलव्हाड, १४. खेर्डा, १५. बोदवड, १६. वेल्हाळे, १७. वरणगाव, १८. जाटगाव - मन्यार खेड, १९. हातनूर, २०. (तपत्) कठोरे, २१. सुसरी, २२. आचेगाव, २३. गोळेगाव, २४. पिंपळगाव खुर्द, २५. पिंपळगाव बुद्रूक, २६. तळवेल (फॅक्टरी), २७. दर्यापूर, २८. काहूरखेडे, २९. एणगाव, ३०. वझरखेडे, ३१. हणवतखेडे, ३२. धोणखेडे, ३३. कोल्हाडी, ३४. आंबदगाव, ३५. नाडगाव

३. यावल विभाग - १. यावल, २. न्हावी, ३. बोरखेडे, ४. फैजपूर, ५. पिंपरुड, ६. आमोदा, ७. ब्राह्मणोद, ८. विरोदा, ९. बडोदा, १०. पाडळसे, ११. पिळोदे, १२. कोसगाव, १३. अंजाळे, १४. राजोरे, १५. चिखली बु।। १६. चिखली खुर्द, १७. सांगवी, १८. अट्रावल, १९. भालोद, २०. हिंगोणा, २१.(डोंगर) कठोरे, २२. हंबर्डी, २३. सातोद, २४. कोलवड, २५. वड्री, २६. कोरपावळी, २७. महेलखेडी, २८. दहीगाव, २९. सावखेडे सीम, ३०. साकळी, ३१. शिरसाड, ३२. किनगाव, ३३. डांभूर्णी, ३४. चुचाळे, ३५. नायगाव.

४. रावेर विभाग - १. विवरे, २. कुसंबा, ३. उटखेडा, ४. खानापूर, ५. कर्जत, ६. अहिरवाडी, ७. सावदा, ८. चिनावल, ९. कुंभारखेडा, १०. वाघोदे बुद्रुक, ११. खिरोदा, १२. रोझोदा, १३. कुळमोरा,

१४. सावखेडा, १५. पाल, १६. निंभोरा, १७. खिर्डी खुर्द, १८. खिर्डी बुद्रूक, १९. मस्कावद, २०. उधळी, २१. सुनोटा, २२. रावेर.

५. एदलाबाद विभाग - १. एदलाबाद, २. कोथळी, ३. सालबर्डी, ४. चांगदेव , ५. निमखेडी, ६. चारदाणा, ७. रुईखेडे, ८. हिवाटे.

जळगाव जिल्हयात १४० लेवा गावांपैकी ही १२२ गावे व त्याची सूची मिळाली. बुलढाणा जिल्हयात ६१ गावांची सूची पुढे देत आहे. = १८३ गावे.

६. मलकापूर तालुका - १. दुधलगाव बुद्रुक, २. दुधलगाव खुर्द, ३. नरवेल, ४. झोडगा, ५. तांदुळवाडी, ६. तालसवाडा, ७. म्हैसवाडी, ८. दसरखेड, ९. विवरा, १०. धरणगाव, ११. अनुराबाद, १२. कुंड बुद्रूक, १३. कुंड खुर्द, १४. निंबारी, १५. भालेगाव, १६. जांबूळधावा, १७. लोणवाडी, १८. आळंद, १९. हरणखेड, २०. वडजी, २१. दाताळा, २२. शिराढोण, २३. मोरखेड खुर्द, २४. वारखेड, २५. निमखेड, २६. मलकापूर.

७. मोताळा तालुका - १. मोताळा, २. बोराखेडी, ३. पुन्हई, ४. तरोडा, ५. आडविहीर, ६. खरबडी, ७. वाढी, ८. पिंपरी गवळी, ९. माकोडी, १०. जहागिरपूर, ११. टेंभी, १२. दाभाडी, १३. तळणी, १४. शेलापूर खुर्द, १५. शेलापूर बुद्रुक, १६. शेलगाव बाजार, १७. सावरगाव जहागीर, १८. निपाणा, १९. माळेगाव, २०. चिंचखेड, २१. तालखेड, २२. चिंचपूर, २३. सांगळद,

८. नांदुरा तालुका - १. नांदुरा बुद्रूक, २. नांदुरा खुर्द, ३. चांदूर विसवा, ४. डिघी, ५. फुली, ६. मेंढळी, ७. शेंबा, ८. सिरसोडी, ९. टोकरखेडा, याशिवाय १. खामगाव, २. बुलढाणा, ३. खांडवी ही तीन गावे एकूण ही १८३ गावांची सूची दिली आहे. याशिवाय नुकतीच आठवलेली १८४. घुसर खुर्द. १८५ वेरुळ, १८६. भांडगुरा, १८७. सानपूरी, १८८. चिखली (बुलढाणा), १८९ भुईसिंगी (बुलढाणा), १९०. पिंपळखुटे (बुलढाणा), १९५. **सांगळद खुर्द**, १९२. खातखेड, १९३. कोल्ही, १९४. निमगाव, १९५. जळगाव खुर्द, १९६. अजळसोंडे, १२७. इतगाव, १९८. कासोदे, १९९. मुक्तळ ही गावे + सुमारे ३० भ्रातृमंडळाची गावे + न आठवलेली सुमारे २०-२१ गावे = एकूण मिळून सुमारे २५० गावे लेवा वस्तीची आहेत.

गुजराथ सोडून दाताळा ठाया अंतर्गत वसलेल्या लेवा पाटीदारांचे कुळ, गोत्र व गुजराथेतील मूळ रहिवासांचे गावासंबंधी माहिती :-

(सदर माहिती अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळाचे त्रैमासिक मुखपत्र 'आपले लेवा परिवार' ३ रा वर्धापन दिन विशेषांक १९९४ जानेवारी ते मार्च १९९४ चे अंकात, पृष्ठ ४५ वर लेखक शंकर विठोबा पाटील, मु+पोस्ट = दुधलगाव बुद्रूक, तालुका - मलकापूर, जिल्हा बुलढाणा, पीन ४४३१०१ यांचा संशोधन केलेला लेख, संपादक महेंद्र राणेंनी वरील पत्रकात प्रसिद्ध केला आहे तो असा :-

अ.नं.	कुळ	गोत्र	कुलदैवत	गुजराथेतील मूळ गाव
१.	सरोदे	भार्गव	खंडेराव म्हाळसा	अनकवाडू
२.	राणे	गौतम	गौतमादेवी	रेळवाडू
३.	धंडारे	गौतम	खंडेराव म्हाळसा	धोंडके, धुंडके
४.	वाघोदे	पाराशर	मनुदेवी	पालनपूर
५.	अत्तरदे	अंगिरा	महालक्ष्मी	नवसारी
६.	बेंडाळे	वशिष्ठ	खंडेराव म्हाळसा	आनंदपूर
७.	तळोले	कौंडण्य	महालक्ष्मी	पावागडे (अहमदाबाद)
८.	ठोंबरे	मार्कंडेय	कालंका भवानी	मेहसाणा
९.	फेंगडे	विश्वामित्र	मनुदेवी	अनकवाडे

अ.नं.	कुळ	गोत्र	कुलदैवत	गुजराथेतील मूळ गाव
१०.	नाले	अंगिरा	आशापूरीदेवी	बडोदे
११.	वाणे	गौतम	कालंका भवानी	बालवाडे
१२.	झांबरे	भार्गव	रेणुका भवानी	सागबारा
१३.	कोल्हे	लोकाक्ष	खंडेराव म्हाळसा	सुरत
१४.	नेहते	वशिष्ठ	कालंका भवानी	मणिपूर
१५.	नाफडे	लोकाक्ष	रेणुका भवानी	भडोच
१६.	वराडे	शांडिल्य	निंबादेवी	अहमदाबाद
१७.	बोंडे	आंगिरा	जोगेश्वरी	वेळदे (ता.निझर जि. पुणे)
१८.	फालक	वशिष्ठ	मनुदेवी	हिरापूर
१९.	वारके	गौतम	मनुदेवी	वैजलपूर
२०.	भंगाळे	भार्गव	दुर्गामाता (पाराशरदेव)	चापानेर
२१.	झोपे,बोंबले,जावळे	विश्वामित्र	मनुदेवी	कडवीर
२२.	चोपडे (कोळंबे)	मारिच	महालक्ष्मी	पावागड
२३.	बटे	अंगिरा	कालंका भवानी	निझर
२४.	किनगे (उन्हाळे)	विश्वामित्र	मनुदेवी	अनकवाडू
२५.	नारखेडे(नकले+टेकाडे)	भारद्वाज	कालंका भवानी	नांदोद करनाळे
२६	कोलते	गौतम	महालक्ष्मी	बारडोली
२७.	डहाके	शृंगव	निंबादेवी	डोलपूर
२८.	जंगले	पाराशर	मनुदेवी	रिझोदा
२९.	लोखंडे	गौतम	अंबिका	मणिपूर
३०.	रोठे	लोकाक्ष	मनुदेवी	अहमदाबाद
३१.	भारंबे	वशिष्ठ	खंडेराव म्हाळसा	चापानेर
३२.	भोळे	मार्कंडेय	कालंका भवानी	अनकवाडू
३३.	वाळके (वामकुळे)	भार्गव	दुर्गादेवी	पालनपूर
३४.	होले	पाराशर	मनुदेवी	मणीपूर
३५.	भिरुड	पाराशर	रेणुका भवानी	अहमदाबाद
३६.	येवले	विश्वामित्र	खंडेराव म्हाळसा	आनंदपूर
३७.	खाचणे	भार्गव	दुर्गादेवी	नवसारी
३८.	रिधोरे	वशिष्ठ	खंडेराव म्हाळसा	खोडबारा
३९.	इंगळे	विश्वामित्र	मनुदेवी	अनकवाडू
४०.	धांडे	अगस्ती	निंबादेवी	मणिपूर
४१.	लढ्ढे	शृंगव	रेणुका भवानी	नांदोद
४२.	पांचपांडे	अगस्ती	खंडेराव म्हाळसा	पावागड
४३.	खडसे (खर्चे)	वशिष्ठ	खंडेराव म्हाळसा	आनंदपूर
४४.	फिरके	मार्कंडेय	कालंका भवानी	पावागड
४५.	बऱ्हाटे (करांडे)	कौंडण्य	रेणुकादेवी	मणिपूर
४६.	सुपे	कौंडण्य	कालंका आशापूरी	आनंदपूर
४७.	बोरले	शांडिल्य	खंडेराव म्हाळसा	पावागड
४८.	नेमाडे	शृंगव	निंबाबाई	अनकवाडू
४९.	गाजरे	लोकाक्ष	भवानी	-
५०.	लोंढे.	गौतम	-	-
५१.	किरंगे	मार्कंडेय	कालकाभवानी	

सारांश :-

१. वशिष्ठ गोत्री - बेंडाळे, नेहते, फालक, भारंबे, रिघोरे, खर्चे, फाल्गुने
२. भारद्धाज गोत्री - नारखेडे, नकले, टेकाडे, अयताडे.
३. भार्गव गोत्री - सरोदे, झांबरे, भंगाळे, वाळके, खाचणे.
४. गौतम गोत्री - राणे, धंडारे, वाणे, वारके, कोलते, लोखंडे, लोंढे.
५. पाराशर गोत्री - वाघोदे, जंगले, होले, भिरुड
६. मार्कंडेय गोत्री - ठोंबरे, भोळे, फिरके
७. विश्वामित्र गोत्री - फेंगडे, झोपे, बोंबले, जावळे, किनगे, उन्हाळे, येवले, इंगळे, ब्राह्मंदे
८. अंगिरा गोत्री - अत्तरदे, नाले, बोंडे, बढे
९. अगस्ती गोत्री - धांडे, पाचपांडे
१०. मारीच गोत्री - चोपडे, कोळंबे,
११. शृंग गोत्री - डहाके, लढे, नेमाडे, धाबकर
१२. कौंडण्य गोत्री - तळोले, बऱ्हाटे, करांडे, सुपे, गुळे
१३. शांडिल्य गोत्री - सराडे, बोरले
१४. लोकाक्ष गोत्री - कोल्हे, नाफडे, रोठे, गाजरे.

टीप :- मी दाताळा ठायातील कुळे, गोत्रे, कुळदैवते व गुजराथेतील मूळ गावे यांची संशोधनपूर्वक माहिती जमा केली. लेवा पाटीदार बांधवांच्या हितासाठी, माहितीसाठी 'आपले लेवा परिवार', संपादक- महेंद्र ओंकार राणे, बी/३, रविकिरण, महात्मा फुले मार्ग, मुलुंड (पूर्व) मुंबई - ४०००८१ नावाच्या त्रैमासिकाचे अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळाचे त्रैमासिक मुखपत्र, मंडळाचा तिसरा वर्धापन दिन विशेषांक १९९४ जानेवारी, फेब्रुवारी व मार्चच्या अंकात पृष्ठ ४५, ४६ व ४७ वर छापून प्रसिद्ध केली.

लेवा पाटीदारांना ती मार्गदर्शक व्हावी या सद्हेतूने लेवा पाटीदार समाज मंडळ, अंबरनाथ (पूर्व), भाईंदर उपशाखा रजि.नं. महा/२०७-९२ ठाणे, दिनांक २७-११-१९९२ पब्लिक ट्रस्ट रजिस्टर नंबर एफ ३३५३ ठाणे दिनांक २३-०३-१९९३, कार्यालय द्वारा श्री. दिलीप निवृत्ती बोरले, दत्तनिवास, रुम नं. ५, कुणाल कुटिरमागे, नवघर गाव, भाईंदर (पूर्व) ४०११०५ या लेवा पाटीदारांच्या संघटन शाखेने प्रथम वर्धापन दिनानिमित्त भाईंदर उपशाखेच्या सौजन्याने इ.सन १९९६ ची "स्नेहबंध" नावाची एक स्मरणिका श्री. विश्वनाथ निवृत्ती बोरले यांचे संपादकत्वाखाली काढून श्री. निनू गोविंद नारखेडे अध्यक्ष, लेवा पाटील समाज मंडळ, अंबरनाथ पूर्व, यांनी ती. ता. २६-११-१९९५ रोजी प्रकाशित केली. सदर स्मरणिकेच्या पृष्ठ क्र. ५५ व ५६ वर "लेवा पाटीदारांनी गुजराथ सोडताना निघालेल्या काही कुळांची माहिती" हा मी संशोधन केलेला लेख 'आपले लेवा परिवार' संपादक- श्री. महेंद ओंकार राणे या अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळाचे मुखपत्रातून घेऊन मला न कळविता माझे नावाऐवजी इंदौरचे श्री. वासुदेवराव एच. पाटील यांचे नावावर छापून पुन्हा प्रकाशित केला. वरील सूची श्री. वासुदेवराव पाटील यांनी प्रकाशित केली नसून ती शंकर विठोबा पाटील दुधलगावकरांनी संशोधित करून यापूर्वीच 'आपले लेवा परिवार' तारीख जानेवारी ते मार्च १९९४ च्या ३ रा वर्धापन दिन विशेषांकाचे पृष्ठ ४५, ४६ व ४७ वर ती छापली होती. सदर लेखातील चुका दुरुस्त करून मी परत तो लेख येथे पुन्हा प्रकाशित करीत आहे. कुळ, गोत्र, कुळदैवत, गुजराथेतील मूळ रहिवासाचे गाव यासंबंधीच्या माहितीचा घोटाळा टळावा म्हणून ही सुधारीत प्रत, लग्न, पूजा, कर्मांतर विधीसाठी वाचकांनी दुरुस्तीची नोंद करून कार्यभाग करावा. सदर संशोधनाबाबत काही शंका असल्यास चैतन्य प्रकाशन दुधलगाव बुद्रूक, ता. मलकापूर,

जिल्हा बुलढाणा - ४४३१०१ महाराष्ट्र फोन नंबर (०७२६७) ५२०२५ ह्या पत्त्यावर येऊन चौकशी करावी किंवा श्री.अशोक अभिमन्यू भाट, लेवा परिवार मंडळीचे भाट, भाट गल्ली, चोपडा, जिल्हा जळगाव यांचे वही नंबर १, पान क्रमांक २९१ ते ३१७ वरून मनसाराम फुंदीला सरोदे लेवाभाट, भाट गल्ली, चोपडा जिल्हा जळगाव यांनी ता. १२ मे १९९७ रोजी अद्यावत दुरुस्त केल्यावर त्याप्रमाणे दिली आहे. जिज्ञासूंनी तपासून पहावी.

इंदौरचे निवृत्त पौलीस निरीक्षक समाजसेवक श्री. वासुदेवराव एच. पाटील यांनी अभ्यासू व संशोधक वृत्तीने मराठी भाषी लेवा पाटीदारांची गोत्रावळी जिल्हा पूर्व खानदेश व बुलढाणा यांची सूची तयार केली. ती आपले माहितीसाठी पुढीलप्रमाणे पुन्हा देत आहे.

अ. न. गोत्र	आडनाव (कुळ)	मूळ गाव (वास्तव्य)
१. गौतम	राणे , राणेपाटील	तळवेल, गोळेगाव, पिंपळगाव खुर्द, दर्यापूर, भालोद, डोंगर कठोरे, सातोद, कानळदे, हिंगोणे, जळगाव खुर्द, सावरगाव
	पाचपांडे	बाह्मणोद
	ढाके	भुसावळ
	तळेले	सातोद, कोळवद, फैजपूर, न्हावी, खिरोदा
	फेगडे	शेलगाव
	नेमाडे	बाह्मणोद
	चौधरी	डोंगर कठोरे
	कोलते	नरवेल
२. शांडिल्य	बोरोले	सुसरी,
	पाटीले	आचेगावचे चौधरी
	बोरोले	मस्कावद
	महाजन	एदलाबाद
	फेगडे	न्हावी, यावल
	पाटील	दुधलगाव
	वराडे	दाताळा,
	(देशमुख)	मलकापूर
	नाफडे	सालबर्डी
३. कोकाक्ष	नेहते	साळवे, बाह्मणोद, डोंगर कठोरे
	पाटील	पाडळशे
	पाटील	शिदाढोण (मलकापूर)
४. भारद्वाज	जावळे	फैजपूर, भालोद
	चौधरी	भालोद
	पाटील	हंबर्डी, नशिराबाद
	चौधरी	दाताळा, फैजपूर
	अत्तरदे	भुसावळ, भादली, जळगाव बुद्रुक
	भारंबे	फैजपूर, खडके, साकरी ,अजळ सोंडे
	महाजन	भालोद, नशिराबाद
	पाटील	शेळगाव, चिनावल
	नारखेडे	धरणगाव
	धांडे	सातोद, नांदुरा
	खडसे	एणगाव
५. कश्यप	भोरटके	सावदा
	पाटील	सावदा, पिळोदे, पिंपळगाव खुर्द, सातोद, खिरोदा
	चौधरी	खिरोदे, सावदे
	वायकोळे	हिंगोणे
	नेहते	सावदे
	जंगले	कंडारी
	बोंडे	हिंगोणे, चिनावल
	बोरोले	फैजपूर, खिरोदे
	बऱ्हाटे	पाडळशे
	तळेले	सातोद
	फालक	सावदा
	इंगळे	भालोद
	धांडे, धाण्डे	सावदा, डोंगर कठोरे
	भंगाळे	सावदा
	अद्रावलकर	जळगाव
	येवले	सातोद
६. काळंकी	काळे	असोदे

अ. न.	गोत्र	आडनाव (कुळ)	मूळ गाव (वास्तव्य)
७.	वशिष्ठ	भंगाळे	नांदेड, कानळदे
		फालक	जळगाव
		हंबर्डीकर	हंबर्डी, भुसावळ
		चौधरी	खिर्डी, आमोदे
		पाटील	आमोदे, शेंम्बा, नाडगाव
		खर्चे	दुधलगाव, शेलगाव बाजार, धरणगाव, दाभाडी
		नेमाडे	सांगवी
		येवले	पिंपळगाव खुर्द, किन्ही
		सरोदे	असोदे
		महाजन	अमादे
		खाचणे	नशिराबाद
८.	भृशुण्डी	चौधरी	भादली
		पाटील	भादली
		ढाके	साळवे, सांगवी
९.	वामदेव	येवले	कानळदे
१०.	गंधर्व	रोटे	नशिराबाद
११.	भृगु/ भार्गव	झांबरे	बाह्मणोद
		वारके	इदगाव
		भोळे	असोदे
		पाटील	उदली
		चौधरी	पाडळशे
		भारंबे	विरोदे
		पाटील	कोसगाव, कासोदे
		महाजन	भुसावळ
१२.	भृंगी	झांबरे	डोंगर, कठोरे
१३.	अग्नी	वाघुळदे	बाह्मणोद
१४.	वाल्मिकी	चौधरी	पाडळशे
		वारके	भुसावळ
		फिरके	न्हावी
१५.	लोमेश	रडे	भादली, नांदेड
१६.	दुर्वासा	बोरोले	सांगवी, चिनावल
		पाटील	पिळोदे
		बोरोले	बाह्मणोद, न्हावी, असोदे
१७.	ब्रह्मचारी	भोळे	असोदे
१८.	मार्कंडेय	चौधरी	नांदेड
		नेमाडे	चिनावल, मस्कावद
		पाटील	नांदेड
		भोळे	नांदेड
		भिरुड	डोंगर कठोरे
१९.	बकदालभ्य	खडके	जळगाव
		वराटे	नांदेड
२०.	कौंडिण्य	इंगळे पाटील	कडगाव
		इंगळे	नांदेड
		महाजन	चिखली
		कोल्हे	भादली, साळवे
		सरोदे	बाह्मणोद
		चौधरी	ममुराबाद
२१.	कपिल	नारखेडे	बाह्मणोद, साळवे
		चौधरी	नशिराबाद
		आटाळे	असोदे
		चौधरी	वडरी
		असोदेकर	नांदेड
२२.	अगस्ती	जंगले	वराडसीम, भादली
		चौधरी	केळवद
		चौधरी	सातोद
		गाजरे	फैजपूर
२३.	गर्ग/ गर्गाचार्य	पाटील	अंजाळे
		चौधरी	आवार
		महाजन, नेहते	डोंगर कठोरे
२४.	विश्वामित्र	झोपे	वरणगाव, ओझरखेड, तळवेल
		पाटील	विल्हाळे
		भंगाळे	सांगवी
		महाजन	मुक्तळ
		इंगळे	निपाणे
२५.	मांडव्य	बरोले	जळगाव
		बोंडे	खानापूर, विवरे (मलकापूर)
२६.	देवमुनि	गुळवे	हिंगोणे
२७.	पौलस्त्य	पाटील	सांगवी बुद्रूक
		लोखंडे	अमोदे
२८.	लोकम	पाटील	किन्ही
२९.	पाराशर	भिरुड	किन्ही

अ. न.	गोत्र	आडनाव (कुळ)	मूळ गाव (वास्तव्य)
		जंगले पाटील	आचेगाव
३०.	याज्ञवल्क्य	चौधरी	भालोद
३१.	गोकर्ण	वाणी	भुसावळ
३२.	वल्लभश्री	गाजरे	हिंगाणे
		चोपडे	भालोद
३३.	श्रृंगी	नेमाडे	नांदुरा खुर्द
३४.	कृष्ण	टोके	हंबर्डी
३५.	ब्रह्मर्षि	चिरमाडे	भादली बुद्रूक
३६.	अंगिरस	चौधरी (गाजरे)	सांगवी
३७.	अंगिरा	गाजरे	न्हावी
		बटे	रुईखेड (एदलाबाद)
३८.	शंख	फालक	न्हावी
३९.	विमजाय	इंगळे	खिरोदा

टीप :- वासुदेवराव एच. पाटील., ४९/१, एल.आय.सी. कॉलनी, इंदौर - ४५२००८, हा श्री वासुदेवरावांचा पोस्टल पत्ता आहे. यांनी लेवा परिवार त्रैमासिक, सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर १९९२ मध्ये प्रसिध्द केले.

लेवा पाटीदारांची कुळे, आडनावे :- सरोदे, राणे, धंडारे, वाघोदे, अत्तरदे, बेंडाळे, तळोले, ठोंबरे, फेंगडे, नाले, वाणे, झामरे, कोल्हे, नेहेते, नाफडे, वराडे, बोंडे, फालक, वारके, भंगाळे, झोपे, बोंबले, जावळे, चोपडे, कोळंबे, बढे, किनगे, किरंगे, उन्हाळे, नारखेडे, नकले, टेकाडे, कोलते, डहाके, जंगले, लोखंडे, रोठे, भोळे, भारंबे, वाळके, होले, भिरुड, येवले, खाचणे, रिधारे, इंगळे, धांडे, लढे, पाचपांडे, खडसे, खर्चे, फिरके, सुपे, करांडे, बऱ्हाटे, बोरवले, नेमाडे, लोंढे, ढाके, फेगडे, पाटील, चौधरी, महाजन, देशमुख, बोरोले, भोरटक्के, वायकोळे, अट्रावलकर, काळे, हंबर्डीकर, रोटे, वाघुळदे, रडे, खडके, बराटे, आटाळे, असोदेकर, गुळवे, वाणे, टोके, चिरमाडे ही ८१ व अशी अनेक आडनावे लेवा पाटीदारांच्या सर्व शाखा, उपशाखासह आहेत.

लेवा पाटीदारांची गोत्रे :- वशिष्ठ, भारद्वाज, भृगु/भार्गव, गौतम, पाराशर, मार्कंड, विश्वामित्र, अंगिरा, अगस्ती, मारिच, शृंग, कौंडण्य, शांडिल्य, लोकाक्ष, कश्यप, काळंकी, भृशुंडी, वामदेव, गंधर्व, भृंगी, वाल्मिकी, लोमेश, दुर्वास, ब्रह्मचारी, मार्कंडेय, बकदालभ्य, कपिल, गर्ग/गर्गाचार्य, मांडव्य, देवमुनि, पौलस्त्य, लोकम, याज्ञवल्क, गोकर्ण, वल्लभश्री, शृंगी, कृष्ण, ब्रह्मर्षी, अंगिरस, शंख, विमजाय अशी लेवा पाटीदारांची सर्व शाखीय गोत्रसूची आहे. याशिवाय इतरही गोत्रे आहेतच.

मराठी भाषिक लेवा पाटीदार वस्ती :- १. रावेर, २. यावल, ३. जळगाव, ४. भुसावळ, ५. एदलाबाद हे खानदेशातील पाच तालुके + बुलढाणा जिल्ह्यातील १. मलकापूर, २., २. भोताळा, ३. नांदुरा हे तीन तालुके मिळून आठ तालुक्यातील लेवा वस्तीचे गावे + साळवे (एरंडोल) + नांदेड (अंमळनेर) + टहाकळी (एरंडेल) + वाघळी (चाळीसगाव) + हातळे (चाळीसगाव) ही गावे + भारतातील अंदाजे २५ शहरातील भ्रातृमंडळ परिसरातील लेवा पाटीदार वसतीस्थाने (१४० + ८० + २ + २ + १ = २२५ + २५ = २५०) मिळून अंदाजे अडीचशे गावातून मराठी भाषिक लेवा पाटीदार नांदतात.

या सर्व लेवा पाटीदार वसाहतीच्या केंद्रस्थानी भुसावळ शहर आहे. ते लोहमार्ग सडका व कच्चे रस्ते यांनी सर्वत्र जोडले आहे म्हणून भुसावळ जिल्ह्याची नवी निर्मिती झाल्यास त्यांची एक कार्यक्षम जिल्हा परिषद होऊ शकते, एक जिल्हा परिषद मुखपत्र हेच लेवा पाटीदार समाजाचे समांतर मुखपत्र होऊ शकते. आणि सर्व मराठी लेवा पाटीदार वस्तीचे शिक्षण, वधूवर, मेळावे, वर्तमानपत्रे, वार्ताहर, दूरभाष सवलतीने लोकल फोनची समाजसेवा, विद्युत केंद्र, पर्यटन केंद्रे,

साहित्य केंद्रे, समाज संघटन केंद्रे, राजकीय प्रचार संस्था, राजकीय पक्ष प्रभाव, वर्तमानपत्राचे जलद घरपोच वितरण, पत्राचा जलद बटवडा, आदिबाबत कार्यक्षमता वाढेल, एकात्मता वृद्धिंगत होईल, वधूवरांना वाढत्या संपर्कामुळे योग्य निवडीचे क्षेत्र विस्तारेल. विदर्भातील अल्पसंख्य म्हणून गैरसोयीच्या जागी फेकले जाणारे जिल्हा परिषद नोकर स्वकीय वस्तीत सुखासीन कर्तव्यदक्ष जीवन जगतील.

अखिल भारतीय लेवा पाटीदार महामंडळाचे 'आपले लेवा परीवार' या ऑक्टोबर ते डिसेंबर १९९४ च्या त्रैमासिक अंकात वर्ष १ अंक ४, पृष्ठ ९ वरील शंकर विठोबा पाटील दुधलगावकरांचा 'भुसावळ जिल्हा व्हावा' हा लेख या दृष्टीने माहितीप्रद वाटेल.

गाडेगावकर शाखा - राणे, नारखेडे, किनगे, तळोले, वाघोदे, बेंडाळे, नाले, फेगडे, वाणी, झांबरे, कोल्हे, नेहते, नाफडे, वराडे, कुरकुरे, वारके, भंगाळे, जावळे, चोपडे, [illegible] कोलते, डहाके, जंगले, लोखंडे, रोठे, भोळे, भारंबे, भिरुड, येवले, इंगळे, धांडे, रडे, [illegible] खर्चे, फिरके, बऱ्हाटे, बोरले, ३८ वे कुळ नेमाडे. या शाखेचे गुजराथेत रलवाड गावी गानमादवो हे आराध्य दैवत आहे. हे लोक सन १२५६ मध्ये पावागड (गुजराथ) येथून बैलगाडीने महाराष्ट्रात आले. लवापासून लेवाजातीची उत्पत्ती असल्यामुळे हे सूर्यवंशीय ठरतात.

श्री. शंकर निनु भारंबे, (एम.एसी.) कृषी अधिकारी प्रशिक्षण, व भेट योजना मलकापूर, आनंद सोसायटी, सुपे यांचे चक्कीजवळ, घराचा प्लॉट नंबर १९ असून हे मूळचे चांदूर बिसन्याचे असून त्यांच्या मते गाडेगावकर शाखेत खालील गावे येतात.

१.चांदूर बिसवा, २.म्हैसवाडी, ३.निपाणा, ४.तळणी, ५. दाभाडी, ६.खरबडी, ७.वरुड (आडविहिरीजवळ), ८.भुसावळ, ९. सावदा, १०. फैजपूर, ११. वरणगाव, १२. सुसरी, १३. अंजन सोंडे, १४. नशिराबाद, १५. निमगाव, १६. भादली, १७. कडगाव, १८. भालोद , १९.ब्राह्मणोद, २०.अमोदा, २१. न्हावी, २२. हिंगोणा बुद्रूक, २३. गाडेगाव, २४.नेरी, २५. जळगाव खानदेश, चारठाणा २६. कोथळी , २७. एदलाबाद, २८. साकरी, २९. फेकरी, ३०. चितोळा, ३१. डोंगर कठोरे, ३२. सुनसगाव, ३३. सातोद, ३४. खिरोदा, ३५. मस्कावद, ३६. पाडळशे, ३७. हंबर्डी, ३८. खडके, ३९. चिनावल, ४०. असोदा, ४१. किन्ही, ४२. उधळी, ४३. ममुराबाद, ४४. ओझरखेड, ४५. आंबिल होड अशी ४५ गावांची यादी त्यांचे स्मरणातून त्यांनी दिली, तर श्री. सुदाम भिकू राणे म्हैसवाडीकरांनी उर्वरीत ४६. तालसवाडा, ४७. हरणखेड (विदर्भ), ४८. आळंद, ४९. यावल, ५०. बेलव्हाड, ५१.इरादो, ५२. कुसुंबा, ५३. बेळी, ५४. सांगवी, ही नव नावांची गावे अधिक जोडून सूची पूर्ण केली.

याशिवाय अधिक माहितीसाठी १. डॉ. भोळे अखिल भारतीय कृषक समाजाचे कार्यकर्ते, मुक्काम जळगाव (पूर्व खानदेश), २. प्रकाश बापू पाटील, (अॅडव्होकेट) राहणार आंबिल होड, पोस्ट, खातखेड, ता. जामनेर, जिल्हा - जळगाव, ३. सुदाम भिमु राणे, मु.पोस्ट म्हैसवाडी, ता. मलकापूर, जिल्हा - बुलढाणा, ४. भुसावलकर नेहते, ५. रामभाऊ हरि झांबरे, सोनु बक्सु महाजन यांचा वाडा, विठ्ठल मंदिर वॉर्ड, भुसावळ, जि. जळगाव, वसंत कृष्णाजी भारंबे, गाडेगाव, पोस्ट नेरी, तालुका जामनेर जिल्हा जळगाव यांना भेटून काही माहिती मिळू शकेल, असेही माझ्या मित्राने मला सांगितले होते.

थोरगव्हाणकर, लेवा पाटीदार शाखा - यशवंत सीताराम चौधरी, मुक्काम सुनसगाव, पोस्ट सुनसगाव, ता. भुसावळ, जिल्हा जळगाव यांचे स्मरणातून थोरगव्हाणकर समाज शाखेची १५ गावे असल्याचे कळते. उदा. १. सुनसगाव, २. फुलगाव, ३. लहान वाघोदे, ४. वरणगाव, ५. पिंपळगावखुर्द, ६. यावल , ७. वढोदा, ८. बेळी, ९. साकेगाव, १०. तिघ्रा स्थानांतर साकेगावला,

११. हिंगोणा, १२. भालोद, १३. अट्रावल, १४. नायगाव, १५. डांभूर्णी, अशी १५ गावे आहेत. त्यापैकी थोरगव्हाण फुलगाव व वाघोदे खुर्द या तीन गावात शंभर टक्के थोरगव्हाणकर लेवा पाटीदार आहेत, तर इतर ठिकाणी काही घरे आहेत. इ.सन. १८४६ पाण्याच्या किरकोळ वादावरून सावदा व थोरगव्हारकरामध्ये मतभेद झाल्याचे तिथे ओझरते ऐकीवात आले.

यांच्यात १. कोल्हे, २. झांबरे, ३. नाले, ४. कोलते, ५. शिंदे, ६. कुरकुरे, ७. झोपे, ८. वराडे, ९. रोटे, १०. बाऊसकर, ११. राणे, १२. नाफडे अशी यांची आडनावे आहेत. याशिवाय डोंगर कठोरे, १७. बोरखेडा (कठोऱ्याजवळचे) १८. सुतगाव, १९. वेल्हाळे, २०. थोरगव्हाण, २१. गाते (सावद्याजवळील) ही गावे चौधरींना आठविली.

यावलचे माधवराव त्र्यंबकराव देशमुख यांची भेट होऊ शकली नाही. म्हणून त्र्यंबक सोनू झांबरे, ४७२ शितोळे नगर, सांगवी गाव, पुणे २७ हे फुलगावचे सेवानिवृत्त अनुभविक नागरिक आहेत. २. जगन्नाथ रंगो चौधरी, सातपुडा हौसिंग सोसायटी, सांगवी पुणे २७, ३. थोर सन्मित्र मंडळ, थोरगव्हाणकर लेवा पाटीदार समाज संघटना, जिल्हा पेठ जळगाव, पिन ४२१००१ यांनाही मी भेटण्याचा प्रयत्न केला होता.

या शाखेचे वधुवर मेळावे या वर्षी जळगाव, नाशिक, डोंबिवली येथे झाल्याचे ऐकले. थोरगव्हाणकरला मूळ जात कार्यालय होते. जळगाव, नाशिक, डोंबिवली येथे जात पंचायतीची विवाह मंडळे सुद्धा असल्याचे ऐकू येते. या शाखेत कवी आनंदा चौधरी, राहणार मांगी हल्ली इंन्दौरला होते. तसेच, तुकाराम महादू चौधरी अट्रावलकर हे रेव्हेन्यू खात्यात कलेक्टर पदापर्यंत गेल्याचेही ऐकले आहे. तसेच, कै. त्र्यबंक महादेव चौधरी अट्रावलकर हेही कलेक्टर होते असेही माझे ऐकीवात आले, व सीताराम दगडू पाटील हे पुण्यात पानमळयाच्या दत्तवाडीच्या बाजूला, पुण्याहून १० ते १२ मैलावर राहणारे सेवानिवृत्त हायकोर्ट जज्ज होते, असेही मला एकाने सांगितले. या सर्वांना भेटून खात्रीलायक माहिती विचारावीशी वाटली पण गाठभेट ऐवजी ऐकीव माहितीच द्यावी लागत आहे.

थोरगव्हाण हे सावद्यावरून जवळच आहे. चिनावलवरून एक मैलावर वाघोद्यावरून अडीच मैलावर आहे. पंढरीनाथ तुकाराम महाजन, औरंगाबाद हे शिक्षणखात्यात होते असेही कळते. रमेश पुरुषोत्तम चौधरी हे थोर गव्हाण हायस्कुलात उत्तम शिक्षक म्हणून सत्कारले गेले. थोरगव्हाणकर लेवा पाटीदारामध्ये सत्पंथी व महानुभाव पंथीय लोक नाहीत. मात्र, वारकरी व स्वामी नारायण पंथीयांचे अनुयायी यांच्यात आहेत. हे लोक खंडोबा, बहिरोबा, गणेश यांचे उपासक आहेत. लेवा पाटीदार जातीच्या थोर गव्हाणकर शाखेचे भाट (मांगटे) नाशिक व धुळे जिल्हयात नंदूरबारला आहेत.

थोर गव्हाणकर लेवा पाटीदार शाखेतील आडनावे - चौधरी, कोल्हे, देशमुख, पाटील, बाऊसकर, झोपे, शिंदे, नाले, कुरकुरे, महाजन, कोलते,मोपारी, झांबरे, (गोत्र भृंग ऋषी, कुलदैवत भैरवनाथ), किनगे, नारखेडे, राणे, वराडे, (गोत्र भृगु, कुळदैवत निमजाई), नेमाडे, वाटोळे, रोटे, मुंजेल अशी २१ आडनावे फक्त मिळालीत.

थोरगव्हाणकर शाखेतील लेवा पाटीदारांची वसती स्थाने :-

अ.नं.	गाव	पोस्ट	तालुका	अ.नं.	गाव	पोस्ट	तालुका
१.	थोर गव्हाण	थोर गव्हाण	रावेर	१७.	भालोद	भालोद	
२.	बोरखेड खुर्द	हिंगोणे	यावल	१८.	भुसावळ	भुसावळ	भुसावळ
३.	सुनसगाव	सुनसगाव	रावेर	१९.	वडोदा	वडोदा	यावल
४.	यावल	यावल	यावल	२०.	जळगाव	जळगाव	जळगाव
५.	साकेगाव	साकेगाव	भुसावळ	२१.	पिंपळगाव खुर्द	पिंपळगाव खुर्द	भुसावळ
६.	डोंगर कठोरा	डोंगर कठोरा	यावल	२२.	पिळोदे	पिळोदे	यावल
७.	लहान वाघोदा खुर्द	लहान वाघोदे	रावेर	२३.	सुतगाव	सुतगाव	रावेर
				२४.	डांभूर्णी	डांभूर्णी	यावल
८.	मांगी	मांगी	रावेर	२५.	एदलाबाद	एदलाबाद	एदलाबाद
९.	फुलगाव	फुलगाव	भुसावळ	२६.	नायगाव		
१०.	अट्रावल	अट्रावल	यावल	२७.	साखळी		
११.	विल्हाळे	विल्हाळे	भुसावळ	२८.	जामठी		
१२.	हिंगोणे	हिंगोणे	यावल	२९.	नाशिक		
१३.	वरणगाव	वरणगाव	यावल	३०.	मुंबई		
१४.	गाते	गाते	रावेर	३१.	देवास		
१५.	चूनवाडे	चूनवाडे	रावेर	३२.	भोपाळ		
१६.	बेळी		भुसावळ	३३.	उज्जैनी		

शाखावार लोकवस्तीचे तालुके :-

१. सावदेकर शाखियांचे वस्तीचे तालुके :- १. यावल, २. रावेर, ३. भुसावळ, ४. जळगाव, ५. एदलाबाद, ६. नांदुरा, ७. मलकापूर, ८. मोताळा या आठ तालुक्यात प्रामुख्याने राहतात. यांची जात पंचायत केंद्रे पाडळशे व दाताळा येथे आहेत

२. थोरगव्हाणकर शाखियांचे वस्तीचे तालुके :- १. यावल, २. रावेर, ३. भुसावळ या तीन तालुक्यात राहतात.

३. गाडेगावकर शाखेचे लोकांचे वस्तीचे तालुके :- १. भुसावळ, २. यावल तालुक्यात नांदतात.

४. कंडारीकर लेवा पाटीदार वस्तीचे तालुके :- कंडारीकर लेवा पाटीदारफक्त तालुक्यातच आहेत. हे चार शाखातील लेवा पाटीदारांची उपासना केंद्रे.

१. वारकरी पंथाचे केंद्र एदलाबाद कोथळी / मेहुणला आहे.

२. महानुभाव पंथाचे केंद्र भालोदला आहे.

३. स्वामी नारायण पंथाचे केंद्र सावद्यास आहे

४. सत्पंथाचे (पिराणा पंथीय) केंद्र फैजपूरला आहे.

या चार उपासना केंद्रातून त्या त्या पंथीयाबद्दल विशेष माहिती मिळू शकते.

"श्री. मधुकर उखर्डू वराडे, मॅट्रिक, कृषी सहाय्यक, मलकापूर, आनंद सोसायटी रोड, मलकापूर, जि. बुलढाणा, संपर्क फोन C/o S.S. Varhade 23623 यांनी दि. ३०-४-१९९८ ला पुढील माहिती दिली. श्री. मधुकर उखर्डू वरुडे मु.पो. थोरगव्हाण, ता. रावेर, जिल्हा-जळगाव हल्ली मुक्काम मलकापूर हे थोरगव्हाण शाखेतील असून त्यांच्या मते वराडे कुळाचे गोत्र भार्गव आहे. वराडे कुळाचे कुळदैवत निंबादेवी उर्फ निमजायदेवी असून हिचे मंदिर दुसखेडे स्टेशनपासून एक किलोमीटर अंतरावर आहे. यावलचे वतनदार देशमुख वराडे आडनावाचे असून हे कुटुंबनायक होते. यावलचे

किल्ल्यावर देशमुखांचे वाड्यात थोरगव्हाणकर प्रतिनिधींची दरवर्षी सुमारे १५० प्रतिनिधींची यावलकर देशमुखांचे अध्यक्षतेखाली सभा भरते.

थोरगव्हाणला पौष पौर्णिमेला भैरवनाथ यात्रा भरते. यंदा त्यात थोरगव्हाण शाखेचा वधूवर मेळावा भरला होता. कौतिक गरबड नारखेडे उर्फ के. नारखेडे हे मूळ थोरगव्हाणकर होते. या समाजात रघुनाथ रामकृष्ण पाटील आमदार होते. हे हल्ली ५० वर्षाचे असावेत. यांना थोरगव्हाणला जाऊन भेटल्यास कदाचित काही माहिती मिळू शकेल. किंवा यावलकर देशमुखाकडे काही माहिती मिळू शकेल.

माझ्या मते पाटीदारांना मांसाहार निषिद्ध होता. थोरगव्हाणकरांनी तो प्रथम सुरू केल्यामुळे त्यांचा मूळ समाजापासून संपर्क तुटला असावा काय ?

प्रकरण २५

लेवा पाटीदार रक्तगटातील शीख-धर्मगुरू व गुर्जर लोक

शीख लोक भारतात अत्यंत शूर आहेत. पंजाबात त्यांची वस्ती आहे. लेवा पाटीदारांची गंगोत्री सप्तसिंधू प्रदेशातच आहे. कूर्मवंशीय क्षत्रियांचा सूर्यवंश पंजाबातच जन्मला - वाढला. तेथूनच तो चहूकडे पसरला. त्या वंशातच ४० वे पिढीत प्रभू रामचंद्राचा मुलगा लव व कुश यांचा जन्म झाला. या लवाचे वंशालाच 'लेवा' म्हणतात. लव कूर्मवंशी क्षत्रिय होता म्हणून लेवा हे कूर्मीवंशी क्षत्रिय होत, व अदितीचा वंश आदित्य वंश होय. विवस्वान हा आदित्य उर्फ सूर्य वंशीय होय. आदितीपुत्र विवस्वानाच्या या सूर्यवंशात भारतातील श्रेष्ठ पुरुष जन्माला आलेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'शूद्र मूळचे कोण होते ?' ह्या ग्रंथात, पृष्ठ २११ वर बाबासाहेब लिहितात की, "सूर्यवंशाचे जे क्षत्रिय होते ते तडफदार, बाणेदार होते... सूर्यवंशाचे क्षत्रिय लोक विद्येच्या बाबतीत ब्राह्मणाइतके विद्वान होते. एवढेच नव्हे तर ब्राह्मणापेक्षा ते उच्च दर्जाचे विद्वान राजर्षी म्हणून समजले जात असत. वैदिक ऋचा रचणारे जे लोक होते. त्यांच्यात क्षत्रिय लोक अग्रगण्य होते."

१) बौद्ध धर्म संस्थापक गौतमबुद्धाचा जन्म शाक्यवंशीय कपिलवस्तुच्या शुद्धोदन राजाचे पोटी झाला. शाक्य स्वयं को कोशल के ईक्ष्वाकू (सूर्यवंश) की एक शाखा मानते थे। शाक्य राज्य के लिए महत्त्वपूर्ण बात महात्मा बुद्ध का इसी राज्य मे जन्म लेना था। (युनिफाईड इतिहास लेखक- डॉ. ए.के. मित्तल, आवृत्ती १९९५, पृष्ठ ४५ पहा).

२) वर्धमान भगवान महावीराने जैनधर्म स्थापन केला. त्याचा जन्म वैशाली नगरच्या कुंड ग्राम नामक स्थानी उत्तर विहारात एका लिच्छवी गणराज्यात झाला. युनिफाईड इतिहास, पृष्ठ ४५ वर लिच्छवी शासक ईक्ष्वाकू वंशीय क्षत्रिय असल्याचे म्हटले आहे, व हा ईक्ष्वाकू वंश म्हणजे सूर्य वंश होय.

३) पंजाबात लाहोरपासून ४० मैलांवरील तलवंडी राय भोयी ह्या खेड्यात जन्मलेल्या गुरु नानकाने शिखधर्म संस्थापन केला. नानकापासून गोविंदसिंहापर्यंत शीख पंथाचे एकूण १० गुरु पंजाबात झाले. "शिखांच्या मते लव-कुश यांच्या म्हणजे प्रभू रामचंद्राच्या सूर्यवंशातील क्षत्रिय घराण्यात या दहाही गुरुंचा जन्म झाला. गुरु गोविंदसिंह लिखित विचित्र नाटक नामकचरित्र ग्रंथात हेच सांगितले आहे. नानकदेवाचे घराणे लववंशी; त्यांचे आडनाव वेदी." (शिखांचा पंथ व इतिहास

लेखक- विश्वकोशकार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. आवृत्ती ५-१२-१९८४, पृष्ठ ६ पहा.)

या तीनही धर्माचे संस्थापक सूर्यवंशातीलच होय. यावरून एका लेवा कूर्मी क्षत्रियानेच शीख धर्म स्थापिला असे म्हणता येते. पंजाबातील भूमिपुत्र जाट हेही कूर्मीक्षत्रिय रक्तगटातीलच होत. "शिखांचा धर्मग्रंथ रचना करणारे शीख धर्मीय गुरु अर्जुनसिंहांनी गुरु ग्रंथसाहेबाची संपूर्ण बांधणी इ.सन १६०४ मध्ये पूर्ण केली." (शिखांचा पंथ व इतिहास, पृष्ठ १५ वरून) याच गुरु अर्जुनसिंहांनी "हजारो जाटांना शीख धर्माची दीक्षा दिली." (शिखांचा पंथ व इतिहास ले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पृष्ठ १५ वरून) "गुरु ग्रंथ साहेब या शीख धर्मग्रंथात नानकदेव, अंगदेव, अमरदास, रामदास, अर्जुनदेव या (लववंशी) शीख धर्मगुरुंचे संपूर्ण पद्य समाविष्ट केले. परंतु त्याबरोबरच या गुरुंच्या पूर्वी व त्यांच्या समकाली झालेले भारतातले भक्तिमार्गी संत होते, जे भक्तिमार्गात जातिभेद व पंथभेद मानत नव्हते. त्यांचाही निवडक पद्यरचना समाविष्ट केल्या.

प्रभू रामचंद्राच्या क्षत्रिय लववंशी सूर्यवंशात जन्मलेल्या दहाही शीख गुरुंचा (शिखांचा पंथ व इतिहास, लेखक- विश्वकोशकार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या ग्रंथाचे पृष्ठ ६ चे आधारे) जन्म कूर्मी क्षत्रिय सूर्यवंशी लवाच्या वंशात म्हणजे लेवा कुणबी कुळात झाला. त्यांची नावे अशी - नानकदेव (१४६९ ते १५३९), अंगद (१५०४ ते १५५२), अमरदास (१४७६ ते १५७४), रामदास (१५३४ ते १५८१), अर्जुन, (१५६३ ते १६०६), हरगोविंद (१५९५ ते १६४४), हरहर राय (१६१० ते १६६१), हरिकिशन (१६५६ ते १६६४), तेजबहादूर (१६२१ ते १६७५), गोविंदसिंह (१६६६ ते १७०८) हे शिखांचा पंथ व इतिहास, पृष्ठ २ वरून दिसून येते.

गुरु नानकांनी परदेशगमन बंदी तोडून मक्का-मदिना यात्रा केली. (शिखांचा पंथ व इतहिास पृष्ठ ९ वरून). या लववंशात जन्मलेल्या शिखांचा धर्मगुरु अंगद याने गुरुमुखी लिपी तयार केली. (शिखांचा पंथ व इतिहास, पृष्ठ १२ वरून). कूर्मवंशी लवाच्या वंशजांची ही भारताला आणखी एक नवी देन होय.

"एका जनमसारवीमध्ये अमरदास हे भगवान रामचंद्राचा बंधू भरत याच्या वंशातले होते असे म्हटले आहे. (शिख पंथ व इतिहास, पृष्ठ १३). याच अमरदासने सामूहिक सहभोजनाची प्रथा 'गुरु का लंगर' या नावाने विस्तारली. चौथे गुरु रामदास यांनी रामदासपूर उर्फ अमृतसर वसविले. गुरु अर्जुनदेवांनी तेथे हरिमंदिर उर्फ सुवर्णमंदिर उभारले. व सन १६०४ मध्ये गुरु ग्रंथसाहेब ह्या एका धर्माच्या मुख्य धर्म ग्रंथाची रचना पूर्ण केली.

कुलमी क्षत्रिय लेवा पाटीदारांचे पावागडच्या पठारावरील कुलदैवत असलेली सशस्त्र महाकाली माता या क्षत्रिय कुळदेवी भवानीचे विक्राळ व रौद्र रूप आहे. अशा त्या क्षत्रिय कुलदैवत भवानीचे चंडिचरित्र गुरु गोविंद सिंहानी लिहिले आहे. दुर्गाष्टमीला चंडिमहोत्सव केला. तिच्या समोर खालसा सैन्याची उभारणी केली. **धर्मात लोकशाही संस्थापिली**. हा लेवा कूर्मीयांचा आचार पूर्वी कसा होता हे उदाहरण आजच्या लेवाच्या वंशजांना प्रेरक होणार नाही काय ? गुरु गोविंदसिंहाचे काळात पंजाबातील हिंदू कुटुंबातून एक तरी मुलगा शिखधर्माला वाहत असत. "हिंदू व शीख असा भेद असला तरी लग्नाच्या बाबतीत म्हणजे मुलगी देण्याचे बाबतीत हा भेद कधीच मानला गेला नाही." (शिखांचा पंथ व इतिहास, ले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पृष्ठ ४६ वरून).

या सूर्यवंशी कूर्मी क्षत्रिय कुलोत्पन्न ईक्ष्वाकू नरेश मान्धाताचा पुत्र पुरुकुत्सने आपली पत्नी नर्मदा हिच्या नावावरून रेवा नदीचे नर्मदा असे नामकरण केले आहे. तत्पूर्वी रेवा नदी म्हणून ती महशूर होती. तिच्या काठी असणाऱ्या शत्रुघ्नाचा पुत्र शत्रुघातीने विदेशावर शासन केले. कुशावती ही त्याची राजधानी होय. (उपकार स.प्र. सामान्यज्ञान, पृष्ठ ११ वरून). इ.सन १३७० मध्ये फारुकी वंशातील मलिक राजाने राज्य स्थापले. ते राज्य सन १६०० पर्यंत होते. म्हणजे सुमारे सव्वादोनशे वर्षे खानदेशावर फारुकी सत्ता होती. (महाराष्ट्र परिचय, पृष्ठ ७ वरून). त्या अगोदर

सन ११८९ पर्यंत उत्तर कालीन चालुक्य व तदनंतर सन १३०७ पर्यंत महाराष्ट्रात यादव राज्य होते.

सुमारे ८५० वर्षापूर्वी म्हणजेच लेवा पाटीदारांचा येथे प्रवेश होण्यापूर्वी बुलढाणा जिल्ह्यात पिंपळगाव राजा हे गाव एका गवळी राजाने वसविले. असा ज्ञानकोशातही उल्लेख सापडतो. (महाराष्ट्राचे जिल्हे, बुलढाणा, पृष्ठ ३९, महाराष्ट्र शासनाने प्रकाशित). रोहिणखेडला आद्य मराठी ग्रंथ श्रीपतीने रचल्याचा ५८ व्या मराठी साहित्य संमेलनातील परिसंवादात उल्लेख आहे. कंबळनाथला नवनाथांपैकी एकाचे तपश्चर्या-स्थान असल्याचा बुलढाणा जिल्हा गॅझेटियरमध्ये उल्लेख आहे. याच परिसरात श्री. चक्रधराचे प्रत्यक्ष आगमन झाल्याचा महानुभाव ग्रंथात इतिहास आहे. अल्लाउद्दीन खिलजीची देवगिरीवर स्वारी याच मार्गे सन १२९५ मध्ये झाली होती. असा हा भाग महंमद तुघलगचे सत्तेखाली सन १३२३ साली आला होता. तसेच, सन १३४७ मध्ये त्याचा प्रमुख सरदार अल्लाउद्दीन हसन गंगूने दक्षिणेत स्वतंत्र बहामनी राज्य संस्थापिले, अशा अस्थिर राजवटीत लेवा पाटीदारांचे पुनर्वसन झाले.

इतिहास काळात महाराष्ट्रातील क्षत्रियात सूर्यवंशी, चंद्रवंशी असे शब्दप्रयोग मात्र सातव्या आठव्या शतकापासून आढळतात. (महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास व संस्कृती, लेखक- प्रा. द.बा. डिसकळकर, पृष्ठ ६७ वरून). अशा या लेवा पाटीदारांच्या परिसरात "मराठी भाषेचा उद्‌गम ७ व्या ८ व्या शतकात झाला असावा." (महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास व संस्कृती, ले. प्रा.द. बा. डिसकळकर, पृष्ठ १२४) म्हणजेच मराठी भाषेचा उगम व सूर्यवंशी व चंद्रवंशी क्षत्रिय असा शब्दप्रयोग एकाच वेळी झाला असावा.

म्हणजेच ७ व्या ८ व्या शतकाचे अगोदर सूर्यवंश होता, पण सूर्यवंश शब्दप्रयोग रुढ नव्हता. तसेच, इसवी. सन १०९४ च्या सिद्धराज जयसिंहापासून महंमद बेगडाचे कालापर्यंत इ.सन १४८७ लेवाकूर्मीयांना पाटीदार हे नाव पडले. व प्रभू रामचंद्र सुत लवानंतर म्हणजे इ.सन पूर्व १६४१ नंतर लेवा हे नाव पडले. इसवी सन पूर्व २७६१ च्या दक्षकाळात अदिती कुर्मवंशी कश्यपाला दिली होती. म्हणून इ.सन पूर्व २७६१ पासून या वंशाला कूर्मवंश म्हणू लागले.

म्हणजेच इ.सन पूर्व २७६१ पासून कूर्मी, इ.सन पूर्व १६४१ पासून लेवा, सन १०९४ पासून पाटीदार म्हणू लागले. व इ.सन पूर्व ४०२१ पासून ठेलार अवस्थेत रक्षणकार्य केल्यापासून क्षत्रिय म्हणू लागले. म्हणून आपल्या जातीचे नावाचा उल्लेख कुलमी (सन. पूर्व २७६१) क्षत्रिय (सन पूर्व ४०२१) लेवा (इ.सन पूर्व १६४१) पाटीदार (इ.सन १४८३) असा काल परत्वे होऊ लागला.

असा हा मराठी भाषिक लेवा पाटीदार प्रदेश इ.सन १३७० पर्यंत खानदेश तुघलजांच्या सत्तेखाली होता. व पुढे सन १३७० ते १६०० पर्यंत फारुकी अंमलाखाली होता. त्यानंतर मोगल सम्राट अकबराचे येथे राज्य आले. (महाराष्ट्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या महाराष्ट्राचे जिल्हे जळगाव, पृष्ठ ७ वरून)

ता. ६-१-१९१८ च्या तहाने सातपुड्याचे दक्षिणेकडील होळकरांचे राज्यातील सर्व खानदेश इंग्रजांकडे गेला होता. (महाराष्ट्राचे जिल्हे, जळगाव, पृष्ठ ७ वरून). तत्पूर्वीचा फारुकी अंमलात खानदेशाचा सुलतान नासिरखानने त्याचा जावई अल्लाउद्दीन बहामनीवर स्वारी केली. व मलकापूरपासून १५ मैलांवरील रोहिणखेडला सन १४३७ साली ही स्वारी झाली. पुन्हा इ.सन १५९० च्या सुमारास अहमदनगरच्या राजकुमार बुरहानने खानदेशाचा राजा अलिखान बरोबर जमालखानावर याव रोहिणखेडला हल्ला केला. अशा प्रकारे रोहिणखेड हे दोनदा रणक्षेत्र झाले. (महाराष्ट्राचे जिल्हे बुलढाणा, पान ३८ वरून)

अशा ह्या परिसरात सुमारे ५०० वर्षापूर्वी

खानदेशातील फारुकी घराण्यातील राजाने मलकापूर शहर वसविले. त्याने आपल्या मलिका राजकुमारीच्या नावावरून मलकापूर हे नाव दिले. याच सुमारास ह्या धामधुमीच्या प्रदेशात लेवा पाटीदारांचा येथपर्यंत प्रवेश झाला. शेंबा, आडविहीर, पुन्हई, बोराखेडी, तरोडा, मोताळा या

भागापर्यंत लेवा पाटीदारांनी वसाहती केल्या. इ.सन १७२९ च्या सुमारास मलकापूरभोवती तटबंदी केली. असे हे मलकापूर नरनाळ्याच्या सरकारची राजधानी होती असे एने-इ-अकबरी या प्रसिद्ध इतिहास ग्रंथात उल्लेखिलेले आहे. निजामाचे काळात येथे २००० फौजेचे हे ठाणे होते. ब्रिटीश काळात ब्रिटीशांचे राजदूत कर्नल कॉलिन्स यांनी दौलतराव शिंदे व रघुजी भोसले ह्यांना आपले अधिकार पत्र इ.सन १८०३ साली मलकापूर येथे दिले होते. सन १८४९ साली मलकापूरला ५ पिलाई (जिनिंग) कारखाने होते. असा उल्लेख सापडतो.

तर असे महाराष्ट्राचे जिल्हे बुलढाणा पृष्ठ ३९ वर वर्णिलेले मलकापूर शहर आहे, व अशा ह्या परिसरात लेवा पाटीदारांची वस्ती सुमारे ५०० वर्षांपासून अंदाजे ८० गावातून आजही विद्यमान आहे.

महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, जळगाव जिल्हा गॅझेटियर, संपादक- डॉ. कि.का.चौधरी, आवृत्ती १९९४, पृष्ठ १८३ वरून कळते की, पाटीदारांची वस्ती मध्यप्रदेश, राजस्थान, पश्चिम बंगाल, पूर्व राजस्थान, पंजाब आदी भागात आहे. लेवा पाटीदार भाटांच्या मते राजस्थानातून गुजराथ मार्गे खानदेशात क्रमाक्रमाने हा वसाहत विस्तार होत आला.

महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र भूमी व लोक' संपादक- डॉ.कि.का चौधरी मराठी सुधारित आवृत्ती सन १९९६, पृष्ठ ८१ वरील कुणबी या शीर्षकाखाली डॉ. चौधरी लिहितात की, "गुजराथमध्ये कणबी, उत्तर प्रदेश व बिहारात कूर्मी, दख्खनमध्ये कुणबी, कुळंबी, कुळवाडी या व्यवसाय दर्शन शब्दांनी प्रमुख कृषीप्रधान जातींना ओळखतात. महाराष्ट्रातील कुणबी जातीत मराठा, कोकणी, खानदेशी व गुजर असे प्रमुख प्रादेशिक गट आहेत. त्यात पुन्हा पोटजाती आहेत. कोकणी कुणब्यात १. देताळे किंवा काळे २, तल्हेरी, तिलोरी असे गट आहेत. खानदेशी कुणबी गटात सात उपगट आहेत ते असे- घाटोळ, कुंभार, मद्राज, लोणी, पांजणा, तिरळे किंवा तिरोळे आणि वंजारी कुणबी हे होत. गुजर कुणबी ही खानदेशातील पोटजात मुळात गुजराथी कुणबी जातीची शाखा असावी. त्यांच्यात अनला, डाळे, ढोरे, गारी, कडवा, खापरा, गाड किंवा लोंडारी आणि लेवा (रेवा) असे सात उपगट आहेत. लेवा कुणबी, लेवा पाटीदार गुजराथमधून आलेले आहेत. राजस्थान व भरतपूर मधील जाट जमातीत असलेले चौधरी हे नाव लेवा कुणब्यात बऱ्याच कुटुंबात दिसते.

विदर्भात झाडे कुणबी हे सर्व प्रथम स्थायिक झाले. तिरोळे कुणबी हे बहुसंख्य आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात माना कुणबी, धनोजे कुणबी व भंडारा जिल्ह्यात खैरे कुणबी, झाडे कुणबी या पोटजाती दिसतात. नागपूर भोसल्याचे कारकिर्दीत 'देशमुख वतन' सहसा मराठा अशा प्रमुख कुणब्यांकडेच असे.

कुणबी जातीत देवक पद्धती आहे. एकच देवक असणाऱ्या व्यक्तींचा विवाह होत नाही. मराठा व कुणबी समाजातील पुरोगामी विचारांच्या लोकांनी ह्या दोन जातीत ऐक्य घडविण्याचे दृष्टीने या दोन गटात लोकांनी विवाहसंबंध सुरू केले.' अशा प्रकारचे वर्णन महाराष्ट्र गॅझेटियर जळगाव जिल्हा, पृष्ठ ८१ व ८२ वर, डॉ.कि.का. चौधरींनी केले आहे ते मुळातूनच वाचा.

विशेष माहितीसाठी भारतातील जाती-जमातींचे अभ्यासक आर.इ.एन्थोव्हेन, आर.व्ही. रसेल, रायबहादूर पंडित हिरालाल, सईद सिराज-उल-हसन, इरावती कर्वे व इतर मान्यवर अभ्यासक त्याचप्रमाणे मुंबई इलाख्याचे व सी.पी. अँड बेरार १९०१, १९११ व १९३१ मधील जनगणना अहवाल व अगदी अलिकडे ॲन्थ्रापॉलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया या भारत सरकारच्या विभागातर्फे के.एस. सिंग यांनी संपादित केलेला 'पीपल इन इंडिया' हा ग्रंथ तसेच, जिल्हा गॅझेटियर ग्रंथातील माहिती, तसेच, विविध जातीजमातीच्या जातीय संस्थांची वेळोवेळी निघणारी माहितीपत्रके, स्मरणिका, अहवालपत्रके पहा. दुधलगाव बुद्रूक येथील चैतन्य प्रकाशन संस्थेचे संशोधन केंद्रातही

बरीच माहिती जमविली आहे. तिचासुद्धा अभ्यासकास फायदा मिळू शकेल.

जळगाव जिल्हा गॅझेटियर, आवृत्ती २ री, सुधारीत, १९९४, ले.डॉ. चौधरी, पृष्ठ ५९८ नुसार आता जळगाव जिल्हयातील १३ तालुक्यात १४७५ गावे आहेत. त्यापैकी १४४८ गावत वस्ती असून पूर्वीच्या गावापैकी २७ गावे निर्जन झालीत. प्रशासकीय सोयीसाठी जळगाव जिल्हयाचे जळगाव, अमळनेर, चाळीसगाव असे तीन महसूली विभाग आहेत व त्याची विभागणी १३ तालुक्यात झाली आहे. जळगाव उपविभागात जळगाव, भुसावळ, यावल, रावेर व एदलाबाद हे तालुके येतात. यात लेवा पाटीदार वस्ती बहुसंख्य आहे. अमळनेर उपविभागात अमळनेर, पारोळा, एरंडोल, चोपडा तालुके येतात तर चाळीसगाव उपविभागात चाळीसगाव, भडगाव, पाचोरा, जामनेर तालुके आहेत. या जिल्हयात सन १९८९ मध्ये ३२ मंडळ अधिकारी व ३५ मंडल निरीक्षक होते. मामलेदारांच्या मदतीसाठी अव्वल कारकुनांच्या दर्जाचे मंडळ अधिकारी व कारकुनाच्या दर्जाचे मंडल निरीक्षक नेमतात. यांचेकडे प्रत्येकी ३० ते ३५ खेड्यांचा कार्यभार असतो. जळगाव जिल्हयात सन १९८९ साली मासिक पगारी पोलीस पाटीलांची संख्या १३९१ होती व जिल्हयात सन १९८९ मध्ये ५२६ तलाठी होते.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ नुसार जळगाव जिल्हयात ता. १ मे १९६२ रोजी जिल्हा परिषद व १३ पंचायत समित्या स्थापन झाल्या.

१. जळगाव पंचायत समितीत ८७ गावे, ६७ ग्रामपंचायतीवर १८ सदस्य आहेत.
२. एदलाबाद पंचायत समितीत ७९ गावे, ५४ ग्रामपंचायतीवर १७ सदस्य आहेत.
३. भुसावळ पंचायत समितीत १०५ गावे, ७३ ग्रामपंचायतीवर १७ सदस्य आहेत.
४. रावेर पंचायत समितीत १४४ गावे, ९१ ग्रामपंचायती आहेत.
५. यावल पंचायत समितती ८४ गावे, ६४ ग्रामपंचायती आहेत.

जळगाव उपविभागात एकूण ४९९ गावे, ३४९ ग्रामपंचायती आहेत.

याशिवाय १ जळगाव नगर पालिका स्थापना १८६४, २. भुसावळ नगर पालिका स्थापना १८८२, सावदा नगर पालिका स्थापना १८८३, यावल नगरपालिका स्थापना १८८४,रावेर नगरपालिका स्थापना १८९२, फैजपूर नगरपालिका स्थापना १८८९ ह्या नगरपालिकातून लेवा पाटीदार वसती आहे.

जातीसंबंधीच्या माहितीचे संदर्भ साहित्य व आकडेवारी मिळवून लेवा पाटीदार जातीविषयक अनुषंगिक संशोधनार्थ वरील माहिती उपयुक्त ठरेल असे वाटल्यावरून थोडे विषयांतर करून सदर माहिती मुद्दाम देत आहोत. वरील दिलेल्या गावांच्या ताज्या मतदार याद्याद्वारे प्रत्येक पंचायत समितीतील गाववार लेवा पाटीदारांच्या मतदार सूच्या केवळ शासकीय याद्यांची झेरॉक्स करून त्यावरील लेवा पाटीदार मतदारावर खुणांकरून अशा याद्या व मतदार संख्या निवडणे कमी त्रासाचे व अल्पावधीत सहज होणे शक्य वाटल्यावरून हा उपक्रम केला.

याचप्रमाणे बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर, मोताळा व नांदुरा या तीन पंचायत समित्यांच्या परिसरात अनुक्रमे ६० + १०२ + ८६ = एकूण २४८ गावांच्या तीन तालुक्यातून वस्ती नांदते. त्यापैकी लेवा वस्तीची असलेली सुमारे ८० गावातूनच ही लेवा वस्ती आहे. ही गावे निवडा त्याची सूची बनवा. मुक्काम + पोस्ट + तालुका + जिल्हा + पिनकोड क्रमांक + शेजारचे मोटार स्टॅंड वा स्टेशन + लोकसंख्या + असल्यास (पी.सी.ओ.) चा फोन क्रमांक अशा सुमारे नऊ रकान्यात ह्या बुलढाणा जिल्हयातील ८० लेवा पाटीदार वस्तीची गावे + जळगाव गावापैकी सुमारे १४० लेवा पाटीदार वस्तीची गावे मिळून एकूण २२० गावे + जळगाव जिल्ह्यातील वर दिलेल्या ६ नगर पालिकेची गावे + बुलढाणा जिल्ह्यातील बुलढाणा + मलकापूर + नांदुरा + मोताळा ही चार तालुक्यांची काही नगरपालिका असलेली गावे मिळून एकूण ८० + १४० + ६ + ४ = २३०

गावांची लेवा पाटीदार ग्रामनाम सूची + भारतातील प्रमुख २० शहरातील वरील आठ तालुके सोडून इतर भ्रातृमंडळांच्या लेवा पाटीदार सभासद सूची सह २३० गावे + २० भ्रातृमंडळे = २५० गावातूनच मराठी भाषिक असलेल्या सुमारे फक्त साडेचार लाख वस्ती असलेल्या लेवा पाटीदारांची संपूर्ण ग्रामनामसूची वरील नऊ रकान्यात छापून कोणी प्रसिद्ध करून कार्यकर्त्यात वितरीत केल्यास तिच्या सहाय्याने गाववार आडनाव सूची + गोत्र सूची + कुळदैवत सूची + ग्रामनामक सूची ह्याची संपूर्ण आकडेवारी सहज तयार करता यावी म्हणून एवढी माहिती देत आहे.

ह्या २३० गावांची वस्ती एका सलग व संलग्न परिसरात तापी-पूर्णा खोऱ्यात जळगाव, यावल, रावेर, एदलाबाद, भुसावळ, मलकापूर, मोताळा, नांदुरा ह्या फक्त आठ तालुक्यातून उत्तरेस सातपुडा व दक्षिणेस अजिंठा डोंगराचे मधील सुपिक खोऱ्यात मुंबई ते जळगाव ते भुसावळ ते बोदवड ते मलकापूर ते नांदुरा ते शेगाव ते नागपूर ते कलकत्ता ह्या दुहेरी ब्रॉडगेज रेल्वे मार्गावर आहे. तीमधून धुळे, जळगाव, भुसावळ, बोदवड, मलकापूर, नांदुरा गावावरून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ जात असून जळगावला उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आहे. ह्या लेवा पाटीदार वस्तीच्या मध्यवर्ती स्थानी प्रसिद्ध भुसावळ शहर असून तेथून सर्वत्र मार्ग एकत्र येऊन मिळतात. अशा ह्या संलग्न असलेल्या क्षेत्रफळाच्या आठ लेवा पाटीदार वस्तीच्या तालुक्यासह भुसावळ जिल्हा निर्मिल्यास सर्व मराठी भाषिक लेवा पाटीदार एकत्र येऊन त्यांची एक जिल्हा परिषद, एक सर्वजात स्पर्शी वर्तमानपत्र, एक वधुवर सूची, एक जातीचे केंद्रीय कार्यालय (सहसा भुसावळ) आदी बाबी एकत्र आल्यास एकात्मता वाढून लेवा पाटीदार प्रगतीचा वेग वाढेल. यासाठी लेवा पाटीदार समाजाने व लेवा पाटीदार समाज नेत्यांनी संघटित मागणी शासन दरबारी करावी. यासाठीच विषयांतर करून हा लेखन प्रपंच केला.

हल्लीचा लेवा पाटीदार समाज असंघटित आहे. 'संघशक्ती कलौयुगे' हे तत्त्व आचरल्याशिवाय म्हणजेच- संघटित झाल्याशिवाय समाज शक्तिमान होणार नाही. व दुबळ्या, असंघटित समाजाचा ऱ्हास वेगाने होतो. 'देवो दुर्बल घातक:' ह्या न्यायाने देवच त्या दुर्बलांना (सरव्हायवल ऑफ द फिटेस्ट) संघर्षात पराभूत करून नेस्त नाबूद करतो, किंवा पर्यायाने तो समाज तेजोहीन होत जातो. पूर्वी बलदंड असलेला लेवा समाज अपखंडित होत-होत व असंघटित होत होत आज अगदी दुर्बल, नेभळा व तेजोहीन बनत आहे. यांच्यात राष्ट्रीय स्तरावरील नेता, लेखक, विचारवंत, संत, पत्रकार, राजकारणी, नट, समाजसेवक हल्ली नावघेण्यालायक एकही दिसत नाहीत, आणि असे लोक आकाशातून टपकत नाही. अगदी हीन-दीन अस्पृश्यांना "शिका-संघटित व्हा-संघर्ष करा" हा नारा देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तळागाळातील दलितोद्धाराची घोडदौड संताजी घोरपडे व धनाजी जाधवांच्याही सवाई जोमाने पुढे रेटून समाज प्रगती केली. आज त्यांच्या प्रयत्नाचा आदर्श प्रत्येक समाज सेवकाने घ्यावा, असे त्यांचे समाज संघटनकार्य बहरते आहे.

गतेतिहासापासून आपणास प्रेरणा मिळते म्हणून मराठी भाषिक लेवा पाटीदार समाजाच्या जन्मापूर्वीपासून या समाजवंशाचा प्रेरक इतिहास मुद्दाम दिला आहे.

इ.सन पूर्व ४०२१ वर्षांपूर्वी झालेल्या स्वायंभूव मनुपासून शिकारी अवस्था टाकून पशुपाल अवस्थेत आलेल्या मानव समाजात प्रथम टोळी टोळीने जगून प्रथम रक्षक अशा क्षत्रियवर्णाची निर्मिती झाली. तदनंतर इ.सन पूर्व २७६१ मध्ये झालेल्या दक्षराजापर्यंत सत्ययुगात देववृत्तीने नांदलेला मनुष्य समाज यापुढे स्थायी वस्ती करून कृषीकर्माचरणाने काश्यपापासून कूर्मवंशी कृषक जातीत परिवर्तीत होत गेला. त्यातूनच पुढे इ.सन १००० पर्यंत चिंतनशील कृषकामधनच ब्राह्मण वर्ग जन्मला. वेदरचना होऊ लागली. दक्ष पुत्री अदिती + मरिची पुत्र कश्यपापासून उर्फ कुर्म ऋषीपासून पुढे विवस्वान आदित्य जन्मले. या वैवस्वत कुळात मनुने मानववंश विस्तारला. त्याचा पुत्र ईक्ष्वाकूने अयोध्येस या सूर्यवंशाचे राज्य संस्थापिले. त्यात ४० वे पिढीत रामचंद्र सूत

लव व कुश जन्मले. यांचा वंश विस्तार हाच लबापासून लेवा वंश होय. एवंच स्वायंभूव मनुर्भरत (इ.सन पूर्व ४०२१) ते दक्षराज (इ.सन पूर्व २७६१) पर्यंतचा देव गण समूह इसन पूर्व २७६१ मधील दाक्षायणीसूत आदितीपासूनचा वंश कश्यपवंश प्रभू रामापर्यंत त्रेतायुगात सूर्यवंशी कूर्मक्षत्रिय वंश वाढला. यालाच प्रभू रामचंद्र सुत लवापासून (इ.सन पूव; १६४१पासून) तर भारतीय महायुद्धात इ.सन. पूर्व १२७७ पर्यंत कूर्मवंशी क्षत्रिय लेवा म्हणता येईल. हाच द्वापारयुगातील काल होय. यापुढे इ.सन पूर्व १२७७ पासूनचा हा समाज इ.सन पूर्व ७८ मध्ये पंजाबात हा सुमित्र काळात राज्यहीन झाला. स्थानांतरीत होऊ लागला. व स्थानांतरित झालेला समाज लववंशी असल्याने स्थानांतरानंतरच लेवा कूर्मी म्हणून इतरत्र ओळखला जाऊ लागला. या अशा स्थानांतर लाटेतूनच इ.सन १४४ मध्ये कूर्मीवंशी सूर्यवंशीय लवकुलोद्‌भव ५९ व्या पिढीतील कनकसेन गुजराथेत येऊन राज्य संस्थापून राहिला. तिथे पंजाबातील लवाच्या वंशजांच्या लेयॉ प्रदेशातून निर्वासित झालेला लेवा कूर्मी गुर्जरासह सौराष्ट्रात स्थायिक झाला.

त्यामुळे सौराष्ट्र देश गुजराथ नावात परिवर्तित झाला. ह्या गुजराथी आर्य उर्फ **गुर्जर समाजापासून लेवा पाटीदार समाजाची निर्मिती झाली असे, बुलढाणा जिल्हा गॅझेटियर, आवृत्ती २ री, सुधारित इंग्रजी प्रत १९७६, पृष्ठ २२७ ओळ २४ मध्ये लिहिले आहे.** 'कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास' लेखक- डॉ. मंगूभाई रामदास पटेल, पाटीदार संशोधन और प्रकाशन ट्रस्ट, अहमदाबाद के संशोधक अहमदाबादके गुजराथ युनिर्व्हसिटीके इतिहास विभाग के रीडर, श्री. पटेल अपने ग्रंथके उपसंहारमे पृष्ठ ४४० परिच्छेद २ मे लिखिते है की, **"पंजाब के गुर्जरोंमेभी लेवी नामकी प्रजाती है। गुर्जर और जाट भी लेऊवा कडवा पाटीदारही है।"**

खानदेश, गॅझेटियर, १८६०, पृष्ठ ६८ चा दाखला देऊन, जळगाव जिल्हा गॅझेटियर, जळगाव जिल्हा १९९४ ची मराठी आवृत्ती, संपादक डॉ. कि.का. चौधरी, पृष्ठ १८६ वर लिहितात की, "Truthful, orderly and frugal almost to niggardliness, they are the most hard working, industrious and simple minded of the khandech agricultural population. Since the great disput which broke up their caste, they have been remarkable for the apparent absence of Jealousie and treacheries which distinguish the Gujar Kunbis."

तसेच, 'जळगाव जिल्हा गॅझेटियर', मराठी प्रत १९९४, पृष्ठ १८६ चे आधारे असे पाचव्या शतकात गुर्जरांनी भारतावर आक्रमण केले. गुर्जर ही पशुपालक जात असून पंजाब, हिमाचल प्रदेश, बुंदेलखंड, राजस्थान, गुजराथ, उत्तरप्रदेश, काश्मिरात यांची वस्ती आहे. पंजाब व काश्मिरातील बाटलेले सुन्नी मुसलमानही पूर्वी गुजर होते. डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर व स्मिथ यांच्या मते युरोप व आफ्रिका सिमेवरील खर्गर लोक हेच गुर्जर असावेत. **परंतु, चि.वि.वैद्य, मुन्शी व ओझा यांच्या मते गुर्जर हा प्रदेश होता. त्यात जोधपूर, जयपूर, अलवार व मेवाडच्या उत्तर भागाचा समावेश होतो. हे लोक तेथील असून मूळ आर्य आहेत. असे संशोधक सप्टेंबर १९८४, पृष्ठ १५ चा दाखला देऊन, डॉ. चौधरी जळगाव जिल्हा गॅझेटियर, पृष्ठ १८६ वर लिहितात.**

अंजनेरी (नाशिक जिल्हा) ताम्रपटानुसार इ.सन ७१० मध्ये नांदीपूर (भडोच जिल्ह्यातील राजपिपला तालुक्यातील नांदोद गाव) विषयावर (जिल्ह्यावर) जयभट नामक गुजर राजाचा अंमल होता. (देव पूर्वोक्त, पृष्ठ ३६) त्यावरून गुजर तत्कालीन सम्राटांचे गुजराथमधील मांडलिक असावेत. गुजरांचे जिल्ह्यात रेवा किंवा लेवा, दोरे, दाले गरी, अनाळा, बड किंवा लोंडारी, खापरा व सूर्यवंशी हे पोटभेद आहेत. त्यापैकी लेवा व दोरे गुजर बहुसंख्य आहेत.

सन १९१८ मधील 'लेवापुराण' ग्रंथानुसार **लेवा गुजर मूळ काश्यप गोत्राचे आहेत.** मथुरेच्या पश्चिमेस लेहकपूर गावचे लेवावंशीय लोक विक्रम संवताचे २०० वर्षांपूर्वी सिकंदराचे पंजाबवरील

आक्रमणास विरोध करण्यास गेलेल्या मधुरेच्या सैन्यात लेहकपूरातील लेवावंशी सैनिकही होते. गुजराथेत अजय नामक राजाने लेवा वंश वसविला. **चिनी प्रवासी युवान च्यांग हा इ.सन. ६४० मध्ये लिहितो की, गुजराथमध्ये वृधनगर या सुंदर भागात लेवा व कडवा लोकांची सुखी वस्ती होती, लेवा शाखेतून लेवा गुजर व लेवा पाटीदार (कणबी) आणि कडवा शाखेतून कडवा गुजर व कडवा पाटीदार (कणबी) अशा उपशाखा निर्माण झाल्या असाव्यात.** लेवा गुजर स्वत:स लहू राजा व त्याचे पुत्र अमरी गंत जमादी गंत, मेहरी गंत, सुरादी गंत यांचे वंशज मानतात. आपण रणथंबोर (राजस्थान) येथून आल्याचे ते सांगतात. (खानदेश गॅझेटियर, १८८०, पृष्ठ ६३ पहा). रणथंबोरहून जुनागड, अहमदाबाद, पावागड व चंपानेर, नर्मदा खोऱ्यातील नीलगड, नेमाड पुर्वेस (निमार) आणि कुरगुंद, खानदेशात असे क्रमाक्रमाने विस्तारत स्थानांतरीत होत होत या मार्गे आले. यापुढे मात्र काही थाळनेर डोंगराच्या अलिकडे व काही असीरगडजवळील तापी खोऱ्यात विसावले. हे आस्थलांतर अकराव्या शतकातील असावे. चोपड्याच्या भाटांच्या नोंदीनुसार गुजर नंदुरबार मार्गे संवत १२३४ च्या सुमारास खानदेशात आले. इ.सन १२१९ मध्ये जामनेरच्या देशमुखीचे गवळ्याकडून लेवा गुजराकडे हस्तांतर झाल्याचा उल्लेख 'खानदेश गॅझेटियर' १८८०, पृष्ठ ६३ वर सापडतो. त्यावरून लेवा गुजर १२१९ पूर्वीच खानदेशात आल्याचे सिद्ध होते.

खानदेशातील लेवा गुजर १२१९ पूर्वी अहमदाबाद व बडोदे चरोतरमधील असून ते यावल, रावेर, जामनेर, एरंडोल, एदलाबाद तालुक्यातील ऐनपूर, खिर्डी, निंभोरे, चांगदेव, तांदलवाडी, केऱ्हाळे, दसनूर, सिंगनूरकर, निंबोल, पिप्री, मांगलवाडी, अंतुर्ली, बलवाडी, कुंभारखेडा, पळसखेडा, पिंपळगाव, उन्नाण, दुसखेडा, म्हैसवाडी आदी गावात बहुसंख्य आहेत. त्याची ३६० कुळे आहेत.

लेवा गुजरांचे लग्नविधी लेवा पाटीदारांसारखेच आहेत. ते १८८० च्या 'खानदेश गॅझेटियरात' पहा. यांचा पंचायत प्रमुख रावेर तालुक्यातील ऐनपूर गावच्या छलोत्रा कुटुंबातील वसिष्ठ गोत्राचा आहे. दोरे गुजर प्रमुख चोपड्याचा देशमुख आहे. यास शहाजहानने देशमुखी दिली आहे. **कडवा गुजर उंझा येथील उमिया माता (गुजराथ) या कुळदेवीस भजतात.**

'दैनिक लोकमत' रविवार ता. २९ नोव्हेंबर १९८७ च्या, लोकमत साहित्यजत्रा अंकाचे पृष्ठ ९ वर डॉ.मु.ब. शहा यांचा 'इतिहास गुर्जरांचा' हा एक उत्कृष्ठ असा संशोधनपर लेख गुर्जरांच्या पूर्वेतिहासावर मुलभूत प्रकाश टाकतो. त्यांच्या मते महाराष्ट्रात जळगाव, धुळे, शहादा, नागपूर भागात मुख्यत: गुर्जरांची वस्ती आहे. मालेगाव परिसरातही ते आढळतात. बडोदा शहरातील गुर्जर भाट व चारण यांच्याजवळील वंशावळ्या सिद्ध करतात की, महाराष्ट्रातले 'पाटील' आणि गुजराथेतील 'पटेल' हे सुमारे १००० वर्षांपूर्वी पंजाबातील होशियारपूर भागातील शेतकरी होत. **मूळचे क्षत्रिय असलेले हे गुर्जर किंवा गुजरवंशीय ११ कोटी लोक सर्व धर्मात समाविष्ट झाले.**

जम्मू, काश्मिर, हिमाचल, हरियाणा, दिल्ली, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र व गुजराथ ही गुर्जरांची वस्तीची राज्ये आहेत. त्यांच्या नावावरूनच गुजर खासी, गझनीजवळचे गुजरानी, पंजाबातील जम्मू, गुजराणवाला, गुजराधार व गुजराथ हे जिल्हे, गुजर ताळ, गुजर नगर, गुर्जर गढ (ग्वालियर) गुर्जर देश, गुर्जर मंडळ ही भूखंडे व इलाखे गुर्जरांच्या नावावरून ओळखतात.

सुप्रसिद्ध पुरातत्त्ववेत्ता सर हर्बर्ट रिजलेने सन १९०१ मध्ये आर्य जातीवरचा आपला जो रिपोर्ट प्रसिद्ध केला त्यात गुर्जरांना प्रथम श्रेणीतील आर्य सिद्ध केले होते. रिजलेच्या मते गुर्जराच्या नाकाचा इंडेक्स ६४.८ हा आहे. जो दुसऱ्या कुठल्याही आर्य जातीच्या नाकाचा नाही.

येथल्या गुर्जरांनी इ.सन ६०० ते १३०० पर्यंत सर्व बाह्य आक्रमकांचा प्रखर विरोध केला. विशेषत: अरबांचा, हूण सम्राट मिहिरकुलाचा पराभव करून हूण सत्येचा शेवट करणारा राजा यशोवर्मा ज्याला मंदसौरच्या शिलालेखात सिंधू ते ब्रह्मपुत्रापर्यंतचा सम्राट म्हटले गेले आहे, गुर्जर जातीय संघाचा निर्माता मानला जातो. भिन्नमाल किंवा भिन्नसाल ही या संघाची राजधानी होती.

बाणभट्टाच्या 'हर्षचरित्रात'ल्या चतुर्थ उच्छ्वासात प्रथमत: गुर्जर जातीचा उल्लेख येतो, आणि **चिनी प्रवासी हुएनत्संगाच्या प्रवास वर्णनात भिन्नमाल शहराचा व तेथील गुर्जर राजांचा संदर्भ** येतो. हरिश्चंद्र हा गुर्जर राज्याचा संस्थापक मानला जातो.

प्रतिहार, चौहाण, चालुक्य, परमार हे स्वत:ला गुर्जरेश्वर म्हणवितात. रजपूत जातीचा उल्लेख तेराव्या शतकापर्यंत इतिहासात सापडत नाही. अग्नीकुंडातून चार राजपूत घराण्यांचे उत्पत्तीची कथा ही शेवटी कथाच मानावी लागेल. **गुर्जर स्वत:ला राजपुत्र म्हणवून घेत असत व त्याचाच अपभ्रंश राजपूत झाला. पुढे राजपूत ही एक स्वतंत्र्य जात झाली पण मुळचे ते सर्व गुर्जरच आहेत.** आर्य, हुण, मुगल यांच्याशी झुंझणाऱ्या गुर्जरांनी इंग्रजाविरुद्ध पहिले बंड केले.

उत्तरप्रदेशातल्या सहराशनपूर जिल्ह्यात खुबड पवारांचे (परमार) अवघ्या १९०० गावांचे लंढोरा राज्य होते. त्या घराण्यातला सेनापती जोगराज सिंहाने इ.सन १३९८ त तैमुरलंगाचा दारुण पराभव केला. इ.सन १८१३ मध्ये लंढोरा राज्याचा राजा रामदयालचा वंशज विजयसिंह गुर्जराने इ.सन १८२२ मध्ये इंग्रजाविरुद्ध प्रखर संघर्ष केला होता. इंग्रजांनी गुरखा फलटणीच्या सहाय्याने ते बंड मोडले. त्याचा इतिहास एच.डी. वाल्टन व एच.आर.नेविल या दोन इंग्रज अधिकाऱ्यांनी 'डेहराडून गॅझेटियर' मध्ये लिहून ठेवला आहे.

'एन्सायक्लोपिडिया, इंडियन ॲण्ड ईस्टर्न सदर्न एशिया' चा लेखक- सर जॉन वेलकोरने गुर्जराविषयी लिहिले की, चारही बाजूंनी जी गुर्जरांची नावे (इ.सन १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धापर्यंत) ५० वर्षे अगदी शांत होती ती एकाएकी भडकून उठली, आणि मेरठमध्ये दंगा झालवर काही तासातच त्यांनी सर्व जिल्हे लुटले. कोणी महत्त्वाचा अधिकारी त्यांच्या गावात आश्रयाला गेला तरी त्याला सोडले नाही. आणि खुलेआम बंड पुकारले. वेलकोरच्या मते ५० वर्षांपासून ते विद्रोहाची तयारी करीत होती. पूर्वी दिल्लीच्या जळपासची सर्व गावे गुर्जरांची होती. ती हटवून दिल्लीचा विकास केला. **आजही दिल्लीच्या जवळपास गुजर जाटांची संख्या खूप आहे. श्रीमती इंदिरा गांधींचा मृत्यू झाल्यानंतर दिल्लीत उसळलेल्या दंगलीत गावाहून सर्वात आधी दिल्लीत दाखल होणाऱ्यात गुजर प्रमुख होते.** सन १९८४ चा पी.यु.सी.एल. चा रिपोर्ट याची माहिती देतो.

गुर्जराबद्दलची माहिती, 'इंडियन म्युटिनीचा' लेखक- सर विल्यम म्योर, 'इंडियन एम्पायरचा' लेखक मार्टिस, सर जॉन लॉरेन्स या १८५७ मधील दिल्लीच्या कमिश्नरने लिहिलेले लाईफ ऑफ लॉर्ड लॉरेन्स हे पुस्तक उत्तर प्रदेश आर्काइव्हजचे प्रमुख डॉ. श्रीवास्तव यांनी लंडनच्या 'लिड पब्लिक लायब्ररीत' त्या वेळच्या गव्हर्नर जनरल लॉर्ड कनिंगला लॉर्ड पामर्स्टनने लिहिलेल्या पत्रतातील गुर्जराविषयीची माहिती, तसेच, 'गुर्जरांची वीरगाथा' लिहिणाऱ्या रतनलाल वर्माचा '१८५७ चे वीर गुर्जर' लिहिणाऱ्या गणपत सिंहाचे वर्णन वाचून गुर्जराबद्दल माहिती मिळू शकते.

त्या पत्रव्यवहारावरून मात्र कळते की, १८५७ सालच्या लखनऊतल्या बंडात जवळपास पाच लाख गुजर मारले गेले. म्हणून इंग्रज त्याचा उल्लेख 'गुर्जर म्युटिनी' म्हणून करतात. सर्व देशभर सुमारे बारा लाख गुजर मारले गेले असावेत असा 'गुर्जरांची वीरगाया' लिहिणाऱ्या रतनलाल वर्माचा '१८५७ चे वीर गुर्जर' ग्रंथाचा लेखक गणपत सिंहाचा अंदाज आहे.

इ.सन ५० पासून थेट आजपर्यंत गुर्जराविषयीचे संशाधन व्हायला हवे, असे. प्रा. डॉ.मु.ब.शहा यांनी लिहून हा 'दै. लोकमत' रविवार ता. २९.११.१९८७ च्या लोकमत साहित्य जत्रा, अंकाचे, पृष्ठ ९ वरील लेख समाप्त केला.

कूर्मकश्यपाचे कुळात सूर्यवंशी क्षत्रिय लेवा पाटीदार कुळातील हल्लीचे मराठी भाषिक लेवा पाटीदार आपला पूर्वेतिहास पूर्णपणे विसरलेत. सिंहाची पिले मेंढरांच्या तांड्यात वाढल्याने स्वस्वरूपाला पारखे होतात. त्या सिंहाचे छाब्यांना त्याच्या वंशकुळीच्या व स्वस्वरूपाच्या सगोत्रियांचे सहवासात आणून परिचय करून दिल्यास आत्मकुळीचे भान जागृत होऊन त्याचा शेळपट स्वभाव पालटून

तो मूळ सिंहजातीचे वळणावर जीवन परिवर्तित करतो. तसेच. हल्ली मूळ वंश. तेज. इतिहासादी परंपरेचे ज्ञान, शिक्षण व संस्काराचे अभावी विसरल्यामुळे हल्लीचा शेळपट बनलेला लेवा पाटीदार उगमस्थानीच्या मूळ शूर वीर महापुरुषाप्रमाणे तेजस्वी व्हावा. त्याला आत्मवंशाचे व आत्मस्वरूपाचे, आपल्या इतिहास परंपराचे ज्ञान होऊन 'अदीन: स्याम शरद: शतम' ह्या वेदोक्तीप्रमाणे तेजस्वी रीतीने बाणेदार वृत्तीने निर्भयतेने जगावा ह्यासाठी थोडे विषयांतर करून हा सूर्यवंश अपखंडीत होत-होत तापी पूर्णेच्या खोऱ्यातील २३० गावांच्या छोट्याशा डबक्यात सुमारे साडेसार लाख लोकवस्ती एवढ्या छोट्याशा समाज शकलात शेळीमेंढीच्या स्वभावाने जगत आहे. संघटना नाही. संस्कार परंपरा नाही. स्व इतिहासाचे ज्ञान व भान नाही. म्हणून विस्कळीत व ठिसूळ समाजरूपाने असंघटित म्हणून दुर्बल व तेजोहीन वृत्तीने जगत आहे. त्याला स्व-कुळाचे-पूर्व परंपरांचे, स्वत:च्या इतिहासाचे व पूर्वी बलाढ्य असलेला सूर्यवंश अपखंडीत होऊन तुकडे पडत पडत अनेक जाती **रूपाने जसे जाट, शीख, रजपूत, कुणबी, गुर्जर, लेवा पाटीदार, कडवा पाटीदार, मुसलमान, मराठा आदी जातीधर्मात विभागला जात जात लहान होत गेला.** म्हणून दुर्बल झाला. असंघटित झाला. अज्ञानाने पूर्वेतिहास व पूर्व परंपरा विसरला. त्याची एक एक शाखा तेजस्वी होती पण तेजोहिन बनत चालली.

सर्व जाती, पोटजातीचे एका वर्णात एकत्रीकरण करून ब्राह्मणांनी आपल्या सर्व जाती पोटजातींची एकसंघ गोधडी शिवून त्यावर ते सुखाने विसावतात. तर एका गोधडीचे जाती-जातीत टुकडे करून गट करून हा क्षत्रिय वर्ण अपखंडित झाला. एवढा अपखंडित झाला की स्वशाखेत वराला अनुरूप वधू मिळणे अल्पसंख्येमुळे दुर्मिळ होऊन मिळेल त्या वधूबरोबर संसाररथ हाकावा लागतो. काय ही आमच्या समाजातील बांधवांची हीन दशा होय. **ही जाण यावी म्हणून ह्या इतिहासाचे सविस्तर लेखनामुळे स्व-जातीगटाचे ज्ञान होऊन पायरी-पायरीने आपल्या रक्तगटांचे व त्या रक्तगटातील जातीउपजातींचे एकत्रीकरणाचा रस्ता दिसावा म्हणून मराठी भाषिक लेवा पाटीदारांचा इतिहास उगमाकडे जात-जात-स्वरक्तगटांचे जाती गटासंबंधी बुध्याच विषयांतर करून ओळख करीत गेलो.** कारण लेवा पाटीदारांचे प्रजोत्पादनार्थ मोठा रक्तगट असावा. फार काय **आपला रक्तगट सोडून इतर रक्तगटाशी रक्तसंकराने बहुगुणी संतती झाल्याचे पूर्वेतिहासात अनेक पुरावे मिळतात.** म्हणूनच इतर जातीधर्मांच्या मुलीशीही पूर्वीच्या राजेरजवाड्यांनी लग्ने केल्याचा इतिहास श्रुती-स्मृति पुराणातूनही सापडतो. चंद्रगुप्त मौर्याची पत्नी तर सेल्यूकस निकेटरची कन्या होती. हा भारतातील पहिला आंतरजातीय. आंतरधर्मीय. आंतरवर्णीय. आंतरदेशीय विवाह ठरला.

ऋग्वेद १/२७ मध्ये "कुर्मो गार्त्समदो गुत्समदो वा ऋषि: ।" ह्या वचनानुसार "राजर्षि कुर्मी सुप्रसिद्ध वैदिक ऋषी गुत्समदचे सुपुत्र होते ।" असे. कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा. लेखक डॉ. रामसिया सिंहचे पृष्ठ १६ वर पहा. "या महान ऋषी कूर्माचे वंशज कूर्मवंशी म्हटले गेले. शिवाय कूर्म व सूर्य (आदित्य) एकच आहेत म्हणून त्यांना सूर्यवंशी म्हटले जाते ।" असे डॉ. सिंह याच पृष्ठ १६ वर पुढे लिहितात.

या गुत्समदाचा बिजातीय रक्तगट असल्याचे माझे वाचनात आले. उदा. नागपूरचे 'दैनिक लोकमत' अकोला बुलढाणा, आवृत्ती साहित्य जत्रा पुरवणी रविवार ता. १३ जुलै १९९७, लोकमत भवन, पं.नेहरु मार्ग, पोस्ट बॉक्स क्र. २१६, नागपूर १२. कार्यकारी संपादक- मदन धनकर. पृष्ठ २ वर 'आमचे वऱ्हाड' लेखक प्रा.डॉ. अशोक मेनकुदळे या लेखात प्रथम स्तंभात लिहितात की, "इंद्राने गौतमाचे रूप धारण करून अहिल्येशी जो व्यभिचार केला त्या व्यभिचारापासून झालेला गुत्समद याने ऋग्वेदातील द्वितीय मंडल रचले. वऱ्हाडात प्रथमच कळंब (यवतमाळ) येथे गुत्समदाने कापसाची लागवड केली. व कापड करवून घेतले. भागाकार व गुणाकार याचा शोध. चंद्रकिरणांचा गर्भाचे वाढीवर होणारा विशिष्ट परिणाम; हे त्याचे अद्वितीय शोध आहेत. असा हा कळंबचा

गुत्समद महान गणिती व संशोधक होऊन गेला."

'कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा' ग्रंथाचे, पृष्ठ १५, परिच्छेद २ मध्ये शेवटच्या ओळीत डॉ.रामसिया सिंह लिहितात की, "इस तरह कश्यप और कूर्म दोनो एकही शक्ती के दो पहलू है ।"

"यह सारा जगत परमेश्वर द्वारा रचा गया है । इसलिये उसकी संज्ञा कूर्म है । कश्यप ही कूर्म है । परमेश्वर का ही नाम कश्यप है । "(सायत्कूर्म:) परमेश्वरेणेद सकल जगत क्रियते तस्मादस्य कूर्म इति संज्ञा । कायपौवै कूर्म इत्यनेन परमेश्वरस्वैव कश्यप इति नामास्ति । ऋग्वेदादि भाष्य भूमिका पृष्ठ ३१५" (कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, पृष्ठ १५ पहा).

महाभारतात मात्र १. मरिची, २. कश्यप, ३. विवस्वान, ४. मनु, ५. ईक्ष्वाकू असा वंश दिल्याचे डॉ. आंबेडकर 'शूद्र मूळचे कोण होते ?' या ग्रंथात पृष्ठ २०८ वर देतात. ह्याच प्रभू रामचंद्राचे सूर्यवंशात हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजीचा जन्म झाला. (मध्ययुगीन भारताचा इतिहास खंड २ रा, प्रकरण ९ वे युगप्रवर्तक शिवराज, पृष्ठ ९ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा 'शूद्र मूळचे कोण होते ?' पृष्ठ १९६ आणि मराठी आडनावे, लेखक- डॉ. रामगोपाल सोनी पृष्ठ ६४ ह्या तीन संदर्भावरून छत्रपती शिवाजी हा सूर्यवंशी क्षत्रिय होता हे दिसते.

बौद्ध धर्म संस्थापक बुद्धाचा जन्म हाही सूर्यवंशी अर्थात शाक्यवंशी कुळातच झाला. (मराठी आडनावे, ले. डॉ.सोनी, पृष्ठ ५८ वरील शेवटचा परिच्छेद पहा). या सूर्यवंशात राजा जनक, विश्वामित्र, राजा श्रीयाळ, चांगुणा, रोहिदास, नळराजा, दमयंती हे श्रेष्ठ क्षात्र झाले असे क्षात्रधर्म लेखक- खंडेराव अप्पाजी मोरे, दिंडोरी दरबार पृष्ठ १६ वर पहा.

गुरुवार ता. १८-२-१९९३ च्या 'दै. लोकमत'च्या रंगधारा पुरवणी पान ३ वर 'शिंदखेडकरांचा सत्य इतिहास आणि संशोधन' ह्या संशोधनपर लेखात, स्तंभ ४ मध्ये श्री. बा.स. गर्जाभये, सहाय्यक संचालक, पुरातत्त्व विभाग, महाराष्ट्र शासन, मध्यवर्ती संग्रहालय परिसर, नागपूरकरांनी खिंदखेडकर जाधव हे भानुवंशी अर्थात सूर्यवंशी रामाच्या वंशातील असल्याचे साधार सिद्ध केले. देवगिरीकर यादवापेक्षा वेगळे कुळ असलेले लखुजी जाधव हे सूर्यवंशी होते. तसेच, याच सूर्यवंशी कुळात राजमाता जिजाबाईचा जन्म झाला.

मोगलांनी ज्याचा धसका घेतला असा मोगलांना दे माय धरणी ठाय करून सोडणारा धनाजी जाधव हा मराठ्यांचा शूर सेनापती ह्याच शिंदखेडकर सूर्यवंशी जाधव घराण्यात जन्मला, असे डॉ. मेनकुदळे यांनी 'दै. लोकमत' ता. १३-७-१९९३ च्या अंकात, पान ३, स्तंभ ८ मध्ये म्हटले आहे. व हा वंश 'दै.लोकमत' १८-२-१९९३ च्या अंकात, पान ३, स्तंभ ४ मध्ये सूर्यवंशी असल्याचे वर दिलेच आहे.

ता. ६ जुलै १९९५ च्या, 'दै. नागपूर पत्रिकेत', श्री. खुशाल खडसे, पृष्ठ ४ वर म्हणतात की, **"जो समाज इतिहास विसरतो तो इतिहास घडवू शकत नाही."** यांचा प्रत्येक लेवा पाटीदाराने विचार केल्यास ह्या विषयावर इतक्या तनमनधनाने का लक्ष द्यावे हे लक्षात येईलच.

'लेवा पाटीदार' ही कुणबी क्षत्रिय जातीची पोटजात आहे, आणि ह्या रक्तात (जातीत) एवढे थोर स्त्री-पुरुष झालेत याचा आपणास अभिमान असावा व त्यापासून प्रेरणा घेऊन आपले तेज वर्धिष्णु करावे यासाठीच इतिहास लेखन व वाचन प्रेरक म्हणून अत्युपयोगी ठरते.

प्रकरण २६

संदर्भ सूची

१. महाराष्ट्र १९९१, संपादक, डॉ. संतोष दास्ताने, प्रकाशक- रामचंद्र आणि कं. ८३०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, पृष्ठ ३७६.

२. कूर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा, लेखक डॉ. राम सिया सिंह, (एम.ए.एल.एल.बी., बी.एड पी.एच.डी.,) प्रकाशक समता प्रकाशन, सरस्वती विहार, कॅम्प रोड, कृष्णादाल मिल के सामने, सतना, मध्यप्रदेश (लेखक मध्यप्रदेशातील मंडला जिल्ह्यात गाडासराईस राहतात।) आवृत्ती १९९२.

३. सामान्यज्ञान १९९४, ले. प्रा. संजीवन नलावडे व प्रा. सौ. इरावती नलावडे, प्रकाशक दास्ताने रामचंद्र आणि कं., ८३० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, आवृत्ती १९९४.

४. मनोरमा इयर बुक १९९३, प्रधान संपादक के.एम.माल्यू, मल्याला मनोरमा कंपनी लि. कोट्टयमसाठी माम्मन माल्यू द्वारा प्रकाशित, कोटय्यम ६८६००१, केरल, भारत, रजिस्ट्रेशन नंबर ४४६९९/८९, पृष्ठ ७३६.

५. महाराष्ट्राचे जिल्हे जळगाव, महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्ध खात्याचे प्रकाशन, पृष्ठ १९७, मुंबई.

६. महाराष्ट्र जिल्हे बुलढाणा, पृष्ठे ५१, प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र सरकार, मुंबई.

७. Buldhana District Gazetteer (Revised Edition)सन १९७६ प्रकाशक: The Executive Editor and Secretary, Gazetteer Department Govt. of Maharashtra, Bombay.

८. Jalgaon District Gazetteer (Revised Edition). (Edition first 1880) second Edition (Revised)1962. Published by the Director, Govt. Printing and Stationary, Maharashtra State, Bombay -4. Pages 945.

९. जळगाव जिल्हा गॅझेटियर, जळजाव जिल्हा, संपादक- डॉ.कि.का. चौधरी, (एम.ए., पी.एच.डी.,) मराठी आवृत्ती, सुधारित १९९४, पृष्ठे ८६४, प्रकाशक- कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

१०. महाराष्ट्र : भूमि व लोक संपादक. डॉ. कि.का. चौधरी मराठी आवृत्ती सुधारित १९९६, मूल्य १७५ रुपये, पृष्ठे ४६७, प्रकाशक कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

११. आपले लेवा परिवार, ऑक्टोबर ते डिसेंबर १९९४, संपादक- महेंद्र ओ. राणे, बी/३, रविकिरण, महात्मा फुले मार्ग, मुलुंड (पूर्व) मुंबई ४०००८१.

१२. यूथ कॉम्पिटिशन टाईम्स, प्रधान संपादक आनंदकुमार महाजन, संपादकीय कार्यालय ३२/३ एच, इंडिया, अल्लापूर, इलाहाबाद -६, फोन ६६०६२१, मूल्य १२०, पृष्ठ ३८१.

१३. युनिफाईड इतिहास (प्रारंभ से १७६१ इ. तक) लेखक डॉ. ए.के. मित्तल, सन १९९५, पृष्ठे ४२४, मूल्य ७० रुपये., प्रकाशक साहित्य भवन पब्लिकेशन्स, हॉस्पिटल रोड, आग्रा २८२००३, आवृत्ती ३ री. १९९५.

१४. महाराष्ट्र राज्य परिचय, आवृत्ती १ली, १९६०, पृष्ठे १३२ प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र सरकार मुंबई - ३.

१५. आपले लेवा परिवार, त्रैमासिक, वर्ष १ अंक २, एप्रिल ते जून १९९४, संपादक, महेंद्र ओ.

राणे., बी/३, रविकिरण, म.फुले मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०००८१.
१६. ब्राह्मणी साहित्य लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भाषांतर बाबा दळवी, मुद्रक व प्रकाशक उषा वाघ, सुगावा प्रकाशन, ८६१/१ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.
१७. महाराष्ट्र सारस्वत ले.क. विनायक लक्ष्मण भावे, पुरवणी लेखक शंकर गोपाळ तुळपुळे. पुणे विद्यापीठ, आवृत्ती ४ थी, शके १८७३, एकूण पृष्ठे ११३९, मुद्रक व प्रकाशक वि.ग. माटे विश्‍वकर्मा, मुद्रणालय, १९६/६९ टिळक रोड, पुणे २.
१८. महाराष्ट्राचे जिल्हे अकोला, महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धी खात्याचे प्रकाशन, मुंबई.
१९. महाभारत युद्ध कालनिर्णय समस्या ले. श्रीराम साठे, मराठी अनुवाद श्री. बाबासाहेब आमटे स्मारक समिती, मुंबई, प्रकाशक, सचिव श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ, सोलापूर ४१३००१ प्रथमावृत्ती ता. १२ एप्रिल १९८७.
२०. स्मरणिका, भोरगाव लेवा पंचायत, पाडळसे, (ठाया दाताळा) विभाग, मलकापूर, युवक युवती मेळावा. ता. १३ जानेवारी १९८५ संपादक :- शंकर विठोबा पाटील दुधलगावकर, खडर्से, खर्चे, फिरके, वराडे, प्रकाशक श्री. तुकाराम हरी पाटील, डिघीकर चाळ, मलकापूर, जिल्हा बुलढाणा, निवडमंडळ सदस्य, भोरगाव लेवा पंचायत पाडळशे, ता. यावल, जिल्हा जळगाव.
२१. कुलमी क्षत्रिय पाटीदारोंका इतिहास लेखक डॉ. मंगुभाई रामदास पटेल, रीडर, गुजराथ युनिव्हर्सिटी, अहमदाबाद, गुजराथ, प्रकाशक जयंतिभाई पटेल, पाटीदार संशोधन और प्रकाशन ट्रस्ट, गज्जरका बंगला, आस्टोडिया रोड, अहमदाबाद ३८०००१ (गुजराथ) प्रथम आवृत्ती १९९१ मूल्य १८० रुपये, पृष्ठे ४४८.
२२. कुणबी/ मराठा समाजातील तरुणांना आव्हान, लेखक व प्रकाशक: बा.कृ. भैदरकर, श्री. नरकेसरी प्रेस, श्री. नाथ की तलैया, जबलपूर, तारीख १०-४-१९७२.
२३. इटारसी नागरी कुर्मी महिलाओंका एक समाजशास्त्रीय अध्ययन नावाचा कु.सीमा सचान यांनी सन १९९३ मध्ये समाजशास्त्र विषय विभागांतर्गात पीएच.डी. उपाधी हेतू बरकत उल्लाह विद्यापीठ, भोपाळ येथे सादर केलेला शोध प्रबंध.
२४. The Imperial Gazztteer of India Vol. V. Abazai to Arcot., New Edition, Today & tomorrow Printers and Publishers 22B/5 original Road, New Delhi 5 (India) which is reffered from Bhopal University Coll No. 910-354 R. Book 1, Accession NO. 2148 Page 910-354 R. Book 1 Accession No. 2148 Page No. 96 to 99 only.
२५. साप्ताहिक सहारा दिवाळी विशेषांक संपादक श्री. वसंतराव शिंदे, यमुना नगर, सेक्टर नं. २१, स्कीम नं. ६, बिल्डिंग ३६. प्लॉट नं. ९, प्राधिकरण, निगडी, पुणे ४११०४४, दूरध्वनी क्रमांक - ७७२४४८.
२६. मराठी आडनावे ले. डॉ. रामगोपाल सोनी, पृष्ठे २८६, मूल्य १३० रु. प्रकाशक नि.सी. मुजुमदार, मनोहर कथा प्रकाशन, मुजुमदार बंगला, पोस्ट ऑफिसचे मागे गिरिपेठ, नागपूर ४४००१०.
२७. आपले लेवा परीवार संपादक म.ओ. राणे, जानेवारी ते मार्च १९९४, बी/३ रविकिरण, म.फुले मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०००८१ + एप्रिल ते जून १९९४ चा याच मासिकाचा अंक.
२८. श्रीमत् भगवतगीता
२९. ज्योतिर्मयुख ले. कै. गोविंद रामचंद्र मोघे, प्रकाशक मधुकर शिवराम कस्तुर, तुकाराम बुक डेपो, बुकसेलर्स, पब्लीशर्स, माधवबाग, मुंबई नं. ४, आवृत्ती ८ वी सन १९६९, मूल्य ६०

रु., पृष्ठे ३५२.

३०. क्षात्रधर्म ले. ब्र.भू. खंडेराव अप्पाजी मोरे, ता. १२-१२-१९८९. प्रका... ल काशिनाथ जाधव, श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास केंद्र, को... ल्हापूर.

३१. जाती भास्कर संपादक पंडित ज्वालाप्रसाद मिश्र प्रकाशक मे. खेम... श्रीकृष्णदास अध्यक्ष, श्री. व्यंकटेश्वर प्रेस, मुंबई ४ के लिए दे.स. शर्मा, मॅनेजर द्वारा ...टेश्वर प्रेस खेतवाडी, मुंबई ४, मुद्रित.

३२. लेवा परिवार जुलै १९९१ व ऑगस्ट १९९१ संपादक प्रा.डॉ. कमलाकर ...क (वडाद) ...शक - श्री. विष्णु अवचित नेमाडे, ब्लॉक १५/१७१ गुहा कॉलनी, आज... रोड ...नी बो/ ३ रविकिरण, म.फुले मार्ग, मुलुंड पूर्व मुंबई ४०००८१ येथे प्रसि... केले.

३३. लेवा परिवार ऑक्टोबर १९९१ संपादक प्रा. डॉ. कमलाकर ढाके ...पत्ता ... ३२ प्रमाणे तसेच, नोव्हेंबर १९९१ चा अंक.

३४. श्री. राजेंद्र संस्मृति ग्रंथ, संपादक बालमुकुंद मिश्र, प्रकाशक साधना ...हित्य परिषद, ... शहाडोल, (म.प्र.) ४८४००१.

३५. शूद्र मूळचे कोण होते ? लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रकाश... गजेंद्र विष्णु ...वंशी रघुवंशी प्रकाशन, २४२ ब, शुक्रवार पेठ, पुणे २, मराठी आवृत्ती.

३६. The Tribes of castes of the North Western India, wri... William Crook... Vol.III., Editor - Casmo Publications Delhi, Pin - 100006 India Editio... in 1975, Page 346 to 359 Kurmi - Kunbi.

३७. लेवा परिवार त्रैमासिक वर्ष २ अंक ३ सप्टेंबर ते ऑक्टो. नोव्हेंबर १९... संपादक ... ३ रविकिरण, म.फुले मार्ग, मुलुंड (पूर्व)मुंबई ८१.

३८. क्षत्रिय मराठ्यांची वंशावळी व शहाण्णवकुळी आणि सूर्य, सोम, ब्रह्म व शेषवंश... लेखक बाळाजी नथुजी गावंड व गोविंद मोरोबा कार्तेकर, प्रकाशक मधुकर शिवराम कस्तुरे, मॅनेजर तुकाराम बुक डेपो, बुकसेलर्स पब्लीशर्स, माधव बाग, मुंबई - ४

३९. ब्राह्मणशाहीचा विजय - लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुवाद... य. दळवी ... प्रकाशक व मुद्रक - उषा वाघ, सुगावा प्रकाशन, ८६१/१ सदाशिव पेठ, पु...

४०. पिंपरुड कोल्हे कुलवृत्तांत, लेखक डॉ. आनंदा कौतिक कोल्हे, ४... शिवाजी ... पुणे ४११००५, प्रथमावृत्ती ता. १२-११-१९९६.

४१. Tourism directory Orissa 3rd Edition 1982 by Department of Tourism Government of Orrissa, Bhuvaneshwar.

४२. भारतके प्रमुख तीर्थ लेखक अशोक कौशिक, प्रकाशक डायमंड पॉकेट ... दरियागंज, नई दिल्ली ११०००२.

४३. श्री. रामजन्मभूमी का रक्त रंजित इतिहास लेखक स्व. पंडित रामगोपा... द (साहित्य रत्न) संपादक आचार्य गुदूनजी शर्मा - प्रकाशक राम लखन गुप्त, बुक... अयोध्याजी. विशेष संस्करण का पंचम अंक १९८३.

४४. श्री राम जन्मभूमीका प्रामाणिक इतिहास आवृत्ती ७ वी लेखक श्रीमती किरण सिंह एम.ए. (इतिहास) भीखसाह मंदिर अयोध्या, प्रकाशक :- श्री राम जन्म भूमी सेवा ट्रस्ट संस्थान. श्री राम जन्म भूमि मंदिर, (साक्षी गोपाल), अयोध्या (भारत), दूरभाष ५०.

४५. फकिरा हरी लेवा बोर्डिंग हाऊसचे सुवर्ण महोत्सवी स्मृतिपुष्प १९६८ संपादक श्री. रा. बा पाटील, प्रकाशन डॉ. गो.दो. बेंडाळे, अध्यक्ष लेवा एज्युकेशन युनियन जवाहर रोड, जिल्हा